[भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-ग्रंथमाला पुस्तक ८ वें]

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ

द्वितीय-संमेलन-वृत्त

संपादक व प्रकाशक

खंडेराव चिंतामण मेहेंदळे

चिटणीस

भाद्रपद शु० ५।१८३७

किंमत ३ रुपये

अनुक्रमणिका

परिशिष्ट

१ भारती युद्धाचा काळ

हिंदुस्थानाच्या ऐतिहासिक काळास भारती युद्धापासून सुरुवात होते ही गोष्ट सर्वतोमान्य आहे; पण भारती युद्ध कधीं झालें याजबद्दल तीव्र मतभेद अद्याप कायम आहे. यासंबंधानें मुख्यतः दोन मतें प्रचलित आहेत. एक सामान्य हिंदुजनसमूहाचें व दुसरें तद्विरुद्ध पाश्चात्त्य विद्वानांचें व कित्येक प्राच्य विद्वानांचें. सामान्य हिंदुजनसमूह भारती युद्ध, कलियुगारंभ व परीक्षिताचा जन्म एक मानून या गोष्टी शकपूर्व ३१७९ किंवा इ. स. पू. ३१०१ वर्षीं धरतात. नक्की बोलावयाचें म्हणजे शक १८३६ च्या पंचांगांत गतकालें ५०१५ दिला आहे, अर्थात् कलियुगास आरंभ श. पू. ३१७९ च्या चैत्र प्रतिपदेस झाला; त्यापूर्वीच्या फाल्गुनांत परीक्षिताचा जन्म झाला व त्यापूर्वीच्या मार्गशीर्षांत म्हणजे श. पू. ३१८० च्या मार्गशीर्षांत भारती युद्ध झालें अशी आमची परंपरागत समजूत आहे. या मतास सर्व भारतीय ज्योतिष्यांचें अनुमोदन आहे. हें च मत मीं हि स्वीकारिलें असून त्याचीं सविस्तर कारणें The Mahabharata a Criticism या माझ्या पुस्तकांत दिलीं आहेत. त्यांत मुख्यतः मेग्यास्थिनीसनें तत्कालिन हिंदुस्थानांत मिळविलेल्या माहितीवरून सँड्रकोटस् म्हणजे चंद्रगुप्त व डायोनिसास यांमध्यें १५३ पिढ्या झाल्या व डायोनिसासहून हिराक्लिस अथवा हरि १५ पिढ्या अलीकडे झाला असें जें विधान लिहून ठेविलें आहे त्याजवर जोर दिला आहे. चंद्रगुप्त व हरि म्हणजे श्रीकृष्ण यांमध्यें १३८ पिढ्या मानल्या तर दर पिढीस २० वर्षांप्रमाणें २७६० वर्षें होतात. यांत ३१२ इ. स. पू. चंद्रगुप्ताचा काळ मिळविला म्हणजे ३०७२ इ. स. असा श्रीकृष्णाचा काळ येतो. असो. आतां याच्या उलट पाश्चात्त्य विद्वान् असें म्हणतात कीं, "यावत्परीक्षितो जन्म यावन्नंदाभिषेचनम् । एतद्वर्षसहस्रं तु शतं पंचदशोत्तरम्" असें भागवतांत वचन आहे व जवळजवळ अशींच वचनें मत्स्य, वायु इत्यादि पुराणांत आहेत. चंद्रगुप्ताचा काळ इ. स. पू. ३१२ सिद्ध च आहे. त्यापूर्वीं शंभर वर्षें नंद व त्यापूर्वीं १११५ वर्षें परीक्षिताचा जन्म एतावता भारती युद्धाचा काळ १५२७ इ. स. पू. अथवा श. पू. १६०० वर्षें सरासरी असा येतो. या दोन विरुद्ध मतांच्या पोटांत दोनतीन मतांतरें आहेत. काश्मीरचा इतिहासकार कल्हण भारती युद्ध कलियुगारंभीं मानीत नाहीं. ६५३ वर्षें कलियुगाचीं गेल्यावर भारती युद्ध झालें असें तो मानतो.

(शतेषु षट्सु सार्धेषु त्र्यधिकेषु गतेषु च। अभवन कुरुपांडवाः)व याला आधार "षड्द्विक-पंचद्वियुतः शककालस्तस्य राज्ञश्च." युधिष्ठिराचा काळ २५६६ शकांत मिळविले म्हणजे येतो या वराहमिहिराच्या प्रसिद्ध वचनाचा देतो. दुसऱ्या म्हणजे अर्वाचीन काळाच्या पोटांत हि दोनचार मतें आहेत; म्हणजे श. पू. १६०० पासून तों १३०० किंबहुना १२०० पर्यंत हा काळ कित्येक विद्वान धरतात. तात्पर्य, प्राचीन काळांत दोन पोटमतें म्हणजे श. पू. ३१८० व २५६६ असून अर्वाचीन काळांत दत्त, काळे, अय्यर, वेबर, मॅकडोनेल, पारगिटर वगैरे विद्वानांच्या मतें भारती युद्धाचा काळ इ. स. पू. १४००।१३००।१२००। ११०० । १००० पर्यंत हि ठरतो. भारती युद्धाच्या काळासंबंधें मतभेदाचें थोडक्यांत स्वरूप असें आहे.

आतां स्थूल मानानें पहातां या दोन मुख्य मतांत फारच मोठा फरक म्हणजे १५।१६ शें वर्षांचा असल्यानें यांपैकीं कोणतें तरी एक मत चुकीचें आहे हें उघड आहे. अर्वाचीन काळाचे अभिमानी असें म्हणतात कीं, कलियुगाचा आरंभ ज्योतिष्यांनीं दिला आहे तो त्यांनीं गणितानें मागून काढला. कलियुगारंभ आणि भारती युद्ध हे दोन्ही काळ एक हें त्यांस कबूल आहे. कारण तसें भारतांतच सांगितलें आहे. पण त्यांचें म्हणणें असें आहे कीं, कलियुगारंभाचा अर्थात् भारती युद्धाचा काळ Tradition अथवा परंपरा हिच्या आधारावर ठरविला नसून तो ज्योतिष्यांनीं गणितानें मागाहून काढला. आतां पुराणांचें मत मी चुकीचें समजतों तें कसें तें सांगतों. पुराणांत भविष्यकथनरूपानें जें राजांचें वर्णन आलें आहे तें अर्थात् त्या राजांच्या मागूनचें आहे. कैलकिलयवनांचें नांव या यादींत अखेरचें आहे. हे राजे इ. स. ८०० च्या सुमारास झाले. अर्थात् ही यादी शेवटची ८०० च्या नंतरची आहे. कैलकिलयवनांपूर्वी जे शक, यवन, तुषार वगैरे राजे झाले त्यांची बेरीज व त्यापूर्वींचे आंध्र, काण्व, मौर्य वगैरे हिंदु राजे झाले, त्यांचीं बेरीज करून कलिकालाची जी संख्या त्या वेळीं प्रसिद्ध होती त्यांत वजा देऊन बाकीचीं वर्षें राहिलीं तीं परीक्षित् व नंद यांमधील अंतर असें पुराणकारांनीं ठरविलें. पण शक, यवन, तुषार इत्यादि म्लेच्छ राजांची बेरीज ते एकामागून एक झाले असें चुकीनें समजून जास्त झाली, वास्तविक ती इतकी मोठी नव्हती. कैलकिलयवनांपर्यंत अमुक वर्षें कलीचीं गेलीं याजबद्दल ज्योतिष्यांची संख्या व पुराणकारांची संख्या एकच आहे असें काळे यांनीं हि कबूल केलें आहे. सारांश, पुराणकारांची चूक एका कालीं झालेल्या राजांची बेरीज करण्यामुळें झाली असें माझें म्हणणें आहे.

मी म्हणतों, पुराणकारांची चूक झाली. प्रतिपक्षी म्हणतात, ज्योतिष्यांनीं चूक केली. या मतभेदाचा निर्णय कसा व्हावा याचा विचार करतां मला आणखी एक प्रमाण सुचलें तें मीं यापुर्वी लोकांपुढें मांडलेंच आहे. तें असें:—"एता वै कृत्तिकाः

प्राच्यै दिशो न च्यवन्ते " असें शतपथब्राह्मणात (२-१-२) वचन आहे. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं आपल्या 'भारतीय ज्योतिषशास्त्र' या प्रसिद्ध ग्रंथात याजवरून शतपथाचा काळ काढला आहे, तो इ.स.पू. सुमारें ३०००चा येतो. हा काळ Observation अथवा दृक्प्रत्यय-विधानावरून काढलेला असून हलण्यासारखा नाहीं. Indian Antiquary Vol XXII मध्यें हि एक लेख लिहून हा गोष्ट दीक्षितांनीं जगतापुढें इंग्रेजींत मांडली. पण कोणा हि युरोपियन पंडितानें याजबद्दल मतभेद प्रदर्शित केला नाहीं किंवा हा काळ खोडण्याचा प्रयत्न केला नाहीं. आतां माझें म्हणणें असें आहे कीं, शतपथब्राह्मण काण्ड १२ यांत पारीक्षित जन्मेजय व त्याचे तीन भाऊ यांचा उल्लेख आहे. हा जनमेजय पांडवाचा पणतू होय असें मी म्हणतों. वेबर हि असें च म्हणतो. जर भारती युद्ध इ. स. १२०० चें मानलें तर शतपथब्राह्मण काण्ड १२ हें इ. स. पू. ११०० चें मानावें लागेल. शतपथ-ब्राह्मण काण्ड २ वरील गणितानें इ. स. पू. ३००० चें ठरतें आणि काण्ड १२ इ. स. पू. ११०० चें म्हणजे या दोहोंत १९०० वर्षांचें अंतर येतें; पण दोहोंच्या भाषेच्या दृष्टीनें एवढें अन्तर यांत असूं शकत नाहीं असा माझा मुद्दा आहे.

याजवर असा आक्षेप येऊं शकेल कीं, काण्ड १२ मधील जनमेजय पारीक्षित पांडवांचा पूर्वज असावा. याचें उत्तर मीं पूर्वीं दिलेंच आहे कीं, चारच पारीक्षित यांत सांगितले आहेत, ते तंतोतंत पांडवांचे पणतू च दिसतात. असो; पण आक्षेपास जागा आहे. मला याच वचनावरून दुसरें प्रमाण सुचलें आहे तें असें. शतपथब्राह्मण काण्ड २ इ. स. पू. ३००० चे सुमाराचें हें जर निश्चित आहे, तर ऋग्वेद्संहिता यापूर्वींची असें मानलेंच पाहिजे. शंकर दीक्षितांनीं हि ही गोष्ट जगतापुढें मांडली आहे. ऋग्वेद व यजुर्वेद मंत्रांचा काळ इ. स. ३००० च्या मागें जातो असें त्यांनीं स्पष्ट म्हटलें असून या गोष्टीकडे पाश्चात्त्य विद्वानांचें व पंडित शामशास्त्री यांचें दुर्लक्ष्य कसें होतें तें समजत नाहीं. भारती युद्ध ऋग्वेद्मंत्र-कालानंतर लवकरच झालें असें दिसतें. नुकताच एक लेख पारगिटरसाहेबांचा (यांनीं पुराणांचें समालोचन करून कांहीं चमत्कारिक निष्कर्ष काढले आहेत) लंडन येथील रायल एशियाटिक सोसायटीपुढें वाचलेला प्रसिद्ध झाला आहे (१९१४ एप्रिल). त्यांत शेवटचें अनुमान काढलें आहे तें असें:—"If we may estimate the date of the great Bharata battle as 1000 B. C. Devapi (the composer of a Vedic hymn) must be placed about a century earlier and Vishvamitra may be placed about seven centuries before the battle. Hence the Vedic age may be placd from 1700 to 1000 B. C. from

मुद्दा भारताचे वाचकांच्या समोर नेहमी उभा राहतो. रा० गोखले यांनी "दुर्योधनाची फिर्याद" या आपल्या काल्पनिक लेखांत याजवर एक मोठा व्यूह रचला आहे. गोखले म्हणतात कीं, वास्तविक पांडवांनीं करार मोडला असून भीष्मांनी पांडवांची बाजू चांद्रमानाची कशी तरी लंगडी सबब काढून सावरून धरली. वेदांग–ज्योतिष ऋग्वेद व यजुर्वेद या दोन्हींत एक असून त्याची रचना झाल्यापासून किंबहुना कित्येक वर्षें पूर्वीपासून हिंदुस्थानांत चांद्रमानाचें वर्ष प्रचलित नव्हतें ही गोष्ट मान्य करावी लागेल. जर भारती युद्ध वेदांग–ज्योतिषानंतर झालें असें मानले तर द्यूताच्या वेळीं देशांत चांद्रवर्ष प्रचलित नसून करारांतील तेरा वर्षें चांद्रमानाची मानणें म्हणजे एक लपंडाव आहे, ही गोष्ट गोखल्यांप्रमाणें आपणास हि कबूल करावी लागेल. चांद्रमानाच्या वर्षाची खोडसाळ सबब त्यायी पांडवांनी पुढें करावी, किंवा सर्वांना पूज्य असलेल्या धर्मशास्त्रज्ञ भीष्मानें ती मान्य करावी किंवा शेंकडों राजेलोकांनीं ह्या लंगड्या सबबीस कबूल करून पांडवांच्या वतीनें लढण्यास उभे रहावें हें खरोखरच आश्चर्यकारक किंबहुना लांछनास्पद होईल. या दृष्टीनें विचार करतां या बिकट प्रश्नाचा एकच उलगडा दिसतो तो असा:–द्यूताच्या व युद्धाच्या वेळीं हिंदुस्थानांत सौरवर्ष व चांद्रवर्ष अशीं दोन्ही वर्षें प्रचलित असून पांडवांकडे झालेले बहुतेक आर्य लोक चांद्रवर्षानें (हल्लींच्या मुसलमानांप्रमाणें) चालणारे होते असें मानलें पाहिजे. दुर्योधनादि सौरमानानें चालणारे व पांडवादि चांद्रमानानें चालणारे असून अनुद्यूताच्या धांदलींत वर्ष कोणतें धरावयाचें याचा करार होणें राहून गेलें असावें. अर्थात तेरा वर्षें धरावयाचीं तीं सौर की चांद्र हा एक वादाचा मोठा जबरदस्त मुद्दा मागाहून उपस्थित झाला, आणि हिंदुस्थानांतील आर्य राजे दोन्ही पक्षांत वांटले गेले. हल्लीं हिंदुस्थानांत हिंदूंत सौरवर्ष चालू आहे मुसलमानांत चांद्रवर्ष चालू आहे आणि सरकारांत इंग्रजी वर्ष चालू आहे. अशा स्थितींत मुदतीच्यासंबंधानें तंटा उपस्थित झालाच पाहिजे. तो टळावा म्हणून वर्ष कोणत्या हि करारांत इंग्रेजी मानावें आणि मुदत हि इंग्रेजी मानानें मोजावी असा निर्बंध मुदतीच्या कायद्यांत घालावा लागला आहे हें प्रसिद्ध आहे. असा निर्बंध त्या वेळीं नसल्यानें द्यूताचा करार करणारा एक पक्ष सौरमानानें चालणारा व दुसरा पक्ष चांद्रमानानें चालणारा अशा स्थितींत १३ वर्षें कोणतीं धरावयाचीं हा वाद उपस्थित होणें अपरिहार्य होतें. या वादाचा निकाल कदाचित भीष्माच्या मताप्रमाणेंच होणें शक्य होतें; म्हणजे पांडव चांद्रमान धरणारे तर त्यांस चांद्रवर्ष लागू धरावें. पण कौरव सौरमान धरणारे, त्यांजवर प्रसंग आला असता तर त्यांनी सौरमान पाळावें, यांत एका हिशेबानें पंक्तिप्रपंच उत्पन्न होतो. सारांश, हा मुद्दा निकाल लागण्यास फार कठीण होता आणि म्हणूनच भारती युद्धासारखें भयंकर युद्ध या अनिश्चित स्थितींत उपस्थित झालें. ज्या मुद्द्यावर रा. गोखले यांनीं भारताची, व्यासाची व भीष्माची टवाळकी केली आहे तो मुद्दा

Tradition". या उताऱ्यावरून वैदिक काळानंतर लवकरच भारती युद्ध झालें ही गोष्ट मान्य दिसते. देवापि हा शंतनूचा बधु म्हणजे भीष्माचा चुलता होता. तो जर मंत्रकर्ता आहे तर भारती युद्धापूर्वी १०० वर्षेपर्यंत सरासरी वेदरचना होत होती असें मानण्यास हरकत नाही. देवापि पणजा मानला (दुसऱ्या पिढ्या भारतांत दिल्या आहेत त्यावरून तरी हि २०० वर्षापलीकडे हा काळ जात नाही. मी पुढे सोमकाचा उल्लेख करणार आहे त्यावरून हि हें च अनुमान निघते. पण शतपथ-ब्राह्मण काण्ड २ हें जर इ. स पू ३००० वर्षाचें तर ऋग्मंत्रकाळ या हि पुष्कळ पूर्वीचा धरावयास पाहिजे अर्थात ऋग्वेद-संहिता-काळ इ. स पू. ४००० पासून इ स. पू ३५००-३३०० मानला पाहिजे आणि त्यानंतर भारती युद्ध लवकरच झाले; अर्थात् भारती युद्धाचा काळ इ. स. पू ३१०१ जो मानला आहे तो च बरोबर दिसतो असें माझे म्हणणें आहे.*

असो या शतपथब्राह्मणांतील प्रमाणाशिवाय मला आणखी एक प्रमाण सुचलें आहे तें मुख्यत: आज मी आपल्यासमोर मांडणार आहें. वेदांग-ज्योतिषाचा हि काळ रा शंकर दीक्षित यांणी 'प्रपद्येत श्रविष्ठादौ सूर्याचंद्रमसावुदक्' या वाक्यात सांगितलेल्या उदगयनस्थितीवरून गणितानें इ. स पू. १४०० ठरविला आहे कोल्ब्रूक वगैरे तोच काळ मानतात असे दिसतें. प्रा मॅक्समुल्लर याणें त्याजबद्दल पुन्हां गणित करवून तो इ स. १२०० पर्यंत ओढण्याचा यत्न केला आहे. १४०० व १२०० मध्ये फारसें अतर नाही, आणि हा काळ पाश्चात्त्य व प्राच्य विद्वानांना संमत आहे असें धरण्यास हरकत नाहा. आतां. रा. काळे असें म्हणतात की, वेदांग-ज्योतिषानंतर भारती युद्ध झाले. कारण भारतात भीष्माच्या तोंडांत वेदांग ज्योतिषांत दिलेलें अधिकमासाचे गणित घातल आहे. या मुद्याचा विचार करतां मला एक कोडें कित्येक दिवसापासून होते तें सुटलें इतकेंच नव्हे, तर समग्र भारती युद्धाची उपपत्ति चागली लागली माझ्या मतें भारतीयुद्ध वेदांग-ज्योतिषापूर्वी पुष्कळच वर्षे घातले पाहिजे. ते कसे आणि या सिद्धान्ताने भारतीय युद्धासंबंधांचा एक बिकट प्रश्न कसा सुटतो हेंच मी आजच्या प्रसंगी विस्तारानें सांगणार आहें.

पांडवांनी बारा वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास पतकरून राज्य सोडलें. ते पांडव आपल्या करारापूर्वी उघडकीस आले किंवा नंतर हा एक महत्त्वाचा

---

*यासंबंधाने रा काळे यांशी विवाद करता काळे यानी असे उत्तर दिले की, "ऋग्वेद-संहितेतील मंत्रांचा काळ शतपथब्राह्मणापूर्वी मानलाच पाहिजे असे नाही शतपथ-ब्राह्मणानंतरची ही देवापीची रचना आहे." हे उत्तर मला तरी आश्चर्यकारक वाटले शिवाय भारती युद्ध इ स. १२०० चे मानल तर देवापीच सूक्त इ. स. १३०० चें धरले पाहिजे आणि शतपथब्राह्मण काण्ड २ इ स. पू ३००० चे म्हणजे शतपथ काण्डानंतर सतराशें वर्षांनी ऋग्वेदांतलि एक सूक्त झाले असं म्हणावं लागेल !!!

अत्यंत महत्त्वाचा असून, त्यांत भारती युद्धाच्या कालनिर्णयाचें एक महत्त्वाचें बीज भरलें आहे असें जेव्हां माझ्या लक्षांत आलें तेव्हां मला मोठें आश्चर्य वाटलें, आणि ज्या मुद्द्याकडे बहुधा कोणी लक्ष देत नाही त्याकडे लक्ष वेधण्याचें श्रेय रा. गोख-ल्यांनीं आपल्या धट्टेनें घेतलें याजबद्दल ते आपल्या आभारास पात्र आहेत असेंच वाटूं लागलें. भारती युद्ध झालें त्या वेळीं पांडव व त्यांजवळील पुष्कळ लोक चांद्रवर्षानें चालणारे होते हें मान्य केल्याशिवाय भारती युद्धास उत्पन्न करणाऱ्या तंट्याची उपपत्तिच लागूं शकत नाही. वेदांग-ज्योतिषाच्या काळीं किंवा तदनंतर हिंदुस्थानांत चांद्रवर्ष मानणारे कोणीच उरले नव्हते हे मला तरी निर्विवाद दिसतें; आणि म्हणून भारती युद्ध वेदांग ज्योतिषापूर्वी कित्येक किंबहुना शेकडों वर्षें झालें असलें पाहिजे असा माझा कोटिक्रम आहे.

या कोटिक्रमाला दृढता येण्यासाठीं पूर्वकाळीं चांद्रवर्ष मानणारे हिंदुस्था-नांत आर्य लोक होते की नाहीं याला प्रत्यंतर पुरावा पाहिजे आहे हें कबूल आहे. असा पुरावा अर्थात् भारतांत किंवा पुराणांत सांपडणें शक्य नाहीं. कारण, हे ग्रंथ ज्या वेळेस हल्लींच्या स्थितींत आले त्या वेळीं चांद्रवर्ष मानणारे हिंदुस्थानांत कोणीच राहिले नव्हते. वेदांग ज्योतिषानें सर्वांची एकवाक्यता झाली असलीच पाहिजे. असा पुरावा सांपडल्यास तो वेदांतच सांपडेल हें उघड आहे. मी भारताचें आलोचन केलें आहे; पण वेदांचें केलें नाहीं. समग्र वेद, भाष्यसहित आणि महाभारत हीं दोन्ही ज्यांच्या डोळ्यांसमोर उभी आहेत त्यांजला हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास कांहीं विशेष स्वरूपानें दिसेल हें निर्विवाद आहे. असो. या दृष्टीनें दुसऱ्यांचे लेख पाहतां पाहतां मला पंडित रुद्रपट्टण शामशास्त्री यांचा 'गवामयनम्' हा लेख पाहावयास मि-ळाला. त्यांची मतें जरी मला मान्य नाहींत तथापि या गोष्टींत त्यांनी जें विधान केलें आहे तें आधारास घेण्यास मला हरकत दिसत नाहीं. 'गवामयनम्' पान १२ याजवर शामशास्त्री म्हणतातः–"It appears form the above passage (Shatapatha XI, I, 2, 10) that in this cycle of 30 sidereal years, no intercalation of any kind was made, so as to keep the lunar year to the season, but that the lunar year was allowed to retrograde through all the seasons and begin again with the season at the close of 30 years." "उत्सृज्या नोत्सृज्या इति मीमांसंते ब्रह्मवादिनः" या कृष्णयजुर्वेदीय मंत्राचा दाखला पंडित शामशास्त्री व रा. टिळक यांनीं या प्रकरणांत घेतला आहे, तेथील भाष्य काढून पाहतां वैदिक काळीं हिंदुस्थानांत सर्व प्रकारचे पक्ष चालू होते, असें दृष्टीस पडतें. गवामयनम् हें एक वर्षाचें मुख्य सत्र असून इतर सत्रें त्याच्याच विकृति आहेत. हें सत्र कसें करावें याचा या सूक्तांत

जुळून थोडक्यांत वैदिक काळातील आर्यांच्या वसाहतीची माहिती देणें जरूर असल्यामुळें तसा प्रयत्न मी या ठिकाणीं करतों.

हिंदुस्थानांत आर्यांची एकच टोळी एकच वेळीं आली अशी साधारणपणें समजूत आहे. असें असेल तर त्यांच्यांत वर्षमान निरनिराळें मानलं जाणें कमी संभवनीय होय. माझ्या मतें आर्यांच्या निदा‍ं दोन टोळ्या निरनिराळ्या वेळीं आल्या. हा सिद्धान्त प्रथम डॉक्टर ग्रीयरसन यांनीं पंजाब, हिमालय व इतर जवळच्या प्रदेशांतील हल्लींच्या आर्यभाषांच्या तुलनेवरून कायम केला. त्यांच्या मतें प्रथमची आर्यांची टोळी खायबर खिंडींतून पंजाबांत आली. ऋग्वेदऋचांवरून हि ही गोष्ट निर्विवाद दिसते आणि ती मान्य केली पाहिजे. दुसरी टोळी गिल्गिटच्या घांटामधून गंगेच्या खोऱ्यांतून सरस्वतीतीरावर आली. भाषांच्या तुलनेवरून डॉ. ग्रीयरसन यांनीं केलेली ही कल्पना महाभारतावरून हि योग्य ठरते असं मीं आपल्या 'एपिकइंडिया' ग्रंथांत दाखविलें आहे. त्याला आणखी जोर देऊन व प्रत्यंतरासाठीं अमेरिकेच्या वसाहतींचा इतिहास जमेस धरून कथा इतिहास मी आपल्या समोर मांडतों, तो आपल्यास मनोरंजक वाटून पटेल अशी मला आशा आहे.

हिंदुस्थानांत ज्या या आर्यांच्या दोन टोळ्या निरनिराळ्या वेळीं निरानराळ्या रस्त्यानें आल्या त्यांनाच माझ्या मतें भारत, रामायण, वगैरे ग्रंथांत सूर्यवंशी क्षत्रिय व चंद्रवंशीय क्षत्रिय अशा नांवें पडली. पूर्वींचे म्हणजे प्रारंभाचे आलेले आर्य प्रथम खायबर खिंडींतून पंजाबांत आले व त्यांनी हळूंहळूं पंजाब व गंगेच्या उत्तरेकडील हिमालयापर्यंतचा प्रदेश मिथिलेपर्यंत व्यापून टाकिला. ऋग्वेदांत काबूलच्या कुभेपासून तो गंगेपर्यंतच्या नद्यांचा उल्लेख वारंवार येतो. "इमं मे गंगे यमुने शुतुद्रि" इत्यादि मंत्रांत या सर्व नद्या गंगेपासून पश्चिमेकडे सिंधुसह कुभेपर्यंतच्या क्रमानें आल्या आहेत, हें प्रसिद्ध आहे. तसेंच गंगेपासून अग्नि निघून पूर्वेकडे मिथिलेपर्यंत गेला असें एक वर्णन ब्राह्मणांत आहे. याजवरून पहिल्या आर्यांची वसति याप्रमाणें पंजाबांतून मिथिलेपर्यंत झाली असें मानण्यास हरकत नाहीं. यानंतर चांद्रवंशीय क्षत्रिय गिलगिट काश्मीरमधून गंगेच्या खोऱ्यानें सरस्वतीतीरावर येऊन त्यांनीं गंगायमुनांमधील व यमुनेच्या दक्षिणेकडील प्रदेशांत वसाहत केली. अमेरिका शोधून काढण्यांत जसे स्पॅनीश, पोर्चुगीज व फ्रेंच हे पुढारी असून त्यांच्यामागून इंग्लिश व डच यांनीं उत्तर अमेरिकेंत वसति केली, त्याप्रमाणेंच ही गोष्ट झाली. असें म्हणण्यास हरकत नाहीं, इतकेंच नव्हे, तर अमेरिकेस 'अमेरिगो' या पोर्चुगीज गृहस्थावरून जसें प्रथम नांव पडून हळू हळूं तें नांव सर्व खंडास लागूं झालें त्याचप्रमाणें हिंदुस्थानास 'भारतवर्ष' हें नांव प्रथम आलेल्या क्षत्रियांवरून पडलें आणि तें सर्वत: लागू झालें. या बाबतींत एक सामान्यत: चुकीचा समज प्रचलित आहे, त्याचा येथें निर्देश करून निरास करणें जरूर दिसतें. भरत हें नांव घेतांच दुष्यंताच्या पुत्राची व्यक्ति आपल्या मनासमोर उभी राहते आणि भरतखंड म्हणजे दौष्यंति भरताचें खंड असा आपला

समज सकद्दर्शनीं होतो. पाश्चात्य व प्राच्य या दोन्ही विद्वानांचा असा गैरसमज झालेला दिसतो. चित्रमयजगताच्या मुखपृष्ठावर शकुंतलेचा पुत्र सर्वदमन भरत याचें चित्र भरत समजानें काढलें आहे. Mac Donell's Vedic Index मध्यें हि भरतासंबंधानें असाच गैरसमज त्या शब्दाखालीं दिसतो. माझा हि असाच गैरसमज पूर्वी होता. पण भागवतांत जेव्हां मीं दोनतीन ठिकाणीं विरुद्ध विधान पाहिलें तेव्हां खरी गोष्ट माझ्या निदर्शनास आली। आणि वरील इतिहासाची संगति लागली. भागवतस्कंध ११ यांत खालील श्लोक आहेत–

> प्रियव्रतो नाम सुतो मनोः स्वायंभुवस्य ह ॥
> तस्याग्नीध्रस्ततो नाभिः ऋषभस्यसुतस्ततः ॥ १५ ॥
> अवतीर्णं पुत्रशतं तस्यासीद्ब्रह्मपारगम् ॥ १६ ॥
> तेषां वै भरतो ज्येष्ठो नारायणपरायणः ॥
> विख्यातं वर्षमेतयन्नाम्ना भारतमुत्तमम् ॥ १७ ॥ अ. २

स्कंध ५ अ. ७ त हि "अजनाभं नामैतद्वर्षं भारतमिति यत आरभ्य व्यपदिशंति ॥" असा निर्देश आहे. स्वायंभुव मनूचा प्रियव्रतपुत्र, त्याचा पुत्र ऋषभ, त्याचा नाभि आणि त्याचा ज्येष्ठ पुत्र भरत. त्यावरून या देशाला 'भारतवर्ष' हें नांव पडलें असा यांत स्पष्ट उल्लेख आहे. सारांश, हिंदुस्थानास 'भारतवर्ष' नांव देणारा भरत दौष्यन्ति भरत नव्हे. यासंबंधानें भारत व शतपथ आणखी तपासून पाहिलें. शतपथब्राह्मणांत व महाभारतांत दौष्यंति भरताची तारीफ केलेली आहे. पण त्यानें हिंदुस्थानास आपलें नांव दिलें असा उल्लेख नाहीं. दुसऱ्या पुराणांशीं प्रत्यंतर पाहतां 'भारतवर्ष' या नांवाचा दौष्यंति भरताशीं संबंध नाहीं असेंच दिसतें. मत्स्यपुराण अ. ११४ यांत एक श्लोक आहे तो असाः—

> भरणात्प्रजनाच्चैव मनुर्भरत उच्यते ।
> निरुक्तवचनैश्चैव वर्षं तद्भारतं स्मृतम् ॥

असो. या निकालावरून दोनतीन गोष्टींचा उलगडा होतो ऋग्वेदांत पंजाबांतील भरतांचें व त्यांचा कुलगुरु वसिष्ठ यांचें जें वर्णन आहे तें चंद्रवंशी दौष्यन्ति भरताचें नव्हे. दुसरे मनूचे वंशज सूर्यवंशी क्षत्रिय या नात्यानें त्यांचा कुलगुरु वसिष्ठ असणें हें हि योग्यच आहे. Vedic Index या ग्रंथांत मॅकडोनेलनें They were fighting with Purus असा जो शेरा दिला आहे तो हि योग्य आहे. पुरु चंद्रवंशी क्षत्रिय आहेत, ते मागून आलेले क्षत्रिय होते, आणि पूर्वी आलेल्या भरतांशीं व वशिष्ठाशीं सहजच भांडत होते. तसेंच दौष्यन्ति भरतानें शंभर अश्वमेध यज्ञ यमुनेच्या किनाऱ्यावर केले असें जें शतपथब्राह्मणांत व महाभारतांतील षोडशराजीय आख्यानांत वर्णन आहे तें हि वर दिलेल्या

सिद्धान्तास जुळून आहे; म्हणजे चंद्रवंशी भरतानें गंगायमुनांच्या प्रदेशांत व यमुनेच्या दक्षिणेस व सरस्वतीतीरावर वस्ती केली हीच गोष्ट येथें निदर्शनास येते. द्रोणपर्वांत ६८ व्या अध्यायांत यासंबंधानें श्लोक आहे तो असाः—

अश्वमेधशतेनेष्टा यमुनामनु बाव यः ।
त्रिशताश्वान् सरस्वत्यां गंगामनु चतुःशतान् ॥

असो. वरील हकीकतीवरून प्रथम स्वायंभुव मनूचें भरतवंशज पंजाबांत आले व त्यांनीं आपलें नांव भरतखंडास दिलें. हे पूर्वी आलेले लोक द्रविड असावे असें पारगिटर म्हणतात हें आश्चर्यकारक आहे. वेदांतील व इतर शास्त्रांतील माहिती व सिद्धान्त त्यांनीं येथें बाजूस ठेविले असें दिसतें. असो. सूर्यवंशी क्षत्रियांनंतर चंद्रवंशी क्षत्रिय गिल्गिट घाटानें गंगाद्रींतून सरस्वतीतीरीं आले व त्यांनीं गंगायमुनांमधील प्रदेश व दक्षिणेकडे यमुनेच्या पलीकडील प्रदेश व्यापला. या चंद्रवंशी क्षत्रियांची जास्त माहिती आपण देण्याचा यत्न विशेषतः हरिवंशांतील वंशावळीवरून करूं.

इला ही चंद्रवंशाची आद्य जननी समजली जाते हिमालयाच्या उत्तरेकडील वर्षाला इला–वर्ष म्हणतात, यावरून ही गोष्ट युक्त दिसते; व चंद्रवंशाची पहिली वस्ती हिमालयाच्या उत्तरेकडील भाग हा च ठरतो. त्यांचा पहिला राजा पुरूरवा. पुरूरव्याचें ठिकाण प्रतिष्ठान अथवा अलाहाबाद असें पुराणांत वर्णन आहे तें पारगिटरसाहेब मुख्य मानतात. पण ही त्यांची चुकी आहे. वेदांवरून पुरूरव्याची वस्ती हिमालयांत ठरते हें त्यांनीं च दाखविलें आहे. पुराणांत प्रतिष्ठान दिलें आहे; पण ही मागूनची पुराणांची कल्पना. ती टाकली पाहिजे. अशी कल्पना होणें साहजिक आहे. शेवटच्या पुराणकारांस आर्य बाहेरून आले ही कल्पना नव्हती. अर्थात् हिंदुस्थानचा मध्य त्यांनीं पुरूरव्यास दिला. अशा प्रकारचा स्थानबदल नेहमीं लोकसमजुतींत होत असतो. विराटनगर जयपुराजवळ असून दक्षिणेकडे आर्य पसरले तेव्हां कर्नाटकांत हनगळ म्हणून ठिकाण आहे तेंच विराटनगर असें तेथील लोक मानूं लागले व अजून मानतात. असो. वेदांच्या अधिक प्रामाण्यानें पुरूरव्याची वस्ती हिमालयोत्तरच ठरविली पाहिजे. पुरूरव्यानंतर नहुष, त्याचा ययाति. ययातीचा आणि वृषपर्वा असुराचा देश जवळजवळ होता ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. ययातीनें पृथ्वी जिंकून पुत्रांस वाटली त्यांत मध्यदेश पुरूस दिला; म्हणजे पौरव प्रथम हिंदुस्थानांत सरस्वतीतीरावर आले असें मानले पाहिजे; हीच गोष्ट वेदांवरून दिसते. सरस्वतीतीरावर भरतांची व पुरूंचीं भांडणें साहजिकच झालीं. पुरूंनंतर यादव लोक हि हिंदुस्थानांत आले असें दिसतें. मथुरेस सूर्यवंशी शत्रुघ्नानें ठाणें दिलें होतें व मधु राक्षसास मारून तेथें वस्ती

केली होती. सूर्यवंश तेथें नष्ट झाल्यानें देश उजाड होता. तो यादवभोजांनी व्यापला, असें हरिवंशात वर्णन आहे, तें योग्य दिसतें. यदूच्या पुत्रांत पृथ्वीची वाटणी झाली व दिशा वांटून दिल्या या नंतरच्या समजुतीनें देशांची चुकी झाली आहे हें उघड आहे. कारण, ययाति अजून हिमालयोत्तर होता. असो. पुरूरव्याच्या एक पुत्राच्या वंशांत कुशिक, कुशांब व कुशनाभ दिले आहेत. त्यांनीं कान्यकुब्ज कौशांबी आणि मगध देश स्थापिले. हे सर्व गंगेच्या दक्षिणेकडे आहेत. विश्वामित्राचा बाप गाधि हा कनोजच्या कुशिकाच्या वंशांतला; म्हणून त्यास कौशिक व गाधिज असें हि म्हणतात. तो चंद्रवंशी असून साहजिकच वसिष्ठाशीं त्याचा लढा होता. कित्येक ऋषिकुलें हि चंद्रवंशांत आहेत. प्रथम प्रथम ब्राह्मण व क्षत्रिय यांचें कुळ एक होतें व ते आपसांत विवाह हि करीत होते. असो. यदूच्या वंशांत यादव म्हणजे कृष्ण, वसुदेव वगैरे आहेतच, पण माहिष्मतीचा हैहय सहस्रार्जुन हि आहे, याशिवाय या वंशांत वीतिहोत्र, भोज (रुक्मि वगैरे), आवंत्य, तालजंघ वगै- अनेक क्षत्रिय जाति आहेत. त्या सर्वांचा उल्लेख करणें शक्य नाहीं.

पण पांचालांचा आपण विशेष विचार करूं. हे पुरूच्याच वंशांतले आहेत आणि कुरूंना जवळ आहेत. कुरुपांचाळांची वेदांत विशेषतः ब्राह्मणांत नेहमीं महती येते. महाभारतांत वारंवार नांवें अशीं येतात कीं, त्यांचा संबंध आपल्या लक्षांत येत नाहीं. टीकाकाराला हि बहुधा तो दिसत नाहीं' कारण तो हि तेथें मुग्धच असतो. मला एका नांवाची विशेष अडचण पुष्कळ दिवस भासत होती, ती या वंशावळींचा विचार करतांना सुटली. रात्रियुद्धाच्या भयंकर परिणामाने द्रोण चिडला त्या वेळीं तो अश्वत्थाम्यास म्हणतो, " सोमका न प्रमोक्तव्या जीवितं परिरक्षता " –"तुझा जीव गेला तरी हरकत नाहीं, सोमकांना सोडूं नकोस." हे सोमक कोण ! टीकेंत सांपडत नाहीं. हिंदुस्थानांतील सर्व लोकांची यादी भीष्मपर्वांत दिली त्यांत हि हें नांव नाही. पण वंशावळीचा विचार करतां हें कोडें सुटलें. सोमक म्हणजे पांचाळांचा एक भाग. पांचाळांची उत्पत्ति, पुरूच्या वंशांत वितथ झाला, त्याच्या वंशांत मुद्गल, सृंजय, यवीनर वगैरे पांच पुत्र झाले त्यांपासून झाली असून या सृंजयाच्या वंशांत सहदेव झाला; त्याचा सोमक, त्याचा जंतु, ह्याचा पृषत, त्याचा द्रुपद आणि त्याचा धृष्टद्युम्न. द्रौपदीला पार्षती म्हणतात, यासाठी. सोमकांबद्दल वैदिक इंडेक्समध्यें मॅकडोनेल माहिती देतो ती अशीः–"सोमकः साहदेव्यः' असें ऋग्वेदांत नांव आहे. (मागील महिन्यांत श्रुतिबोधाचा अंक आला, त्यांत हें नांव माझ्या दृष्टीस पडलें.) पर्वतनारदांनीं राजसूय यज्ञांत सोमकास अमुक रीतीनें 'सोम पी' असें सांगुन सोम प्यावयास दिला यामुळें तो बलाढ्य झाला असें ऐतरेय ब्राह्मणांत वर्णन आहे''. सारांश, हा सोमक सार्वभौम होता म्हणून त्याचें नांव त्याच्या वंशजास चालू झालें. महाभारतकार पांच-

कारण वेद, ब्राह्मण ठाऊक आहेत असें धरून चालतो, म्हणून सोमक कोण हे सांगत बसत नाहीं. पण आम्हांस त्यांचा परिचय नसल्यानें आम्ही बुचकळ्यांत पडतों. असो. धृष्टद्युम्नापासून सोमकाची पिढी चौथी. फार झालें तर तो भारती युद्धापूर्वी शंभर वर्षे झाला असावा. वेदांतील ऋचांत "सोमकः साहदेव्यः" असें नांव येतें तो हाच पांचाल सोमक असें धरलें तर भारती युद्ध वैदिक काळाजवळच घालावें लागेल. अशा दृष्टीनें देवापि आणि सोमक यांचे एकच महत्त्व आहे, हें मीं पूर्वी दाखविलें आहे.

निरनिराळ्या लोकांचा किंवा कुळांचा एकाच मूळ पुरुषाशीं संबंध जोडण्याचा परिपाठ पूर्व काळच्या सर्व लोकांत दिसतो. असा संबंध पुष्कळ अंशीं काल्पनिक असतो हें उघड आहे. एका आदमपासून पृथ्वीवरील सर्व मनुष्यजाति निर्माण झाल्या असें ज्यू लोकांचें मत आहे. त्याचप्रमाणे इतर लोकांचें हि असल्यास आश्चर्यकारक नाहीं. चंद्रवंशी मानलेल्या सर्व क्षत्रिय कुलांची उत्पत्ति एका इलेपासून जी मानली गेली आहे ती कदाचित् काल्पनिक असेल. पण एवढें निर्विवाद दिसतें कीं, या कुळांचा पुष्कळ बाबतींत एकजथा असून त्यांचें सूर्यवंशी क्षत्रियांशी कित्येक बाबतींत भिन्नत्व असावें. हें भिन्नत्व पुढें मी दाखविणार च आहे. हिंदुस्थान व्यापण्यासंबंधानें त्यांचें भांडण लागले हें साहजिकच आहे. भारती युद्ध म्हणजे गंगेच्या दक्षिणेस पसरलेल्या दुसऱ्या टोळीच्या आर्यांचें पंजाबांत व गंगोत्तर पसरलेल्या पहिल्या टोळीच्या आर्यांशी झालेले युद्ध होय असें मी एपिक इंडियांत विरुद्ध बाजूस असलेल्या राजांच्या देशांवरून दाखविले आहे. त्याला दुजोरा देऊन मला त्यांच्या कुळांवरून असें म्हणतां येईल की, हें युद्ध मुख्यतः चंद्रवंशी व सूर्यवंशी क्षत्रियांचें युद्ध होय. पांडवांच्या बाजूला बहुतेक चंद्रवंशी क्षत्रिय होते. पांडव, पांचाल, मत्स्य, चेदि, मगध, यादव, सात्वत, भोज हे सर्व चंद्रवंशी होते. कौरव पूर्वी आलेले जरी स्वतः चंद्रवंशी च होते, तथापि त्यांजकडे पुष्कळ सूर्यवंशी क्षत्रिय होते. या युद्धांत शेवटी चंद्रवंशाची सरशी झाली आणि ज्याप्रमाणें अमेरिकेंत स्पॅनिश व फ्रेंच यांचा पराजय होऊन इंग्लिश लोकांची सरशी झाली त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत हें भारती युद्ध आपसांत होऊन शेवटीं चंद्रवंशीयांचा विजय झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सूर्यवंशी व चंद्रवंशी आर्यांत मुख्य मुख्य फरकाच्या गोष्टी थोडक्यांत अशा. दोघे हि वैदिकधर्मानुयायी होते. तथापि त्यांच्यांत कांहीं धार्मिक बाबतींत भिन्नभाव होता असें ब्राह्मणांवरून दिसतें. अमरिकेंत गेलेल स्पॅनिश, फ्रेंच, इंग्लिश व डच हे ख्रिस्ती होते; पण त्यांच्यांत हि असा च फरक असून पहिले रोमन कॅथोलिक होते, व दुसरे प्रोटेस्टंट होते. तसें च पहिले शूर व धाडसी होते तर दुसरे मजबूत पण शांत

डोक्याचे होते. पहिले गोरे असून, दुसरे काळे होते. (यांत मात्र अमेरिकेच्या लोकांशीं निराळेपणा आहे.) कृष्ण, अर्जुन, द्रौपदी, व्यास इत्यादि चंद्रवंशी पूज्य व्यक्ति काळ्या वर्णाच्या होत्या. हा वर्णाचा भिन्नपणा अजून हि कायम आहे असें म्हटल्यास चालेल. हल्लींचे यादवांचे वंशज मराठे, पांडवांचे वंशज तुवर, कौशिकांचे वंशज राठोड वगैरे क्षत्रिय जाति बहुधा वर्णानें काळसर असतात. तसेच, शिसोदे, कछवाह वगैरे सूर्यवंशी क्षत्रिय बहुधा गोरवर्णाचे असतात. चौथें, सूर्यवंशी धनुर्विद्येचे अभिमानी होते व चंद्रवंशी मल्लविद्येचे. कृष्ण, बलराम, जरासंध, भीम, दुर्योधन इत्यादिकांच्या उदाहरणानें हें व्यक्त आहे. पांचवें, लग्नाच्या बाबतींत त्यांच्यांत फरक दिसतो. मुख्यतः बहु-पतिकत्वाची चाल पांडवांत व पांचालांत रूढ असावी असें द्रौपदीच्या उदाहरणावरून दिसतें. महाभारतांत धर्मानें एके ठिकाणीं हा कुलक्रमागत धर्म आहे असें स्पष्ट म्हटलें आहे. काश्मीर, गिल्गिट वगैरे हिमालयांतील भागांत असे विवाह अद्यापि रूढ आहेत. बहुपत्नीकत्वाची हि प्रवृत्ति चंद्रवंशीयांत अधिक दिसते. विशेषतः नागकन्या करण्याची प्रवृत्ति त्यांच्यांत अधिक दिसून येत्ये. हे नाग म्हणजे द्राविड वंशाचे किंवा आर्य वंशाचे होते हा एक प्रश्न आहे. पण नागलोकांशीं व चंद्रवंशी क्षत्रियांशीं बराच मिलाफ मध्यहिंदुस्थानांत व दक्षिणेंत झाला असें भागवतावरून व हरिवंशावरून दिसतें. यदूच्या नागकन्यांपासून उत्पन्न झालेल्या चार पुत्रांनीं माहिष्मती, करवीर, वनवासी व समुद्रतीर या ठिकाणीं चार राज्यें स्थापित केलीं असें हरिवंशांत वर्णन आहे. अर्जुनानें उलूपी, चित्रांगदा इत्यादि नागकन्या केल्याचें भारतांत वर्णन आहे. मध्य हिंदुस्थान व दक्षिणेंत आर्यद्रविडमिश्र लोक दिसतात याचें कारण हेंच असावें असें वाटतें.

या च मुद्द्यास अनुसरून व मिश्र लोकांच्या स्वरूपावरून महत्त्वाचा एक फरक या आर्यांत शेवटीं सांगितला पाहिजे तो असा. दुसऱ्या टोळीचे चंद्रवंशी क्षत्रिय Brachecephalic म्हणजे रुंद डोक्याचे असावेत व पूर्वी आलेले अथवा सूर्यवंशी क्षत्रिय Dolicho-cephalic म्हणजे लांब डोक्याचे असावेत असें दिसतें. शीर्षमापनशास्त्र हल्लीं नवीन अस्तित्वांत आलें आहे. या शास्त्राच्या आधारें Race अथवा वंश बऱ्याच चांगल्या रीतीनें ओळखतां येतात पण हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, लांब किंवा रुंद डोकें हें निश्चयात्मक वंशाचें चिन्ह नव्हे. या बाबतींत सर हर्बर्ट रिस्ले यांनीं सन १९०१ च्या सेन्ससच्या रिपोर्टांत जी माहिती व जे सिद्धान्त दिले आहेत ते वाचण्यासारखे आहेत. पण हिंदुस्थानच्या लोकांच्या वंशासंबंधानें सिद्धान्त बांधतांना रिस्ले साहेबांची चुकी झाली आहे हें मीं आपल्या Epic India या पुस्तकांत दाखविलें आहे. ही चुकी सरकारी व इतर पुस्तकांतून अजून चालली आहे. सबब या मुद्द्याकडे मी वाचकांचें लक्ष पुन्हां वेधितों. आर्यवंशी लोक बहुधा लांब डोक्याचे असतात असें शीर्षमापनशास्त्रवेत्ते मानतात. पंजाबांतील व राजपुतान्यांतील लोक लांब डोक्याचे आहेत हें १९०१ च्या सेन्ससच्या वेळीं प्रत्यक्ष

मापें घेतल्यानें सिद्ध झालें. यामुळें या प्रांतांत आर्य लोकांची वस्ती आहे हें आतां निर्विवाद सिद्ध झालें हा एक मोठा फायदा च झाला आहे. मध्य हिंदुस्थानांतील लोक मध्यम डोक्याचे आहेत, असें प्रत्यक्ष घेतलेल्या मापांवरून कळलें. त्याजवरून सर रिस्ले त्यांस Aryo-Dravidian म्हणजे आर्यद्रविड असे लेखतात. दक्षिणेंतील मराठे व पश्चिमेकडील गुजराथी वगैरे लोक रुंद डोक्याचे दिसून आले. त्याजवरून पश्चिम हिंदुस्थानच्या लोकांस रिस्ले साहेब Scytho-Dravidian म्हणजे शकद्रविड ठरवितात. त्यांची जी चुक झाली आहे ती येथें च. ती कशी हें थोडक्यांत सांगतों. जसे आर्य लांब डोक्याचे आहेत तसे च द्रविड हि लांब डोक्याचे आहेत हें शीर्षमापनशास्त्रवेत्ते कबूल करतात व रिस्लेसाहेब हि कबूल करतात. मग मध्य हिंदुस्थानांत जे मध्यम डोक्याचे लोक आहेत ते आर्य व द्रविड यांच्या मिश्रणाचे कसे असूं शकतात? हे लोक मध्यम डोक्याचे होण्यास लांब डोक्याच्या व रुंद डोक्याच्या लोकांचें मिश्रण झालें पाहिजे हें उघड आहे. आणि आर्य हे लांब डोक्याचे मानले आणि द्रविड हि लांब डोक्याचे धरले तर हें शक्य नाहीं. अर्थात् हें कोडें सुटण्यास हिंदुस्थानांतील मध्य देशांतील लोक मध्यम डोक्याचे होण्यास आर्य जातीचे जे लोक मिश्रणांत आले ते रुंद डोक्याचे होते असेंच मानलें पाहिजे. केल्ट् वगैरे कांहीं आर्य जाति रुंद डोक्याच्या आहेत, हें सर्वांस कबूल आहे. सारांश, गंगास्रोत्यांतून आलेली दुसरी आर्यांची टोळी म्हणजे चंद्रवंशी क्षत्रिय रुंद डोक्याचे असावेत असाच सिद्धान्त निघतो. आणि ही गोष्ट मान्य केली व History and Tradition–इतिहास व परंपरा–यांचा मेळ घातला म्हणजे यादवांचे जे वंशज दक्षिणेंत आले व जे मराठे म्हणून प्रसिद्ध आहेत त्यांच्या रुंद डोक्याचा शकांशीं संबंध न लागतां आर्यांशींच लागतो. शीर्षमापनशास्त्राच्या दुसऱ्या एका सिद्धान्तानें हि ही गोष्ट सिद्ध होते. जातीचें अथवा वंशाचें निश्चयात्मक ज्ञापक डोकें नसून नाक आहे हा सिद्धान्त सर्वतोमान्य झाला आहे. आर्य उंच नाकाचे, शक अथवा मोंगल बुडाशीं बसक्या नाकाचे आणि द्रविड जाती शेंड्याशीं रुंद नाकाच्या हा सिद्धान्त अबाधित आहे. नाकांचीं मापें रिस्लेसाहेबांनीं दक्षिणेत घेतलीं त्यांत मराठे हे मध्यम नाकाचे दिसून आले. अर्थात् त्यांस शक व द्रविड यांचें मिश्रण मानणें शक्य नाहीं, आर्य व द्रविड यांचेंच मानलें पाहिजे. तीच स्थिति मध्यहिंदुस्थानांतील लोकांची आहे. म्हणजे यांचें नाक मध्यम प्रमाणातलें आहे. असो. एकंदरीनें पाहतां दक्षिणेंतील लोक आर्य-द्रविड आहेत हाच सिद्धान्त ठरतो. याचा जास्त विस्तार माझ्या Epic-India या पुस्तकांत आहे तो जिज्ञासूंनीं पहावा. येथें जी गोष्ट सांगणें आहे ती ही कीं, सूर्यवंशी क्षत्रिय Dolichocephalic म्हणजे लांब डोक्याचे असून चंद्रवंशी

क्षत्रिय किंवा दुसऱ्या टोळीचे हिंदुस्थानांत आलेले आर्य Brache-cephalic म्हणजे रुंद डोक्याचे असले पाहिजेत. *

आतां विषयाचा समारोप करतांना आपण जेथून निघालों त्या ठिकाणीं येऊं. चंद्रवंशी क्षत्रिय व सूर्यवंशी क्षत्रिय यांच्यात ज्या कित्येक धार्मिक व इतर चालींत फरक होता त्यांतला हा एक मुख्य फरक होता कीं, चंद्रवंशी लोक चांद्रवर्षानें चालणारे व सूर्यवंशी लोक सौरवर्षानें चालणारे होते. असा त्यांच्यांत फरक होता ही गोष्ट मान्य केल्याशिवाय भारती युद्धाची उपपत्ति च लागत नाहीं. असा वर्षांचा फरक आर्यलोकांत हिंदुस्थानांत प्राचीन काळीं होता हें वैदिकसूक्तांवरून दिसतें. असा फरक असणें मनुष्यजातीच्या उत्तरोत्तर सुधारणेच्या प्रगतीवरून हि संभवनीय आहे. मनुष्य सहजरीतीनें दिवस सूर्यावरून ठरवितो, महिने चंद्रावरून ठरवितो व वर्ष ऋतूंवरून ठरवितो. पण या गोलांच्या प्रत्यक्ष गति अशा आहेत कीं, त्यांवरून दिवस, महिने व वर्ष यांचें प्रमाण नीट बसत नाहीं. ठोकळ प्रमाण बसतें, तें असें. ३० दिवसांचा एक चांद्रमास आणि बारा चांद्रमासांचें एक वर्ष. पण कांहीं वर्षे गेलीं म्हणजे बारा चांद्र महिन्यांचें मानलेलें वर्ष कमी पडून ऋतु बिघडूं लागतात. अर्थात् मनुष्याच्या सुधारणेच्या प्रगतींत हा प्रश्न निरनिराळ्या ठिकाणीं लोकांपुढें आला असावा. चांद्रमास धरावे तर वर्ष सुटतें म्हणजे ऋतु सुटतात. ऋतु धरावे तर महिन्याचे ठळक दिवस पौर्णिमा-अमावास्या सुटतात. साधारणपणें कमी सुधारलेले लोक चांद्रमासाला च चिकटतील हें उघड आहे. ज्यांची विशेष प्रगति झाली असावी त्यांनीं ३० दिवसांचा सावनमास मानून ३६० दिवसांचें वर्ष धरून सूर्यालाच मुख्यत्व दिलें असावें, व ५ दिवसांचा फरक निरनिराळ्या रीतीनें भरून काढला असावा.

---

* सुदैवानें सन १९११ च्या सेन्सस रिपोर्टांत सर गिस्ले यांचें मुंबई इलाख्याच्या लोकांच्या संबंधें असलेलें मत अद्याप ग्राह्य नसल्याचें पान २ वरील फुटनोटमध्यें नमूद आहे. पान ३२५ वर याचा जास्त खुलासा आहे तो असाः— "There is on the west an intermix-ture of some short-headed race which may have found its way thither by sea or along the coast. Risley believed this to be a result of the Scythian Invasion; but his view has not received general acceptance. According to Dr. Hadon this element is Alpine and not Mongolian." भाषांतर—पश्चिमेकडे कांहीं आंखूड डोक्याच्या जातीचें मिश्रण आहे. हे लोक समुद्रावरून किंवा किनाऱ्यानें आले असावे. रिस्ले यांच्या मतें हा परिणाम शकांच्या स्वारीचा असावा, पण हें मत साधारणपणें ग्राह्य झालेलें नाहीं. डॉक्टर हाडान यांच्या मताप्रमाणें हे लोक अल्पाईन आहेत, मॉंगोलियन नाहींत.

हिमालयाच्या उत्तरेकडील प्रदेशांत ऋतूंचा बदल एवढा कडक नाहीं आणि म्हणून तथील आर्यांस सौरवर्ष घेण्याची जरूरी वाटली नसावी. प्रगतीची दुसरी दिशा म्हणजे, महिने चांद्र ठेवावे आणि वर्ष सौर ठेवावें आणि दोहोंचा मेळ अधिक-मासांनी घालावा. ही युक्ति भारती आर्यांनीं हिंदुस्थानांत आल्यावर बसविली असावी. असो. ही पुढच्या प्रगतीची पायरी पुढें हिंदुस्थानांत सर्वतः मान्य झाली. कारण, हिंदुस्थानांत ऋतूंचें महत्त्व विशेष आहे. मुख्यतः पावसाळा महत्त्वाचा असून तो अमुकच महिन्यांत यावा असें असणे इष्ट असल्यानें चांद्रमासांत अधिक-मास घालण्याची पद्धति चोहींकडे मान्य झाली असावी, व वर्षास 'वर्ष' ही हि संज्ञा याचमुळें प्रचारांत आली असावी. पण वैदिक काळी आर्यलोक हिंदुस्थानांत नुकतेच आले असून शरत्, हेमंत इत्यादि ऋतु हि वर्षाचे वाचक होते. त्याचप्रमाणें सावन, सौर व चांद्र वर्ष हि पूर्वीप्रमाणें प्रचारांत होते असें वैदिक वचनांवरून दिसतें. ही स्थिति वैदिक काळाच्या शेवटापर्यंत म्हणजे भारती युद्धापर्यंत असावी आणि म्हणूनच भारती युद्धाचा तंटा लागला. सारांश, भारती युद्ध वेदांगाच्या पुष्कळ पूर्वी झालें असें दिसतें वेदांगांत एकच वर्ष व एकच अधिक-मास घालावयाची पद्धत आहे.

येथे एक प्रश्न असा उद्भवतो की, चंद्रवंशी क्षत्रिय चांद्रवर्ष मानणारे होते तर कौरव चंद्रवंशी असून सौरवर्ष कां मानीत होते? या शंकेचें निराकरण असें दिसतें कीं, चंद्रवंशी क्षत्रिय जसजसे हिंदुस्थानांत पुष्कळ दिवस राहिले तसतसे त्यांच्यांत सौरवर्ष सुरू झालें असावें. कौरव हे पूरूच्या वंशांतील मुख्य असून ते हिंदुस्थानांत प्रथम आले हें आपण वर पाहिलेच आहे त्यांनीं सूर्यवंशीयांपासून सौरवर्ष घेतले असावें, किंवा स्वतःच हिंदुस्थानच्या परिस्थितींत बरीच वर्षे घालविल्यानें अधिकमासाची पद्धति काढून चांद्र व सौर वर्षांचा मेळ घातला असावा. पांडव हे सर्वांत अखेरीस आलेले चंद्रवंशी क्षत्रिय होते ही गोष्ट निर्विवाद आहे पांडवांस हिमालयांतून ब्राह्मणांनीं आणून हस्तिनापुरास कौरवाच्या स्वाधीन केले असें भारतांत स्पष्ट वर्णन आहे. हिमालयांत रूढ असलेली बहुपतिकत्वाची चाल त्यांच्यांत अद्याप रूढ होती हें हि स्पष्ट आहे. यावरून त्यांच्यांत अद्याप चांद्रवर्ष चालू असावें असें मानण्यास हरकत नाही. सारांश, कित्येक जुने आलेले चंद्रवंशी क्षत्रिय जरी सौरवर्ष धरीत असले तरी पुष्कळ, विशेषतः नवीन आलेले, चंद्रवंशी क्षत्रिय चांद्रवर्ष मानणारे होते असें दिसतें.

वरील विवेचनावरून एक कल्पना साहजिक सुचते ती, केवळ कल्पना म्हणून, आपल्यासमोर मांडतों. देवांपासून आपली उत्पत्ति मानण्याचा प्रकार सर्व लोकांत दिसतो, त्याचप्रमाणे आपल्यांत हि चंद्रसूर्यांवरून उत्पत्ति मानली गेली तर आश्चर्य नाहीं. ऐतिहासिकदृष्ट्या ही उत्पत्ति काल्पनिकच होय. पण अशी कल्पना होण्यास कांहीं तरी कारण घडले असावें लागतें. हें कारण कोणतें याचा उलगडा वरील

हकीकतीवरून होतो. सूर्यास मुख्य मानून त्याच्या गतीवरून कालमापन करणारे ते सूर्यवंशी होत व चंद्रास मुख्य मानून त्याच्या गतीवर कालमापन करणारे ते चंद्रवंशी होत, असा या देवतावंशाच्या कल्पनेचा उगम असावा. सर्वांत आधी आलेले म्हणजे स्वायंभुव मनूचे वंशज पंजाबांत आले त्यावेळीं ही कल्पना नसावी. ह्या कल्पनेचा निर्देश वेदब्राह्मणांत नाहीं. महाभारतापासून दिसतो. अर्थात ती मागचा आहे. असो. हा कालमानाचा फरक या भिन्न वंशांच्या नांवांच्या उगमाशीं असो वा नसो; भारती युद्धाच्या वेळीं निराळीं कालमानें अमलांत असून पांडव चांद्रवर्ष धरणारे होते हें निर्विवाद आहे. यासाठीं भारतीयुद्ध लगधाच्या वेदांगज्योतिषाच्या पुष्कळ पूर्वीचें आहे असें मानण्यास बळकट जागा आहे.

चिंतामण विनायक वैद्य.

२ अक्रूरो ददते मणिम्

हें वाक्य यास्कीय निरुक्ताच्या द्वितीयाध्यायाच्या प्रथम पादाच्या चतुर्थ खंडांत आलें आहे. एकपदतद्धितांचें निर्वचन चाललें आहे; व दण्ड्यः पुरुष असें वाक्य घेऊन, त्यांतील दण्ड्य ह्या एकपदतद्धिताचें निर्वचन करतांना दण्ड या पदाचें निर्वचन करण्याची यास्काला इच्छा झाली. दण्डो ददतेर्धारयतिकर्मणः असा दद नामक धारणार्थक धातूपासून दण्ड शब्द निर्वाचिला. परंतु, शंका निघाली कीं, दद् धातूचा धारण असा अर्थ कशावरून? वेदांतील प्रयोगावरून, असें या शंकेला उत्तर मिळालें. वेदांत धारणार्थक दद् धातू आहे. येथें यास्क म्हणतो कीं, दद् चा धारणा हा अर्थ प्रमाणावयाला वेदाकडे धांव घ्यावयाला नको; भाषेंत म्हणजे यास्ककालीन लौकिक संस्कृत भाषेंत हि दद् चा धारणार्थी प्रयोग होतो. तो कसा होतो, हें उदाहरणानें स्पष्ट करून दाखवितांना, यास्कानें

अक्रूरो ददते मणिमित्यभिषंते

असा हवाला दिला आहे. अक्रूरो ददते मणिं* या वाक्यांत दद् धारणार्थी

---

* प्रो. रोठ हे आपल्या यास्कनिरुक्ताच्या भाषांतरित व टिप्पणीयुक्त प्रतींत अक्रूरो ददते मणिम् हें वाक्य व त्यावरील यास्कांनीं केलेली चर्चा हा भाग प्रक्षिप्त मानतात. या रीतीनें वरील महत्वाचे भागाची वासलात लावण्याची वस्तुस्थिति चिंत्य आहे. मात्र हिंदुस्थानांत सांपडणाऱ्या सर्व पोथ्यांत व छापील प्रतींत हा भाग सांपडतो; व तो प्रक्षिप्त असावा असें मानण्याची निरुक्ताच्या संपादकांची प्रवृत्ति दृग्गोचर होत नाहीं. तर्सें च हा भाग विशिष्ट स्थलीं असण्यांत अनौचित्य हि भासत नाहीं.—संपादक

योजिला जातो व या वाक्याचा अर्थ, अक्रूर मणि धारण करतो, असा आहे, असें यास्क सांगतो. येथें आपणा ऐतिहासिकांना विचार करण्यासारखा मुद्दा असा आहे कीं, ह्या वाक्यांतील अक्रूर कोण व मणि कसला ? यास्क स्वकालीन संस्कृत भाषेंतील सर्वतोमुखी असलेला एक लौकिक प्रयोग देत आहे. यास्ककाली लोकांत अक्रूरो ददते मणिं ही एक म्हण च पडून गेली होती. कोणी हि अक्रूर म्हणजे सौम्य अथवा निरुपद्रवी माणूस अंगावर रत्न धारण करतो, असा जर या वाक्याचा अर्थ केला, तर तो समर्पक होत नाही प्रायः निरुपद्रवी व सौम्य माणूस आपल्या अंगावरील रत्न सदासर्वदा रक्षण करून तें पुनः जनांत तोऱ्यानें मिरवूं शकेल, हें क्वचित् च संभवतें. तेव्हा सामान्य माणसाला उद्देशून हें सामान्य वाक्य म्हण म्हणून प्रचारांत आलें असावें, असे म्हणणे टिकण्याजोगें नाही. उदाहरणार्थ, एक मराठी म्हण घेऊं. मराठींत एखाद्या अरेरावी करणाऱ्या माणसाला किंवा पोराला टाकून बोलावयाचे असलें म्हणजे ' मोठा बाजीरावाचा लेक आला आहे बोलायला ' हें वाक्य योजतात. ह्या वाक्यातील बाजीराव हा कांही कोणी सामान्य निरुपद्रवी व सौम्य पुरुष नसून, कोणी तरी कर्ता, पराक्रमी व तेजस्वी पुरुष आहे व त्याच्यावरून आज दोनशे वर्षे मराठींत हे वाक्य लौकिक म्हण म्हणून सर्वत्र देशभर प्रचलित झालेले आहे. तो च प्रकार, अक्रूरो ददते मणिं ह्या वाक्यांतील अक्रूर व मणि या वस्तूंचा यास्ककाली झालेला होता. नाही तर हें वाक्य दाखला म्हणून देण्यात कांही मतलब नव्हता. समजा की, अक्रूरः बद्दल माणवक. शब्द घातला व मणि बद्दल माला शब्द घातला तर माणवको ददते मालां असें मिळमिळीत वाक्य बनतें व ते म्हण म्हणून नमूद करण्यात कांही एक स्वारस्य रहात नाही. तेव्हा अक्रूरः व मणि हे शब्द असलेले अक्रूरो ददते मणिं हें वाक्य देण्याचा यास्काचा हेतु स्पष्ट आहे तो हा की, दाखला म्हणून जो प्रयोग किंवा जें वाक्य द्यावयाचे तो प्रयोग किंवा तें वाक्य सर्वजनप्रसिद्ध, सर्वजनसंमत व शंकालेशरहित असावें. तात्पर्य, अक्रूरो ददते मणिं ही म्हण यास्ककाली लहान थोर अशा सर्व लोकांच्या तोंडी झालेली होती, ह्यात संशय नाही.

दुसरें: ही म्हण लोकांच्या फक्त तोंडी च तेवढी आढळणारी होती असें नव्हे. तर ही म्हण यास्ककालीन किंवा यास्कपूर्वकालीन ग्रंथांत, मग तो ग्रंथ मिताक्षर असो किंवा अमिताक्षर असो कोठें तरी नमूद झालेली होती.

अक्रूरो ददते मणिं

ही आठ अक्षरें अनुष्टुभ् श्लोकाच्या चवथ्या चरणांतल्या सारखी दिसतात. अर्थात्, ही म्हण प्रथम कोणत्या तरी मिताक्षर ग्रंथांत नमूद झालेली होती असें म्हणावें लागतें. हा मिताक्षर ग्रंथ केवळ सुभाषिताचा होता किंवा दुसरा कांहीं स्वतंत्र प्रबंध होता, या बाबीचा हि निर्णय होण्यासारखा आहे.

२ प्रायः म्हण म्हटली म्हणजे तिच्या पाठीमागें कांहीं तरी धार्मिक, सामाजिक, राजकीय, व्यावहारिक किंवा वैयक्तिक किंवा सार्ष्टिक इतिहास असतो, अशी कांहीं एक चमत्कारिक धार्मिक, सामाजिक, राजकीय, व्यावहारिक किंवा वैयक्तिक किंवा सार्ष्टिक गोष्ट अगोदर देशांत घडलेली असते कीं, ती सर्व जनांच्या नजरेस प्रामुख्यानें व आभिमुख्यानें येते व दाखला म्हणून सामान्य व विशिष्ट लोक तिचा सररहा उपयोग करितात. उदाहरणार्थ, कांहीं मराठी म्हणी घ्या.

(१) डावरेगिरी करूं नका.

(२) लक्ष्मबाईनें तीर मारला.

(३) राव बाजी जप करताहेत.

(४) बापूंनीं मोहरें एक घर मागें घेतलें.

(५) गोविंदरावांनीं आंगाला भस्म फासलें.

(६) पडत्या फळाची आज्ञा.

हीं वाक्यें मराठीत म्हणी आहेत व यांच्या पाठीमागें कांहीं ना कांहीं तरी सामाजिक, राजकीय, व्यावहारिक किंवा वैयक्तिक किंवा सार्ष्टिक इतिहास आहे.

(१) डावऱ्याचा इतिहास (२) लक्ष्मीबाई झाशीकरणीचा इतिहास, (३) दुसऱ्या बाजीरावाचा इतिहास, (४) सखारामबापूचा इतिहास, (५) भस्म फांसून शंकरानें बैरागी होण्याचा पौराणिक इतिहास, (६) किंवा देवाला फळाचा कौल लावतात ह्या सामाजिक चालीचा इतिहास या सहा हि वाक्यांच्या किंवा म्हणांच्या पाठीमागें आहे तसा कांहीं तरी नामांकित व सर्वजनप्रसिद्ध असा इतिहास यास्ककालीं अक्रूरो ददते मणिं या म्हणीच्या पाठीमागें असला पाहिजे हें उघड आहे. अक्रूर हा कोणी तरी इतिहासप्रसिद्ध पुरुष आहे व त्याच्यावर कांहीं एका बहुमोल मण्यासंबंधानें म्हणजे रत्नासंबंधानें प्रसंग आलेला आहे. हा प्रसंग इतका जगजाहिर झाला कीं, तो सर्वतोमुखीं होऊन, त्याची शेवटीं रोजच्या दाखल्याला उपयोगी पडणारी म्हण झाली. असा हा प्रसंग कोणता ? पौराणिक म्हणजे प्राचीन इतिहास पहातां, ह्या म्हणीवर चांगला प्रकाश पडतो. देवकीसुत व वसुदेवतनय जो श्रीवासुदेव कृष्ण त्याच्या चरित्रांत एका अक्रूराचा व एका नामांकित मण्याचा उल्लेख आलेला प्रसिद्ध आहे. स्यमंतक नांवाचें अनर्घ्य रत्न सूर्यानें सत्राजिताला दिलें. तें श्रीकृष्णानें सत्राजितापाशी मागितलें, परंतु तें देण्याची बुद्धि सत्राजिताला झाली नाहीं. प्रसेन एक दिवस तो मणि गळ्यांत घालून मृगयेला गेला. त्याला वधून तो मणी एका सिंहानें दडविला. सिंहापासून तो जांबवताच्या हातीं गेला. इकडे प्रसेन व मणी नाहींसे झालेले पाहून, प्रसेनाला मारून श्रीकृष्णानें रत्नाचा अपहार केला असा संशय सत्राजिताला आला व या आकाची कुज-

धुज सर्वतोमुखीं झाली. छोटे आळ किती झपाट्यानें पसरतात व लोकांचीं मनें किती त्वरेनें ग्रासतात, तें सांगावयाला नको च. जो तो श्रीकृष्णाचा संशय घेऊं लागला. उघड कोणीं बोलावयाचें नाहीं व नेम मात्र विशिष्ट व्यक्तीवर धरावयाचा असा ह्या आळांच्या प्रकरणांत विचित्र प्रकार चालतो. मुक्या परंतु मारक आळाला उत्तर हि देतां येत नाहीं व तो निमूटपणें सोसून गप्प हि बसवत नाहीं. तेव्हां श्रीकृष्णानें रत्नाचा शोध स्वतः लावण्याचा प्रयत्न केला. त्यांत त्याला यश येऊन, जांबवंताच्या घरीं तो त्याला सांपडला. तो घेऊन कृष्णानें सर्वांदेखत तो पुनः सत्राजिताच्या स्वाधीन केला व आपण खोट्या आळांतून एकदाचा महत्प्रयासानें मुक्त झाला. पुढें कांहींका दिवसांनीं शतधन्व्यानें सत्राजिताला निजलेला ठार केला व रत्नाचा अपहार केला. तेव्हां आपला सासरा जो सत्राजित् त्याचा सूड उगविणें श्रीकृष्णाला भाग पडलें. कृष्णानें शतधन्व्याला यमलोकास पाठविलें; पण स्यमंतकमणि मात्र सांपडला नाही. शतधन्व्याने तो कृष्णाच्या भयानें अक्रूराजवळ दिला होता. अक्रूर हा कृष्णभक्त होता; परंतु शतधन्याचा मित्र हि होता; तेव्हां सकृद्दर्शनीं संशय कोणाला नाही. शेवटी श्रीकृष्णाने त्याचा पुनः पत्ता लाविला व स्वभक्त म्हणन अक्रूरापाशी च तो राहूं दिला. तेव्हांपासून अक्रूर निर्भयपणें तें अनर्घ्य रत्न धारण करूं लागला.

३ श्रीकृष्णासारख्या मोठ्याचे अंग ज्या मोठ्या रत्नाच्या मानगडींत होतें व ज्याच्या अवघड मालकीकरितां मोठमोठ्यांचे प्राण गेले व मोठमोठ्यांवर आळ आले, त्या रत्नाचा इतिहास, अक्रूरो ददते मणिं, ह्या म्हणीच्या पाठीमागें आहे. ज्याच्याविषयीं कोणाला कालत्रयीं संशय हि यावयाचा नाहीं, त्याच्याजवळ हरवलेली वस्तु सांपडावी व ती पुनः सर्वसंमतीनें त्याच्याजवळ च राजरोस रहावी, असा जेथे विचित्र व अतर्क्य प्रकार घडतो, तेथें ही म्हण यास्ककालीं योजीत असें दिसतें. तात्पर्य, ह्या म्हणीच्या बुडाशीं वासुदेव कृष्ण या महान् पराक्रमी पुरुषाच्या अद्भुत चरित्रांतील एक अद्भुत प्रसंग आहे आणि ही च गोष्ट प्रस्तुत लेखाचा मुख्य मुद्दा आहे. तो असा कीं, वासुदेव कृष्ण हि व्यक्ति, निरुक्तकार जो यास्क त्याच्या पूर्वी होऊन गेली. वासुदेव कृष्णाचा उल्लेख पाणिनीच्या अष्टाध्यायींत हि झालेला आहे. त्या अर्थी, हे स्पष्ट आहे की, वासुदेव कृष्ण हा पराक्रमी पुरुष पाणिनि व यास्क ह्यांच्या पूर्वी होऊन गेला. अदमासानें किती पूर्वी होऊन गेला त्याचा छडा पुढील कलमांत काढतों.

४ कोणी असें म्हणतात कीं, यास्कापूर्वी पाणिनि झाला, व कित्येक म्हणतात कीं पाणिनीपूर्वी यास्क झाला. मला वाटतें की, पाणिनि व यास्क हे बहुशः समकालीन असावेत व त्या दोघांत कांहीं अंतर असलें च तर तें शे दोनशे वर्षांहून जास्त नसावें. अलीकडचा कोण व पलीकडचा कोण, हें ठरविण्यास जशीं साधनें असावीं

तशीं उपलब्ध नाहींत. शेंदोनशें वर्षांच्या अंतरानें हे दोघे हि एका च युगांत झालेले आहेत, एवढें मात्र बऱ्याच निश्चयानें म्हणतां येतें पाणिनिकालनिर्णय या निबंधांत पाणिनि शकपूर्व एक हजार वर्षांच्या पूर्वींचा हि असावा, असा निश्चय मीं केला आहे. कित्येक युरोपीयन शोधक पाणिनि ख्रिस्तपूर्व तीनशें वर्षांच्या सुमारास झाला व या कालाच्या पाठीमागें पाणिनीला नेण्यास सबळ पुरावा नाहीं, असें म्हणतात. त्यांचें असें हि म्हणणें आहे कीं पाणिनीला लेखनकला माहित नव्हती. परंतु लेखनकला ख्रिस्तापूर्वी सहाशें किंवा सातशें वर्षांच्या सुमारास भारतवर्षांत प्रचलित झाली, असें ह्यांपैकीं च कांहीं शोधक म्हणतात. आतां पाणिनीला जर अक्षर ओळख नव्हती, तर तो ह्या सातशें किंवा सहाशें वर्षांच्या आधींचा असला पाहिजे असें होतें, तेव्हां अर्थात् च पाणिनीच्या अनक्षरतेनें कित्येक युरोपीयन व अमेरिकन पंडितांनीं बसविलेला पाणिनीचा ख्रिस्तपूर्व तीनशें हा काल अप्रमाण ठरतो. युरोपीयन शोधक या बाबींत फारच असंबद्ध व परस्परविरोधी विधानें करतांना दृष्टीस पडतात. आतां पाणिनीला अक्षरओळख होती, हें पाणिनीच्या सूत्रांवरून स्पष्ट सिद्ध आहे, व हें मीं दुसऱ्या एका लेखांत दाखविलेलें आहे. एकंदरींत पाणिनि शकपूर्व एक हजाराच्या सुमारास झाला असावा, असें माझें मत आहे. यास्क हि त्या च सुमारास आगेंमागें केव्हां तरी झाला असें हि मी म्हणतों. आतां, यास्क व पाणिनि हे जर शकपूर्व एक हजाराच्या सुमारास झाले, तर हें स्पष्ट च आहे कीं, वासुदेव कृष्ण त्या कालाच्या पूर्वीं होऊन गेला असला पाहिजे.

५ अक्रूरो ददते मणिमित्यभिभाषन्ते असें यास्कोद्धृत वाक्य आहे यास्क सांगतो कीं, लोकांत म्हणजे स्वकालीन संस्कृत भाषा बोलणाऱ्या समाजांत अक्रूरो ददते मणिं ही म्हण प्रचलित आहे व ह्या म्हणींत धारणार्थक दद् हा धातू योजिला आहे. वास्तविक दद् या धातूचा अर्थ दान करणें असा, यास्क व पाणिनि ह्या किंचित् आगेंमागें होऊन गेलेल्या वैय्याकरणांच्या कालीं होता. पाणिनीय धातुपाठांत दद् दाने असें पठित आहे. उघड आहे की, दद् धारण करणें हा अर्थ यास्क व पाणिनि ह्यांच्या कालीं जी संस्कृत लौकिक भाषा होती तिच्याहून जुन्या अशा संस्कृत भाषेंत प्रचारांत होता, तो ह्या यास्ककालीं प्रचलित असणाऱ्या अक्रूरो ददते मणिं ह्या जुन्या म्हणींत यास्ककालीं हि दृष्टयुत्पत्तीस येई. हें स्पष्ट करावयाला मराठींतील एक प्रयोग घेतों. अशी कल्पना करावयाची आहे कीं, कोणी एक महाराष्ट्रीय निरुक्तकार, पालख शब्दाचें निर्वचन करीत आहे आणि त्यांत आधाराला म्हणून खालील वाक्य देत आहेः -

आळंचो कां पाळंचो, इति अभिभाषन्ते ।

महाराष्ट्रीय निरुक्तकार म्हणतो कीं, लोकांच्या तोंडीं आळंचो कां पाळंचो असें वाक्य प्रचलित असलेलें दृष्टीस पडतें, त्यांत जो आळंच् उत्क्षेपे असा धातू

दृष्टीस पडतो त्या धातूपासून पालख हा शब्द निघालेला आहे. आपल्या पायाच्या तळव्यांवर मुलाला उचलून व आपण पाठीवर पडून लहान बाळांना मोठ्या मुली पाय मागेंपुढें हलवून खेळवीत असतांना, आळंचो कां पाळंचो, हें वाक्य उच्चारितात. आलंच् उत्क्षेपे हा पाणिनीय जुना धातू मराठींत फक्त आळंचो कां पाळंचो ह्या गाण्याच्या कडव्यांत तेवढा राहिलेला उत्कट दिसतो. इतर कोठें लौकिक मराठींत आलंच् धातूचा शुद्ध किंवा भ्रष्ट उपयोग होत असलेला आढळत नाहीं. उत्क्षेपणार्थी आळंचो व पाळंचो हे दोन शब्द वर्तमानमराठींत ह्या एका स्थलीं गोचर होतात; परंतु ते हजारों वर्षांच्या जुन्या महाराष्ट्र्यादि प्राकृतांत व पाणिनीय संस्कृतांत सररहा योजिले जात असत. तात्पर्य, आळंचो कां पाळंचो, हा प्रयोग आपल्या महाराष्ट्रीय निरुक्तकारानें स्वकालीन समाजांत रूढ असलेला म्हणून जो दाखविला तो त्याच्या काली म्हण म्हणून एका च वाक्यांत आढळत आहे. परंतु तो सदर निरुक्तकाराच्या फार पूर्वीचा जुना असा आहे. हा च प्रकार अक्रूरो ददते मणिं हा प्रयोग उद्धृत करण्यांत यास्काचा झालेला स्पष्ट दिसतो. यास्क व पाणिनि यांच्या कालीं दद दानार्थक धातू प्रचलित होता, दद् धारणार्थक सररहा प्रचलित नव्हता; फक्त अक्रूरो ददते मणिं ह्या जुन्या म्हणीत किंवा श्लोकपादांत तेवढा राहिला होता. धारणार्थक दद् धातू वेदभाषेत सररहा प्रचलित होता. सांगण्याचा मुद्दा इतका च की, अक्रूरो ददते मणिं ही म्हण किंवा हा श्लोकपाद, ज्या कालीं दद् धातूचा धारणा असा अर्थ होता त्या काली रचिलेला आहे. आतां, दद् धातूचा धारणा असा अर्थ वेदकाली होता हें सिद्ध आहे, त्या अर्थी अक्रूरो ददते मणिं ही म्हण वेदकालीं केव्हां तरी प्रचलित झालेली आहे. बहुशः वेदकालच्या अगदीं शेवटीं शेवटीं ही म्हण रचिली गेली असावी.

६ अक्रूरो ददते मणिं ही म्हण यास्काहून जुनी आहे. आतां हें उघड च आहे कीं, ही म्हण ज्या प्रसंगावरून पडली तो प्रसंग आणि त्या प्रसंगांतील व्यक्ती व वस्तु ह्या सदर म्हणीहून जुन्या असल्या पाहिजेत. हें हि स्पष्ट आहे कीं, जर म्हण ज्या कालीं रचिली गेली त्या कालीं वैदिक धारणार्थ दद् धातु प्रचलित होता, तर म्हण ज्या पुरुषांच्या संबंधानें रचिली गेली त्या पुरुषांच्या कालीं कोणत्या तरी प्रकारची वैदिक भाषेसारखी जुनी भाषा प्रचलित होती. स्यमंतक प्रकरण घडल्यानंतर लवकर च ही म्हण किंवा हा श्लोकपाद रचिला गेला असावा.

७ पाणिनि व यास्क यांच्या कालीं वैदिक भाषा इतकी अत्यन्त जुनी झाली होती कीं, ती वेदपठण करणाऱ्या ब्राह्मण लोकांना हि नीट समजतनाशी झाली होती. ह्या अज्ञान स्थितीसंबंधानें यास्कानें खालील मंत्र उद्धृत केला आहे:—

स्थाणुरयं भारहारः किलाभू
दधीत्य वेदं न विजानाति योर्थम्।
योर्थज्ञ इत्सकलं भद्रमश्नुते
नाकमेति ज्ञानविधूतपाप्मा ॥

ऋग्वेदाच्या इतर कोणत्या तरी लुप्त शाखेंतील हा मंत्र आहे असें सायण शाकलशाखेवरील ऋग्भाष्यांत म्हणतो. म्हणजे ऋग्वेदांतल्या प्राचीनतम भाषेचें ज्ञान केवळ यास्काच्या कालीं नुकतें च लुप्त होत चाललें होतें असें नव्हे, तर वरील मंत्र रचिला जाण्याच्या कालीं हि प्राचीन वेदभाषा वेदपाठक ब्राह्मणांना नीट कळेनाशी झाली होती. वरील मंत्राची भाषा ऋग्वेदांतील प्राचीनतम भाषेहून अति अर्वाचीन आहे. परंतु ती वेदकालीन आहे, यांत संशय नाहीं. एक तर या मंत्राचा छंद बराच अर्वाचीन आहे, व दुसरें, ह्या मंत्रांत एवार्थक इत् निपात झाला आहे. हा इत् निपात यास्क व पाणिनि यांच्या वेळच्या प्रचलित भाषेंत योजला जाण्याचा बंद पडला होता. या मंत्राची भाषा व अक्रूरो ददते मणिं ह्या म्हणीची भाषा सारख्या व समकालान दिसतात.

७ यास्काहून प्राचीनतम ऋग्वेदभाषा स्थूल मानानें किती जुनी असावी याचा वर्तमान मराठी भाषा व ज्ञानेश्वरी मराठी भाषा ह्यांच्या चरित्रावरून अंदाज बांधतां येण्यासारखा आहे. वर्तमान मराठी व ज्ञानेश्वरकालीन मराठी ह्यांच्यांत च सहाशें वर्षांचें अंतर आहे. तत्रापि, ज्ञानेश्वरीची भाषा वर्तमानकालीन जे आपण त्यांस समजते. केवळ व्याकरणशास्त्रज्ञ पंडितांना च ती कळते असें नव्हे, तर व्याकरणानभिज्ञ जे ब्राह्मणापासून महारमांगापर्यंत सामान्य लोक त्यांना हि कळते असें दिसतें. कारण, खेडेगांवांतील गांवढ्ये, ब्राह्मण, शूद्र, महार वगैरे सर्व जातींच्या लोकांत ज्ञानेश्वरीचें पठन व श्रवण करणारे लोक हरहमेश आढळतात. ह्याचा अर्थ इतकाच कीं, ज्ञानेश्वरकालिन भाषा महाराष्ट्रांत अद्याप हि कळते. ज्ञानेश्वरी भाषा बहुशः व्याकरणशुद्ध या लोकांना कळत नाहीं, हें स्पष्ट आहे. पण वर्तमान मराठी हि ह्या गांवढ्यांना व्याकरणशुद्ध कळत नाहीं, हें हि खरें आहे. तात्पर्य, सहाशें वर्षांच्या अवधींत स्वभाषेचें जुनें रूप महाराष्ट्रांत अद्याप कळत नाहींसें झालेलें नाहीं. ह्याचें कारण असें आहे कीं, यद्यपि ज्ञानेश्वरकालीन मराठी भाषेंत व वर्तमान मराठी भाषेंत सहाशें वर्षांचें अंतर पडलें आहे; तत्रापि ज्ञानेश्वरकालीन भाषेंतील शब्दांचीं व धातूंचीं विभक्तिरूपें अगदीं योग्य नियमानें झालेलीं. ज्ञानेश्वरी भाषेंत असें एक हि वाक्य नाहीं कीं ज्यांतील शब्दांचीं व धातूंचीं विभक्तिरूपें व्याकरणशुद्ध नाहींत. ज्ञानेश्वरकालीन मराठी भाषेचें व्याकरण स्वतांना

बाहुलकत्वाचें नांव हि काढण्याची जरूर नाहीं. तशी गोष्ट वेद्भाषेची नाहीं. वेद्भाषेंतील म्हणजे छंदोभाषेंतील शब्दांच्या व धातूंच्या रूपांचा परामर्श घेतांना छंदसि बहुलं हें सूत्र वारंवार पढावें लागतें, ह्याचा अर्थ काय ? ह्याचा अर्थ असा कीं, यास्क व पाणिनि ह्यांच्या काळच्या संस्कृत भाषेंत व वेद्कालच्या संस्कृत भाषेंत काळानें इतकें थोरलें अंतर पडलें होतें कीं, शब्दांच्या व धातूंच्या व निपातांच्या व अव्ययांच्या अनेक रूपांना सामान्य नियम लागत नाहींत असें आढळून येऊं लागलें. तेव्हां वारंवार बाहुलकत्वाचा आश्रय करणें अपरिहार्य होऊन बसलें. एका च भाषेच्या दोन रूपांतरांत इतकें रूपवैलक्षण्य उत्पन्न होण्यास सहाशें किंवा बाराशें वर्षांचा अवधि पुरेसा होत नाहीं. शक ९०० तील मराठी घेतली व तिची तुलना १८०० तील मराठीशीं केली, तत्रापि इतकें रूपवैलक्षण्य एक हजार वर्षांचें कालान्तर पडलें असतां हि झालेलें दिसत नाहीं. तेव्हां यास्ककालीन भाषेंत व ऋग्वेद्कालीन भाषेंत अंतर दोन अडीच हजार वर्षांहून अधिक असावें, असें विधान करण्याकडे प्रवृत्ति होते. म्हणजे यास्काचा काल स्थूल मानानें जर शकपूर्व एक हजार धरला, तर ऋग्वेद्भाषेचा काल तत्पूर्वी दोन अडीच हजार वर्षांहून हि पाठीमागचा म्हणजे शकपूर्व तीन साडेतीन हजार वर्षांहून हि पाठीमागचा खुशाल धरावा; आणि अक्रूर व कृष्ण यांच्या वेळच्या वेद्भाषेचा काळ शकपूर्व सुमारें तीन हजार वर्षांचा धरावा. एकंदरींत असा अंदाज करावासा वाटतो कीं, कृष्णकालीं अर्वाचीन वेद्भाषा प्रचलित झालेली असावी.

८ भारतीय युद्ध पुराणपरंपरेनें व ज्योतिषपरंपरेनें पहातां शकापूर्वी ३१७९ वर्षीं घडलें. अर्थात् देवकीनंदन श्रीकृष्ण व पांडव हे शकापूर्वी सुमारें ३१०० वर्षें होऊन गेले. ह्या पांडवकालची किंवा श्रीकृष्णकालची, इमारत म्हणा, ग्रंथ म्हणा, नाणें म्हणा, कांहीं एक स्थूल खूण अद्यापपर्यंत प्राचीनेतिहाससंशोधकांना सांपडलेली नाहीं. त्यामुळें होत आहे काय कीं, तुलनेला तद्दितर वस्तु नसल्यामुळें, श्रीकृष्ण, पांडव व भारतीय युद्ध केवळ कविकल्पनेचे तरंग आहेत असं विधान निरुपायानें करण्याचें धाडस करावें लागतें. पुराणें व इतिहास यांतील उल्लेखांखेरीज ह्यांच्या अस्तित्वासंबंधाचें अवांतर प्रमाण उपलब्ध नाहीं. पाणिनीयांत महाभारताचा उल्लेख आहे व पाणिनीच्या कालीं वासुदेव कृष्ण हा भक्तांच्य पूजेचा विषय होऊन राहिला होता असें हि म्हणण्यास पुरावा आहे; परंतु, भारतकालची व श्रीकृष्णकालची स्थूल अशी खूण कांहींएक उपलब्ध नव्हती. तशी स्थूल खूण, यास्कोद्धृत अक्रूरो ददते मणिं ह्या म्हणीच्या रूपानें आज आपणांस मिळाली आहे, असें मला वाटतें. ह्या म्हणीची भाषा वेद्कालाच्या अगदीं शेवटल्या थरांतील असून, ही म्हण यास्काच्या कालापर्यंत परंपरेनें समाजांत वावरत होती. म्हणींतील धारणार्थक दद् धातु वेद्कालीन होता, असें असून सर्व

भाषांतील जुन्या म्हणींच्या स्वभावाप्रमाणें, ही म्हण यास्ककालीन समाजाच्या भाषेंत जशीची तशी गुरफटून राहिली होती. अद्भुतपणास्तव उदाहरणार्थ तिचा उल्लेख आपल्या ग्रंथांत करून यास्कानें इतिहासावर मोठा उपकार करून ठेविला आहे.

निबंधांतील सिद्धान्तांचा सारांशः—

(१) अक्रुरो ददते मणिं ह्या म्हणींतील अक्रूर कृष्णकालीन प्रसिद्ध अक्रूर आहे व मणि प्रसिद्ध स्यमंतक मणि आहे.

(२) अक्रुरो ददते मणिं ह्या म्हणींतील धारणार्थक दद् धातू वैदिक आहे, लौकिक नाहीं; वेदकालाच्या अगदीं शेवटल्या थरांत ही म्हण रचिली गेली आहे.

(३) ही म्हण रचिली जाण्याच्या पूर्वी अक्रूर, श्रीकृष्ण व स्यमंतक-मण्याचा प्रसंग होऊन गेलेला असला पाहिजे.

(४) अक्रूर व श्रीकृष्ण यांच्या कालीं अर्वाचीन वैदिक भाषा भारत-वर्षांत प्रचलित होती.

(५) यास्ककालीं व अर्वाचीन वेदकालीं देखील प्राचीन वेदभाषा निश्चळ वेदपाठक ब्राह्मणांना नीट कळेनाशी झाली होती.

६ अक्रुरो ददते मणिम् ही म्हण यास्कानें नमूद करून ठेविली त्याचें एक कारण असें दिसतें की, श्रीकृष्ण, अक्रूर वगैरे मोठमोठ्या इतिहासप्रसिद्ध पुरुषांचा संबंध ह्या म्हणींतल्या प्रसंगांत आलेला सर्वजनश्रुत होता. दुसरें कारण असें दिसतें कीं, स्यमंतक हें महारत्न यास्ककालीन भारतवर्षांत प्रसिद्ध असावें. काशी वगैरे शह-रांतून प्रवास करतांना मीं असा प्रवाद ऐकिला कीं, सध्यांचा जो कोहीनूर इंग्लंडांत आहे, व जो भारतवर्षांतील पराक्रमी राजे व सम्राट आणि भारतवर्षांत आलेले परकीय राजे आजपर्यंत धारण करीत आलेले आहेत तो कोहीनूर म्हणजे च प्राचीन स्यमंतक मणि होय. रत्नाची महार्हता व अद्भुतता पहातां, हा प्रवाद क्षणभर विश्वसनीयसा भासावा, यांत नवल नाहीं.

वि. का. राजवाडे

३ चित्पावनांची सामाजिक मूळपीठिका, मध्य व सद्यःस्थिति

१ शालिवाहनाच्या सतराव्या शतकांत चित्पावन ब्राह्मण भारतवर्षाच्या राजकीय क्षितिजावर एकाएकीं व अकस्मात् उगवलेले स्थूल दृष्टीला दिसतात. सामान्यतः असा हि स्थूल समज आहे की, कोणत्या हि प्रकारचें पूर्वचिन्ह न दाखवितां, किंवा कोणत्या हि प्रकारची पर्वतयारी न करितां हा समाज दैवयोगानें एकाएकी ऐश्वर्यारूढ झाला. प्रायः असला धूमकेतुसदृश चमत्कार इतिहासाला परिचित नाही, इतकें च काय, तर सृष्टीला हि परिचित नाहीं. उपमानभूत जें धूमकेतुदर्शन तें हि सृष्टनियमानुसार च होत असतें. इतकेंच कीं, एखाद्या धूमकेतूचा इतिहास व पूर्वचरित्र आपणांला माहीत असतें व तो भेटीला आला असतां, आपण चकित होत नाहीं. आणि एखाद्या धूमकेतूचें पूर्वचरित्रचसें काय तर अस्तित्व मात्र हि आपणांला अवगत नसतें व तो उगवला असतां, अज्ञानान आकस्मिकत्वाचा आरोप त्याजवर आपण करतों. हा च मासला चित्पावनांच्या उदयासंबंधानें उडालेला आहे स्थूल दृष्टीला चित्पावनांचा उदय आकस्मिक भासतो इतकें च. वास्तविक, सूक्ष्म शोध करतां असें आढळून आलें आहे कीं, चित्पावनांची उदयोन्मुखता आस्तेआस्ते व क्रमाक्रमानें च होत आली आहे.

२ चित्पावनांचा अगदी पहिला उल्लेख पौराणिक असून, तो सर्वप्रसिद्ध आहे. त्या उल्लेखांत असें म्हटलें आहे की, पर्शुरामानें चौदा भिन्न गोत्रांच्या चौदा ब्राह्मणांची स्थापना पर्शुरामक्षेत्रांत किंवा परशुरामक्षेत्रांत केली—हा उल्लेख प्रथम सह्याद्रिखंडांत आढळतो. ही दंतकथा खरी आहे असें धरून चालले— आणि दंतकथांत कांहीं भाग ऐतिहासिक असतो हें सर्व इतिहासज्ञांना मान्य आहे. तर अशी एकसांगड निष्पन्न होते कीं, पुराणप्रसिद्ध जमदग्निरेणुकापुत्र परशुराम व हे चौदा भिन्नगोत्री चित्पावन पुरुष समकालीन होते. आतां, परशुरामाचा काळ जर कळला, तर ह्या समकालीनत्वाच्या सांगडीची उपयुक्तता प्रत्ययास येईल. ह्या कामीं दुसरी एक बाब आपल्या शोधाला उपकारक अशी उपलब्ध आहे. मलबारांत मंगळूरापासून कन्याकुमारीपर्यंत परशुरामशक चालतो. ह्या परशुरामशकाचें पहिलें वर्ष कलिवर्ष १९२७ त सुरू झालें. म्हणजे आज शक १८३६ त अथवा कलिवर्ष ५०१५ त परशुराम शकाला प्रारंभ होऊन ३०८८ वर्षे झाली. अथवा शालिवाहनशकापूर्वी १२५२ व्या वर्षी परशुरामशक सुरू झाला. तात्पर्य दंतकथा व परशुरामशकाचा प्रारंभ ह्यांची सांगड घातली असतां अशी निष्पत्ति होते कीं, चित्पावनांचे चौदा मूळ पुरुष

१०८८ वर्षांमागें कोंकणांत वसाहत करते झाले. त्या काळीं कोंकणांत नागांची वस्ती होती व कोंकणाला नागलोक किंवा पाताललोक अशी संज्ञा होती.

३ आतां चौदा चित्पावन ब्राह्मणांना कोंकणांत आणून स्थापणारा पुरुष कोण व कोठील त्याचा छडा लागल्यास तें पाहूं. ह्या पुरुषाचें नांव दोन तऱ्हांनीं लिहिलेलें आढळतें, परशुराम व पर्शुराम. ह्याला भार्गवराम असें हि पुराणें म्हणतात. परशु म्हणजे फरश अथवा कुऱ्हाड आहे हत्यार ज्याचें तो परशुराम—परशुयुक्तराम—असा अर्थ परशुराम ह्या शब्दाचा करतात. पण, पर्शुराम ह्या शब्दाचा अर्थ काय? पर्शु म्हणजे काय? तर मला असें वाटतें कीं, पर्शु हें पुरातनकालीन एका आयुधजीविसंघाचें वाचक अभिधान आहे. पर्श्वादियौधेयादिभ्योऽणञौ (५-३-११७) ह्या सूत्रांत पर्शूचा उल्लेख पाणिनीनें केला आहे. असुर लोकांच्या इतिहासांत हि पर्शुअ ह्या नांवानें पर्शूचा उल्लेख झालेला आढळतो. हे पर्शु अर्वाचीन पारसीकांचे पूर्वज होत. तेव्हां, पर्शुराम म्हणजे ह्या पर्शूंच्या जनपदांतील व लोकांतील जो राम तो होय, असें विधान करण्याकडे प्रवृत्ति होते. पर्शुरामाचें दुसरें नांव भार्गव आहे. भृगूंच्या कुलांत उत्पन्न जो झाला तो भार्गव. हे भृगु म्हणजे Phrygians ऊर्फ Brigaus नांवाचे आशियामायनर मधील पुरातन लोक—ज्यांचा संबंध पुरातन ग्रीस मधील Thracian लोकांशीं होता असें म्हणतात—असावे. पर्शुराम पर्शु हि होता व भृगु हि होता, त्या अर्थी पर्शु व भृगु म्हणजे प्राचीन पारसीकांचे पूर्वज व ग्रीस मधील प्राचीन थ्रेशियन लोकांचे पूर्वज अन्योन्यसंबद्ध असावे, असें म्हणावें लागतें. पर्शू मधील हा जो पर्शुराम त्यानें शालिवाहनशकाच्या पूर्वी १२५२ वर्षांच्या सुमारास चौदा चित्पावनांची स्थापना नागलोकांत, ऊर्फ पाताळांत, ऊर्फ कोंकणांत, ऊर्फ अपरान्तांत केली. पर्शुराम ज्या अर्थी पर्शुलोकांतील होता, त्या अर्थी त्यानें आपल्या जनपदांतील चौदा ब्राह्मण कोकणांत आणून स्थापिले असतील. कदाचित्, भारतवर्षांतील इतर प्रांतांतून त्याला प्रिय असे ब्राह्मण त्यानें आणिले असतील. दंतकथा म्हणते कीं, हे चौदा ब्राह्मण समुद्रांतून किनाऱ्याला अगदीं दमलेभागलेले लागले. ह्या दंतकथेवर जर विश्वास ठेवला, तर पश्चिमेकडून पर्शूंच्या देशांतून, हे चौदा ब्राह्मण आले असण्याचा संभव उत्पन्न होतो. पुरातन काळीं पर्शु, भृगु, वगैरे पश्चिमेकडील लोकांत चातुर्वर्ण्य होतें. त्या चातुर्वर्ण्यांतील चौदा ब्राह्मण पर्शूंच्या जनपदांतील पराक्रमी पर्शुरामानें कोंकणांत आणिले असावे. चित्पावन ब्राह्मण इजिप्त, पालस्तैन, वगैरे प्रांतांतून आलेले कोणी तरी लोक असावे व ते प्राचीन काळीं एकवर्णी असावे, असें विधान कित्येक लोक करतात. परंतु, त्या विधानाला आधार नाहीं. चित्पावन ब्राह्मण पश्चिमेकडील परदेशांतून आले असले च तर ते पर्शूंच्या किंवा भृगूंच्या जनपदांतून आले असावे, एवढें विधान दंतकथेंतील समुद्र, पश्चिम, व पर्शुराम या तीन राशींवरून करतां येईल. पाताळांत चातुर्वर्णिक ब्राह्मणांची वस्ती चित्पावनांच्या पूर्वी प्रायः नसावी.

४ ह्या चित्पावनांचा त्या कालीं म्हणजे १०८८ वर्षांपूर्वी धंदा काय होता, हें विचारावयाला च नको. हे लोक ब्राह्मण होते, त्या अर्थी हे ब्राह्मणधर्मानें कालक्रमणा करीत, हें उघड आहे. आणि हें ह्यांच्या नांवावरून हि ताडतां येण्यासारखें आहे. ह्यांचें नांव चित्पावन. चित्पावन हा चित्तपावन ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. शुद्ध चित्तपावन शब्द हि अपभ्रंश च आहे. मूळ शब्द चित्यपावन असा आहे. चितिसंबंधक जें तें चित्य. आतां चिति म्हणजे काय ! तें उकलण्यास प्राचीन ब्राह्मणांच्या धंद्याकडे पाहिलें पाहिजे. प्राचीन ब्राह्मण अग्निचयन करीत. ह्या अग्निचयनांत पांच चिति असत. फक्त वांवभर जमीन नांगरून नाना प्रकारच्या विटांनीं पक्ष्याच्या आकारासारखें एक जें स्थान करावयाचें त्याचें नांव चिति. अग्निचयनांत अशा पांच चित्या तयार कराव्या लागत. चितींतला जो अग्नि तो चित्याग्नि, किंवा नुसता चित्य. त्या चित्याग्नीनें म्हणजे चित्याग्नीच्या उपासनेनें म्हणजे अग्निचयन करण्यानें जे पावन म्हणजे पवित्र म्हणजे शुद्ध म्हणजे संस्कृत ऊर्फ शुचिर्भूत ऊर्फ पुण्यवंत झाले ते चित्यपावन. सांगण्याचा मुद्दा एवढा च कीं पर्शुरामानें कोंकणांत जे मूळ चौदा ब्राह्मण स्थापिले ते वैदिक धर्मप्रमाणें यज्ञयागादि करणारे होते. त्यांच्या त्या विटांनीं बनविलेल्या चित्या व अग्निचयनें पाहून, भोंवतालच्या नाग वगैरे लोकांत चित्यपावन ब्राह्मण या नांवानें त्यांची प्रख्या झाली. चित्यपावनाचा अपभ्रंश चित्तपावन व चित्तपावनाचा अपभ्रंश चित्पावन.

५. चिपळुणापासून तीन मैलांवर पर्शुराम नांवाचा पर्वत आहे. तेथें भार्गवरामाचें देवालय आहे. तेथील भार्गवराम चित्पावनांचा मुख्य देव. ह्यावरून असा तर्क केला तर चालेल कीं प्रथम चित्पावन जे कोंकणांत उतरले ते दाभोळच्या खाडींतून पर्शुराम पर्वतावर येऊन राहिले. ह्या पर्वतावर पर्शुरामाचें वास्तव्य असल्या कारणानें त्याचे हे चौदा अनुयायी त्या पर्वताच्या आश्रयानें राहिले हें योग्य च होतें. ह्या पर्वताला फार पुरातन कालापासून पर्शुरामक्षेत्र अशी संज्ञा पर्शुरामावरून पडली आहे. आणि ह्या पर्वतावर व पर्वताच्या पायथ्याशीं आसपास वस्ती करून रहाणाऱ्या व चित्याग्नीची अहर्निश उपासना करणाऱ्या चित्यपावन ब्राह्मणांवरून ह्या भूमीला चित्यपावनभूमि अशी हि संज्ञा आहे. चित्यपावनभूमि चा अपभ्रंश चित्तपावनभूमि. चित्तपावनभूमि ला दुसरा पर्याय शब्द चित्तपावनस्थल. चित्तपावनभूमींत किंवा चित्तपावनस्थलांत वैशेष्यानें रहाणारे जे ते चित्तपावनस्थ. अशा परंपरेनें चित्तपावनस्थ ह्या शब्दाचा सुसंगत अर्थ लागतो.

६. कित्येक असें समजतात कीं चिपळूण व चित्तपावन ह्या शब्दांचा कांहीं तरी पूर्वापर संबंध असावा व चिपळूण हा शब्द चित्तपावन या शब्दावरून

साधला असावा. परंतु, तसा प्रकार असलेला दिसत नाहीं. चिपळूण या शब्दाचें हजार वर्षी पलीकडील रूप चिपोळण असें जुन्या लेखांतून आढळतें. चिपोळण या शब्दांतील पोळण हा शब्द पुलिन या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे. पुलिन याचा प्रथम अपभ्रंश पोलिन. तेव्हां पुरातन रूप चिपोलिन किंवा चिपोळिण असें असलें पाहिजे. आणि हें रूप जुन्या मराठी कागदपत्रांत सांपडतें. चिपुळिण असें हि रूप येतें. तात्पर्य, अर्वाचीन चिपळूण ह्या शब्दांतील दुसरा अवयव पुलिन या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे. आतां पहिला अवयव जो चि त्याचा इतिहास लिहितों. सध्यां ज्या विस्तीर्ण वस्तीला चिपळूण म्हणतात ती वस्ती अलीकडील पांच चार शें वर्षांतील आहे. खरें पुरातन चिपळूण किंवा चिपुळिण किंवा चिपोळण दोन नद्यांच्या मध्यें पुळणावर आहे. ह्या दोन नद्या म्हटल्या म्हणजे वासिष्ठी व शिव या होत. पैकीं शिव नदीवरून ह्या पुळणाचें नांव शिवपुलिन असें प्राचीन काळीं पडलें. शिवपुलिन शब्दाचा अपभ्रंश सिवपुळिण. सिवपुळिण याचा अपभ्रंश चिअपुळिण. चिअपुळिण याचा अपभ्रंश चिपुळिण. चिपुळिण याचा अपभ्रंश चिपोळिण. चिपोळिण याचा अपभ्रंश चिपळोण किंवा चिपळूण. अशी ह्या शब्दाची व्युत्पत्ति आहे. शिव नदीच्या पुळणावर जें गांव वसलें तें चिपळूण—अर्थात् चित्पावन ह्या शब्दाशी चिपळून या शब्दाचा कांहीं एक संबंध दिसत नाहीं. एवढा मात्र संबंध असावा कीं, शिव, वासिष्ठी, सिवपुलिन ऊर्फ चिपळूण, परशुराम, गोवळकोट वगैरे संस्कृतोत्पन्न नांवें ह्या चौदा चितिपावन ऊर्फ चित्यपावन ऊर्फ चित्पावन ब्राह्मणांनी किंवा त्यांच्या संततीनें दिलीं असावीं. मूळ नागलोक या स्थानांना आपल्या भाषेंत कोणत्या नांवानें ओळखीत, तें सांगतां येण्यास मला कांहीं साधन उपलब्ध झालेलें नाहीं. पुढें मागें नागांच्या भाषेंतील शब्द जर एखाद्या विचक्षण शोधकाला उमगले, तर ह्या प्रश्नावर जास्त उजेड पडेल. वासिष्ठी ही नदी सह्याद्रीच्या मुख्य रांगेपासून दूर उगम पावून पर्शुरामाच्या डोंगराखालून चिपळुणावरून वहात वहात जात आहे. तेव्हां ही चिपळूणची खास नदी नव्हे. चिपळूणची खास नदी शिव. ही शिवनदी चिपळुणाच्या आसपासच्या टेंकड्यांत जवळच उगवून चिपळुण्या पुळणाशीं वासिष्ठीस मिळते. तेव्हां, अर्थांतच, ह्या पुळणास शिवनदीचें पुळण म्हणतात व ह्या पुळणावर वसलेल्या गांवास चिपळूण म्हणजे शिवपुलिन ही अन्वर्थक संज्ञा प्राप्त झाली आहे.

७. अहर्निश अग्निचयनादि यज्ञयागांत गुंतणारे हे चौदा भिन्न गोत्रांचे चौदा ब्राह्मण प्रथम पर्शुराम पर्वताच्या वरती व आसपास येऊन वसती करते झाले व शिवपुलिन ऊर्फ चिपळोण हें गांव त्यांच्या वंशजांनीं वसविलें. कारण, प्रथम जे चौदा ब्राह्मण आले, त्यांची संख्या गांव वसविण्या इतकी दिसत नाहीं. पुढें प्रजावृद्धि झाल्यावर नंतर बहुशः गांव वसविला जाऊन व त्यांत ग्रामसंस्था स्थापित होऊन, त्याला ग्राम हें सार्थ अभिधान प्राप्त झालें असावें. तात्पर्य, पर्शु-

रामपर्वत आणि शिवनदीचें पुळण हें चित्पावनांचें अत्यंत प्राचीन वसतिस्थान असावें, ह्यांत काडीमात्र संशय नाहीं. चित्पावनांचा जो पुढें विस्तार झाला तो ह्या चित्यपावन भूमींतून ऊर्फ पर्शुरामक्षेत्रांतून झाला. येणेंप्रमाणें, चित्पावनांच्या मूळपीठिकेसंबंधानें काळ, स्थळ व मनुष्य, ह्या तीन ऐतिहासिक राशींच्या बाबतींत शोध करतां करतां छडा लागतो. मूळ चौदा भिन्नगोत्री पुरुष होते. त्यांनीं पर्शुरामपर्वत व शिवनदी ह्यांच्या आश्रयांतील लहानसा टापू आपलें मूल स्थान केलें आणि हें कृत्य कलि १९२७ त म्हणजे शालिवाहन शकाच्या पूर्वी १२५२ वर्षांच्या सुमारास अथवा शक १८३६ च्या पूर्वी ३०८८ वर्षांच्या सुमारास झालें. काल, स्थल व व्यक्ति अशा ज्या कोणत्या हि ऐतिहासिक प्रसंगाच्या तीन राशि त्या चित्पावनांच्या ह्या मूळपीठिकेच्या प्रसंगांत उपलब्ध झाल्या. येथें कालासंबंधानें मतभेद होईल. भार्गवराम दाशरथि रामाच्या कालीं म्हणजे भारतीययुद्धाच्या पूर्वी होऊन गेला, असें पुराणें व इतिहास म्हणतात. येथें जी पर्शुरामशकाची कालगणना आधाराला घेतली आहे तिनें भार्गवराम भारतीय युद्धानंतर १९२७ व्या वर्षाच्या सुमारास कोंकणांत चौदा ब्राह्मणांची स्थापना करतां झाला, असें विधान केल्याप्रमाणें होतें. म्हणजे पर्शुराम दोन चार हजार वर्षें जगला असलें अनैतिहासिक विधान केल्यासारखें होतें. पराकाष्ठा झाली म्हणजे माणसाची हयात शंभर वर्षें. तेव्हां, येथें मेळ कोण कसा घालील तो घालो. इतक्या मात्र बाबी प्रस्तुत प्रकरणीं अगदीं निश्चित आहेत. (१) पर्शुराम शक कलि १९२७ त सुरू झाला; (२) चौदा ब्राह्मणांनीं पर्शुराम पर्वताच्या आसपास वस्ति केली; (३) आणि ह्या चौदा ब्राह्मणांना पर्शुरामानें कोंकणांत स्थापिलें. या तिसऱ्या बाबीवर शंका अशी घेतां येते कीं, शककर्ता पर्शुराम व चौदा ब्राह्मणांची स्थापना करणारा पर्शुराम एक च कशावरून ? तर ह्याला दंतकथा हें च प्रमाण आहे. मलबारांतील शककर्ता पर्शुराम व चौदा ब्राह्मणांची स्थापना करणारा पर्शुराम मातृपितृसंबंधानें एक च व्यक्ति आहे, असें पौराणिक दंतकथा म्हणते. दंतकथा व ऐतिहासिक सिद्ध बाबी ह्यांची सांगड या स्थलीं घालावयाची आहे. पुराणांतून परस्परविरुद्ध अशीं वचनें बहुत आहेत. त्यांतून कांहीं विधानें निश्चित अशीं ठरविलीं पाहिजेत; आणि नंतर त्यांच्या अनुषंगानें इतर पौराणिक विधानांची सत्यासत्यता ठरविली पाहिजे. पौराणिक दंतकथेंतून निश्चित मार्ग काढण्याला हा एक च न्याय उपलब्ध आहे.

८ एथपर्यंत दंतकथेंतून जेवढा ऐतिहासिक भाग निवडून व पारखून काढितां येण्यासारखा दिसला तेवढा काढिला. त्या वरून इतकें बरें च निश्चयानें कळलें कीं, सुमारें तीन हजार अठ्ठ्यायशीं वर्षांपूर्वी चित्पावन ब्राह्मण कोंकणांत येऊन राहिले, त्यांची संख्या नेमकी चौदा होती व चौदांपैकीं प्रत्येक ब्राह्मण भिन्न

गोत्राचा होता. यांच्या स्त्रियांसंबंधानें उल्लेख दंतकथेंत बिलकुल नाहीं. येथें कुलधर्माची कथा उपकारक व्हावी असें वाटतें. हे अहर्निश अग्निचयन किंवा अग्निचिति करणारे ब्राह्मण स्त्रियांवांचून अग्नीची उपासना खचित करीत नव्हते. अग्निहोत्राला यजमानाप्रमाणें यजमानीण हि प्रायः अवश्य लागते. दंतकथेंत तर यजमानणीचा बिलकुल निर्देश नाहीं. तो निर्देश कुलधर्मावरून होतो. सर्व चित्पावनांचें पुरुष-दैवत पर्शुराम होय. त्या प्रमाणेंच बहुतेक सर्व चित्पावनांचें स्त्रीदैवत जोगेश्वरी होय. ही जोगेश्वरी म्हणजे अंब्याची जोगाई. चित्पावन पुरुष जसे पर्शुरामचे तशा मूळ चित्पावन स्त्रिया जोगाईच्या अंब्याच्या असाव्या. पर्शुराम व जोगेश्वरी हीं सर्व चित्पावनांचीं मुख्य कुलदैवतें होत. कुलदैवतें म्हणजे कुलाला जेव्हां केव्हां व जेथें कोठें अनादि कालीं म्हणजे फार प्राचीन कालीं प्रारंभ झाला तेव्हांची व तेथचीं मूळ दैवतें. आतां कित्येक चित्पावन घराण्यांनीं खंडोबा, वज्राई, महालक्ष्मी, वगैरे नवीन कुळदैवतें स्वीकारलेलीं आढळतात. परंतु हा प्रकार सापेक्षतः अर्वाचीन काळांत घडून आलेला आहे. कित्येक घराणीं ज्या नव्या प्रदेशांत येऊन राहिलीं व जेथें त्यांना बरकत आली व जेथील देवाच्या किंवा देवीच्या कृपेनें त्यांना बरे दिवस लाभेल त्या प्रदेशांतील इष्ट दैवतांना त्या घराण्यांनीं आपलीं नवीन कुल-दैवतें केलीं. परंतु, यद्यपि हीं नवीं कुलदैवतें देव्हाऱ्यांत शिरलीं, तत्रापि आदि-दैवतें जी पर्शुराम व जोगेश्वरी त्यांना ह्या घराण्यांनीं अजीबात सोडिलें अशांतला भाग मुळीं च नाहीं. मूळ अनादि दैवतें जशीं चीं तशीं स्वस्थानापन्न आहेत. ह्याचा अर्थ इतकाच कीं पर्शुराम व जोगेश्वरी हीं दोन चित्पावनांचीं अगदीं मूळ कुळ-दैवतें होत. पुरुषांचें पर्शुराम हें पुरुषदैवत होतें च. त्याच्या जोडीला बायांनीं आपली जोगेश्वरी हें स्त्रीदैवत कौटुंबिक देव्हाऱ्यांत आणून हक्कानें बसविलें. कारण बाया ज्या प्रदेशांतून किंवा घराण्यांतून आल्या त्या प्रदेशांतील किंवा घराण्यांतील स्त्रीदैवत जोगेश्वरी हें होतें. तात्पर्य, ह्या चौदा ब्राह्मणांच्या स्त्रिया जोगाईच्या आंब्याकडील होत्या. गोकर्णादि पश्चिमसमुद्रावरील तीर्थांच्या यात्रे करितां ह्या मुलींचे आईबाप कोकणांत मुलींसह आले व तेथें पर्शुरामानें त्यांचीं लग्नें ह्या चौदा अग्निचयन करूं इच्छिणाऱ्या पुरुषांशीं करून दिलीं म्हणा किंवा पर्शुरामानें मुद्दाम त्या दूर प्रदेशांतून त्या मुली आणविल्या म्हणा. इतकें स्पष्ट दिसत आहे कीं, चित्पावन स्त्रियांच्या पूजेचा विषय अंब्याची जोगाई आहे. एवंच पर्शुरामचे चौदा ब्राह्मण व अंब्याच्या चौदा मुली ह्यांची जी संतति ती सध्यांचे चित्पावन ब्राह्मण होत. त्यांची वृद्धि व उदय व स्थित्यंतरें ह्या तीन हजार वर्षांत कसकशीं झालीं तें, जितका पुरावा उपलब्ध झाला तितक्या पुरतें, पुढील कलमांत नमूद करतों.

९ चित्पावन ह्या शब्दाची खरी व्युत्पत्ति कळल्यावर, भ्रामक व्युत्पत्त्यांवर विश्वास ठेवण्याचें कारण रहात नाहीं. मराठींत व संस्कृतांत चिता म्हणजे मृताला

दहन करण्या करितां रचिलेलें सरण. चित्पावन ह्या सामासिक शब्दाचीं चिता व पावन अशीं दोन दलें पाडून, नंतर कित्येक लोकांनीं त्यांच्यावर अशी कृति बसविली कीं, हे चौदा चित्पावन लोक मूळ समुद्रांतून वहात येऊन किनाऱ्याला प्रेतें होऊन पडले, त्यांना तेथील लोकांनीं चितेवर दहन करण्या करितां ठेविलें, इतक्यांत ते सजीव झाले, सबब तेव्हांपासून त्यांना चितापावन अशी संज्ञा मिळाली. ह्या वर आणीक हि एक कोटि कोण्या कल्पकानें बसविली. ती अशी कीं मूळ चौदा कोळी होते, त्यांचे चितेवर दहन| करून व येणेंप्रमाणें त्यांना अभिपूत करून, पर्शुरामानें ब्राह्मण केलें. अशा नाना कल्पना व नाना कुट्या चित्पावनांच्या मूलोत्पत्तीसंबंधानें निघाल्या. त्याचें कारण व्युत्पत्तीचें अज्ञान. मूळ हे अहर्निश अभिचयन व यज्ञयाग करणारे ब्राह्मण होते व त्यावरून त्यांना चितिपावन अथवा चित्यपावन असें अभिधान प्राप्त झालें, हा इतिहास खऱ्या व्युत्पत्तींत होता तो खोटी व्युत्पत्ति केल्यामुळें समजेनासा झाला व अशक्य विधानें करून समाधान मानून घेणें अपरिहार्य झालें. मेलेलीं चौदा शवें दहन होत असतां उठलीं, कोळ्यांचे ब्राह्मण झाले, वगैरे विधानें असंभाव्यापैकीं असल्यामुळें, तदाधारभूत व्युत्पत्ति हि निराधार आहे, हें उघड आहे. सद्व्युत्पत्तीचा इतिहासाला केवढा फायदा होतो व असद्व्युत्पत्तीपासून ऐतिहासिक सत्याला केवढा धक्का पोहोचतो, त्याचा हा एक उत्कट मासला आहे.

१० असद्व्युत्पत्ति केल्यानें असभाव्य विधानें पत्करावीं लागतात हें ध्यानांत घेऊन, कित्येक पाश्चात्यांनीं व्युत्पत्ति शोधून काढण्याचें मुळींच एका बाजूस ठेऊन, स्वकपोलकल्पित असे तर्क चालविले व त्यांचा च अनुवाद कित्येक परप्रत्ययनेयबुद्धि आधुनिक ब्राह्मणांनीं केला. हे लोक पश्चिमेकडून अर्थात् समुद्रापलीकडून इजिप्तांतून म्हणा, यहुदी लोकांच्या पालेस्तैन प्रांतांतून म्हणा, कोठून तरी आले, असा यांनीं प्रथम पहिला तर्क केला व नंतर त्यांच्या विचारसरणीला इष्ट असा दुसरा तर्क त्यांनीं असा केला कीं. मूळचे हे लोक एकवर्णी होते, पण हिंदुस्थानांत आल्यावर त्यांनीं ब्राह्मणधर्म स्वीकारिला. ह्या कल्पनांत अशी एक असंभाव्यता होती कीं, हिंदुस्थानांतील इतर ब्राह्मणांनीं ह्या मूळच्या यहुदी किंवा मिस्त्री एकवर्णी म्लेच्छांना ब्राम्हण म्हणून ब्राम्हण्यांत समावून घेतलें. गोत्रप्रवरांना डोळ्यांत तेल घालून जपणारे भारतीय ब्राह्मण म्लेछांना ब्राह्मण करून घेतील किंवा मानतील, हें असंभाव्य आहे, इकडे या शोधकांचें लक्ष्य गेलें नाहीं. मी जी वर व्युत्पत्ति केली आहे, त्यानें हें असंभवादि दोष समूळ टळतात. चित्पावन ब्राह्मण पश्चिमेकडून आले असले च तर ते पर्शु लोकांच्या देशांतून आले असले पाहिजेत, पर्शु लोकांत पुरातन कालीं चातुर्वर्ण्य होतें, त्या लोकांत चातुर्वर्ण्य होतें तेव्हां फार पुरातन कालीं हे लोक कोंकणांत आले, त्यांना वीरपुरुष जो पर्शुराम त्यानें

कोंकणांत आणिलें, व पर्शु म्हणजे आधुनिक पारसीकांचे पुरातन पूर्वज होत, अशीं माझीं विधानें आहेत. त्यांचा सुज्ञांनीं शांतपणें विचार करावा.

११ शकपूर्व १२५२ वर्षापासून अथवा खिस्तपूर्व ११७४ वर्षांपासून आजपर्यंतचा ३०८८ वर्षांचा चित्पावनांचा इतिहास द्यावयाचा संकल्प आहे. त्या कालाची ओळख पटण्या करितां, तत्कालीन एकाददुसरी समकालीन ऐतिहासिक बाब सांगतों. चित्पावन पर्शुरामास प्रथम जेव्हां येऊन राहिले, त्या कालीं किंवा त्या कालानंतर कांहीं कालानें किंवा तत्पूर्वी लवकर च पाणिनि होऊन गेला. उत्तर हिंदुस्थानांत हिंदूंचें राज्य किंवा राज्यें असून, दंडकारण्यांत अद्याप वस्ती झाली नव्हती. गोदातीराला मात्र आर्यांची वस्ती झाली असावी. ज्या पर्शूंच्या देशांतून चित्पावन मूळ आले असावे असा आपण तर्क बांधला आहे त्या पर्शूंच्या देशा शेजारीं असुर लोकांचें मोठें साम्राज्य त्या कालीं पसरलें होतें. जसे मुसुलमानांच्या जुलमानें पुढें पार्शी हिंदुस्थानांत पळून आले, तसेच असुरांच्या जुलमामुळें चित्पावन ब्राह्मण कोंकण किनाऱ्याच्या आश्रयाला आले असण्याचा संभव आहे. कारण, मुसुलमानांप्रमाणेंच त्यांचे पूर्वज जे असुर ते हि पराकाष्ठेचे अमानुष क्रूर असत. कोंकणांत त्या कालीं नागांची म्हणजे कोंकणांत सध्यां जे मराठे, भंडारी, महार, वगैरे लोक आहेत त्यांच्या पूर्वजांची वस्ती होती. अशा वस्तींत व अशा परिस्थितींत चौदा चित्पावन ब्राह्मण कोंकणांत पर्शुरामाच्या डोंगराच्या आश्रयानें आपला देव व आपला धर्म यांजकडे सर्वस्वी लक्ष्य देऊन कालक्रमणा करूं लागले. पाणिनीच्या अष्टाध्यायींत विंध्यपर्वताच्या दक्षिणेकडील प्रांतांचें किंवा लोकांचें फारसें नांव नाहीं. म्हणजे पाणिनीच्या कालीं आर्यांच्या वसाहती विंध्याच्या दक्षिणेकडे झाल्या नव्हत्या व आर्यांना विंध्याच्या दक्षिणेकडील माहिती प्रायः बिलकुल नव्हती. अशा ह्या कालीं चौदा चित्पावनांची स्थापना कोंकणांत झालेली होती.

१२ सध्यां शक १८३६ त चित्पावनांची यथायावत् लोकसंख्या मुंबई-इलाख्यांत एक लक्ष दहा हजार आहे. सर्व हिंदुस्थान व पृथ्वीवरील बाकीचे देश घेतले तर आणिक पांच हजार जास्ती मिळून चित्पावनांची एकंदर लोकसंख्या सुमारें एक लक्ष पंधरा हजार भरावी. गेल्या तीन हजार वर्षांत मूळ चौदा ब्राह्मण जे कोंकणांत आले त्यांची वाढ फक्त एक लक्ष पंधरा हजार पर्यंत आज मित्तीस झाली आहे. प्रथम ३०८८ व्या वर्षाच्या प्रारंभीं प्रत्येक पुरुषाला एक स्त्री या हिशेबाप्रमाणें चित्पावनांची फक्त २८ माणसें होती, चौदा पुरुष व चौदा स्त्रिया. त्यांचीं आतां आजमित्तीस सरासरीनें साठ हजार पुरुष व पंचावन हजार स्त्रिया, अशीं माणसें झालीं आहेत. आणि भारतवर्षांतील एकंदर कालदेशवर्तमान पहातां इतकी च वाढ तीन हजार वर्षांत व्हावी, असें दिसतें. तुलनार्थ,

हिंदुस्थानांतील ज्यू व पार्शी लोक घेऊं. तुलनार्थ हे दोन समाज अशा करितां घेतों कीं, चित्पावन ब्राह्मणांत व ह्या दोन समाजांत बरींच साम्यें आहेत. (१) ह्या तिन्हीं समाजांत बाहेरून धर्मांतर होऊन लोकसंख्येची वृद्धि होऊं शकत नाहीं. (२) तद्बाह्य समाजांशीं ह्या तिन्ही समाजांचा शरीरसंबंध होत नाहीं. (३) हे तिन्ही समाज भारतवर्षांत परदेशांतून, उपजीविकार्थ च केवळ नव्हे, तर अस्तित्व-रक्षणार्थ आलेले आहेत. पैकीं ज्यू लोकांना हिंदुस्थानांत येऊन सुमारें पंधरा सोळाशें वर्षे झालेलीं आहेत. आणि पार्शांना येऊन सुमारें अकराशें बाराशें वर्षे झालेलीं आहेत. मूळ पहिल्या प्रथम किती ज्यू किंवा किती पार्शी आले त्याचा नक्की आंकडा कोठें दिलेला आढळत नाहीं. परंतु, अंदाज आहे कीं, आश्रयार्थ आलेले हे दोन्ही समाज लोकसंख्येने पांचशें सातशेंहून जास्त नसावे. पंधराशें सोळाशें वर्षांपूर्वीं आलेल्या पांच चारशें ज्यूंची सध्यां १८३६ शकांत लोकसंख्या सुमारें एकवीस हजार आहे आणि अकराशें बारशे वर्षांपूर्वीं आलेल्या पार्श्यांची लोकसंख्या १८३६ शकांत सुमारें एक लाख झाली आहे. ह्यावरून, तीन हजार वर्षांत चौदा ब्राह्मणांची वाढ सवा लाखापर्यंत च व्हावी ह्यांत अनियमित असें कांहीं नाहीं. इतकी च वाढ ह्या देशांतील कालदेशवर्तमान पहातां व्हावी असा नियम दिसतो.

१३ चित्पावनांच्या लोकसंख्येच्या वाढींत आजपर्यंत सांपडलेल्या साधनांवरून पांच टप्पे आढळतात. प्रथम फक्त चौदा गोत्रें ऊर्फ आडनांवें ऊर्फ भिन्न घराणीं होतीं. हा पहिला टप्पा. त्या चौदा आडनांवांचीं नंतर साठ आडनांवें झालीं. हा दुसरा टप्पा. साठांचीं पुढें एकशें तीस आडनांवें झालेलीं दिसतात (भारतीय आर्य-वंश हा निबंध पहा)—हा तिसरा टप्पा एकशे तीसाचीं कालान्तरानें अडीचशें आडनांवें झालीं (देवाचें गोठणें येथील टेंगें मत) हा चौथा टप्पा. आणि अडीचशेंचीं सध्यां साडेतीनशें आडनांवें झालेलीं प्रचलित आहेत. हा पांचवा टप्पा. तिसऱ्या टप्प्यापर्यंत प्रायः बहुतेक आडनांवें ऋषिनामांवरून पडलेलीं आढळतात. ह्या तिसऱ्या टप्प्यानंतर मात्र, गांवांवरून व धंद्यावरून आडनांवें निर्माण झालीं. म्हणजे तिसरा टप्पा पोहोंचे तोंपर्यंत यद्यपि निरनिराळ्या आसपासच्या गांवांत चित्पावन जाऊन निराळीं घरें करून राहिले असले, तत्रापि त्या त्या गांवचें किंवा धंद्याचें पूर्ण तादात्म्य झालेलें अद्याप आढळत नाहीं. एकशेंतीस आडनांवें प्रचलित होत तोंपर्यंत यज्ञयागादि वैदिक कर्म करण्यांतच हे ब्राह्मण गुंतले होते. नंतर आस्तें आस्ते यज्ञयाग हळूहळू सुटून जोसपण, कुळकरण, महाजनकी, खोती, हुद्देदारी, देशपांडेपण, इत्यादि व्यवहार ह्या लोकांनीं सोईप्रमाणें व लभ्यांशाप्रमाणें उचललेले दिसतात.

१४ गोत्रांवरून व आडनांवांवरून चित्पावनांची वाढ कसकशी होत गेली, हें स्थूलमानानें ताडतां येतें. त्यां वरून स्थूल कालमानाचा हि अंदाज होतो;

परंतु नक्की कालमान सांगतां येत नाहीं. कालमानाचा नक्की निर्देश करतां येण्यास ताम्रशीलादिलेख व कागदपत्र सांपडावे लागतात. उत्तर व दक्षिण कोंकण यांत शक १२०० पर्यंत जे थोडे ताम्रपट व शिलालेख सांपडले आहेत, त्यांच्यांत चित्पावनांचे उल्लेख खरें पाहिलें तर आढळावयाचे. ताम्रशिलादिदानपत्रांत ब्राह्मणांचीं नांवें व गोत्रें येतात. त्यापैकीं कित्येक नांवें चित्पावनांची असण्याचा पूर्ण संभव आहे. परंतु, देशस्थ, कऱ्हाडे व चित्पावन ह्यांच्यांत चित्पावनांचीं चौदा गोत्रें समान असल्यामुळें, त्यांतून चित्पावनांचीं अमुक च नांवें हें ओळखून काढतां येण्यास भेदक प्रमाण उपलब्ध नाहीं. शिलाहारांच्या राजवटींत कोल्हापूर, कऱ्हाड व नगर इकडील ब्राह्मणांना च कोंकणांत जोसपण,देशपांडेपण, पुजारीपण वगैरे हुद्दे शिलाहारांनीं दिलेले असावे. कचित् हे हुद्दे चित्पावनांच्या हि वांट्यास आले असतील. चित्पावनांचें नांव व आडनांव ज्यांत आलें आहे असा शिलाहारांचा पहिला लेख म्हटला म्हणजे शालिवाहनाच्या बाराव्या शतकांतील आहे (Graham's Report, Inscription No 8). त्यांत घैसास हें चित्पावन-आडनांव आलें आहे. घैसास ह्याचें दुसरें रूप घळिसास. हें घैसास आडनांव चित्पावनांच्या मूळ साठ आडनांवांत नाहीं. म्हणजे घैसास हें आडनांव पडण्या पूर्वी साठ आडनांवें निर्माण झालीं. अर्थात् शालिवाहनाच्या बाराव्या शतकाच्या पूर्वी साठ आडनांवें प्रचलित झालीं होतीं, हे निश्चित.

१५ ह्यानंतर कागदोपत्रीं पुरावा मुसलमान अमलापासून उपलब्ध आहे. गेल्या वर्षी कोंकणांत हिंडतांना मला कांहीं कागदपत्र मिळाले. त्यांतून कशेळी येथील कुळकर्ण्यांच्या दप्तरांतील एका पत्रांत खालील उल्लेख आहे (परिशिष्ट अ पहा). कागद जामीनकीचा आहे. त्यांत खालील चित्पावनांच्या साक्षी आहेत. कागद शक १५२२ तील आहे.

साक्ष

भानजी गणपुला	सिवभट राणाडिया
मौजे ढवळें १	गावखडिकर १
गणो विठल पराणजप्या १	

हे तीन चित्पावन फणशे व सेजवळकर या दोन कऱ्हाड्यांना २१५२॥ रुपयांना जामीन राहिले होते. म्हणजे शक १५२२ त हे तीन चित्पावन बऱ्याच चांगल्या सुस्थितींत असले पाहिजेत.

ह्याहून जुना असा चित्पावनांचा कागदोपत्रीं उल्लेख म्हणजे चिपळुणच्या कुळकर्ण्यांचा सांपडला आहे (परिशिष्ट आ पहा). सध्यांचे चिपळूणचे कुळकर्णी देशस्थ आहेत पहिले कुळकर्णी चित्पावन होते. गौतमाई नांवाची चिपळू-

णची कुळकरणीण शिवाजी छत्रपति व संभाजी छत्रपति यांच्या वेळीं होती. तिची वंशावळ:—

मूळ संपादक नरसीपंत काळे १४७० सुमार

|

विनाजी नरसी १५००

|

पर्शराम १५३०

|

काळो परशराम १५५५

|

अंतो काळो

स्त्री गौतमाई शक १५८० सुमार

काळे कुळकर्ण्यांच्या ह्या उल्लेखावरून दिसतें कीं शक १४७० च्या सुमारास नरसीपंत काळ्यानें चिपळूणचें कुळकरण संपादिलें. हें कुळकरण १४७०च्या पूर्वीच संपादिलेलें असावें.

रत्नागिरीजवळील पांवस येथील जोशांचे कागद पाहिले त्यांत शक १५४० तील एका कौलनाम्यांत म्हटलें आहे कीं पांवसच्या जोशांचे जोसपण कदीम मिरास आहे. म्हणजे निदान दोन तीनशें वर्षांचें जुनें त्या कालीं असावें. अर्थात् पावसचे जोशी शक १२४० पासून पावसचें जोसपण करीत असावे.

ह्याच जोशांच्या येथील शक १५५० तील एका खरीदपत्रावर खालील साक्षी आहेत:—

विश्वनाथ भट देसाई
दादभट देसाई
वामनभट देसाई
बाल सोवनी सराफ
हारिभट अभेकर
गणेस महाजनी
तानजी रघुनाथ कुळकर्णी

ह्यांपैकीं तीन चार साक्षी चित्पावनांच्या आहेत, म्हणजे शक १५५० त सराफ व महाजनी पांवस गावांत चित्पावन होते (परिशिष्ट इ).

ह्या जोशांच्या दुसऱ्या एक शक १५५६ तील हजरमजालमीच्या कागदा-वर खालील सह्या आहेत:—

हरभट अभेंकर खोतु वाडा कुर्ध्ये
कानभट फडका खोतु फडके वाडा कुर्ध्ये
माद जोसी खोतु मौजे अंबर

म्हणजे शक १५५६ त कित्येक चित्पावन खोत होते.

राजापुराजवळील मीठगव्हाणें येथील देसायांचे कागद पाहिले त्यांत शक १५५२ तील एका महजरांत मीठगव्हाणचें देसाइपण चित्पावनांचें पुरातन असलेलें आढळतें. पूर्वीचें म्हणजे सुमार दोनशें वर्षें देसाईपण मिळवून शक १५५२ त झालीं असावीं. म्हणजे शक १३५२ पासून ह्या चित्पावन घराण्यांत मिठगव्हाणचें देसाईपण आहे. (परिशिष्ट ई).

दंडाराजपुरी व श्रीवर्धन येथील भटांच्या घराण्यांत हि देशमुखी अशी च फार पुरातन आहे. शक १४०० च्या सुमारास ही देशमुखी भटांनीं संपादन केली असावी. अद्याप श्रीवर्धन प्रांतांतील कागदपत्र मीं शोधले नाहींत. तेव्हां नक्की विधान करतां येत नाहीं.

१६ तात्पर्य शक १२०० नंतर शिलाहाराचा अंमल कोंकणांतून उठून यादवांचें राज्य कोंकणांत झाल्यावर व विशेषतः मुसुलमानी अंमलांत, चित्पावन ब्राह्मणांनीं आपला पिढीजात धंदा जो यज्ञकर्माचा व वैदिकीचा तो किंचित् सोडून कुलकरण, जोसपण, सराफी, खोती, महाजनकी, देशमुखी व देशपांडेगिरी आस्तेआस्ते आक्रमण केली, असें दिसतें. पूर्वी दोन अडीच हजार वर्षें म्हणजे शकपूर्व १२०० पासून १२०० पर्यंत हे लोक केवळ ब्रह्मवृत्तीनें रहात होते. परंतु, शिलाहारांच्या नाशाबरोबर कऱ्हाड्यांचें उच्चाटण होऊन, कऱ्हाडे जसजसे खालावत चालले तसतसे चित्पावन त्यांचे धंदे स्वीकारूं लागले. येथें ब्रह्मवृत्ति सुटून, व्यावहारिक वृत्ति चित्पावनांची सुरू झाली. व्यावहारिक वृत्त्या स्वीकारल्यामुळें आर्थिक व सांपत्तिक स्थिति हि बदलत गेली. ह्या बदलणाऱ्या वर्धमान सांपत्तिक व आर्थिक व व्यावहारिक सुस्थितीबरोबर चित्पावनांची महत्वाकांक्षा दिवसेंदिवस वाढत जाऊन, शेवटीं शालिवाहनाच्या सतराव्या शतकाच्या प्रारंभाच्या सुमारास त्या महत्वाकांक्षेनें अखिल भारतवर्षाच्या साम्राज्याला गवसणी घालण्याचा उपक्रम केला.

१७ वरील हकीकतीवरून सहज दिसून येईल कीं, शालिवाहनाच्या सतराव्या शतकाच्या प्रारंभास चित्पावन ब्राह्मण आपले दर्भ व यज्ञपात्रें टाकून एकदम असिपत्राचा व मुत्सद्देगिरीचा पेषा स्वीकारते झाले आणि धूमकेतूप्रमाणें अकस्मात् राजकीय क्षितिजावर उदय पावले, अशांतला कांहींएक अद्भुत प्रकार नाहीं, शक १२०० पासून शक १६०० पर्यंत जोसपण, खोती, सराफी, देशमुखी

असे एकापाठीमागून एक लौकिक व्यवहार आक्रमीत आक्रमीत, शेवटीं उच्चें राजकारणाचा व्यवहार त्यांनीं योग्य समयीं, योग्य लोकसंख्या झाल्यावर, उचल-लेला आहे. प्रथम समयाच्या योग्यतेचा खुलासा करतों. (१) शिवछत्रपतीनें व शहाजी राजानें जी राज्यक्रांति व स्वराज्यस्थापना केली तिला साहाय्य सर्वस्वीं देशस्थ ब्राह्मणांनीं केलेलें आहे. तींत चित्पावनांचा बहुतेक बिलकुल संबंध नाहीं. शिवकालीन कित्येक चित्पावन कमाविसदार, सुभेदार, सभासद किंवा किल्लेदार व कारकून असलेले आढळतात. परंतु उच्च राजकारणांत प्रमुखत्वानें पडलेला एक हि चित्पावन आढळत नाहीं. शिवछत्रपतीनंतर शंभुछत्रपतीचा गोंधळ सुरू झाला. अवरंगजेबानें पुनः सर्व दक्षिण पादाक्रांत केल्यासारखें केलें. त्या धालमेलींत व खटाटोपांत स्वराज्यरक्षणाच्या खडतर प्रयत्नांत मराठेभाई व देशस्थ मुत्सद्दी यांच्या आहुति इतक्या पडल्या कीं, शक १६२२ च्या सुमारास म्हणजे राजाराम-छत्रपतीच्या मृत्यूच्या सुमारास शिवकालीन मराठे लढवय्ये व देशस्थ मुत्सद्दी पार खलास होऊन गेले. राज्यशकट चातुर्यानें हांकण्यास व शिताफीनें चालविण्यास बुद्धिबलाची व मुत्सद्देगिरीची वाण पडूं लागली. असा प्रकार भारतवर्षाच्या राजकारणांत वारंवार घडून आलेला आहे. त्याचें कारण भारतीय आर्यांच्या समाजव्यवस्थेंत गुरफटलेलें आहे. त्याचा खुलासा पुढें करतों. एथें इतकें च नमूद करून ठेवतों कीं, शक १६२२ च्या सुमाराला महाराष्ट्रांत उच्च राजकारण चातुर्यानें चालविणारें बुद्धिबल देशस्थ ब्राह्मणांतून बहुतेक अगदी नामशेष झालें. अशा आणीबाणीच्या समयीं बाळाजी विश्वनाथ भट यानें व याच्या इतर जातभाईनीं पुढें सरून पडली बाजू सांवरली व राज्याचा गाडा हांकिला, इतकें च नव्हे तर तो गाडा सर्व भारतवर्षभर फिरविला. समयाच्या योग्यतेसंबंधानें व औचित्या-संबंधानें हा असा खुलासा आहे. देशस्थांत जर ह्या कालीं उच्च मुत्सद्देगिरी व बुद्धिबल असतें, तर चित्पावनांना पुढें येऊन आपली कर्तबगारी दाखविण्यास संधि च सांपडली नसती. (२) आतां लोकसंख्येचा खुलासा करतों. शकपूर्व १२०० पासून शकोत्तर १२०० पर्यंतच्या अडीच हजार वर्षांत चित्पावनांची लोकसंख्या इतकी थोडी होती कीं, हिंदुस्थानच्या राजकारणांत हात घालण्यासारखें त्यांच्या ठाईं सामर्थ्य च नव्हतें. मी असा अंदाज केला आहे कीं, जोंपर्यंत केवळ वैदिक वृत्तीनें चित्पावन ब्राह्मण रहात होते, तोंपर्यंत म्हणजे साठ ऋषिनामोत्पन्न आडनांवें त्यांच्यांत प्रचलित होईपर्यंत, त्यांची लोकसंख्या पांच चार हजारांहून जास्त नव्हती. कारण, प्रजावृद्धि होण्यासारखी त्यांची आर्थिक स्थिति नव्हती. केवळ भिक्षा-वृत्तीवर निर्वाह करणाऱ्या समाजांत व वैदिक नीतीनें नियमित झालेल्या समाजांत प्रजावृद्धि अत्यंत संकुचित असणार हें निश्चित आहे. शक १२०० नंतर मुसुलमानी अंमलांत लौकिक व्यवहार जसजसे हे लोक उचलूं लागले तसतसें

त्यांचें आर्थिक सामर्थ्य वाढूं लागलें व ज्यास्त प्रजा पोसण्याची शक्ति त्यांचे ठाई आली. ब्राह्मण पडल्यामुळें बुद्धि पूर्वीपासून च संस्कृत झालेली होती; आणि ह्या बुद्धीला जेव्हां कांहीं एका प्रमाणानें संपत्तीची व प्रजावृद्धीची जोड मिळाली, तेव्हां हिंदुस्थानच्या उच्च राजकारणांत हात घालण्याची ह्या समाजांत शक्ति उत्पन्न झाली. ही शक्ति शक १५०० पासून शक १६०० पर्यंत योग्य संधीची वाट पहात होती. ती संधि राजाराम छत्रपतीच्या मृत्यूनंतर चित्पावनांना सांपडली व तिचा त्यांनीं यथायोग्य उपयोग केला. शक १६०० च्या सुमारास आडनांवें, सुमारें दोन अडीचशें झालीं होतीं, त्यावरून अंदाज वाटतो कीं, चित्पावनांची एकंदर लोकसंख्या त्या काली सुमारानें सरासरी दहा बारा हजार असावी. ही लोकसंख्या पेलतां न येण्यासारखी अवाढव्य हि नव्हती व पेलण्यास कुच-कामाची अशी क्षुद्र हि नव्हती. एक विचारानें भारून जाऊन, कोणतें हि लहान मोठें काम योग्य पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं शिताफीनें व कर्तृत्वानें उरकण्याची धमक ह्या समाजांत शक १६२२ च्या सुमारास संपत्ति, लौकिक दर्जा, बुद्धि लोकसंख्या व महत्त्वाकांक्षा ह्या पांच बाबींत निर्माण झालेली होती. गेल्या दोन अडीच हजार वर्षांत हिंदुस्थानच्या उच्च राजकारणांत ज्या ज्या हिंदू किंवा अहिंदू समाजांनीं विजयानें हात घातलेला आहे, त्या त्या समाजाच्या ठाईं ह्या पांच बाबींत योग्य तयारी असलेली दिसते. (१) समाज पुढाऱ्यांना पेलतां येईल इतका आटपसर असावा, फार अवाढव्य हि नसावा. (२) समाजाची सांपत्तिक स्थिति व लौकिक दर्जा हिंदुस्थानांतील इतर कोणत्या हि जातीच्या तोडीचा, अथवा त्याहून किंचित सरस असा असावा. (३) बुद्धिसामर्थ्यानें हिंदुस्थानांतील कोणत्या हि जातींहून तो फारसा कमतर नसावा, उच्च असल्यास फारच उत्कृष्ट. (४) आणि उच्च राजकारणांत पडण्याची धमक व महत्त्वाकांक्षा पुढाऱ्यांत व अनुयायांत असावी. हे पांच गुण हिंदुस्थानच्या उच्च राजकारणांत विजयानें हात घालणाऱ्या लोकांचे ठाईं असलेले अनुभवास आलेले आहेत—आणि शक १६२२ त चित्पावनांच्या ठाईं अनुभवास येत होते, हें पुराव्यांनिशीं वर दाखवून दिलें आहे. तुरुक घ्या, मोंगल घ्या, फ्रेंच घ्या, किंवा हबशी देखील घ्या, हे पांच गुण त्या त्या लोकांच्या ठाईं हटकून आढळून येतील; आटपसर व महत्त्वाकांक्षी पर-कीय समाज हिंदुस्थानांत एक प्रकारची जात बनतो आणि एकजुटीनें ह्या देशां-तील लहान मोठें राज्ययंत्र बुद्धीच्या व पराक्रमाच्या जोरावर काबीज करतो. हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत हि हा च चमत्कार अनुभवास येतो. मौर्य, शात वाहन, चालुक्य, गुप्त, राष्ट्रकूट, यादव, व चित्पावन यांच्या हि चरित्रांत हा च चमत्कार अनुभवास येतो. आटपशीर, मध्यवर्ती, कार्यकर्ता, व महत्त्वाकांक्षी असा एक लढाऊ व मुत्सद्दी समाज असला, म्हणजे हिंदुस्थानांतील आपापलें

पोटापाण्याचे धंदे निधास्तपणें चालविणारे बाकीचे लोक त्या समाजाचा अंमल तो समाज समर्थ आहे तोंपर्यंत आनंदानें मानतात व त्याची सेवा करतात. तो समाज क्षीणबल, तवीर्य व समाप्तकार्य झाला म्हणजे दुसऱ्या एखाद्या कर्तृत्व-शाली अशा आटपशीर समाजाचा अंमल हिंदुस्थानांतील लोक मान्य करतात, राज्ययंत्राच्या मालकी संबंधानं आवडनिवड अशी फारशी त्यांना नाहीं. एक भीति मात्र त्यांच्यात दृष्टीस पडते. ती कोणती, तर अराजकाची. कोणता हि अंमल शांतपणें कबूल करण्याचा हा गुण जो वैश्यशूद्रादि जातींत दृष्टीस पडतो, त्याचें कारण हिंदुस्थानांतील समाजव्यवस्था होय. आज हजारों वर्षे राज्ययंत्राची प्रकृति दुरुस्त ठेविण्याचा मक्ता धर्मानें म्हणजे अनादिसिद्ध समाजव्यवस्थेनें हिंदु-स्थानांत क्षत्रिय व ब्राह्मण या वर्णांनीं आपल्याकडे घेतलेला आहे. तेव्हां अर्थात् श्रमविभागाच्या तत्वाप्रमाणें ब्राह्मण व क्षत्रिय यांच्या व्यतिरिक्त बाकीचे लोक राज्ययंत्राच्या प्रकृतीकडे सहजच लक्ष्य देत नाहींत. राजकीय उलाढाल जी कांहीं व्हावयाची ती क्षत्रिय व ब्राह्मण ह्यांच्या द्वारा व्हावयाची. ती यथास्थित व यथा-न्याय करण्याचें काम जेव्हां जेव्हां हिंदुस्थानांतील ब्राह्मण व क्षत्रिय हलगर्जी-पणानें किंवा अन्योन्य बेबनावानें टाळतात, तेव्हां तेव्हां त्यांची जागा हिंदुबाह्य असा कोणता तरी लढाऊ व मुत्सद्दी असा आटपशीर समाज पटकावतो आणि ती पटकावणी हिंदुस्थानांतील बाकीच्या वर्णांना निमूटपणें सहन करणें निरुपायानें भाग पडतें. हा घरचा किंवा बाहेरचा राज्यकर्ता आटपशीर समाज प्रजेपासून उर्मटपणानें जीवाबाहेर पैसा उकळूं लागला किंवा देवधर्माच्या आड येऊं लागला म्हणजे मात्र हे लोक त्रस्त होतात आणि नाश पावतात. ह्यांच्या नाशाबरोबर राज्यकर्त्यांची आर्थिक स्थिती खालावते. आर्थिक व सांपत्तिक स्थितीबरोबर नाना प्रकारची इतर हलाखी राज्यकर्त्या समाजांत उद्भवते. आणि शेवटीं दुसरा एखादा घरचा किंवा बाहेरचा कर्ता व आटपशीर समाज राज्ययंत्राची मालकी पटकावतो.

१८ असो. शक १६२२ च्या सुमारास चित्पावनांनीं उच्च राजकारणांत मन घातलें तें एकट्या दुकट्या भटउपनामक पेशव्यांनीं च तेवढें घातलें असें नाहीं. तर भटांच्या बरोबर, भानू, रास्ते, फडके, पटवर्धन, गोखले, काळे, बेहरे, पेठे, जोशी, कर्वे, कानडे, थत्ते, गोडबोले, लाटे, वोक, भाव्ये, गद्रे, परचुरे, मेहेंदळे, गोळे, पागे, लागू, दामळे, घारे, गाडगीळ, लिमये, पाटणकर, ठोसर, पेंडसे, कुंटे, गानू, आपटे, आठवले, साठे वगैरे अनेक चित्पावन कुळें त्या कालीं राजकारणांत, व्यापारांत, शास्त्रांत व समरांगणांत नांव करतांना दृष्टीस पडतात. कित्येक लढवय्ये बनले, कित्येक मुत्सद्दी झाले, कित्येकांनीं वकिल्या पत्करल्या, कित्येक नवकोट नारायण झाले, कित्येक धुरंधर ज्योती झाले, कित्येक नामांकित वैय्याकरण म्हणून

गाजले व कित्येक पट्टीचे वैदिक म्हणून प्रख्यातीस आले. सामान्य कारकुनी-पासून तों प्रधानकीपर्यंतच्या व सामान्य शिपाईगिरीपासून तों सेनापतित्वापर्यंतच्या अधिकाराच्या सर्व पाय्ऱ्या चित्पावनांनीं आक्रमिल्या. शक १६२२ पासून शक १७३९ पर्यंत महाराष्ट्रसाम्राज्याचे यंत्र चित्पावनांच्या देखरेखीखालीं व कबज्यांत होतें. त्या शंभर सवाशें वर्षांत सांपत्तिक स्थिति उत्तमोत्तम असल्यामुळें व जीवकला वर्धमान स्थितीत गेल्यामुळें, चित्पावनांचीं लोकसंख्या दहाबारा हजारांवरून पन्नास साठ हजारांपर्यंत गेली असावी असा अंदाज आहे. शक १६२२ पर्यंत पर्शुरामच्या डोंगराचा आश्रय सुटून चित्पावनांची वस्ती उत्तरेस हरिहरेश्वर व दक्षिणेस राजापूर येथपर्यंत पसरली. ही वस्ती समुद्रकिनाऱ्याला धरून होती. कोंकणपट्टीचे मुख्य भाग दोन. खलाटी व वलाटी, किंवा सह्याद्री पर्वताच्या बाजूचे पूर्वेकडील कोंकण व समुद्राच्या बाजूकडील पश्चिमेकडील कोंकण. पैकीं समुद्र-किनाऱ्याच्या बाजूला चित्पावनांची वस्ती विशेष आहे आणि सह्याद्रीच्या बाजूला कऱ्हाड्यांची वस्ती विशेष आहे. चित्पावनांची वस्ती राजापुराकडे पसरल्यावर देवाच्या गोठण्यास पर्शुरामाची म्हणजे कुलदेवतेची स्थापना नवीन केलेली दिसते. राजापुराकडील व दंडाराजपुरीकडील चित्पावनांच्या मूळ गांवाचा तपास करतां असें आढळून आलेलें आहे कीं, सर्व चित्पावन कुळें पर्शुरामच्या डोंगराकडे आपलें मूळ गांव असल्याचें सांगतात. शक १६२२ पूर्वी फार थोडी चित्पावन कुळें वर घांटीं जाऊन वस्ती करून राहिलेलीं आढळतात. नाशिक त्र्यंबक, जोगाईचें आंबें व काशीरामेश्वर या क्षेत्रीं एखाददुसरें चित्पावन कुळ शक १६२२ पूर्वी जाऊन राहिलेलें आहे. ह्याहून जास्त वस्ती शक १६२२पूर्वी चित्पावनांनीं वर घांटीं केलेली नाहीं. शक १६२२ नंतर चित्पावन सातारा, पुणें वगैरे प्रांतांतून कायमची वस्ती करून राहिले आणि आतां तर तुरळक तुरळक असे सर्व हिंदुस्थानभर पसरले आहेत.

१९ तीन हजार वर्षांपूर्वी कदाचित परदेशाहून येऊन कोंकणांतील पर्शु-रामाच्या डोंगराच्या आश्रयानें रहाणाऱ्या चौदा वैदिक ब्राह्मणांचे वंशज सर्व हिंदुस्थानभर कसकसे पसरत गेले व चौदांचे सव्वा लाख कसे झाले, तें वरील वृत्तावरून स्पष्ट होतें. आतां चातुर्वर्ण्य–दृष्टीनें ह्या समाजांत काय रूपान्तरें झालीं तें पाहूं. अध्ययनाध्यापन, यजनयाजन व दान-प्रतिग्रह, ही जीं ब्राह्मणांचीं सहा कर्में तीं चित्पावन ब्राह्मणांचीं सुमारें शालि-वाहनाच्या बाराव्या शतकापर्यंत सुटलीं नाहीत. त्यापुढें, जोसपण, पुजारीपण, व कृषि हे तीन धंदे ह्या ब्राह्मणांनीं उचललेले दिसतात. ह्यापासून ब्राह्मण्याला विशेष कमीपणा येण्यासारखा नव्हता. कालान्तरानें, कुळकरण, देशमुखी, सराफी, खोती, कारकुनी, कमाविशी, सुभेदारी, वगैरे शुद्ध ब्राह्मण्याला कमीपणा आणणारे

धंदे हे लोक करूं लागले. पुढें शक १६२२ नंतर ह्यांनीं मुत्सद्देगिरी व शिपायगिरी हे हि पेशे मोठ्या कर्तृत्वानें चालविले. पैकीं मुत्सद्देगिरी ब्राह्मण्याला विहित आहे; शिपायगिरी संकटावस्थेवांचून विहित नाहीं. तदनंतर अलीकडील शंभर वर्षांत– म्हणजे शक १७३९ पासून १८३६ पर्यंतच्या म्हणजे आजपर्यंतच्या काळांत- सुतारकी, शिंपगिरी, आचारकी, सोनारकाम, गवंडीपण, मास्तरकी, कलाली, कारकुनी, वैद्यकी, वकिली, इंजनेरी, शेतकी, क्षुद्र वाणिज्य, वगैरे सर्व प्रकारचे शूद्र, वाणिज् व कारुकर्में यांचे धंदे स्वीकारून चातुर्वर्ण्याच्या दृष्टीनें हे लोक स्वकर्मच्युत झाले आहेत यांत सशय नाहीं. कर्मच्युति झाल्यानें मनोरचना बदलून धर्मच्युति हि झालेली आहे. आणि धर्मच्युति झाल्यानें ह्या धर्मच्युतांना हिंदुधर्मशास्त्राचीं मूलतत्वें हि लागू पडतनाशी झालीं आहेत. हा प्रकार कसा होत चालला आहे तें संक्षेपतः वर्णन करतों.

२० हिंदुसमाजरचनेंत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण आहेत व ह्या चार वर्णांत धंद्यामुळें, प्रांतामुळें व आचारभिन्नत्वामुळें अनेक उपवर्ग ऊर्फ पोटवर्ण आहेत. हे पोटवर्ण व मुख्य वर्ण वांशिक आहेत, म्हणजे जन्मसिद्ध आहेत. ह्यांच्यांत ह्यांच्याबाहेरून कोणी येऊन समाविष्ट होऊं शकत नाहीं. प्रजा कांहीं एका प्रमाणापर्यंत जोंपर्यंत होती तोंपर्यंत हें सर्व ठीक चाललें होतें. परंतु, प्रजावृद्धि जसजशी प्रमाणाबाहेर होऊं लागली तसतसा निराळा च एक प्रकार उद्भूत झाला व तो ब्राह्मणादि वर्णांत विशेष गोचर होऊं लागला. ब्राह्मणांची लोकसंख्या प्रमाणाबाहेर जसजशी होत चालली, तसतसा त्यांचा निर्वाह केवळ यजनयाजनादि संपादून होणें मुष्कील झालें. क्वचित् स्थळीं तें तें सार्वजनीक किंवा सामाजिक काम करण्यास त्या त्या जाति नसल्यामुळें किंवा असमर्थ झाल्यामुळें आणि क्वचित् सांपत्तिक व आर्थिक अडचणीमुळें ब्राह्मणांनीं त्या त्या ब्राह्मणेतर जातींचे धंदे उचलले. सध्यां तर असा प्रकार झाला आहे कीं, अगदीं गलिच्छ धंदे सोडून बाकीचे बहुतेक सर्व धंदे ब्राह्मण करतात. एक जन्मसिद्ध ब्राह्मणत्व मात्र उरलेलें आहे. म्हणजे ब्राह्मण जातींत शरीरसंबंधानें किंवा इतर कोणत्या हि तऱ्हेनें बाहेरचें मनुष्य समाविष्ट होत नाहीं. असा प्रकार सध्यां अत्यंत मोठ्या प्रमाणावर प्रचलित झाला आहे. ह्या प्रकार फार पुरातन कालापासून आस्ते आस्ते प्रचलित होत होत सध्यां मनस्वी वाढला आहे. भगवद्गीता ज्या कालीं रचली गेली त्या कालीं किंवा त्या कालाच्या फार पूर्वी गुणकर्मांवरून प्रथम चातुर्वर्ण्याची प्रस्थापना झाली. नंतर गुण व कर्म यांना जन्मसिद्धत्वाची जोड देऊन जाति निर्माण झाल्या. पुढें असा प्रसंग येऊन गेला कीं, फक्त जन्मावरून जाति ठरूं लागली; मग गुण व कर्म कोणतें हि कां असेना. ही पद्धति सध्यां चालूं आहे. जातीनें, ह्याचा च अर्थ जन्मानें,

जो सध्यां ब्राह्मण निपजतो तो गुणानें व कर्मानें अत्यंत गलिच्छ धंद्या व्यतिरिक्त त्याला इष्ट तो धंदा पत्करतो. ह्याचा परिणाम असा होत चालला आहे कीं, ब्राह्मण इतर जातींच्या पोटावर पाय देत आहेत, असा अनुभव इतरजातींना येऊं लागला आहे. ह्याचा अर्थ इतका च कीं, ब्राह्मणांत च क्षत्रिय, वैश्य, शूद्र अशा जाति निर्माण होण्याची चिन्हें दिसत आहेत. कां कीं, ते ते धंदे करणारे वैश्यशूद्रादि लोक ब्राह्मणांना आपल्या जातींत घेऊं शकत नाहींत व हे शिंपी ब्राह्मण किंवा कायस्थ ब्राह्मण किंवा सोनार ब्राह्मण ब्राह्मणधर्म सोडून त्या त्या जातींचे धंदे तर राजरोस करूं लागले आहेत. तशांत इतर शूद्रादिजातीचे धंदे करूं लागल्यामुळें त्या त्या ब्राह्मणांच्या ठाईं शूद्रादि जातींचे आचार व मनोरचना हि उद्भूत होऊं लागली आहे; इतके च नव्हें तर मुसुलमान व युरोपियन यांचे आचार व मनोरचना ह्या ब्राह्मणांत दिसूं लागली आहे. शूद्रांची पाटाची चाल, मांसभक्षणाची चाल, मद्यपानाची चाल ह्यांच्यापैकीं कित्येकांनीं उचलली असून कित्येकांनीं युरोपियनांची गोमांस भक्षणाची हि चाल राजरोस उचलली आहे व कित्येक बिलकुल जातिनिर्बंध च नको म्हणून प्रतिपादूं लागले आहेत, व तो विचार आचरणांत आणून चुकले आहेत. ह्या शेवटल्या दोन बाबी शूद्रादि जातींच्या हि परीकडील आहेत.ह्याचा परिणाम असा झाला आहे किंवा होण्याचा रंग दिसतो कीं वरील नवीन व हिंदुबाह्य चाली स्वीकारणाऱ्यांचा एक नवीन जातिहीन व युरोपीयन आचारसंपन्न असा समाज हिंदुस्थानांत अस्तित्वांत आला आहे किंवा येत चालला आहे. हा जातिहीन व युरोपीयन आचारसंपन्न समाज प्रामुख्यानें उपस्थित करण्यांत चित्पावनांनीं, इतर व्यवसायांतल्या प्रमाणेंच, आज पन्नास साठ वर्षें पुढाकार घेतलेला आहे. केवळ अत्यन्त शास्त्रशुद्ध व पवित्र ब्राह्मणधर्मानें वागणारे जे कोणी हजार पांचशें चित्पावन ब्राम्हण ह्या भरतखंडांत असतील त्यांच्या दृष्टीनें ह्यांत अदृष्टपूर्व असें कांहीं नाहीं. असा प्रकार कालदेशवर्तमानानुसार होणें अपरिहार्य आहे. एकपत्नीव्रत, एकपतिव्रत, अहिंसा, मद्यनिवृत्ति, इत्यादि सुधारणा वैदिक कालापासून हा काल पर्यंत जे कोणी पवित्र ब्राह्मण वेळोवेळीं ह्या देशांत झाले त्यांनीं ब्राम्हणसमाजांत प्रचारांत आस्ते आस्ते आणिल्या. ह्या सुधारणा सर्व ब्राह्मणांना सारख्याच पेलतील, असा कांहीं नियम नाहीं. तेव्हां ज्यांना त्या पेलत नसतील त्यांनीं हा उच्च मार्ग सोडून इतर मार्ग स्वीकारल्यास, लाभालाभ भोगण्यास त्यांचे ते मुखत्यार आहेत. हा नवीन समाज काढणाऱ्यांना समाजहित व देशहित साधण्याची उत्कट इच्छा आहे व ती ह्या मार्गानें साधेल असें त्यांस मनापासून वाटतें. तेव्हां, कोणी हि पवित्र ब्राह्मण त्यांच्या आड येण्याची इच्छा कधीं हि करणार नाहीं, हें स्पष्ट आहे. मूळ उच्च मार्ग चित्पावनांपेक्षां व इतर देशस्थादि ब्राम्हणांपेक्षां पुष्कळ

लोक एकेका बाबींत हळूहळू सोडीत आल्यास गेलीं दोन अडीच हजार वर्षे गेलीं. प्रथम, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, कारु, इत्यादींचे धंदे व आचार ब्राह्मण स्वीकारूं लागतां लागतां, आतां म्लेंछाचार हि स्वीकारण्यांत हित आहे असें त्यांस वाटूं लागलें आहे. तेव्हां, त्यांचा निराळा च एक समाज बनणें अगत्याचें झालें आहे. शुद्ध, पवित्र व उच्च मार्गाचें अवलंबन करणारे जे थोडे कोणी ब्राह्मण असतील त्यांना आतां एकच मार्ग खुला आहे. तो हा कीं, म्लेंछाचार स्वीकारणाऱ्या आपल्या पूर्वीच्या जातभाईंशीं शरीरसंबंध व सहभोजन ह्या बाबींत बिलकुल संबंध न ठेवणें. बाकीचा व्यवहार पूर्ववत् प्रेमानें व सदय अंतःकरणानें चालण्यास कांहीं च अडचण नाहीं. समाजहित व देशहित साधणें हा दोघांचा हि एकच हेतू आहे.

२१ येणेंप्रमाणें चित्पावन ब्राह्मणांतून व इतर हि ब्राह्मणांतून कांहीं विशिष्ट मतांमुळें फुटून जाऊन, एक निराळा च समाज निर्माण होत असलेला अनुभवास येत आहे. ह्या नूतन समाजाशीं वर्तन सनातन ब्राह्मण समाज आपल्या नित्याच्या स्वभावाला अनसरून अत्यन्त स्वल्पिष्ट घर्षणाच्या स्वरूपाचें ठेवील, हें उघड आहे. आजपर्यंत हजारों वर्षे ह्या च मार्गाचा अवलंब ब्राह्मणांनीं केला. जेव्हां जेव्हां, वांशिक, मानसिक, धार्मिक, आचारिक, किंवा दैशिक कारणांनीं एका वर्णांत किंवा एका जातींत कांहीं लोक भिन्न प्रकृतीचे, आचाराचे किंवा विचाराचे निपजतात व मूळ आचाराला, विचाराला किंवा प्रकृतीला सोडण्याचा संकल्प व निश्चय करतात, तेव्हां तेव्हां त्या भिन्नप्रकृतींना आपला एक निराळा च कंपू ऊर्फ जात बनविण्याची मुभा ब्राह्मणसमाज समाधानानें परंतु निरुपायानें देतो. प्रथम सामोपचारानें किंचित् घर्षण होतें. तेवढ्यानें भिन्नप्रकृति व्यक्ति सुखाराध्य ठरल्या, तर जास्त घर्षणाची अवश्यकता रहात नाहीं; दुराराध्य ठरल्या, तर भिन्न जात बनवूं देण्याव्यतिरिक्त अन्य मार्ग उपलब्ध नसतो. कारण, भेदाला भिऊन, दुराराध्यांत मिसळून जावें, तर हजारों वर्षांच्या अनुभवानें जो उच्च मार्ग सुदैवानें प्राप्त झाला, तो सोडून कनिष्ठ पायरीवर उतरणें श्लाघ्य नसतें. एकपत्नीव्रत, एकपतिव्रत, मद्यमांसनिवृत्ति, अहिंसा, ब्रह्मभय, इत्यादिंतील कोणती हि बाब घ्या. ह्या बाबी हजारों वर्षांच्या अनुभवानें ब्राह्मणसमाजांत सिद्ध झाल्या आहेत व उच्च सामाजिक प्रगतीचीं गोड फळें आहेत. ही उच्च प्रगती सोडून, कनिष्ठ सामाजिक स्थितीला उतरणें केव्हां हि श्रेयस्कर होणार नाहीं. आतां कनिष्ठ सामाजिक स्थितीला उतरणें श्रेयस्कर आहे असें ज्यांस सद्विचारान्तीं वाटेल त्यांना ती स्थिति पत्करावयाची च असेल, तर ब्राह्मणसमाज त्यांच्या रस्त्यांत सामोपचाराच्या उपदेशाव्यतिरिक्त दुसरी कोणती हि आडकाठी घालणार नाहीं. कनिष्ट मार्ग परिस्थित्यन्तरास्तव स्वीकारण्यास जे कोणी सिद्ध झाले असतील, त्यांना सनातन धर्माचाराभिमानी इतकें च सांगूं शकेल कीं, ऐतिहासिकता म्हणून जी एक महत्वाची बाब मानवी संसारांत अनुस्यूत झालेली आहे तिजकडे आपण कानाडोळा करतां. ऋषिकालीं सोम

नांवाचें मादक द्रव्य ऋषि सेवन करीत असत आणि यज्ञांत, श्राद्धांत व नित्यांच्या भोजनांत हि मांसाशन करीत असत. कालान्तरानें हे दोन्ही प्रघात उच्च नीतीला लज्जास्पद वाटून, सदाचाराभिमानी ब्राह्मणांनीं निषिद्ध ठरविले व तो ठराव समाजांत अमलांत आणिला. हा उच्च नीतीचा प्रघात अनेक शतकांच्या प्रगतीचा व घासाघासीचा परिणाम आहे. तो उच्च नीतीचा प्रघात सोडून देणें सनातन धर्माभिमान्यांना श्रेयस्कर वाटत नाही. ज्यांना तो श्रेयस्कर वाटत असेल त्यांच्या आचारपानित्याबद्दल सनातनधर्मीयांना कींव वाटते. ह्या उच्च नीतीकरितां ब्राह्मणसभांतून पंचद्रविडांना पंचगौडांहून जास्त मान देतात. प्रगतीच्या दृष्टीनें पहातां पंचगौडांनी मांसनिवृत्त व्हावें, हा प्रगतीचा रस्ता दिसतो, व तो पंचगौड कालान्तरानें आक्रमितील असा उद्योग पंचद्रविड केल्याशिवाय रहाणार नाहीत. परंतु पंचद्रविडांपैकीच कित्येक मद्यमांसप्रवृत्त झालेले पाहून, सदाचारसंपन्नांना कींव व दुःख उत्पन्न होते. एकपतित्वासंबंधाने हि असा च प्रकार आहे. पतिपत्नीसंबंध जन्मोजन्मींचा आहे, अशी श्रद्धा आर्यांची व ब्राह्मणांची फार पुरातन कालापासूनची आहे. स्त्रीनें यावज्जन्म एका च नवऱ्याला चिकटून रहाण्यांत सामाजिक नीतीची पराकाष्ठा होते. ही अत्युच्च नीति ब्राह्मण समाजांत आज हजारों वर्षे रूढ आहे. हिच्यांत प्रगति करावयाची म्हणजे पुरुषानें हि यावज्जन्म एकाच बायकोला चिकटून रहाण्याचा प्रघात पाडावयाचा. सुधारणा म्हणजे जर प्रगति असेल आणि प्रतिगति नसेल, तर ती ह्या दिशेनें व्हावयाला हवी. पण खेदाची गोष्ट आहे कीं एकाच किंवा भिन्न कालीं बहुपत्नीकत्वाच्या नीच चालीप्रमाणेंच भिन्नकालीं बहुपतिकत्वाची चाल पाडणें कित्येकांना श्रेयस्कर वाटते. ऋषिकालीं वायु, अग्नि, वीज, जल, इत्यादि पंचभूतांची पूजा प्रचलित होती. तदनंतर इंद्र, राम, कृष्ण, इत्यादि वीरपूजा सुरू झाली. पुढें कालान्तरानें ब्रह्मभूयाचें तत्व अद्वैत वेदान्त्यांनीं शोधून काढून, इतर काल्पनिक देवतांच्या व वीरपुरुषांच्या व भूतशक्तींच्या पूजा अवास्तव व नीच ठरविल्या. ब्रह्मभूयाच्या ह्या उच्च पायरीला येण्यास हजारों वर्षांची खटपट लागली. ब्रह्मभूयाची कल्पना पूजाविषयक प्रगतीचा केवळ कळस आहे. हि प्रगति सोडून, पूजेचे व प्रार्थनेचे गौण मार्ग अवलंबितांना कित्येक लोक पाहिले, म्हणजे सनातनधर्मीयांना मानवी प्रगतीसंबंधानें पराकाष्ठेची निराशा उत्पन्न होते. हें च खरें कीं, उच्च नीति व प्रगति पेलण्याचें काम बहुत धैर्याचें व सत्त्वाचें आहे. तें ज्यांच्या हातून उरकत नसेल, त्यांना सुलभतर मार्ग सुखानें आक्रमूं देणें सोयीचें व स्वल्पिष्ट घर्षणाचें होईल.

२२ येणेंप्रमाणें मूळच्या चौदा चित्पावन ब्राह्मणांचा वंश वैदिक धर्मानें शातवाहनशकाच्या बाराव्या शतकापर्यंत चालून, आस्ते आस्ते पुढें ब्राह्मणेतर धंदे स्वीकारूं लागतां लागतां, आतां तर, त्यापैकी बराच मोठा भाग, एकवर्णाकडे व

कदाचित् म्लेच्छधर्माकडे व म्लेच्छआचाराकडे जोरानें व वेगानें, झुकत आहे व वैदिक परंपरेला पारखा होत आहे. सुधारकपंथ म्हणून सध्यां ज्याला म्हणतात तो अकस्मात् गेल्या पन्नास साठ वर्षांत उत्पन्न झालेला नाहीं, त्याचीं पाळेंमुळें निदान सहाशें वर्षें खोल आहेत. ज्या पहिल्या ब्राह्मणानें शुद्ध वैदिक आचार सोडून, प्रथम ब्राह्मणेतर धंदा सुरू केला, तो पहिला सुधारक होय. सुधारक म्हणण्या ऐवजीं नवीनाचाराप्रचारक हा शब्द घातल्यास यथार्थाचा बोध उत्तम होईल. कारण सुधारणा हा शब्द सध्यां सामाजिक बदल ह्या शब्दसमूहाचा पर्याय झाला आहे. सामाजिक बदल बरा असा वा वाईट असो दोन्हींना हि सुधारणा हें एक च नांव पडलें आहे. खरें म्हटलें असतां व सामाजिक फेरबदलाचा गेल्या साहाशें वर्षांचा इतिहास पहातां,असें म्हणावें लागतें की सामाजिक सुधारक सध्यां दोन प्रकारचेआहेतः ब्राह्मणेतरं धंदे पत्करणारे परंतु वैदिक परंपरेला व मद्यमांसनिवृत्यादि मुख्य आचारांना न सोडणारे जे जुने सुधारक त्यांचा पहिला प्रकार आणि मद्यमांसप्रवृत्तिसबंधानें विशेष अडचण ज्यांना भासत नाहीं व वैदिक परंपरेवर ज्यांची विशेष भिस्त नाहा अशांचा दुसरा प्रकार. हा दुसरा प्रकार पहिल्या प्रकाराचाच केवळ प्रकर्ष आहे. परंतु दोहोंत एक मोठें अंतर आहे. पहिले धंद्यानें यद्यपि ब्राह्मणत्वापासून च्युत झालेले आहेत, तत्रापि गृह्य आचारानें शुद्ध ब्राह्मण आहेत, व चातुर्वर्ण्याची त्यांना चाड आहे. दुसरे धंद्यानें ब्राह्मणत्वापासून च्युत झाले असून, शिवाय गृह्य आचार हि त्यांनीं सोडून दिले आहेत व एकवर्णाचे ते पुरस्कर्ते आहेत. गृह्य आचारांनीं शुद्ध असा जो चातुर्वर्ण्यप्रिय ब्राह्मणब्रुवांचा समाज त्यांतून जातिवंत ब्राह्मण निपजण्याचा संभव आहे. एकवर्णप्रियांच्या समाजांतून ब्राह्मण ही राशि च मुळीं नाहींशी झालेली आहे, तेव्हां त्यांच्यांतून ब्राह्मण निजपण्याचा संभव च नाही. चातुर्वर्ण्यदृष्टीनें चित्पावन समाजाची अशी ही सद्यःस्थिति आहे.

२३ कऱ्हाडे, देशस्थ, देवरुखे, शेणवई, परभू, भंडारी, महार, मराठे, वगैरे जाति व पोटजाति ह्यांच्या हि मूळपीठिका, त्यांच्या संबंधाची कागदपत्रें हुडकून काढून, रचिल्या पाहिजेत. कारण, हिंदू-समाजरचनेचा अभ्यास व अर्थ त्याखेरीज विशद होणार नाहीं.

२४ ह्या निबंधांत चित्पावनांच्या सामाजिक स्थितिगतीचा विचार केला आहे. त्यांच्या आर्थिक, राजकीय, वैयिक, वगैरें स्थितिगतींचा विचार अन्यत्र करणे योग्य होईल.

वि. का. राजवाडे

(परिशिष्ट अ)

लेखांक १

कसेळी, जिल्हा रत्नागिरी, येथील कुळकर्ण्यांची वंशावळ

जनार्दन शक १४५०
|
कांयदेउ शक १४७५
|
जानो (फसली ९८०, इसवी १५८०, शक १५०२)

आज सुमार ३८५ वर्षे झाली. पूर्वी कसेळीस किती वर्षे होते तें सांगवत नाहीं.

लेखांक २

१५११ आषाढ वद्य १३

(फारसी शिका)

(फारसी शिका) ॐ कौलनामा अज दिवाण ता। राजापूर सु॥ सन तिसैन वा तिसा मया ताहां अंतो काइदेउ मुलिया मिरासी मोकदम वा नारो काइदेउ खोतु मौजे कसेळी दिल्हा कौलुनामा ऐसा जें तुजे बाबे देसायानी वा खोतानी ता। मजकूर अर्दास केली जें अंतो काइदेउ वा नारो काइदेउ खोतु मिरासी मुलिये मौजे मजकूर तपे मजकुरासी निधे बदल एताती त्यासी राहाविया घर नाही घरें घरखाण याणी करणें चुकूर होताती तरी बानारामधें सीयासनरामयाचे जंगमाचें घर असे तो ठाउ घर बांधावया देणें वा पुढें सीयासनासी ऐकेकडे ठाउ दिल्हा असे वा आगर गाउ पान पोफळ वा फणे वा नारेल विकावया कारणें घरा पुढें दुकान बांधतील तरी साहेबी कौलु देउनु घरासी ठाउ देणें म्हणौनु बराये इलतमेस + + + + खातिरेसी आणौनु + + + + घर बांधावयासी सीयासन रामया बाबे दरफ ठाउ दिला असे घर वा दुकान बांधौन् सुखे असिजे वा अंतो काइदेउ खासनिवीस मारून आला ते वेळेसी घर बांधले म्हणौनु कोणी काही बोलनील तरी काही निसबत नाही जाणिजे खातिरजमा करुनु सुखें असिजे

तेरीख २६ माहे रजू सूद
सा बा न

लेखांक ३

१५१३ चैत्र वद्य ७

(फारसी मजकूर)

फारसी शिक्का

·।। ॐ कौलनामे अज दिवाण तपे राजापुर मामले मुजाफराबाद ताा अंतो कांइदेउ + + बाहीरवाडी मौजे कसेळी ताा मजकूर सुहुरसन इहिदे तिसैन तिसा मैया दिल्हा कौलनामा ऐसा जें तुवां हुजूर एउनू मालूम केले जे मौजेमजकुरी किटो हरडीकराचे आगराची पात ++++ सेत जमीन वाडा आहे. तेथें चंद्राजवळी ++++ ते जमीन नाकांर्दी पडिली असे साहेबाचा कौलु जाहालेया तेथे कस्ट मस्याखती +++ नारेल माडणी करीन तरी हुजरून हजरती +++ न्यामीखान अलीस्यान दया ++++ हू साहेबी माहालामी कौलु मादीर केला ऐसे जे बनिसबत परगणे कुडाल ++++ इस्तवा +++ देउनु नारेल माडणी ++++ म्हणौन कौलु सादीर केले असेती तेणेप्रमाणें आपणामी कौलु दिल्हे तरी +++ सी नारेल माडणी करीन म्हणौनु (ए) बाबं देसाइयानी वा खोनानि तपे मजकूर इलतमेसी केले मग बराए इलतमसो खातिरेसी आणुनु जमीन चाबती किटो मजकूर नारेलमाडणी करावेया दिल्ही असे इस्तवा मुदती २५ साले इस्तकबिल सन इसने तिसैन तागायत सन सीत असर अलफ मैया दिल्हे असे इस्तवा भरेतव निधा

मुदती १० साले इस्तकबिल
सन इसने तिसैन तिसा
मया तागाइत सन इहिदे
अलफ एक हजार माड
बैसती इतुके जमीनेसी
दर साले होन ·।।· एकुनु
लारी ३ प्रमाणे देणे
मुदती १० साले इाा सन
सबा अलफ ताा सन
सीत असर अलफ एक
हजार माड बैसती ते

मुदती ५ साले इस्तकबिल
सन इसने अलफ तागाइत
सन सीत अलफ एक
नारेल बैसती इतुके
जमीनेसी दर साले
होन १ एकुनु लारी
६ प्रमाणे देणे

जमीनेसी दर साले होन
२ एकुनु लारी १२
प्रमाणे देणे

हेणे प्रमाणे इस्तवा दिल्हे असे इस्तवा दिल्हेवरी पेस्तर दर सदे १०० माडांसी लारी १० दाहा साल दर साल देणे याची माफजानी करावया माडामध्ये कुणबी वा + + + वा गावीत जे कोणी घरे बांधौन असतील यांसी मुदती पांच साले ह्या सन इहिदे तिसैन ता। सन सीत वेठ वा बेगारी वा पाणीदाम कुली माफ असे मुदती गुदरलेयावरी + + + + + घरे ५ पाणीदाम माफ + + + + असतील तरी दर घरासी पाणीदाम लारी १) हर साल बसाल देणे हेणे प्रमाणें परगणे कुडाल विलायतीस कौलु असे तरी सदरहू जमीन नारेलमाडणी करून वा' सदरहू इस्तवा प्रमाणे देउनु सुखे असिजे इस्तवा भरलेयावरी सदरहू प्रमाणे रकम देउनु सुखे असिजे लारी ६ कौलु
तेरीख २० माहे
जमादिलाखर



लेखांक ४

१५२२

श्री

दा। बा। अंतो नार ठाकूर फणशे व नारो माहादेव सेजवळकर मौजे कसेली ता। राजापूर सुहुरसन इहिदे मया अलफ कारणे राजश्री रुद्राजी हीरदेव सेणवी मो। मजकुरी गोमावियासी लिहून दिला कतबा ऐसा जे हजरत खान साहेबांची आरमाराची स्वारी राजापूर प्रांते जाहाली ते समई मौजेमजकूरची माणसें कबिले दस्त करून राजपुरीस आणिली त्यास तुम्हाम दिवाणात जमान देऊन खंडकरार केला रुपये

ऐन रुपये	२०५०
भाते	१०२॥
	२१५२॥

एकून एकवीस से साडे बावन रुपये मुदत महिने तीन वायदा करून देउन मुदतीस दिले नाही तर दर माहे दर सदे व्याज चवत्राप्रमाणे देउन घालीन

जमानत लोक शेर्त प्रमाणे देउन सदरहूचे कतबे अलाहिदे कुलारग दिले आहेत त्याप्रमाणें + + + + देउन

साक्ष

भानजी गणपुला
मौजे ढवळें
१

सिवभट राणाडिया
गावखडिकर
१

गणो विठल पराणजप्या
अडिवरेकर
१

अंतो नार ठाकूर व नारोबा सेजवळकर पैकेस लिहिलेप्रमाणे मान

लेखांक ५

१५२३

श्री

दाा बेस्मी अंतनाक बिन हरनाक पाडावा भनू खरमोला व गणा बिन विठल गोठणकर साा मौजे कसेली तपे राजापूर सुहुरसन इसने व मया अलफ कारणें राजश्री रामाजी लिंगोजी कुळकर्णी मौजे मजकूर स्वामीस लिहून दिल्हा कबूलकतबा ऐसा जे कमीनाचे बाईल व मूल बनाम कमली व राम ऐसे दस्तगीर होऊन राजपुरीस आणिले त्यावर अंतो नार ठाकूर व नारो माहादेऊ कळकिए हे राजपुरीस एऊन राा रुद्राजी हीरदेव यांसी बजीद होऊन जमान देऊन बंदाहून बाहीर काढिले आणि माथा रुपये २०० मोकरर केले आण अंतो नार ठाकूर श्रीहरेश्वरास गेला तेथे मृत्य पावला त्या उपर आम्ही दिवाणचा खंड यावा व जमानत दर सदे रुा ५ व भता रुा दर सदे ५ प्रमाणें द्यावे त्यास ओकात नाहीं मग आपण राजपुरीस आलो हर कोठे विकून घेऊन अगर कोणाचे बागेवर ठेवील तर ठेऊन घेऊन मग ओकात नाहीं मग सोड रुा ५० करून बाकी ऐन खंड रुा १५० दीडसे मोकरार केला आहे यांबद्दल तुम्ही जेथे विकाल तेथे आपण राजी आहे तुमचे द्रव्याचे विल्हे होईल तेव्हा आपण सुटेन भाद्रपद सुध प्रतिपदा मोकाम राजपुरी

साक्ष

खामजी शाहाणा मौजे जली

लिा अंतो केशव खाडेकर मौजे गावखडी

अंतो पाध्ये बिन विठल पाध्ये नेवाळकर मौजे कोंढ

लेखांक ६

१५३१ फाल्गन वद्य ७

फारसी मजकूर

फारसी शिक्का फारसी शिक्का

०॥ ® कौलुनामे अज दिवाण ता॥ राजापूर अज पूजा श्रीसरस्वती हुजुर-सन असर अलफ ता॥ जानो काइदेउ वा नारो काइदेउ थिराजर अंतो, काइदेउ कुलकरणी वा मुलिया मोकदम मौजे कसेळी ता॥ मजकूर दिला कौलुनामा ऐसा जे तुमी हुजूर एउनु मालूम केले जे जमीन घाट बाबती केळकर, पडिले होते तेथे पेसजी नवेदर माडणी करावेया कारकीर्दी दिलावरखान आगर रुकाई बारा माडणी करावे इस्तवा मुदती बारा साले रकम दर रुकायासी लारी २।४ प्रमाणे देणे ऐसे कौलु सन इहिदे समानीन कारणे घेउनु सन इसने कारणे जे काही जमीन होते तेथे आगरमाडणी केले तेणे चि प्रमाणे मौजेमजकूरीचे माहाजनाचे कौलु वा देसायाचे कौलु वा माहालीचे कौलु वा हुजूरचे कौलु घेतले पुढा अंतो काइदेउ ता॥मजकुरीचे निघावाना हातं माहालीचे निधेबद्दल मोकासाई माहालासी आले अंतो काइदेउ काही सक धरून बाहीर गेला आगर सिपणे विण मेले मागुते मौजेमजकूरासी आलेवरी हुजूर एउनु अहवाल मागोन मुदती ५ साले इस्तवा करुन मुदती १७ सतरा सालाचे कौलु घेउनु आगरासा कस्ट मस्याखती केले इस्तवा भरला साहेबी मेजजावेया पाठविले आगर पोलि ३१९ दर सदे रुकाई २ एकून रुकाई ६।१५ जमीन जाहाले आता साहबी हेयासी पाती जगल पालक करून दर रुकायासी लारी २।४ एकून लारी १४॥।७ मोकरर करून कौलु मरामत केलेया पेस्तर मस्याखती करावेया उमेद होइल म्हणोन वा दरीबाब देसायानी अर्दास केले जे जानो काइदेउ मौजेमजकुरीचा कुलकरणी वा मुलिया पूर्वापारी दिवाण नफराईस तकसीर करीत नाही याणे नवी मांडणी करून आगरासी मस्या-खती केले असे वा माहाजनाचे वा देसायाचे वा माहालीचे वा हुजूरचे कौल घेतले असे साहेबी खातिरेसी आणून सदरहूप्रमाणे आगरासी पातीपालक करून दर रुकायासी रकम लारी २।४ प्रमाणें कौलु मरामत करणें म्हणौन बिनाबरा इलतमेस खातिरेसी आणून वा कौलु खातिरेसी आणून आगरासी बदल पाती

किना निवई धिरगांची
कुडो ८१॥।

किता सावरीचे काठे
कुडो८१॥।

किता आगराचे मुळवस

जमीन ८१

एकून कुडो ८४ पातीस पालक केले असे अगर सदरहू रकम रुकाई ६।१५ दर रुकाइयासी लारी २।४ एकून लारी १४।।।७ अज अज इस्तकबिल सा। तिसा अलफ दर साल झडती करून आगरासी कोर्दी माहामुरी करून सुखे असिजे कुल बाब मफ्त करून दिले असे नकदयाती वा तडतकसीम बाहातरी पाले माफ असे मूल रकम सदरहू साल दरसाल झडती करून आगराची मस्याखती करून सुखे असिजे मो

तो २० माहे जिल्हेज

(परिशिष्ट आ)

लेखांक १

१६३७

।। श्रीवरदमूर्ति ।।

२१ एकवीस

करीना वतनं देशकुलकर्ण हरी रुष्ण .... कर्यात ता। चिपोलण सुबा मामले दाभोल इस्तकबील वतन साधले त्यापासून तागायत सुा सीत अशर मया व अलफ मन्मथ नाम संवत्छर येकूण सरासरी भोगवटा बरसें .... पूर्वील करीनां काळोपंत ता। मजकुरींचे देशकुलकर्ण पिढी दर पिढी करीत होते त्याची जबरदस्त .... एकंदर वतन-दारास असा .... होऊन .... त्यास जिवे च मारिले याचे पोटी एक च पुत्र होता त्याचे नांव अंताजी काळो उमरवरसें १० बर त्यास शाहाणा लिहिणार सरंदाज होता तो कारभारामुळे विजापुरास जाऊन तेथून येऊन आपले घरी आपमरणे मृत्य पावला काळोपंताची स्त्री गौतंमबाई दुसर कोण्ही मुतालीक ठेवायास यत्न करितां कोठे चितानरूप योजेना काळोपंताच्या घराण्याचे दायाज विनाजी बल्लाळ हे साजंण बंधु होते परंतु विद्या नाही ऐसे असोन साही जण उठोन देशांतरास गेले वतन चालिले पाहिजे म्हणोन ...... जी दातीर याची मुली अंतोवास पहिले दिल्ही होती त्याही आप्त विषइ देखोन पंचाइताच्या अनु-मते त्यास देशकुलकर्णाची मुतालकी सांगितली त्याणें चालविले वरसें ३०।। ४०।। त्याउपरी किनेकां दिवसी गोतमाईमध्यें व हरबाजी दातीरामध्ये बेबनाव होऊन कलहो निर्माण व्हावयास निमित्य गोतमाबाई दातीरास म्हणे कीं तुह्मी मुली आपल्या लेकास दिल्ही होती ते त ...... व .... ती याकरितां आपला पुत्र

मेला म्हणौन नाना प्रकारची त्यावरी कुफराने घेऊन नित्य कटकट होऊ आरंभ ············ यास दूर करावा ऐसा इत्यथ जाला परंतु दुसरा मुतालीक यत्न करितां चितानरूप मिलेनां दाहा जणांस ऐसें कलो आले की गौतमाबाईस दुसरा मुतालीक योजून······ऊन दांतीरास काढावा तरी च परस्परे कलहो वारतो नाहीतरी एखादा अनर्थ होणार हे गोष्ट जगप्रसिध जाली अकळपीत तिमाजी भास्कर व गंगाजी भास्कर हे दोघे······वाक तर्फेचे कुलकर्ण करीत होते तेथून थानभ्रष्ट होऊन चिपोलणीं गोदोवा व गणोवा व नारोवा ती ······देव वाटेपण करीत होते············चा सुहृदसमंध होता याकरितां चिपोलणास सह-कुटुंब आले राहायास जागा न मिले तेव्हा काही एक दिवस विठल जोसी याचे पोटिवरी राहिले तेथे तग निधेनां देखौन तिमाजी नाईक- देउसकर याचे घरीं राहिले लिहिणार उमेदवार देखोन सर्वांसि आर्जव संपादून गोतमाबाईस सांगोन तिमाजीपंतास देशकुलकर्णाची मुतालकी सांगितली किनेका दिवसी गंगाजी भास्कर हे लवाकास कुलकर्ण चालवायास गेले तिमाजीपंत व गंगाजीपंताचा पुत्र हरी त्रिमल यास तिमाजीपंताचे पोटी संतान नव्हते म्हणौन त्यास दिल्हा होता त्यास तिमाजीपंती आपणासंनिध ठेवून कितेक दिवस गोतमबाईसि रुजुवात राखोन पंचाइतास राजी राखोन कुलकर्णाचा कारभार करु लागले सान्या मामलियामध्ये दर···रो······आपणास अनकूल करून घेतले त्याउपरि विषकुंभ पयोदुग्ध हे विद्या मनीं धरून दिवसें दिवस गोतमाईस अलक्ष करून अनावस्थाकारितां हैरान व अपमान करुं लागले व मुतालकी आहे ते स्वना खावंदगिरी करुंन घ्यावी ऐसी तरतुद तलाष प्रसंग पाहोन आरंभला यत्न करितां करितां विजापुराहून अफजल-खानांस गजश्री सिवाजी राजे यावरी नामजाद केले अफजलखान हुमत वजीर त्याहीबराबरी पादशाहाचो फर्मानाचो डोळें करूंन घेतली होती हे वर्तमान तिमा-जीपंतास श्रुत जालियावरी याहीं कासी दियाननराउ यास वष करून याखेरीज तीनसें नावा विज्यापुराम पोंहचवाव्या ऐसा करार दाद करून फर्मानाची डोले होती त्यापैकी आपल्या नावे फर्मान करून घेतला त्यामध्यें गोतमाबाईची अफलाद लेहोन रुजुपडे ऐसे करून फर्मान घेऊन जाहिरानां न करिता चिपोलणास आले ऐसियास माहाजर पाहिजे म्हणौन जेथे श्रेह वा द ट सावला त्यास श्रुत करून फर्मानाप्रमाणें माहाजर करून घेतले अनकूल होते तेवढियाच्या साक्षी घेतल्या केशवसेट व गागसेट सेटिये हे नामधारीक याची साक्ष अलबता असावी म्हणौन प्रसंगोचित त्यास सांगितले त्याही उगे च मान्य केलेसे केले आणि त्या अपरोक्ष गौतमाईस आणुंन पुसिले कीं तिमाजीपंती आपल्या नावे पादशाही फर्मान करून घेतला आता माहाजर करितातो कितेकानी साक्षी केलधा आम्हास हि साक्ष करु म्हणौन आमचे भेटीस आले हे वर्तमान तुम्हास काही कलले की नाही त्यावरी ते कष्टी होऊन बोलिली की हे वर्तमान आपणास

आजीवरी कलले नाही तेव्हां सेटीने पुसिले की तुम्हापासी काही कागदपत्र तब-नाचे आहेत की काय त्याउपरी ते बोलिली की आहेत त्याउपरी तन्ही सावध होऊन कोण्हास दृष्ट न व्होता जतनेने वागवणें त्यावरी बाइकोची जात कागद दुसरे जागा ठेवावयास योजेनां तेव्हा चिरकुटे घालून उसां घ्यावयास उसी करून त्यामध्ये कागदपत्र होते तेवढे अशेष घालून उसी ठेविली रोज उठोन उसी दडपुन पाहाता कागद दरम्यान आहेत ऐसे कलत गेले तो तिमाजीपंतास अगत्य जाले की आपण फर्मान व माहाजर आपले नावे करून घेतला परंतु मोतमाईपासी कागदपत्र असतील त्याचा अंतस्ते शोध करून हस्तगत करावे म्हणौन कार्याकारण तीपासी येऊन आपले कितेक सुखदुख तिचे मन द्रवे ऐसे करु लागले उसा उसी होती तेथे हात चालऊन उसीमधे कागद आहेत ऐसा तर्क दिसोन आला तेव्हा प्रसंग पाहोन खर्डेयाचे गुंडाले करुन उसीमध्ये घालून पहिले कागद ठेविले होते ते काढुन घेउन त्याची ...... त्याम्ना खर्डे ठेविले गोतमाई सदा पाहात असे तैसे पाहो लागली तो पहिल्या च प्रमाणे कागद आहेत ऐसे प्रत्ययास येत गेले त्यावरी कितेका दिवसी संदेह निर्माण जाला म्हणौन उसी उघडून कागद पाहो लागली तो ते बाइको तसि कलेनां तेव्हा भलत्यापासी वाचायास दाखउ लागली कोण्ही वाचीना तेव्हा कृ-ष्णाजी देउसकर यापासी दाखविले त्याणे पाहाता बुके फुरसी खर्डे म्हणो लागला हे कलता च तिमाजीपंताच्या घरास जाऊन पाच ...... बोंबा मारुन त्याचा आपला आट घो क णा केला फर्मानामध्ये माझे लेकीचा औष म्हणोन लिहि-तोस तरी तू माझ्या बटकीचा लेक की काय ये जातीने...... यो वि न्य जाले वे समई तिमाजीपंत निमाजीनाईक देउसकर याचे च घरी होते हे कथले होउ लागले तैसे त्यास आपल्या घरातून बाहेर घातले तेव्हां वालदेवाच्या विद...... सांडोनु बा......चे घर होते तेथे जाऊन राहिले नित्य उठोन इचा त्याचा सीमे-परता कलहो होउ लागला दुसरा मुतालीक ठेवावा तरी च कलहो वारतो नाहीतरी या कथालियानिमित्य आपला प्राण जाईल म्हणोन गोतमाई भगीरथ प्रयत्न करु लागली परंतु बाइको कोण्हाचा पक्षपात नाही हरीपंताचे पिते कृष्णाजी सोमनाथ ते समई पंचनदीची मजमु करीत होते त्याची प्रत्यक्ष गोतमाई माउसी हे तिचे पुतणे म्हणोन एका दो वर्षी भेटीस येत काही अनकूल पडिलियासारिखा परा-मर्ष करीत त्यापासी गोतमाई म्हणे की तू माझा पूत असता माझी दुर्दशा होते मुतालीक होता तो कृतघ्न होऊन विसवास घात करितो माझे नाव बुडउन आपले प्रतिपादतो ऐसे असोन वतन का बुडविता ऐसा नाना प्रकारे सांगत गेली परंतु कृष्णाजीपंती मान्य केले नाही तेव्हां कोनेर रघुनाथ तुरुंबकर यांची आजी ते गोतमाईची बहीण याकरिता त्याच्या घरास गेली यास कितेक सांगायाच्या

नीतीने सांगितले परंतु याहीं मान्य केले नाहीं तेव्हां रोज उठोन झगडे भांडणे होत चालिली घरामध्यें राहो नेदीत दुसऱ्याच्या घरास गेली तरी ज्याचे घरी असें त्यासी हितशत्रुपण दर्षवीत गोतमाईचे समाधान करून आपल्या घरास पाठवा ते चीकडे फिरते तीपासी द्रव्याची पोतडी आहे ते जतन करा ह्मणोन सांगत त्या-मूळे नसते अरिष्ट म्हणौन तीस आपल्या घराहून बाहेर घालीत ऐसे घरोघर होन घालिले कोठे राहावयास जागा नाहीसा कर्मभोग पाठीस लागला देशत्याग करावा की विषप्रलय करावा ऐसे जाले तेव्हां श्री परशरामास जाऊन देवापासी धरणे घेऊन उपोषीत बसली काय निमित्य म्हणौन नारंभट पुजारेयाही पुसिले त्यापासी सांगितले की आपणास राहावयास जागा नाही जेथें जावे तेथे ब्रह्मग्रह पाठीस लागला याकरिता देवापासी देहांत करावयास येथें आलों तेव्हां त्याचे मन द्रवोन आपला घरी राहाविले हे वर्तमान ते समई अंताजी बावाजी यांणी सासवडकर चिपोलणची मजमु करीत होते त्यास हे वर्तमान कळले त्यावरी त्याहीं गोतमाईस बोलाऊन आणुन वर्तमान पुसिले त्यावरून तिणे आद्यंत निवेदन केले तेव्हां तिमाजी-पंतास सांगोन फजीत करून तिच्या घरठणीयावरी स्वतंतर घर बांधोन देऊन अंनावस्त्राची बेगमी करविली अंताजीपंत मजमु करीत होते तों काही एक दिवस चालिले ते हुजूर गेलियावरी पहिल्यापेक्षा विशेष कलहो निरंतर होउ लागले काही एक दिवस इची हलाखी होऊन तिमाजीपंतास छी थु फजीती करिता करिता भोग हलु हल भोगोन खडो लागला तो अकल्पीत अंताजी बावाजी राय-गडाहून राजापूरचा सुभा करून चिपोलणास आले तेथे स्मरण धरुन गोतमाईचा परामर्ष करु लागले तेव्हा साक्षात कुलस्वामी मूर्तिमंत येऊन भेटला ऐसे तीस समाधान होऊन भेटीस येऊन आपले वर्तमान त्यास निवेदन केले त्यावरून ते बोलिली* की ऐसे च होता होता उद्या मरोन जासील वतन बुडोन त्याच्या हातास जाईल याकरितां तुह्मा कोण्ही आपत-विषई असेल तरी त्यास आणून वतनावरी ठेव दिरंग करु नको तेव्हा गोतमाई बोलिली की आपणास स्वामीच्या पाया वितरिक्त दुसरे नाही मायबाप भाऊबंद सकळ गणगोत आपण आहेती मी निराश्रीत आहे द्रौपतीच्या आकांतास साक्षात श्रीकृष्ण पावला तद्वत स्वामी आले याउपरी माझा काही उबार राहिला नाहीं स्वामीने जीर्णोधार करावा म्हणौन बहुता प्रकारे सांगितले तेव्हा ते बोलिले कीं प्रस्तुत माहादाजी अनंत दाभोलचा सुभा करिताती ते आपले पुत्र त्यास आम्ही स्वता आपले दस्तुरे तुह्मेविसी पत्र लेहोन देतो ते घेऊन त्याचे भेटीस जाणे ते तुझे पारपत्य करितील म्हणौन त्याही पत्र लेहोन दिल्हे ते घेऊन गोतमाई दाभो-

---

* 'बोलिले' असें पाहिजे.

लेस माहादाजीपंताचे भेटीस गेली पत्र त्यास देऊन सविस्तर आपल्या श्रमाचे व तिमाजीपंताच्या करतुत्वाचे आद्यंत वर्तमान निवेदन केले त्यावरून त्याही गोतमाईचे समाधान करून तुझे कोण्ही आप्तविषई आहेत की नाही हे पुसिले ते बोलिली की प्रस्तुत कृष्णाजी सोमनाथ माझे पुतण्ये पंचनदीची मजमु स्वामीच्या पायांपासी करिताती त्यावरून त्यास हा कार्यभाग सांगावा म्हणोन अंतःकर्णी समाधान मानून त्यास बोलून नाना प्रकारे बोध केला परंतु आइकिला नाही माहादाजीपंतास कृष्णाजीपंताचा राग आला तो मान्य केला परंतु हे गोष्टीचा अंगिकार न करिता उठोन गेले तो दैवीगतीने ते च फडीं विनाजी बलाल देशत्यागे गेला होता ते अकल्पीत तेथे पैदा जाला गोतमाईने हर्ष मानून माहादाजीपंतास भेटविला त्यावरून माहादाजीपंत हि बहुत समाधान पावले परंतु मनास आणितां विनाजीस विद्या नाही केवल पाषाणरूप याकारिता मागती कृष्णाजीपंतास अतिशय करून बोलाऊन आणिले विनाजीची त्याची भेटी करविली हे कोण ते कोण परस्पर पुसिले खुणमुद्रा कलली याउपरी कृष्णाजीपंते तुम्ही देशकुलकर्ण करा स्वता तुमचीच खावंदगिरी ऐसे करून देतो म्हणोन तिमाजी नाईक देउसकर चिपोलणांहून तेथे गेले होते त्यास मध्यस्तीस घालुन नानाप्रकारे बोध करुन मान्य केले कृष्णाजीपंती आपले नाव लेहो दिल्हे नाहीं आपले पुत्र हरीपंत याही व विनाजीने चालवावे पुढे विनाजीच्या पुत्रानी हरीपंती वौषपरंपरेने वतनाचा उपभोग करून सुखी असावे ऐसे कागदपत्र करुन देउनु गोतमाई सहवर्तमान विनाजीस कृष्णाजीपंताचे हाती देऊन तिमाजीपंत अगोधर मेले गंगाजीपंत होते त्यास दूर करून यास चिपोलणास पाठविले रुणानबंध प्रमाण कृष्णाजीपंती मानून आले कारकुनाची व वरकड अनुक्रमे भेटी घेऊन कार्यभाग यथान्याये चालऊन मागील जुने कागदपत्र व माहालीचे रकमाले गंगाजीपंतापासी मागो लागले तेव्हा गंगाजीपंत रडो लागले आपणापासी कागदपत्र होते तेवढे गोवलामध्ये ठेविले होते ते अकस्मात आग लागोन जलोन गेले कागदाचा कपटा राहिला नाहीं म्हणोन नफरा करु लागले माझा भाउ तिमाजीपंत मेला हरी त्रिमल पुतण्या तो हि मेला मी हि मरेन म्हणोन काकुलतीस येऊन आपणास निरोप द्या म्हणोन पाया पडो लागले दरम्यान निरोप देता नये म्हणोन सेटीच्या मते जाले तेव्हा गंगाजीपंतास घेऊन कृष्णाजीपंत दाभोलेस माहादाजीपंतापासी गेले त्याही कागदाचे त्वष्ट लाविले तेथे हि तेच तकरीर केली तेव्हा बाबाजीपंती आपले पत्र कृष्णाजीपंतास स्वदस्तुरें लेहोन दिल्हे की कागदपत्र आपणास ठाउके होते ते आपणादेखत जलोन गेले आंपणास न कलत कोणे कदाचीत् ठेविले असतील त्यावरून तुम्हासी जो कोण्ही प्रसंग करील त्याचे

आई वर गडिली आहे व कार्यभागमुळे खर्चवेच दरबारी अगर आवंतर जाला असेल तो तुवासि निसबत नाही व कार्यभागमुळे जे मिलकत जाली असेल ते तुम्हास मागावयास निरुबत नाही मिलकत व खर्च आमची आम्ही जाणों ऐसे पत्र लेहोन दिल्हे त्याउपरी माहादाजीपंती गंगाजीपतापासी पाच हजार लारी मागो लागले तेव्हा भल्या लोकी अर्ज केला परंतु माहादाजीपंत नाइकत कोण्हाचा यत्न चालेनां तेव्हां कृष्णाजीपंती बजीद होऊन माफ करऊन गंगाजीपंतास आणुन कसबाचे मुतालिकीचे कुलकर्ण दिल्हे गोतमाई केवल मातेपेक्षा विशेष देवरूप मानून सांभाल करीत गेले आजन्माचे क्लेष होते तेवढे दूर जाले सुखरूप माय-लेकरासमान काल:क्रमणां होत चालिली तेव्हा गोतमाई कृष्णाजीपंतास म्हणो लागली की तुझे तीघे पुत्र आहेत त्यास मार्कंडाचे आयुष हो त्यामधील एक पुत्र आपणास दतपुत्र यावा म्हणोन भिडेस घातले तिची भीड उलंघवेनां तेव्हा मान्य केले शास्त्राधार पंडिताच्या मते मनास आणिता गोतमाईचे जमदाग्नी गोत्र कृष्णाजीपंताचे वसिष्ट गोत्र घटितार्थास नये पुरुष असिला तरी कार्यास येईल बाइकोस बोलिले नाही ऐसे धर्मशास्त्री निघाले तेव्हा विनाजी बलालास तन्ही यावा ऐसा सिधांत जाला कृष्णाजीपंताचे पुत्र

वडील हरीपंत १ मधील जनार्दन १ कनिष्ट भिकाजी १

या तीघापैकी जनार्दनास विनाजीस देऊन दतविधान केले तो थोडकीया च दिवसांत विनाजीस हि पुत्र जाला त्याचे नाव बापु ठेविले वडील जनार्दन धाकटा बापु ऐसे मानून उभयताची लग्ने यथाविधी कृष्णाजीपंती केली.

वडील जनार्दन विनायक यास	धाकटा बापुजी विनायक त्यास
विठल जोतिसी प्रभोलीकर	विसोबा नाईक सेंबेकर खोत
याची कन्या केली तिचे नाव	मोंजे··· ··मणवणें याची कन्या
वेणाई १	केली तिचे नाव सावित्री १

याप्रकारे उभयतांची लग्ने करून [व]द्याभ्यासास लाविले केवल गंगाजल होऊन कार्यभाग सुरलीत होऊ लागला विनाजीने हि आपले पत्र कृष्णाजीपंतास लेहोन दिल्हे की आपले दोघे पुत्रानी व हरीपंती एकदिल राहोन वोषपरंपरेने वत-नाचा उपभोग करावा ऐसे साक्षीनसी पत्र लेहोन दिल्हे त्या प्रसंगामध्ये जे कोण्ही स्वकीय परकीय राजकीय नामधारीक लोक होते त्यादेखत सदरहु प्रसंग जाला तो त्यास दखल आहे बिनपसील

सुबा दाबोल

माहादाजी अनंत	लक्ष्मण कृष्ण म-	पांडुरंग विस्वनाथ
सुबेदार १	जमदार १	दफतरदार १
तिमाजी नरसिंगराउ	नरसो गोविंद	नरसो नागदेव पतकी
दफतरदार १	चिटनिवीस १	······पोतेनीस

शिंदोजी अनंत
भावजनीस १

संभाजी बापुजी
हवालदार सौदागरी १

ता। चिपोलण कसबा

माहालीचे कारकून

१ माहादाजी राम हवालदार
१ मल्हार हरी मजमदार
१ रूपजी हरी दफतरदार
१ अंतो हरी दफतरदार
४
१ विसाजी सोमनाथ
निगावन कसबा

परस्थली येऊन कसबा राहिले

वेदशास्त्रसंपन कर्मकांडपरायण रा। केशवभट पंडित लेले १
राजश्री कासी विस्वासराउ १
रा। विठल जोतिर्सी प्रभोलकर
हरी गणेश १

जोतिसी

१ गोविंद जोसी
१ वीरेश्वर जोसी
१ विठल जोसी
१ बाल जोसी
१ रुद्र जोसी
१ कास जोसी
१ बाल जोसी खीर
१ नर जोसी
१ बहिर जोसी बलाल जोसी
९

उपाध्येपैकी

१ कासीभट पुराणीक
१ अवधुतभट चितले
१ माहादे भट
१ धोंडभट
१ नरसीभट ढेगे
५

मंत्रभट

१ मुधभट
१ शंकरभट
२

वेद्य

१ नारभट
१ परशरामभट
२

पोटे

रघोवा नाइक १
परसोवा ना। १
हरवा ना। १
अंतोवा ना। १
नारभट पुजारे परशराम १
अंतोवा ना। सफरे १

देउसकर

तिमाजी नाइक
हरवा नाइक
केसोवा ना। १
रुद्राजी ना। १

वालदेव

गोदावा ना।
गणोवा ना।
नारोवा ना।

गोविंद नाा नरेकर १
गस्ती नरहरी नाईक १
गोविंद रुद्राजी पोतदार १

वालदेव लिहिले०

बाल जोसी बागेमधील १

पतकी वतनदार

नरसो गोविंद १ नरसो गोविंद १

मु···सि द र स मुतालिक कुलकर्णी जमाती १
देसाई मोकदम चिपुलण १
तुकसेट माहाजन १

वाणीपैकी मोख्तसर

गांग सेट कुडालकर १ विस सेट वणजवडीकर १
रवल सेट वाडकर १ कानसेट पोतदार १
नजर सेट पाथरे १ विठसेट लेडिये १
दास सेट डाखवे १ गोपाल सेट चौधरी १

सोनार

दामसेट १ तुकसेट १

दरजी जानसेट १
गौळी गोंद म्हेतर १
धोबी गोविंद १
हजाम रोड माहाला १
पारकर रामणी १

साळी

नान म्हेतर १ बापु विथापा १
सिदोजी कांबळी १ भिकाजी १

सराफ

हरबाजी नाा मरढे गोलक गोदोंवा नाा
अंबाजी नाा गोलक १ हरबाजी चिबोरे १
कुबेर नाा मोहिते १ तिमाजी नाा ठाकूर १
कृष्णाजी दातीर १ विसोवा नरेकर १
मल्हार विठल मुतालीक कुलकर्णी कसबा १
विसोवा मुतालीक लावणीस १

सेटीये

केशवसेट १ गांग सेट १
कृष्णसेट १

जमातीपैकी मोख्तसर

दांवजी नाखवा १ जैत्रोजी नाखवा १
अंबाजी नाखवा पेजकर १
इसमाइलमुलना १
कासार गणसेट १

तेली

तावडोजी १ याकुबजी १
बैलकरी बापु १
खुमारी जनकोजी १
तोडकरी गोपालसेट १
कागदी खोजगी १

माळी

गोंद म्हेतर १ मांयाजी १

साटे

वेटजी म्हेतर १ अबा दुलजी १

मापागी सिलार १ — ॰ : १

गुरव तान्हा १ — नाइकवाडी कदीम

ठाणगे बावाजी निरुत वाडी मालखाजाणी २ — मालजी नाइक १ कृष्णाजी ना। १

आंबा व माहादा माहार — डागे लखमोजी व विठोजी २

कर्यातपैकी

बांदरे मुकासी मोहतादी — बावजी ..क ..ोकर खोत मौजे रू ,

पेढायकर १ वाडकर १ — राघोबा नाइक सेबेकर खोत मौजे धामणवणे १

ना।दिवसेकर १ वोबलांकर १ — काप साले झोरोजी टेभ्या १

तिंवरेकर १ अडरेकर १ — चिचघरी कासार १

मोखणेकर १ ठेरूकर १ — दुलवठणे सटवोजी व कृष्णाजी लिंगवना १

सिणाकर १ — काने गोविंद मल्हार १

...... न्हे — कुंभारली महादसेट सेटिया १

जोग प्रभु १ कृष्ण प्रभु १ — तुरबु कोनेरी रघुनाथ १

पिपली खुर्द गंगाजा हरी १ — ...... होसी हरजीराउ चव्हाण देसाई १

परसोजी फरजन — गोवल इस्माइलजी चौगला १

पोफली पवार १ — विरले गंगाजी भास्कर

वायल कान्होवा नाइक काटधरे १

कासीरामजी नाईक १

कावडस्ते गोदोबा १

येणेप्रमाणे सर्वांच्या मतें तिमाजी भास्करास दूर करून कृष्णाजी सोमनाथ स्थापना केली आणि कोणे गोष्टींचे किलबिश तिलतुल्य न राहाता निःप्रांजल घरांबियामध्ये व राजगृही बिलाकुसूर चालो लागले तो तोमध्ये कितेक व्याक्षेप पडिले ते कृष्णाजीपंती शर्तीनसी वाद सांगोन पराभवाते पावविले बितपसील

राजश्री संभाजीराजे याच्या कारकीर्दास राजश्री आनाजीपंती प्रसंग केला की संगमेश्वराच्या देशकुलकर्णास कोण्ही खावद नाही तेवढे वतन साहेबी मेहरवान होऊन आपणास मन्हामत करावे त्यावरून मनास आणून संगमेश्वरचे वतन देशकुलकर्णाचे अनाजीपंतास दिल्हे ते चिपोलणचे दफतरदार याही कुष्मांड करून विनाजी बलाळ्यास फिसाउन वस्त्रपात्र जेवणखाण गाडी दाखऊन कृष्णाजीपंतास काढुन काढून आपण देशकुलकर्ण करावे ऐसे करून विनाजीस घेऊन सरकारकुनासीं वाद भगीरथ

च प्रसंगी राहुजी सोमनाथ आनाजी-पंतास बोलिले की तुमचे सिवेसेजारी आपणांस हि एक वतन यावे मनास आणिता वेकाजी गंगाधर हेलवाककर कलकर्णी। तिमाजी भास्कराचा पुतण्या रायगडास मोहसबा यावयास गेला होता त्याणे सांगितलें कीं चिपोलणच्या हि देशकुलकर्णास खावंद नाही त्यावरून हुजूर मोझ्यास त्यास उभा करून राहुजी-पंतास चिपोलणचे देशकुलकर्ण वतन करून दिल्हे त्या फडास रुष्णाजीपती जाऊन सा महिने वाद सांगितला परंतु सरकारकुनापुढे याचे माडेना राहुजी-पंताचा मुतालीक माहालास आला हे वाद सांगत जर्जर जाले तऱ्ही दरबारीचा पिछा सोडिला नाही इतकियांत राजश्री कबजीबावा संगमेश्वरीहून-रायगडास . जाताबराबरी गहुर्जापंत चिपोलणास आले माहाजर करून घ्यावा म्हणौन लोकास तश्रीफा यावयास दोन दीडे कापड खा करून अगोधर आपण चिपोलणास आले राजश्री कबजीबावा परशरामी येऊन भोजनास राहिले ते प्रसंगी रुष्णाजीपंती विनाजीबराबरी दोघे त्याचे पुत्र देऊन .कबजीबावा बाहेर येता च तीघानी पायावरी घालून घ्यावे ऐसे सिकउन पाठविले तेणे च प्रमाणे या तीघानी येऊन कबजीबावाच्या पायावरी स प व ल घालुन जुलुम होतो दाद यावी म्हणौन अर्ज केला त्यावरून कबजी-बावा अनुतापी होऊन कोनेरीपंत कार भारी यास रागेजोन सांगितले की यो बडा जंज्याल हमारे नजीक किस सबब प्रयत्न करुन सांगितला ते फडां राजश्री रघुनाथ नारायण होते त्याही रुष्णाजीपंताच्या मुखांतरें करीना मनास आणिता हे थोटाई करिताती रुष्णाजीपंत वतनाचे खावंद खरे ऐसे त्याच्या चितास आले रघुनांथपंत थोड सामान्य नव्हे त्याचे पिते नारोपंत माहाराज शाहाजीराजे याची मजमु करीत होते तैसे च रघुनाथ हाली शिवाजीराजेयाची मजमु करिताती त्यास राजे ताजीम देताती त्याही मन-सुफी केली ते कुदरत कोणाची अन्यथा करावयास तेव्हा रायाजी हरी व लिंगोजी हरीस बाहेर घातले विनाजीस फजीत करून आपले कागदपत्र देऊन रुष्णा-जीपंतास वतनावरी पाठविले हे कलम २ त्याउपरी हरबाजी दांतीर पहिले मुता-लकी चालवीत होता त्याणे आपली लेकी गोतमाईच्या पुत्रास दिल्ही होती त्याचा लेक पांडुरंग केलसींहून येऊन रुष्णाजीपंतासि वाद सांगितला की आपले बहिणीचे वतन त्याचा स्वतसिध खावंद आपण हयात असतां दरम्यानें तुम्ही वतन खावयास कोण म्हणौनं कटकट बहुत केली तेव्हा त्यास चौघानी सांगितले की तु खावंद म्हणोन घेतोस तरी जेव्हा रुष्णाजीपंताच्या गळा वतन घातले तेव्हा च कां उभा राहोन आपले वतन घेतलेस नाहीं याउपरी तुज फिटत नाही व्यर्थ श्रमी होउ नको म्हणौन कितेक सांगितले त्याणे पारपत्य होईल म्हणौन गावा

दयाल हुवा इसका करी देखकर निशा करो फेर हमारे पास गरगशा आने न द्यो म्हणोन सांगितले त्यावरून कोनेरीपंती त्यास उठउन उद्देक तुमचा निवाडा करितो म्हणोन आपणाकडे आणिले कुल हकीकत कृष्णाजी पंताच्या मुखांतरें रायगडी आइकिली च होती त्यावरी कबजीबावा भोजनास बसले ते समई पंडितानी येऊन न्यायनीतीच्या शास्त्राच्या चर्चा केल्या त्यामध्ये सहज एकाची वृत्ती छेद करून दुसऱ्यास दिल्हीयाने त्या पापास जोडा च नाही म्हणौन वाक्यें चालिली ते च समई कोनेरपंत येऊन कबजीबावास सांगितले की त्या ब्राह्मणांची मनसुफी बरहक मनास आणितां त्यांचे वतन खरें येथे संदेह नाही राजद्वारी बलात्कार होऊन त्या गरीबाचा उछेद होतो म्हणोन सांगितले त्याच्या सांगण्यांस आणि शास्त्राच्या वाक्यास एक जाले त्यावरून त्याचे मन द्रवोन राहुजीपंतास सांगोन त्याचे वतन दूर करून याचे यासच द्यावे ऐसा आपले मनी निश्चय केला तो चिपोलणी राहुजींपंती त्वरा करून माहाजर करून लोकास तश्रीफा यावयासि तमाम लोकास ताकीद करून चाटे पडवीस जमा केले तों कृष्णाजीपंती विनाजीस सांगितले की तु दोघे मुल घेऊन सभाषण वठली असेल तेथे उभे राहोन ठसासा जुलुम होतो म्हणौन बोंबा मारा म्हणौन त्यास सांगोन पाठविले त्याचप्रमाणें याही केले त्यावरून मुलारंभी अपशकुन मध्ये तीन रोज बरोबर कोरान भिक्षा मागितली ज्याच्या घरास भिक्षेस जावे तो च क्षि (ड) करी तेव्हा उठोन गेला हे कलम

त्याउपरी मागती अनाजीपंतावरी व राहुजीपंतावरी कुष्मांड होऊन यास दस्त राजश्री संभाजी राजे यानी केले तेव्हा सारा कारभार खंडेराउ पानसंबल यास जाला त्याही याच्या वतनांवरी हुजरून दो माहालास दोघे मुतालीक पाठविले त्यावरून कृष्णाजीपंत हुजुर जाऊन झाला करीनां सांगितला च्यार महिने वाद सांगत श्रमी जाले तेव्हां मनास पेसजीची कुल कैफत मनास आणुन कृष्णाजीपंतास करार करून पाठविले हे कलम ४

त्याउपरी राहुजीपंत मृत्य पावले दोघे पुत्र कासी राहुजी व त्र्यंबक राहुजी यास घेऊन राहुजीपंताची स्त्री घेऊन राजश्री रामचंद्रपंत यासी विशालगडास गेली तेथें या कुलकर्णाचा प्रसंग केला तेथे चालवावे हे अगत्य देखोन त्यास दोन तकसिमां कृष्णाजीपंतास एक तकसीम देऊन समजाऊन पाठवावे ऐसा तह केला परंतु कृष्णाजीपंत नाइकेत कुडीमध्ये आत्मा आहे तो सोडून जात नाही देहं वा पातये अर्थ वा साधयेत हे गोष्ट चितात धरुन मरणांस धरणे घेत बसले रोज उठोन राहुजीपंताची स्त्री बाजी आणि कृष्णाजीपंत देहावर संकल्प करुन फड सोडिला नाही तेव्हा एके दिवसी राम-

मांनून तमाम लोक भरारा एकाकेंच उठोन आपलाल्या घरास गेले राहुजीपंती हिंवसलेसें तोंड करून खडे होऊन परशरामास गेले कबजी बावा-जींची भेटी होताच कबजी बोलिले की राहुजी पंडित तुम बुढे होकर राज्याजीका निशा कर कर गरीब बमणका बतन लेकर तुम लेते हो ये मनसुफी हम जानता नई राज्यार्जाने दिया तुम राज्या देख-कर लेवा म्हणौन निःश्रौम्र्न सांगितले कबजी बावा स्वार जाले राहुजीपंत हि डोलीमध्यें बसोन त्याबराबरी गेले तो वाटेस रुष्णाजीपंती जाऊन डोली उभी करून गहुजीपंतास बोलिले की राहुजी नानां तु म्हातारा जाला आहेस उद्या मरोन जासील तुजपासी पटकुल अप-रांपर असतां तुझ्या पुत्रास काय उणे आहे हे टाकून माझ्या आंगावरील घोंगडी जुनी बलात्कारे हिरोन घेतोस हे तुझे कोण भूषण ऐसे तप्त होऊन बोल-ता च राहुजीपंती दोन्ही हात जोडून या-उपरी तुझ्या वतनाच्या वाटे अजी-पासून जाईल तो तुझ्या च बटकीचा लेक असेल म्हणौन सांगोन रुष्णा-जीपंतास निरोप देऊन राहुजी नाना स्वार होऊन गेले हे कलम वारले तऱ्ही रुष्णाजीपंती भगवी कापडे करून उपोशणे आरंभुन रोज राजे बाहेर येता च मजुरा करु लागले याउपरी राजे गांगोलीस आले तेथे हि पिछा सोडिला नाही एके दिवसी राजे बाहेर डोहो बांधला होता तेथे होडिया घालुन खुशा-लीस जागा केला तेथे राजे येता च रुष्णाजीपंत उंभे राहोन नेत्याने (!) चंद्रपंतास राग येऊन बलात्कारें रुष्णाजीपंतास गडाखाले घातले उघडे बोडके दरवाजापासी येऊन योगासन घालून बसिले तो राजश्री नारो नीलकंठ रामचंद्रपंताचे वडील भाऊ जंजिरे-विजयदुर्गाहून राम-चंद्रपंताचे भेटीस विशालगडास आले त्यास आणावयास पुढे सामोरे रामचंद्र-पंत गेले तों दरवाजियापासी रुष्णाजी-पंत उघडे बोडके आसन घालून बसिले होते ते देखिले तेव्हा पंताचे मन द्रवोन बराबरी दिवटिया देऊन गडावरी पाठ-विले दुसरे दिवसी प्रसंग पडला तो राहुजीपंताच्या पुत्राची भीड मोडेनां रुष्णाजीपंत आइकेतनां तेव्हा एखादा अनर्थ होणार रुष्णाजीपंत तामसी जिवाचवर उदार होणार तेव्हा सभा-सद भले लोकी रुष्णाजीपंतास बहुतां प्रकारे सांगितले की तुमचे कुल-कर्ण उद्या तुमच्या हातास येईल प्रस्तुत ये प्रसंगी पंती तह केला आहे की दोन तक(सि)मा त्यास एक तकसीम तुम्हास देताती ते तुम्ही मान्य करा म्हणौन नाना प्रकारे बोध केला त्यावरून शांत होऊन कार्याकारण प्रसंगानरुप मान्य करून आले तो मोगलाचा धुंदकार (धुंदमार ?) जाला जागा-जागा फौजा येऊन साताऱ्यास सर्फे-खान बिलगला सेख निजाम विशाल-गडास येऊन वेढा घातला तमाम को-कण मोगलास कबूल जाले अगदी वतनदारी विष्कळीत जाली राहुजी-पंताचे मुल परभारे च मोगिरीस (!)

झोका मारिल्या साहेब सर्वज्ञ शास्त्रार्थाचा अर्थ स्वता पंडिताचा निशा होय ऐसा करितातो ऐसे असोन माझें पारपत्य होत नाही म्हणोन अर्ज केला त्यावरून राज्यानी प्रल्हादपंतास पुसिले त्याही सांगितले कीं थोरले मांहाराज होते ते थोराची भीड पडली तऱ्ही एकाचे वतन काढून दुसऱ्यास सहसा दिल्हे नाही आणि साहेब माहाराज पुत्र भिडेभारेने या ब्राह्मणाचे वतन खरेखुरे असता बलात्कारें काढून दिल्हे त्यावरून राज्यानीं राहुजीपंताचे कुलकर्ण दूर करून कृष्णाजीपंतास च करार करून राजश्री प्रल्हादपंती राजपत्र व आपले पत्र वेंकाजी निबदेव दाभोलेस सुबेदार होते त्यास आणून आपले वतन चालउ लागले याउपरि दुसऱ्यास खलेल करावयास गरज नाही ऐसे राजपत्र खरे खुरे होऊन बिलाकुसूर चालउ लागले १

एक वरीस राहुजी पंताचा मुतालीक होता त्याउपरी रायाजी हरी व लिंगोजी हरी

गेले त्याउपरी कितेका दिवसी निवल होऊन लोक आपपले जागा येउ लागले तो राजाराम चंदी मोगलानी घेतलियावरी त्या प्रांताहून सातारियास येऊन राहिले तेथे सारे सरकारकून आले तेथे हरीपंत कृष्णाजीपंताचे पुत्र सातारियास गेले राजे माडीवरी बसले होते त्यास जाऊन भेटले वर्तमान निवेदन केले तेव्हा राजानी हरीपंताबराबरी चोपदार देऊन कोनेरीपंत न्यायाधीश याकडे पाठविले त्यास जाऊन भेटले त्यास पहिली हकीकत कलली च होती व यांही आपले स्वमुखे सांगितले. तेव्हा कागद करून यावे म्हणोन कोनेरपंत राजास पुसावयास आले तेव्हा परशरामपंती ` शा मारिला कीं विनाजीच्या च पुत्रानी उपभोग करावा ऐसे पत्र करून देणे हरीपंताचे नाव नाही म्हणोन खलेल पडिले कोनेरपंत हरीपंतास म्हणो लागले की तुमचे नाव लेहावयास तुम्हापासी काही कागदपत्राचा आधार असेल तरी दाखवा त्यावरून तुमचे नाव लेहोन पत्रे करून देतो तेव्हा हरीपंतापासी विनाजीने पत्र लेहोन दिल्हे होते की आपल्या पुत्रानी व हरीपंती मिलोन वतनांचा उपभोग वौषपरंपरेने करावा म्हणोन पत्र होते ते कोनेरपंतास दाखविले त्यावरून राज्यास व परशरामपंतास सांगोन ते पत्र दाखउन याचे नाव लेहोन द्यावे ऐसी परवानगी घेऊन पत्रामध्यें याचे हि नाव लेहोन राजपत्र करून सिध केले तो राज्यास काही पैकियाची गरज लागली म्हणोन कोनेरपंताकडे

ऐवज न्यायाधिशी ची' ......ले ते प्रसंगी होती तेवढीवरी ऐवज नावनिसीवार लिहिला त्यामध्ये हरीपंताच्यानावे दोनी सें रुपये घेणे म्हणौन लिहिले त्यावरून दोशा रुपयाचे त्वष्ट यास लाविले रुका न मिले कागदपत्र तयार जाले तेव्हा कर्जवाम मिलाले तैसे घेऊन दोनीशें रुपये देऊन कागदास सिके होऊन हरीपंतास निरोप दोधेला ते दरवाजियास आले तो राहुजीपंताच्या दोघा पुत्रानी मोरगिरीहून येऊन दरवाजियापासी हरीपंतास अरगटून माघारे राजसानिध नेले राज्यापासी सांगितले की आपणास चिपोलणचे कुलकर्णाचे वतन संभाजी राजे यानी दिल्हे आहे तेणेंप्रमाणे साहेबी द्यावे त्यावरून राजाराम बोलिले की दाजीने एकाचे वतन काढून ए 'म काय समजोन दिल्हे आम्ही स आणून ज्याचे त्यास च सरे ' ास निसबत नाहीं याउपरी कु. ांची चर्चा करायास गरज नाही म्हणोन पष्ट सांगोन हरीपंतास पाने देऊन वतनाच्या वतनावरी पाठविले हे

कलम ५

येणेप्रमाणें सत्याचे सत्य नानाप्रकारीचे व्याक्षेप निर्माण जाले होते ते दूर होऊन सेवट खरे तें च परिणांमी उरले तेव्हां रुष्णाजीपंती श्रमाचा स्वास टाकून एकश्चित जाले वर्तमान होते तोवरी चालविले त्यावरी त्यांही कैलासवास केलीयानंतर हरीपंत त्याचे पुत्र ते चालवितात या कार्यभागमुलेदरबारी हुजरातीस व रोबतीस प्रसंग पडिले

महाराज		सरकारकून	
संभाजी राजे १	राजाराम १	रघुनाथ नारायण पंडति	प्रल्हाद पंडीत
सुभेदार दाभोल			

माहादाजी अनंत	राघो वासुदेव		शंकराजी पंडीत
पंताजी रंगनाथ	बहिरो त्रिमल	रामचंद्र पंडीत	
माहादाजी नारायण	वेंकाजी निबदेव		कबजी बावा
अंताजी लक्ष्मण	देवाजी विठल	परशराम पंडीत	
बापुजी आपाजी	गंगाजी दादाजी	कोनेरपंत	
माहादाजी बलाल	कासी रंगनाथ		
विठल गोपाल	सिवाजी कृष्ण		

इतकियासी प्रसंग पडोन त्याच्या हि मुखांतर कृष्णाजीपंत खरे जाले याउपरी भालेराई मोगलाई जाली तेथे हि रुजुवात जाली आहे हे वर्तमान गौतमाईने आपल्या स्वमुखे कुल हकीकत सांगितली व ज्याणे हे पत्र आपल्या स्वदस्तरे लेहोन दिल्हा त्यास हि इतकिया गोष्टीची दखलगिरी आहे श्रीस व सत्य स्मरोन लिहिले आहे यामध्ये जाले वर्तमान टाकून स्वता बुधीने लिहिले असेल त्याचा दोषी तो च होईल ऐसे जाणोन लिहिले आहे हे पत्र जे कोण्ही थोर लोक वाचून पाहातील आणि आपल्या च हृदई शब्दमथन करिता सारांष ध्यानास येईल ते च अंतरसाक्ष श्रीची आहे सत्ये करून हा भूगोल राहिला आहे असत्य असते ते हजार मुलामगिरि जडावाची केली तऱ्ही जे कोण्ही श्री च्या पायाचे परीक्षक आहेती त्याही नजरेने च पाहाता खरे ते च खरे परीक्षा न पाहाता दिसोन येते तैसेच ···· मगिरी असते त्यास हजार श्रिंघार केलियाने भलयाचे अंतरी साक्ष येत नाही यामध्ये या पत्रार्थावरून आमचे वतन आहे त्याणे आपल्या स्वमुखे प्रसंग पडेल तेथे सांगावे लागत नाही सारा निशापत्रावरून सर्वज्ञ असतील त्यास कलेल म्हणोन लिहिणाराच्या हृदइ संचार होऊन लिहिविले तेणें च प्रमाणें स्फुर्ती चालिली स्वता बुद्धीने इतकां जे ट न द ग जी राहात नाही यामध्ये सर्वज्ञ आहेत त्यास च हा अर्थ कलला असेल वरकडास कागद मात्र वाचून आइकतील काही ध्यानास येणार नाही हे खरे तेथे याउपरि लेहावे ऐसा अर्थ नाही कलले असावे संपूर्णमस्तु शुभं भवतु ॥ एक गोष्ट राहिली गौतमाई वर्तमान असतां ते व विनाजी बलालाचे कुटुंब देखील हरीपंताचे कुटुंब याचा त्याचा रुणानबंध मिलाप जाला त्यापासून आजिवरी सकल कुटुंब एकत्र च हरीपंतापासी आहे कलले असावे

(परिशिष्ट आ)

तकरीर करदे बा। कृष्णाजी सोमनाथ वसिष्ट अ ······ त देशकुलकर्णी ······ ······ चिपोलण सुहुरसन समस तिसैन अलफ कारणे राजश्री स्वामीचे

सेवेसि लिहुन दिले करीनापत्र ऐसेंजे चिपुलणचे मिरास देसकुलकण कदीम पिढी दरपिढी पुरातन आपली माउसी गोतमाइ व विनाजी बलाल देश-कुलकर्णी पुरातन चालिले पुरातन पिढी मूळ पुरुष नरसीपत त्याचे दोघ पुत्र एक विनाजी नरसी एक परशराम नरसी चालवीत होते विनाजीपंताचा पुत्र बाळो विनायक परशरामपंताचा पुत्र काळो परशराम ऐसे चालवीत होते पुढे बालोपंत मरोन गेले त्यावरी काळोपंत चालवीत होते पुढे कालोपत दावेदारानी मारिले त्याचे पुत्र अंतो काळो वृत्ती चालवीत होते पुढे अंतो काळो मरोन गेला विनाजी बलाल व नरसो बलाल बालोपंताचे पुत्र विज्यापुरास गेले त्याकरिता समइ वृत्ती चालवावयासी गोतमाईने तिमाजी भास्कर व गंगाजी भास्कर हेळवाककर वृत्ती चालवावयासी ठेविले पुढे हेळवाककरानी गोतमाईस विस्वास दाखउन तिचे वृत्तीचे फर्मान व माहाजर कागद नेउन आपले नावे कागद केले फर्मान आणिला त्यावरी विनाजी विज्यापुराहुन आला गोतमाईने विनाजीस घेऊन दाभोळस कारकीर्दी राजश्री माहादाजी अज सुभा जाऊन विदित केले त्याणी दाहा मनसुबदार बैसउन मनसुबी करून गगाजी भास्कर तिमाजी भास्कर दूर केले आणि गोतमाईने आपणासि माहादाजीपंत सुभेदार यासि सांगोन आपण बहिणीचा पुत्र म्हणुन आपणास मुतालकी देउन चिपोलणास मिरास चालवावया ठेविले पुढे गोतमाईने * आपला पुत्र जनार्दन विनाजीस देउन केशवभट लेले व कासीभट व माहादेउभट धर्माधिकरणी व कृष्णभट उपाध्ये व जोसी व मंत्रभट बैसउन होम दत्तपुत्रविधान करविले पुढे जनार्दन पुत्र घेतलियाउपरी विनाजीपंतास तीघे पुत्र जाहाले एक बाळाजी एक आबाजी एक मोरया तीघामध्ये दोघ गतःप्राण जाहाले बाळाजी व जनार्दन हाली आहेत याचे विवाह केले येणेप्रमाणे करीना चालत असता राहुजीपंताचा मुतालीक अताजी आणाजी म्हणुन माहालासि कारकीर्दी राजश्री संभाजी राजे साहेब हा आला होता आपण भगवी वस्त्रे करून उपवास करून राजश्री साहेबांबरोबर हिंडत होतो ते वेळेसि राजश्री कबजीबावा स्वामीने कृपा करून साहेबाचा हातरोखा देऊन माहालासि पाठविले व राजश्री प्रल्हादपंत न्यायाधीश व राजश्री निळोपंत पेशवे व स्वामीचे पत्र ऐसी पत्रे सादर जाहाली ते कागद हबसीयाचे स्वारीमध्ये आगीन जळोन गेले इतुके वर्तमान व कोणी म्हणतात की फगरे देसकुलकर्णी हमजाबाद याचे मुतालीक काले देशकुलकर्णी होते तरी ते गोष्ट लटकी व राजश्री आबासाहेबांचे वेळेसि राहुजीपंताचा मुतालीक आला म्हणतात तरी ते हि गोष्ट लटकी आहे

---

* आपला म्हणजे लेखकाचा=कृष्णाजी सोमनाथाचा.

लेखांक १



·।। ||छ|| कौलुनामे अज रख्तखाने खोदाएवंद जमाएत + + + + + विले दौलतखान साहेब मोकासाई तपे पावस मामले मुजाफराबाद अज पूजा श्रीसरस्वती सुहु'सन निसा अशर अलफ ताहारीरयादा बस्मी केस जोइसी बिन विश्वनाथ जोइसी कसबे मजकूर यासि लिहौन दिला कौलनामा ऐसा जे तुज विसी विश्वनाथभट वा श्रादभट सिधभट देसाई वा खोतानि तपे मजकूर मालूम केले जे केस जाइसी मजकूर कसबाचे जोतिषी मिरासी यासी काही इनाम वृती नाही दरीं वख्त जोसी मजकूर एऊन सांगितले जे जमीन वाडी मेरुवी नदीचे किनारे हमशाहीं वाडी चाहुडी कसबे मजकूर तेथ जमीन दरां बुडाले असे आजी तागाईत कोणी कीर्दी केले नाही हरीक पेरून उजवी सिबाड देताती तेथे आपण मशाखत करून नारल माड नेमावणी करीन आपणासी वृती करून देणे म्हणौन तरी जोइसी मजकूर कदीम मिरासी असे यांसी इनाम वृती करून देणे आमी जन्मान्तर भासे परवा करून दिले असे साहेबी कौल मन्हामत करणे म्हणौन मग बराये मालुमाती खातिरेसी आणून कौल सादीर केले असे यासी इस्तवा मुदती पंचवीस वरुसें + + + माड सुमार करून जे काय माड होतील त्याचे पंचक बाद करून वरकड होतील त्यासी मख्ता महासूल वा नकदयाती बाजे उजुहाती वा बाजे तकसीमात तालुक मामला वा माहाल कानू वा गेरकानू कदीम वा जदीद वा लवाजिमा देसाई कुलकर्णी वं सराफमामला वा माहाल नामने बाछा वा पेस्तर नाम रौहाद कुलयाब दर सदे माडासी तुमास बदल वृत जोतिस इनाम करून दिले आहे व कम माहासूल दर सदे माडासी बर निस्पद बाजे माड नवी कीर्दी लारी १० हेंगे प्रमाणे दुनिया मध्ये चांद सूर्य तपे तो साल ब साल देत जाइजे इस्तवा भरे तव जमीन मजकुरीचे सिबाड दर सालासी लारी २।· हेगे प्रमाणे मेरुवीचे सेतासी साल दर साल देत जाइजे इस्तवा भरलेवरी सदरहू सिबाड यावेया निस्पत नाहिं माडा मध्ये केळ व पानवेल वा मिरवेल वा आले वा ऊस वा धान वा आंबे फणस वा बाजे हर जिनसी झाड खेरीज सुपारी कीर्दी करून राइजे जमीन मजकुरीचे चतुसीमा पुर्विलेकडे चाहुडीचे नदीचे हद पछमेकडे नदीचे हद उत्तरेकडे चाहुडीचे जमीनीचे हद हे चतुसीमा मधील जमीन तुमास जन्मांतर भासे सना करून दिले असे माडाचे मशाखतीबदल अइलिया वा कामती ठेवसी त्यासी पाणदाम पायपोस वेठबेगार माफ केले असे हे लिहिले प्रमाणे तुमी वा तुमचे अवलाद-अफलादीनें दुनिया मध्ये चांद सूर्य तपे तव भोगावे

१५५० चैत्र शुद्ध १ बुधवार

लेखांक २

॥ छ स्वस्तिश्री सके १५५० वरुसें विभव संवछरे चैत्र सुध प्रतिपदा सौम्यवार तयनी पीलभट भैरा मौजे गोलपुंन तपे पाउस यासि सिदी समला सिदी माहामद जोहार मोकासाई माजी तपे मजकुर याने लिहौनु दिले खरांदखत ऐसे जे तुज पासून आपलें आत्मकार्या कारणें घेतलें लाहारी १७५८० पाउणे दोन सें या बद्दल आपलें बाग नजीक वेतेरे देखील मळा व नारळ माड काही बारासी आहे व काही बारासी येणार ऐसे सुमार ९३८० वा झाडे आंबा वा फनस वा उडिणी वा बाजे हग जिनस तमाम खुसी खुद खडून विकत दिले असे कमावीस करून तुमी वा तुमचे अवलाद अफलादीने खात जाणे आमास वा आमचे अवलाद-अफलादीस निसबत नाही सदरहू पैके आमासी पावले बाग तुमास अर्जानी हेजे माडाचे इम्तव बाा पटा व कौलु इनसराईम जाहालेयावरी दस्त बांधतील तेणेप्रमाणे दिवाणी झडती करीत जाइजे तव पावे तवं जमीनेचा सिबाड बाा पटा देत जाणे

गोही

विश्वनाथभट देसाई

दादभट देसाई

बाल सोवनी सराफ

तानजी रघुनाथ कुलकरणी

बाननाक खोतु बागा

गणनाक खोतु माडबा गाडबोड

वामनभट देसाई

हरिभट अभेकर

गणेस माहाजनी

भाई सेखाला व भाई चांद

लस्करी मामला

नामनाक खोतु बागा

लेखांक ३

बिहुजूर १५५६ माघ वद्य ३





बहुजूर बहीबानी
काजी हकीम मौजे मजकूर

बिहुजूर तिमाजी
विष्णु देसकुलकरणी
मामले मजकूर

सरदेसाई





स्वति श्री सक १५५६ वरुसे भाव संवछर माघ वदि त्रितीया रविवार तदिनी पाउसयामी

वामन + + देसाई



नार माहाजनी खोतु
मौजे गोलप

हरभट अभेंकर खोतु	कानभट फडका खोतु
वाडा कुर्ध्यं	फडके वाडा कुर्ध्यं
देवलभट खोतु मौजे	माद जोसी खोतु मौजे
नाखिरे देवलभट	अंबेरे माद जइसी
रामनाक बाबनाक खोतु	किटो माहादेउ खोतु
डोरुले रामनाक बाबनाक	मौजे गाउखेड
	किटो माहादेउ खोत
	मौजे गाउखेड

हे मुख समस्त चुकले माकले ग्रामगुरु आमचे अनुमते विश्वनाथ जोईसी वा जोग जोईसी वा कृष्ण जोईसी फर्जदानी सोम जोईसी तपे मजकुर यासी लिहोन दिला उपार्जनपट याचा क्रम ऐसा जे तुमी एऊन सागितलेती जे आपण तपे मजकुरीचे जोतिसी मिरासी सेवा करितो पर आपणासी काही वृत्ती नाही तरी आपुले आगर वाडा माहाजनी का। मजकूर असे त्या आगराचे जमीन पिडावा व महाबलवाडेचे परिया नजीक अगर नागण जोईसी परिया किनारे असे वा परिया पैले धडी जमातवाडा कसबे मजकूरचे उजवी जमीन असे तेथे आपण बावी खंणले असे तेथे आपण घर बांधोन नारल माड सुमार ५० नेमावणी करीन ते आपणासी वृती करून देणे म्हणौन मग आमी मनासी आणून सदरहू जमीन हरदू कूस नारल माड नेमावणी करावेया जन्मांतर भासे दिले असे नारल माड सुमार पनास नेमावणी कीजे यासी इस्तवा मुदती २५ साला केले असे पंचविस साले जाहालेवरी माड सुमार करून त्याचे पंचक बाद् करून वरकड माडासी मखूता माहसूल वा नकदेयाती वा बाजे उजुहाती वा तकसिमात मामला वा माहाल दर सदे माडासी लारी २०८० याणे प्रमाणे जे काय होईल ते तुमास वृती करून दिले असे वा जमीन मजकुरीचा सिबाड दरसलासी लारी ·।।।· बिा

जमीन आगर	
वाडा माहाजनी	जमीन जमातवाडा
तुमचे मिरासिचे	कसबा लारी ·।·
लारी ·।।·	

सदरहू सिबाड तुमास माफ केले असे आणि तुमास सेत नाही तरी तमाजी सोमलिंग या घाणेकर वा पटवर्धन वा सोनार याणीं का। मजकुरामध्ये खाजण मोडिले असे त्या सरिसे नदी किनारे उजवी जमीन अबदुल रहिमनाचे बागेचे हादे खालते वा साड जोइसी याचे खाजणाखालते खाजण असे त्यासी हाद बांधावेया बेणे मशाखती मोबलग असे त्यासी तुमी हाद बांधोन मशाखती कीजे

तै हि तुमास वृती करून दिले असे कमावीस करून जोतीसपणा चालवून सुखे असिजे तुमचे अवलादी अफलादीनें खाणे आमी वा आमचे जातप्रजातेन पालावे वा माहाबल वाडेचे कालवा एत असे ते कालुवेचे पाणी वेल घटिका ४ दिले असे आणून माड सिपिजे वा माडाचे मशाखतीकारणें अइलिया १ वा कामती १ ठेविजे त्यासी पायपोस पाणबाब वाटेस बेगार माफ केले असे जमीनेचे चतुसीमा पूर्विलेकडे म्हाराचे मठाचे हद् वा पछमेकडे मारगावरती वा उतरेकडे जमातवाडा कम्बेचे मली तुमा दिले असे पाटाचे हद् वा दक्षणेकडे देसाइयाचे जमिनेचे हद् हे चतुसिमा मधिल जमीन तुमास दिले असे

तेरीख १६ माहे शावान

~~~~~~~~~~~~~~~

लेखांक ४

१५६८



कौलुनामे अजरख्तखाने खोदायवंद खाने
अजमे अकरमे हुसैन अलीखान साहेब

सरगुरो मोकासाइ कसबे पांवस मामले मुजाफुराबाद सुहुरसन सबा अरबैन अलफ ताहा विश्वनाथ जोइसी वृतीवंत कसबे तपे मजकूर बाबे कौलुनामा ऐसा जे तुम्ही हुजुर येउनु मालुक केलें जे आपले आगरवाडा महाजनी कसबा तेथे असे त्याचे मरव्ता माहालून नकदेयांती वा बेजेउजुहाती मरव्ता लारी २५ पंचवीस त्यामधें लारी १० दाहा आपणासी आहे ही इनाम दिले असे ते साल ब साल भोगवंट होत असे वरकड क्षडती होत असे आपणासी तकसीमात सालाबाद जोइंसी म्हणोन माफ असे याणेप्रमाणे सालाबाद भोगवंट चालत असे तेणेप्रमाणे साहेबी कौलु सादीर केले प्रमाणे साहेबासी द्वा देउन असैन म्हणौन मग बराय इलतमायेस खातीरैसी अणून तुमसी तकसीमात माफ केले असे वरकड मस्ता साळ ब साल देऊन सुखें असिजे वरकड वावड मजकुराचे खुंटाचे असे त्यामधें तुमचें अगराचें खुंट उणे केले असे तकसीमात कुल बाबी होतीया निस्बत नाहीं
~~~~~~~~~~~~~~~

तुमासी माफ केले असे आगगसी कस्ट मशागती आपले जोतिसी वृती कमाविस करून सुखें असिजे दरबाब खातीरजमा करून असिजे दरीं बाब कौलु असे मोर्तब

फारसी
शिक्का

श्री १५९६ आश्वीन वद्य ५

लेखांक ५

श्रीसकलगुणमंडित–सौजन्यासिंधु–अखंडितलक्ष्मीअलंकृत–राजमान्य-राजश्री जिवाजी विनायक सुभेदार व कारकून हाल व इस्तकबाल सुभा मामले प्रभावली प्रति

०श्री
चतामणि च
रण शरण

पोश्य मोरेश्वर पंडितराउ नमस्कार सुा समस सबैन अलफ वेदमूर्ति श्रीधर जोतीर्शी बिन विश्वनाथ जोतीषी साा कसबा ताा पावस हे भले योग्य भले ब्राह्मण म्हणऊन धर्मार्थ देविले

तांदूळ मोठे कैली कोठी मापे दाहा मण ·।।·

वणी गाई पोटफोडिया च्यारी ४

एकून तांदूळ मोठे कोठी मापे दाहा मण रास देविले व वणी गाई पोटफोडिया च्यारी सोडविलिया आहे तरी तुम्ही तरफमजकुरीहून तांदूळ मोठे कैली मापे दाहा मण देवणे व वणी गाई पोटफोडिया च्यारी सोडवणे प्रतिवर्षी वेदमूर्तिचा समाचार घेऊन जोवरी वेदमूर्ति सुखरूप तोवरी तांदूळ आदा करणे व गाई खासगत असतील तरी एका पासून च्यारी पावेतो पालीत जाणे दर हर साला ताजा खुर्द खताचा उजूर न करणे ताली लेहोन घेऊन असल फिराऊन छ देणे १८ माहे रजबु

सुभं
भवतु

बार सुद छ ५ माहे जिलकाद सैनं समस हे विज्ञप्ति

बार

पो छ १९ शाबान

शिं. सं.–१०

श्री १६३१ श्रावण वद्य ८

लेखांक ६

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शक ३६ विरोधी संवत्छरे श्रावण वद्य सौम्यवासर क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति याणीं पारपत्यगार व कारकून वर्तमान व भावी ता। पांवस प्रांत राजापूर यांसी आज्ञा केली ऐसि जे वेदमुर्ती गोपाल जोतिसी बिन श्रीधर जोतिसी सा। कसबे पांवस याणी स्वामिसंनिध येऊन विनंती केली आपले पिते श्रीधर जोतिसी बहुत थोर विद्यावंत याचा योगक्षेम चालावा याकरितां दिवाणातून धर्मादाव नांदूल कोठीमापें खंडी १८० दिल्हा त्याप्रमाणें चालत होते त्यास तेवढयानें संवसारकृत्य न चाले याकरितां राजश्री कैलासवासी स्वामी चंजी प्रांतें असतां विनंती केली त्यावरून राजश्रीनी धर्मादाव दूर करून तीन शत लारींची वृत्ती करून दिली राजश्री रामचंद्र पंडित आमात्य हुकमतपन्हा यावरी राज्यभार होता यासि पत्र करून दिल्हे ते पत्र पंतमशारनिलेस दिधली-यावरी पैंती दीड शत लारीची वृत चतुर्थांश लागवड व तीन तकसिमा पडी या-प्रमाणें पत्र माहालकरियासी करून दिल्हे परंतु भूमी आपल्या दुमाला होऊनु चालिले नाही त्याउपरी आपले पिते निधन पावले आपला योगक्षेम चालिला पाहिजे याकरितां आपल्यास धर्मादाव कोठीमापें तांदूल मोकरर करून दिल्हे ते कितेक दिवस चालिले त्याउपरी धामधुम जाली धर्मादाव ही न पावे या करितां सिंधुदुर्गिच्या मुकामी स्वामीसंनीध येऊन विनंती केली त्यावरून स्वामीनें सन सबामध्ये छ १२ रमजानी क्या मजकुरी सेजारकरीची वृत्ती करून दिधली तें पत्र महालास नेले त्यास आपले ठिकाण आगर व सेत आहे ते नेदता पडी आणखी ठिकाण महालकरी देऊ लागले ऐशास आपल्यास पडीचें ठिकाण घेऊन कीर्दी करावयास अनकूल पडत नाहीं तरी स्वामीने आपलें ठिकाण आगर व सेत आहे तें इनाम करून दिल्हे पाहिजे म्हणजे स्नानसंध्या करून स्वामीस कल्याण चिंतून सुखरूप राहीन म्हणून विदित केलें व सनसबामध्यें सनद दिधली होती ते आणून दिधली व पूर्वील चंजीचे मुकामी तीर्थस्वरूप कैलासवासी स्वामीनें तीन शत लारीची वृती करून दिधली तें पत्र गेलें म्हणून विदित केले ऐशास गोपाळ जोशी भले शास्त्रज्ञ याचे पिते श्रीधर जोतिसी बहुत थोर होते हे ही तैसे च आहेत यांचा योगक्षेम सांग चालावा हें स्वामीस अगत्य याकरितां सनसबामध्यें सनद दिधली ते रद करून हालियास नवीन इनाम कुलबानु व कुलकानु सो। हक्कदार करून याचा आगर व सेत कसबे मजकूरी आहे त्यापैकी अनाजी दतो याचे धारेवानें इनाम लारी दाभोली १०० येकसें रास इनाम करून दिल्हा आहे तरी तुम्ही कसबे मजकुरी याचे आगर सेत असेल त्यापैकी सेजारकरीची भुमी लागवडीपैकी नेमून देउनु चतुःसिमा करून याचे दुमाला करणें आणि इनाम यास व याचे पुत्रपौत्रादी वंशपरंपरेने चालवणें सालदरसाल ताजा सनदेचा उजूर न करणे पेशजी धर्मादाव

चालत असेल तो व कैलासवासीचें पत्र असेल तें रद असे या सनदेची तालिक लेहोन घेऊन असल सनद भोगवटीयास त्याजपाशी परतोन देणे लेखनालंकार

मर्यां
देयं विरा
जते

श्री शि
व नरपति
हर्ष निधान मो
रेश्वर सुत नील
कंठ प्रधान

रुजू सुरु
निर्वास

तेरीख २१

जमादिलाकर सुरुसन
अशरैन मया व अलफ

बार सुरुसुद सुरुसुद बार

परिशिष्ट ई*

लेखांक १ १५५२

बीहुजूर चौंडो पंडीत
मजमुदार मामला

(फारसी शिक्का)

मलीक शाहा क + . + +
गिसालेदार नामजाद
+ + + + + +

(फारसी शिक्का)

रामजी नारायण
मजमूदार कीले
खीलणें

(फारसी शिक्का)

नरहरी वीठल मजमदार
तपे राजापूर (फारसी शिक्का)

दत्तो गंगाधर नीवसींदे
का मा

(फारसी शिक्का)

* कसबा मीठगव्हाणे, ता राजापूर, जिा रत्नागिरी येथील रा० रा० बाळकृष्ण श्रीधर देसाई यांजकडून मिळाला. अस्सल कागद मालकाजवळ आहे. त्याची नक्कल मार्गशीर्ष शु० ७ शके १८३५ या दिवशीं मीं स्वतः करून घेतली.

बि. का. रा.

बीहुनूर वामनाईक
सरदेसाई

श्री
गणेष

+++ भट देसाई

मराठी
शिक्का

बाबदे माहाजनी
वा बाल माहाजनी

कृस्ण ठाकूर देसाई

मराठी
शिक्का

केस माहाजनी
रामदे माहाजनी

॥ ॐ सीस्त वाटप देसाईयानी कसबे मीठगाव्हणे मामले मुाबाद सुा सन इहिदे सलासीन अलफ कारणें समस्त वारीसदारानी मीलोन तपे राजापुरास आले आपुले निवाडे बदल एउनु राजश्री   सरदे-
साई गोसावी वा राजश्री   पडीत मजमुंदार
मामला वा देसाईयानी तपे राजापूर वा देसाई काा नेउरें वा समस्त ग्रहस्त हुजूर नीवाडा जाहाला जें दोगाचे सतत असे दो ठाई वृती वाटून घेणे आगरें वा मले सेते पहीलेची वडीली वाटप करून घेतले असे लाजीमा वा तैनाती वाटून घेणें बीा

लाईजामा वा तैनाती
लारी ५५ ॰

लाजीमा लारी
१०५॥

आगर मोरवणे
++++++++
म लारी ७०

एकून बेरीज लारी २३०॥ याचे तकसीम वाटे दोनी
बीतपसील

नीमे वाटा एक मध्ये
तकसीमा दोनी एकून
लारी ११५।•
केस माहाजनी वा
फर्जेदानी गणपत मा
हाजनी वा फर्जेदानी
वामन माहाजनी लारी
५७॥७॥
रामदे माहाजनी वा
तान माहाजनी वा
बाबदे माहाजनी लारी
५७॥७॥

नीमे वाटा एक मध्ये
तकसीमा दोनी एकून
लारी ११५।•
बाबदे माहाजनी बीन
गोवीद माहाजनी लारी
५७॥७॥
बाल माहाजनी बीन
माहादे माहाजनी लारी
५७॥७॥

हेणे प्रमाणे परंपरेवरून वाटे करून दीले असती हेणे प्रमाणे आपले आपले तकसीम खाउनु एक वरीसी दीवाणसेवा नीमतकसीमदारानी करणे दूसरे वरीसी दूसरे तकसीमदारानी करणे दीवाणीचे काही विलाथी सर्त वृतीवरी पडीले तरी ++++ माल देणे वाएदा वा कोणी एउनु दीवाणी वसूलात पेसकसी करील तरी त्याचा तो जाणे सर खुद देईल वारकडास समूंध नाही वा पेसजी गणपत माहाजनी वा त्याचे फर्जेदासी लीहीली सीस्त करून घेतली होती ते वेलेसी अवघे तकसीमदार वृतीस शोंबत न्हवते म्हणौउनु दीली होती ती त्यासी न वचे त्यासी नीसबत नाही दा हेणे प्रमाणे चोळवाटे जो कोणी मागूता झगडा झोंबी करील तो माहापातकी

बहूजूर

साक्ष

नारो केसव पंडीत
सरदेसाई

श्रीनारो
केशव पं-
डीत

वीस्णो तीमाजी देसकुलकर्णी
मामला

सोनाजी नारायण
कुलकर्णी तपे मजकूर

अंतो पीलदेऊ राजापूरकर

नार माहाजनी देसाई
अणसकूर
रामदे माहाजनी देसाई
का। होली

श्री १५८२ माघ शुा ९

लेखांक २

तालीक

फारसी
शिक्का

·॥छ अज रख्तखाने खोदायवंद सैद साहात सैद अशफ हवालदार कसबे कर्यात मीठगवणे कुलीदयामदवलनहू ता। भानजी हरी हुदेदार व देसाईयानी व कुलकर्णी व खोत गावडेयानी जरीबे मीठागर का। मा। बिदानद के हर्ची सुा इहिदे सितैन अलफ दरीविले रुष्ण माहाजनी न नार माहाजनी बिन गोविंद माहाजनी देसाई का। मा। यासी बदल तश्रीफ इनाम नमक अगर अदवणा नजीक मळी मीठागर ते मऱ्हामत केले असे त्याचे दुम ले कीजे सदहू अगर खराब पडिले असे मशाखती करून कमावीस करून खातील यासी व याचे अवलादी व अफलादीसी इनाम दर साला चालवीत जाईजे तालीख लेहून घेऊन असल मिसली परतून दीजे दर बाब ताकीद असे मो। पारसी

तेरीख ७ जमादिलाखर

१६१९ चैत्र शुा ११

लेखांक ३

श्री

अखंडीत लक्ष्मीअलंकृत राजमान्य-
राजश्री रामाजी अनंत सरसूबेदार
व कारकून प्रांत राजापूर गो

सेवक रामचंद्र नीलकंठ नमस्कार सु॥ सबा तीसैन अलफ नार माजन देसाई का। मीठगाव्हणे याणे हूजूर एऊन वीदीत केलें की गोवीद माजनी देसाई का। मजकूर याचा आपला देशमूखीचा वाटा पूर्वी जाला त्या ऊपरी आपला बाप गोवीद माजनी यास अदलशाही कारकीर्दीस ईनामत ठीकणे करून दील्हीं बीतपसील

मला साखरट	१	खर कोकील	१
अगर नजीक कारवीने	१	खरी नजीक वाडी चव्हाण	१

एणे प्रमाणें च्यारी ठीकणे आहेत त्यास गोवीद् माजनी सद्रहू ठीकाणाच्या वीभागावीशी कटकट करीतो याचे पारपत्य केलें पाहीजे म्हणुन तपसीले वीदत केले त्यावरून हे पत्र तुम्हास लीहीले असे तरी तुम्ही हरएक मनसूफी माहालीचे वतनदार वृध बहूनकाली असतील त्यास व हमशाही गावींचे सोत मीरासदार असतील त्यास आणुन चौकसीने सत्य स्मरोन याचा त्याचा वीभाग त्या उपरी नार माजन याच्या वढोली सद्रहू वृती साधन केली तरी गावीद् माजनी यास ताकीद कर + + ++ + +++ ++ +++ + + बोभाट एऊ न द्देणे जाणीजे छ ९ रमजान नीदेश समक्ष

लेखन
सीमा समु
ल्लसति

लेखांक ४ श्री १६५४ आषाढ वद्य ७

(शिक्का)

श्री
राजा शाहु चरणी
तत्पर तुकाजीसुत
कान्होजी आंगर स
रखल निरतर

कौलनामा अजरवारी राजश्री सभाजी आगरे सरसुभेदार आरमार ताा +++ +++ +++ बीन दाद माहाजनी काा मीठगव्हाणे सुहूर सन मलास सलासीन मया व अलफ दीलहा कौलनामा येसाजे तुम्ही वीजयदूर्गीचे मुकामी येऊनु विनंती कली की आपले खाजण खारट पुलण नजीक मजरे दलें काा माार येथे आहे ते पुर्वी आपले आजे गोवीद् माहाजनी देसाई याणी राजश्री आणाजी दतो याचे कारकीर्दीस कौल घेउनु बांद बाधोन कमावीस केलें होतें त्यावरी सेख निजामाची धामधुम जाहाली ते समई मूलूक खराब जाहाला तेव्हा खाजणाचा बांद मोडला तो आजी पावेतो मोडला आहे बहुत दिवस जाहाले खाजणामध्यें रान वाढोन तीन च्यार खाडी पडिल्या कादलाची व चीपीची झाडें वाढली खर्च बहून दीडदोनसे रुपये पावेतो खर्च पाहिजे याकरीतां साहेबीं तह करून दील्हा तरी उमेद् धरून कर्जवाम घेऊन खाजणाचा बांद बांधोन म्हणोन व ये बाबे माहादो हरी व बालाजी तमाजी देशकुलकरणी व महाजनानी काा माार

याणी मालूमात केली कीं बहूत दिवस खराब पडिले आहे तह करूनं दिल्हा तरी देशाई खाजणाचा बांध बांधीतील म्हणौन बराई अर्ज खात-रेस आणुन कौल मन्हामत केला आहे खाजणास खर्च बहुत बांधास मेहनत् फार याजकरितां तह करून दिल्हा असे साले १२ बारा यासि बयान सालें

माफी ईा सन आर्बा ता
सन आर्बैन मयां सालें माफी
७

इस्तावा दर बिघा जमीनीस
भात दसेरी मापें

ईहिदे आर्बैन	ईसने आर्बैन
४१॥.	४२
सलास आर्बैन	आर्बा आर्बैन
४३	४४॥.
खमस आर्बैन	लग
·।·॥·	

येकून माफी सालें पेस्तर सालापासून सात सालें व तह इस्तावा सालें पांच येकुन बारा सालें मोईन करून दिल्ही असे उमेद धरून खाजणाची कीर्दी करून बांद बांधोन माहामूर करणे इस्तावा भरलेयावरी खाजणास धारा पुलण व खार वीलायत शर्त खाजणाप्रमाणें जिन्नस नव्हे येसें जाणोन इस्तावा भग्लेयावरी पाहाणी करून खाजणास धारा सवासाहामण प्रा करार करून दिल्हा असे येणे प्रा दस्ताची ऊगवणी करणे खाजणाचे बांधास बांधणें कुणबी दोन ठेवाल त्यास वेठ बेगार माफ असे घरपटी घेणार नाहीं खाजणाची सीमा

पूर्वेस नदी सीमाबांद
१
पश्चीमेस बांद भुसकुटी
१

उत्तरेस सेते दलेकर मंडले
व सेलट्या व मूग जैतापुर
१
दक्षणेस पर्या व मळी खाजण
बापट व जामदार मृगें जैतापुर

येणे प्रा सीमा असे उमेद धरून माहामूर करणे कोणे बाबे शक न धरणे

कौल असे राा छ २१ मोहरम

मोर्तब
सुद

श्री १६७८ माघ वद्य १२

लेखांक ५

अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य-

राजश्री नारो त्रींबक गोसावी यासि

सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार सूरू सन सबा खमसैन मया व अलफ अंताजी गोवींद देशमुख व माहादाजी बलाल देशकुलकर्णी कर्यात मीठगवाणें प्रांत राजापूर याणी हूजूर येऊन वीदीत केलें कीं सदरहू दोन्ही वतनें पुरातन आपलीं आपण चालवीत आलों असतां आलीकडे तुळाजी आंगरे यांचे अमलांत गयाल बाकी लटकीच काढुन आधावतीमुळें पैका देणे नाही तरी वतने लेहून देणे ऐसी फारच निकड केल्यावर वतने लेहून दिल्हीं त्यास तीनच्यार वर्षे जाहाली येवीसी स्वामींनी मनास आणुन पूर्ववत चालत आल्याप्रमाणें चालती करावी म्हणोन त्यावरून हें पत्र तुम्हास सादर केले असे तरी सदरहू दोन्ही वतने लटके नीमीत्त ठेऊन अमानत केली आहेत ती मुदामत चालत आल्याप्रमाणें चालवणे हकदक कानू कायदा पुरातन चालत आल्याप्रमाणे चालवणे यांत जो दिगर असेल तर वर्तमान वर्तमान हूजूर लहून पाठवणे जाणीजे छ २५ जमादीलोवल बहुत काये लीहीणे

लेखन सीमा

४ श्रीपतिकृत मराठी ज्योतिषरत्नमाला
शक ९६१ सुमार

१ नेवासें येथील जोशांच्या पोथ्यांत ही त्रुटित पोथी सापडली. सबंद पोथीचीं एकंदर पृष्ठें किती असतील तें सांगतां येत नाहीं. मला फक्त ३७ पानें म्हणजे ७४ पृष्ठें सांपडलीं आहेत. एक पासून सदतीस पर्यंत सर्व पानें शाबूत आहेत. पानांच्या कडा च्यारी बाजूंनीं तुटल्या आहेत. पानांचा रंग पिंवळासांवळा झालेला असून, पानें जीर्णत्वामुळें ढिसूळ झालीं आहेत. पोथीला लिहून सुमारें

४६६ वर्षे झालीं आहेत. दग्पृष्ठास ओळी सामान्यतः ९ किंवा १० आहेत. अक्षर शालिवाहनशकाच्या चौदाव्या शतकांतील बालबोध आहे.

२ शंकर बाळकृष्ण दीक्षित आपल्या **भारतीय** ज्योतिःशास्त्राच्या इतिहासांत (पृष्ठ २३७) लिहितात कीं हा श्रीपति शक ९६१ च्या सुमारास झाला व ह्याचे रत्नमाला व जातकपद्धति हे दोन ग्रंथ महादेवीनामक टीकेसह काशीस छापले आहेत. पैकीं रत्नमाला म्हणून जो ग्रंथ काशीस छापला आहे तो हा च. काशीस छापलेल्या पोथींत मूळ व टीका दोन्ही संस्कृतांत आहेत. मला सांपडलेल्या प्रस्तुत पोथींत मूळ संस्कृतांत आहे व टीका मराठींत आहे. टीका दुसऱ्या कोणीं केलेली नाहीं, खुद्द स्वतः श्रीपतीनें केली आहे. टीकेत श्रीपति दोनदां खालीलप्रमाणें प्रतिज्ञा करतो:—

टीका प्रथम श्लोक

॥ तया ईश्वररुपा कालातें मिं
ग्रंथकर्त्ता श्रीपति नमस्कारि ॥

टीका द्वितीय श्लोक

॥ मी श्रीपति रत्नाचि
माळा रचितों ॥

ह्या दोन उल्लेखांवरून स्पष्ट आहे कीं शक ९६१ च्या सुमारास श्रीपतीनें हा रत्नमाळा ग्रंथ मूळ संस्कृतांत लिहिला व त्याची टीका किंवा त्याचा अर्थ त्यानें स्वतः मराठींत दिला. अर्थात्, श्रीपति हा भास्कराचार्याप्रमाणें महाराष्ट्रीय ब्राह्मण आहे. भास्कराचार्यांनीं (शक १०३६) श्रीपतीचा उल्लेख केला आहे असें शंकर दीक्षित म्हणतात. तात्पर्य प्रस्तुत मराठी टीका शक ९६१ च्या सुमाराची आहे.

३ प्रस्तुत पोथी शक ९६१ च्या सुमारात लिहिलेल्या मूळ मराठी पोथीची कितवी नक्कल आहे, न कळे. एवढें मात्र निश्चित आहे कीं, ही नक्कल शक १३६९ च्या सुमारास केव्हां तरी केलेली आहे. बहुशः शक १३६८ च्या शेवटीं केलेली असावी. कारण पोथीच्या चौथ्या पानाच्या पाठीवर बारीक अक्षरांत पंचसंवत्सरांच्या पुढें नक्कलकारानें १३६९ पासून १३७३ पर्यंत चे पांच आंकडे लिहिले आहेत. श्रीपतीची मूळ मराठी टीका मोठ्या अक्षरांनीं लिहून नक्कलकारानें स्वतःचें लिहिणें बारीक अक्षरांनीं लिहिलें आहे व त्यांत स्वतःच्या कालाचा सहज-

गल्या निर्देश करून ठेविला आहे. तात्पर्य, श्रीपतिनें मूळ मराठी टीका शक ९६१ च्या सुमारास लिहिली व तिची नक्कल कोण्या तरी नक्कलकारानें शक १३६८ त केली.

४ नक्कलकारानें संस्कृत श्लोक अगदीं अशुद्ध लिहिले आहेत. मराठी टीका हि फारशी शुद्ध लिहिली आहे, असें नाहीं. भाषा शक ९६१ तील कित्येक स्थळीं आहे. परंतु नक्कलकारानें तिला आधुनिक म्हणजे शक १३६८ च्या सुमारची करण्यास कमी केलें नाहीं. ह्या साऱ्या नक्कलकारांची ही खोड च आहे. प्रायः मूळ ग्रंथ जसाचा तसा बिनचूक कान्हामात्रांसुद्धां उतरावयाचें वळण ह्या लोकांना नाहीं च. नक्कलकार बहुशः नेवाशाच्या ग्रामजोश्यांपैकीं एखादा असंस्कृतज्ञ गांवढ्या जोशी असावा. इतकें मात्र खरें कीं ह्या गांवढ्या जोशाचे आपणावर, ही पोथी लिहून ठेवण्याबद्दल, फार उपकार आहेत.

५ भाषेसंबंधानें विवेचन इतरत्र विस्तारानें केलें असल्यामुळें, एथें उगाच पाल्हाळ करीत नाहीं. आस्थेवाईक अभ्यासकांना या ग्रंथाचें महत्व सांगावयाला नको च. तत्रापि, ह्या ग्रंथांतील १३६८ तील नक्कलकारानें अर्वाचिनलेलीं रूपें बाद केलीं असतां, इतकें स्पष्ट होतें, कीं ह्या ग्रंथाची भाषा पाटण येथील भास्कराचार्यांचा नातू जो चंगदेव त्याच्या शिलालेखांतील भाषेसारखी व ज्ञानेश्वरीच्या भाषेसारखी आहे. शक १२१२ तील ज्ञानेश्वराची जी भाषा आहे ती च शक ९६१ तील श्रीपतीची भाषा आहे. फरक असला च तर तो फार अल्पस्वल्प आहे. ९६१ त श्रीपति जर इतकी चांगली व प्रौढ मराठी लिहितो, तर मराठीचें हें रूप असें च निदान आणखी शंभर दीडशें वर्षें असलें पाहिजे. म्हणजे शक ८०० तील मराठी शक १२०० तील मराठी सारखें च बहुतेक असलें पाहिजे. ह्या दृष्टीनें पहातां मराठी भाषेचे शक ८०० पासून शक १८०० पर्यंत जे रूपविभाग होतात ते असे:—

(१) ८०० पासून १३०० पर्यंत ज्ञानेश्वरी रूप
(२) १३०० पासून १५०० पर्यंत एकनाथी रूप
(३) १५०० पासून १७०० पर्यंत रामदासी रूप
(४) १७०० पासून व १८३५ पर्यंत चिपळोणकरी रूप

असे हे ठळक ठळक विभाग मराठी भाषेच्या रूपाचे होतात. ८०० पासून तेराशें पर्यंतचे श्रीपति, मुकुंदराज, ज्ञानेश्वर, नामदेव या ग्रंथकारांचे ग्रंथ उपलब्ध आहेत. पैकीं श्रीपति व ज्ञानेश्वर यांच्या च तेवढ्या जुन्या संहिता सांपडल्या आहेत. बाकीच्यांच्या जुन्या संहिता अद्याप हस्तगत झाल्या नाहींत. ८०० पासून १३०० पर्यंतचे आणीक ग्रंथकार व ग्रंथ जेव्हां सांपडतील तेव्हां ह्या ५०० वर्षी-

तील मराठी भाषेच्या रूपांत आणीक हि भेदप्रभेद करतां येण्यास साधन उपलब्ध होईल. तोंपर्यंत ८०० पासून १३०० पर्यंत भाषेचें एक च रूप असलेलें जें स्थूलदृष्टीनें दिसत आहे तेवढ्यांत सध्यां समाधान मानून राहिलें पाहिजे. सहदेव भाडळी, मेघमाला वगैरे कांहीं ग्रंथ शक १००० पासून शक १२०० पर्यंत झालेले माझ्या संग्रहांत आहेत. परंतु, ते अद्याप मीं उतरून काढिले नाहींत. तोंपर्यंत नामनिर्देशापलीकडे त्यांजसंबंधानें निश्चित कांहीं एक लिहितां येत नाहीं.

वि. का. राजवाडे

श्रीगणेशाय नमः ॥
माहालक्ष्म्यै नमः

प्रभवविरतिमध्यज्ञानवंध्या नितांतं
विदितपरमतत्वा यत्र ते योगिनो पि ॥
तमहमिह निमित्तं विश्वजन्मात्ययाना
मनुमित मभिवंदे भग्रहैः काळ मीशं ॥ १ ॥

प्रभव म्हणिजे उत्पत्ति : मध्यमस्थितिविरचितो प्रळयो
ऐसा त्रिविधु कालु तयां[1] काळाचा विषे ज्ञाने वंध्यें
निर्फळें जालि ॥ कोणांचि : जेहि जाणितिले पर-
मतत्व तेयांचि[2] ज्ञाने अतिसें निर्फळें जालि उत्पत्ति
स्थिति : प्रळयो ऐसें नेणति : ऐसा जो काल
ईश्वरु तेयासि नमस्कारु : पुनरपि : सकळ
विश्वाचें जन्म प्रतिपाळ : संसारु। येथ का
सूण्य समर्थु। पुनरपि केसा जाला प्रत्यहि
नक्षत्रिं करून मानिजे मविजे तेया ईश्वररूपा
कालातें मिं ग्रंथुकर्त्ता श्रीपति नमस्कारी तें
ग्रंथ समाप्ति पावावया[3] कारणें ॥ छ[4] ॥

विलोक्य गर्गादिमुनिप्रणीतं
वागहलल्लादिरुतं च शास्त्रं ॥
दैवज्ञकंठाभरणार्थ मेषा
विरच्यते ज्योतिशरत्नमाला ॥ २ ॥

गर्गादिमुनिश्वरीं केलि शास्त्रें ऑलिक[5]–वाराहमिहिराचा-

---

१ तेया. २ तेयांचि. ३ पावावेया. ४ लिं. ५ **अलिक** नामें प्राचीन ज्योतिषी.

र्य-लह्लादिकिं आर्चार्यें[6] तिंहे[7] केलिं जें[8] शास्त्रें[9]
तियें समस्तें[10] अवलोकुनु मग मिं श्रीपति रत्नाचि
माळा गचिंतो[11] ॥ उंविंतें[12] ज्यो(तिं[13],ष नां[14]ं रत्नां[15]
तेयांचिया माळा दैवज्ञ जे ज्योतिषि तेर्यां[16]चिया
कंठा अळंकारावेया कारणें ॥ छ्रं ॥

शकेंद्रकाळः प्रथगारुतिघ्नः
शशांकनंदाश्वियुगैः समेताः ॥
शराद्रिवस्विदुधृतः सं लब्धः
षष्ट्या सशेषा प्रभवादयो ब्दा ॥ ३ ॥

शाळिवाहानशकु दों ठाई मांडोंवा[17] षॉलिल[18] प्रति
२२ गुणिजे मग यासि ४२९हे मेळवावे
पाठि येणे[19] १८७ भागु द्यावा[20] जें लब्ध ये तें
वरिला शकासि मेळवावें मग तैंयौंसि[21] शकासि
६० भागु दर्यांवा[22] शेष उरे तो संवत्सर जाणावा
प्रभवादिकु ॥ छ्रं ॥

प्रभवविभवाख्यशुक्लः प्रमोदनामा प्रजापति रथाब्दः ॥
परतोंगिरा स्ततश्च श्रिमुषभावो युवाख्योन्यः ॥ ४ ॥
धातेश्वरबहुधान्यो प्रमाधिनाम(ा)थ विक्रमः सवृषः ॥
अथ चित्रभानु रस्मात्सुभानुर(पि,तारणाख्य श्च ॥ ५ ॥
पार्थिवनामा व्यय इति सर्वजिदाख्यो थ सर्वधारि च ॥
त (द) नु विरोधिविकृतः खरनंदनविजयजयसंज्ञः ॥ ६ ॥
मन्मथदुर्मुषसंज्ञा तथापरो हेमलंबविलंबो ॥
तद्वद्विकारिनामा थ शार्वरी प्लव इति शुभकृत् ॥ ७ ॥

---

६ आचार्य या शब्दाचें तृतीयेचें अनेकवचन. ७ त या सर्वनामाचें तृतीयेचें अनेकवचन, पुल्लिंग. ८ ज या सर्वनामाचें प्रथमेचें अनेकवचन, नपुंसकलिंग. ९ प्रथमा-नपुंसक-अनेकवचन. १० समस्तें. ११ तो वरचा अनुनासिक चि वर काढिला आहे. १२ ओविंतों. तों बद्दल तें कांढिला आहे. १३ ति अक्षर काढावयाचें विसरला. १४ वे वर अनुनासिक हवा. १५ प्रथमा-नपुंसक-अनेकवचन. १६ पहिल्या या वर अनुनासिक हवा, तेयांचिया. १७ मा वर अनुनासिक हवा. १८ षा=खा. १९ णे वर अनुनासिक हवा. २० द् वर मात्रा पाहिजे, देयावा. २१ ते वर अनुनासिक निरर्थक. २२ देयावा.

शोभनरुद्परः क्रोधिविश्वावसु रन् पराभवाख्या श्च ॥
परतः प्लवंगनामा किळक इवि सौम्यसंज्ञा श्च ॥ ८ ॥
साधारणविरोधिरुतथ पधाविप्रमादिनामान्यैः ॥
आनंदराक्षसाख्यो नळपिंगळकाळयुक्ता श्च ॥ ९ ॥
सिद्धार्थरौद्रदुर्मतीदुंदुभि रुरुभयो वत्सराः क्रमादपरे ॥
रुधिरोद्गारी रक्ताक्षीसंज्ञक क्रोधनक्षयकृत ॥ १० ॥
संवत्सर ६० सगि[23]थिले ॥ छ ॥

इयं हि षष्टि : परिवत्सराणां
बृहस्पते र्मध्यमराशिभोगात् ॥
उदाहृता पूर्वमुनिप्रवर्यै-
र्नियोजनीया गणनक्रमेण ॥ ११

हे साठि संवत्सर बृहस्पतिचेया मध्यमराशिभोगा
पासौनु पुर्वाचार्यं बोलिले ते[24] क्रमे[25] विलोषावि[26]
प्रभवा लागौनु जो[27] मध्यम राशि म्हणिपे सिद्धांति
अहर्गणीव[28] । सिरि[29] मध्यम बृहस्पति वर्त्तितां[30]
राशि जे ये ते संवत्सर पालटला जाणावा
हें बृहस्पतिमान बोलिजे : गुर्जराते[31] वर्त्तत
असे ॥ छ ॥

तस्सि षंलुं यदा सा उद्गमं याति मासि
प्रथमलवगत संबासवे वासवे ज्या ॥
निखिलजनहितार्थे वर्षवृंदे वरिष्ठः
प्रभव इति स नाम्ना जायते द्व स्तदानि ॥ १२ ॥

निश्चैये[32] मौघा[33] मासा धनिष्ठाचा[34] प्रथमचरणि बृहस्पति
ज्यो तिथिए उदो करि तै प्रभव एणें नावे संवत्सरु
प्र[35] (व)र्त्ते लोकहिता कारणें ॥ छ ॥

२३संग्रंथिताः=सार्गाथले. २४तें = तिथें. मागील वाक्यांत संवत्सर शब्द पुल्लिंगी अनेकवचनीं योजिला आहे. ह्या वाक्यांत नपुंसकालिंग अनेकवचन योजिलें आहे. २५ क्रमें. २६ विलोकाविं. २७तृतीया अनेकवचन. सिद्धांतिं. २८ अहःव गणाव ह्या दोन शब्दांचा समास केला आहे. गणावा ह्या शब्दाचा शेवटला कान्हा लिहावयाचा राहिला आहे. २९ प्रथम सि काढून नंतर तिची षि केलेली दिसते. षिरि किंवा सिरि म्हणजे वरती, मथळ्यावर. ३० वर्त्तितां म्हणजे गणितानें काढितां. ३१ देशनाम, सप्तमी. ३२ये. ३३ सप्तमी एकवचन. ३४ चा उच्चार संस्कृतांतल्याप्रमाणें धनिष्टाचेया. ३५ व लिहावयाचा राहिला होता.

		विष्णु १	जिव २	जिव २	इंद्र ३	अग्नि ४	विश्वक ५	अहिर्बुध्न्य ६
अग्नि १ सूर्युः २ चंद्रः ३ ब्रह्मा ४ रुद्र ५	संवत्सर परिवत्सर इदावत्सर अनुद्वत्सर इद्वत्सर	प्रभव १ विभव २ शुक्ल ३ प्रमोद ४ प्रजापति ५	१३६९ १३७० १३७१ १३७२ १३७३	अंगिरा ६ श्रीमुख ७ भावा ८ युवा ९ धाधा १०	इश्वर ११ बहुधा १२ प्रमाथि १३ विक्रम १४ १५	चित्रभा १६ सुभानु १७ तारण १८ पार्थिव १९ व्यय २० ब्रह्मवंशिक	सर्वजी २१ सर्वधा २२ विरोधी २३ विकृत २४ खर २५	नंदन २६ विजय २७ जय २८ मन्मथ २९ दुर्मुख ३०
		पितर ७	विश्वेदेव ८	सोम ९	इंद्राग्नि १०	नासत्य ११	भग १२	
अग्नि १ सूर्य २ चंद्र ३ ब्रह्म ४ इश्वरु ५	संवत्सर परिवत्सर इदावत्सर अनद्वत्सर इद्वत्सर	हेमलंब ३१ विलंब ३२ वीका ३३ शार्व ३४ प्लव ३५	शुभकृत ३६ शोभनु ३७ क्राधि ३८ विश्वा ३९ पराभव ४०	प्लवंग ४१ किळक ४२ सौम्य ४३ साधार ४४ विरोधि ४५	परीधा ४६ प्रमादि ४७ अनंद ४८ राक्षस ४९ नळ ५०	पींगळ ५१ काळयु ५२ सीद्धार्थी ५३ रौद्र ५४ दुर्मती ५५	दुंदुभी ५६ रुधिरोद्गा ५७ रक्ताक्षी ५८ क्रोधन ५९ क्षय ६०	
			विष्णुवंशी				रुद्रवंशीका	

३६ ह्या कोष्टकांतील चवथ कलम नकल ज्या वेळीं केली त्या वेळीं लिहिलेलें आहे.

युगं भवेद्वत्सरपंचकेन
युगानि च द्वादशवर्षषष्ट्या ॥
भवंति तेषा मधिदेवता श्च
रमेण वक्ष्यामि मुनिप्रणीता (:) ॥ १३ ॥

संवत्सैरा[३७] पंचा ५ युग एक १ होए एवं संवत्सर ६०
युगें १२ होति प्रभवा लागुनि अनुक्रमें ॥ एया
युगाचें[३८] अधीदेवतें[३९] मुनिश्वरि[४०] सांघितलें[४१] तें सांघेन[४२] ॥ छ्[४६] ॥

विष्णु जिवः शक्रो दहन स्त्वष्ठा चाहिर्बुध्न्यः पितरः ॥
विश्वे सोम श्वेंद्रज्वलनौ नासत्याख्यावत्य श्च भगः ॥ १४ ॥

विष्णु १ बृहस्पति २ इंद्रु ३ अग्नि ४ विश्वकर्मा ५ अहिर्बुध्न्यं ६
पितरु ७ विश्वेदेवा ८ चंद्रु ९ इंद अग्नि ([४३] १०) ११
भग १२ एवं युगें १२ क्रमें चि आधिपति
जाँणावें[४४][४५] ॥ छ्[४६] ॥

संवत्सरः प्रथमकः परिवत्सरो न्य-
स्तस्मादिन्विदितपूर्वपदापरं स्युः ॥
एवं युगेषु सकळेषु तदीयनाथा
वह्न्यर्कशीतगुर्वाविरिंचिशिवा क्रमेण ॥ १५ ॥

प्रथम संवत्सर १ परिवत्सर २ इदावत्सर ३ अनुद्वत्सर ४
इद्वत्सर ५ एयांसि उंचिं पदें असति ॥ एयां परि
एकेकु १२ युगा जाणावा आतां एँयांचें[४५] स्वामि ॥
अग्नि १ सूर्यु २ चंद्रु ३ ब्रह्मा ४ पार्वती ५ अँनुक्रमे[४५]
जाणावे ॥ छ्[४६] ॥

मृगादिराशिद्वयभानुभोगा
षडर्त्तवः स्युः शिशिरो वसंतः ॥

---

३७ षष्ठी. ३८ युगाचें; चें=चियें. चें चा उच्चार संस्कृतांतल्याप्रमाणें. ३९ देवतें. अनेकवचन. ४० रिं. तृतीया अनेकवचन. ४१ अनेकवचन. लियें=ल्यें=लें. ४२ तियें=त्यें=तें. अनेकवचन. ४३ दहाचा आंकडा लिहावयाचा राहिला आहे व ११ ह्या आंकड्याच्या अगोदर नासत्य हीं अक्षरें लिहावयाचीं राहिलीं आहेत. ४४ अनुनासिक निरर्थक किंवा वैकल्पिक. ४५ चे वर अनुनासिक निरर्थक किंवा वैकल्पिक. ४६ में.

ग्रीष्म श्च वर्षा शरच्च तद्वु
द्वेमंतनामा कथित श्च षष्टः ॥ १६ ॥

मकरादि राशि २ दोनि सूर्यु असता रुतु ६ होति ॥
यौंलां क्रांति असतां ऋतु जाणावे ॥ ६ ॥

१०	११	१२	१	२	३	४	५	६	७	८	९
म	कु	मि	मे	वृ	मि	क	सिं	कं	तु	वृ	ध
शि	शि	वसं				व	व		श		
शि	शि	त रे	वसं	ग्री	ग्री			श		हे	हे
र	र	तो	त	ष्म	ष्म	र्षा	र्षा	र	र	मं	मं
॥ उ त्त रा य णे ॥						॥ द क्षि णा य ण ॥					

शिशिरपूर्व मृदुत्रय मुत्तरं
ह्ययन माहु रह श्वस्तदामथ ॥
भवति दक्षिण मन्यदृतुत्रयं
निगदिता रजनी मरुतां च सा ॥ १७ ॥

टिका ॥ शिशिरु १ वसंतु २ ग्री ३ या तीन्हि रेतुं
देवाचा दिवसु ॥ आणिक उत्तरायण होए ॥ वर्षा १
शरदु २ हेमंतु ॥ ३ ॥ या ३ रुतौ देवाची रात्रि ॥
आणिक दक्षिणायन होए जाणावे ॥ ६ ॥

गृहप्रवेशं त्रिदशप्रतिष्ठा
विवाहचौळव्रतबंधपूर्वे : ॥
सोम्यायने कर्म शुभं विधेयं
यद्गर्हितं तत्खलु दक्षिणे च ॥ १८ ॥

---

४७ ला प्रत्यय लागला आहे. याला या रूपांतील ला वर अनुनासिक वैकल्पिक. ४८ ऋतु ह्या शब्दाचीं रेतां, रेतु, रुतु, ऋतु, अशीं चार रूपें ह्या ग्रंथांत आढळतात. ४९ वे वर अनुनासिक दिला नाहीं.

टीका ॥ गृहारंभप्रवेश देवप्रतिष्टा प्रसौदारंभु ।
विवाह चौळ मौंजिबंधुंन[51] ॥ आदि करुण ॥
मंगळ कार्यें तेतुकीं उत्तरायणी करावि ॥
[52]जें कार्यें अमंगळें निंद्ये[53] तियें दक्षिणायनि
करावि ॥ ९ ॥ ९ ॥

दर्शावधिं मास मुशंति चांद्रं
सौरं तथा भास्करराशिचारात् ॥
त्रिंशद्दिनं सावनसंज्ञ मार्या
नाक्षत्र मिंदो र्भगणाभ्रम श्च ॥ १९ ॥

टिका ॥ अंवसे पासौनि अंवसें वरीं गणिजे ॥
वो चंद्रमासु ह्मणिजें ॥ संक्रांति पासौनी संक्राति
वरि गणीजे ॥ तो सौरमासु ॥ एकादशी पासौंनु ३०
तिथि गणौनु देइजे ॥ तो सावनमासु ॥ अश्वीनी
पासौन रेवति वरी चंद्रु भोगी एसैंयाँ[54] गणिजे ॥
तो नक्षत्रमासु एवं ४ मास संज्ञा होनि ॥ ९ ॥

मधु स्तथा माधवसंज्ञित श्च
शुक्रः शुचि श्चाथ नभोनभस्यो ॥
तथैष उर्ज श्च सह सहस्यौ
तपस्तपस्या विदिति क्रमेण ॥ २० ॥
स्वनाम नक्षत्र स्वनामनाथा
मासा श्च पक्षा वपि देवपित्र्यौ ॥
उभौ निरुक्तौ पलु शुक्लकृष्णौ
शुभाशुभे कर्मणि तौ प्रशस्तौ ॥ २१ ॥

---

५० प्रा. ५१ बंधनु बद्दल बंधुन लिहिलें आहे. ५२ जें = जियें. ५३ द्येवर अनुनासिक हवा. ५४ से वर अनुनासिक निरर्थक पण वैकल्पिक. ऐ बद्दल ए काढिला आहे. ऐसेया काला=ऐश्या काला= अशा काळा.

ईश्वरु	इंद्राग्नि	इंद्रु ३	उदक	विष्णु	अनेचक	अश्वी	आग्नि	चंद्रु	गुरु	पितर:	भग:
चैत्र १	वैशा २	ज्येष्ट ३	अषा ४	श्रव ५	भाद्र ६	अश्वी ७	कार्ती ८	मांर्ग ९	पौंष १०	माघ ११	फाग १२
मधु १	माध २	शुक्र ३	शुची ४	नभ ५	नभस्या ६	एष ७	उर्ज ८	सह ९	सहस्यौ १०	तप ११	तपस्या १२

टिका ॥ नक्षत्रप्रमाणें आधिप जाणावे ॥ शुक्लपक्षाचे देव ॥
कृष्णपक्षाचे पितर अशुभ कार्यासि ॥ छ्रं ॥
ईंति श्रीपतिविरचितौं[55]यां ज्योतिषरत्नमाळायां
संवत्स[56]प्रकरणं ॥ प्रथमं ॥ छ्रं ॥

तिथिपा श्चतुर्मुषविधातृविष्णवो
यमशितदिधितिविशाषवज्रिणः ॥
वसुनागधर्मशिवातिग्मरश्मयो
मदनकलि स्तदनु विश्व इत्यपि ॥ १ ॥

टिकां[57] ॥ प्रतिपदादि तिथिचे आधिपति क्रमें[58] चिं[59] साधैन[60] ॥
चतुर्मुष १ ब्रह्मा २ विष्णु ३ यमु ४ चंद्र ५ स्वामि कार्तिकु ६
इंद्रु ७ वसु ८ नाग ९ धर्मु १० शिव ११ सूर्य १२
मदनु १३ कलि १४ विश्वदेवा १५ ॥ छ्रं ॥

तिथौ हि दर्शसंज्ञिके
पितृ मुर्शत्यधिश्वरा ॥
त्रयोदशीत्रितिययो
स्मृत स्तु वित्तपोपरे ॥ २ ॥

आमावास्यै[61] पितर तृतिया आणिक तेरसु या २ तिथि[62]
धर्नेदुः स्वामी ऐसें[63] ऐका रिषेश्वराचें मत्त[64] ॥ छ्रं ॥

---

५५ र वर अनुस्वार निरर्थक. ५६ संवत्सर शब्दांतील र गाळला आहे. प्रकर्ण असा अपभ्रंश, तो लिहावयाचें मनांत होतें. परंतु संस्कृत रूप मध्यें लक्ष्यांत येऊन प्रकरणं असें संस्कृत मराठी दुहेरी रूप हातून निघालें! ५७ का वर अनुनासिक निरर्थक परंतु वैकल्पिक. ५८ मे वर अनुनासिक हवा. ५९ चि वर अनुनासिक वैकल्पिक. ६० सा वर अनुनासिक हवा. ६१ चतुर्थी. ६२ चतुर्थी. ६३ ऐ बद्दल ए लिहिला आहे. ६४ मत बद्दल मत्त असा उच्चार फार पुरातन आहे व अद्याप हि प्रचलित आहे.

वह्नि विरिंचो गिरिजा गणेश
फणि विषाखो दिनकृन्महेशः ॥
दुर्गान्तको विश्वहरि स्मर श्च
शर्व शाशि चेति पुराणदृष्टाः ॥ ३ ॥

अग्नि १ ब्रह्मा २ पार्वती ३ गणेशु ४ सर्व ५ स्वामी कार्तिकु ६ सूर्य ७ इश्वरु ८ दुर्गा ९ यमु १० विश्वेदेवा ११ विष्णु १२ मदनु १३ महेशु १४ चंद्रु १५ हे पुराणप्रसिद्ध आधिपत्यें[65] प्रति[66]पदादि जाणावे ॥ छू ॥

नंदा च भद्रा च जया च रिक्ता
पूर्णेति सर्वा तिथयः क्रमा स्युः ॥
कनिष्टमध्यष्टफळा स्तु शुक्ल—
कृष्णे भवंत्युत्तममध्यहिना ॥ ४ ॥

नंदा १ भद्रा २ जया ३ रिक्ता ४ पूर्णा ५ ईया परि जाणाविया नंदा १।१।६।११ नंदा २।७।१२ भद्रा ३।८।१३ जया ४।९।१४ रिक्ता ५।१०।१५ पूर्णा इया परि शुक्लपक्षीं प्रथम ५ तिथि कनिष्टा मग मध्यम ५ मग उत्तम ५ कृष्णपक्षि प्रथम उत्तमा तिथि मग ५ मध्यमा ५ मग तिथि अधमा (रामराम)[67] तैंसी[68] च फळ[69] जाणावें[70] ॥ छू ॥

तिथि श्च युग्मा खलु पक्षरंध्रा
भवे द्वितिया दशामिं च हित्वा ॥
दर्श श्च तासां विषमा वरिष्टा
स्मृता मुनींद्रै नवमिं विहाय ॥ ५ ॥

बिज २ दशमि वर्जुनु तिथि तिया पक्षरंध्रा होति या शुभकार्या तिरु[71]+ नवमी अवंस वर्जुनु विषम तिथि तेया मंगळकार्यासि उत्तमा ४।६।८।१२। १४।९।३०। या पक्षरंध्रा अशुभा ॥ १ ॥ २ ॥ ३।५।७।१०।११।१३।१५। या वरिष्टा शुभा ॥ छू ॥

---

६५ अधिपति. ६६ चतुर्थी. ६७ हीं अक्षरें अधमा या शब्दावरती लिहिलीं आहेत. ६८ सी वर अनुनासिक हवा. ६९ अनेकवचंनं. येथें वाक्य संपलें. ७० जाणावें = ज्ञातव्यं. ७१ येथें एक अक्षर वाचतां येत नाहीं, तीन अक्षरी शब्द आहे.

एकांतरे दिनकरो स्ति घयो द्वितीया
पूर्वा धनुः शफर मियो वृषकुभयो श्च ॥
कर्क्याजियो श्च मिथुनाबळयो मृगेद्रा
कौर्प्यो स्तुळामकरयो श्च भवंति दग्धा ॥ ६ ॥

श्लोकार्थ ॥

द्वितिया धनमिनेषु चतुर्थि वृषकुंभयो ॥
मेषे कर्काटके षष्टी कंन्य च मिथुन चाष्टमी ॥ ७ ॥
दशमी वृश्चिके सिंहे द्वादशी मकरे तुळे ॥
ज्ञातव्या तिथयो दग्धा द्वौ द्वौ राशौ स्तिथे रवौ ॥ [७२]

आद्या चतस्त्र क्रियपूर्वकाणां
मेषा चतुर्णा मिह पंचमि स्यात् ॥
परापरेषां परत स्तथैव
मकृरराशे रशुभा तिथि स्यात ॥ ८ ॥

ध	मि	२
वृ	कुं	४
मे	कं	६
कं	मि	८
वृ	सिं	१०
म	तू	१२
सू	र्य	

+ + + संक्राति
असे तेया दग्धा
वजावियाँ[७३]

पाडव्या[७४] लागोनि प्रथम तिथि ४
राशि ४ मेषादिकी लागेति ४ तेया
राशि ५ लागे सिंहा राशि ४ सष्टि
आद ति[७५] ४ इत्क्या[७६] चौराशि
१५।३० लागे ऐसैया[७७] परि
वाटावें ॥ जिए राशि पापग्रहो
असे ते तिथि अशुभ जाणावि
मेषु १ वृश्चिकु ९ चौ राशि १०
लागे ११ धनु १२ मकरु १३
कुभ १४ मिनु या स्वौ[७८] चौ
अवंस का पुनिव जाणावे ऐसीया
परि ॥ छ ॥

---

७२ येथें श्लोकाला आंकडा दिला नाहीं. ७३ वजावेया. ७४ पाडवेया. ७५ तिथि. ७६ इतुकिया. ७७ ऐसेया. ७८ अर्थ कळत नाहीं.

नष्टेंदुषष्टिप्रतिपत् स धिमान्
न जातु दंतोत्कषणं विदध्यात् ॥
कुर्वंनवाप्नोति तदाशु नुमं
लक्ष्मिकुळज्ञातिजनोपघातं ॥ [७९]

८।३०।१६ इहि[८०] ति[८१] तिथि[८२] दंतधावन कदाचित् बुद्धिवंत्ति[८३]
न करावें जरि करिति तर लक्ष्मि कुळ ज्ञाति
इतुकि[८४] नाशे[८५] ॥छ ॥

स्नातु जेंनस्य दशमी तनयां त्रयोदश्या-
र्थं निहंतु उभय मेतदपि द्वितिया ॥
मप्तम्यनिंदुनवमिषु च संपदीसु
स्नाया कदाचिदपि नामळकै मनुष्या ॥ ९ ॥

दशमि तैळाभ्यंगु करि तो तैं[८६]पुत्र मरति त्रयोदशि अर्थनाशु
होए ॥ द्वितिएसि जर किजे तरि पुत्र-[८७]आणिक-धन-नाशु
होये दोन्हि पळें[८८] होति ॥ ७।३०।९। इहीं[८९] तिंहीं[९०]
तिथिं जर संपत्तिचि चाड तर मैनुष्ये[९१] कदाचित
अमळें[९२]कंटियाहि न न्हैईजे[९३] ॥ छ ॥

षष्टिषु तैलं फळं मष्टमीषु
क्षुरक्रिया चैव चतुर्दशिषु ॥
स्त्रिसेवनं नष्टकळासू पुंसां
मायुक्षयार्थं मुनयो वदंति ॥ १० ॥

---

७९ श्लोकाला आकडा नाहीं. ८० सप्तमी. ८१ तिहिं. हिं ल्याहावयाची राहिली. ८२ सप्तमी. ८३ तृतीया. ८४ इतुकीं प्रथमा अनेकवचन. ८५ नाशेति. ति ल्याहावयाची राहिली आहे. ८६ तत्पुत्र. त काढावयाचा राहिला आहे. ८७ पुत्रनाशु आणिक धननाशु असें म्हणावयाच्या ऐवजीं पुत्र-आणिक-धन-नाशु असें म्हटलें आहे. म्हणजे एका प्रकारचा समास केला आहे. इतकें च की आणिक हें पद तसेंच ठेविलें आहे. संस्कृत समासांत हें पद गाळतात. मराठींत विकल्पेंकरून गाळीत नाहींत. ८८ फ ऐवजीं प. ८९ अनुनासिक वैकल्पिक. ९० ति पेक्षां हि वर अनुनासिक जास्त बरा दिसता. ९१ अनुनासिक हवा. ९२ तृतिया. ९३ न्हावें.

सटि तेलभोजन न कें[९४](रा)वें ॥ अष्टमी मांस न
भक्षावें । चतुर्दशी क्षौरें न करावें । अमावास्ये
मैथुनु[९५] जरि जिवाचेयाचि चाड तरि या तिथि
इतुकें न करावें ॥ ऐसे मुनेश्वर[९६] बोलति ॥ छ ॥

अष्टम्यांदिषु नाद्या दूर्ध्वगति स्तु कदाचिदपि विद्वान् ॥
शिर्ष–कपाळांत्राणि नषचर्मतिळानि च क्रमशा ॥ ११ ॥

अष्टमी । नारिकेळ । नवमी ९ भोपळे ॥ दशमी १० पडवळ ॥
एकादशी वालसेंगा[९७] द्वा १२ केळ । त्रयो १३ वांगे[९८]
जरि ऊर्द्धागतिचि चाड तरि अष्टमी लागौनु
यें फळें न भक्षावि[९९] जाणतेन कदाचित् ॥ छ ॥

राकानुमत्याविति पूर्णमास्या
रात्रेंदुदृष्टे दुवशाद्भवेतां ॥
कुहूसिनीवाल्यपि नष्टदृष्टे
चंद्रे स्मृते चासितपचदस्यौ ॥ १२ ॥

पुनिवे दिहा चंद्रु उदिजे तर अनुमतिः ॥ रात्रि
उदौजे[१००] तर कानावा अव ३० सें चंद्रु निदिसे[१०१]
तर कुहु ह्मणिजे कळाशेष दिसे नरि सिनीवालि
ह्मणिपे ॥ छ

माघे पंचदाशी कृष्णा नभस्ये च त्रयोदशी ॥
तृतीया माधवे शुक्ला नवम्युर्जे युगादयः ॥ १३ ॥

माघमासिची आमावास्या शिरात्रि[१०२] भाद्रपदमासचा
कृष्णपार्क्षि त्रयोदशु अर्द्धपक्षि वैशाषमासि शुक्ला
तृतीया : अक्षतृतीया : कार्तिकशुक्ल नवमी दिवाळि
वितल्पा : या तिथि ४ युगादि ह्मणिजे ॥ नवमी

---

९४ रा गाळला आहे. ९५ न करावें हें अध्याहृत आहे. ९६ मुनीश्वर ह्या संस्कृत समासाचें रूप मुनेश्वर असें अद्याप हि मराठींत हरहमेष करितात. ९७ से वर अनुनासिक हवा. ९८ वा वर अनुनासिक हवा. ९९ वि वर अनुनासिक हवा. १०० दे पाहिजे. १०१ अकरणरूप. १०२ शिवरात्रि ह्या शब्दाचा लौकिक अपभ्रंश शिरात्रि.

कृतयुगादि तृतीया तृतयुगादि[१०३] : अमावास्या ३०
द्वापरादि ॥ त्रयोदशी १३ कलियुगादि जें एकीं
युगीं पुण्य कीजे तितुल[१०४] पा[१०५] येकी दिवसीं
होए ॥ छ ॥

अश्वीयुजी शुक्लनममी द्वादश्यूर्जे मधौ तृतीया च ॥
भाद्रपदे पि(तृ)तृतीया श्रावणमासे त्वमावास्या ॥ १४ ।

टिका ॥ आश्विनाचि शुक्ल महानवमी ९ कार्तिकशुक्ल
द्वादशी १२ चैत्रशुक्ल तृतीया[१०६] : ॥ भाद्रपदशुक्ल तृतीया ।
श्रावणमासिचि आमावास्या पोलेयाची ॥

एकादशी च पौषे शुचि सितदशमी सप्तमी माघे ॥
बहुळाष्टमी नभस्येऽप्याषाढी कार्तिकी तद्वत् ॥ १५ ॥

टिका ॥ पुष्यमासाची शुक्ल एका ११ ॥ आषाढि शुक्ल दशमी ॥
माघी शुक्ल सप्तमी ॥ भाद्रपदकृष्णाष्टमी ॥ आषाढी कृष्णाष्टमी ॥
कार्त्तिकी कृष्णाष्टमी ॥ छ ॥

फाल्गुनसीतपंचदशी चैत्री ज्येष्टपौर्णमासि च ॥
मंन्वंतरादय इमा श्चतुर्दशोक्ता बुधै पुण्यात् ॥ १६ ॥

टिका ॥ फाल्गुनी पुनिव ॥
चैत्री पुनीव ॥ ज्येष्टी पुनीव ॥ एवं तिथि १४ मंन्वादि
म्हणिजेति ॥ ऐकैकि एका मंन्वंत्तराची आदि एकी मंन्वतरि
पुण्य कीजे ॥ तिये[१०८] एकि तिथि होए ॥ छ ॥

वृद्धि स्तु मंगळपदा च वळा षळा च
लक्ष्मीवती त्वथ यसापरत श्च मित्रा ॥
तद्वद्बला सुमहती तिथि रूप्रकमा
स्या धर्मिणी प्रतिपदादि तथैव नंदा ॥ १७ ॥

---

१०३ त्रेता=तृत. १०४ तितुलैं=तितुलें. प्रथमा नपुंसक एकवचन. १०५. अव्यय. १०६ जशीं ।, ॥, हीं विरामचिन्हें आहेत तसें च : हें हि विरामचिन्ह आहे. प्रथम : हें विरामचिन्ह लिहिलें व नंतर ॥ हें हि लिहिलें. दोन चिन्हें लिहिण्याचें कारण नव्हतें. १०७ एकेकि असें रूप हवें. एकाराचें चिन्ह काढावयाला लेखक विसरला. १०८ तिये म्हणजे तितकें. हें रूप अगदीं अपरिचित आहे.

क्रमाद्यशोवत्यपराजयोग्रा
सौम्याह्वया पंचदशी तिथि श्च ॥
फळानि नाम्ना सदृशानि तासा
महकृषिभि र्नून मुदाहृतानि ॥ १८ ॥

टिका ॥ प्रतिपदादि फळा प्रमार्णे तिथि गणावि १ वृद्धि २ सुमंगळपदा ३ बळा ४ षळा ५ लक्ष्मिवाति ६ यशा ७ मित्रा ८ बळा ९ उग्रा १० दशम्या धर्मिणी । [१०९]दशं नंदा १२ यशोवति १३ जया चतुर्दशी १४ उग्रा १५ सौम्या ॥ अनुक्रमें जि[११०]यचें जैसें नाव तिय[११०]चें तैंस[१११] फळ ॥ छ् ॥

नंदासु चित्रोत्सववास्तुतंत्र—
क्षेत्रादि कुर्वित तथैव नृत्यं ॥
विवाहभूषाशकटाध्वयाने
भद्रासु कार्याण्यपि पौष्टिकानि ॥ १९ ॥

टिका ॥ नंदा १।६।११॥ इहि[११२] तिथि[११२] इतुकी[११२] कार्यें करावें[११३] ॥ चित्रा मंगळोत्सव : । वास्तु । उंषध । शिल्पकर्म । क्षेत्रकर्म । विवाहिक । नृत्य । गीत । वाजित्र । आदि करुनु ॥ भद्रा २ । ७ । १२ इहिं तिथि[११२] इतुकी[११२] कार्य[११२] करावि ॥ विवाह । अळंकार ।शकट गाडे[११४] । कर्म मार्ग ।आत्रादि[११५] ॥ [११६]शांतिक । पौष्टिक ॥ छ् ॥

जयासु संग्रामबळोपयोगो
कार्याणि सिद्धि तिहिनिर्मितानि ॥
रिक्तासु वद्धद्ध्वधबंधघात–
विशाभिशस्त्रादि च यांति सिद्धिः ॥ २० ॥

---

१०९ एकादश. ११ चा आंकडा लिहावयाचा राहिला व दश च्या पाठीमागें एका हें पद लिहावयाचें राहिलें. ११० य हें चिन्ह ए बद्दल आहे. १११ तैसें. तें वरती जो अनुनासिक दिला आहे तो वास्तविक स वर चा असावा. ११२ शेवटीं अनुनासिक हवा. ११३ अनेकवचन. ११४ शकटकर्म व गाडेकर्म. कर्म हें पद रेघेच्या आलीकडे हवें. ११५ आत्रादि=यात्रादि. मार्ग हें पद रेघेच्या पलीकडे लेखकानें लिहावयाला हवें होतें. मार्गयात्रादि. ११६ शा वर अनुस्वार हवा. शांतिक.

टिका ॥ जया ३ । ८ । १३ इहिं तिथि इतुकी कार्ये करावि‍ं ।
संग्रामू ॥ सैन्यरचन ॥ व्यूहु ॥ सराई ॥ येंत्र ॥
स्थिरे कार्ये जिवादि वाहनें विधि : ॥ मायकर्म ॥
रिका ४ । ९ । १४ इहिं तिथिं इयें कार्ये करावीं ॥
[117] निधि काढाविया बंधन । विष । घातु । अग्नि । शस्त्रकर्म ।
[118] क्रूरें कार्ये करावि‍ं ॥ छ्रं ॥

पूर्णासु मांगल्यविवाहयात्रा
सपौष्टिकं शांतिककर्म कार्यं ॥
सदैव दर्शे पितृकर्म मुक्ता-
न्यान्यद्विध्यात्सुंभमंगळादि ॥ २१ ॥

टिका ॥ पूर्णा ५।१०।१५ इहिं तिथि इतुकी कार्ये
करावी मंगळकार्यें विवाह ॥ यात्रा ॥ शांतिक[119] । पौष्टिक ॥
अमॊवास्ये[120] । स पितृकार्यें ॥ जाप्यु । स्नानदान । हे
करावें ॥ अणि मांगल्यकार्यें काहि न करावें
॥ छ्रं ॥

कृष्णपक्षे त्रयोदश्यां मघास्विंदुं करे रवि ॥
यदा तदा गजछाया श्राद्धपुण्यै रवाप्यते ॥ २२ ॥

टिका ॥ कृष्ण त्रयोदशी मघा नक्षत्र । हस्त सूर्यू । ऐसें
जे होय । तैं (ग)जछायापर्वणि होए । श्राद्ध पुण्यैस्तव[121]
पाविजे ॥ छ्रं ॥

नभस्ये वा सिते पक्षे भानौ चैव करस्थिते ॥
व्यतिपातकुजरोहिण्यां सा षष्टी कपिला स्मृता ॥ २३ ॥

टिका ॥ भाद्रपदीं ६ सष्टि व्यतिपातु मंगळवारु ॥ रोहिणी
हस्तु सूर्ये । एणें संयोगें होय । तै कपिलषष्टी म्हणिजे ॥
ये माहापुंण्यतिथि स्नानदान करावें ॥ छ्रं ॥

यत्रैकस्पृशि तिथिद्वयावसानं
वार श्चेद्‌वमदिनं तदुक्त मार्यै ॥

---

११७ अनेकवचन. ११८ हा लेखक अनुनासिक विकल्पानें देतो न देतो. ११९ शां. १२० स हें शब्दयोगी अव्यय निराळें काढिलें आहे. १२१ पुण्यैः याचें भाषान्तर पुण्यस्तव. स्तव याचीं ज्ञानेश्वरकालीं (१) स्तव व (२) तव अशीं दोन रूपें होत. पैकीं स्तव हें तव च्या पूर्वीचें.

यस्यशां इयति तिथिभयस्य वाह
विधुस्पृक् स पुन र्द्वयं च नेष्टं ॥ २४ ॥

टीका ॥ एक वारु । २ तिथिचा अंतु पावे तो अवमु दिनु । हें दोह्नि मंगळकार्यां सि अनिष्ट ॥ छ ॥

अवाप्य या मस्त मुपैति सूर्य
स्थितिं मुहूर्तत्रयवाहिनीं च ॥
धर्मस्य कृत्ये ष्वषिळेषु पुर्णा
मदंति तां काळविदः पुराणा ॥ २५ ॥

टीका ॥ जिये तिथि चिं[122] तिन मूहुर्त्त भोगुनु ॥ सूर्यू अस्तमान पावे घटिकां ६ ते । तिथि सकळधर्मकार्यां सि पूर्णा जाणावि ॥ एसेया काळा तें जाणते जै आदिरिषेश्वर बोलति । एका श्लोकाचा विस्तारु याज्ञवल्क्यस्मृति सि आहे तो पाहावा ॥ छ ॥

दैवे कर्मणि संप्राप्ति यस्या मुदि गते रवौ ॥
सा तिथि सकला ज्ञेया दानाध्ययनकर्मसु ॥ २६ ॥

इति श्रीपतिविरंचितायां ज्योतिषरत्नमाळयां
तीथिप्रकरणं द्वितियं ॥ छ ॥ ६ : ३ ॥

सूर्योदितः शिवशिवागुहविष्णुकेंदु-
काळाः क्रमेण कथिता पितयो ग्रहाणां ॥
वह्निंबुभुमिहरिशक्रशचिविरिंचिसू
तेषां पुन र्मुनिवरैः प्रतिदेवता श्च ॥ १ ॥

टिका ॥ सूर्या पासोनु अनुक्रमे चि देवतें[123] जाणावा सूर्य ईश्वरु । चंद्रासि पार्वति । मंगळाचा स्वामि कार्त्तिकु ॥ बुधासि विष्णु ॥ बृहस्पतिसि ब्रह्मा ॥ शुक्रासि चंद्रु । शनि काळु ॥ पुनरपि प्रतिदेवते[124] जाणावे ॥ सूर्यासि अग्नि । चंद्रासि ॥ उदक । मंगळासि भूमि ॥ बुधासि हरि गुरुसि इंद्रु ॥ शुक्रासि इंद्राणि ॥ शनिसि ब्रह्मा ॥ जो जेयाचा[125] स्वामि तेयाचा वारि तेयार्चि कार्ये करावीं ॥

---

१२२ अव्यय १२३ पुंलिंग एकवचन. १२४ पुंलिंग अनेकवचन. १२५ ज वर मात्रा हवी- जेयाचा. कारण, पुढें तेयाचा व तेयार्चि हीं दोन रूपें एकारयुक्त लागलीं च आलीं आहेत. ज वर मात्रा देण्यास विसरला आहे, हें उघड आहे.

राहों राधिपति कालः प्रत्यधिशोशो भुजंगमाः ॥
तथा केतो श्चित्रगुप्तः स्वयंभु ऋषिभी स्मृता ॥ १ ॥ छ्रै ॥

राजाभिषेकोत्सवयानसेवा
गोवह्निमंत्रौषधशस्त्रकर्म ॥
सुवर्णताम्रोणिकचर्मकाष्टं
संग्रामपण्यादि रवौ विदध्यात् ॥ २ ॥

टिका ॥ राजाभिषेकु । मंगळें[126] कार्ये । यात्रा । सेवाकर्म ।
गाइचिं कार्यें । अग्निकर्में
मंत्रें[127] साधना ॥ औषध । शस्त्रकर्म । सुवर्ण[128] कुर्ण ।
[129] तांबे ॥ लो॰कर्म । चर्मकर्म । काष्टकर्म । संग्रामु
[130] घेणें ॥ आदि करुनु आदित्यवारीं करावि ॥ छ्रूं ॥

शंषाब्जमुक्तारजतेक्षुभोज्यं
स्त्रीवृक्षकृष्यंबुविभूषणाद्यं ॥
गीतक्रतुक्षीरविकारशृंगी
पुण्यांबरारंभण मिंदुवारे ॥ ३ ॥

टिका ॥ शंषु ॥ कमळ । मुक्ताफळ । रुपें उत्सें[131]
पान भोजन । स्त्री । वृक्ष । कृषि । उदक ।
अळंकार । गीतनृत्य । वादित्र यज्ञ । क्षीरविकार
सिधरेणीं[132] रसाळ । उंहळपि[133] । हंसकादि शृंगीण
गोचतुष्पदादि ॥ पुण्ये[134] । वस्त्रें इतुकीया कार्यांचां[135]
विधि आरंभु करावि[136] सोमवारिं ॥ छ्रूं ॥

भेदानृतास्तेयविषाग्निशस्त्र—
बंधाभिघाहवशाठ्यदंभान् ॥

---

१२६ यें वर अनुनासिक हवा. १२७ अनेकवचन नपुंसक. १२८ क॰ण= ऋण. १२९ बे वर अनुनासिक हवा. तांबेलोहकर्म हा समास आहे. मध्यें रेष निरर्थक दिली आहे. १३० पण्य ह्या शब्दार्चे भाषान्तर घेणें. १३१ उत्सव. १३॰ शिधरण=शिखरण. १३३ पक्षिविशेष. १३४ अनुनासिक हवा. १३५ चा वर अनुनासिक निरर्थक. १३६ विधि व आरंभ हीं करावीं. हीं अध्याहृत करावीं या क्रियापदाचा कर्ता.

सेनानिवेशाकरधातुहेम—
प्रवाळकार्यादि कुजे हि कुर्यात् ॥ ४ ॥

टिका ॥ मेदु । अनृत । चोरि । अग्नि । शस्त्र । बंधन । घातु । संग्रामु । शाठ्य दंभु । सैन्यरचना ॥ नाना अगेरीं[137] धातु ॥ वादु । सुवर्ण । पवळें । आदिकरुनु कार्यें मंगळवारिं करावि ॥ छ ॥

नैपुण्यपण्याध्ययनं कळाश्च
शिल्पादिसेवालिपिलेषनानी ॥
धातुक्रियाकांचनयुक्तसंधि—
व्यायामवादा श्च बुधे विधेयाः ॥ ५ ॥

टिका ॥ नाना–कळासाधन । क्रयविक्रय । अध्ययन । कळा । शिल्पकाष्ट । पाषा । र्णादि[138] । सेवा । लिपि । लेषन । चित्र । अक्षरलिषि । धातुक्रिया । कांचन । युक्तसंधान । व्ययामु । वादु । शास्त्रचर्चा । एतुकीं कार्यें बुधवारि करावि ॥ छ ॥

धर्मक्रियापौष्टिकयज्ञविद्या
मांगल्यहेमांबरवेश्मयात्रा ॥
रथाश्वभेषज्यविभूषणादि—
कार्यं विदध्यात्सुरमांत्रिणोन्हि ॥ ६ ॥

टिका ॥ सकळ कर्मकार्यें । शांतिकें । पौष्टिकें । यज्ञ । विद्या । मांगल्यकार्यें । सुवर्ण । वस्त्र । गृह । यात्रा । रथ । अश्व । भेषज्य । अळंकार । भूषणादि । बृहस्पतिवारिं करावि ॥ छ ॥

स्त्रीगीतशैय्यामणिरत्नगंध-
वस्त्रोत्सवाळंकारणादिकर्म ॥
भूपण्यगोकोशकृषिक्रिया श्च
सिद्धिंति शुक्रस्य दिने समस्ता ॥ ७ ॥

---

१३७ आकरधातु = अगराधातु = खाणीतील धातू. १३८ पाषा + णादि = पाषाणादि. हीं पदें व्यस्त निरर्थक केलीं आहेत. असा निरर्थक विग्रह करण्याची लेखकाला संवय सडकून आहे.

टिका ॥ सौसुं[139]ता गीत । नृत्य । वादित्र । सत्त्व ।
शयन । मणि पद्मरागादिं । रत्न । मुक्तकादि ।
चंदन । वस्त्र । उत्सव मंगळ । अळंकी[140]रण । भूकर्म ।
पण्य । हाटवटिया । क्रयविक्रय । गौकर्म । भांडार ।
कृषि । यें[141] आदि करुनु शुक्रवारिं सिद्धिते पावे[142] ॥ छ्रू ॥

लोहाश्मसीसत्रपुशस्त्रदास
पापानृतास्तेयविषासवाद्यं ॥
गृहप्रवेशद्विपबंधदिक्षा
स्थिरं च कर्मार्किसुतेह्नि कुर्यात् ॥ ८ ॥

टिका ॥ लोहकर्म । पाषाण । सीसें । पीतळ । शस्त्रकर्म ।
दासदासी । पाप । लटकें क्रूरकर्म । विषकर्म । माद्य ।
महारंभप्रवेशु । हस्तीसी शंखळीं[143] । दीक्षा । स्थिर-
कर्मादि शनीश्वरदीनी करावि । छ्रू ॥

रवि स्थिरः शीतकर श्वर श्च
महीज उग्रः शशिज श्च मिश्रः ॥
लघुः सुरेज्यो भृगुजो मृदु श्च
शनी श्च तीक्ष्णः कथितो मुनिंद्रैः ॥ ९ ॥

टिका ॥ रवि स्थिरु । चंद्रु चरु । मंगलु उग्र ।
बुध मिश्रु । बृह लघु । शुक्र मृदु । शनी तीक्ष्ण ।
स्वभा[144]वसारिखें कार्य करावि ॥ छ्रू ॥

रवि स्तापं कांतिं वितरति शशि भूमितनयो
मृतिं लक्ष्मिं चांद्रिं सुरपतिगुरु र्वित्तहरणं ॥
विपत्यः दैत्यानां गुरु रखिळभोगानुभवं
नृणां तैलाभ्यंगा त्सपदि कुरुते सूर्यतनयः ॥ १० ॥

टिका ॥ आदि(त्य)वारिं तैलाभ्यंग करिजे तरि संतापु
ज्वरु उपजे ॥ सोमवारिं कांतिसी ज्वलना होय ।

---

१३९ अनेकवचन नपुंसक. १४० करण बद्दल कारण लिहितो. १४१ इयें=यें =हीं. १४२ यें आदि करुनु कर्म सिद्धितें पावे. क्रियापद एकवचनी. तेव्हां कर्म हा शब्द कर्ता अध्याहृत समजणें भाग आहे. १४३ शृंखला = शंखळा, शंकळा, १४४ समास. अनेकवचन.

मंगळे मृत्युः । बुधे लक्ष्मि । गुरु द्रुव्यनाशु ।
शुक्रे अपत्यै[145] । शनीश्वरे पुल्या तैलाभ्यंगा स्तव
वेगोपित्तर[146] सकळभोगप्राप्ति ॥ ९ ॥

नापो रवौ कांतिमाति श्च चंद्रे
मृत्युः कुजे सोमसुते च लक्ष्मि ॥
रोगं गुरौ निर्द्धनता च शुक्रे
सर्वार्थसिद्धि भर्वतीति मंदे ॥ ११ ॥
नार्कारवारें न च संक्रमे च
न वैधृते न व्यक्तिपातयोगे ॥
न पक्षमध्ये न च विष्टिपष्टो
अभ्यंग इष्टो न च पर्वसूकः ॥ १२ ॥

टिका ॥ रवि मंगळवारु संक्रांति[147] । व्यतिपातु ।
अष्टमी । सठि । इतुकां दिसि अभ्यंगु न
करावा ॥ आणिक सोमपर्व । सूर्यपर्व । पितराद्दिवासिं
॥ ९ ॥

भानु र्मासं क्षपयति तथा सप्त मार्त्तंडसूनुः
भौम श्चाष्टौ वितरति शुभं बोधनः पंचमासान् ॥
सप्तेवेंदु र्दश सुरगुरुः शुक्र एकादशेति
प्राहु र्गगप्रभृतिमुनयः क्षुरकार्येष नूनं ॥ १२ ॥

टिका ॥ आ(दि)त्यवारिं क्षौर कीजे नर मासु १
[148]अ१युष्य तूटे ॥ शनीश्वरु मास ७ तुटे ।
मंगळे मासु ८ तुटति बुधवारि क्षौर कीजे
तर मास ५ आयुष्य वाढे ॥ चंद्रें मास ७
वाढे ॥ बृहस्पति मास १० वाढे । शुक्रे मास
१२ ॥ वाढे ॥ ऐसे[149] गर्गादि रिषि बोलति ॥ ९ ॥

---

१४५ आपत्ति, विपत्ति. १४६ शब्दाचा अर्थ लागत नाहीं. १४७ संक्रांति यां शब्दाचा उच्चार संक्रात केला आहे. सध्यां अशिष्ट लोक सक्रात असा उच्चार करतात. १४८ येथें एकाचा आंकडा व्यर्थ पडला आहे. १४९ एतादृशं अपि=आइसें हि=ऐसें इं=ऐसीं. ऐसें निसळें व ऐसे मिराळें. तन्हि, तरि मिसळें व तन्हें निराळें. तन्हें हा शब्द ज्ञानेश्वरींत येतो.

विद्यारंभः सुरगुरुशितज्ञेष्वभिष्टार्थदाई
कर्त्तु श्चायु श्चिरमपि च करोत्यंशुमान्मध्यमोत्र।
निद्वाशो भवति जडता पंचता भूमिपुत्रे
छायासूना वपि च मुनय कीर्त्ययंत्येवमाद्या ॥ १३ ॥

टीका ॥ बुध हस्पति शुक्र इहिं वारिं विद्यारंभू कीजे । तरि अभिळषित मनोरथ पुरे ॥ आयुष्य वाढे । आदित्यु मध्यम चद्रु । जडत्व मूर्षत्व मंगळे मृत्यु । शानिवारि मृत्यु होए । ऐसें आदि- मुनिश्वर बोलति ॥ ९६ ॥

मनीषीणो द्वप्रहराद्वितियाद
आरभ्य सर्वेष्वपि मंगळेषु ॥
भौमोशनः सूर्यबुधार्कचंद्र—
सूरेज्यवारेषु विवर्जयति ॥ १४

टीका ॥ सर्वमंगळकार्यासि जाणते लोक तिहिं दुसरेया अर्द्धपाहाराचा पासौनी अर्द्धयामु जाणावे ॥ मंगळवारि अर्द्धप्रहरु २ शुक्रवारि ३ आदित्य ४ बुध ५ शनि ६ चंद्र ७ बृहस्पति ८ ॥ येणे अनुक्रमे वर्जावे ॥

मन्वर्कदिग्वस्वतवेदपक्षै
रर्का न्मुहुर्त्तैः कुळिका भवंति ॥
दिवा निरेकै स्थ यामिनिषु
ते गर्हिता कर्मसु शोभनेषु ॥ १५ ॥

टीका ॥ आदिवारि[१५०] १४ मुहुर्त्ति कुळिकु होए ॥ सोमवारिं १२ मंगळवारिं १० बुधवारिं ८ गुरु ६ शुक्र ४ शनि २ मूहुर्त्ति कुळिकु होए । दिवसाचें जाणावें ॥ एया मध्यें मूहुर्त्ते उणें कीजे तें रात्रिचें जाणावे । हे समस्ता शु(भ)कार्यासि वर्जावें १३ मूहुर्त्तां उपरि

---

१५० हा लेखक त्य बहुधा गाळतो. किंवा खुद्द ग्रंथकार जो श्रीपति नो तर आदित्यवाराला आदिवार म्हणजे पहिला वार म्हणत नसेल ?

मुहुर्त्त १ तो आदित्यवारिं कुळिकु जाणावे
एणें क्रमें जाणावे ॥ छ ॥

वारप्रवर्त्ति मुनयो वदंति
सूर्योदया द्रावणराजधान्यं ॥
उर्द्ध तथाधोध परत्र तस्मा
श्चराद्धदेशांतरनाडिकाभि ॥ १६ ॥

टिका ॥ वारप्रवृत्ति सूर्योदया उपरि सर्वकाळ
लंकेसि होए । लंका म्हणता जेतुकी मध्यरेषा
ते गृहगणतिं जाणावें ॥ आणिक देसि चराद्ध
देशांत्तराचिया घटिका प्रमाणें सूर्योदया आदिकां
पाठि जाणावि ॥ छ ॥

चरार्द्धदेशांतरयो वियोगो
योगोथ पानियपळै श्च सम्यक् ॥
सूर्योदयादूर्ध्वमृगे घने धो
वारप्रवर्त्ति मुनयो वदंति ॥ १७ ॥

टिका ॥ चरार्द्ध । आणिक देशातर इयाचा योग,
मेळवणें ॥ वियोग फेडनें । ते चि दक्षिणायनि
फेडणे ॥ उत्तरायणी मेळवणें ॥ ऐसें करिता
जिए येति पानिवलि[१५१] तेहि पानवालिं तेहिं
पानिवळा करुनि वारप्रवार्त्ति जरि
[१५२]सूर्योसी जरि रुण अंतरि सूर्योदया उपरि
जरि घन असे । तरि आदिवारप्रवर्त्ति जाणावि ।
[१५३]ऐसें ऋषिश्वर बोलति ॥ छ ॥

वारे ग्रहस्योपचयावहस्य
कार्यं यथोदिष्टमुपैति सिद्धिं ॥
भवेत्तदेवापचयाप्रदस्य
प्रयत्नतो निर्मितमप्यसाध्यं ॥ १८ ॥

---

१५१ पानीयपल=पानिवल, पानिवळ, पानवल. पानवलीं म्हणजे पाण्याची पळें. पंचांगांत मोजलेली पळें. १५२ सूर्यो या शब्दाची चतुर्थी. १५३ ऐ अक्षर.

टीका ॥ जेया वाराचिं कार्यें साधितालिं[१५४] तियें जरि ग्रहो असे । उच्चिचा असे ॥ सबलु काहि उपद्रो नाहिं । तर होनि ग्रहो अस्तंगतु ॥ निचस्तु ॥ निर्बलु । तरि जिए कार्यें बोलिलि ॥ ते[१५५] प्रयत्नु केलेया असाध्यं ॥ छ ॥

सोमसौम्यगुरुशुक्रवासरा
सर्वकर्मसू भवंति सि(द्धि)दा ॥
भानुभौमशनिवासरेषु च
प्रोक्त मेव षलु कर्म सिद्ध्यति ॥ १९ ॥

टिका ॥ सोमु । बुध । गुरु । शुक्र ४ हे वार सर्व कार्यासि साधक ॥ रवि मंगळ शनि । हे तिन्हि वार जें बोलिलिं कार्यें तियें चि सिद्धिं पावति ॥ आणिक न पर्वति ॥ छ ॥

शस्तो हि लाक्षारसरंजनेर्को
मांजिष्टकौसुंभकरागयो श्च ॥
महीसुतः कांचनभूषणेषु
पतंगसूनः षलु लोहकृत्ये ॥ २० ॥

टिका ॥ लाक्षा मांजिष्ट । कौसुंभ । रताजन आदित्यवारिं ॥ सुवर्णालंकार ॥ मंगळवारिं ॥ शनिवारि लोहकर्म ॥ छ ॥

शीर्णं रवौ शततमंबुभि रार्द्र मिंदौ
भौमे शुचे बुधदिने च भवे धनाय ॥
ज्ञानाय मंत्रिण भृगौ प्रियसंगमाय
मंदे मळाय च नवांबरधारिण स्यात् ॥ २१ ॥

टीका ॥ नविं वस्त्रें आदित्यवारिं नेसिजे तरि वेगा जीर्णें होएति फाटेति सोमे उदकें उलिं असे(ति) निरंतर । मंगळे शोषु सांघे । बुधे धनप्राप्ति ॥ गुरु ज्ञानप्राप्ति ॥ शुक्रे प्रियासि मेळने होए शनिवारि मलिने होए ॥ छ ॥

---

१५४ सा वर अनुनासिक हवा. १५५ अनेकवचन. तियें ऐवजीं ते.

वारप्रवर्त्तिघटिका द्विनिघ्नाः
काळाख्यः होराः पतयः शरांशाः ॥
दिनाधिपाद्या रविशुक्रसौम्य--
शशांकसौरेज्यकुजा क्रमेण ॥ २२ ॥

टीका ॥ वा(र)प्रवर्त्ति पासौनु जिया भरलिया
घटिका तिया २ गुणाविया मग ५ भागु
देयावा जें लब्ध यें तो काळ होरा पुण्यु
दिनु वार मंग । रवि । शुक्र । बुध । चंद्र ।
शनि ॥ गुरु । भौम । येणें अनुक्रमें ॥ छ्रं ॥

यस्य ग्रहस्य वारेपि किंचित्कर्म प्रकीर्तितं ॥
तत्तस्य काळहोरायां सर्वमेव विधीयते ॥ २३ ॥

टीका ॥ जें ग्रहाचा वारिं ॥ जें कार्ये साधितलिं
ते अवघी तेयाचियें काळ होरा करावे : ते
सिद्धितें पावति ॥ छ्रं ॥

इति श्रीपतिविरचितायां ज्योतिषरत्नमा-
ळायां वारप्रकर्णं ॥ तृतीयं ॥ छ्रं ॥



क्रमशो भवंति योगा विष्कंभः प्रीत रूर्पागे चायुष्मान् ॥
सौभाग्यशोभनाख्या वतिगंड स्त्वथ सुकर्मा च ॥ १ ॥
वैधृतिशुळगंडवृद्धिधृवनामानो भवंत्यथान्ये च ॥
व्याघातहर्षणाख्या वथ वज्रं सिधि र्व्यतीपातः ॥ २ ॥
तदनु वरियान् परिघः शिवसिद्धो साध्यः शुभः शुक्ला ॥
ब्रह्मेंद्रो वैधृतिनामा समानें फळं कुर्युः ॥ ३ ॥

टिका ॥ क्रमें चि योग जाणावे : ॥ विष्कंभ १ प्रीति २
आयुष्मान् ३ सौभाग्य ४ शोभन ५ अतिगंड ६ सुकर्मा ७
धृति ८ शूळ ९ गंड १० वृद्धि ११ धृव १२ व्याघात १३

---

१५६ हें फुलपांखरूं ऊर्फ पतंग याचें चित्र आहे. पतंग म्हणजे सूर्य व पतंग म्हणजे फुलपांखरूं असे दोन अर्थ मराठींत पतंग ह्या शब्दाचे होत असल्या-मुळें, पतंगाचें चित्र काढून सूर्याचें व सूर्यमालिकेचें स्मरण पहाणाऱ्याला करून देण्याचा हेतु लेखकाचा किंवा मूळ ग्रंथकाराचा असावा.

हर्षण १४ वज्र १५ सिद्धि १६ व्यतिपातु १७
वर्यान् १८ परिघ १९ शिव २० सिद्धि २१ साध्य २२
शुभ २३ शुक्ल २४ ब्रह्मा २५ ऐंद्र २६ वैधृति २७ ॥
एवं योग १७ नावां साग्विं फळें ॥ छ ॥

विरुद्धसंज्ञा इह यैव योगा
स्तेषा मनिष्टः षष्ठु पाद आद्यं ॥
सवैधृति स्तु र्व्यतिपातनामा
सर्वोप्यनिष्टः परिघस्य चार्द्धं ॥ ४ ॥

टिका ॥ योगा मध्यें जे विरुद्ध योग तेयाचा
पहिला चरणु वोषटा वैधृति । व्यतिपातु । अवघे
वोषटे । परिघाचे पूर्वार्द्ध निषिद्ध : ॥ छ ॥

तिस्र स्तु येगे प्रथमे च वज्रे
व्याघातसंज्ञेन तु पंचशूळे ॥
गंडेतिगंडे च षडे च नाद्यः
शुभेषु कार्येषु विवर्जयंति ॥ ५ ॥

अर्थ : ॥ विष्कंभाच्या प्रथमघटिका ३ वज्रवाघात
९ शूळ ५ गंड ६ अतिगंड ६ एया योगाच्या
प्रथमघटिका । या शुभकार्या वर्जाव्या ॥ छ ॥

व्याघातशूळपरिघव्यतिपातपूर्व—
गंडातगंडकुळिसेषू सवैधृतेषू ॥
आदित्यचांद्रपितृसार्पभदस्तमूळ—
मैत्राष्यतिष्यसूरवर्द्धकिभानि मूर्द्धनि ॥ ६ ॥

टिका ॥ एका योगाचा माथा ये नक्षत्रें देउनि
चक्र गणावें ॥ व्याघात पुनर्वसु ॥ शूळ मृगु ॥
परिघीं मघा ॥ व्यतिपा अश्लेषा ॥ विष्कंभ
अश्विनी ॥ गंडि मूळ ॥ अतिगंडीं आनुराधा ॥
वाजि पुष्यु ॥ वैधृति चित्रा ॥ ऐंणें अनुक्रमें ॥ छ ॥

एका मूर्द्धि गता त्रयोदश तथा तिर्यक् स्थिता स्थापयेद्
रेषाचक्रमिदं बुधैरभिहितं षार्ज्जूरिकं तत्र तु ॥
व्याघातादिषु मूर्द्धि भं च कथितं दस्वेकरेषास्थयो
सूर्याचंद्रमसो र्मिथो निगदितो दृक्पात एकार्गला ॥ ७ ॥

टीका ॥ एकि रेषा उभी ॥ आडवीया तेरा ॥ एसें -
षार्जूरि चक्र होए ॥ मग व्याघातादि नक्षत्रें सांधितलिं ॥
तिये योग तयाचें ॥ नक्षत्र ऊर्द्ध रेषा
देउनि गणावें ॥ चंद्रसूर्य एके रेपे पडति तियाचें
दृष्टि पासौनि ॥ एकार्गलु उपजे ॥ तो शुभकार्यासि
विरुद्ध ॥ छ ॥

दिनकरहिमरश्मे दृष्टिसंपातजन्मा
भवति विकृतमूर्त्ति कोपि रुद्रो मनुष्यः ॥
पतति भुवनमध्ये मंगलानां विनिष्टे
ज्वलनकपिलदृष्ट्या निर्द्दहंत्या जगंति ॥ ८ ॥

अर्थ : ॥ चंद्रसूर्यांचिये दृष्टि पासौनु कव्हणिएकु
पुरुष उपजे भायानकमूर्त्ति अतिरौद्र मग त्रिभुवना मध्यें पडे मंगळासि ॥
न्यसावियासि ॥ जलता अग्नि सारिखि दृष्टि तियाचि त्रिजगति
ते जाळि तो एकार्गलु म्हणिजे ॥ छ ॥
इति श्रीपतिविरचितायां ज्योतिशरत्नमाळायां
योगप्रकर्णं ॥ चतुर्थं ॥ ॥ छ ॥

बवाव्हयं बालवकौलवाख्ये
ततो भवेत्तैतिळनामध्येयं ॥
गराभिधानं वणिजं च विष्टि
रित्याहु गर्या करणानि सप्त ॥ २ ॥

टिका ॥ बव १ बाळव २ कौळव ३ तैतिळ ४
गर ५ वणिज ६ विष्टिभद्रा । ७ ॥ ये करणें
७ आचार्य बोलिले ॥ छ ॥

चतुर्दशी या शशिन प्रहिणा
तस्या विभागे शकुनि र्द्वितीये ॥
दर्शार्द्धयो स्तच्चतुरंघ्रिनागे
किंस्तुघ्न मावे प्रतिपद्दले च ॥ २ ॥

अर्थ : जेया चतुर्दशीं चंद्रु क्षीणु होए । तेया
दुसरा विभागि शकुन कण होय । आमावास्येच्ये
प्रथमदळि चतुष्पद । द्वितीयदळी नाग । प्रतिपदा-
च्ये प्रथमदाळि किंस्तुघ्न होए । इये करणे च्यारि
४ स्थिरें ॥ छ ॥

इंद्रो ब्रह्मा मित्रमभ्मार्यमाभू
श्रिः किनाश श्चेति तिथ्यार्द्धनाथा ॥
कन्युक्षाण्यो मर्पवायू तथैव
ये चत्वार स्ते स्थिराणां चतुर्णां ॥ ३ ॥

टीका ॥ बवासि इंद्र स्वामि । बाळवासि ब्रह्मा । कौळवासि मित्र सूर्य । तैतिळासि अर्यमासूर्य । गरासि वसूधा । वणिजासि लक्ष्मि । भद्रेसि यमु देवता शकुनि कळि । चतुष्पदासि वृषभु नागासि सर्प । किंस्तुघ्नासि वायु । हे करणाधि- पत्य जाणावे ॥ छ ॥

पौष्टिकस्थिरशुभानि बवाख्ये
बाळवे द्विजहितान्यपि धर्म ॥
कौळवे प्रमदमित्रविधानं
तैतिळे शुभहितान्यपि कर्म ॥ ४ ॥

टीका ॥ शांतिके पौष्टिकें । स्थिर कर्म । मंगळ- कार्ये । इतुकिं करावि बवावरिं ॥ ब्रह्मकृत्य ब्रह्मचार्य । यज्ञव्रत । दान अध्ययन जाप्य । धर्मकार्ये । इतुकीं बाळवी करावि कौळवें प्रमद । मित्रवैधानं । खि कौळवें कार्यें ॥ सुरतसंभोग वेश्यकर्म ॥ मित्रकार्य । संधान ॥ इतुकीं करावि ॥ तैतिळीं मंगळकार्यें । गृहारंभु । सेवा । इतुकी कार्यें करावि ॥ छ ॥
१५७ वि पाहिजे.

गरे च बिजाश्रयकर्षणानि
वाणिज्यपस्थैर्यवणिक्रिया श्च ॥
न सिद्धि मायाति कृतं च विष्टया
विषाय घातादिषु तत्र सिद्धि ॥ ५ ॥

अर्थ : ॥ गरें करणें बिजें । साठवावि बाहि करावि ॥ क्षेत्रें ॥ व्यापार । अवघें करावें ॥ वणिजीं ॥ वणिज करावें ॥ स्थिर कार्यें ॥ हाट हाटवघ उभाराव्या ॥ पसारे घालावे ॥

भद्रेसि शुभकार्ये सिद्धि न पवे ॥ विषप्रयोग ।
शविया शत्रुघातु । उग्रें कार्यें सिद्धि पावाति
॥ ६ ॥

मंत्रौशधानि शकुनौ च सपौष्टिकानि
गोविप्रराज्यपितृकर्म चतुष्पदेषु ॥
सौभाग्यदारुणहृति धृवकर्म नागे
किंस्तुघ्ननाम्नि शुभपौष्टिकमंगळानि ॥ ६ ॥

अर्थ : ॥ मंत्रसाधन । उषधकर्म । शांतिक ॥ पौष्टिक ॥
आचारु ॥ इतुकीं शकुनी करावि ॥ नागकरणी ॥
गाइची कार्यें ॥ ब्राह्मकृत्य ॥ दारुणें तिषढें हरावीं ॥
सर्प धरावे ॥ स्थावर ॥ प्रवेशादि ॥ क एतुकीं
कार्यें किंस्तुघ्नी करावि ॥ ६ ॥

नाडय स्तु पंच वदनं गळक स्तथैका
वक्षो दशैकसहितौ नियतं चतस्रं ॥
नाभिः कटिः षडतउछलता च तिस्रो
विष्टें बंधे रभिहितौ गतिभाग एषा ॥ ७ ॥

अर्थ : ॥ अवघ्या भद्राच्या घटिका ३० तेयाचा अंग-
विभागिं घटिका ५ तें मुषा गळां घटिका १ व-
क्षस्थळि ११ नाभि ४ कटि ६ पुछ ३ घटिका ३०
हा भद्रेचा अंगविभागु ॥ ६ ॥

मुषे कार्यध्वस्ति र्भवति मरणं चाथ गळके
धनध्वास्ति र्वक्षस्थळकटितटे बुद्धिविलयः ॥
कलि र्नाभिदेशे विजय मथ पुछे च जगदुः
शरिरे भद्राया पृथुगिनि फळं पूर्वमुनयः ॥ ८ ॥

टीका ॥ मूषि कार्यनाशू ॥ गळां मरणं ॥ वक्षस्थाळि
धनहानि ॥ कटिप्रदेशू बुद्धिनाशु ॥ नाभि कळी ॥
पुढी वीजयो ॥ एसें भद्राशरिराचें फळ ऐसे
मुनि बोलति ॥ ६ ॥

उद्धद्रौध्रतरपिंडिकातिरुष्णा
दंष्ट्रोग्रा पृथहनुगंडदीर्घनासा ॥

कार्याग्नि हुतवहलक्ष मुद्गिरंति
विश्रांतःपतति समंततो त्र विष्टिः ॥ ९ ॥

टीका ॥ सिद्धा मोटिया मासळा पिंडिका जाधा
अतिसेन कृष्ण कर्म । भिनाजन येसि उग्रा
दाढा ॥ तिखटा दिर्घ हणु ॥ आदि कपोळें
मा कार्यसहस्रातें नाशिंत लक्षु एकु १
अग्निज्वाळा ॥ मुखें उगलिं तियेसिं सर्वत्र
लोकाचें पडे ॥ छ ॥

मनुवसुमुनितिथियुगदशशिवगुणसंख्यासु तिथि-पूर्वस्या ॥
आयातु विष्टिरेपा पृष्ठे शुभदा परत स्त्वशुभा ॥ १० ॥

टिका ॥ पूर्वे गमन १४ भद्रेचें आग्ने ८ दक्षिणे ७
नैऋत्ये १५ पश्चिमे ४ वायव्ये भद्रेचे गमन १०
उत्तरे ११ ईशान्ये ३ भद्रेचे अंग ॥ असान ॥
पाठि ॥ शुभ पुछे ॥ अशुभ यात्राप्रवेशा संग्रामीं
जाणावीं ॥ छ ॥

जळशिखिशशिशरक्षाः सर्वकिंनाशधाय
त्रिदशर्पातकक्रुष्सु प्रोक्त मास्यं हि विष्टेः ॥
नियत मृषिभि राशासंख्ययामें क्रमेण
स्फुट मिह परिहार्यं मंगळेष्ठे तदेवा ॥ ११ ॥

टिका ॥ पश्चिमे चतुर्दशी भद्रा-मुष प्रहरिं ५
अग्ने अष्टमी प्रहरी २ सप्तमी उत्तरे ॥ प्रहरिं ७
भद्रा-मुषि ॥ ध्रुवु नैऋत्य ४ पाहारि चौथिस
ईशान्ये ८ पाहरिं दशमीं दक्षिणे पाहा ३ ।
एकादशी वायव्ये प्रहरिं ६ पूर्व तिजे प्रहरि १ ॥
भद्रामुष हें मंगळकार्यासि वर्जावी ॥ छ ॥

मंत्रौषधानी शकुनौ च सपुष्टिकानि
गोविप्रराज्यपितृकर्म चतुष्पदेषु ॥
सौभाग्यदारुणहृतिधृवकर्म नागे
किंस्तुघ्निनाम्नि शुभपौष्टिकमंगळानि ॥ १२ ॥
दैत्येंद्रे समरेमरेषु विजितेष्विशं कुधो दृष्टवान्
स्वां कार्ये किळ निर्गता परमुषि लाङ्गूलिनि च त्रिपाद ॥

विष्टि सप्तभुजमृगेंद्रगळका क्षामोदरि प्रेतगा
दैत्यघ्नि मुदितैः सूरे स्तु करणां प्रांतेन युक्ता सदा ॥ १३

टीका । पूर्वि समरंगणि दैत्यें देव जितले ॥ मग ईश्वरा जवलि आलि ॥ तेव्हळिं श्रीशंभु कोपला रेषे आपळा शरिरु । पाहिला तेथौनु ॥ भद्रा जन्मलि ॥ गाढवाचे ऐसें मुष विस्तीर्ण पुंसा तिन्हि पाए ॥ (सा)त भुजा : ॥ सिंहा चा सारिषा गळा । पांदि केंसा सरस पाठि पोट एकत्र ॥ असे प्रेता समान ॥ मग अशेष दैत्य ॥ मारिले तेव्हळि : देव तोषले : ॥ मग करणाचा अंति स्थापिलि अचळ पद दिधलें : तें भद्रा म्हणिपे ॥ छ्रीं ॥

इति श्रीपतिविरचितायां ज्योतिशरत्नमाळायां करणप्रकर्ण ॥ पंचमं ॥

मेशादस्त्रयमाग्निधातृशशिनः शर्वादितिः धीकपतिः
कद्रुजा पितरो भगोर्यमरविस्त्वाष्ट्राव्हया मारुतः ॥
शक्राग्नि त्वथ मित्रइंद्राननऋतां स्तोय च विश्वे विधिः
गोविंदो वसवांबुपाजचरणाहिर्बुध्न्यपषाभिधा ॥ १ ॥

टिका ॥ नक्षत्राचे देवत अनुक्रमे जाणारे : ॥ अश्विनी देवता अश्विनीसी यम भरणीसी । अग्नि कृत्तिकासि ब्रह्मा रोहिणीसी चंद्र । मृगासि ईश्वरु आर्द्रासी अदित्य । पुनर्वसुसी गरु । पुष्यासि सर्प । अश्लेषासी पितर मघासी भग पूर्वाफाल्गुनीसी अर्यमा उत्तराफाल्गुनीसी रवि हस्तसी विश्वकर्मा चित्रांसी वायु स्वातिसी अग्नि विशाषासी मित्र अनुराधासी इंद्र ज्येष्ठासी नैऋति मूळासि उदक पूर्वाषाढासी विश्वेदेवा उत्तराषाढासी ब्रह्मा अभिजितासि विष्णु श्रवणासी वसु । धनिष्ठासी वरुण । शततारकासी अजाचरण पूर्वाभाद्रपदासी अहिर्बुध्न्य ॥ उत्त(रा)भाद्रपदासी पुष रेवतिसी एसे हे अधिपत्य नक्षत्राचे जाणावे ॥ छ्रीं ॥

अश्वेभाजफणिद्वयं श्व वृषकुमेषो तवो मषक ॥
चापु गौ क्रमश स्ततोपि मार्जार व्याघ्रः स्ततः सैरिभः ॥

व्याघ्रेणो मृगमंडलो कपि रथो बभ्रुद्वयं वानरः
सिंहोश्वो मृगराट् पशु श्व किरिटि योनि स्तु भानामियं ॥ २ ॥

टीका ॥ अश्वीनी पासोनि अनुक्रमे चि योनि जाणाव्या ॥
अश्विनी अश्व ॥ भरणी हस्ती ॥ कृत्तिका बोकडा ॥ रोहिणी
सर्प ॥ मृग सर्प ॥ अद्रा श्वान । पुनर्वसु माज(र) ।
पुष्य मेढा ॥ अश्लेषा माजर ॥ मघा उंदिरु ॥ पूर्वा
उंदिरु ॥ उत्तरा गाइ ॥ हस्त म्हेसी ॥ चित्रा व्याघ्र ॥
स्वाति म्हेसि ॥ विषाषा व्याघ्र अनुराधा हरण ॥
ज्येष्ठा मृग ॥ मूळ सुनें ॥ पूर्वाषाढा वानर ॥ उत्तरा-
षाढा मुंगस ॥ अभिजित अलु ॥ श्रवण वानर ॥
धनिष्टा सीहु ॥ शततारका अश्व ॥ पूर्वाभाद्रपदा सीहु ॥
उत्तराभाद्रपदा गाए रेवात हस्ती ॥ एवं नक्षत्रयोनि
॥ छ ॥

गोव्याघ्रं गजसींह मश्वमहिषं श्वेण च बभ्रुरगं
वैरं वानरमेषकं च सुमहत्तद्वद्विडालादुरं ॥
लोकानां व्यवहारतोन्यदपि चा ज्ञात्वा प्रयत्नादिदं
दंपत्यो र्नृपभृत्ययो रपि सदा वर्ज्य शुभस्यार्थिभिः ॥ ३॥

टीका ॥ गाईवाघासि वैर ॥ घाडया म्हैसि वैर सुणिया
हरिणां वैर ॥ मुंगसासीसर्पासी वैर ॥ वानेरमेढा वैर ॥
उंदिरासी माजर ॥ ये योगानि वैर वधुवरासि
राजेयासि सेवकासि वर्जावि ॥ प्रत्यत्नें अणिक हि
लोकव्यवहारा स्तव काहि होए ॥ ते चिंताव ॥ छ ॥

मूळाग्नेयमघाद्विदेवभरणी सार्पाणि पूर्वात्रयं
ज्योतिर्विद्भि रधोमुखं हि नवकं भानामिदं कीर्त्तितं ॥
वापीकूपतडागगर्त्तपरिखाखातो निधे स्धृति
क्षेपोद्यूतबलिप्रवेशगणिताऽंभाः प्रसिध्यन्ति च ॥ ४ ॥

टीका ॥ मूळ १ कृतिका २ मघा ३ विषाषा ४ भरणी ५
अश्लेषा ॥ पूर्वा ३ ये वक्षत्रे ९ अधोमुखे ज्योतिषी
मागितलि ॥ ईहि नक्षत्री वापि ॥ कूप तळि ॥
अगड ॥ पेवें ॥ षात ॥ षणावि निधि
काढाविया गाडावि रोवावि ॥ द्यूत जुंवि (प्र)वेशु

करावा ॥ गणितारंभु एतुकिं सिंद्धि पावति
॥ छ ॥

ज्येष्टादित्यकराश्विनीमृगशिरःपौष्णानुराधानिळ
त्वष्टाष्यानि वदंति भानि मुनय स्तिर्यङ्मुषान्येषु च ॥
अश्वेभोष्ट्रलुलायरासभवृषोरश्रादिदांति श्च तै
गंत्रीयंत्रहळप्रवाहगणितारंभा प्रसिध्यंति च ॥ ५ ॥

अर्थ : ॥ ज्येष्टा । पुनर्वसु । हस्तु । अश्विनी मृग ।
रेवति ॥ अनुराधा ॥ स्वाति ॥ चित्रा एवं नक्षत्रें
९ तिर्यङ्मुषें ॥ इहिं नक्षत्री ॥ अश्व । गज । कन्हीं ।
म्हैसी । गधर्भे । बैल । येटिके । कयांसि पलाणे
घालविं ॥ नांव साधावि ॥ गाडे यंत्रे ॥ गायनयत्रे ॥
विणादि ॥ नांगरा वषरा ॥ क्षेत्र ॥ यंत्रे यात्रा ॥
आदि करुनु करातिं ॥ छ ॥

पुष्यार्द्रा—श्रवणोत्तरा—शतभिषक—ब्राह्मश्रविष्टाव्हया-
न्यूर्द्ध्वाष्यानि नवोदितानि मुनिभि द्विष्टयान्यथेतेषु तु ॥
प्रासादाध्वजधर्मवाणगृहप्राकारमनोरण-
छायारामविधे हितो नरपतेः पट्टाभिषेकादि च ॥ ६ ॥

टीका ॥ पुष्य ॥ आर्द्रा ॥ श्रवण ॥ उत्तरा ३ शततारका ॥
रोहिणी ॥ धनिष्टा ॥ एव नक्षत्रें ९ उर्द्ध्वमुषे ॥
इहिं नक्षत्री देउळं ॥ ध्वजा । स्तंभ । छत्रें ।
घरें ॥ पोवळि ॥ चरीया ॥ मंगळतोरणे ॥
उंची भूमिची कार्यें ॥ वृक्षवाटिका ॥ रायासि
पट्टाभिषेकु ॥ एतुकीं सिद्धि पावति ॥ छ ॥

रोहिणीसहित मुत्तरात्रयं
कीर्त्तयंति मुनयो ध्रुवाव्हयं ॥
बीजहर्म्यनगराभिषेचना-
रामशांतिकहितं स्थिरेषु च ॥ ७ ॥

टीका ॥ रोहिणी ॥ उत्तरा ३ इयें ४ ध्रुवें ॥
ग्रहारंभु करावा ॥ प्रवेशु नगरारंभ करावा ॥
अभिषेकु करावा ॥ वृक्ष ॥ राम शांतिक इतुकिं
स्थिरें कार्यें करावि ॥ छ ॥

त्वाष्ट्रमैत्रशशिपौष्णदैवना
मामनंत्य मुनयो मृदुन्यपि ॥
मित्रकार्यरतिभूषणांबरो
द्गिनमंगळविधान मेषु च ॥ ८ ॥

टीका ॥ चित्रा ॥ अनुराधा ॥ रेवती ॥ मृगु ॥
एवं नक्षत्रें ४ मृदुवे ॥ इहिं इतुकीं कार्यें
करावि ॥ मित्रकार्यें ॥ संधान सुरत ॥
अळंकार ॥ वस्त्रें ॥ गायन ॥ मंगळकार्यें
॥ छ ॥

आश्वीनीगुरुभमर्कदैवतं
साभिजिलघुचतुष्टयं मतं ॥
पण्यभूषणकळारतौषधं
ज्ञानशिल्पगमनेषु सिद्धिदं ॥ ९ ॥

टीका ॥ अश्वीनी ॥ पुष्य ॥ हस्तु ॥ अभिजिनु ॥
एवं नक्षत्रें ४ लघुवे ॥ इहिं पण्य ॥ क्रय ॥
विक्रय ॥ अळंकार ॥ रस ॥ औषध ॥
ज्ञानसाधन ॥ शिल्प ॥ यात्रा एतुकीं सीद्धि
पावति ॥ छ ॥

मूळशक्रशिवसर्पदैवता-
न्युग्रपंत्यथ च तीक्ष्णसंज्ञया ॥
भूतयक्षविधिमंत्रसाधन-
भेदबंधवधकर्म चात्र तु ॥ १० ॥

टीका ॥ मूळ ॥ ज्येष्टा ॥ अर्द्रा ॥ अश्लेषा ॥ एवं
नक्षत्रें ४ तीक्ष्णे ॥ इहि नक्षत्रिं भूत वें ॥
ताळ विधि ॥ मंत्र साधावे ॥ भेदु ॥ बंधन
वधु ॥ घातु ॥ तिक्ष्ण कार्यें करावि ॥ छ ॥

पूर्विकात्रितय मंत्यकं मघे-
त्युग्रपंचक मिदं जगु बुधा ॥
शाठ्यनाशविषघातबंधनो-
छेदशस्त्रदहनादिषु स्मृतं ॥ ११ ॥

अर्थ : ॥ पूर्वा ॥ ३ भरणी ॥ मघा ॥ एवं
नक्षत्रें ५ उग्रें इहि शाठ्य नाशु विष ॥ घातु ॥

बंधनं ॥ शत्रुसिं उच्चाटण ॥ आमि ॥ एतुकीं कार्यें करावि ॥ छ्रूं ॥

वैष्णवत्रययुतः पुनर्वसु
मरुतं च चरपंचकं त्विदं ॥
दंतिवाजिकरमोक्षवाहना-
रामयानाविधुषु प्रशम्यते ॥ १२ ॥

टीका ॥ श्रवणु ॥ धनिष्टा ॥ शततारका ॥ पुनर्वसु ॥ स्वाति ॥ एवं नक्षत्रें ५ चरे म्हणिजाति ॥ इहि हस्ति ॥ घोडें ॥ कन्हे ॥ बैल ॥ अदि करुनु ॥ पालाणिजाति ॥ आरव लाविजाति ॥ जाणता इतुकीं कार्यें करावि ॥ छ्रूं

हव्यवाहभयुतद्विदैवतं
मिश्रसंज्ञ मथ मिश्रकर्मसु ॥
स्वाभिधानस + + + + धने
कीर्तितानि सकलानि सूरिभि ॥ ११ ॥

अर्थः ॥ कृत्तिका ॥ विषाषा ॥ एवं नक्षत्रें २ मिश्रे इहिं मिश्र कार्यें करावें ॥ ऐसें आदि-रिषेश्वर बोलति एया अन्यथा नाहिं ॥ छ्रूं ॥

चरं चलं क्रूर मुशंति चोग्रं
ध्रुवं स्थिरं दारुणभं च तीक्ष्णं ॥
क्षिप्रं लघुकं मृदु मैत्रसंज्ञं
साधारणं मिश्र + + + + +

५ महाराष्ट्रांतील व्यवहारनिर्णयपद्धति
शके १४०० ते शके १७००

" कोणाचें वतन घेऊन यांस देतां येत नाहीं. कदाचित् बरजोबरी नजर देऊन दिल्हे. तरी कांहीं बहुत परंपरा चालणार नाहीं. करणें ते धर्मता

करावे लागते "–परगणे दंतागीर पाटण येथील सरशेटेपणाचा महजर. (ले. नंबर ७३)

(१) बदललेल्या परिस्थितीमुळें पूर्वकालीन परिचित अशा कित्येक शब्दांचे अर्थ आपणांस आज मितीस अगदीं अपरिचित झाले आहेत. अशा प्रकारच्या कित्येक शब्दांपैकीं व्यवहार हा एक शब्द आहे. हल्लीं हि व्यवहार हा शब्द प्रचारांत आहे. परंतु शके १८०० मध्यें जो अर्थ व्यक्त करण्याकरितां हा शब्द वापरला जात असे, त्या अर्थाचा बोध होण्याकरितां व्यवहार ह्या शब्दाची हल्लीं आपण योजना करीत नाहीं. यास्तव व्यवहार हा शब्द कोणता अर्थ व्यक्त करण्याकरितां मी आज योजीत आहे त्याचा आरंभीं च खुलासा करणे जरूर आहे. मनुस्मृतीचे आठवे अध्यायाचे प्रारंभीं जे श्लोक आहेत, त्यांत या शब्दाची व्याख्या व स्वरूप यांचें दिग्दर्शन केलेले आहे. ऋणदानादि अठरा विवादांमध्यें विरुद्ध अर्थ प्रतिपादन करणाऱ्या वादी व प्रतिवादी यांच्या वाक्यांपासून उत्पन्न होणाऱ्या संदेहास घालविणारा जो विचार त्यास च व्यवहार असे म्हणतात अशा विचारांमुळें प्रजेस आपसांतील विवादांच्या योगानें होणारी पीडा नाहींशी होत असते; यास्तव हा हि तिच्या रक्षणाचा उपाय आहे. ती ऋणदानादि कार्यें अठरा व्यवहारमार्गांमध्ये सांगितलेलीं आहेत. त्या अठरां मार्गांतील १ ऋणदान, २ निक्षेप, ३ जो स्वामी नव्हे अशा पुरुषानें वस्तूचा केलेला विक्रय, ४ सभूय-समुत्थान, ५ दिलेलें धन अपात्र बुद्धीनें किंवा क्रोधानें परत घेणें, ६ सेवकाचे वेतन न देणे, ७ केलेल्या संकेताचें उल्लंघन करणें, ८ विकत दिलेली किंवा घेतलेली वस्तु पसंत न पडल्यामुळें देणारास किंवा घेणारास पश्चात्ताप होऊन त्यामुळें उत्पन्न होणारा वाद, ९ स्वामी व पशुपाल यांच्यामधील पशूंविषयीं होणारा वाद, १० ग्रामादि सीमांचा वाद, ११ शिव्यागाळी देणे हें वाक्पारुष्य व ताडनादि दंडपारुष्य, १२ स्तेय (चोरी, दुसऱ्याचें धन घेऊन नाहीं म्हणणें), १३ साहस (बलात्कारानें धन ग्रहण करणें), १४ स्त्री व पुरुष यांच्या समागमापासून होणारा वाद, १५ स्त्रिया व पुरुष यांची धर्मामध्यें व्यवस्था, १६ पितृसंबंधी धनाचा विभाग, १७ द्यूतादि क्रीडांचे धर्म निश्चित करणें, १८ पक्षी व बकरे इत्यादि प्राण्यांची लढाई. अशी ही अठरा व्यवहारप्रवृत्तीची स्थानें आहेत. या अठरा मुख्य स्थानांचे १३२ पोट भेद आहेत. हल्लीं सिव्हिल आणि क्रिमिनल लॉ या शब्दांची जेवढी व्याप्ती आहे तेवढी व्याप्ती व्यवहार या शब्दानें त्या काळीं दर्शविली जात असे. व्यवहार हा शब्द आतां सांगितलेला अर्थ व व्याप्ती दर्शविण्याचें इराद्यानें आज मी योजिला असून या अर्थास अनुरूप अशा प्रकारचें विवेचन आज मी करणार आहे.

व्यवहार शब्दाची व्याख्या आणि व्याप्ति

शक १४०० ते १७०० चे दरम्यानचे कालांतील व्यवहाराबद्दल माहिती मिळण्याचीं साधनें

(२) शके १४०० ते शके १७०० चे दरम्यानचे कालांतील महाराष्ट्रांतील व्यवहारनिर्णयपद्धतीसंबंधी माहिती मुख्यत्वें करून मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या पंधराव्या खंडांत, इतिहाससंग्रह मासिक पुस्तकांत, व भारत-इतिहास-मंडलाचे अहवालांत प्रकाशित झालेल्या, व रा. राजवाडे, रा. देव यांचे संग्रहीं असलेल्या त्या च कालचे अप्रकाशित कागदपत्रांत आहे. ह्या सर्व कागदपत्रांचें साधारण स्वरूप दाखविणारा तक्ता या लेखास परिशिष्ट म्हणून जोडला आहे. मीं तयार केलेल्या परिशिष्टांत दाखल केलेलीं पत्रें सरासरीनें शके १४०० पासून शके १७०० चें दरम्यानचे कालांतील आहेत. श्री शहाजी राजे, श्री छत्रपति शिवाजी महाराज, श्री संभाजी, राजाराम, आणि शाहू महाराज इतक्या पुरुषांच्या कारकीर्दीचा अंतर्भाव ह्या काळांत होतो. ह्या काळाचे प्रारंभींचीं वर्षें मुसुलमानी रियासतींतील होतीं; ह्यावरून हें उघड आहे कीं, ह्या कालांतील कागदपत्रांचे निरीक्षणाचे आधारें जीं अनुमानें निघतील तीं मुसुलमानी व मराठी सत्ता अस्तित्वांत असणाऱ्या दोन्ही कालांस लागूं असणारीं अशीं आहेत (परिशिष्ट लेखांक नंबर क, ख, ग, व १). नरसोजी जगदळा व कऱ्हाडचा बाप्पाजी मुसुलमान व पिसळा यांचे मध्यें मसूरचे पाटिलकीबद्दल जे व्यवहार झाल्याचा उल्लेख ह्या लेखांत आहे ते व्यवहार विजापूरच्या इब्राईम आदिलशाहाचे कारकीर्दींत झालेले आहेत. (इब्राइम आदिल शाहाची कारकीर्द १५१२-१५४८). ह्या लेखांपैकीं खुद्द बादशहानें मसूरची पाटिलकी त्याचे मालकीची असल्याबद्दल, गोताचा, देशमुखदेशपांड्यांचा व परगण्याचा महजर करून आणण्याविषयीं नरसोजी जगदळ्यास सांगितल्याचा उल्लेख आहे. ह्यावरून गोत, देसक वगैरे सारख्या व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्था व त्यांची व्यवहारनिर्णय करण्याची पद्धती ह्यांचा तत्कालीन मुसुलमानी राज्यकर्त्यांनीं अंगिकार करून आपल्या राज्ययंत्रांत त्या दोहोंचा हि समावेश केला होता ही गोष्ट सिद्ध होते.

महत्वाच्या समाजसंबंधान व्यवहार उत्पन्न होतात

(३) व्यवहारपद्धतीसंबंधानें कांहीं निश्चित विधानें करण्याकरितां ज्या स्वरूपाचे कागदपत्र पाहिजेत, तशा स्वरूपाचे कागदपत्र उपलब्ध झाले आहेत ही मोठी समाधानाची गोष्ट आहे. कोणत्या हि देशांत जे व्यवहार उत्पन्न होतात, ते त्या देशांतील ज्या महत्वाच्या समाजसंस्था असतात, त्या संस्थांसंबंधीं, अगर त्या संस्थांचे जे चालक अगर घटक असतात त्यांसंबंधीं मुख्यत्वें करून उत्पन्न होतात. यास्तव शके १४०० पासून शके १७०० पावेतों महाराष्ट्रांतील व्यवहारनिर्णयपद्धतीसंबंधीं शक्य तितकीं बरोबर अनुमानें काढण्यास

तत्कालीन समाजांतील महत्वाच्या संस्थांच्या चालक अगर घटकांसंबंधीं उत्पन्न होणाऱ्या व्यवहारांचें निरीक्षिण करणें जरूर आहे.

(४) या दृष्टीनें विचार करितां तत्कालीन महाराष्ट्रसमाजांत महत्वाच्या संस्था कोणत्या होत्या, यांचा प्रथम शोध घेऊन नंतर त्यासंबंधीं कोण कोणते व्यवहार उत्पन्न झाले व त्यांचा निर्णय कोणत्या रीतीनें केला गेला हें पाहिलें पाहिजे. कोणत्या हि समाजांत स्थूलमानानें दोन कार्योकरितां संस्था निर्माण होतात. एकः समाजांतील व्यक्तींचें ऐहिक कल्याण साधण्याकरितां; दुसरें: पारमार्थिक कल्याण साधण्याकरितां. तत्कालीन महाराष्ट्रांतील पहिल्या वर्गात समावेश पावणाऱ्या संस्था म्हटल्या म्हणजे देशमूख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी, मोकदम, बारा बलुतें व त्यांचीं वतनें या होत. दुसऱ्या वर्गात समावेश पावणाऱ्या संस्था म्हटल्या म्हणजे देवस्थानें, मठस्थापना, गुरुशिष्यपरंपरा, उपाध्येपण, जोशीवृत्ती, धर्माधिकारीवृत्ति, भिक्षुकीवृत्ति, विद्वान् व स्नानसंध्याशील ब्राह्मणांचें पालनपोषण, इत्यादि होत. पहिल्या वर्गात समावेश पावणाऱ्या संस्थांची उदाहरणें मसूरचे जगदळे, गुप्ते, देशपांडे, जेधे देशमूख इत्यादिकांची आहेत. दुसऱ्या वर्गांत समावेश पावणाऱ्या संस्थांचीं उदाहरणें निंब-सदानंद, राजोपाध्ये, चाकणचे ब्रह्मे यांचीं आहेत.

शके १४०० शके १७०० च दरम्यानचे काळांतील महाराष्ट्रांतील महत्वाच्या समाजसंस्था

५ परिशिष्टांत दाखल केलेल्या, ह्या काळांतील एकंदर ११७ कागदांचे व ते कागद ज्या व्यवहारांसंबंधीं आहेत, त्या व्यवहारांचें स्वरूपाचे दृष्टीनें वर्गीकरण अशा प्रकारचें करितां येतें:--

व्यवहारविषयाचें स्वरूपाचे दृष्टीनें वर्गीकरण.

(१) स्थावर मिळकतीसंबंधी व्यवहार

वतन आणि वतनासंबंधी हक्क

पाटिलकी	मोकदमी	कुळकर्णी	देशमूखी
१७	१२	१	२५

देशकुलकर्णी अथवा देशपांडे	खासनिशी	सरसेटेपण
१७	१	१

वृत्ती

ग्रामउपाधिक	जोशी अथवा जोतिशी	धर्माधिकारिणी
१	१२	१

सरधर्माधिकारिणी	सरजोतिषी
१	३

वृत्ती व वतनेतर स्थावर मिळकत

शेतांतील पिकाचे नुकसानीबद्दल	गांवचे सीमेबद्दल
२	३

बखळ जागा	इनामगांव	वाटे हिश्याबद्दल	घर
१	१	२	२

जंगम मिळकतीबद्दल

पुस्तकें	वस्तभाव व रुपये	गांवगतीचे पैशाचे हिशोबाबद्दल
१	१	१

परचक्रनिवारणार्थ देऊं केलेल्या रकमेचे फाळणीबद्दल

१

पिंडदान, नांदीश्राद्ध वगैरेचे प्राप्तीबद्दल	देवाचे पालखीचे मिरवणुकीचे वेळीं देवापुढें ठेविलेल्या पैशाबद्दल
१	१

इतर

जातींत पावन करून घेतल्याबद्दल अगर बहिष्कारावद्दल

४

मोरेकरी घातल्याबद्दल १	मत्रांगसहित मंत्रोपदेश व ज्ञानांगसहित ज्ञानोपदेश करण्याच्या हक्काबद्दल
	१

परिशिष्टांतील कागदांचें स्वरूपाचे दृष्टीनें वर्गीकरण ह्याप्रमाणें करितां येतें:–

महजर (गोत, देसक)

महजरनामा

निवाडपत्र

निवाडा

निर्णयपत्र

थळपत्र

सुरत महजर

महजरनामा मिरासीपत्र जयपत्र

तकरीर यजित पत्र

बखेर

जबानी

राजीनामापत्र

सवद् रोखा

समापत्र

नेमपत्र

सनद्

आज्ञापत्र

फारकत

साक्षपत्र

कौलनामा

क्रयपत्र

खरिद्खत

शर्तनामा

बक्षिसपत्र

इनामपत्र

बीं दाणे

वृत्तीपत्र

(६) ह्या लेखास जोडिलेल्या परिशिष्टांत नमूद केलेले कागदपत्र, तत्कालीन महाराष्ट्रीय समाजांतील महत्वाच्या संस्थांसंबंधीं झालेल्या व्यवहाराविषयीं असल्याकारणानें, या कागदांचें निरीक्षण करून, तत्कालीन व्यवहारनिर्णयपद्धतीसंबंधी कोणतीं निश्चित विधानें आपणांस करितां येतील याचा विचार करण्याकडे आतां वळतो. मंडळास सादर केलेल्या परिशिष्टांत एकंदर ११७ लेख व्यवहारासंबंधीचे आहेत, व त्यांचे निरीक्षण करून, मुख्यत्वेंकरून

व्यवहाराच्या अनेक बाबी पैकीं मुख्य चार बाबी

१. व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्था, त्यांची रचना व अधिकार

२. व्यवहारनिर्णय ज्या नियमांस अनुसरून केला जात असे ते नियम व त्या नियमांचा संग्रह ज्यांत केला आहे असे प्रमाणभूत मानले जाणारे ग्रंथ

३. व्यवहारनिर्णयसंबंधीं विधिविषयक नियम

४. व्यवहारनिश्चितीचें कार्य सुकर होण्याकरितां अस्तित्वांत असलेल्या तरतुदी

व्यवहाराच्या अनेक अंगांपैकीं या चार अंगांसंबंधी परिशिष्टांतील कागदांचे आधारें विवेचन करण्याचें आज मीं योजिलें आहे.

७ हल्लीं महाराष्ट्रांत व्यवहारनिर्णय करणाऱ्या ज्या संस्था आहेत त्या सर्व संस्था हल्लींच्या राजसत्तेनें निर्माण केलेल्या कायद्याचे पायांवर उभारलेल्या आहेत. एका विवक्षित प्रदेशाचे विवक्षित भाग करून त्या भागांत राहणाऱ्या लोकांमध्यें कोणत्या हि स्वरूपाचा व्यवहार उत्पन्न झाल्यास त्या भागांवर नेमिलेल्या न्याय करणाऱ्या अधिकाऱ्यानें त्या व्यवहाराची चौकशी करून त्या व्यवहाराचा निकाल करावयाचा असा हल्लींचा कायदा आहे. न्यायनिर्णय करण्याकरितां कायद्यानें स्थापित केलेल्या यंत्राचा कनिष्ठ प्रतीचा घटक म्हणजे सबजज्ज अथवा मुनसफ

हल्लीं महाराष्ट्रांत अस्तित्वांत असलेल्या व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थांचे स्थूल स्वरूप

हा होय. अनेक गांवें मिळून एक तालुका व अशा एक अगर दोन तालुक्यांत उत्पन्न होणाऱ्या व्यवहाराचा निवाडा करणारा अधिकारी तो मुनसफ अथवा सबजज्ज होय. सबजज्जाचे दोन प्रकार—एक फर्स्ट क्लास, व दुसरा सेकंड क्लास. वादाचे विषयाची किंमत ५००० रुपयांचे आंत असेल तेव्हां त्या व्यवहाराचा निर्णय सेकंड क्लास सबजज्जानें करावयाचा; व वादाचे विषयाची किंमत ५००० रुपयांहून अधिक असेल तेव्हां त्या वादाचा निर्णय फर्स्ट क्लास सबजज्ज यानें करावयाचा. मुंबई शहर खेरीज करून इलाख्यांतील इतर कोणत्या हि ठिकाणीं उत्पन्न होणाऱ्या दिवाणी स्वरूपाचे व्यवहाराचा निकाल या दोन अधिकाऱ्यांपैकीं कोणीं तरी एकानें करावयाचा असतो. या व्यवहारनिर्णय करणाऱ्या दोन अधिकाऱ्यांहून श्रेष्ठप्रतीची व्यवहारनिर्णय करणारी संस्था म्हणजे डिस्ट्रिक्ट कोर्ट होय. अनेक तालुका कोर्टाचे सबजज्जांनीं केलेल्या निकालाची तपासणी करण्याचा अधिकार डिस्ट्रिक्ट कोर्टाकडे असतो. डिस्ट्रिक्ट कोर्टाहून वरिष्ठ प्रतीच्या व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्था म्हणजे हायकोर्ट व प्रिव्हीकौन्सिल ह्या होत. हायकोर्टास डिस्ट्रिक्ट कोर्टानें केलेल्या ठरावांची व प्रिव्हीकौन्सिलला हायकोर्टानें केलेल्या ठरावांची तपासणी करण्याचा अधिकार असतो. अव्वल दाव्याची चौकशी करून निवाडा करण्याचा अधिकार मुन्सफ कोर्टाला व मुन्सफ कोर्टांनीं केलेल्या ठरावांची तपासणी करण्याचा अधिकार डिस्ट्रिक्ट कोर्ट, हायकोर्ट, व प्रिव्हीकौन्सिल ह्यांना आहे. प्रस्तुत काळच्या कायद्यानें स्थापित केलेल्या व्यवहारनिर्णय करणाऱ्या यंत्राचें स्थूल स्वरूप या प्रकारचें आहे. या प्रस्तुत काळच्या योजनेंत व्यवहारनिर्णय करण्याचे कामीं ज्या गांवांतील व्यवहार असेल, अगर ज्या जातीच्या लोकांतील व्यवहार असेल, त्या गांवांतील अगर त्या जातींतील लोकांचा संबंध व्यवहारनिर्णय करण्याचे कामीं बिलकूल कोठें हि येत नाहीं. व्यवहारनिर्णयाचें काम सर्वस्वी सबजज्ज याचे हातांत असून तो करील तो निर्णय उभयतां वादीप्रतिवादींनीं मान्य करावयाचा असतो.

शके १४०० ते शके १७०० चे दरम्यानचे काळांतील या व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थांचें स्वरूप

८ ज्या कालासंबंधीं आपणांस प्रस्तुत विचार करावयाचा आहे त्या काळच्या व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थांची रचना आतां दर्शविलेल्या प्रस्तुत काळच्या व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थांच्या रचनेहून अगदीं भिन्न स्वरूपाची होती; आणि ती रचना अगदीं निराळ्या तत्वांवर उभारलेली होती. त्या काळचें व्यवहारनिर्णय करणारें यंत्र जे परंपरागत महाराष्ट्रांत चालत आलेलें होतें त्या यंत्राचा अगदीं कनिष्ठ प्रतीचा घटक

म्हणजे प्रत्येक ग्राम व त्या ग्रामांतील रहिवाशांचा समाज हा होय. जितकीं ग्रामें तितक्या व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्था असें होतें. प्रत्येक ग्राम हें त्या ग्रामांतील रहिवाशांच्या व्यष्टी व समष्टीरूप व्यवहारापुरतें एक लहान प्रजासत्तात्मक राज्य होतें व या दृष्टीनें त्या ग्रामांतील निवळ एखाद्या व्यक्तीच्या अगर कुटुंबाच्या खाजगी स्वरूपाच्या व्यवहाराखेरीज इतर कोणता हि व्यवहार त्या ग्रामांतील रहिवाशांच्या सभेचे विद्यमानें होत असे. हे जे ग्रामांतील रहिवाशी त्यांस गोत ही संज्ञा होती. ग्रामांतील कोणत्या हि दोन व्यक्तींमध्यें कांहीं व्यवहार उत्पन्न झाल्यास, प्रथम तो व्यवहार उभयतां वादींनीं गोतास निवेदन करावयाचा; मग गोतानें उभयतांचें म्हणणें ऐकून घेऊन, योग्य ती चौकशी करून, त्या व्यवहाराचा निर्णय करावयाचा, व त्याप्रमाणें उभयतां वादींनीं वर्तन करावयाचें. प्रस्तुत काळच्या व्यवहारनिर्णय करणाऱ्या यंत्राचा अगदीं कनिष्ठ प्रतीचा घटक जसें मुनसफ कोर्ट तसें त्या काळच्या व्यवहारनिर्णय करणाऱ्या यंत्राचा कनिष्ठ प्रतीचा घटक म्हणजे गोत होय. हल्लीं गोताचा जो अर्थ प्रचारांत आहे, त्यामुळें थोडासा गैर समज उत्पन्न होण्याचा संभव आहे. नात्याचे लोक म्हणजे गोत असा अर्थ आपण समजतों. परंतु आतां सांगितलेल्या गोत ह्या संज्ञेचा हा अर्थ नसून एका ग्रामांतील निरनिराळ्या जातीचे व निरनिराळे धंदे करणारे लोकांचा समूह म्हणजे गोत. गोताचे निवाड्यास गोत-महजर ही संज्ञा आहे. गोत-महजराचे नमुने परिशिष्टांत नमूद केलेले नंबर ३, १०, ३२, ३४, ३६, ४२. ४७, हे लेखांक आहेत. ह्या गोत-महजरांवरील सह्यांचें निरीक्षण केलें असतां त्या ग्रामांतील पाटील कुळकर्णी, बाराबलुते व शेटे महाजन यांच्या सह्या असलेल्या आढळून येतात. बलुते १२ असत—सुतार, लोहार, चांभार, महार, मांग, कुंभार, न्हावी, धोबी, गुरव, जोशी, भाट, आणि मुलाणा. प्रत्येक ग्रामांत सर्व बाराबलुते असत च असा नियम नव्हता. त्या ग्रामांत जे बलुते असत त्यांचा समावेश गोतांत होत असे. गोत-महजरावर बलुत्यांपैकीं कुंभार, धोबी, सुतार, महार, मांग, चांभार, गुरव आणि जोशी यांच्या सह्या बहुधां आढळून येतात. गोतांत कोणकोणत्या लोकांचा समावेश होत असे या मुद्याचा यावरून स्पष्ट खुलासा झाला. ग्रामांतील कोणत्या हि दोन व्यक्तींमध्यें व्यवहार उत्पन्न झाला असतां, त्याबद्दलची फिर्याद प्रथम ग्रामाचा पाटील, अगर दुसरा कोणी सरकारी अधिकारी यांचेकडे प्रथम यावी लागे. व तो अधिकारी ती फिर्याद गोताकडे निवाडा करण्याकरितां पाठवील तर च त्या व्यवहाराचा निर्णय करण्याचा अधिकार गोतास असे कीं काय ? हा एक महत्वाचा प्रश्न आहे. निरीक्षण केलेल्या

व्यवहारनिर्णय करणाऱ्या यंत्राचा कनिष्ठ प्रतीचा घटक गोत

गोताचा फिर्याद घेण्याचा अधिकार

कागदपत्रांवरून प्रथम फिर्याद पाटील अगर सरकारी अधिकाऱ्यांकडे दिल्यानंतर त्यानें तिचा निर्णय करण्याचें काम गोताकडें सोंपविलें तर च त्या व्यवहाराचा निर्णय गोतास करितां येत असे असा निर्बंध नव्हता. ग्रामांत उत्पन्न झालेल्या व्यवहाराचा निर्णय गोत स्वतंत्र रीतीनें करी. नंबर ३ मध्यें " संताजी बिन भिकाजी चव्हाण व महादजी बिन सुलतानजी जगदळे कसबे मसूर हरदोजण राजमुद्रा व देसक व गोत यापासी येऊन उभे राहिले " अशा प्रकारचा उल्लेख आहे. ग्रामांतील दोन रहिवाशांमध्यें उत्पन्न झालेला व्यवहार ग्रामाचे पाटलानें निर्णय करण्याकरितां गोताकडे पाठविल्याचा कोणत्या हि महजरांत उल्लेख आढळत नाहीं. हल्लींचे शेतकी

गोत आणि लवाद

आक्टाचे लवादासारखे च गोताचे अधिकार असावेत असा कदाचित समज होण्याचा संभव आहे. परंतु तसा कोणाचा समज झाल्यास तो हि बरोबर नाहीं. लवादाकडे नेलेल्या व्यवहाराचा निर्णय करण्याचा प्रयत्न न झाल्यास लवादानें करावयाचा असतो त्याचप्रमाणे लवादानें सुचविलेली तोड, वादीप्रति वादींनीं मान्य केली च पाहिजे, असा हि निर्बंध नाहीं. यावरून आजपावेतों शेतकी आक्टाप्रमाणें नेमले जाणारे लवाद आणि गोत यांत बिलकुल साम्य नाहीं हें उघड आहे. उत्पन्न झालेल्या व्यवहाराचा निकाल करून घेण्याकरितां गोताकडे जाणें अगर न जाणें हे वादी अगर प्रतिवादी यांचे मर्जीवर ठेविलेलें नव्हतें. परिशिष्ट लेखांक नं० ९ अ च्या श्री छत्रपती राजाराम महाराजांच्या आज्ञापत्रावरून हा मुद्दा स्पष्ट होत आहे. राजाराम महाराजांनीं निवाडा करण्यापूर्वी उभयतां वादीस गोताचा निवाडा आणण्याबद्दल हुकूम केला, असें ह्या लेखावरून दिसून येत आहे.

व्यवहार सरकारी अधिकाऱ्याकडे नल्यास सरकारी अधिकारी गोताकडे व्यवहार पाठवीत असे

जगदळे वतनदारांचे मूळ देशमुखी वतनाचे गांव ५७ होते. त्यांपैकीं २० गांवांचा भोगवटा कांहीं कारणांमुळे बंद पडून ती गांवें यादवांकडे गेली. तेव्हां जगदळे ह्यांनी त्या २० गांवांचा भोगवटा त्यांजकडे पुरातनप्रमाणें सुरू व्हावा म्हणून छत्रपती राजाराम महाराज यांचेकडे दाद मागितली असतां राजाराम महाराजांनी जगदळे व यादव ह्यांस गोताकडे पाठवून हमशाई गोत मेळवून पूर्वापार वृत्त मनास आणून निवाडा करून महजर करण्याबद्दल आज्ञा केली. ही आज्ञा केल्यानंतर परिशिष्ट लेखांक १० वरून थळ मौजे किवळ येथें गोत जमा होऊन गोताने तंट्यांतील २० गांवें जगदळे यांची आहेत, व त्या गावांवर यादवांचा कोणत्या हि प्रकारचा संबंध नाहीं असा महजर करून दिला. ह्या च व्यवहाराचे बाबतींत गांवगन्ना वतनदार, पाटील, कुळकर्णी, चौगुले बोलावून आणून श्रीकृष्णातीरीं जमा करून त्यांसी शपथ घालून विचारणें जें सांगतील तें करिना हुजूर लिहून

पाठविणें म्हणून छत्रपती राजाराम महाराजांनीं आज्ञा केली होती. त्यांचे आज्ञे-प्रमाणें तरफ मजकूरचे पाटील, कुळकर्णी, चौगुले, शेटे महाजन, व बाराबलुते बोलावून आणून थळ कसबे उंबरज ऐथें श्रीकृष्णासंगमीं पाटील, कुळकर्णी, चौगुले, मोख्तसर ऐसे कृष्णेंमध्यें घालून त्यांचे माथां शपथ घालून विचारलें इत्यादि मजकूर परिशिष्ट लेखांक १२ मध्यें असून छत्रपतीच्या आज्ञेप्रमाणें चौकशी करून झालेली हकीगत मोरो जनार्दन कारकून यानें राजाराम महाराजांस कळविली. अखेर छत्रपती राजाराम महाराजांनीं गोतांनीं केलेला महजर लक्षांत घेऊन ५७ गांवची देशमुखी महादजी जगदळे देशमूख ह्यांस दुमाला केली (परिशिष्ट लेखांक नंबर १२ अ). या एकंदर विवेचनावरून सरकारी अधिकाऱ्याकडे अथवा खुद्द राजाकडे एखादा व्यवहार निर्णयाकरितां नेल्यास गोताचे निवाड्यावांचून त्या व्यवहाराचा निर्णय सरकारी अधिकारी अथवा खुद्द राजा हि करीत नसे, असा सिद्धांत शाबीत होतो. जातां जातां या ठिकाणीं दुसऱ्या एका गौण मुद्यासंबंधीं दोन शब्द सांगितल्यावांचून राहवत नाहीं. छत्रपती राजाराम महाराजांची कारकीर्द बरी च धामधूमीची होती असें असून हि या देशमुखी गांवांचा कथला शके १६१५ मध्यें उपस्थित होऊन त्याचा अखेर निकाल राजाराम महाराजांनीं शके १६१८ मध्यें केला. अवघ्या तीन वर्षांत या भानगडीच्या प्रकरणाचा निकाल राजाराम महाराजांच्या धामधूमीच्या कारकीर्दींत झाला, या एवढ्या एकट्या च उदाहरणावरून सर्व साधारण सिद्धांत ठरविणें बरोबर होणार नाहीं ही गोष्ट जरी खरी आहे तथापि हें एक उदाहरण लक्षांत ठेवण्यासारखें आहे. या च प्रकारचीं दुसरीं हि कांहीं उदाहरणें दाखवितां येतील. या व असल्या दुसऱ्या कित्येक उदाहरणांवरून त्या काळीं न्याय मिळण्यास फार दिरंगाई होत असे असा त्या काळाविषयींचा कोणाचा ग्रह असल्यास तो साधार आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं.

> व्यवहारनिर्णय होण्यास त्या काळीं दिरंगाई होत असे हा समज बरोबर नाहीं

हल्ली जी व्यवहारनिर्णय करण्याची पद्धति अमलांत आहे त्या पद्धतींत ज्या ग्रामांचा व्यवहार असेल तेथील रहिवाशांना त्या व्यवहाराचा निर्णय करण्यासंबंधीं कोणत्या हि प्रकारचा अधिकार ठेविला नसल्या कारणानें व कायद्याचे कलमांत सांगितलेल्या ठराविक तत्वास व पद्धतीस अनुसरून मुनसफानें व्यवहारनिर्णय करावयाचा असल्याकारणानें मुनसफाचे हातून जर एखादी चूक झाली तर तिचा परिणाम पक्षकारास फार च चमत्कारिक रीतीनें भोगावा लागतो, व त्यामुळें काळ आणि द्रव्य यांचा कल्पनेबाहेर निरर्थक खर्च होतो. मीं केलेल्या विधानाची सत्यता हल्लीं वकीलीचा धंदा करणाऱ्या गृहस्थांना पूर्णपणें पटेल अशी

> प्रस्तुतचे व्यवहारनिर्णय करण्याचे कामीं ग्रामांतील लोकांचा संबंध नसल्याकारणानें होणारं नुकसान

माझी साक्षी आहे. ग्रामांमध्यें कोणत्या हिं दोन व्यक्तींत व्यवहार उत्पन्न झाल्यास त्याची फिर्याद सरकारी अधिकाऱ्याकडे अगर खुद्द राजाकडे हि पक्षकारास देण्याचा हक्क असे (परिशिष्ट लेखांक नं ४, ५ ४५, ८२, ८७, ८८, ९२). परंतु गोतास व्यवहार निवेदन न करितां एखादा वादी सरकारी अधिकाऱ्याकडे परभारें गेल्यास त्या अधिकाऱ्यानें तो व्यवहार गोताकडे निर्णय करण्याकरितां पाठवावयाचा असा साधारण प्रघात होता. परिशिष्ट लेखांक ४५, ८८ ही अशा प्रकारची उदाहरणें आहेत.

व्यवहाराबद्दल फिर्याद घेण्याचा सरकारी अधिकाऱ्यास अखत्यार असे

ह्या च बाबतीसंबंधीं दुसरी कांहीं उदाहरणें विचार करण्यासारखीं आहेत. लेखांक नं० ८२ चे महजरावरून मोजे रावेत परगणे पुणे येथील पाटीलकी वतनाबद्दलचा व्यवहार शहाजी महाराजांकडे नेण्यांत आला; तेव्हां साहेबांची रजा सादर झाली जे "मौजे रावेत परगणे पुणे गांवचे पाटीलकीचे व्यवहाराचा गोतानें निवाडा करावा." त्यानंतर राजश्री दादाजी कोंडदेव यांनी गोतासमवेत ह्या व्यवहाराचा निकाल केला. लेखांक नंबर ८७ चे शके १५६३ श्रावण शुा ७ चे कागदांत "जानोजी कुंभारकर व रामाजी कुंभारकर मोकदम मौजे वणपुरी यां मध्यें बाप भांउबीचे भांडण आहे ऐसियास जानोजी राजश्री साहेबांपासीं गेला होता. ऐसियास राजश्री साहेबीं हुकुम केला कीं मागे मा॥ इले दादाजी कोंडदेव सुभेदार याचे कारकिर्दीस ऐसे चालिलें असेली; राजश्री साहेबांचे कारकीर्दीस चालीले असेली तेंप्रमाणें हाली वर्तणे. एणेप्रमाणें गोतास हुकुम जालियावरी गोत मौजे मजकूर एउन दोघांचे राजीनामें लीहून घेतले." ह्या हि उताऱ्यावरून फिर्याद शिवाजी महाराज यांचे कडे गेली असतां त्या फिर्यादीचा निकाल करण्याचें काम शिवाजी महाराजांनीं गोताकडे सोंपविलें. ले. नं. ९२ हा १६३२।३३ सालांतील तकरीर आहे. त्यामध्यें संभाजी गरूड पुण्यामध्यें अमरसाहेब होता, त्याजपाशी जाऊन फिर्याद जाहाला कीं मौजे बेलसरची मोकदमी आपली आहे. संभाजी गरूड ह्यास हुकुम फर्माविला कीं "तुझा ईनसाफ गोतावर टाकिला आहे".

परिशिष्ट लेखांक नंबर ८८ हा शके १५९४ श्रावण शुा ४ चा कागद आहे. ह्या कागदास जाबिता मखलासी ही संज्ञा आहे. माली माउ माली यानें सुभा राजश्री राघोबल्लाळ सुभेदार सा॥ जुन्नर याजकडे फिर्याद केली. "राजश्री विसाजी बाबाजी कुळकर्णी मौजे चिखली हा कुळकर्ण चालवीत असतां आपणास हिशोब गांवगतीचा समजाविला नाहीं. लोकांचे देणें घेणे आहे ते मागत आहेत". ह्यानंतर राघो बल्लाळ यानें "विसाजीस दस्त करून आपले व दादाजी

कोंडदेव मजमुदार सुभे मजकूर व काशीराम हवलदार व निळो वामन अजहत्ती व त्रिंबकजी देशपांडे यास बैसऊन मसलासी केली. "

ह्या उदाहरणांवरून सरकारी अधिकारी हि क्वचित् प्रसंगीं एखाद्या व्यवहाराचा निकाल गोताकडे न पाठवितां स्वतः करीत असत. अशा रीतीनें सरकारी अधिकाऱ्यानें जरी निवाडा केला, तरी देखील तो दुसऱ्या दोन तीन शिष्ट गृहस्थांचे विद्यमानें व सल्ल्यानें केला जाई.

सरकारी अधिकाऱ्यांकडें एखादा व्यवहार नेल्यास होतां होईल तों त्या व्यवहाराचा निर्णय करण्याचें काम गोताकडें सोंपविण्यांत येई; हा जो सिद्धांत वरील उदाहरणांवरून दिसून आला त्याचें अवलंबन पोर्तुगीज सरकार हि करीत असे. ही गोष्ट लेखांक नं. ७९ वरून दिसून येते. ले. नं ७९ हा शके १७३४ पोष वा॥ ८ चा निवाडा आहे. व्यवहार विनायक जोसी व चंद्रभट जोशी यांचेमध्यें मामले फोंडाचे सरजोतिषी वृत्ताबद्दल होता. ह्या व्यवहाराबद्दलची फिर्याद कोंश्यल्यंर ये च्यांचलर दो इस्ताद व जुबीज इनि देत जराल (माहालांनी नवीन कारजात) यांचे कडे देण्यांत आली. ह्या व्यवहाराचा निकाल त्यांनीं मध्यस्तांवर सोंपविला. निवाड्याचें काम मध्यस्तांवर सोंपविण्यापूर्वी "तुम्हां मध्यस्तांवर मान्य होऊन तेर्म केला आहे " असा ह्या निवाड्यांत उल्लेख केला आहे. ह्यावरून निवाड्याचें काम सोंपविण्यापूर्वी उभयतां वादींची मध्यस्तांकडे व्यवहार सोंपविण्याविषयीं संमती लागत असे असें दिसून येतें.

सर्व जातींच्या लोकांस व्यवहारनिर्णय करण्याकरितां गोतां कडे जाणें भाग असें किंवा काय ह्या हि एका मुद्याचा विचार होणें जरूर आहे. मुसुलमानी

सर्व जातींचे लोकांचा व्यवहारनिर्णय करण्याचा गोतास अधिकार असे

राजवटींमध्यें एखादा व्यवहार हिंदु मुसुलमान यांचे मध्यें उत्पन्न झाल्यास त्या व्यवहाराचा निर्णय करण्यास गोतास अधिकार असे; हें परिशिष्ट लेखांक १ वरून सिद्ध होतें. मसूर येथील पाटीलकी वतनासंबंधीं नरसोजी जगदळे व बापाजी मुसुलमान यांचे मध्यें वाद होता. प्रथम ह्या वादाचा निकाल मसूर एथील गोतानें केला. त्यानंतर कऱ्हाड येथील देसकांनीं परगण्याचा महजर केला. त्यानंतर ह्या च वादासंबंधीं अंबरखानानें विजापूर पातशहाचे हुकुमावरून मुनसफी केली. कऱ्हाड येथील परगण्याचा महजर नरसोजी जगदळे याचे तर्फे पक्षपाती लोकांनीं केला; सबब तो मला कबूल नाहीं अशी बापाजी मुसुलमान यानें नकार करून त्या च व्यवहाराचा निवाडा दूरस्थळाचे गोतानें करावा, असें त्यानें मागणें केलें. बापाजी मुसुलमानाचे या मागणीस अनुसरून " प्रतिष्टान थोर जागा आहे. हमेषा निवाडे होताहेत. न्याय, नीती बरी होते " सबब बापाजीचा वाद व्यवहारप्रवीण धर्माधिकारिणी हरी पाठक

व माणिक पाठक यांचेकडे पाठविण्यांत आला, व त्यांनीं प्रतिष्ठान एथें धर्म-चौक्यावरी सभा करून उभयतांचीं उत्तरें मनास आणून व्यवहाराचा निर्णय थोर ग्रंथ विज्ञानेश्वर याचे वचनांचे आधारें केला. त्यावरून हिंदु असो वा मुसुलमान असो त्या काळीं त्याचेवर गोताची व विज्ञानेश्वराची सत्ता गाजत होती असें दिसून येतें. हल्लींच्या काळचे तालुक्याचे सबजज्जकोर्टासारिखें अगदीं कमी दर्जाचें जें गोत कोर्ट त्याची रचना व अधिकार या संबंधानें विवेचन झालें. आतां यापेक्षां वरिष्ठ प्रतीची व्यवहारनिर्णय करणारी संस्था कोणती होती तें पाहूं.

(९) गोताहून वरिष्ठ प्रतीची व्यवहारनिर्णय करणारी संस्था देशक ही होय. देशकांनीं दिलेल्या निवाड्यांस परगण्याचा अथवा देशकाचा महजर असें म्हणत असत. देशक ह्या संज्ञेंत कोणकोणाचा समावेश होत असे तें प्रथम पाहूं. परिशिष्ट लेखांक नंबर २१ वरून देशकाची रचना कशा प्रकारची असे हें स्पष्ट होतें. व्यवहार देशाधिकाऱ्याचे वतना बद्दल होता, व त्याचा निवाडा देशकांनीं महजर करून दिल्हा. देशकांमध्यें हवलदार, कारकून, सरनोबत, सबनीस, हेजीब, चिटणीस, कारखानीस, सरगुरो, बाजे नाईक, नाईकवाडी, देशक, शेटे महाजन, व बलुते इतक्यांचा समावेश होत असे. या लेखांतील देशकांची नावें पाहिली असतां त्यांमध्यें परगण्यांतील देशमुख व परगण्यांतील मौजा आणि कसबा गांवांचे पाटील व मुकादम, शेटे, महाजन, व बलुते यांच्या सह्या आढळून येतात. परिशिष्ट ले० नं० ३९, ३९, ४१, व ५२ हे देशकांचे निवाड्यांची उदाहरणें आहेत. आतां देशकांचे अधिकार व्यवहारनिर्णयाचे बाबतींत कोणत्या स्वरूपाचे होते ते पाहूं.

देशक व त्याची रचना

उत्पन्न झालेला व्यवहार निव्वळ स्थानिक स्वरूपाचा नसून तो प्रांतिक स्वरूपाचा असल्यास त्या व्यवहाराचा निर्णय करण्याचा अधिकार मुख्यत्वें करून देशकास च होता. याशिवाय गोतानें निर्णय केलेल्या व्यवहाराचा हि फिरून निर्णय करण्याचा अधिकार देशकास असे. परिशिष्ट ले. नं. १ वरून ही गोष्ट स्पष्ट होत आहे. मसूर हा कसब्याचा गांव असून तेथील पाटीलकीसंबंधी व्यवहाराचा निर्णय गोतानें एकदां केल्यानंतर त्या च व्यवहाराचा निर्णय कऱ्हाड येथील देशकांनीं केला. परंतु या देशकाच्या अधिकाराचा उपयोग करण्याचा प्रसंग देशकास क्वचित च येत असावा असें वाटतें. गोतानें केलेल्या निवाड्याचा देशकांनीं फिरून निवाडा करण्याचा अधिकार म्हणजे हल्लींच्या अपील कोर्टास असलेल्या अधिकारासारखा थोडाबहुत होता. परंतु अगदीं अपील कोर्टाच्या अधि-

देशकाचे अधिकार

कारासारखा तंतोतंत नव्हता. प्रस्तुतच्या अपील कोर्टास नवीन पुरावा क्वचित च घेतां येतो. परंतु देशकाकडे गोतांनी केलेल्या निवाड्याचा व्यवहार निर्णयाकरितां आला असतां देशकांना त्या व्यवहाराची प्रथम पासून चौकशी करण्याच्या अधिकार असे. वाटल्यास अधिक पुरावा घेण्याचा हि देशकास अधिकार असे. व्यवहारनिर्णय करण्याचे बाबतींत देशकाचे अधिकार व त्या अधिकाराचें स्वरूप आतां सांगितलेल्या प्रकारचें होतें. व्यवहाराचें स्वरूप अगर व्यवहारविषयक वस्तूची किंमत याचे योगानें व्यवहारनिर्णय करण्याचे गोताचे व देशकाचे अधिकारास या पुढें सांगण्यांत येणाऱ्या एका अपवादात्मक प्रकाराखेरीज दुसऱ्या कोणत्या हि प्रकारचा प्रतिबंध नसे; व्यवहारविषयक मिळकतीची किंमत ५००० हजाराचें आंत असेल तरच तालुकाकोर्टाचे मुनसफानें त्या दाव्याची चौकशी करावी; ५००० वर किंमत असल्यास त्या दाव्याची चौकशी फक्त फर्स्ट क्लास मुनसफानें करावी; अशा प्रकारचे निर्बंध त्या काळी गोत अगर देशक यांचे व्यवहारनिर्णय करण्याचे सत्तेवर घातलेले नव्हते.

व्यवहारनिर्णय करण्याच गोत व देशकाच अधिकारांवर निर्बंध

व्यवहारनिर्णय करण्याचे संबंधी गोताचें अगर देशकाचे अधिकारांत जातिभ्रष्ट झालेल्यास जातींत पावन करून घेण्याचा अधिकार नव्हता असें परिशिष्ट ले. नं. ५५ वरून दिसून येतें. हा लेख शके १६४४ मधला असून श्रीमंत शंकराचार्य अभिनव श्रीविद्यानरसिंह भारती स्वामी यांचें आज्ञापत्र आहे. "सदाशिवभट बिन जायभट जोतिषी मौजे कटोली यांची स्त्री माहेरी असतां जटील गोसावी यानें भ्रष्ट केली. ब्रह्मकर्म लोप्य होते. सबब सदाशिवभट मठ करवीर क्षेत्रामी श्रीस्वामीकडे गेले. सदाशिवभटाचे स्त्रीस त्रिवार पुशीले परंतु ते मागती आपल्या यातीत रिघाल्या मान्य नाही. ऐसें रुन निश्चय तीस विचारून ते बायकोचा सदाशिवभटानें घटस्फोट शास्त्रनिर्णय विधियुक्त त्यागविधी क्रम केलें व त्यास तीर्थप्रसाद देऊन पंक्तीपावन करून शुद्ध करून घेतले व सदाशीवभट यांचे घरी अन्नोदक संसर्ग करण्याविषयी सर्वत्रास आज्ञा केली." या लेखांकावरून जातीसंबंधीं व्यवहार उत्पन्न झाल्यास त्या व्यवहाराचा निर्णय करण्याचा अधिकार गोताकडे अगर देशकाकडे नसून तो अधिकार श्रीमत् शंकराचार्य यांचे हातांत होता असें दिसून येतें. जातीत पावन करून घेण्याचा अधिकार राजास हि होता, असें दुसऱ्या एका लेखावरून दिसून येतें. परिशिष्ट लेखांक नंबर ६९ हें मोरेश्वर पंडितराव यांचें जाहीर आज्ञापत्र शके १६०८ चैत्र शुा २ चें छत्रपति संभाजी महाराज यांचे कारकीर्दीतिलें आहे. "गंगाधर रंगनाथ कुळकर्णी कसबे हरसूल यांस मोगलांनी बलात्कारे बाटविला त्यास पावन करून घेण्याबद्दल छत्रपति रुपाळु

जातिभ्रष्टास पावन करून घेण्याचा अधिकार

होऊन प्रायश्चित्त यावयास आज्ञा दिली. या उपरी आम्ही राजश्री छंदोगामात्य याचे सभेसी समस्त विद्वद्वैदिक ब्राह्मणांचे समतीनें मिताक्षरादि निबंध पाहोन प्रायश्चित्त निर्वाह करून गंगाधर रंगनाथ यास प्रायश्चित्त संकल्प सांगोन श्री यात्रेस पाठविला." अशा प्रकारचा उल्लेख सदरहु आज्ञापत्रांत आहे. यावरून समस्त ब्रह्मवृंदाचे संमतीनें जातींत पावन करून घेण्याचा राजास अधिकार होता हें त्या उदाहरणावरून स्पष्ट दिसते.

दूरस्थळास व्यवहार निर्णयाकरितां पाठविण्यांत यावा अशा प्रकारची मागणी करण्याचा हक्क

परिशिष्ट लेखांक नंबर १ वरून वादी अगर प्रतिवादी यांस गोताने केलेला निवाडा मान्य न झाल्यास त्या च व्यवहाराची चौकशी देशकांनीं अगर दूरस्थळच्या गोतानें करावी अशा प्रकारचे मागणें वादीस अगर प्रतिवादीस करतां येत असे मात्र पूर्वी झालेला निवाडा पक्षपातानें झालेला आहे असें शाबित करावें लागे. परिशिष्ट लेखांक नंबर ४२ हें एकास्थळाहून दुसऱ्या स्थळाकडे पक्षकाराचे मागणीवरून व्यवहार वर्ग केल्याचें उदाहरण आहे. हल्ली मुकदमा एका कोर्टाकडून दुसऱ्या कोर्टाकडे वर्ग करण्यासंबंधी जो अधिकार पक्षकारास ठेविला आहे तशा स्वरूपाचा हा अधिकार असून तत्काली ह्या अधिकाराचा फायदा प्रसंगोपात लोक घेत असत. "हक्कजवारीचा जो निवाडा झाला तेथे जगदळे याची पार्टी गालितातो सबब आपल्यास दूर स्थळ दिले म्हणजे तेथे निवाडा होईल. त्यास आपण राजी" अशी बापाजी मुसलमान याची तक्रार होती; आणि या सबबीवर त्यास दूर स्थळ देण्यांत आलें असें परिशिष्ट लेखांक नंबर १ वरून दिसतें. ह्या च मुद्यासंबंधी परिशिष्ट लेखांक नंबर ९९ चें एक दुसरें उदाहरण आहे. कुडाळ येथील देशकुळकर्ण व गांवकुळकर्णासंबंधीं जे महजर उपलब्ध झाले आहेत (ले. नं. १०५, १०१) त्यांवरून हि विशेषप्रकारचें कारण नसतां उभयतां वादींचे मागणीवरून परस्थळाचे गोताकडे व्यवहार निर्णया करितां पाठविण्याचा प्रघात होता. अशा रीतीनें व्यवहार परस्थळाकडे निवाड्याकरितां पाठविला म्हणजे ज्या स्थळाकडे व्यवहार निवाड्या करितां पाठवीत असत त्या ठिकाणचे गोतास लेखी पत्र देण्यांत येई. त्या पत्रास थलपत्र ही संज्ञा होती. थलपत्रांत अमुक एका मुदतीचे आंत उभयतां वाद्यांनी परस्थळाचे गोताकडे हजर होण्याबद्दल मुदत नमूद करण्यांत येत असे. उभयतां वाद्यांपैकी मुदतीचे आंत एखादा वादी हजर न झाल्यास पूर्वी जशी वहिवाट चालू असेल त्याप्रमाणें वहिवाट चालू ठेवण्याबद्दल परस्थळाचें गोत व्यवहार ज्या स्थळाचा असेल तेथील गोतास व तेथील अधिकाऱ्यास कळवीत असे. कुडाळ एथील देशकुळकर्ण व गांवकुळकर्णाबद्दलचा

व्यवहार विसाजी प्रभुणे व नारायण प्रभुणे यांचेमध्यें होता (ले. नंबर १०५). ह्या व्यवहाराचा निवाडा करण्याकरितां उभयतां वाद्यांस थलपत्र देऊन दंतागीर पाटण येथील थलाकडे रवाना करण्यात आलें. विसाजीपंत थलास गेले. नारोपंत मुदतींत गेले नाहींत. तेव्हां दंतागीर पाटण येथील गोतानें वर नमूद केल्याप्रमाणें हुकूम केला. एखाद्या स्थलाकडे व्यवहार निर्णय करण्याकरितां पाठविला असतां तेथील गोतास त्या स्वरूपाच्या व्यवहारनिर्णयपद्धतीशीं परिचय नसल्यास तो व्यवहारनिर्णय न करितां परत पाठवीत. कुडाळ येथील गांवकुळकर्ण व देशकुलकर्णाबद्दल जे अनेक वाद झाले त्यांपैकीं परिशिष्ट लेख नंबर १०५ मध्ये अशा प्रकारचा उल्लेख आहे. "मग रायबाग थल दिले. थलांत गेलें ते गोत म्हणो लागले वतनाचा निवाडा येथ होत नाहीं; उदमाची पेठ; मग गांवास आले."

गोतापुढे एखादा वादी हजर न जाहल्यास त्यास तलब करून आणण्यांत येई व वादाचा निर्णय अमूक एका रीतीनें करून घेण्याबद्दल त्यानें कबूल केल्यावर त्याचेकडून जामीन घेऊन त्यास मुक्त करण्यांत येई. (ले. नंबर १०५).

१० गोत व देशक या दोन व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थांहून वरिष्ठ प्रतीची व्यवहारनिर्णय करणारी तिसरी संस्था म्हणजे न्यायाधीश अथवा व्यवहारनिर्णय करण्या करितां राजानें नेमलेला व राजमुद्रा दिलेला अधिकारी. परिशिष्ट लेख नंबर १ हा मुसलमानी राजवटींतील महजर आहे. त्यांत पातशानें अंबरखानापाशीं मुनसफी दिली असा उल्लेख जगदळे

न्यायाधीश अथवा मुनसफी करण्याकरितां राजानें नेमलेला अधिकारी


यांचे पाटिलकी वतनाचे वादाचे संबंधांत आलेला आहे. अंबरखानानें पाटिलकी वतनावर बापाजी मुसुलमानाचा कांहीं संबंध नाहीं असा निवाडा केला. मुनसफानें केलेला निवाडा वादीप्रतिवादींवर बंधनकारक नसे; व सरकारी अधिकाऱ्यानें मुनसफी केल्यावर हि थळ मागण्याचा अधिकार उभयतां वादीप्रतिवादींस होता, ही गोष्ट या लेखावरून दिसत आहे; व ती लक्षांत ठेवण्या सारखी आहे. मराठी राज्याची स्थापना झाल्यानंतर सरकारी अधिकाऱ्यांची मुनसफी करण्यासंबंधीं वहिवाट पूर्वीप्रमाणें च अस्तित्वांत राहिली असें परिशिष्ट लेख नबर १०, ११ व ८८ यांवरून दिसून येतें. शिरवडे गांवांतील शेताबद्दल महादजी जगदळे व सितोजी व सटवोजी भोसले यांचे मध्यें व्यवहार होता. त्या व्यवहाराचा निवाडा रा. कवि कलश छंदोगामात्य व रा. सरकारकून एकी सदरी बैसोन केला. परिशिष्ट ले. नंबर ३९ हा देशकाचा निवाडा आहे हा निवाडा गुंजण मावळचे देशमुखीबद्दल असून दादाजी कोंडदेव सुभेदार नामजाद कारकून किल्ले कोंडणा यांनीं व देशकांचे मजालसीनें मिळून केला आहे.

११ राजानें व्यवहारनिर्णय करण्याकरितां नेमलेल्या अधिकाऱ्याहून व्यवहारनिर्णय करणारी श्रेष्ठ प्रतीची चौथी संस्था म्हणजे खुद्द राजा हा होय.

राजाचे व्यवहारनिर्णय करण्या संबंधी अधिकार

राजानें व्यवहारनिर्णय केल्याचें उदाहरण म्हणजे जमदडे व यादव यांचे मध्यें देशमुखीचे वतनाचे गांवासंबंधीं जो व्यवहार होता त्याचा निर्णय श्री छत्रपति राजाराम महाराज यांनीं केला तें होय. याबद्दल पूर्वी उल्लेख केला च आहे. याशिवाय परिशिष्ट लेख नंबर ५, ४०, ४४ व ६० हीं दुसरीं खुद्द राजानें मुनसफी केल्याचीं उदाहरणें आहेत. गुंजण मावळचे देशमुखीबद्दलचे व्यवहारमध्या रा. दादाजी कोंडदेव यांनीं देशकाचे मजालसी समवेत जो निवाडा केला, त्या च व्यवहारचा राजश्री शिवाजी राजे यांनीं देशकांचे मजालसी समवेत फिरून चौकशी करून निवाडा केला. शिवाजी महाराजांनीं देशकांचे मजालसींत केलेला महजर शके १५७१ चैत्र वा। २ चा आहे. ते वेळीं शिवाजी महाराजांचें वय ३० वर्षांचें होतें. श्रीशिवाजी महाराजांनीं दादाजी कोंडदेव यांनीं केलेल्या निवाड्यांत फेरफार केला.

राजश्री दादाजी कोंडदेव यांनीं काय निवाडा केला होता व त्यांत शिवाजी महाराजांनीं काय फेरफार केला हें जाणण्याची जिज्ञासा होणें स्वाभाविक आहे. ही जिज्ञासा तृप्त करण्याकरितां ह्या निवाड्याची थोडक्यांत हकीगत देतों.



वाद बाबाजी हऊजी व बाळाजी यांमध्ये होता .

दादाजी पंडित यांनीं– " दोनी देशमुखीचें नागर व दोनी तरफा वडील पणाची तक्षीम दोघांस (कान्होजी बाजी व बाबाजी हऊजी) बराबरी व पानें

व लुगडी दोघांस बराबरी ऐसा सल्ला दिधला. बाळाजी नाईक तिसरा भाऊ हा दोघांचा हि धाकटा भाऊ त्याबद्दल त्याचे तर्फेचे गांवीचा हक्कलाजीमा व इनामती व इसाबती उत्पन्न बालाजीनें खाणे आणि दोघांच्या सिकिया खाले बालाजी नाईकाचे तकसिमेचे गाउ पटीस बराबरी दोघांखाली लिहीणें ऐसा तह दिधला. "

श्री शिवाजीमहाराज यांनी दिलेला निकाल– बापूजी बिन कान्होजी तकसीम १वाटीयाची एकी; वडीलपण नांगराची ह्याजी बाबाजी तकसीम १ वाटीयाची एकी व नांगर वडीलपण बालाजी बिन रुद्राजी नाईक याची वाटियाची तकसिम १ येणेंप्रमाणें आपआपल्या तर्फा लावणी उगवणी करणें.श्री शिवाजीमहाराजांचा निवाडा योग्य दिसतो.

खुद्द राजानें व्यवहारनिर्णय केल्याचें उदाहरण नारो केशव, बाबूराव रामाजी देशपांडे, व यादव रखमाजी, व देवाजी त्र्यंबक या उभयतांमध्यें कजबे सुपें येथील देशपांडेपणाबद्दल जो वाद होता त्या वादाचा निवाडा श्री शाहूमहाराजांनीं केल्याचें होय. शके १६७४ श्रावण वद्य ३ रोजीं छत्रपती शाहू महाराज समस्त अष्ट प्रधान, राजकार्यभागी, होनाजी अनंत न्यायाधीश, राजमुद्राधिकारी व वतनदार महालानिहाय, गोत, देशक, परगणे सुपे बारामती व मुकदम मौजे सांनवडी व पणदरे या सर्वांची या व्यवहाराचा निकाल करण्याकरितां एक जंगी धर्मसभा सातान्या नजीक श्रीकृष्णेचे तीरीं संगम माहुली एथें भरली. इनसाफ करण्याकरितां कुल देशक बोलाविला होता. तो हि सभेमध्यें बैसविला. " महाराज साहेबीं स्वमुखें कुल धर्मसभेस लहान थोरास ४२ पूर्वजांची व सत्याची व श्रीची शफत घातली व इनसाफ धर्मसभेवर सोंपविला. " यानंतर धर्मसभेनें उभयतां वाद्यांच्या तोंडी व लेखी पुराव्याचा विचार करून या व्यवहाराचा निकाल केला. खुद्द राजाकडे व्यवहारनिर्णय करून घेण्याकरितां वादी आल्यास राजा देखील इनसाफ करण्याचे कामीं धर्मसभेचा आश्रय करीत असे, हें ह्या उदाहरणावरून स्पष्ट होत आहे. गोत, देशक, न्यायाधीश आणि राजा अशा प्रकारची व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थांची तत्कालीन परंपरा होती. परिशिष्ट ले. नं. ३ मध्यें "सदरहु तकसीम वडीलपणा महादजी पाटील कजबे मजकूर यांस विकत किंमत होनु विसास खंडून दिल्हे व त्याचे क्रयपत्र देसक व आपले बापाभावाचे साक्षीनें करून दिल्हे असे; व ठाणा राजमुद्रा व देशक व गोत याचा महजर करून द्यावयाचा आहे म्हणून साहेब मदर व देसक व गोत यापाशीं आलो आहे " असा उल्लेख आहे; यावरून हि वरील सिद्धांतास तत्कालीन कागदपत्रांतील उल्लेखांमुळें चांगली बळकटी येत आहे.

(१२). ज्या मिळकतीबद्दल व्यवहार उत्पन्न झाला असेल ती मिळकत

निरनिराळ्या महालांत असल्यास त्या मिळकतीबद्दल प्रत्येक महालाचे गोताकडून निरनिराळे महजर करून घ्यावे लागत. परिशिष्ट लेख नंबर ६३, ६५, व ६६ हे कुडाळ देशमुखाचे देसकतीबद्दल प्रगणे वाई किल्ले परळी, किल्ले चंदन येथील गोतानें केलेले निवाडे आहेत. मुख्य महजर किल्ले चंदन येथील गोतानें केलेला आहे; परंतु तो उपलब्ध नाही. किल्ले परळीचे महजरांत " तुमचे महालीचा महजर करून देणे म्हणवूनि ....किल्ले चंदनीचा मिसलां बरहुकुम महजर " असा उल्लेख आहे.

ज्या मिळकतीबद्दल व्यवहार असेल ती निरनिराळ्या महालांत असल्यास त्या व्यवहाराचा निर्णय कोणीं करावयाचा

(१३) या व्यवहारनिर्णय करणाऱ्या गोत व देशक यांच्या मजालसी अथवा सभा कोठें भरत या मुद्याचा विचार करणें जरूर आहे प्रस्तुत काळीं न्यायाधिकाऱ्यांकरितां त्यांचे हुद्यास शोभतील अशा प्रकारचीं कमी अधिक भव्य मंदिरें न्यायनिर्णय करण्याकरितां उभारलेली आहेत. परंतु त्या काळीं हल्लींच्या सारखीं भव्य मंदिरें अस्तित्वांत नव्हतीं. साधारणपणें गोतसभा ग्रामांतील देवालयांत भरत असत. क्वचित् प्रसंगीं नदीच्या तीरीं अगर दोन नद्यांचे संगमानजीक हि धर्मसभा भरत. परिशिष्ट लेख नंबर ४२ व ५४ यांत देवालयांत सभा भरल्याचा उल्लेख आहे. नंबर १२, ४४ व ५६ यांमध्यें उंबरज नजीक कृष्णातीरीं, श्रीकृष्णावेण्यासंगम महातीर्थ माहुली, कृष्णातीरानजीक श्री शिवनाथ देऊ कजबे रहिमतपूर इत्यादि कृष्णानदीचे तीरानजीक सभा भरल्याचा उल्लेख आहे. शाहूमहाराजांनीं सुपेकर देशपांड्यांचे वादाचा निवाडा करण्याकरितां जी महासभा भरविली होती ती देखील साताऱ्याचे राजवाड्यांतील भव्य अशा दरबार मंदिरांत न भरवितां माहुलीक्षेत्रीं कृष्णावेण्यासंगमावर भरविली. तत्कालीन समाजांतील लोकांचे मनांत देवालयें, तीर्थें, महानद्या व त्यांचे संगम यांचे पवित्रपणाविषयीं अत्यंत पूज्यभाव असल्याकारणानें हे सर्व व्यवहार ह्या ठिकाणांचे समीप करण्यांत सहज रीतीनें सत्याचें आविष्करण व्हावें हा हेतु होता हें उघड आहे. सर्व व्यवहारनिर्णय करण्याचा हेतु सत्य शोधण्याचा असल्या कारणानें तें सत्यशोधन भव्य न्यायमंदिरांत झालें काय किंवा एखाद्या महानदीचे तीरीं अगर देवालयांत झालें काय त्याची किंमत सारखी च आहे.

गोत व देशक यांच्या मजालसी कोठें भरत

(१४) आतां ह्या संस्था केव्हांपासून अस्तित्वांत आल्या या प्रश्नाचा विचार करूं. स्मृतिग्रंथांत व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थांचें वर्णन कित्येक ठिकाणीं केलेलें आहे. मनु, याज्ञवल्क्य, नारद आणि बृहस्पति स्मृतींत याबद्दलचे उल्लेख अशा प्रकारचे आहेत. मनुस्मृतीचे ८ वे अध्यायाचे ९, १०, व ११ वे श्लोकांत न्यायनिर्णय करणाऱ्या संस्थांचें वर्णन या प्रकारचें दिलेलें आहे.—

गोत व देशक ह्या निर्णय करणाऱ्या संस्था केव्हांपासून अस्तित्वांत आल्या

" दुसऱ्या कार्यांमध्यें निमग्न झाल्यामुळें किंवा रोगादिकानें व्याकूळ झाल्यामुळें राजानें स्वतः कार्यें न पाहिल्यास त्यानें तीं पाहण्याकरितां कार्यदर्शन-कुशल ब्राह्मणांस नेमावें. "

" तीन धार्मिक व कार्यदर्शनसमर्थ ब्राह्मणांसह त्या (राजानें नेमलेल्या) ब्राह्मणानें त्या श्रेष्ठ सभेंत प्रवेश करून राजाप्रमाणें बसून किंवा उभ्यानें राज्याचीं कार्यें पहावीं. "

" ज्या स्थानीं ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद यांस जाणणारे तीन ब्राह्मण व राजानें ज्यास अधिकार दिला आहे असा एक विद्वान ब्राह्मण असतो त्यास च चतुर्मुखाचे सभेसारखी सभा होय असें समजतात. "

याज्ञवल्क्यस्मृतींत व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेसंबंधीं व्यवहारअध्या-याचे ३० व्या श्लोकांत नृपेणाधिकृतः पूगः श्रेणयोऽथ कुलानि च । पूर्वं पूर्वं गुरु ज्ञेयं व्यवहारविधौ नृणां ॥ असा उल्लेख आहे. नारदस्मृतीचे उपोद्घातांतील सातवा श्लोक अशा अर्थाचा आहे. कुल, श्रेणी आणि गण या तीन व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्था आहेत; व त्या क्रमशः परस्परांहून श्रेष्ठ आहेत. बृहस्पतिस्मृती-मध्यें या संबंधांत अशा प्रकारचे उल्लेख आहेत. न्याय देणाऱ्या सभा चार प्रका-रच्या असतात. एक स्थायी, दुसरी फिरती, तिसरी राजमुद्रा दिलेली व न्याया-धिशाची देखरेख जीवर आहे अशी व चौथी खुद्द ज्या सभेंत राजा हजर राहतो ती.

२६. शेतकरी, सुतार, लोहार इत्यादि कारागीर, चित्रकार, कर्जाउ पैसे देणारे, समाईक भांडवलावर व्यापार करणारे, नृत्य करणारे, विशिष्ट धर्मपंथाचीं चिन्हें धारण करणारे आणि चोर या सर्वांनी त्यांचेमध्यें उत्पन्न होणाऱ्या व्यव हाराचा निर्णय त्यांचे धंद्याचे नियमांस अनुसरून करावा.

२७. साधु व जादुटोणे करणारे लोक यांच्यांत उत्पन्न होणाऱ्या व्यवहा-राचा निर्णय फक्त तीन वेद जाणणाऱ्या लोकांकडून करावा. त्यांचे कोपास कारणीभूत होण्याचा संभव असल्या कारणानें राजानें स्वतः त्यांचे व्यवहाराचा निर्णय करूं नये.

२८. नातेवाईक, धंदेवाईक, ग्रामस्थांचा संघ आणि राजानें नेमलेला अधि-कारी यांनीं साहसासारख्या भयंकर गुन्ह्याखेरीज बाकीच्या व्यवहाराचा निर्णय करावा.

२९. नातेवाईक, धंदेवाईक, व ग्रामस्थांचा संघ आणि मुख्य न्यायाधीश हे एकांहून एक श्रेष्ठ आहेत. आणि ज्याचे व्यवहाराचा निर्णय यांपैकीं कोणीं

एकानें केला असेल, तेव्हां त्यानें व्यवहार करणाऱ्या संस्थेहून श्रेष्ठ असलेल्या संस्थेकडे त्या व्यवहाराची फिरून चौकशी करण्याबद्दल मागणी करावी.

३०. जेव्हां एखाद्या व्यवहाराचा निर्णय नातेवाईकांनीं योग्यप्रकारें केला नसेल तेव्हां त्या च व्यवहाराचा निर्णय धंदेवाईक संघानें करावा. धंदेवाईक संघानें त्या व्यवहाराचा निर्णय योग्य प्रकारें न केल्यास त्या च व्यवहाराचा निर्णय ग्रामस्थांच्या संघानें योग्य प्रकारें करावा. आणि ग्रामस्थांचे संघानें योग्य प्रकारें निकाल न केल्यास राजानें नेमलेल्या न्यायाधीशानें त्या व्यवहाराचा निर्णय योग्य प्रकारें करावा.

३१. गोत, धंदेवाईक आणि ग्रामस्थ यांच्या संघाहून न्यायाधीशाचा अधिकार श्रेष्ठ आहे. मुख्य न्यायाधीश या सर्वांहून श्रेष्ठ आणि राजा सर्वांहून श्रेष्ठ आहे.

गोत आणि देशक इत्यादि व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थांचें स्वरूप निरीक्षण केलेल्या कागदपत्रांवरून जे दृष्टोत्पत्तीस आलें आहे त्या स्वरूपाशीं याज्ञवल्क्य, नारद व बृहस्पतिस्मृतींत वर्णन केलेल्या संस्थांचे स्वरूप सामान्यपणें बरें च मिळतें आहे. परंतु मनुस्मृतींत वर्णिलेल्या व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेशी बरीक जें जुळतें नाही. राजानें स्थापित केलेल्या व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचें वर्णन मनुस्मृतींत केलेलें दिसतें. मनुस्मृतिकालीन समाजांत साक्षात अस्तित्वांत असलेल्या व्यवहारनिर्णय करणाऱ्या राजानें स्थापित केलेल्या संस्थेखेरीज इतर संस्थांचा उल्लेख मनुस्मृतींत केलेला दिसत नाहीं. याज्ञवल्क्य, नारद आणि बृहस्पतिस्मृतींत वर्णिलेल्या संस्थांशीं गोत, देशक यांचे सामान्यपणें जरी बरें च साम्य आहे, तथापि त्या संस्थांच्या घटनेंत व गोत आणि देशक यांच्या घटनेंत बरी च तफावत आहे. कुलाच्या रचनेसंबंधी मिताक्षरेमध्यें विज्ञानेश्वरानें जो खुलासा केला आहे, त्यावरून ज्ञातीबांधव तें कुल असा अर्थ उत्पन्न होतो. "कुलानि ज्ञातिसम्बन्धिबन्धूनां समूहाः" असा विज्ञानेश्वरांनी अर्थ दिला आहे. गोताचे रचनेबद्दल कागदपत्राचे आधारें जें मी वर्णन केले आहे त्यावरून गोताची व कुलाची रचना एकस्वरूपाची आहे असें म्हणतां येणार नाही. गोत व कुल यांचा व्युत्पत्तीदृष्ट्या अर्थ एक च आहे. मानवी प्राण्याचें रानटी स्थितींतून सुधारलेल्या स्थितींत संक्रमण होत असतां संक्रमणअवस्थेच प्रारंभी प्रत्येक ग्राम हें एका च पुरुषाचे वंशजांपासून बनलें असावें असा समाजशास्त्रवेत्त्यांचा तर्क आहे. या दृष्टीनें पाहतां प्रत्येक ग्राम कधीं तरी एके काळीं एका च पुरुषापासून उत्पन्न झालेल्या वंशजांचें बनलें असलें पाहिजे; व फार पुरातन काळी अशा प्रकारच्या ग्रामांत उत्पन्न होणारा व्यवहार

गोत व देशक ह्यांची स्मृतींत वर्णिलेल्या कुल, श्रेणी आणि पूग ह्या संस्थांशी तुलना

त्या ग्रामांत राहणारे एका च मूळ पुरुषाचे वंशज म्हणजे सर्व कुल करीत असलें पाहिजे. कालांतरानें समाजाचा जसजसा विकास होत चालला तसतसा प्रत्येक ग्रामरचनेंत फरक होत गेला. समाजाची जशजशी प्रगती होत जाते तशतशीं निरनिराळीं कार्यें करणारे निरनिराळे वर्ग त्या समाजांत उत्पन्न होतात; व एका पुरुषाचे वंशजांचा विस्तार या दृष्टीनें ग्रामास प्राप्त झालेल्या स्वरूपाचें स्थित्यंतर होत जाऊन निरनिराळे धंदे करणाऱ्या निरनिराळ्या जाती ग्रामांत उत्पन्न होतात. अशा रीतीनें ग्रामाचें मूळ स्वरूप जें एका पुरुषापासून विस्तार पावलेलें कुल तें अंतर्धान पावून त्या ठिकाणची नवीन प्रकारची ग्रामरचना उत्पन्न होते. समाजाच्या विकासामुळें ग्रामास प्राप्त झालेल्या नूतन स्वरूपाशीं विज्ञानेश्वरानें वर्णिलेल्या पूगाचें स्वरूप तंतोतंत जुळतें. " पूगाः समूहाः भिन्नजातीनां भिन्नवृत्तीनां एकस्थाननिवासिनां यथा ग्रामनगरादयः " अर्थ–भिन्नजातीच्या भिन्नवृत्ती (व्यवहार, निर्वाह, साधन) करणाऱ्या पण एकस्थानीं निवास करणाऱ्या लोकांचा समूह उ. ग्राम, नगर इत्यादि–असें विज्ञानेश्वरानें पूगाचें वर्णन केलें आहे. यावरून असें दिसतें कीं ग्रामसमाजाचें प्राचीन मूळ स्वरूप दर्शविणारी संज्ञा कुल अगर गोत ही तशी च कायम राहून गोताचे रचनेंत स्थित्यंतर झालें व गोताचे मूळ रचनेचे ठिकाणीं पूग ह्या संज्ञेनें दर्शविली जाणारी ग्रामरचना अस्तित्वांत आली. श्रेणीचें वर्णन मिताक्षरेंमध्यें जें दिलें आहे, त्यावरून पूग आणि श्रेणी यांतील फरक दिसून येईल. नानाजातीनामेकजातीनामप्येक-जातीयकर्मोपजीविनाम् संघाताः । यथा हेडाबुकादीनां तांबूलिककुविन्द-चर्मकारादिनां च ॥ नाना जातीच्या किंवा एका च जातीच्या हि एका च कर्मावर निर्वाह करणाऱ्या लोकांचा संघः– जसें तांबोळी, तेली, चांभार इत्यादि; असें श्रेणीचें वर्णन केलें आहे.

श्रेणीचे रचनेंत धंद्याचें विशेष प्राधान्य दिसतें. एक धंदा करणारे एक जातीचे अगर भिन्न जातीचे लोकांचा जो संघ तो श्रेणी. श्रेणीचा हा विशेष लक्षांत घेतला असतां बृहस्पतिस्मृतीतील २६ वे श्लोकांत वर्णन केलेल्या संस्थांशीं श्रेणीचें बरें च साम्य दिसून येतें.

देशकाची रचना पूगाचे धर्तीवर च होत असे. परंतु गोताचे रचनेंत जसे निव्वळ ग्रामस्थ असत, तसा देशकाचे रचनेचा प्रकार नसे. परगण्यांतील देशमुख, देशपांडे, मोकदम, शेटे, महाजन मिळून देशकाची रचना होत असे.

सारांश, कुल ही संस्था नष्ट होऊन तिचें कार्य पूगाकडे आलें असें दिसून येतें.

नारदस्मृतींत वर्णिलेल्या व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्था याज्ञवल्क्य-स्मृतींत वर्णिलेल्या संस्थांसारख्या च आहेत. फक्त पूगाचे ठिकाणीं ' गण ' या

शब्दाची योजना केली आहे. पूगाचे आणि गणाचे रचनेंत कांहीं तफावत असावी असें वाटत नाहीं.

आतां बृहस्पतिस्मृतींत वर्णिलेल्या संस्थांबद्दल विचार करूं. बृहस्पतिस्मृतीचे २ रे व ३ रे श्लोकांत वर्णिलेल्या संस्थांचें साम्य गोत, देशक, आणि ठाणा राजमुद्रा या तिहींशीं बरें च जुळतें. २६ व २७ व्या श्लोकांत वर्णन केलेल्या संस्था विशिष्ट प्रकारच्या सभा असून तशा प्रकारच्या सभा त्या काळीं अस्तित्वांत असल्या पाहिजेत; व प्रस्तुतहून अधिक कागदपत्र मिळाल्यास अशा सभांचे अस्तित्वाबद्दल निश्चित सिद्धांत करितां येईल. ह्या श्लोकांत वर्णन केलेल्या संस्थांशीं श्रेणीचें बरें च साम्य आहे. परिशिष्ट लेख नंबर ३० वरून त्या काळीं अशा विशिष्ट प्रकारच्या सभा अस्तित्वांत होत्या असें अनुमान काढण्यास जागा आहे. मुरारभट ब्रम्हे व वासुदेवभट ब्रम्हे यांचे मध्यें पुस्तकाचा "कळहो" होता. तो व्यवहार चाकण स्थळचे ब्रम्हसभेकडे गेला; व ब्रम्हसभेचे विद्यमानें त्या व्यवहाराचा निकाल लागला. असल्या विशिष्ट प्रकारच्या सभेचें दुसरें उदाहरण परिशिष्ट ले. नं. १६ अ हें आहे. हा लेख निंब येथील सदानंद गोसाव्याचे मठाचे कागदांपैकीं शके १५९३ चा एक कागद आहे. मठांतील कुणबिणीनें जीव दिला, व तिचे आत्महत्येसंबंधी दोष मठाधिपतीवर आला या भानगडीचा निकाल दसनाम मानभाव गोसाव्यांचे सभेनें करून, "मठपति यांस शेले देऊनु मोकळे केले; अतां कुणबिणीनें जीव दिल्हे त्याचे कांहीं लिगाड नाहीं. दसनामानी येऊनु अन्नपाणी यावे, यांस पुढें कोण्ही बोलेल त्यांस दसनामाचे आण," असा ठराव केला. ह्या कागदांवरील सह्या पाहतां ही सभा निव्वळ दसनाम गोसाव्यांची असोन त्यांत इतर जातीचा अगर धंद्याचा कोणी हि इसम नव्हता. बृहस्पतिस्मृतींतील २८ व्या श्लोकांत वर्णन केलेल्या संस्था आणि कुल, श्रेणी, पूग अथवा गण ह्या याज्ञवल्क्य आणि नारदस्मृतींत वर्णन केलेल्या संस्था एक च होत. श्लोक २९, ३० व ३१ मध्यें या संस्थांची व्यवहारनिर्णय करण्याचे अधिकाराची मर्यादा आणि त्यांचें परस्परांचें श्रेष्ठत्व हीं दर्शविलीं आहेत. या सर्व विवेचनावरून गोत व देशक या स्वरूपाच्या व्यवहारनिर्णय करणाऱ्या *संस्था

---

*हाल्सबरीज् लॉज् आफ इंग्लंड व्हा. ९ पा. १७ मध्यें जें विवेचन आहे तें ह्या संस्थांचे उत्पत्तीचे बाबतींत लक्षांत ठेवण्यासारखें आहे. "Courts are created by the authority of the king as the fountain of justice. This authority is exercised either by Statute, charter, letters patent or order in council. In some cases a court is held by prescription as having existed from time immemorial with the implication that there was at some time a grant of the court by the king which has been lost".

आर्यभूमींत याज्ञवल्क्य, नारद, आणि बृहस्पति या स्मृतींचे कालांचे पूर्वीपासून अस्तित्वांत होत्या हें स्पष्ट होत आहे. याज्ञवल्क्य आणि नारद स्मृतींचा रचनाकाल सुमारें शके ५०० ते ६०० चे दरम्यान ठरला गेला आहे. बृहस्पतिस्मृतीचा रचनाकाल नारदस्मृतिनंतरचा आहे, असा विद्वानांचा समज आहे. यावरून शके ५०० पासून व्यवहारनिर्णय करणाऱ्या गोत, देशक, अगर कुल, श्रेणी व पूग या स्वरूपाच्या संस्था आपले देशांत अस्तित्वांत आहेत, हे निर्विवाद सिद्ध होत आहे. मनुस्मृतीचा रचनाकाल शालिवाहन शकाचे सुरवातीपासोन शके २०० चे दरम्यान आहे असा विद्वानांचा तर्क आहे. मनुस्मृतीचे काळीं या संस्था अस्तित्वांत होत्या किंवा नव्हत्या याबद्दल मनुस्मृतीत कोठें उल्लेख नाहीं; तथापि आपले समाजांतील संस्थांचे ठिकाणीं आढळणारा प्राचीनपणा आणि अचलता हे दोन विशेष लक्षांत घेतले असतां मनुस्मृतीचे काली हि या च संस्था अगर या संस्थांशीं बरें च सादृश्य असणाऱ्या व्यवहारनिर्णय करणाऱ्या दुसऱ्या संस्था अस्तित्वांत असल्या पाहिजेत असें अनुमान करणें धाडसाचें होणार नाही.

(१५) मानवी समाजाचें दोन शत्रूंपासून रक्षण करावयाचें असतें; एक अंतः शत्रु व दुसरा बहिः शत्रु. समाजाचे कल्याणाचे दृष्टीनें या दोन्ही गोष्टी सारख्या च महत्वाच्या आहेत. प्रजेमध्यें आपआपसांतील उत्पन्न होणाऱ्या तंट्यांचा निकाल योग्य रीतीनें लावून प्रजेस संतुष्ट ठेवणें हें राजाच्या कर्तव्यापैकीं एक महत्वाचें कर्तव्य आहे. चौदावे शतकापासून सत्रावे शतकापर्यंत हें महत्वाचें कर्तव्य राजसत्ताधिकाऱ्यानी आपले हातांत न ठेवितां ते सर्वतोपरि प्रजेवर सोंपविलें होतें; व ते कर्तव्य देशमुखदेशपांड्यासारख्या श्रेष्ठ प्रतीच्या वतनदारांपासून तों महार मांगासारख्या कनिष्ठ प्रतीच्या बलूते वतनदारांपावेतों सर्व दर्जाचे वतनदार व ग्रामांतील शेटे महाजन एकत्र मिळून उच्चनीच भाव विसरून करीत असत. पंधराव्या खडांत प्रसिद्ध झालेले व आज पावेतों प्रसिद्ध न झालेले परंतु यापुढें प्रसिद्ध होणारे कागदपत्र, व्यवहारनिर्णय करण्याचे कामीं महाराष्ट्रांतील प्रत्येक लहानसहान ग्रामांतील लोक पूर्ण वाकबगार होते व धर्माचे (Law, duty) परंपरागत ज्ञान त्यांचे अंगांत खेळत होतें, अशी साक्ष देतील, अशी माझी खात्री आहे. हल्लींच्या स्थानिक स्वराज्यासारख्या संस्थाकडे जी कामें सोपविण्यांत आलेली आहेत, त्यापेक्षां श्रेष्ठप्रतीची व जबाबदारीची कामे प्रत्येक ग्रामांतील व परगण्यातील गोतांच्या व देशकांच्या सभा करीत असत. मराठी साम्राज्याचे लयाचे वेळी व्यवहारनिर्णय करणाऱ्या या हीनावस्थेप्रत पावलेल्या एतद्देशीय यंत्राबद्दल व तें चालविणाऱ्या लोकांबद्दल देखील मिस्टर मौट स्टुअर्ट एल्फिंस्टन सारख्यानें स्तुतिपर उद्गार काढिले आहेत.

राजाच्या कर्तव्यापैकीं एक महत्वाचें कर्तव्य प्रजेचे हाती होतें

मिस्टर माउन्ट स्टूअर्ट एल्फिंस्टन यांनी पेशव्यांपासून जिंकलेल्या मुलुखासंबंधीं जो रिपोर्ट लिहिला आहे, त्या रिपोर्टांत ते म्हणतातः —

" All accounts agree, it must be owned, in representing the knowledge of the common people in the customary law of their country and consequently the uniformity of their decisions when formed into Panchayats, is far beyond what could be expected.

The advantage of this was particularly felt among the lower orders who are most out of reach of their rulers and most apt to be neglected under all Governments. By means of the Panchayat they were enabled to effect a tolerable dispensation of justice among themselves and it happens that most of the objections above stated to that institution do not apply in this case. "

मि. एलफिंस्टनचे हे उदगार गोतासंबंधी आहेत हे उघड आहे.

गोत व देशक ह्या संस्थांचे अस्तित्वामुळे महाराष्ट्रांतील लोकांचे फायदे

(१६) राजसत्तेच्या नानाविध अंगांपैकीं व्यवहारनिर्णय करण्याचें एक महत्वाचें अंग महाराष्ट्रांतील प्रजेच्या हाती असल्याकारणानें महाराष्ट्रांतील लोकांचा फायदा सामाजिकदृष्टीने अपूर्व होत असे. व्यवहारनिर्णय करण्यासारखे जवाबदारीचें व महत्वाचे कर्तव्य करण्याचा प्रत्येक ग्रामांतील लोकांस हरहमेश प्रसंग येत असल्यामुळे सत्यनिष्ठा, परस्परांचे वर्तनावर दाब ठेवण्याची हातोटी, तडजोडीनें एकत्र मिळून कामें करण्याची संवय, वगैरे अनेक नैतिक गुण महाराष्ट्रांतील लोकांचे अंगी प्राथमिक शिक्षणाच्या शाळा अस्तित्वांत नसतां हि नांदत होते याशिवाय काल आणि द्रव्य यांचा अकारण अपव्यय न झाल्याकारणानें सांपत्तिकदृष्टीनें महाराष्ट्रांतील लोकांचा जो फायदा होत असे, तो निराळा च. अशा प्रकारच्या या एतद्देशीय व्यवहारनिर्णय करणाऱ्या यंत्राचें उच्चाटण शके १७४० नंतर सन १८२७ सालांत अंमलांत आलेल्या रेग्युलेशन नंबर २ ने केलें हल्ली महाराष्ट्रांतील प्रत्येक ग्रामांतील रहिवाशांत दोन तट, क्षुल्लक कारणावरून परस्परांवर फौजदारी व दिवाणी खटले करण्याची प्रवृत्ति व त्यापायीं द्रव्य व काल यांचा भलताच अपव्यय करण्याची मूर्खपणाची हौस, चुगलखोरपणा इत्यादि गुण दृष्टोत्पत्तीस पडतात, हें स्थित्यंतर कशामुळें झालें ही मनन करण्यासारखी गोष्ट आहे.

(१) आतां आजच्या प्रतिपाद्य विषयाचे दुसरे भागाचें विवेचनाकडे वळतों. आजच्या व्याख्यानाच्या सुरवातीस व्यवहार शब्दासंबंधीं जो इशारा द्यावा लागला, तशा च प्रकारचा इषारा दुसऱ्या एका शब्दासंबंधीं या ठिकाणीं प्रथम देणें जरूर आहे.

धर्म म्हणजे काय

गेल्या पाउणशें वर्षांत कायदा हा शब्द आपल्या चांगल्या परिचयाचा झालेला आहे. तत् पूर्वीचा व तो अर्थ व्यक्त न करणारा परंतु तत्सदृश अर्थ व्यक्त करणारा शब्द म्हटला म्हणजे धर्म हा होय. राजानें अगर राजसत्तेनें निर्माण केलेल्या संस्थेनें प्रचारांत आणिलेले विधिनिषेधरूपी जे नियम तो कायदा अशी स्थूलमानानें कायद्याची व्याख्या होईल. या व्याख्येहून धर्म शब्दाची व्यापकता अधिक विस्तृत आहे. प्रस्तुत काळी धर्म हा शब्द उच्चारला असतां दान करणें अगर पारलौकिक कल्याणाचा मार्ग या दोन कल्पना आपल्या मनांत येतात. वर्णाश्रमआचारविषयक व व्यवहारविषयक विधिनिषेधरूपी श्रुतिस्मृती यांच्या आज्ञा तो धर्म असा पूर्व काळीं आपणांस परिचित असलेला धर्मांचा अर्थ होय. या शिवाय मनुस्मृतीचे आठवे अध्यायाचे ४१ वे श्लोकावरून (राजाच्या) विरुद्ध नसलेले ब्राह्मणादिकांचे याजनादि जातिधर्म, देशांतील लोकांचे देशधर्म व वाणी कारागीर इत्यादिकांचे कुलपरंपरागत धर्म यांचा हि धर्म या संज्ञेंत समावेश होतो असें दिसतें. बृहस्पतिस्मृतीतील मागें सांगितलेल्या २६ आणि २७ व्या श्लोकांवरून हि धर्म या संज्ञेचे व्याप्तींत शेतकरी, सुतार, लोहार इत्यादि कारागीर, चित्रकार, कर्जाऊ पैसे देणारे, समाईक भांडवलावर व्यापार करणारे. चोर इत्यादि जातीचे जे जे जातिधर्म असतील त्या नियमांचा हि धर्म या संज्ञेंत समावेश होत असे असें दिसून येतें. धर्म या शब्दाची आतां दर्शविलेली व्याप्ति लक्षांत ठेऊन आजच्या विषयाचे दुसऱ्या भागाचा विचार करावयाचा आहे.

शके १४०० ते १७०० चे दरम्यान गोत, देशक, न्यायाधीश अगर खुद्द राजा यांचेकडे कोणता हि व्यवहार निर्णय करण्याकरितां आला असतां त्या व्यवहाराचा निर्णय स्मृतिग्रंथांतील धर्मांचे आधारें होत असे असें पंधराव्या खंडांतील प्रसिद्ध झालेल्या व इतर कागदपत्रांवरून सिद्ध होत आहे. महाराष्ट्रांत याज्ञवल्क्यस्मृतीवर विज्ञानेश्वरानें केलेल्या मिताक्षरा टीकेस प्रमाणभूत समजलें जात असे, व त्यांतील प्रतिपादन केलेल्या धर्मांस अनुसरून त्या काळीं व्यवहारनिर्णय केला जात असे. स्मृतिग्रंथांत प्रतिपादन केलेले नियम काल्पनिक होते व व्यवहारांत त्यांचा साक्षात अंमल होत नसे असें कित्येक पाश्चात्य पंडितांचें मत

आहे. परंतु या मुद्यासंबंधीं आतां मी जो आपले पुढें पुरावा मांडणार आहे त्या वरून हें मत निराधार व गैरसमज उत्पन्न करणारें आहे अशी आपली खात्री होईल.

(२) पंधरावे खंडांत प्रसिद्ध झालेले व इतर व्यवहारविषयक कागदपत्रांचें निरीक्षण करितां, त्यांमध्यें ज्या व्यवहारविषयक संज्ञा आढळण्यांत येतात त्या

व्यवहारविषयक संज्ञा

अशाः— अग्रवादी, पश्चिमवादी, व्यवहार, व्यवहार-प्रवीण, सभा, धर्म, धर्माधिकारी, दिव्य इत्यादि. स्मृति-ग्रंथांचे व्यवहारअध्यायांतून आढळणाऱ्या संज्ञा या कागदपत्रांत हरहमेष येतात. यावरून स्मृतिग्रंथांत आढळणाऱ्या संज्ञा सामान्य प्रतीच्या लोकांत प्रचलित होत्या हें निर्विवाद आहे. स्मृतिग्रंथांतील तत्वांशीं परिचय असल्या खेरीज या स्मृतींतील व्यवहारविषयक संज्ञा सामान्य जनांत प्रचलित होण्याचा संभव नाही. या एवढ्या गोष्टीवरून हि स्मृतींतील नियमांचे आधारें व्यवहारनिर्णय केला जात असे असें अनुमान काढण्यास हरकत नाही. परंतु याहीपेक्षां महत्वाचा पुरावा म्हटला म्हणजे कांहीं कागदांत साक्षात स्मृतिग्रंथाचा व त्या ग्रंथांतील वचनांचा उल्लेख केला असून उत्पन्न झालेल्या वादग्रस्त प्रश्नांचा निकाल स्मृतिग्रंथांतील

स्मृतिग्रंथांतील वचनांचा उल्लेख

वचनांचे आधारें करण्यांत आलेला आहे. अशा प्रकाऱ्च्या उदाहरणांचें थोडक्यांत दिग्दिर्शन करणें जरूर आहे. परिशिष्ट लेख नंबर १ मध्ये पश्चिमवादी बाप्पाजी मुसुलमान यानें अशी तक्रार केली की, अग्रवादी नरसोजी जगदळे देशमुख हा दिव्य करण्यास राजी असल्यास मसूरचे पाटिलकीवरील सर्व हक्क सोडून देण्यास मी तयार आहे. बाप्पाजी मुसुलमानानें ही तक्रार पुढें आणण्यापूर्वीं नरसोजी जगदळ्यानें मसूरची पाटिलकी त्यांचे मालकीची आहे असे शाबित करणारे पुरातन कागदपत्र, पातशाही फरमान, थळपत्रे वगैरे हजर केलीं होती व नरसोजीनें तोंडी पुरावा हि दिला होता अशा स्थितींत कागदोपत्री व तोंडी पुरावा हजर करणाऱ्या वादीस प्रतिपक्ष दिव्य कर असें आव्हान करूं लागल्यास त्याची काय व्यवस्था करावी हा प्रश्न उपस्थित झाला; तेव्हां या प्रश्नाचा निकाल "थोर ग्रंथ विज्ञानेश्वर आणुन त्यांतील वचनांचे आधारें करण्याचें धर्माधिकारी यांनीं ठरविलें. विज्ञानेश्वरांनीं याज्ञवल्क्यस्मृतींतील दुसऱ्या अध्यायांतील २२ व्या श्लोकावरील टीकेंतः—

॥ यद्येको मानुषीं ब्रूयादन्यो ब्रूयात्तु दैविकीम् ॥
॥ मानुषीं तत्र गृह्णीयान्नतु दैवीं क्रियां नृप ॥

' ज्या अभियोगांत मानुषप्रमाणानें मुख्य एक देशाची सिद्धि होत असेल त्यांत हि दैवप्रमाणाचा आश्रय करूं नये, " असे वचन लिहिलें आहे. महजरांत

धर्माधिकारिणी यांनीं या वचनाचा आधार घेऊन बाप्पाजी मुसुलमानाचे आव्हाना-प्रमाणें नरसोजीस दिव्य करण्यास सांगतां येत नाहीं असा ठराव केला; व त्यांचे पुढें आलेल्या लेखी व तोंडी पुराव्यावरून व्यवहाराचा निर्णय केला. या च मुद्या-संबंधीं मिताक्षराटीकेंतील म्हणून दुसरें एक वचन महजरांत नमूद केलेलें आहे; परंतु तें वचन हल्लीं उपलब्ध असलेल्या मिताक्षराटीकेचे पुस्तकांतून कोठें आढळून येत नाहीं. तें वचन महजराची नक्कल करणारानें उतरून घेतलें आहे तें असें:—

॥ राते पत्रे मृते साक्षे देशे च प्रलयं ततः ॥
॥ त्रिमिसतत्र न विद्यन्ते चतुर्थं दिव्य साधनं ॥

व्याकरणदृष्ट्या हें वचन बरोबर नसून माझे एका विद्वान संस्कृतज्ञ मित्रानें या वचनाचा व्याकरणशुद्ध पाठ असा सुचविला आहे—

॥ गते पत्रे मृते साक्षौ देशे च प्रलयं गते ॥
॥ त्रयो यत्र न विद्यन्ते चतुर्थं दिव्यसाधनं ॥

कदाचित् त्या काळीं प्रचलित असणाऱ्या मिताक्षराटीकेच्या ग्रंथांत हें वचन असण्याचा संभव आहे.

मिताक्षराग्रंथातील आतां सांगितलेलें वचन व " थोर ग्रंथ विज्ञानेश्वर " अशा रीतीनें विज्ञानेश्वराचा केलेला उल्लेख यांवरून तत्कालीन महाराष्ट्रांत स्मृति-ग्रंथांबद्दल व त्यांतले त्यांत विज्ञानेश्वरानें केलेल्या मिताक्षराटीकेबद्दल किती अपूर्व आदर व पूज्यबुद्धि होती हें दिसून येतें.

वाईचे चित्राव घराण्याचे रा· राजवाडे यांचे संग्रहांतील अद्यापि अप्र-सिद्ध असलेल्या कागदपत्रांपैकीं शके १५९० श्रावण वा॥ ८ चें नरसिंह भट चित्राव विरूद्ध नारायण भट चित्राव यांचेमध्यें वाई येथील इनामाचे गरगशा-बद्दलचें प· ले· नं ५७ चें निर्णयपत्र आहे. या गरगशाचा निवाडा करण्याकरितां ब्रह्मसभा बोलावण्यांत आली होती. वडिलोपार्जित स्थावर मिळकतीचे वांटे करून घेतल्यानंतर विभक्त झालेल्या भावांपैकीं एकानें स्वकष्टानें नवीन मिळकत संपादन केल्यास त्या मिळकतीवर इतर भावांची मालकी पोंचते किंवा कसें हा प्रश्न होता. या मुद्यासंबंधीं निर्णयपत्रांत अशा प्रकारचा उल्लेख आहे:—

" कजबे मांडगणीचे समस्त बोलावून धर्मसभा करून निवाडा धर्मता पाहतां धर्मशास्त्र विज्ञानेश्वरग्रंथ आणून पाहतां वडिलांचे वृत्तीचें जें आहे तें वाटून घेऊन नांदताती आणि तीहीं वृत्तीवर आपल्या कष्टें करून जें मिळविलें असेल त्यास वरकडा वाटे करावयासी संबंध नाहीं. " ह्याप्रमाणें ह्या व्यवहाराचा धर्मसभेनें

निकाल केला. याज्ञवल्क्यस्मृतीचा व्यवहारअध्याय श्लोक १२० व त्यावरील मिताक्षराटीकेंतील तत्वास अनुसरून ब्रह्मसभेनें हा निकाल केला असें दिसून येतें.

या च सिद्धांतास बळकटी आणणारें आणखी एक तिसरें उदाहरण देतों. इतिहास-मंडलाच्या शके १८३४ च्या अहवालांत विश्वंभर गोसावी यांचे पुत्र दासोबा गोसावी यांचें शके १६१७ तील जयपत्र छापिलें आहे (प. ले. नं. ५९). मंत्रांगसहित मंत्रोपदेश व ज्ञानांगसहित ज्ञानोपदेश करण्याचे अधिकाराबद्दल दासोबा गोसावी व सर्वज्ञ गोसावी यांचे मध्यें व्यवहार होता. सभापती यांनीं या व्यवहाराचा निर्णय केल्यानंतर सर्वज्ञ गोसावी सभापतीस पुशिल्याविण पळोन गेले सबब ते पराजित झाले असा सभेनें निर्णय केला. सभेनें केलेल्या या निर्णयास जयपत्रांत आधार म्हणून याज्ञवल्क्यस्मृतीचे व्यवहारअध्यायांतील सहावे श्लोकावरील टीकेंतील वचन दिलें आहे. तें असें:—

॥ अन्यवादी क्रियाद्वेषी नोपस्थाता निरुत्तरः ॥
॥ आहूतः प्रपलायी च हीनः पंचविधः स्मृतः ॥

पांच प्रकारचे हीन वादी कोण कोण समजावे तें या वचनांत सांगितलें आहे. परिशिष्ट लेख नंबर ६९ हें मोरेश्वर पंडीतराव याचें शके १६०८ चैत्र शुा २ चे छत्रपति संभाजी महाराजांच्या कारकिर्दीतील एक जाहीर आज्ञापत्र आहे. गंगाधर रामचंद्र कुळकर्णी कमबे हरसूल यास बलात्कारानें मोंगलांनीं बाटविलें. पुढें छत्रपति संभाजी महाराजांनीं त्यास जातींत पावन करून घेण्याची आज्ञा केली. जातिभ्रष्टास पावन करून घेतां येतें की नाहीं, हा प्रश्न उपस्थित झाला. तेव्हां मिताक्षरादि निबंध पाहोन समस्त ब्राह्मणांच्या संमतीनें प्रायश्चित्त निर्वाह करून गंगाधर रामचंद्र यास पावन करून घेतला, असा ह्या पत्रांत उल्लेख आहे. ह्यावरून हि मिताक्षराग्रंथाचें व्यवहारप्रायश्चित्तादिनिर्णयाचे बाबतींत केवढें प्राधान्य होतें हें दिसून येतें.

परिशिष्ट ले. नंबर ८३ हा शके १५६४ जेष्ट शुा ११ चा राजश्री दादाजी कोंडदेव यांनीं गोताचे मजालसी समवेत केलेला निवाडा आहे. व्यवहार मौजे मलदे परगणे पुणें येथील मोकदमीबद्धल होता. दादाजी कोंडदेव यांनीं केलेल्या महजरांत याज्ञवल्क्यस्मृतींतील वचनांचा आधार देऊन त्या कामीं उत्पन्न झालेल्या कायद्याच्या प्रश्नाचा निवाडा केला. ह्या व्यवहाराची थोडक्यांत हकीगत अशी होती.

बाकोजी

सिदोजी × पुताई   बानजी

एसाजी   बाजी

बाकोजीस दोन मुलगे होते. सिदोजी आणि बानजी. सिदोजीची बायको पुताई व बानजीचा मुलगा बाजी. सिदोजी व बानजी यांची आपसांत वाटणी होऊन वतनाचा निमे हिश्याचा उपभोग स्वतंत्र रीतीनें घेत होते. पुढें सिदोजीचा मुलगा मयत झाला. बानजी व पुताई मागें हयात होते. पुताईनें एसाजी हयात असतां च एक पालकपुत्र बाळगला होता. बानजीचें म्हणणें सर्व मिळकतीचा मालक मी असून पुताईचा मिळकतीवर कांहीं हक्क नाही.

राजश्री दादाजी कोंडदेव यांनी निकाल असा दिला. "बानजीचे व सिदोजीचे विभाग पूर्वी च जाहले आहेती. विभाग जाहलियावरि विभागाची धनीण सिदोजीची पत्नी पुताई ते तो विभाग आपण भक्षुं अथवा पालक पुत्रास देऊं ए अर्थी बानजीचे संततीस समंध नाही एनदर्थी वचनें याज्ञवल्क्यः

।। पत्नी दुहितरश्चैव पितरौ भ्रातरस्तथा ।।

।। तत्सुता गोत्रजा बन्धुः शिष्यः सब्रह्मचारिणः ।। अ० २, १३५

।। पिंडदोऽशहरश्चैषां पूर्वाभावे परः परः ।। १३२ ।।

एखादा मनुष्य निपुत्रिक मेल्यास त्याची बायको, मुली, बाप, आई, भाऊ, आणि त्याचे मुलगे, गोत्रज, बंधु, शिष्य अगर स्वाध्यायी हे त्याचे वारस समजावे व वरील क्रमांत नमूद केलेल्या प्रत्येकाच्या अभावीं त्याचेपुढील नमूद केलेल्या इसमानें मयताची मिळकत वारस म्हणून घ्यावी.

या वर सांगितलेल्या औरसादि १२ पुत्रांतील पूर्व पूर्व पुत्राच्या अभावीं पुढचा पुढचा पुत्र श्राद्ध करणारा व धन घेणारा आहे असें समजावें.

वृद्धमनुरपि पत्न्याः समग्रधनसंबंधं वक्ति ।

अपुत्रा शयनं भर्तुः पालयंती व्रते स्थिता ।

पत्न्येव दद्यात्तत्पिंडं कृत्स्नमंशं लभेत चेति ।।

वृद्धमनुनें हि या वचनांत जिला पुत्र नाही अशा भर्त्याच्या शय्येचें पालन करीत व्रतस्थ असलेल्या पत्नीनें च त्याला पिंड देऊन सर्व धन घ्यावें असें म्हणून पत्नीचा समग्र धनसंबंध सांगितला आहे.

बृहस्पति—

कुल्येषु विद्यमानेषु पितृभ्रातृसनाभिषु ।
असुतस्य प्रमीतस्य पत्नी तद्भागहारिणी ॥

पिता, भ्राता, इत्यादि सपिंड जन विद्यमान असतांना हि मेलेल्या अपुत्राची पत्नी त्याचें धन घेते.

तस्मादपुत्रस्य स्वर्यातस्य विभक्तस्यामंसृष्टिनः
परिणाता स्त्री संयता सकलमेव धनं गृण्हातीति स्थितम् ।

तस्मात् मेलेल्या पुत्ररहित पुरुषाच्या भार्येला अन्नवस्त्रापेक्षां अधिक धन मिळत नाहीं असें म्हणणें हा शुद्ध मोह होय.

अशा प्रकारचे मिताक्षरेंतले आधार देऊन पुनाई सिदोजीच्या हिश्याची मालक आहे असें ठरविण्यांत आलें. वरील सर्व वचनें मिताक्षराटीकेंतील असून शेवटील वाक्य हा विज्ञानेश्वराचा सिद्धांत आहे. हें हि उदाहरण मीं या मुद्याचे विवेचनास सुरुवात करतेवेळीं जो सिद्धांत शाबित होत असल्याचें सांगितलें त्यास बळकटी आणणारें आहे. राजश्री दादाजी कोंडदेव हें व्यवहारप्रवीण होते असें ह्या निवाड्यावरून दिसतें.

परिशिष्ट लेख नंबर ८५ हें ह्या च मुद्यासंबंधीं बळकटी आणणारें आणखी एक उदाहरण आहे. हा लेख शके १५७३ वैशाख वा। १ चा महजर आहे. कृष्णाजी बिन संताजीचे भाऊ बाल पाटील यानें दुष्काळांत खावयास नव्हतें म्हणून निमी मोकदमी रामजी कुळकर्णी यास विकत दिली. खरेदीचे व्यवहाराबद्दल बाल पाटील यानें रामजीपासून कांहीं रोख रकम व कांहीं धान्य घेतलें होतें. पुढें कृष्णाजी बिन संताजी पाटलानें गोताकडे रामजीस खरेदी दिलेल्या निम्मे मोकदमीचा व्यवहार नेला. तेव्हां दहांजण गोत बसोन आपणांस खुशी करून मोकदमीचा निरख केला.

बाल पाटलास रामजी कुळकर्ण्यानें दिलेल्या रोख रकम व धान्याबद्दल दाम दुप्पट व कण तिप्पट या नियमांस अनुसरून जी रकम झाली ती देऊन कृष्णाजीस गोविंद राम कुळकर्णी याचेकडून निमी मोकदमी परत खरेदी देवविली. याज्ञवल्क्यस्मृतीचे दुसरे अ. श्लोक ५७ मध्यें दामदुपटीसंबंधीं जो नियम आहे त्यास अनुसरून गोतानें हा निर्णय केला हें उघड आहे.

परिशिष्ट लेख नंबर २०हा मीं केलेल्या विधानांस पुष्टी आणणारा आणिक एक पुरावा आहे. मौजे मांढरदेव तालुके वाई व आंबडे व वलूलनेर तालुके

उतरोली या गांवचे शिवेबद्दल खोबडे व मांडरे यांचे मध्यें वाद होता. या वादाचा निकाल दिव्यानें करण्याचा ठराव करून मांडरे यांचे वतीनें गांवमहारानें दिव्य करण्याचें ठरविलें. महारानें अग्निदिव्य केलें त्याबद्दल या लेखांत जें वर्णन दिलें आहे तें याज्ञवल्क्यस्मृतीचे दुसरे अध्यायाचे १०५ ते १०९ या श्लोकांत वर्णन केलेल्या अग्निदिव्याशी तंतोतंत जुळतें.

कुडाळ देशपांड्यांचे कागदपत्रांत व्यवहारधर्मांपैकीं एक दोन नियम आढळण्यांत आले ते ह्या ठिकाणीं नमूद करणें जरूर आहे. अंतो मलनाथ प्रभुणे आणि सोनोपंत अकलुजकर यांचेमध्यें देशकुळकर्ण आणि गांवकुळकर्णाबद्दल व्यवहार होता (प. ले. नंबर १०२). सोनोपंतानें रवा काढिला खोटा जाहला. तेव्हां ब्राह्मण म्हणून जीवें मारिला नाही. बोट कापून गाढवारूढ करून बाहेर काढिला. ब्राह्मणवाद्यांतील व्यवहार असला तर जो वादी खोटा ठरेल त्यास कोणत्या प्रकारचें शासन करण्यांत येत असें हें ह्या उदाहरणावरून दिसतें.

प्रभुणे यांचें वतन तिऱ्हाईत लोकांनी बळकाविल्यावर, प्रभुणे घराण्यांपैकीं एकानें वतन परत मिळविण्याची खटपट चालविली; व त्या कामांत त्यास मदत करण्याविषयीं त्यानें आपले भाउबंदास विनंति केली. भांडण करून वतन मिळविण्याचे खटपटीत सामील होण्याची त्यांची इच्छा नव्हती, सबब त्यांनीं मदत मागणारे गृहस्थास तुझा घटस्फोट केला म्हणून भरलेला तांब्या लंवडून देऊन वतन न लगे ऐसा कागद लिहून दिला. ह्या उदाहरणावरून त्या काळीं भाउबंदकीचा संबंध तोडण्याकरितां कोणत्या मार्गाचें अवलंबन करण्यांत येत असें हें स्पष्ट होतें. तात्पर्य श्रुतिस्मृतिप्रणीत,–त्यांतले त्यांत याज्ञवल्क्यस्मृतीवर विज्ञानेश्वरानें केलेल्य मिताक्षराटीकेंत प्रतिपादन केलेलें असे,–धर्म, शिवाय जातिधर्म व परंपरागत चालत आलेले कुलधर्म यांस अनुसरून शके १४०० ते १७०० दरम्यान महाराष्ट्रांतील व्यवहाराचा निर्णय गोत, देशक, न्यायाधीश, राजा, ब्रह्मसभा इत्यादि व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्था करीत असत, असें सिद्ध होतें. मोठमोठ्या व्यापाराचे शहरांतून व्यापारी लोकांत उत्पन्न होणाऱ्या व्यवहाराचा निर्णय कोणत्या नियमांस अनुसरून होत असे यांविषयीं निश्चित विधान करण्यास आज कांहीं साधन नाहीं. तथापि पुढें मागें आणिक व्यवहारविषयक कागदपत्र उपलब्ध होऊन प्रसिद्ध झाले म्हणजे त्यांबद्दल आपणांस कोणतीं निश्चित विधानें करितां येतील तें ठरेल.

३

(१) गोत, देशक, न्यायाधीश अगर व्यवहारनिर्णय करणारा राजानें नेमिलेला अधिकारी, अगर राजा यांकडे कोणता हि व्यवहार निर्णय करण्याकरितां

आला असतां त्या व्यवहाराचा निर्णय करण्याचे बाबतींत या संस्था कोणत्या पद्धतीचें अवलंबन करीत असत तें पाहूं. पहिली गोष्ट म्हटली म्हणजे अग्रवादी व पश्चिमवादी या दोघांकडून गोतांकडे अगर देशकांकडे व्यवहारनिर्णयाचें काम सोंपविण्यास राजी असल्याबद्दल व गोत अगर देशक जो निवाडा करितील तो मान्य करण्याबद्दल त्यांचे कडून लेख लिहून घ्यावयाचे. या लेखांस राजीनामा ही संज्ञा असे. कित्येक वेळां उभयतां वाद्यांकडून गोतानें दिलेल्या निवाड्याबर-हुकुम वर्तन करण्याबद्दल जामीन घेत असत. जामीनदारानें लिहून दिलेल्या लेखांस जमानकद्बे ही संज्ञा होती. शके १६८४ सालांतील पाध्ये व जोशी यांचे मध्यें ज्योतिषीवृत्तीचे व धर्माधिकरणाचे व्यवहाराबद्दल श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांचें जें निवाडापत्र (प. ले. नं. ६०) भारत इ. मंडळाचे शक १८३२ चे अहवालांत प्रसिद्ध झालें आहे, त्यांतील एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. खरोखरी वाद असतांना वाद्यांपैकीं एखादा वादी पंचांसमोर वाद करण्यास उभा न राहिला तर क्वचित् प्रसंगीं त्याचा पक्ष राजानें पंचांपुढें मांडून वादाचा निकाल करून घेण्याची पद्धति होती असें त्या निवाडपत्रावरून दिसतें. उभयतां अग्र-वादी व पश्चिमवादी यांचेकडून राजीनामे व जमानकद्बे लिहून घेतल्यानंतर वादाविषयीं परस्परांची काय हकीगत आहे ती लिहून घेऊन त्यावर उभयतांच्या सह्या घेण्यांत येत. या लेखी हकीगतीस तकरीर असें म्हणत. परिशिष्ट लेख नंबर ४३ हें तकरीरीचें नमूनेदार उदाहरण आहे. एखादे वेळीं वाद सांगणें बरोबर न वाटून उभयतां वादी आपसांत समजले तर आप-सांत समजुतीचा जो लेख होत असे त्यास सवादपत्र असें म्हणत. परिशिष्ट लेख नंबर ३५ हा सवादपत्राचा एक नमुना आहे. गोताकडे व्यवहार निर्णयाकरितां गेल्यानंतर गोताचे मध्यस्तीनें उभयतां पक्षकारांमध्यें आपसांत समजूत जाहल्यास आपसांत समजुतीप्रमाणें गोत निवाडा देत असे. असल्या निवाड्यास राजीनामा-पत्र असें म्हणत. प.ले.नं. ७१ हें राजीनामापत्राचें नमूनेदार उदाहरण आहे. अग्रवादी व पश्चिमवादी यांच्या तकरीरा लिहून घेतल्यानंतर कागदपत्री व तोंडी पुरावा घेण्यांत येई. एखाद्या व्यवहाराचा निवाडा खुद्द राजा अगर राजातर्फे नेमिलेला न्यायाधीश करीत असल्यास वादग्रस्त मुद्यासंबंधीं साक्षीदारांच्या ज-बान्या घेण्याचें काम महालाचे अधिकाऱ्यांकडे सोंपविण्यांत येत असे. राजाचे आज्ञापत्रांत नमूद केल्याप्रमाणें अधिकारी साक्षिदारांनीं सांगितलेला मजकूर लिहून घेऊन त्या लेखी जबान्या राजाकडे अगर त्यानें नेमिलेल्या अधिकाऱ्यांकडे रवाना करी. या लेखी जबान्यांस वगैरे म्हणत. क्वचित् प्रसंगीं वादग्रस्त प्रश्नाबद्दल साक्षीदारानें सांगितलेली माहिती लिहून घेऊन तीवर साक्षीदारांच्या सह्या व

मुद्रा घेण्यांत येत. या प्रकारच्या कागदास साक्षपत्र असें म्हणत. १५ वे खंडांतील लेख नंबर ५९ हें एक नमूनेदार साक्षपत्र आहे. पाटगांव मुक्कामीं श्री छत्रपती शाहूमहाराजांचा मुक्काम असतां त्यांचे बरोबर असणाऱ्या सरदारांनीं मसूरच्या देशमुखीच्या सनदा यादवांनीं छत्रपती शाहूमहाराज यांचेंकडून कशा मिळविल्या, व वास्तविक देशमुखी वतन कोणाचे मालकीचें होतें असे विषयीं जी माहिती त्या सरदारांना होती ती या साक्षपत्रांत नमूद केली असून या कागदावर त्यांच्या सह्या व मोर्तबें आहेत. असल्या साक्षपत्राचा व्यवहाराचा निकाल करिते वेळीं पुरावा म्हणून उपयोग केला जात असावा असें वाटतें. गोतापुढें आलेले कागदपत्रपुराव्यांत ग्राह्य अग्राह्य ठरविण्या.विषयींचे नियमांचा नमूना कागदपत्रांत आढळण्यांत येतो. सुप्याचे देशपांड्यांचें १६४४ तील देशपांडेवतनाबद्दलचें एक जयपत्र आहे (प. ले. नं. ४४). या व्यवहाराचा निकाल संगम माहुली एथें छत्रपती शाहूमहाराज यांनीं देशमुख, देशपांडे, गोत व देशक यांचे मजालसींत केला व्यवहारनिर्णयाचें काम चालूं असतां एका वाद्यानें पूर्वी झालेल्या महजराची नक्कल हजर केली. तेव्हां सभानायकीं फर्मावलें कीं अस्सल नाहीं तेव्हां ही नक्कल खोटी आहे. नामंजूर केली. त्या च प्रमाणें वडिलपणा शाबित करण्याकरितां जो कागद पुढें आणण्यांत आला होता त्यांत जागजागीं चित केली होती सबब तो हि कागद नामंजूर केला.

(२) साक्षिदारांच्या साक्षी घेण्यापूर्वी त्यांस कोणत्या प्रकारच्या शपथा शपथा व त्यांचे नमूने देत असत याचे कांहीं नमूने सांगतों. त्यांवरून त्या काळें लोकांची धर्मश्रद्धा कशा प्रकारची होती व त्या धर्मश्रद्धेचा उपयोग सत्यान्वेषणाचे कामीं कशा रीतीनें करीत असत हें दिसून येतें. कित्येक वेळां साक्षिदारांस प्रथम नदींत घालून मग त्यांस सत्य असेल तें सांगा असें सांगण्याचा प्रघात असे. परिशिष्ट लेख नंबर ५ मध्यें मौजे मजकुरचे बलुते बोलावून आणून श्रीचे देवालईं नेऊन त्यांस शपथ घालून विचारणें असा उल्लेख आहे. वाराणशींस गोहत्येचें पातक व ब्रह्महत्येचें पातक लागेल अशा प्रकारचो सर्वसाधारण शपथ देण्याचा प्रघात हि होता. परिशिष्ट लेख नंबर १२ मध्यें बारा बलुतें बोलावून आणून थळ कजबे उंबरज येथें श्रीकृष्णासंगमीं पाटिल, कुळकर्णी, चौगुले ऐसे कृष्णेमध्यें घालून त्यांचे माथां शपथ घालून विचारणें असा उल्लेख आहे. परिशिष्ट लेख नंबर ४२ मध्यें सत्यान्वेषणाकरितां कोण कोणत्या शपथा व तरतुदी करण्यांत आल्या होत्या हें महजरांतील शब्दांतच आपणांस सांगतों— वाद पाटिलकी वतनाबद्दल होता–

“ पिंपरीस जाऊन पांच महिने बैसोन गोते हरदो जणांच्या तकरीरा व कित्येक फाते मनास आणावयाचे ते आणले. सेवट गोताजवळी गांवीचे च

सडीस राजी झाले. त्यावरून गोते मौजेमजकुरांस सडी लिहिली कीं समस्त गोत व दहाजण बलुते व मोखतसर श्रीदेवाचे विहिरींत आंगोळी करून तुळशीच्या माळा गळ्यां घालून आपले लेख हातीं धरून तुमचे माथा मार्गीमहारांचे अशुद्ध असें चांभ.रकुंड व डोवरकुंड व रंगा(कुंड वोढून सात मंडले ओढून त्यांत उभे राहणें श्रीदेवाचे रंगशीळेवर उभे राहणें तुम्हांस गोहत्या ब्रह्महत्या असेती व गुरुद्रोही मात्रागमन सुरापान तुमचे पूर्वज स्वर्गी वाट पहात आहेत कीं पुत्र सत्य वदोन उद्धार करील किंवा खोटें बालोन नरकीं बुडवील धर्मे आपला पिता उद्धारिला श्री रघुनाथे पितयाची भाक सत्य केली तैसा तुम्ही आपल्या पूर्वजांचा उद्धार करून सत्य वदोन नेमस्त करून हरदोजणाचें वडीलपण तें लेहोन पाठविणें सडींचें प्रतीउत्तर लेहोन पाठविणें". आतांपर्यंत शपथेचे जे नमूने दिले त्यां सर्वांत हें नमूनेदार उदाहरण आहे. प. ले. नंबर ४४ मध्यें "कुल धर्मसभेस लहान थोरांस बेचाळिस पूर्वजांची व सत्याची व श्रींची शपथ घातली" असा उल्लेख आहे. प. लेख नंबर ५६ मध्यें " कृष्णातीरानजीक श्रीशिवनाथ देऊ कजवे रहिमतपूर क्रियेस नेमून पाठविले दोघे जण वादी श्रीकृष्णेंत उभे केले व पटेलास गोतास दिवाणें हुकुम केला कीं तुमचा वतनदार देशपांड्या जो कोणी खरा असेल त्याचा हात धरून बाहेर काढणें " असा उल्लेख आहे. प. लेख नंबर ४८ मध्यें "हिंदुधर्म असेल त्यांस श्री ज्ञानदेवाची शपथ देऊन व मुसुलमानांस कुराणाची शफत देऊन " असा उल्लेख आहे. अशा प्रकारच्या शफतांचा व क्रियेचा उपयोग करून नंतर साक्षिदाराची जबानी घेण्यांत येत असे.

(३) ह्या ठिकाणीं तोंडी अगर लेखी पुरावा नसल्यास अगर तोंडी पुराव्या-दिव्य वरून गोताची खात्री होत नसल्यास व्यवहारनिर्णयाचे बाबतींत गोत अगर देशकाकडून अगर न्याय निर्णय करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून कोणत्या मार्गाचें अवलंबन करण्यांत येई, याचा थोडक्यांत विचार करूं.

याज्ञवल्क्यस्मृतीचे दुसरे अध्यायाचे २२ वे श्लोकांत लेख, कायदेशीर ताबा आणि साक्षीदार हा कोणत्या हि व्यवहारांतला पुरावा होय. यांच्या अभावीं दिव्य हाच पुरावा होय.

॥ प्रमाणं लिखितं भुक्तिः साक्षिणश्चेति कीर्तितम् ॥
एषामन्यतमाभावे दिव्यान्यतममुच्यते ॥ २२ ॥

अशाप्रकारचें वचन आहे. व या च वचनाचे टीकेंत प. ले. नं. १ मध्यें नमूद केलेलें कात्यायनाचें " यद्येको मानुषी ब्रूयात " हें वचन आहे. यावरून मानुष प्रमाणांचा सर्वथा अभाव असला तर च दिव्य प्रमाणाला प्रमाण समजावें असा स्मृतिकाराचा ह्याबद्दल अभिप्राय होतो. व ह्या मतास अनुसरून च व्यवहार-

निर्णय करण्याचे कामीं दिव्याचें अवलंबन केलें जात असे. परिशिष्ट लेख नंबर १ वरून स्मृतिकाराची ह्या बाबतींत आज्ञा प्रमाण मानून त्यास अनुसरून व्यवहार-निर्णय करण्यांत येत असे असें स्पष्ट होत आहे. प.ले.नं. ७५ हा मौजे बेलवड बुा परगणे मजकूर येथील पाटिलकीचे व्यवहाराबद्दलचे हकीगतीचें टांचण आहे. गोतानें तोंडी पुरावा घेतला परंतु "संशयनिवास न होये मग सरकारचे कारकून व आम्ही मिळोन जेजुरीस गेलों व दुसरे दिवशी मल्हा·तीर्थीं स्नानें करून भोवर गांवकरी सभा कुल पासर आणून श्री जेजोरी लिंग याचे कासवावरी उभे करोन माथा भांडार घालोन ज्याची साक्ष त्यांजला वांचून दाखविली मग समस्तास त्रिरात्र पंचरात्रांचा नेम केले कोणास काही रखता ख्यानत जाहली नाहा तेव्हां पंचाईतानी-कयास केला की आवजी व महादजी एक भाऊ खरे". ह्या उल्लेखां-वरून दिव्य करण्यापूर्वी त्याहून सौम्य क्रिया करण्याचा प्रघात होता असें दिसतें. सर्व मार्ग खुंटले म्हणजे मग दिव्याचें अवलंबन करीत. आतां दिव्याचे कोणते प्रकार अस्तित्वांत होते ते सांगतों.

आतां दिव्याचे प्रकाराचें थोडक्यांत दिग्दर्शन करितों. दिव्य कर-णाराचे हात साबणानें शुद्ध धुवून नखें काढावयाची. नंतर पिशव्यांत हात घालून त्या बंद करून त्यांवर मोहोर करून तीन रात्र दिव्य करणारास अटकेंत ठेवावयाचा. पिशव्यांत हात घालण्यापूर्वी हातांवरील सर्व निशाण्या टिपून ठेवावयाच्या. तीन दिवसांनंतर चौथे दिवशीं देवालयाचे समीप सात मंडलें करावयाची. एक लोखंडाचा गोळा (लिंबा एवढा) तापवून लाल करावयाचा. दिव्य करणाराचे हातावर पिंपळाचीं पानें द्यावयाची. त्यांवर थोडें तूप अगर लोणी घालून त्यावर तो लोखंडाचा तापविलेला गोळा लोहारानें सांडसात धरून ठेवावयाचा. मग दिव्य करणारानें तो गोळा हातांत घेऊन सात मंडलें ओलांडून पुढें गवत ठेविलेल्या खड्ड्यांत तो गोळा टाकावयाचा. गोळा टाकल्यावर गवतानें पेट घेतला पाहिजे. नंतर फिरून पिशव्यांत हात घालून त्यांवर मोहोर करून तीन रात्र दिव्य करणा-रास अटकेंत ठेवावयाचा. नंतर पिशव्या सोडून हात तपासून पाहावयाचे. हातावर फोड दिसल्यास तो दिव्य करणारा व तो ज्या पक्षाचा असेल तो पक्ष खोटा ठरला असें समजण्यांत येई. हातांवर फोड वगैरे न आढळल्यास दिव्य करणारा पक्ष खरा समजला जाई. हा दिव्याचा प्रकार लेखांक नंबर २० मधील आहे.

लेखांक नंबर ८० तप्त महादिव्य केलें असा उल्लेख आहे. या दिव्याचें साग्र वर्णन तेथें दिलेलें नाहीं. परंतु प. ले. नं. ८१ मध्यें या दिव्याचें थोडें वर्णन दिलेलें आहे. यास च रवा काढणें असें म्हणतात. तूप अगर तेल तापवून त्यांत लोखंडाचा तुकडा टाकावयाचा. दिव्य करणारानें सात मंडलें चालत येऊन त्या तापलेल्या तुपांतील अगर तेलांतील तुकडा काढावयाचा. हातांस इजा जाहली

नाहीं असें दिसल्यास दिव्य करणारा खरा जाला असें समजण्यांत येई. तुकडा काढावयाचे पूर्वी हातांसंबंधीं तरतुदी आतां च सांगितल्याप्रमाणें प्रथम च करावयाच्या असत. इजा जाहल्याचें आढळल्यास दिव्य करणारा खोटा झाला असें समजावयाचें.

शिवाजी महाराजांचे कारकीर्दींत कुडाळच्या देशकुळकर्ण व गांवकुळकर्णाबद्दल प्रभूणे आणि अकलूजकर जोशी यांचें मध्यें वाद उत्पन्न झाला. ह्या वादाचा निकाल दिव्याचा आश्रय करून करण्यांत आला. रव्याचे क्रियेबद्दल इतकी साग्र हकीगत कोठें आढळली नसल्याकारणानें ह्या व्यवहारासंबंधीं हकीगतीचे कागदांतील साग्र उतारा खालीं देतोंः —

" या उपरि स्वामिनीं दिव्याचा निर्वाह करून राजीनामे मागितले. ऐसियास आम्ही राजी जाहलों. दिव्यमुखें खरे जाहलों तरी देशकुळकर्ण गांवकुळकर्ण दुबस्त खाउ. जोशी अकलूजकरास संबंध नाहीं. जर दिव्यमुखें खोटा जाहलो तरी सदरहु वतनास सर्व भावांस अर्थाअर्थी संबंध नाहीं. अयवादी जोशी झाले. त्यांनीं दिव्य करावें हा राजीनामा सही. जोशी अकलूजकर यांनी राजीनामे लिहून दिल्हे. .... राजीनामे तिघांनी लिहून दिल्हे. या उपरी कसबे पालि ता। उंबरज श्री खंडेराव या स्थली दिव्य नेमून देऊन वादी यांस पालिचे स्थलास पाठविले. तेथें गेलियावरि दिव्यास मुहूर्त नाहीं या करितां पंधरा सोळा दिवस अवलंबे तेथें च राहिले. राजश्री कृष्णाजी बल्लाळ सुभेदार प्रांत सातारा यांनीं मूहूर्त पाहिला. अप्पाजी खंडो व जानो महादेव यांचे हात धोवावयास गोलाविले. ते समईं बोलिले की आप्पाजीचे हातांस जळवात आहे. जानोबास चंद्रबळ नाहीं. तेव्हां अप्पाजी खंडो याचा धाकटा भाऊ सिवाजी खंडो यास चंद्रबल पाहून मजालस करून वैशाख वा। ५ ला शनिवारीं सिवाजीचा हात धुवून हाताची चिन्हें लेहून पिसवी घालून लाखोटा केला. दुसरे दिवशीं रविवारी षष्ठी प्रातःकालिं हर्जीर मज्यालसीस राजश्री यमाजी सिवदेव सुभेदार प्रांत व्याघ्रगड शाहाजी सिंदे देसाई ता। कुडाळ व पदाजी देसाई ता। मेढे सुभा व्याघ्रगड व स्थलकरी समस्त गोत देखील मजालस करून तेल तूप कोळसे मांइनप्रमाणें व रवें पात्र आणून व येथारीतीने दिव्य सिध करून सिवाजी खंडो यानें उचार केला कीं प्रभूणे पूर्वी आपण देशकुळकर्णी व गांवकुळकर्णी वतनदार ऐसें बोलोन दिव्य काढिलें. या उपरी तें च समयीं मागती हातास पिसवी घालून लखोटा करून सोमवारीं सायंकाळीं वरकड वादी यास खबर लेहून देऊन सातारियाचे मुक्कामी हुजूर पाठविलें. तिसरे दिवशीं मंगळवारी सिवाजीचा हात पहावयास आणिला. लखोटा तोडून पिशवी काढून हात पहातां अनामिके घोटास नखा शेजारल्या पेन्यांस याहे-

ल्या आंगें थोरा एवढा फोड आला व वरकड च्यारी बोटें व नखाच्या भोंवया फुगल्या. ऐसे हाजीर मजालसींत देखोन रवा लागला खोटा जाहला. "

ह्या दोन प्रकारांखेरीज मला तिसरा दिव्याचा प्रकार कोणत्या हि कागद्-पत्रांत आढळला नाहीं.

आतां क्रिया नेमणें व दिव्य करणें ह्या संबंधीं थेट मनुस्मृतीपासूनची परं-परा कशी आहे ह्याचें थोडक्यांत दिग्दर्शन करितों.

मनुस्मृतीचे ८ वे अध्यायाचे १०८ ते ११६ श्लोकांत ह्यासंबंधी विवेचन आलें आहे.

॥ यस्य दृश्येत सप्ताहादुक्तवाक्यस्य साक्षिणः ॥
॥ रोगोऽग्निर्ज्ञातिमरणमृणं दाप्यो दमं च सः ॥ १०८ ॥
॥ असाक्षिकेषु त्वर्थेषु मिथो विवदमानयोः ॥
॥ अविन्दन्तस्वतः सत्यं शपथेनापि लम्भयेत् ॥ १०९ ॥
॥ महर्षिभिश्च देवैश्च कार्यार्थं शपथाः कृताः ॥
॥ वसिष्ठश्चापि शपथं शेपे वै यवने नृपे ॥ ११० ॥ ॥
॥ न वृथा शपथं कुर्यात्स्वल्पेऽप्यर्थे नरो बुधः ॥
॥ वृथा हि शपथं कुर्वन्प्रेत्य चेह च नश्यति ॥ १११ ॥
॥ कामिनीषु विवाहेषु गवां भक्ष्ये तथेन्धने ॥
॥ ब्राह्मणाभ्युपपत्तौ च शपथे नास्ति पातकं ॥ ११२ ॥
॥ सत्येन शापयेद्विप्रं क्षत्रियं वाहनायुधैः ॥
॥ गोबीजकाश्चनैर्वैश्यं शूद्रं सर्वैस्तु पातकैः ॥ ११३ ॥
॥ अग्निं वाहारयेदे ।मप्सु चैनं निमज्जयेत् ॥
॥ पुत्रदारस्य वाप्येनं शिरांसि स्पर्शयेत्पृथक् ॥ ११४ ॥
॥ यमिद्धो न दहत्यग्निरापो नोन्मज्जयन्ति च ॥
॥ न चार्तिमृच्छति क्षिप्रं स ज्ञेयः शपथे शुचिः ॥ ११५ ॥
॥ वत्सस्य ह्यभिशप्तस्य पुरा भ्रात्रा यवीयसा ॥
॥ नाग्निर्ददाह रोमापि सत्येन जगतः स्पृशः ॥ ११६ ॥

अर्थः— ज्यानें साक्ष दिली आहे अशा पुरुषास सात दिवसांत जर कांहीं व्याधि जडली किंवा त्याचें गृह दग्ध झालें अथवा पुत्रादि निकट संबंधी एकाकी मरण पावला तर दैवानें च त्याचें मिथ्याभाषण सिद्ध केलें आहे असें जाणून धन-कोचें ऋण व राज्याचा दंड त्याच्यापासून घ्यावा. ज्यामध्यें साक्षी नाहींत अशा व्यवहारांत परस्पर वाद करणाऱ्या दोघांतील खरा कोण याचा

निर्णय करितां येईनासा झाल्यास न्यायाधीशानें त्यांस पुढील शपथा घालून सत्य जाणावें. सप्तर्षि व इंद्रादि देव यांनीं संदिग्ध कार्याच्या निर्णयासाठीं शपथा घेतल्या आहेत. यानें शंभर पुत्र खाल्ले असा विश्वामित्रानें आरोप केला असतां आपण शुद्ध आहों हें व्यक्त करण्याकरितां वसिष्ठानें हि यवन पुत्र जो सुदामा त्याच्या पुढें शपथ घेतली आहे. सुज्ञ पुरुषानें अल्पशा कारणाकरितां शपथ घेऊं नये. कारण व्यर्थ शपथ घेणारा पुरुष या लोकीं व परलोकीं हि नाश पावतो. ज्यास पुष्कळ स्त्रिया आहेत अशा पुरुषानें तूं च मला अतिशय प्रिय आहेस असें प्रत्येकीस खोटें च जरी सांगितलें तरी त्यांत दोष नाहीं. त्या च प्रमाणें विवाहप्रसंगी (मी दुसरी स्त्री वरणार नाहीं इत्यादि), गाईच्या गवता सारिख्या भक्ष्याकरितां, अग्निहोत्राकरितां, इंधनादिकांकरितां व ब्राह्मणाच्या रक्षणाकरितां शपथ वाहण्यांत कांहीं दोष नाहीं. ब्राम्हणाकडून सत्यशब्दाचा उच्चार करवून शपथ घेववावी. क्षत्रियाकडून वाहन व आयुध यांची शपथ घेववावी. व शूद्रास मला सर्व पातकें लागोत अशी शपथ घेणेस सांगावें. (ब्राह्मणादिकांनीं माझें सत्यादि निष्फळ होवोत असें म्हणावें). किंवा शूद्रादिकांकडून अग्नि आणवावा (त्याचा प्रकार असा–२०० तोळे भार लोखंडाचा आठ अंगुलें लांब एक तुकडा घेऊन तो लाल करावा व तो शूद्राच्या हातांत देऊन त्यास सात पावलें चालवावें), किंवा जळवा इत्यादि प्राणी ज्यांत नाहींत अशा जळांत त्यास बुडवावें. पुत्र व स्त्रिया यांच्या मस्तकांस पृथक् पृथक् स्पर्श करवावा. ज्यास प्रदीप्त अग्नि जाळीत नाहीं, पाणी वर उडवीत नाहीं व ज्यास मोठी पीडा प्राप्त होत नाहीं तो शपथ करितांना अति शुद्ध होतो असें समजावें. कारण पूर्वी एका वत्स नामक ऋषीस त्याच्या धाकट्या सावत्र भावानें तूं ब्राम्हण नाहींस शूद्राचा पुत्र आहेस असें म्हटलें असतां मी शूद्र नाहीं असें म्हणून आपल्या शुद्धीकरितां त्यानें अग्नीमध्यें प्रवेश केला. पण सर्व जगाच्या शुभाशुभकर्तव्यास हेरांप्रमाणें पाहणाऱ्या अग्नीनें सत्यामुळें त्याचा एक केंस हि जाळिला नाहीं

याज्ञवल्क्यस्मृतीचे ९७ ते ११५ श्लोकांत तुला, अग्नि, जळ, विष, आणि कोष ह्या निराळ्या पांच प्रकारच्या दिव्यांचें साग्र वर्णन दिलें आहे. नारदस्मृतींतील पहिले अध्यायाचे २३६ ते ३४८ श्लोकांत दिलेलें दिव्याचें वर्णन याज्ञवल्क्यस्मृतींतील वर्णनापेक्षां हि फार बारीक आणि साग्र आहे. याज्ञवल्क्यस्मृतींत सांगितलेल्या दिव्याचे प्रकारांखेरीज तांदुळ आणि सुवर्णाचे तुकड्याचे दिव्याचे प्रकाराचें वर्णन नारदस्मृतींत केलें आहे. रवा काढण्याचें जें दिव्य आहे तें नारदस्मृतींत वर्णिलेलें च दिव्य होय.

ह्या दिव्याचें साद्य वर्णन मिताक्षराटीकेंत दिलें आहे तें असें. ज्यास रवा ही संज्ञा आहे त्यास तप्तमाषविधि ही संज्ञा होती. हे विधी दोन प्रकारचे होते.

सोन्याचे, रुप्याचें, तांब्याचें किंवा मातीचें सोळा अंगुळें विस्तीर्ण व चार अंगुळें खोल मंडळ (वर्तुळपात्र) करावें. त्यांत तीस पलप्रमाण घृत किंवा तेल घालावें. त्याला चांगले तापवावें व तें तापून कडकडूं लागलें म्हणजे त्यांत सोन्याचा उडीद(किंवा एक मासा) भार तुकडा टाकावा. नंतर दिव्य करणारानें आंगठा व त्याच्या जवळचीं एकदोन बोटें यांनीं त्या तप्त माषाला वर उचलावें. त्याला उचलीत असतांना जो हात झाडीत नाही, किंवा ज्याच्या हातावर फोड येत नाहींत, ज्याच्या हाताचीं बोटें निर्विकार असतात तो धर्मतः शुद्ध होतो.

दुसरा प्रकारः—

सोन्याच्या, रुप्याच्या, तांब्याच्या, लोखंडाच्या किंवा मातीच्या पात्रांत गाईचें घृत घालून पवित्र पुरुषानें तें अग्निवर तापवावें. नंतर त्यांत सोन्याची, रुप्याची, तांब्याची किंवा लोखंडाची चांगली शुद्ध केलेली व पाण्यानें एकदां धुतलेली मुद्रिका टाकावी. त्यापूर्वी पात्रांत तापून सळसळत असलेल्या तुपांत ओलें पान सोडून तें चुर्रर असा आवाज करितें किंवा नाहीं तें पाहावें. नंतर परं पवित्रं या मंत्राने अभिमंत्रण करावें. मंत्राचा अर्थ असाः—हे घृता, तूं यज्ञकर्मांमध्यें परम पवित्र व अमृत आहेस यास्तव हे पवित्र करणाऱ्या घृता तूं पाण्याला जाळ. पवित्र पुरुषाला बर्फासारखें शीत हो. असो; ह्यानंतर उपोषण करून, स्नान करून, ओलेत्यानें आलेल्या शोध्यास ती घृतांतील मुद्रिका आंगठ्याजवळच्या बोटानें काढावयास सांगावें. नंतर परीक्षकांनी आंगठ्याजवळचें बोट पहावें. त्यावर फोड आलेले नसल्यास दिव्य करणारा शुद्ध आहे, व ते असल्यास तो अशुद्ध आहे असें समजावें.

आपस्तंबस्मृतीचे प्रश्न २ खंड २१ श्लोक ६ मध्यें दिव्याचें अवलंबन केव्हां करावें तें सांगितलें आहे. नारदस्मृतीचा २४९ वा श्लोक महत्वाचा आहे. जेव्हां एखादा भयंकर गुन्हा झाला असेल तेव्हां राजानें दिव्य करवावें. परंतु याव्यतिरिक्त पक्षकारास अगर साक्षीदारास न्यायी राजानें शपथा मात्र याव्या असा ह्या श्लोकाचा आशय आहे. ह्यावरून हि दिव्याचा उपयोग क्वचित् प्रसंगीं केला जात असे असें सिद्ध होतें.

स्मृतिग्रंथांतील आतां आपले निदर्शनास आणलेल्या श्लोकांवरून दिव्य आणि शपथा पुराव्याचे दृष्टीनें एका च वर्गांत पडतात हें स्पष्ट झालें आहे किंवा नेमण्याचे प्रघातासंबंधीं मीं जो उल्लेख केला आहे तशा च प्रकारचा

उल्लेख मनुस्मृतींतील पहिले श्लोकांत आलेला आहे. हे सर्व प्रकार मनुस्मृतीचे कालापासून पंपरागत न्यायनिर्णय करणाऱ्या संस्थांबरोबर च आपले समाजांत अस्तित्वांत आहेत हें निर्विवाद सिद्ध होत आहे. हल्लीच्या काळीं सुधारलेल्या समजलें जाणाऱ्या राष्ट्रांत हि शके १४०० ते १७०० चे दरम्यान दिव्य करण्याचा प्रघात सुरू होता. पॉप्युलर सायक्लोपीडियामध्यें व्हॉ. १० पृ. १८६ त असा उल्लेख आहे-

Besides this ordeal-ordeal of water (found in Prussia in the 17th and in the neighbouring countries in the 1st half of the 18th century) there was also the weighing of witches. It deserves to be mentioned as a singular instance that as lately as 1728 several witches were weighed at Szegedin in Hungary. With the exception of these few relics of ordeals the end of the 15th and the beginning of the 16th century are to be regarded as the closing period of them in Europe."

ह्या उताऱ्यावरून हि त्या काळांत दिव्य करण्याचा प्रघात पाश्चात्य देशांत अस्तित्वांत होता असें ठरतें. दिव्याचे युक्तायुक्ततेबद्दल प्रस्तुत स्थळीं विचार करणेचें कारण नाहीं. आतां जें विवेचन केलें आहे त्यावरून हि आजचे विषयाचे दुसरे मुद्यासंबंधीं मी जो सिद्धांत ठरविला आहे त्यास हि चांगल्या प्रकारची बळकटी येते.

ह्या कालांत दिव्याचा प्रकार अस्तित्वांत होता तरी दिव्य केल्यानंतर त्यासंबंधी लेख कोणत्या स्वरूपाचा होत असे हा प्रश्न आहे. परिशिष्ट लेख नंबर ८१ वरून ह्या प्रश्नाचा उलगडा होतो. सदरहु लेखांत "सदरहु कागद हाजीर मजालसी दाखविता यावरी मुनसफदारी खातिरेस आणतां दिव्य करून जमीन साधिली म्हणून सदरहु कागद लिहिला आहे. तरी जे वखती दिव होते ते वखती हरदो महालांचे कारकून व देशमुख व देशक व जवार व कोनेकुए मेळवून दिवाण होते तेथें महजर त्यांची नांवें निशाणें करून महजर करिताती ए कागदी तैसा आणल नाहीं यासी तो कागद रुजू न पडे बातल करून दूर केला" ह्या उताऱ्यावरून दिव्य करण्यांत आलें म्हणजे कोणते विधी करावे लागत हें स्पष्ट आहे. परिशिष्टांत नमूद केलेल्या कागदांतील दोन उदाहरणांवरून दोन गांवच्या सिवेसंबंधीं तंटा असल्यास त्या तंट्याचा निकाल करण्याकरितां दिव्याचा आश्रय करण्यांत येत असे असें दिसतें. गांवच्या सीमेचे वादांत लेखी अगर नोंदी विश्वसनीय पुरावा मिळणें दुरापास्त असे व असें स्थितींत स्मृतिग्रंथांत सांगितलेल्या

नियमांस अनुसरून दिव्याचें अवलंबन केल्याखेरीज गत्यंतर नसे. ग्रामांतील बारा बलुत्यांपैकीं महार हा ग्रामाचे सीमेचा रक्षक समजला जात असे. व ग्रामसिमेचे वादांत गांवमहारानें दिव्य करण्याचा प्रघात होता. परिशिष्ट लेख नंबर २० मधील व्यवहारासंबंधीं दिव्य गांवमहारानें केलें.

लेखी व तोंडी पुराव्याचा विचार करून गोत, देशक, न्यायाधिकारी अगर खुद्द राजा जो निवाडा देत असे त्यास थळपत्र, गोतपत्र, गोतमहजर, देशक महजर, निवाडापत्र, निर्णयपत्र या संज्ञा असत. परि. ले. ७२ वरुन कोणत्या हि व्यवहारासंबंधीं महजर जाला म्हणजे त्यावर ठाण्याचे अधिकाऱ्याची मुद्रा घेण्याची वहिवाट होती. वाद्यांपैकीं ज्याचा वादांत जय होई त्यास गोत अगर देशक वादांत जय पावला अशा बद्दलचा लेख करून देत असत. त्यास जयपत्र ही संज्ञा होती. परिशिष्ट ले. नं ४४.५९ हे जयपत्राचे नमुने आहेत. व्यवहारांत वाद्याचा पराभव होई तेव्हां त्याचेकडून वादांत पराभव पावल्याबद्दल, गोत अगर देशक जो लेख लिहून घेत असत त्यास यजितपत्र म्हणत (प. ले. नं. १९). वादांत जय पावलेल्या वाद्याकडून जी रक्कम घेण्यांत येई तीस शेरणी म्हणत, व पराभव पावलेल्या इसमाकडून जी रक्कम घेण्यांत येई तीस हरकी अगर गुन्हेगारी असें म्हणत. गोताकडे व्यवहारानिर्णयाचें काम चालूं असतां वादग्रस्त विषयासंबंधीं एखाद्या विशिष्ट रीतीनें वादाविषयीं हकीगत सांगितल्यास त्याप्रमाणें उभयतां वागण्यास तयार आहेत अशी उभयतां वादकरणारांनीं कबुली दिल्यास ठरल्याप्रमाणें क्रिया करून त्याबद्दलची माहिती अगर दाखला मागवावयाचा त्यास सडीपत्र असें म्हणत. आतां च शपथेचें नमूनेदार उदाहरण म्हणून ले नं. ४२ चा उल्लेख केला तें सडीपत्राचें नमूनेदार उदाहरण आहे. पंढरपुरचे आराध्ये यांचे कागदपत्रांत श्री क्षेत्र व पेठ शिंगणापूर स्थळीचा शके १५६० तील एक कागद आहे त्यावरुन थिटे, आराध्ये व बडवे यांचे मध्यें उत्पन्न झालेल्या व्यवहारासंबंधीं त्यांस श्रीक्षेत्र शिंगणापूर येथें पाठविण्यांत आलें होतें. गोतापुढें बडवे हजर झाले नाहींत सबब निवाडा न करितां आराध्ये व थिटे यांस शिंगणापूरचे सभेनें परत पाठवून दिलें.

एखादा वादी गोतापुढें हजर न झाल्यास त्यास हजर राहणें भाग पाडण्याकरितां काय तजवीज करण्यांत येत असे असेविषयीं उपलब्ध झालेल्या कागदपत्रांवरून कांहीं निश्चित अनुमान करितां येत नाहीं.

याप्रमाणें व्यवहारनिर्णय करण्याच्या पद्धतीचें स्थूल स्वरूप निरीक्षण केलेल्या कागदपत्रांवरून दिसलें तें आपलेपुढें मांडिलें आहे. आतां सुरल महजर या नांवाचा कोल्हापूर धर्माधिकारी यांचे कागदांपैकीं शके १६२९ आषाढ वद्य ८च्या एका कागदाबद्दल थोडें विवेचन करितों. राघो सखो व विसाजी काशीनाथ आथर्ववेदी यांचेमध्यें सटाउच्या देशपांडेपणाविषयींचा कथळा होता. तो गोताकडे पाठविला. गोतानें पूर्वीचे

महजर कागदपत्र वगैरे मनास आणून हरदोवादी यांस श्रीकृष्णेची क्रिया नेमिली. कृष्णेची क्रिया नेमिली याचा अर्थ ध्यानीं येण्याकरितां महजरांतील च हकीगत निवेदन करितों:—" दोघे वादी श्रीकृष्णेमध्यें उभे केले आणि पटेलास व गोतास दिवाणें हुकूम केला कीं तुमचा वतनदार देशपांड्या जो कोणी खरा असेल त्यास हातीं धरून बाहेर काढणें म्हणून हुकूम केला. त्यावरून पटेल व बाजें गोत यांनीं जाऊन विसाजी कासी यास हातीं धरिलें आणि माघारें मुरडतें वेळेस कृष्णेंत च पडले. येणेंप्रमाणें दोघेजण आडखळोन पडले तेव्हां च तुम्ही कुलमजालसीस जाहीरान केला. परंतु कोण्हे खानरेस आणिलें नाहीं यावर दसरात्र पंचरात्रीमध्यें त्यांस क्रिया लागली बीा तपशील. " यानंतर क्रिया लागणारांपैकी कोणी मेला, कोणाचें घर जळलें किंवा कोणाचा जवळचा नातेवाईक मेला, अशी तपशीलवार माहिती दिली आहे. "येणेंप्रमाणें क्रिया लागली हें मनास आणून ऋग्वेदी यांस व अथर्वणास रांगणीयास रवाना केलें असे. हा सुरत महजर लिहून दिला." महजराचें विशेषण या दृष्टीनें सुरत या शब्दापासून कांहीं अर्थनिष्पत्ति होत नाही. मूळ कागद मोडींत लिहिलेला असून त्याची नक्कल करणाराचे हातून हा शब्द लावण्यांत कांही चूक झाली असावी असें वाटतें. कदाचित् सुरत याचे ठिकाणीं वास्तविक चुरस हा शब्द असावा असें वाटतें. ज्याशसून वाईट परिणाम होतो तें दर्शविण्याकरितां चुरस या विशेषणाचा उपयोग करितात. क्रिया बाधल्यामुळें वाईट परिणाम झाला, सबब चुरस हें विशेषण या महजरास दिलें असावें असें वाटतें. दिनकर रामदास यांचे कागदांपैकीं शके १६२३ तील (प० ले० न. ६२) महजरनामा मिरासपत्र या नांवाचा एक कागद आहे. या कागदांतील मजकूर उपलब्ध न झाल्याकारणानें या कागदाचें स्वरूप निश्चित करितां येत नाहीं.

(४) एकदां एखाद्या व्यवहाराचा गोतानें निर्णय केल्यानंतर तो च व्यवहार फिरून कोणीं उपस्थित केल्यास त्या व्यवहाराचा फिरून निर्णय न करितां पूर्वीचा च निर्णय कायम समजला जात असे. शिरवळ देशपांड्यांचे कागदांपैकीं शके १५९४ श्रावण शुा प्रतिपदेचे महजरावरून या मुद्याची शाबिती होते. प. ले. नं. ४६ निगडी येथील देशमुखीचे वादाबद्दलचा आहे. या व्यवहाराची चौकशी चालू असतां

एखाद्या व्यवहाराचा निर्णय झालेला असल्यास फिरून निर्णय करूं नये

ह्या च व्यवहाराबद्दल कसबे हरणस मौजे वेळवंड भोरे येथील गोतानें निवाडा केल्याचें दिसून आलें तेव्हां हरणसच्या गोतानें केलेला निवाडा कायम करण्यांत आला. मनुस्मृतीचे ९वे अध्यायाचे २२३वे श्लोकामध्यें "ज्या एखाद्या ऋणदानादि व्यवहारामध्यें जें कार्य यथाशास्त्र करून सोडलें आहे म्हणजे त्याचा एखादा निर्णय

झाला आहे व जें दंड देऊन समाप्त झालें आहे ते धर्मतः झालें आहे असें समजावें व पुनरपि त्यांस फिरवूं नये " असें तत्त्व ग्रथित केलें आहे. या तत्त्वास अनुसरून च गोतानें फिरून चौकशी न करितां पूर्वीचा निवाडा ग्राह्य केला:

(५) एखादा वादी पैशाच्या अभावी अगर इतर कांही कारणामुळे वाद सांगण्यास असमर्थ असल्यास द्रव्यबळ असलेल्या इसमास आपली मिळकत खरेदी देऊन वंशपरंपरा वाद सांगण्याचे कामी खरेदी घेणारने खरेदी देणारास मदत करावी, अशा स्वरूपाचे कागद त्या काळी करण्याचा प्रघात असे. परिशिष्ट लेख नंबर १३ हे शके १६१० तील क्रयपत्र आहे. तें क्रयपत्र महादजी जगदळे यांस बाबाजी बिन गंगाजी यानें लिहून दिले आहे. मौजे शिरवड गांवचे पाटिलकीबद्दल नाईकवाडी कुणबी यांनी बाबाजी बिन गंगाजी याचेपाशी कथळा सुरूं केला. तेव्हां बाबाजीने महादजी जगदळे यास त्याची पाठी राखण्याबद्दल व नाईकवाडीयासी वादवेवाद सांगण्याचे कामी विनंति केली जगदळे यांनी वाद सांगून नाईकवाडी खोटे ठरले. याबद्दल बाबाजीने त्याचे मालकीची निम्मे पाटिलकी महादजीस खरेदी दिली खरेदीखतांत " नाईकवाडी याचे लिगाड जें पडेल तें तुम्ही वारावें आपण पाठी राखावें " अशी शर्त महादजीने कबूल केल्याचा उल्लेख आहे. परिशिष्ट लेख नंबर ७० हें असल्या स्वरूपाचें दुसरे एक उदाहरण आहे.

वादी वाद सांगण्यास असमर्थ असल्यास त्यास मदत देण्याची पद्धत

उभयतां वादीतर्फे गोत अगर देशक यांचेपुढे वाद सांगण्याकरिता त्या काळी वकिलांचा वर्ग आस्तित्वात असल्याचें या कागदपत्रावरून दिसून येत नाही.

(४)

(१) आता व्यवहारनिर्णयाचे कार्य सुकर होण्याकरितां त्या काळी कोणकोणत्या प्रकारच्या तरतुदी अस्तित्वात होत्या तें पाहू. पाटिलकी, देशमुखी, देशपांडे-कुळकर्णी-वतन व जोतिषी वगैरेंसारख्या वृत्तीच मालकानें वतन अगर वृत्ती सर्व अगर कांहीं भाग तिऱ्हाइत इसमांस विकल्यास त्याबद्दल क्रयपत्र अगर खरेदीखत करण्याचा प्रघात होता, परंतु असल्या स्वरूपाचे व्यवहार महत्वाचे असल्याकारणानें खरेदीखतांत च गोताचा, देशकाचा, ठाणा व राजमुद्रा यांचा महजर करून देण्याची शर्त असे. अशा स्वरूपाचे महजराचे नमूने प. ले. नंबर १८,२२,२५,८९,९० वगैरे आहेत. वास्तविक उभयतां पक्षकारांमध्यें कोणत्या हि प्रकारचा तंटा नसतां पुढेमागें झालेल्या व्यवहारासंबंधी कोणत्या हि प्रकारची भानगड होऊं नये व तशा प्रकारची भानगड

खरेदीचे व्यवहाराबद्दल महजर करून घेण्याचा प्रघात

उत्पन्न झाल्यास तो व्यवहार गोताचे संमतीनें झालेला असल्याकारणानें खरेदा घेणाराचे मालकीस बाध येऊं नये ह्या हेतूनें अशा स्वरूपाचे महजर करण्यांत येत असावे असें दिसतें. महजरनिवाडा झाल्यानंतर त्यावर ठाण्याचे अधिकाऱ्याची मुद्रा घेण्यांत येई (लेखांक नंबर ७२).

गोत व देशक यांजकडे वाद गेला असतां त्यांचे वियमानें समजूत झाल्यास त्यास राजीनामापत्र असें म्हणत (लेखांक नंबर ७१).

परिशिष्ट लेख नंबर ७० हा शके १६१३ कार्तिक शुा १३ चा नेमपत्र ह्या नांवाचा एक कागद आहे. ह्यावरून आतां सांगितलेल्या स्वरूपाचे व्यवहार गोतसभेचे वियमानें होत होते असें सिद्ध होतें. कृष्णाजी बुलगो वगैरे देशकुळकर्णी परगणे खटाउ याचे देशकुळकर्णाचें वतन एक अथर्वण बळकावून बसला. अथर्वणास दूर करण्याचें सामर्थ्य कृष्णाजी बुलगो वगैरेंत नव्हतें सबब ते रामचंद्र निळकंठ यांचेकडे दाद मागण्यास गेले तेव्हां गोताचे वियमानें नेमपत्र होऊन परस्परांत करार ठरले ते असेः—

रामचंद्र निळकंठ यांनी मान्य केले जे तुह्मांस पाचपोर देशकुळकर्णी व गावकुळकर्णी व जोतिषी ऋग्वेदी पाटील मजकूर हे आपण पदरीं घेतले आजिपासोन तें आपले भाऊ यानी व आपण अथर्वण मजकूर देवमूलें गोतमूलें व हामशाई मिरासदार यांच्या वियमानें मारून काह्राडावें आपली पाठी व साहना पुरवावी ह्याबद्दल निम्में वतन रामचंद्र निळकंठ यांस कृष्णाजी बुलगो वगैरेंनीं द्यावें.

वतनासारख्या महत्वाच्या मिळकतीसंबंधीं कोणता हि व्यवहार जाहल्यास तो जाहीर रीतीनें व्हावा; हे असले व्यवहार गोताचे वियमानें करण्यांत हेतु दिसतो.

परिशिष्ट लेख नंबर ७३ हा एक दुसरा महत्वाचा महजर आहे. " राम सेटी बिन सद सेटी परगणे पाटण हा गोताकडे आला व त्यानें तक्रार केली कीं साहेबसेवा पडते. सेवा करून कुटुंबाचा चरितार्थ चालत नाहीं. सबब कुटुंबाचा योगक्षेम चालेल व सेवा हि करितां येईल अशी तजवीज व्हावी. गोतानें ही हकीगत मनास आणून राम सेटी यास बहुमतानें सरसेटीपणाचे वतन करून दिलें. यास हकलाजमा बाा हक्क जाबीता आलाहिदा करून दिला असे. इनाम सरसेटेपणाचा खावा. घोडा व अफ्तगीर बिलाकसूर द्यावी. दोनी बाजार भरावा.'' याप्रमाणें गोतांनीं रामसेटी यास महजर करून दिल्हा. सरकारी अधिकाऱ्यांचे सरबराईबद्दल हें सरसेटेपणाचें वतन रामसेटी यास गोतानें करून दिल्याचें दिसतें.

परिशिष्ट लेखांक नंबर १८ हा शके १६५३ मार्गशीर्ष शुा ५ चा आतां सांगितलेल्या स्वरूपाचा महजर आहे. तर्फे अंतरुज मामले फोंडा येथील सरधर्माधिकारिणी व सरजोतिषी वृत्तीवर ... भास्करभट सफ्रे आपली मालकी सांगत होता. ह्या महजरांत असले महजर करण्याचा हेतु स्पष्टपणें नमूद करण्यांत आला आहे. व ह्या दृष्टीनें ह्या महजराचें फार महत्व आहे सरसुभेदारानें भास्कर भट सफ्रे यास पंचांसमोर हजर होऊन आपला वाद सांगण्याबद्दल हुकूम केला. सफ्रा हजर जाहला नाहीं. हें वर्तमान सरसूभेदार यास विदित जालें. नंतर "सफ्रा मजकूर दुर्बुद्धीनें उपाद्धे यांजबरोबर वेव्हार करीत होता नीतीचा अर्थ करीत नाहीं ऐसे कळोन भास्कर भट सफ्रा यास किलेच्या बुरुजावर नेऊन ठेविला आणि समस्तांस आपापले स्थळीं सूखरूप जाऊन राहणें म्हणोन आज्ञा केली ते प्रमाणें उपाधे हि स्वस्थळीं गेले." हा मजकूर कोणे हि समयीं कोठें हि सर्वांस जाहीर असावयाकरितां हा महजरनामा लीहीला आहे. ह्यावरून असल्या प्रकारचे महजर करण्यांत वतनासारख्या महत्वाच्या मिळकतीसंबंधीं व्यवहार सर्वांस जाहीर व्हावे हा हेतु होता हें सिद्ध झालें. हल्लींचे रजिस्ट्रेशनअॅक्टाचें जें कार्य तें च कार्य या प्रघातानें सिद्ध होत असे. या खेरीज एखादी महत्वाची गोष्ट घडली व पुढें मागें वाद उत्पन्न झाल्यास त्या गोष्टीची शाबिती होणें महत्वाचें आहे असें वाटल्यास ती गोष्ट गोतास निवेदन करून घडलेल्या गोष्टीचे अस्तित्वाबद्दल गोताचा महजर करून घेतां येत असे. या स्वरूपाचे महजराचें उदाहरण ले. १३ हें आहे. वतनाचे खरेदीविक्रीचा व्यवहार झाला म्हणजे क्रयपत्र खेरीज गोताचा महजर करून घेऊन शिवाय खरेदी देणारानें खरेदी घेणारास एक निराळा कागद लिहून द्यावा लागत असे. या कागदाचा नमूना ले. २० हा आहे; व यास शर्तनामा ही संज्ञा होती.

आजच्या प्रतिपाद्य विषयाचे चौथे भागासंबंधीं सांगण्यासारिखें होतें तें सांगितलें. शक १४०० पासून शक १७०० पर्यंतच्या महाराष्ट्रांतील व्यवहारनिर्णयपद्धतीसंबंधीं आज मीं जीं कांहीं विधानें आपल्यांपुढें मांडिली आहेत तीं अमर्दीं निर्दोष आहेत अशी प्रतिज्ञा माझ्यानें करवणार नाहीं. उपलब्ध झालेल्या कागदपत्रांचे निरीक्षणावरून जे विचार मनांत आले ते आपणांस निवेदन केले आहेत. व्यवहारासंबंधीं अजून हि अशा हजारों बाबी आहेत कीं त्यांबद्दल मला आज कांहीं सांगतां आलें नाहीं. तथापि तशा प्रकारचें सांगोपांग विवेचन करण्यास हल्लींहून हजारों व्यवहारविषयक कागद उपलब्ध झाले पाहिजेत. अशा प्रकारचे कागद उपलब्ध झाल्यास व या गोष्टीकडे एखाद्या श्रेष्ठ व विद्वान कायदेपंडिताचें लक्ष्य गेल्यास मुसुलमानी व मराठी अमदानीतील व्यवहारनिर्णयपद्धतीचा

एक सर्वांगसुंदर व सांगोपांग असा मराठ्यांच्या इतिहासाच्या शतशः भागां-पैकीं एक भाग आपणांस लवकर च वाचावयास मिळेल अशी आशा व्यक्त करून मी हें आजचें विवेचन पुरें करितों.†

भा. वा. भट

५ श्रीसमर्थांनीं स्वहस्ताक्षरें लिहिलेलें पत्र

श्रीसमर्थ संप्रदायाच्या इतिहासाचीं साधनें मिळविण्याचा प्रयत्न सुरू होऊन अकरा वर्षें होत आलीं, तरी अजून श्रीसमर्थांच्या हातचें असें एक हि पत्र उपलब्ध होईना, तेव्हां जवळ जवळ असें वाटूं लागलें कीं, श्रीसमर्थ बहुधा स्वतः पत्रें लिहीत नसावेत व त्यांच्या हातचीं दिव्य पत्रें पाहण्याचें आपल्या नशिबीं नाहीं. श्रीमत् दासबोधाची जी मूळ प्रत श्री कल्याण स्वामींच्या हातची आहे तींत ठिकठिकाणीं श्रीसमर्थांनीं स्वतः शोध घातलेले आहेत, अशी दंतकथा आहे व त्यांनीं कल्याणांना घालून दिलेला कित्ता, एकाद्या जुन्या पोथीच्या पानाप्रमाणें असलेला कल्याणस्वामींच्या मठांत आहे. याशिवाय श्रीसमर्थांच्या हातचा असा लेख आजपर्यंत मिळाला नव्हता. एखाद्या पत्राच्या दोन ओळी जरी त्यांच्या हातच्या मिळतील तरी महाराष्ट्राचें केवढें भाग्य होय असें वाटे ! मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें मिळवून तीं प्रकाशित करणारे रा. राजवाडे तर असें म्हणूं लागले कीं, यावरून असें दिसतें कीं ही थोर विभूति हातानें लिहित नसे तर कार्यें घडवून आणीत असे, तेव्हां त्यांच्या हातचें पत्र मिळणें दुर्घट च होय.

पण श्रीसमर्थांची महाराष्ट्रावर ही केवढी कृपा होय कीं, जेथें नुसत्या दोन ओळी मिळाल्या तरी महाराष्ट्र स्वतःस धन्य मानता, तेथें आज बरोबर बावन ओळींचें शुद्ध श्रीसमर्थांनीं लिहिलेलें मोडी पत्र उपलब्ध झालें आहे. त्या पत्रांत श्रीसमर्थमुखींचे शब्द आहेत कीं, "तुमचें मन मजवरी बहुत आहे ते तुमचे आवडीच्या गुणें कल्याण होईल. ऐसें नेमस्त चिन्ह दिसतें." हें वाक्य जणूं काय विद्यमान महाराष्ट्राला उद्देशून च श्रीसमर्थांनीं लिहिलें आहे, अशी कल्पना करण्यास कांहीं प्रत्यवाय वाटत नाहीं. श्रीसमर्थांच्या ठायीं पूर्ण निष्ठा ठेवणें, हा च आपल्या कल्याणाचा मार्ग होय ! असा साऱ्या महाराष्ट्रास श्रीसमर्थांचा आशीर्वाद आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

असें तें पत्र वाचून दाखविण्यापूर्वीं थोडी पूर्व हकिकत सांगितली पाहिजे; कारण प्रत्यक्ष पत्रांत तें कोणीं आणि केव्हां लिहिलें याचा उल्लेख नाहीं. तेव्हां तें

† परिशिष्ट ग्रंथाचे शेवटीं जोडलें आहे.

पत्र केव्हां लिहिलें आणि तें श्रीसमर्थांनीं च लिहिलेलें आहे, असें मी म्हणतों तें कां, याचा आपणांस प्रत्यय यावा म्हणून दुसऱ्या एका पत्राचा येथें निर्देश केला पाहिजे.

श्रीसमर्थशिष्य विठ्ठल गोसावी यांनीं शके १६०४ चे सुमारास दिवाकर गोसावी यांस लिहिलेल्या एका पत्राची नक्कल दिवाकर गोसावी यांच्या वंशजाकडे मिळाली आहे. नक्कल हि तत्कालीन च दिसते. त्या पत्रांत विठ्ठल गोसावी लिहितात:--

" + + + + + + + + + + + + + उपरी आनंदसंवछरी श्रीसमर्थ हेलवाकीचे घळयेस होते च्यातुर्मास तेथे क्रमिले सीतलाई बहुत जाली म्हणून उष्णदेशासी चाफलाकडे आले हेलवाकीचे घलयेस कितेक कार्ये सीध होणे होते म्हणून वेदमूर्ती रघुनाथ भट नवहस्त पंडितराये श्री चे उपाध्ये व पुराणीक श्रीनीं त्यांस कृपा पूर्वक हे वृत्ती करून पूर्वी च दिली होती त्यासी ते स्थल सीध करावयासी ठेविले आप चाफलास आले नवसाची समाराधना श्री चेद्वारी केली शूद्राचे भोजन सीगणवाडीस केले दुसरे दिवसी पंडितरायासी कितेक समाधानाची उतरे जैसा दिवाकर गोसावी तैसे च तुम्ही म्हणून गौरवयुक्त स्वहस्ताक्षरे पत्र लिहिले आणि शाहापुरास जावयास आश्वारूढ होऊन स्वार जाले + + + + + + + + + "

त्या पत्रांतील जरुर तेवढा च भाग आपणांस सादर केला आहे. हा भाग लक्ष्यांत ठेवून आतां मी वाचून दाखवितों तें पत्र ऐकावें.

[अस्सल-मोडी

१५९६ मार्गशीर्ष-पौष]

श्रीरामसमर्थ

उतमगुणाळंकृत रघुनाथभक्तिप
रायेण परोपकार राजमान्या राजश्री
रघुनाथभट गोसांवी यांसी स्नेहपू
र्वक सूचना तुमचा निरोप घेउनु
हेलवाकीहून स्वार जालों ते सुखरू
प चाफळास पावलों संकल्पाची
समारादना हि जाली पुढें शरीराचा
उपचार हि हळु हळु होतो तुम
चें मन मजवरी बहुत आहे ते तुम

चे आवडीच्या गुणे कल्याण हो
ईल ऐसें नेमस्त चिन्ह दिसतें
आपणे ते कर्कश सीतलाईमध्यें
बहुत चि श्रम पावलों तो माझा
सकळ श्रम घेउनु मज निरोप
दिधला तो उपकार देव जाणे
येविसी चीत चमत्कारलें ते प
त्री किती ह्मणौनु लेहावे माझें अ
रिष्ट तुम्ही घेउन मज उष्ण देशा
सी पाठविले हा उपकार श्रीरघु
नाथजीस जाला मज रघुनाथजी
वेगलें कोण्ही जिवलग नाही
आपण जाला समाचार रघुनाथजी
त्रिदित केला याउपरी माझे
ठाई तुह्मी आहा रघुनाथकृपे
चा प्रत्यये तुह्मास आलियावरी
प्रचीतीसीं कला येईल बहुत का
काये लेहावें वेदमूर्ती दिवाकर
भट गोसावी तेथे आलियावरी
तुम्हीं माझा समाचार घेयासी ये
प्रांतीस आले पाहिजे स्नेह बहु
त असों दीजे हा पत्रार्थ हें इतु
कें म्या आवडीच्या कलवळयाने
लिहिले आहे मने मन साक्ष असेल परं
नु तुम्हास उपचारसा वाटोन रजीस
होल तरी न होणें जैसा दिवाकरभट तै
से तुम्ही हा इत्यर्थ आहे बरें कललें
पाहिजे तुमचा आमचा येकात प्रसं
ग जालियावरी मग पेसे लिहिना न ये ह्म
णौनि ये संधीमधे प्रसग फावला पु
ढें फावेना म्हणौनि लाबे करून लिहि
लें वरकड इतर भाव मनामधे असेल
तरी रघुनाथ साक्ष असे तुम्ही रजीस

न होणे आणि जे आहे ते लिहिलें याम
घे मिथ्या स्तुती नाही तुम्ही सर्वज्ञ
आहा तुमचें जे काही आहे ते सकल मा
झें चि आहे म्या मज माझ्या मनास
येईल तैसे लिहिलें येथे तुमचें काये
गल काही चिंता न की जे तुम्ही आ
मचे चि आहा तुम्ही आम्ही सकल दे
वाचे आहों शरीरभेदावरी न जाणे
अतरस्थिति पाहिल्या उपरी
कळों येईल

आतां हें पत्र कोणीं आणि केव्हां लिहिलें हें मीं आपणास सांगावयास नको. श्रीसमर्थांनीं स्वहस्ताक्षरें पत्र लिहिलें म्हणून ज्याचा निर्देश विठ्ठल गोसावी यांनीं केला आहे, तें च हें पत्र होय. मूळ पत्र जेवढें आहे, त्यांत अक्षरें जेवढीं आहेत, तेवढें च पत्र व तेवढीं च अक्षरें यांचा फोटो घेतलेला आहे, तो आपणांस दाखवितो. (संमेलनांतील सभासदांस फोटो दाखविण्यांत आला.) असें हें श्रीसमर्थांनीं स्वहस्ताक्षरें लिहिलेलें पत्र होय.

आनंदनाम संवत्सरीं श्रीसमर्थ चातुर्मासाला हेळवाकच्या घळींत होते. आनंदनाम संवत्सर म्हणजे महाराष्ट्राच्या आनंदाचा संवत्सर होय. शके १५९६ हा आनंदनाम सवत्सर होय. या च संवत्सराच्या ज्येष्ठ शु. १३ ला श्रीछत्रपती शिवाजी महराज यांना रायगडीं अभिषेक होऊन राजशक सुरू झाला. शक १५९६ पहिला राजशक. चालू संवत्सर आनंदनाम च आहे. १५९६ चा आनंद व १८३६ चा आनंद मिळून महाराष्ट्रानें तेव्हांपासून पांच आनंद संवत्सरें किंवा २४० वर्षें पाहिलीं. १५९६ च्या आषाढ शु. ११ पासून तों कार्तिक शु. ११ पर्यंत श्रीसमर्थ हेळवाकच्या घळींत होते. नंतर चाफळास येऊन समाराधना वगैरे झाल्यावर हें पत्र लिहिलें आहे. म्हणजे तें १५९६ च्या मार्गशीर्ष पौषांत लिहिलेलें आहे.

कऱ्हाडाहून चिपळुणास जातांना वाटेंत घाटमाथ्यावर हेळवाक म्हणून कोयनेच्या कांठीं एक लहानसें गांव आहे. तेथून अर्ध्या कोसावर कोंढवळें म्हणून एक खेडें आहे. तेथून पुढें एक सज्जनगडापेक्षां मोठा डोंगर चढून गेल्यावर गर्द झाडींत ती सुप्रसिद्ध घळ आहे. वाघ, अस्वलें वगैरेंची अजून हि तेथें बरी च वस्ती आहे, म्हणून एकट्या दुकट्यानें निःशङ्कपणें घळीकडे जाणें सुरक्षितपणाचें नसतें. आम्ही दहा पांच माणसें, काठ्या व कायते या आयुधांनीं सज्ज असलेली,

बरोबर घेऊन गेल्या चैत्र वा। १० स घळींत गेलों ·र्तों. ढी पांघरून सि तरी थंडी वाजावी इतकी थंडी चैत्रांत तेथें असते, मग चातुर्मासांत थंडी किती असेल याची कल्पना करावी. अशा त्या घळींत १५९६ चा चातुर्मास श्रीसमर्थांनीं क्रमिला. तेथें सांतलाई होऊन श्रीसमर्थ बहुत ।वे श्रम पावले. तो त्यांचा सकल श्रम घेऊन रघुनाथभटांनीं श्रीसमर्थांस उष्ण देशास चाफळाकडे जाण्यास सवड दिली, हे श्रीसमर्थांस मोठे उपकार वाटले. इतके उपकार वाटावे असें कोणते अरिष्ट होतें, तें कळण्यास आज अजून मार्ग नाहीं. जाला समाचार श्रीसमर्थांनीं रघुनाथजीस विदित केला, कारण त्यांना रघुनाथजीवेगळे कोणी दुसरे जिवलग नव्हते. इतरांना इतर कोणी जिवलग असतात. हा च श्रीसमर्थ आणि आपण यांच्यात फरक होय. त्यामुळें ते सुखी झाले आणि आपण कष्टी होतों.

असें हें श्रीसमर्थांनीं स्वहस्ताक्षरें लिहिलेलें पत्र आहे, त्याविषयीं बोलावें आणि लिहावें तितकें थोडें आहे. कळकळ,' निष्कपटपणा, निस्सीम प्रेम, कर्तव्यदक्षता, रघुनाथभक्ति, गुरुशिष्यांची अनन्यता इत्यादि कित्येक गोष्टींचा बोध या पत्रावरून आपणांस होणार आहे.

पत्राच्या अस्सलपणाविषयीं मला शंका नाही. रघुनाथभटांची एकुलती एक मुलगी दिवाकरांचा मुलगा भैरवभट यांस दिली होती. शक १६०५ चे सुमारास रघुनाथभट महायात्रेला गेले. जातांना आपली वृत्ती व इनाम वगैरे सर्व त्यांनीं आपल्या जावयाच्या नांवानें करून दिलीं. दिवाकरांचे वंशज तेव्हांपासून तों आतांपर्यंत चाफळास आहेत. तेव्हां प्रस्तुतचें पत्र चाफळकऱ्यांत मिळालें तें योग्य ठिकाणीं च मिळालें, असें असल्यामुळें त्याच्या अस्सलपणाविषयीं शंका घेण्यास जागा नाहीं.

यावर कोणी एक च शंका विचारील. जें मूळ पत्र असेल तें श्रीसमर्थांच्या हातचें असेल हें कबूल आहे, पण हें च तें मूळ पत्र कशावरून? मूळ पत्राची ही नक्कल नसेल कशावरून? याला बिनतोड उत्तर आज नाहीं, हें खरें आहे. तथापि लिपीवरून, कित्ता, शोध, यांतील बाळबोध अक्षरें व हीं मोडीं अक्षरें यांच्यांतील हि साम्यावरून, कागदाच्या स्वरूपावरून, हें च पत्र मूळ असलें पाहिजे असें माझें ठाम मत झालें आहे. त्या मतास बिनतोडपणा येण्यास आणखी कांहीं असलीं दुसरीं श्रीसमर्थांनीं लिहिलेलीं अस्सल पत्रें मिळालीं पाहिजेत; आणि तीं मिळतील! एक तरी पत्र मिळेल असें कधीं कोणाला वाटलें होतें, मग, आणखी मिळणार नाहींत, असें तरी आतां कां वाटावें! उलट, हें एक पत्र मिळालें, यावरून आणखी असलीं पत्रें मिळण्याचा संभव आहे, ही च गोष्ट सिद्ध होते. श्रीसमर्थ स्वतः मुळीं च लिहीत नसत हें खरें नसून, महत्वाचे प्रसंगीं ते

स्वतः लिहीत हें उघड आहे. तेव्हां अशा च महत्वाच्या प्रसंगीं त्यांनीं स्वहस्ताक्षर लिहिलेलीं पत्रें मिळण्याची महाराष्ट्रानें आशा करणें निरर्थक होणार नाहीं.

चाफळखोऱ्यांतील कांहीं कागद रा. चांदोरकर यांस उपलब्ध झाले. जें जें कांहीं रामदासी वाङ्मय मिळेल तें तें माझ्या हवालीं करून मला ऋणी करण्याचा रा. चांदोरकर, रा. राजवाडे, रा. मुंडले व इतर कांहीं स्नेही यांचा जो क्रम आहे, त्यास अनुसरून रा. चांदोरकरांना उपलब्ध झालेले कागद मजकडे आले, त्यांत हें पत्र होतें, तें आज आपणास वाचून दाखविलें. श्री रामदास आणि रामदासी ग्रंथमालेंतील नववा भाग, "श्री संप्रदायाचीं कागदपत्रें", या च संवत्सरांत प्रकाशित व्हावा असा हेतु आहे, तेव्हां त्या भागांत या पत्राविषयीं आणखी जास्त खुलासा करण्यांत येईल.

शं. श्री. देव

६ विजयनगराचा विध्वंस.

शक १४८६ रक्ताक्षी संवत्सरीं चैत्रवैशाखाचे सुमारास राक्षसतागडीचा घनघोर रणसंग्राम होऊन, हिंदूंची राजसत्ता दक्षिणेंतून लयास गेली; परंतु ती कायमची नव्हे. एका शतकाचे अवधींत च ती पुन्हां दुप्पट जोरानें उदय कशी पावली याची साक्ष इतिहास देत च आहे. उत्तरेंत दृढमूल झालेल्या व दक्षिणेंत जीव धरुन राहिलेल्या मुसुलमानी सत्तेंत असलेली भिन्नता ही च महाराष्ट्रांतील राष्ट्रीय कल्पनेच्या जागरूकतेची एक साक्ष आहे, असें म्हटल्यास हरकत नाहीं.

स्वधर्माची अनोळख अथवा गैरसमज, अलोट संपत्तीचा मद, परस्पर मत्सर, आणि फार दिवस टिकलेल्या राजसत्तेचा नैसर्गिक कमकुवतपणा, या सर्व अथवा यांपैकीं कांहीं गोष्टी मुसुलमानांचा दक्षिणेंत विजय होण्यास कारण झाल्या असतील; परंतु पराभूत होणें व पराधीन होणें यांत फरक आहे. एक शारीरिक आहे, दुसरा मानसिक आहे. महाराष्ट्र पराधीन असें मुसुलमानी रियासतींत कधीं हि झालें नाहीं असें मला वाटतें. तथापि राव, राजे, देशमुख, देसाई यांची संकुचित सत्ता निराळी व साम्राज्याची राजसत्ता निराळी. दक्षिणेंत मुसुलमानांचें राज्य झाल्यावर हि देशमुख, देसाई, राव आणि राजे हे एका दृष्टीनें जरी स्वतंत्रपणें वागत असत व क्वचित् प्रसंगीं साम्राज्यसत्तेशीं दोन हात करण्यास हि तयार होत असत तरी विद्यानगराची स्थापना होई पावेतों 'हिंदी राष्ट्र' या कल्पनेस फारसें

मूर्तरूप आलें होतें असें म्हणतां येणार नाहीं. विजयनगराच्या स्थापनेनें हिंदी साम्राज्याबरोवर च हिंदी राष्ट्रीयत्वाचा हि पुनरुदय झाला. भावनेस मरण नाहीं म्हणतात तें खरें. विजयनगराचा विध्वंस झाला; परंतु राष्ट्रकल्पना मावळली असें म्हणतां येणार नाहीं.

अनुकूल परिस्थिति घडवून आणल्यावर अथवा घडून आल्यावर त्या कल्पनेनें पुन्हां उसळ खाल्ली व साम्राज्यवृक्ष पुन्हां टवटवीत झाला. तेव्हां विजयनगराची स्थापना अथवा त्या साम्राज्याचा उदय ही हिंदूंनीं आपली राष्ट्रकल्पनेची अजमावलेली शक्ति व त्या साम्राज्याची उत्तरोत्तर झालेली भरभराट ही त्या कल्पनेच्या पोषकतेची त्यांचे अंगीं असलेली पात्रता च होय असें म्हणण्यास हरकत नाहीं.

मग विजयनगराचा विध्वंस कां झाला? याचें कारण एव्हां च नव्हे तर हिंदूंच्या सर्वकालच्या इतिहासांत उपलब्ध होणाऱ्या एका गोष्टींत आहे. ती ही कीं, राजकारणांत दिसून येणारी त्यांची 'उदारता'. याबद्दल जास्त ऊहापोह करण्याचा हा प्रसंग नाहीं.

शक ८ शें पासून १५ शें पावेतों हिंदूंनीं लिहिलेला हिंदी राष्ट्राचा इतिहास उपलब्ध नाहीं. जो काय आज थोडाबहुत उपलब्ध आहे तो मुसलमानी तवारिखलेखकांनी अथवा सरदारांनी, किंवा परदेशस्थ व्यापारी प्रवाशांनी लिहिलेला असा च आहे.

अशा परकीय लेखकांनीं लिहिलेल्या इतिहासांत हिंदी राष्ट्राचें मन कसें दर्शित होईल? इतिहास म्हणजे केवळ घडलेल्या गोष्टी नमूद करणें नव्हे. त्या गोष्टी घडवून आणण्यास जी अंतर्गत स्थिति अथवा जें मन कारण झालें असेल त्याचें यथायोग्य पर्यालोचन व आविष्करण करणें हा खरा इतिहास होय. मन हें कारण आहे, घडलेल्या गोष्टी हा परिणाम आहे; त्यायोगानें राष्ट्राचें स्वरूप ओळखतां येत नाहीं; व जेथें राष्ट्राचें स्वरूप ओळखलें गेलं नाही म्हणजे जेथे कार्यकारणभाव ओळखला नाही तेथें घडलेल्या गोष्टींत असणारी एकसूत्रता समजावयाची नाहीं आणि म्हणून त्या गोष्टींच्या स्वरूपाची यथायोग्य समज ही पटावयाची नाही म्हणजे त्यांचें इंगित दुर्ज्ञेय होईल. इतकें च नाहीं परंतु या कार्यकारणभावाच्या म्हणजे समाजाच्या मनोरचनेच्या अज्ञानानें 'भविष्यवादित्व' हा जो एक इतिहासज्ञांचा विशेष आहे तो पार नाहींसा होईल.

हिंदीराष्ट्राच्या उपरिनिर्दिष्ट कालाच्या इतिहासाची ही स्थिति असल्यानें 'तालिकोट' अथवा 'राक्षेस तागडी' च्या रणसंग्रामाची पुढें दिलेली हकीकत अत्यन्त महत्वाची आहे. ती असावी तितकी विस्तृत नाहीं ही गोष्ट खरी,

परंतु आज आपणांस उपलब्ध असलेल्या कोणत्या हि हकीकतीपेक्षां ही जास्त विस्तृत व महत्वाची आहे. या हकीकतीवरून प्रत्यक्ष रणसंग्रामाचे वेळीं विश्वासानें कसा घात झाला म्हणजे हिंदूराजाचा विश्वासघातानें कसा गळा कापला हें तर दिसतें च परंतु तत्पूर्वी हिंदी व महंमदी राष्ट्रांचा परस्पर कसा संबंध होता व हिंदी राष्ट्राचें वैभव कसें होतें हें हि चित्रित होत आहे.

आपण येथें जमलेले सर्व च इतिहासज्ञ आहां तेव्हां तौलनिक लिहिण्याची कांहीं जरूर दिसत नाहीं. या लेखांत नाण्यांची जीं नांवें आलीं आहेत तिकडे पुराणवस्तुसंशोधकांचें लक्ष्य विशेष लागावें एवढी च सूचना करून मूळ लेखाकडे वळतों.

गो. का. चांदोरकर

+ + + + दिले वरी तीसरे रोजी जासुदानी खबर घेउनु आकबर-शहा पादशहा जलालदीन जालनापूर पादशाहा व इमामनप्र (ळीक पात-शाहा) वराडदेश व निजामशाहा (ब)हीरी पादशाहा हे तिघे व + + लोनु अलियेदलशाहा + + नकीद हेजीबास पाठविले + + तुम्ही करनाटक मुलुक + + या येतो तुम्ही आपुले मुलुका मधे वाट यावे व आपली राऊत संचणी कराव + + तरी अलीयेदलशाहा या + + सीं जबाब दिल्हे जे आपण राज (भु) (व) राचे फर्जेद म्हणविले अस + ह्यावरी मदतीये + + आपुले मुळका-मधून + + वाट देत नाहीं ऐसे जावाब दि (ल्हे) हेजीबास कपडे व हस्तकडग + मान व तेजी २ व हतीछावा देऊनु रवाना केले येसे ख (बर !) लखोटा घेऊनु आले + राजभुवरानं अलीयेदलशाहा पादशहापासी बिमऱ्या + सीं पाठ विले जे खुद (तुवा) आम (च) (फ) र्जेद असे तरी आपले मु (ळु) (का) मधे तिघे पादशाहासी येऊ नये येसे खलबत करु (न) (गो) स्टीचे तट देऊन अलीयेदलशाहा यानी रसनपतीस येक + कपडे व घोडा व हस्तीछवा एक देऊनु पाठविलेवरी बां (स) लया हेजीब येऊनु + (रा) (ज) भुवरासी हे अहवाल सांगीतलेवरी तमाम वजीरासीं होकु (म) लाऊ पाठवुनु खलबत केले वजीर मनसुरानीं राजभुव (रा) (सीं) सीरभोई सलाम करून अ (र्जी) (क) रू लागले जे तुवा नऊकोटीना(रा)येण तेजोनिधी भुवर वइकुं(ठना)(यक) आहेसी वडगोजी बाहेर घालव + वर्जारासी सर्फराज करुनु + नामजादी उतर-तर्फ सिके + र मनसुरासी खजा(ना) पैके देणे शर्त मर्दीनें + पादशाहासी गोष-माल दि(ल्हा) (जा)ईल येसे बोलीलेवरी पानें व फले व खुषबोई घालुन राज

भवरानें उठोन राणवसामधे येऊनु थोरली बाइल सत्यभा(मा) (ई)चे महाला-मधें येऊनु नवरत्नजडीत पलंगांवरी बैसोन अपले वडीलाचे वेलेचे मुदतीचे थोर थोर बस्ना आणऊन पाहोन त्यामधुन मोठा ज(डा) व + सोनीयाचे व कमर-शाल व अगोठी व हस्तकडग यसे थोरली बाईलेसी दिधले तेथुन दुसरे बाईल देवाचेंनामणी त्रिवेगल इचे महालामधें गेले तेथे दोनी + स बैसोन नाटकशालेसी आणऊन खडवीले. नाटकशालेमी पांचहजार फलम देऊन पाठविले बाईलेसी मोती वजन खं.८१। म. ५॥ शे. ३॥ व पीतांबर पांच दिल्ह तेथून तीसरे बाईल मनमोहनी निजस्वरूपांचे महलासी आलेवरी तिने राजभुवरावरी बलादुरी देऊनु आपुले महलांत घेऊनु जाऊनु बहुत मेहमानी केली मग रायानें तेथ बैसोन न + मेवा बागशाहीमधुन फले आणवीलि यांन॥------

अमृतफलें	१३५००	व नारींगी मु	१७५०
व फणसें	३५२	कलंगडी	८४०
अनार सुमार	५०००००	दराख वजन	१॥२
मेवु	३००००	खरबुजे वजन	१॥ ४॥ ८॥
बादाम वजन	१॥	नयशकर	१७८२००
व नारेळ सुमार	४१३००	चारवळे वजन	१॥२
खलाल खुर्मा	१॥	केळे सुमार	८०००
शकरानिंबु	८९००००	गोडबी वजन	१॥।
अकरूड वजन	१॥	अंजीरे सुमार	१३८३००
सिसमीस वजन	१॥।३	लग	०

येसे महालोमहालासी राणवसामधे पाठऊन दिल्हे तेथोन मातुश्री चंद्र-सालेचे (घ)रासी गेलेवरी मातुश्रीने राजयास समोर येऊनु राजयावरू + मोचलग + थोर थोर जडीत वस्ता बलादुरी देऊनु आपुले महालामधे नेऊन बहुत मेहमानी केली मग राजभुवरानें हे मजकूर तमाम सांगितले जे च्यार पादशाहा मिळोन हे मुलुकावरी चाली करून येताती हे धर्ममुलुक देवस्थान अन-छेत्र व देवब्राम्हणस्थल असे + सी त्याचे तसनीस होऊन त्याकरीता लस्केर कटकबंदी (क)रून आपण जाऊनु त्यासी गोषमाल देऊनु आपणासी नी-(रो)प देणे म्हणवोन मातेचे पाया पडला त्यावरी मातेने बहुत दिलगीर होऊनु राजभुवरासी बोलो लागली जे तुवा राजकुवर आमचे + सीत पादशाही होऊ आले तुर(का)चे कांहीं गरगशा जहाले नव्हते (क)(र)ता जाजती करूनु येताती तुवा त्याचे सांगाते सला हेजीबाती करणे म्हणोनु राजभुवराचे दिल समाधान बहुत केले त्याने न अईकता तेथून उठोन गेला मग सर्वानु + ने रजा दिल्हे तेथून सगीत महालासी येऊनु राजा बैसता पलं-घरी निद्रा केली रात्री राजभुवरा(नें) स्वप्न देखीले जे आपुले कानीचे मोती तोडून घेत होते बैसले सिहासन हिरोन घेत असे आपणासी दूत येऊनु वोढीत असे अैसे पाहुनु बाबीरा होऊन ऊठीला सवेची थोर थोर जोइसी व पंडीत व वेदशास्त्री व ग्राम जोसी आपुले वडीलाचे वेले आदीखानी बहुता दिवसाचे होते त्यासी बोलाऊ पाठविले मग त्यापुढे स्वप्न सागीतलेवरी त्यांनी राजभवराची मन समा-धान केले जे तुझे शत्रु जे कोण्ही येनातो ते नाम होऊ(नु) जातील तुवा क्षेत्र-पती मार्कंडी (आ)उश होऊनु राजसिहासनी रा(ज्य) करीसाल म्हणोन बोलिले मग आप(ण) आले लोकासी अमावलिया व करनाटकी चादरा देऊनु दोहडावले मग राजयाने बैसोन पांच हजार होनु ब्रामणासी वाटिले मग राजयाने बरवे मोहूर्त पाहुनु घोडा सारंगा अमृतनिधान राजाबैसता आणऊन त्यावरी बसोन अकरावे तासी तख्त विज्यानगराहोऊनु बाहीर येऊन उतरतर्फेसी नवगोजी देऊनु उतरीले पागा व पीलखाना व उस्तरखाना व थटी व सिकारखाना व जमदारखाना व शरबतखाना व कोठी व फराशखाना व अंबारखाना व तमाम येऊनु नऊगजी आसपास येऊनु उतरीले शाहार विजयानगरामधें धांडोरा फिर-विलें कीं येक घोडा व राऊत न राहाता लस्केरासी चालणें म्हणोनु ताकीद केली तमाम बाहेर येऊनु उतरीले खजाना फोडुनु वजीरासी खर्च मिसलतीस श्रीरंग-स्तान याव स + दासिवप्पा नाईक जामदार व गोपालपा पारपत्तगार व कोमारराऊ खजानदार हे चवघेजण बैसोनु वाटणी दिल्हे बीता दर वजीरासी होनु यासेरीज बाजे लोकासी दिल्हे येकुन होनु दर वजीराचे| हेजीबासी बोलाऊनु होनाचे हमीणे दिल्हे बीता——

जडेमाले होनु	रामचंद्रमोले
३७४८४६०	१५३९१५
सीवराई	अच्युतराई
१८७३२२०	१०७९०
अधोरमोले	घुटमोले
४४९७१	५०८०००
हकेरीहोनु	चनराईहोनु
८०००००	४०००००
मेखी होनु	वेंकटेशमोले
८०००००	४०००००
वेळुरहोन	मधुरीमोले
४०००००	६००००
आनंतमोले	नागरफणीहोनु
१५०००	१०७०००
महिसवाल	होममोले होन
१२०००	१८०००
वेगमी होनु	हणमत माले होनु
१२०००	२६०००
आनीगोंदी	रघुनाथ मोले
२१९३८०	२३८७८०३

येकुन जिनसवार होनु बेरीज १२३५७४११ येणेप्रमाणें वजीराचे हेजीबास हुजुर बोलाऊनु जिनसवार हमीणे दिल्हे तमाम वजीरासी ताकींद फर्मावीले की घोडियासी सिले व राऊतासी सीले व टोप व हित्तीस सिले देऊनु हे अवघे भार करुनु बसवणे येसे ताकीद केले मग दुसरे रोजी वजीरानी दिद्वानी खबर व हरकारेस पाठविले कुलगणती बीतपसील———

घोडे सुमार	हत्ती सुमार
३५००००	९७७८
हत्तीणी	बाण सुमार
६३१८	४६०९५७८
बंदुखी पेदे	तपा

१४८९१५	११९८४३७८
हटेभालेकारी सुमार	गमबाण
१२०५६	२३१३२०
करल बागनी	कोमारबाण
२५०	११११२०
भांडे फिरंगी सुमार	छडेबाण
३९२८	बाडाई सुमार
बंदुक	३०४९
+ ९३८	सिले दगले सुमार
सुर्द	२७८५०
३३००	सीले टोप सुमार
जबरजंग	२७८५०
+ २२००	टुक्के सुमार
एकांगी धांगाना	११४३८७०
८००००	वडगोडानी
सीले घोडे	५८९१०
१४०००	लोहार सुमार
सीले हत्ती सुमार	१०९०
१८००	हुनरवंद
सिकार कुत्ते	३००४
७०९	पानबुडे
	१८००
नदी टोकरे सुमार	दारुवजण खंडी
२००	९३६५१०॥३॥४

या खेरीज मनेवरानी व पुंडानीं पालेगारानी व लिंगारीयानी व अलकुरानी व राजबिडीयानी व हियलकारानी मोबलग गणती सापडीत नाहीं जगंलोजंगल व डोंगरेडोंगर व दरेखोरे जागा जागा उतरले असे नजरेने पाहतां करनाटकी लसकेर सात आ(ठ) गांव जमीन उतरले असे राजभुवराने नडगोर्जी तुंगभद्रातून पुढें दिधले. णेसखाना जाऊनु कृस्णानदी कडका धरून उतरले राजयानें हत्तीस आणऊनु पाहुन सीले करवीले. हतचि नावें पिनावे बीताा———

१ रणउर्जन	१ मुतीनचंद
१ ऐरावत	१ जाक(थ)मार
१ बलराऊ	१ सीताराम

१ गिलीराम
१ चिलाकोमार
१ हणुमत
१ वीरसूल
१ चनगीरीराय
१ कस्तुरीभोग
१ बाईलहुली
१ कामधेनु
१ भटविक्रम
१ चित्रगुणी
१ भोगीराय
१ वैभाग्य
१ अनंतकोटी
१ जोतीप्रकास
१ अमृतराम
१ पंचपतेस्वर
१ सुखीानुन
१ वेताळ
१ लोकनाथ
१ + प्रकाश
१ + + +
१ वेदमूर्ती
१ केसवेस्वर
१ भीस्मकर
१ हरीचंद्र
१ कुंभकर्ण
१ ग्रंथार्थ
१ चतुर
१ वीरभद्र
१ देवेंद्र
१ वज्रमणी
१ शार्धूळ
१ केशवराऊ

१ मुतग
१ तिवाकर
१ बलब्रह्म
१ नरसींह
१ रुशेस्वर
१ विष्णपद्
१ चक्रपती
१ विष्णुरा(ज)
१ वैराजी
१ अनंतसेन
१ मन्मथ
१ रुद्रअनंत
१ अमहत
१ गुयलराऊ
१ कार्तीकवीर
१ यगलीचेन्न
१ दशरथ
१ विक्रमराऊ
१ गणेश
१ रक्षागल
१ वैकुंठ
१ बारकेस्वर
१ सूर्यकांत
१ गोपालराऊ
१ फरसराम
१ सालीग्राम
१ नेजानिधी
१ अलक
१ उकीनगूढ
१ रामयाण
१ कल्पवृक्ष
१ विलोचन

१ वीरवसवंत	१ महाराज
१ बागराज	१ प्रल्हाद
१ केदगराय	१ तारकासुर
१ मार्कंडेस्वर	१ सूर्यप्रकाश
१ रत्नपार्थी	१ हलकाकोली
१ गोपाळ मूर्ती	१ येकदंत
१ उइल नजर	१ जगनथवीर
१ नवकोटी नारायण	१ निधानगुण
१ तुलाराय	१ बैरागी
	१ दुईलजन

९२ *

तमाम हत्ती सीले संदुनी करून हत्तीवरी जंबुरे जबरजंग लाऊन अला-हिदा पेशनामाजाद कृस्णा नदी तटाकी उतरवीले राजभुवगनें का तावरगीरी व कुंदरापिवयेल बरगे दरमायाने येऊनु नडगजी देऊनु उतरले पेशनामजादी लस्कर व बाजारबुणगा येऊनु मुसकीनजीक उतरीले नीजामशाहा पादशाहा बहीरी मऱ्हाटा तख्त दौलताबाद याने भीमरथीस येऊन उतरोन सुलतान पेरोजाबाद नजीक उतरला व अकबरजलालदीन पादशाहा शहादुर्गानजीक उतरला व इभराइम कुतबशाहा तेलगण तख्त गोलकोंडें याने मुदगल व गयेचूर दरम्याने उतरला चहुतर्फेने मुसलमान पादशाहायानी लस्कर व लुटावरे व पेंढारे व वणजारे व चोरपाईक नदी धरून उतरले राजभुवराचे मुलुकामधे चिधीचोली बं(हा)द धरून आणु लागले तमाम मुलुक हुली होऊन चालीले राजभुवरानें आपले लस्करासी ताकीद करून बाजारबुणगा नजीक च्यार हजार घोडा व पावप्यादे पनास हजार ठेऊनु तमाम वजीरानें व राजबिडीयानी व राजकोमारानी व येकांगधीरानी व सपरीगारानी व रजपुतानी व क्षेत्रीयानी व दलवईयानी व मनेवारानी हे अवघे जाऊनु राक्षेसतागडीस जाऊन नजीक उतरले अराबा भांडी फिरंगी गाडीयावरी मुस्तेदी करून जोडुनु बाण तमाम पावमुग बाणाईत बैलावरी दर बैलासी बाण सुमार २८† येकुन बाण सुमार ८०००० व राजबाण व कोमारबाण येसे उटावरी अराब पुढें उतरवीणे व बारु गेलोले व तुव खिजतना इ ने सांगाते घोडा राऊत व पावपाये असपास दरम्याने ठेवणे व बिसलया नाईक त्रिवेंगलपा नाईक

---

* बेरीज केली असतां ९० भरते, ९२ भरत नाहीं.

† प्रत्येक बैलास फक्त २८ च बाण कसे ! प्रत्येक बैल १००।२०० बाण सहज वाहील.

व कार्तीकविरपा नाईक हे तीघेजणासी राजभुवरी कपडे देउनु मुसलमान पाद-शाहीसी झगडा करावे पेस(यास) नामजादी पाठविलेवरी त्यानी येउनु आपुले करनाटकी कुल लस्केर देखील राक्षेसतागडीनजीक उतरीले हे खबरी जासुदानी व कालबा(दा?)रानी व हरकारेयानी येसे जरजरा तिलतिल खबर घेउनु आपुले पादशाहासी सांगितले मग मुसलमान पादशाही गांव पांच कोसावरी येउनु उतरले वरी निजामशाहा मऱ्हाठा पादशाही व ईभराईम कुतुबशहा तेलंगण पातशाही हे दोघेजण फुटोन अलाहिदा लस्केर घेउनु तलावा फिरो लागले ते पाहोन राजभुवरानें लस्कर पायदल फौज करून भार रचिले अलीयेदलशाहा पादशाहा कन्नडजाण यानें आपुले कुल लस्केर घेउनु येक फौज करून उभा राहिला इमामनमुळीक पादशाहा वराड देश आपुले कुल लस्केर घेऊनु येकभार रचिले असे तीनी च्यारी पादशाहा च्यारोतर्फे भार करून राहिलेवरी करनाटकी पाऊप्याधे व घोडेस्वारानी येकदुमाल होउनु अरोबा मधे रचून पुढे चालुनू निजा-मशाहा बहीरी पादशाहा व कुतबशाहा तेलगणे तर्फे झगडा केले बाणाबाणी जहाले व त्यामधे व यामधे लस्केर बहुत जाया जाला दोहीतर्फेचें लस्केर जखमी थार जहाले निजामशाहा बहिरी पादशाहा व कुतबशाहा तैलगण याने दीडकोस माघारे जाऊनु अलीयेदलशाहा कन्नडजाण व ईमामनमुळीक वराडदेश पादशाहा याने आपले जागा मुस्तैद दोनी फौजा होते त्यानी येउनु झगडा दिल्हे जखमी व पाडाऊ जाहाले बीतपसील———

निज्यामशाहा बेहिरी
पादशाहा याचे वजीर
पडीले———

१ सीवाजी काटे
१ अलमखान
१ बैरागी
१ अकवलखान

४

पाडाऊ

१ काले मंदुर
१ बसवाजी
१ खेरोजी भोसले

३

तेरीज

कुतबशाहा पादशाहा
तैलगण वजीर पाडऊ
जाहाले———

१ हसनखानडोला
१ केसवराऊ
१ अंताजी
१ सटवाजी

४

कवटाणवर पडीले

१ मोतीराऊ
१ अगीराऊ
१ येसाजीराऊ
१ देवाजी कुरप

४

जखमी ———————— व पडीले पाऊदे

१ रघुवीर कोमार
१ खेमणा दलवी
१ मिरीबा जामदार
१ घोलपा सारप
 + + +
१ रामकोठी नाईक
१ सेख अली
—
६

करनाटकी व निजामशाही व तैलगण यैसे तीही पादशाही लोक प-डीले येसे मोबलग गणती सापडत नाही जंगलाजंगल व रा-णेराण पडिले असे जखमी देवीनाईक १

पाडाऊ

१ अलंगखाबीता
१ मोकाम(द !) अनगुदीकर
—
२

हे रणजखमी व पाडाऊ जाहालेवरी राजभुवराने अैकोन अपुले तरफेचे वजीरास व लोकासी व बाजे खलकासी कपडे पाठविले आपुले लोकासी सागोन पाठवीले जे अपण येईजे तो झगडा न करणे लोक बहुत जाया होताती तमाम जमा जाहालीयावरी शर्तमर्दीने झगडा केला जाईल यैसे भोसल्या दलवीयासी पाठउनु दिल्हे अलीयेदलशाहा पादशाहा कनडजाण या पासी छरीयेपा नाईक जामदार याला हेजीबातीस पाठविले जे तुवां अपण चालोन येउनु अम्हापासी येउनु मांडीवरी बैसून फर्जंद म्हणवीले कि तुम्हाकडे अपण न येऊ म्हणोन यैसे शर्तनामा केलेवरी रायेचूर व अदवानी हे दुदलांणी बद्दल दिल्हे आपुले सद्देमधे पादशाही जमजम करुनु असावे यैसे असता तुम्ही अपुले मुळकामधून तिघ पादशाचे लस्केरासी वाट देउनु अपण कुल लस्केरसहीत येउनु मदती होउनु उतरले असे बहुत बरे चार पादशाही मिळुन आलीया काय होणार असे पेस्तर तुमचे मुदा काय कैसे असे म्हणोन मग अलीयेदलशहा याने जबाब दिल्हे जे तिघे पादशाही लस्केर जोरावार होउनु माझे मुळुकामधून आले मज पासी जोरावार नाही कुल लस्कर व मुळुक खराब केले हे राजवटे मधे आम्ही पडलो नाहीं हे तो जैसे फर्जंद म्हणोन मांडीवरी बैसोन सव सफध दिल्हे असे त्यासी खता नाहीं तुम्ही काही दिलगीर न होणे यैसे हेजीबा सांगाते खलबत करुनु हेजीबासी शाल व आसावली व तेजी व हस्तकडग व कुडकीबासी

मोती जोडा १ दिल्हे व हत्ती छावा येक १ दिल्हे व हेजीबा सांगाते मोत्सर दाहजण आले होते त्यासी शाला येक येक देउनु हेजिबासी पाने देउनु दोहडावीलेवरी हेजीब जाउनु राजभुवरासी हे हकीकती बयाण अर्ज केले हेजीब सांगाते आलीयेद्‌ळशहाचे हरकारे सीवाजी गोपीनाथ जमारीकादा होता त्या सांगाते तीन तास पासुनु पाच तास परीयंतर खलबत करुनु हरकारा मशारनुलेसी येक दुस्त कपडे दिल्हे व मोतीयाचा तुऱ्हाइ येक १ व कमरशाल १ दिल्हे बहुत मेहमानी केली अलीयेद्‌लशाहासी फिरंग व कमर गुर्दा थोर मोलाचा देउनु पाठविले हे खबर निजानशाहा बहीरी व कुतुबशाहा तेलगण व अकबर जलालदीन मोगली पादशाहा यासी दिदवानी हरकारे यानी लिहून पाठविले जे अलीयेद्‌ल शाहा सांगाते राजवटा लागीली असे म्हणोन मग तिघे पादशाहा यानी येद्‌लशाहा पादशाहा नजीक हरकारेसी पाठविले अम्ही अवघे मिळोन राजभुवराचे मुलुकगीरी कराव्या आलो असो दरम्याने तुम्हीं त्या सांगाते राजवटा करीता हे तरी बरे नव्हे अवघे येकवट होउनु गोशमाल देणे लागते अलाहिदा राजवटा केलीयाने काम होऊन येत नाही तरी तुम्ही त्यामधे मिलालीया आम्ही काही फिरोन जाणार नाही शर्तमर्दीने मुलुकगीरी करून तुम्ही आम्हाबराबरी मसलतीस येणे म्हणोन तरी येद्‌लशहाने सांगोन पाठविले की तुम्हाबरोबरी असो जे काये दिलचे मुदा असेल ते कबुल म्हणोनु मग हरकारेसी तश्रीफ देउनु रवाना केले राजभुवराने आपण येऊन राक्षेसतागडी नजीक उतरले रणथाबा चौधार राक्षेसतागडीचे मैदानामधे घातले करनाटकी लस्केर तमाम येउनु उतरले झगडेसी सुरु जाहाले मुदती रोज २७ झगडा जहाला जलालदीन अकबर पादशाहा तख्त जालनापूर याने मोगल व कर्ण रजपूत राहाठोड हे नालतवाडी दरम्याने उतरले यामधे व त्यामधं रायबागा नजीक झगडा रोजबरोज होऊं लागला करनाटकी वजीर व येनलमुलुक व अंकुशखान थारगीर वजीरानी पारखे होउनु येद्‌लशाहा तर्फेसी आले जलालदीन अकबर पादशाहा व निज्यामशाहा पादशाहा बहीरी व कुतुबशाहा तेलंगण हे तिघे मिळुनु गजफौज करून चालोन आले राजबिडे पाऊण्याचे हसम झगडा दिल्हे पहिले तास पासून अकरा तास पावेतो झगडा जहाला रण दुतर्फे पडिले राजभुवराने राजबिडे व बाजे वजीरासी व लोकासी बोलाऊन खलबत केले सदरहू वजीर अवघे मिळून राजभुवरास अर्ज केले जे मुसलमानु पादशाही लस्केर येकवट होउनु येताती आम्ही त्याचे तोंडेसी उभे रहातो जैसे मारावे तैसे झगडा फत्ते करीतो अलीयेद्‌लशाहा व इमामनमुळीक हे दोघे पादशाही लस्कर आपुले जागा होऊन पुढे येताती दोघे पादशाही झगडा देत असे रोजबरोज रण पडीत असे त्यानी दगा देउनु सांपडवीतील त्याचे पतेरा नाहीं ते तर्फेसी मुद्दाम दाहा हजार घोडा व पन्नास हजार पायेदळ त्याचे तोंडेसी राखणे आम्ही दिलपाखीनें मशाकत करून दोन्ही पाद-

शाही लस्कर दगा देतील येसे सिरभोई ठेऊन रोशन केलेवरी राजभुवरानें वजीरासी कपडे देऊन दोहडाविले जागा जागा आपुले गड कोटासी इतबारी लोकासी राजभुवरानें पाठविले बीतपशील———

चंद्रगडासी रामचंद्र नाईकासी पाठविले १

रायेगडासी लक्षमण नाईक जामदार पाठविल १

शहादुर्गासी चिकणा नाईक पाठविल १

तोरगलासी थलवेंकटी पाठविल १

ताडपत्रीसी गिरीयेपा नाईक पाठविल १

अनेगोदीस नागपावडेर पाठविल १

बंकापुरासी येलावेडुरु पाठविल १

कृष्णगडासी बिसळपा बेडरु १

इलोरीसी वीरपा नाईकासी पाठविले १

कदनोलीसी अमृत नाईक पाठविल १

चंदावरासी भोजराज पाठविल १

नदी आलासी वेंकटापा नाईक पाठविल १

चिचगलासी गिरीकृष्ण गुरु वेडरु पाठविल १

सलारीपट्टणेसी रायेप्पा नाईक पाठविल १

मधरेसी गोपाळ नाईकासी पाठविल १

येणेप्रमाणें कपडे देउनु पाठविले राजफौज झगडा जहाले निज्यामशाहा बहिरी व कुतुबशाहा तेलंगण मोडा जहाला अकबर जलालदीन मोगलावरी झगडा घातला त्याचे मदतीस कोण्ही आले नाहीं निज्यामशाहा बहिरी व कुतुबशाहा तेलंगण हे मोड जहाले मोड होउनु येकजागा भार रचिले होते लस्कर करनाटकी झगडा करुनु परतुन येता मागुती हे फौज लस्कर झगडा दिल्हे हे करनाटकी लोकानी ४०००००० हजार बाण येकायेकी घ(हा ?)ती लाविले त्याखाली दोघे पादशाहाचे लस्कर मोबलग झगडीयात पडीले कच खाऊन आपुले जागेसी उतरले मोगली लोक मागुती येउनु अलाहिदा झगडा दिल्हे करणाटकी लोक बहुत पडीले इतुके झगडा देउनु राजभुवराचे लस्केर जाउनु आपुले जागा उतरले राजभुवराने आपण राजहौश मुस्तेदी रामहत्तीवरी बैसोन कुल लस्कर दोघे तिघे पादशाहावरी चालिले भांडे थोर थोर भरुनु भांडेचे बहुत मार जहाले बहुत कच होउनु लस्कर मोड जाहाले त्यावरी राजभुवराने बहुत खुषीहाल होऊन नडगोजीस परतून येउनु उतरले करनाटक लोक तिनी पादशाहा लस्करासी झगडा करून भागोन बेहु-

शार होऊन लस्केर उतरले होते अलीयेदशाहा व इमामनमुलीक वराडदेश पादशाहा हे दोघेजण पादशाहा येकायेकी मुस्तेदीहून राजभुवरावरी घोडे केला त्याचे जिमा उतरुन बेखबर होते पाऊप्याचे लोक रोटीपोळी करून घेत होते तो येही जाऊन सभा पडोन खतर केले राजभुवर रामराज अलीयेदलशाहा पादशाहा कन्नड-जाण हाताखाले पाडून जाब बोलिला जे तुवा माझे लेक म्हणोन बोलीली होतासी तुवा येकायेकी दगा करुनु मजवरी सभा पडिलासी आता माझे काये ततबीर चालणार असे माझे लस्केर तमाम पडीले म्हणोन ताजा कपडे पुरतकालीक दाईव टोपीस हिरा मोती माणीकाचे कुलाब घालून मावीशाला पांघरुन अपुले देवासी स्मरण करून अलीयेदलशाहासी सांगोन पाठविले जे तुवा आपण फिरंग घेऊन येकांग लढाई करावे दुसरीयाने आपुलीयावरी हात देऊ नये म्हणोन त्यापासी सौगंद घेतलं मग अलीयेदलशाहाने अपण येकागी भिडीतां नजीक उभे राहुन डोसकी कापिले हे खबर च्यारी पादशाहासी जाहीर जाहाले करनाटकी लस्केर तमाम चिंदीचोल जहाले पलोन हत्ती व घोडे उट बारु गलोले व बाण खुमार व खजाना तमाम लुटालुटी जहाले कुल लस्कर मिलोन विज्यानगरासी गेले राजभुवराचे माये व तिघीजण बाईला हे खबर ऐकोन माहालासी आगी लाऊन दिल्हे माणीक मोती व हीरा रत्न तमाम मुसलमान लस्कर पादशाहा जाऊन कटकबंद उतरोन मुद्दाम १४ रोज शहरामधे सोदासोदी केले मोबलग माल सांप-डिले मुलुकगिरी तिनी पादशाहा यांनी केले अकबर जलालदीन पादशाहाचे लस्कर परतून गेले व इमामनमुलुक हे अपुले मुलुकासी गेले निज्यामशा-हा बहिरी आपुले मुलुकासी गेले अलीयेदशाहा याने मुलुकगीरी करीत चालिले पिनगोडेसी जाउनु वेढा घालून तिनी महिने लढाई केली मग कोट वरजार होउनु काबीज करू दिल्हे नाही मग तेथून तोरगलासी येऊन वेढा घातले स्थलवेंकटी झगडा केले काही काबीज हाेऊ दिल्हे नाही मग तेथे लस्कर ठेउनु अलीयेदशा पादशाहा विज्यापुरासी आले रक्ताक्षी नाम संवछरे वैशाख वदि अस्टमी सोमवारी १० वे तासी श्रवण नक्षत्री भिमासीम वरली रामराजांन जीव दिल्हे ऐसे खबर करनाटकी पादशाहाचे राजा जाहीर जहाले अलीयेदलशाहानें च्यारी पादशाहासी मेहमानगी केली मग ते बहुत खुषी होऊन गेले येदलशाहानें राजयाचे सी कासीस देऊन पाठविले त्याचे विलायेती गड कोटासी काबीजेबद्दल घोडे राऊत देऊन पाठवितासी पेस्तर अहवाल नजरे पडलिया बयानवार खबेर पाठउन देऊन आजी तागाईत छ २५ माहे मोहरम रोज च्यारी संदेस लिहुनु पाठविले असे अंबाजी कामदिजासुद व नाईकवाडी रोशन करीता मालूम होईल हे खबेर मोर्तुब जहाले बिकलम वेंकटाद्री तकेल निसीदा प॥ संपगाऊ से॥ हुबेलीयाचे तालीक लिहुन घेतले वेंकाजी नारायण कुलकरणी क म क ल स दा (बा हा) ब डे

अनंदनाम संवछरे फालगुण सुद बोज दिवसा लिहून मोर्तब केले. ताजा कलम अप्पा(ण्णा)जी जोशी मोकदमा

मागच्या बाजूवर

मामले परंडा मोर्तब (सुद) + + (तेरी) स छ ११ माहे जमादिलाखर सन हजार १०९५

*संपूर्ण.

७ श्रीधर कवि (पेशवाईंतला)

तळेगाव-दाभाड्यास शोध करीत असता मला भाऊभट बर्वे याचे घरी एक बाड मिळालें. त्याची पहिली व शेवटची पृष्ठें गहाळ झाली आहेत. नामदेव, तुकाराम, उद्धवचिद्घन, चिन्मयानंद, देवदासांकित संत, नारोपंडित, रंगनाथ, नरहरि मालो, बहिणी, रामदास, आनंदतनय, यादवबावा, अमृतेश्वर, वामन इत्यादि अनेक कवींची स्फुट कविता त्यांत आहे. बाड आतील मित्यांवरून व उल्लेखांवरून शके १६७१।७२।७३।७४। व ७५ या साली कधी पुण्यात तर कधी औरंगाबादेस, एकदां टाकळीस तर एकदां शाहागडास असे लिहिलेले आहे. अर्थात श्री. नानासाहेब पेशव्यांचे अमदानीतलें आहे

त्यांत 'श्रीधर' नामक कवीची कांही कविता लिहिलेली आहे. कविता चांगल्यापैकीं आहे. संस्कृत, प्राकृत व हिंदी या भाषात श्लोक, स्तोत्रें, अष्टकें, ओव्या, पदें वगैरे आहेत.

हा कवी श्रीधरस्वामी नाझरेकराहून भिन्न आहे, कारण यानें आपलें वर्णन बाड पृ. १२५ वर असे केलें आहे.

" विद्वन्मंडलमौक्तिकाळितरळस्यात्रेयगोत्राबुधे
श्चंद्रस्य श्रुतिपारगस्य सुधिय श्रीरामकृष्णस्य यः ॥
पुत्रः श्रीधरनामको जडधिया ज्ञानाप्तये मुक्तये
ग्रंथं प्राकृतभाषया कलिमलप्रध्वंसकं निर्ममे ॥ १ ॥ "

तसेंच बाड पृ. १२३ वर श्रीकृष्णवेण्याष्टकाचे अखेरीस

" महाबलेशकन्यकामनःप्रमोदकारकं स्तवाष्टकं प्रपौत्रपुत्रभुक्तिमुक्तिदायकं ॥
रामकृष्णनंदनेन श्रीधरेण निर्मितं भवेत्त्रिपाठशालिनां सदा शिवाय भूयसे ॥९॥"

असा उल्लेख आहे त्यावरून हि याच्या बापाचे नांव रामकृष्ण ठरतें. गोत्र अत्रि. कालासंबंधानें पाहतां या बाडांत पुढें याच कवीनें दीनवाणीनें केलेली

---

*ही बखर मागें 'सरस्वतीमंदिरांत' छापली होती. वाचनाच्या चुका फार झाल्या होत्या सबब पुनः नीट लाऊन छापणे भाग पडले. —संपादक

श्रीमंत नानासाहेबांची प्रार्थना दिली आहे; त्यावरून तो नानासाहेब पेशव्याचा समकालीन ठरतो. सदर प्रार्थना अशी:—

श्रीराम

भूभारं न्यस्य सर्वं त्वयि निखिलजगत्पालनैकप्रधानं
प्राधान्यं चापि दत्वा निजमजरमजो वीतचिंतो भवव्यथा ॥
आनंदोत्फुल्लतुंदस्फुटनटनपटुस्तांडवासक्तचेताः
सोव्यान्नानाविभो त्वां निजजनवरदो विघ्नहर्ता गजास्यः ॥ १ ॥
श्रीमंतः श्रीप्रधानोत्तम नमन तुम्हालागि साष्टांग माझें
पृथ्वीच्या पाळनाचें निजशिरिं धरिलें स्वामिनी सर्व वोझें ॥
तेथें मद्रक्षणें तें किति अजि तरुला भार नोहे फुलाचा ॥
त्यासिंधूमाजि बिंदूपरि मम गणना लेश या वैभवाचा ॥ २ ॥
स्वामीची करुणाच साधक मला नाही दुजें साधन ॥
जालों थोरपदासवें च्युत तया संगेंच गेलें धन ॥
त्यागावा भव हेच बुद्धि गमली निर्बंध जाला तया ॥
ब्रह्मस्वा ठाव गुतलों न जिणवे प्रारब्ध त्या घातया ॥ ३ ॥
सेवे योग्य असेन मी जरि तरी स्वामी करा जी रुपा ॥
आयुष्यव्यय होतसे आजि वृथा निद्रेंत जैसी क्षपा ॥
न प्रापंचिक पारमार्थिक असे धंदा वृथा जीवन ॥
वर्तावें जगि पूरणार्थ उदरा या दुर्भरा लागुन ॥ ४ ॥
कल्पद्रुमासन्निध दैन्यवाणी ॥ हे ऐकिली नाहिं जनात वाणीं ॥
न ध्वांत अध्वांत वसे रवीच्या ॥ युक्तींत हें नाडळलें कवीच्या ॥ ५ ॥
चंडोद्दंडप्रतापें जिणुनि रिपुकुळां सर्व भूमंडळातें ॥
साधूनि [नी] साधुवृंदां बहुत सुख दिल्हें ज्या पारी [परीं] विश्वतातें ॥
आता मद्दैन्यशत्रू दमुनि झडकरी सोडवा स्वामि मातें ॥
ऐका हे श्रीधराची विनयविनवणी रक्षणें मुख्य नातें ॥६॥ ॥छ॥

कवीनें आपल्या कुळदेवतेवर श्रीक्षेत्रजाकुलदेवीदशक नांवाचें स्तोत्र केलें आहे त्याचा प्रारंभ असाः—

‘ प्रेंखत्तुंगतरंगसंघविलसद्भीमातटिन्यास्तटे
शेतग्रामवरे सुपुण्यनिलयक्षेत्रे जगद्वंदिते ॥
केदारांचितमंचके प्रकटितां विद्युत्प्रभाभासुरां
भक्तत्राणपरायणां भगवतीं श्रीक्षेत्रजामाश्रये ॥ १ ॥

त्यावरून भीमेच्या कांठच्या शेतग्रामां (?) तील ‘ श्रीक्षेत्रजा ’ देवी

हीं त्याची कुळदेवता होय.

याच स्तोत्रांतील ९ वा श्लोक असाः—

" देवीं शूद्रकुमारिकाकृतिधरां नीलोत्पलश्यामलां ॥
चिच्छक्तिं परवस्तुनस्तुमहिषीं श्रेयस्करीं शांकरीं ॥
कोशाख्यद्विजसंततेः सुवरदां तन्निग्रहानुग्रहां ॥ भ० ॥९॥ "

या वर्णनानावरून देवीची आकृति ध्यानांत येते व तिसऱ्या चरणावरून कवि हा ' कोशे ' आडनांवाचा असावासें अनुमान होतें. ' पंतप्रधानाख्यान ' या टिपणांत हा मुद्दा पुन्हां येणार आहे.

किरकोळ पदें श्लोक यांसेरीज या बाडांत या कवीचे भागवतस्तुतिपर कांहीं श्लोक असून, तत्त्वबोध नामक एक ५६ श्लोकांचा छोटा ग्रंथ राममारुति-संवादात्मक आहे. त्याचा ५५ वा श्लोक असाः—

" केला असा मारुतिला प्रबोध ॥ म्हणोनि हा ग्रंथ हि तत्त्वबोध ॥
श्रीराम आत्मा निज श्रीधराचा ॥ हा ग्रंथ तेणें रचिला स्ववाचा ॥५५॥ "

वै. व. १०।१८३६ पुणें दत्तो वामन पोतदार

श्री

८ ' पंतप्रधानाख्यान् '

१ ब्राह्मणपद्पादशाही ज्यांच्या कारकीर्दींत ऐश्वर्याच्या शिखरावर बसली होती त्या श्रीमंत नानासाहेब पेशव्यांच्या स्तुतिपर संस्कृतप्राकृत काव्यें तळेगावच्या पूर्वोल्लिखित भाऊभट बर्वे यांजकडील बाडांत पृ. १३६ ते १३९ वर आढळलीं. राजस्तानांतील भाटांच्या कवनांकडे ज्या दृष्टीनें पहावयाचें ती च दृष्टि येथें हि पण पाहिजे. काव्य चटकदार आहे. शब्दचमत्कारावर जास्त भर आहे. थोडक्यांत गोडी आहे.

२ संस्कृत काव्य अष्टक आहे व मराठी ' पंचदशी ' आहे. पंधराव्या श्लोकाच्या पुढें सहा श्लोक मागून जोडलेले दिसतात व एकविसाच्या पुढें हि संस्कृतप्राकृत श्लोकांचें एक शेंपूट आढळतें. त्यांच्या आंकड्यांवरून त्यांचा तुटकपणा व्यक्त होतो. परंतु पुढें एकदम अठ्ठाविसाचा आंकडा आहे त्यावरून लेखकानें ते मागच्या भागाशीं चिकटविलेले दिसतात.

३ संस्कृत ३१४ व मराठी ९ या पद्यांत नाना देश, लोक यांचा उल्लेख आहे. मराठी १३ व्यांत. नानांच्या प्रीतींतल्या सभ्यांचें थोडेसें कीर्तन कवीनें केलें आहे.

४ कित्येक श्लोकपादांचा व पादार्धांचा अर्थ मला स्पष्ट कळला नाहीं.

५ कवीनें आपलें नांव शैव असें दिलें आहे (सं. ८; म. ६-८-१५-१८-२१) तो कोण काय याचा आतां विचार करूं

६ याच बाडांत पृ. २५ ते ३२ पर्यंत १२१ ओव्या आहेत. कर्ता शेवटीं अगर आरंभी नांव देत नाहीं. कवनाच्या मध्यें मात्र पुष्कळ नावें आलीं आहेत. या ओव्यांत सद्गुरूची विनवणी केलेली आहे.

स्वस्ति सगुण ब्रह्मरूपा ॥ शरण्यशरणा शैवभूपा ॥
निजधैर्याच्या सबळ यूपा ॥ अकूपारा कृपेच्या ॥ १ ॥

या ओवीनें आरंभिलेली स्तुति चालतां चालतां ९ व्या ओंवीपासून असा मजकूर आहेः—

" श्रीमच्छैव मोरेश्वर ॥सगुणलीलानटनागर ॥
कविवर सुखकर परात्पर ॥ सदा सादर निजदासां ॥ १० ॥
कल्पद्रुमासम सदय फळला ॥ ज्ञानबोधानें कवळला ॥
अभक्तांतें जो न कळला ॥ परि आकळला निजदासां ॥ ११ ॥
श्रीसदाशिव शैवानुज ॥ ज्ञानरूप जो महाभुज ॥
अगम्य न कळे ज्याचें गुज ॥ जयासि मजतुज नाठवे ॥ १२ ॥
शैवकुळीं भूषणमणी ॥ पंडितवर अणि कुशळाग्रणी ॥
देखतां लागे निजसुख धणी ॥ अभिनव करणी जयाची ॥ १३ ॥
श्री नीलकंठ शैवात्मज ॥ प्रसन्न ज्याची करुणा मज ॥
सानुज त्याचें मी पदरज ॥ नमितों सहज निजभावें ॥ १४ ॥
सानुजससूनु शैवराया ॥ फावलासि मजला स्तव कराया ॥
निरसुनि माया सुख वराया ॥ महदुपाया मज तूंचि ॥ १५ ॥ "

येथून पुढें पुन्हां १६ व्या ओंवीपासून ते २१ व्या पर्यंत स्तुति असून पुढें असा उल्लेख आहेः—

" कोशोपाह्वय परम दीन ॥ राघव विषयैकगरळपीन ॥
श्रीमच्चरणीं समन लीन ॥ जसा मीन उदकांत ॥ २२ ॥"

मीपणानें व चंचलपणानें

" या लागि सर्वदा स्वच्छ नसें ॥ द्व्यामुष्यायण चित्तीं असें ॥
न कळें आतां होयिल कसें ॥ विवश मानसें बहु केलें ॥ ३८ ॥"

अशी कवींची दशा झाली. त्याच बरोबर

" प्रारब्धयोगें विषम केलें ॥ श्रीमद्दर्शन दूरि ठेलें ॥
वियोगअनळें जाळियेलें ॥ कर्म उदेलें विपरीत ॥ ४२ ॥
आणुनि घातलें दूरदेशा ॥ न देखें स्वप्नगतस्वजनवेशा ॥
दुराप श्रीमद्भजनलेशा । म्हुण महेशा स्मरतसें ॥ ४३ ॥
पूर्वीं यौवनारंभ नाहीं ॥ तोंचि पडिलों या प्रवाही ॥
सत्संगाची प्राप्ति काहीं ॥ या [ना?] ही दैवें मिळाली ॥ ४४ ॥
सद्भक्तीचा पथ मोडला ॥ असंसर्गी संग जोडला ॥
देह दुःखें बहु रोडला ॥ विवेक खोडला समूळ ॥ ४५ ॥
शामळसंगें वृत्तिस मळ ॥ बाह्य भासला परि निर्मळ ॥
अंतर त्याचें म्हणुनि सकळ ॥ काळ सुंफळें लोटिला ॥ ४६ ॥
तेथिल ऋणानुबंध सरला ...॥ ४७ ॥
पुढें सुखाचा समय आला ॥ श्रीमत्पदयुगलाभ जाला ... ॥ ४८ ॥
कुजोपनामा जो भूभुज ॥ ...... ॥ ५० ॥
तत्संसर्गें बहुत चि सळें ॥ अविचारतापें हृदई जळें ॥
वांचलों श्रीमत्कृपाबळें ॥ ना तरि मावळे तत्काळ ॥ ५२ ॥
... ... तदुपरि वर्षें तीन गेली ॥ कर्मफळें बहु भोगियेली ॥
नीचार्जनें ही बहुत केलीं ॥ ...... ॥ ५४ ॥
काळ बहुताचि कठिण आला ॥ कुटुंबभरणीं श्रम जिवाला ॥
... ... ॥ परि नये चि कोण्हा माझी किव ॥
निशिदिनि वदनीं शिव शिव ॥ म्हुण सदाशिव कळवळिला ॥ ५७ ॥
कैलासवासी परमगाजी ॥ आपा आणिक राय बाजी ॥
दैवयोगें नृप नवाजी ॥ ज्यापुढें भाजी अरिकुळें ॥ ५८ ॥
त्यांचिये उदररत्नाकरीं ॥ पुत्रचतुष्टय रत्नें खरी ॥
ज्याचा प्रकाश दिगंतरीं ॥ चराचरीं दाटला ॥ ५९ ॥
श्रीमद्बल्लाळ आणि राघव ॥ जनार्दन बहुगुण लाघव ॥
चौथा श्रीमत्सदाशिव ॥ जो जीवन जीवदयेचा ॥ ६० ॥
... ... ॥ प्रताप त्यांचा सकळा ठावा ॥
श्रीमत्कृपे मज रिघावा ॥ हें पद पावावयाचा ॥ ६२ ॥

यत्न मजहुनि हा न जाला ॥ योग सहजाचि घडुनि आला ॥ ...॥६३॥"

अशा स्थितींत

" वार्धक्येंसी पडली मिठी ॥ अद्यापि मुक्तता न दिसे दिठी ॥
देह तो प्रारब्धाचे मुठी ॥ उठाउठी पडेल ॥ ८१ ॥
संकल्पशेषें मग उरावें ॥ तरी जननिजठरीं अंकुरावें ॥
असें च काय जी म्यां झुरावें ॥ पुन्हां मुरावें भवदुःखीं ॥ ८२ ॥ "

म्हणुन सावध होऊन तुला शरण आलों " शैवशरणा आणि संकट
पडे ॥ म्हणेल त्याची जिव्हा झडे ॥ मी तो अनुचर त्या मजकडे ॥
काळ गडबडे पहाया ॥ ९९ ॥ " असा विश्वासोद्गार काढून कवीनें
" कूर्मी पिलियां पाहे जसी ॥ दृष्टि मजवरि ठेवी तसी ॥ "
अशी गुरूची विनवणी केली व " प्रत्युत्तराची वाट पाहें ॥ "
...... " म्हणुनि येतों लोटांगणीं " (१२१) अशी समाप्ति केली आहे.

६ वरील लांबलचक उतारा जरूर म्हणून च दिला आहे. त्यांतील २२ व्या ओंवीवरून या ओंव्या करणारा गृहस्थ ' राघव कोशे ' असावा. व ओंवी १४-वरून त्यास नीलकंठ शैवात्मजाकडुन ज्ञान मिळालें असावें. शैवमोरेश्वर हाच शैव असावा. व सदाशिव शैव हा त्याचा भाऊ असावा. ५८ व्या ओंवीतल्या पेशवे कुळांतील मंडळीच्या स्पष्ट उल्लेखावरून बाड १७४० च्या नंतर लिहिलेलें आहे. हें उघड आहे.

७ दुसऱ्या स्थळीं श्रीधरकवीकृत नानासाहेबांची प्रार्थना दिली आहे. त्यांतील वर्णन व स्थिति यावर्णनाशीं जुळती आहे व ' क्षेत्रजा ' देवीच्या श्रीधर-कृत दशकांतील उल्लेखावरून त्याचें उपनाम कोशे असावेंसें दिसते. या ओंवीकाव्याचा कर्ता हि राघव कोशे मानल्यास १५ ओंवींतील " सानुज ससूनु शैवराया" या चरणांचा अर्थ त्या अनुरोधानें च बसवावा लागेल व श्रीधर हा राघवाचा अनुज—सहोदर नव्हे—ठरेल. तें कांहीं हि असो, इतकें मात्र निर्विवाद आहे कीं श्रीधर, शैव, राघव कोशे ही सर्व मंडळी नानासाहेब पेशव्यांच्या कृपाकटाक्षांतील त्यांची आश्रित असून अर्थातच समकालीन होती.

८ याच बाडांत पृष्ठ ३३ ते ३५ पर्यंत शैव कवीची कविता आहे. त्यावर "श्री मच्छैवमयूरेश्वरभट्टस्वामिनोक्तिः" असा मथळा असून पहिल्याच श्लोकांत " करित लेख नवा कवि शैव हा ॥ १ " असा उल्लेख आहे. त्यावरून हि शैव मोरेश्वर हाच शैव ठरतो.

९ ३५ व्या पानावर मागल्या बाजूस एका कवनाच्या शेवटीं " श्रीमयूरे-श्वरानंदमंदारतरु ज्यासि देखुनि नुरे विघ्नदंभू " असा उल्लेख आहे.

१० बाडाच्या ४३ व्या पृष्ठावर " श्रीमच्छैवनीलकंठोक्तिः " आहे तिच्या शेवटीं " देवाळेवसकं तदुक्तिसुखिनं श्रीराघवं भावये ॥ २ ॥ "

या उल्लेखांतील ' राघव ' हा ' राघव कोशे'च असावा.

११ बाडाच्या ५३ व्या पृष्ठावर आरंभींच "शके १६७५ श्रीमुखाब्दे माघ वदि अष्टमी शैव मोरेश्वर भट्ट कैलासवासी जाले" अशी मिति हि आहे. "शैव कुळीं" असा उल्लेख (ओंवी १३) येतो त्याचा अर्थ काय ! 'शैवांचें कुळ' कां शैव आडनांव धरावयाचें ?

१२ बाडांत वामनाची ' नामसुधा ' उतरली आहे. त्याचे शेवटीं असा उल्लेख आहेः—

" येवं श्लोकसंख्या ५३५ शके १६७४ आंगिरा नाम संवत्सरे अश्विन शुद्ध एकादशी गुरुवासरे श्रीगोदावरीतीरे महाराजश्रीमत्प्रधानसैन्यमध्ये टांकळी ग्राम-सन्निध कोशोपनामक गणेशतनय रघुनाथेन लिखितं शुभं श्रीनारायणार्पणमस्तु॥ शुभं भवतु ॥ ॥ छ ॥ "

यावरून सदर बाड रघुनाथ उर्फ राघव गणेश कोशे यांचें च असून ते नानासाहेब पेशव्यांचे आश्रित होते असें स्वच्छ ठरतें; व श्रीधर हा हि कोशे च मानल्यास तो रघुनाथाचा सहोदर होऊं शकत नाहीं.

१३ बाड कोशांचे असल्याबद्दल पुढें हि येक पुरावा आहे. तो येणेंप्रमाणें " इति श्रीरुद्रयामले महागमसारोद्धारे रामचंद्रमानसपूजा समाप्तः ॥

शके १६७४ आंगिरा नाम संवत्सरे भाद्रपदशुध ११ तद्दिनी श्रीमत्करवी-रक्षेत्रस्थगणेशभट्टअध्यापकलिखितमिति ध्रुवं ॥ कोशोपनामक रघुनाथपंतस्य दत्तं ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥ "

१४ मोरोपंतांच्या नामरसायनांत पुढील आर्या आहेः—

रघुनाथपंत कोशे संप्रति गेले समीप सेवेला ।
प्रेमें सिंचित होते या कवना ते सखे जसे वेला ॥ ११२ ॥

यावरून या बाडाचे लेखक राघव गणशे कोशे व पंतांचे वरील मित्र हे एकच असावेत. पंतांचा काल १६५१ ते शके १७१६ हा असून त्यांची काव्यकलिका शके १६७५ चे सुमारास च उमलूं लागली होती व सदर बाड हि त्याच वेळचें आहे. रघुनाथपंत कोशे बारामतीचे राहणारे होते. असो. पंतांच्या ग्रामस्थ स्नेह्याचें बाड म्हणून हि एक नवीन च महत्व या बाडास प्राप्त होत आहे.

द. वा. पोतदार

[बाड पृ. १३६ पोट]

श्री सांबः शरणं मम ॥ पंतप्रधानाख्यान्
देव त्वां देवदेवः सततमवतु स श्रीमहादेव एव
श्रेयान् यद्भ्रूविभंगः स्फुरति सुरनराऽशेषशेषादिकेषु ॥

आसीद्यस्मादकस्माद्गगनमथ ततो मातरिश्वा ततोग्नि
स्तस्माद्दंभस्ततोसौ धरणिरथ ततः पंचपंचप्रपंचः ॥ १ ॥
विप्रान्रक्षंतुमथो निहंतुमहितान् रंतुं शतं धीमतां
गंतुं वीरसदः प्रणंतुमपिवा मंतुं गुरूनार्जवैः ।
कर्तुंभर्तुमपि प्रहर्तुमुपसंहर्तुं विहर्तुं भुवि
त्रातुं दातुमभीप्सितानि सततं नानैव नान्यः पुमान् ॥ २ ॥
ताम्रास्ताम्रननास्युस्तरलतरदृशः श्यामलाः श्यामलाः स्युः ।
फैरंगाः फेरुरंगा भयभरितगिरो भंगुरा इंगरेजाः ॥
डिंडीरा डिंगमाराश्चरणशरणगा आरवा आरवा स्युः ।
शाहोः कोटीरहीरप्रबलभुजबलत्वद्रुजोद्यत्प्रसंगे ॥ ३ ॥

(बा. पृ. १३६ पाठ)

तावन्मूरतकच्छमच्छभखगजंगालबंगालजाः ।
करीशीनखलीनचीनचलखब्योखारघोगारजाः ॥
तावत्सिंदवलिंदबंदरपुरुत्कालेषु ते ते नृपा ।
यावत्तेनृपमौलिमंडनदृढः सन्नो न दोर्दंडगः ॥†
यः कीर्तिं स्वपितामहादपि पितुः पृथ्व्यामविस्तारयन् ।
नानादेशनिवासिनोऽवानिसुरान् चक्रे समं निर्जरैः ॥
किं भूयोऽप्यपरं ब्रुवे शुभगिरा जिग्येपि यो वाक्पतिं
नाना सैषगुणाधिकस्तदितरो नाम्नापि नाम्नायते । ॥ ५ ॥
अनुलोमतया नाना नानैव प्रतिलोमतः
आयंतसदृशो नाना नाना नान्यादृशः पुमान् ॥ ६ ॥
तावन्मंगलमाचरन्तु रिपवो जल्पंतु तावत्खला ।
वीरास्तावदमी निजेषु च निजं वल्गंतु किंपौरुषं ॥
गर्भे तावदिमा वहंतु जठरे संभ्रान्तवैरिस्त्रियो ।
यावत्ते नृपमौलिरत्नभृकुटीभंगो न रंगायते ॥ ७ ॥
यदि शिवे रतिरंगमहोत्सवो ।

(बा. पृ. १३७ पोट)

यदि तनौ सततं भसितादरः ॥
यदि कवित्वकलाकलितं मनः ।
पिब तदा कविशैववचःसुधां ॥ १ ॥ ८ ॥

---

*‘ दं ’ पाहिजे; ‡आंकडा ॥ ४ ॥ पाहिजे.

(बा. पृ. १३८ पोट)

सारासारा विचारा करुनि तुज वदों सत्य सत्यावतारा ।
तारानाथानुकारा युवतिजनमनोरंजनश्रीकुमारा ॥
चोरा जारा न थारा थरथरित तुला ऐकता शाहदारा ।
*दारादारारिदारा फिरत परि जुगें जीव नाना उदारा ॥ १ ॥
नाना ना ना वदेना ह्मणुनि म्हणतसों कर्ण ही यास साना ।
दाना याना सहाना अधिक शिबिहुनी देत जो अगदाना ॥
मानाधिक्यें कमाना चढवि जयिं तयी शत्रुवर्गा तनाना ।
गाना ताना रिझेना परि कविवचनीं प्रीति या भाग्यवाना ॥ २ ॥
नाना बाहेर आले कटकमृगगणीं केसरीसे निघाले ।
लाखों भाले च भाले कनककटरुचा तक्षकस्तोम जाले ॥
दिल्लीचे लोक भ्याले सहज जन चतुर्दिक्षु कौलास आले ।
आले ते सर्व ज्याले इतर यवन ते लज्जया घेन प्याले ॥ ३ ॥
वामा कामाभिरामा समद्दमन तूं सत्य हें सत्यनामा ।

(बा. पृ. १३७ पाठ)

धामाच्या शीतधामा विमलगुणगणग्रामसद्रत्नदामा ॥
स्वःकामा पूर्णकामा बपुषि तव सदा शोभती सत्य भामा ।
यामायामासि आम्हा स्मरसि निजमनीं दक्षिणेच्या ललामा ॥ ४ ॥
मीराऽमीरास वीर्यें दमुनि दमविलें त्या निजामा वजीरा ।
वीराधीरासि शौर्यें धरुनि निजकरी पाळियेलें गभीरा ॥
नीरानीरासि येथें भुवनजन तयां दावियेलें वतीरा ।
शीरा खीरा द्विजांला सतत वितरसी शाहुकोटीरहीरा ॥ ५ ॥
धर्में धर्मास कर्में करुनि मग तुवां रक्षिलें नित्यकर्मा ।
दीनानाथांसि अन्नें वसनधनभरें पुष्ट केलें स्वशर्मा ॥
शौर्यें ब्रह्मांडभांडा मथुनि भुजबळें काढिलें भूग्भिर्मा ।
श्रीमत्प्रौढप्रतापा विशद न वदतां जाणसी शैवमर्मा ॥ ६ ॥
बाळाजी तरि विश्वनाथ म्हणवी बाजीद्र वाजीपती ॥
श्रीनाना सुन त्यांस ज्यास हृदयीं दिल्लीश ही कांपति ।
विप्रांचा सुरवृक्ष पक्षदमन म्लेंछादिकांचा खरें ।
पृथ्वीचे नृप ज्यांस वंदित भये रत्नांकिते शेखरें ॥ ७ ॥
नाना ना न वदे ह्मणोनि जनता नाना जयातें वदे ।
विप्रांला धन दे खळां निधन दे सर्वांस सर्वस्व दे ॥
शत्रूंलां भय दे निजां अभय दे विश्वास दिश्वात दे ।

---

* दारादारा + अरिदारा

(बा. पृ. १३८ पोट)

दे दे देउनि देचि दे तरि सख्या शेऽ्ऽास संवास दे ॥ ८ ॥

हिंदू मोगल पारसीक हबशी आरब्ब किल्माख हि ।
रोहले व पठाण सय्यद पनी जेपास बेबास ही ॥
जे ते सर्व जिलेबदार तुमचे नानाभिमानाधिका
स्नेहाचा विकला जगांत पिकला कल्पद्रु विप्रादिका ॥ ९ ॥

माजन्ना व मुरारि या कळियुगी विख्यात दाते पुरा ।
यामध्यें तुझिया तुळेस अतुळा कोण्ही न जाला पुरा ॥
शस्त्रें शास्त्रमतें प्रशस्तसुगुणश्रीमंत नाना जगी ।
दातृत्वें विजयध्वजें मिरवमी *आसत्यमत्योंग्गी ॥ १० ॥

केल्या तीस तुळा परंतु अतुळा कैसा तुळे तोलसी ।
हा भूगोळ तुझ्या तुळे जरि तुळे तें स्वल्पसा डोलसी ॥
नस्रज्जंग न जंग सोसित तुझी भंगोनि मागें हटे ।
हट्टें जे झगटे तयी भट तुझे घेतील त्या चेमटे ॥ ११ ॥

शें शें शें अतिरुद्र यागशतके लक्षाग्निहोत्रे खरीं ।
काशी अंगणसी शकांत तुमच्या जाली जगाअंतरी ॥
मुंजी आणि विवाह हे न गणना नाना तुम्हाला घडे ।
केला हा कलिकाळ मृत्ययुगसा पापास छापा पडे ॥ १२ ॥

श्रीमत्र्यंबकराव भावभरित श्रीमन्महादेव ही ॥
जेथें ते श्रुभराव पंडित जसे स्वर्देव भूदेव ही ॥

(बा. पृ. १३७ पाठ)

जेथें भैरवगौरवान्वित सभा रामेंदु रार्केदु ही ।
नानेंद्रा सुखसिंधु तूं गुण तुझे श्रीमत्सुधाबिंदु ही ॥ १३ ॥

हस्ती दस्त दराज मस्त समरी अस्ताद्रिचे जावळे ।
अस्तव्यस्त समस्तशात्रवचमू जे लक्षिता सावळे ॥
शुंडादंड सदंड खंड करिती विंध्याद्रिची शेखरे ।
मेघाडंबरवंत अंतक परा हें वाक्य शैवी खरें ॥ १४ ॥

हो कल्याण तुम्हां असें जरि वदों तों तें तुम्हाला असे ।
श्रीधीश्रीतनयादि हें जरि वदों ते वाणि देवें नसे ॥
आतां हें चि मनीं विचारुनि वदों नादें जसा नांदशी ।
शैवी पंचदशी असो प्रिय तुम्हा जैसी प्रिया षोडशी ॥ १५ ॥

---

*स्वर्गमृत्युपाळांत

रेषा वाजिमयी जवें जवं निघे भासे तयीं जो जना ।
देतां मंडळ मंडळाकृति मना भासे तयीं योजना ॥
संकोचीं फिरतां द्विरानन गमे वेगें पुरेना क्षिती ॥
एवंलक्षण पक्षिराज हय ते लक्षाधिकें लक्षिती ॥ १६ ॥
कोण्ही कोकनदोपमारुण किती किर्मीर कल्माष ही ।
कोण्ही पार्वणचंद्रबिंबसमसे पुच्छीं श्रुतिश्याम ही ॥
कोण्ही कज्जळपर्वताकृतिकसे स्वर्भानुचे बाळसे ।

(बा. पृ. १३९ पोट)

ज्यांचि पृष्ठि अधिष्ठितां वरिल ते काळास ही काळसे ॥ १७ ॥
कोण्ही सुंब बुडेल यास्तव उडे गंगा व रेवा-जळा ।
कोण्ही आक्रमिती दिगंत गमनें कोण्ही नभोमंडळा ॥
मुक्तादाम गळां सुवर्णखचिता ज्यां शोभती पाखरा ।
तार्जा ते शिरताजमंडित तुझे श्रीशैव वक्रा खरा ॥ १८ ॥
त्या वाजींस खलीन जीन चढतां प्राचीन चेलीन ही ।
भ्याली चीन अधीन लीन वदते नामेष नामीन ही ॥
सिंधूचा परपार इछित जवें तै सैंधवाख्या जयां ।
पक्षें हीन विपक्षपक्षदमन प्रत्यक्ष लक्षूं तयां ॥ १९ ॥
शेंशें बाण भरूनि उष्ट्रशनकें सेनामुखीं चालती ।
शेंशें अश्वजजालनाल झडतां भूभृच्छिरें हालती ॥
नाना दिग्विजयास या जवं निघे तै देव उल्लासती ।
सेनाव्यूह तसे उडुव्रज जसे चंद्रासवें भासती ॥ २० ॥
आम्हीं हेम सिलंगगातिल तसे विख्यात लोकामध्यें ।
नाहीं दुर्बळ ना समर्थ विभवें जालों अधें ना मधें ॥
जैसे पूर्व सुदामदेव मग ते कृष्णें समुद्धारिले ।
तैसे शैव सदैव दैवजळधे युष्मद्गुणें भारिले ॥ २१ ॥

(बा. पृ. १३९ पाठ)

कर विजापुरकर भागानगर सगर दिल्लि आणि ते आगर भराभर भरती ।
जें जें दिगंती शहर तेथे नानाचा कहर जसि सिंधूची लहर लागलिया भरती ॥
सिंद खरखर भरखर चीन चंदी चंदावर कछ मछलीबंदर तेथें फौजा भरती ।
तुझ्या सेनेचे समर पाहु मिळेत अमर जधिं बांधसि कमर तधिं लांडे मरती ॥ १ ॥

चिरंजीव चिरं नंद चिरं पालय मेदिनीं ।
चिरं वितर दानानि चिरं त्वं विजयी भव ॥ २ ॥

अस्मिन् शासति राज्यमेतदखिलं प्राज्यं समृद्ध्याभवद्
बुद्ध्या शुद्धमतीवमत्तविधुरं धर्मिष्ठशर्मिष्ठवत् ॥
सत्त्वार्नीतिमती मतिर्धृतिमती कारुण्यलीलावती ।
दृष्टिः मृष्टिवती कृतिर्विजयते नाना सदानाधिकः ॥ १ ॥
त्वद्गुणग्रामरत्नौघैर्मतिस्तृप्ता न तृप्यति ।
गाय गाय यथा मांचं पायं पाय सुधामिव ॥ १ ॥
जो हा भारधरा धरा गिरिवरा या मात ही सागरा ।
आकाशप्रकरा करा दिनकरा धारा धरा इंबरा ॥
तो तूझ्या अचरा विचित्र रुचिरा चंद्राचिया सोदरा ।
सत्कीर्ती [र्ति] प्रचुरा चराचरवरा नाना प्रधानेश्वरा ॥ १ ॥
श्रीनाना सुखदायके श्रुतिपुटीं वाक्यामृते आयकें ।
उल्हासासि विधायकें अतुळ जे कांतादशःसायकें ॥

(पा. पृ. १८० पोट)

गावीं जें गुणगायकें प्रीतिपदीं वैचित्र्यसंधायकें ।
गंभीरें मृदुलायकें वदावेली कैलासिच्या नायकें ॥
कल्की होणार आहे वदत बुध असे तें मृषा आजि जालें ।
जे जे जें चिन्ह त्याचें सहज पारें तुझ्या सर्व आगामि आलें ॥
खड्गी तू अश्वसादी यवनदमन तूं विप्रवर्यावनंमा ।
हसा सन्मानसाच्या खळकुळशमनीं जीव तो कृष्ण कसा ॥ १ ॥ ॥२८॥

९ श्री. बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचें एक ऋणानुबंधी घराणें

बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचें चरित्र जर कोणी आज लिहावयास बसेल तर त्या थोर पुरुषाची सगतवार माहिती नसल्यामुळे लेखकाची लेखणी जागोजाग अटकून राहणार, अशी स्थिति आहे

१ त्यांच्या चरित्रास आधारभूत अशी एक जुनी यादि म्यां 'भारतवर्षांत' प्रसिद्ध केली आहे.

२ बाजीराव बल्लाळ यांचा परममित्र राजा भिमराव रेठरेकर याचा बाप भिवराव व बाळाजी विश्वनाथ या उभयतांचा अति घरोबा असल्याबद्दलच्या आख्यायिका अन्यत्र प्रसिद्ध झाल्या आहेत. अस्सल दोन पत्रांच्या नकला मिळाल्या आहेत.

३ मंडळाचे संशोधक ग. पटवर्धन ह्यांनी पेशव्यांच्या पूर्वजांविषयीं कांहीं नवीन कागदोपत्रीं माहिती मिळविली आहे. व मला

४ आज ह्या नवीन घराण्याचा शोध लागला आहे.

५ ह्याशिवाय आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रांतून कांही तुटक तुटक उल्लेख बाहेर आले आहेत ते.

आज मिळालेल्या पत्राची नक्कल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
विसाजीबावा स्वामीगोसावी यांसी

पो॥ बाळाजी विश्वनाथ प्रधान– कृतानेक नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत असिले पाहिजे. विशेष. पूर्वी अंजनवेलीत असता आमचे सर्व प्रकारें आपण चालविलें. संकटें आह्मावरी पडली त्या प्रसंगी आपण आह्मावरी कृतोपकार फार केला; आह्मांमुळें सर्वस्वें खराब होऊन आमचें संरक्षण केलें. हल्लीं ईश्वरें आह्मावरी कृपा केली यास्तव आपण आह्मापाशी रहावें आम्ही सर्व प्रकारें चालवावें हें आमचें मानस यास्तव आग्रह बहुत केला त्यास आपण सांगितलें जे आपला वृद्धापकाळ आणि योगक्षेम चालत आहे ज्याचे सन्नीद्ध आहों ते हि उत्तम प्रकारें चालवितात. मुलें ठेवावी तर ती लहान यास्तव त्याचें उपयोगी पडे ऐसें पत्र लेहून द्यावें म्हणोन बोलिला त्यावरून तुम्हांस हें पत्र लेहून दिल्हे असे जर करितां आमचें व आमच्या वंशाचें ईश्वरें कल्याण केलें तर सर्वप्रकारें आपले वंशाचें उत्तम प्रकारें चालवावें अंतर करूं नये. अंतर जाहालिया पूर्वी आम्ही आपल्याशी शफत केली आहे त्यास अंतर पडेल ईश्वरास मानणार नाही प्रस्तुत आम्ही आपणास रुपये ७०० शालशें प्रतिवर्षी करार करून दिल्हे आहेत साल दरसाल प्रविष्ट करूं सुा तिसा आशेर मया व अलफ छ १५ सवाल लोभ असो दीजे हें विनंती—

ही नकलेची नक्कल आहे व पत्रांत लिहिलेले विसाजीबावा यांच्या वंशजाकडून मिळालेली आहे.

विसाजीबावा यांचें समग्र नांव 'विसाजी नारायण', उपनाम जाखी गोत्र वत्स, सूत्र आश्वलायन, जात सारस्वत उर्फ शेणवी ब्राह्मण. हे पंतप्रतिनिधी यांचे चिटनीस होते. शाहू महाराज यांणी यांस बामणोली जिल्हा रत्नागिरी हा गांव इनाम दिला तो त्यांच्या एका वंशशाखेकडे चालू आहे. ह्यांच्या वंशाकडे पंतप्रतिनिधींची चिटणिशी पांच पिढ्या चालली होती. पंतप्रतिनिधींकडून खरळें पेटा शिराळे तालुके वाळवे व कोकळे तर्फ मरळी तालुके पाटण हे दोन गांव शके १६७१ त इनाम मिळाले.

विसाजी नारायण यांचे वंशजांची वंशावळ खाली दिली आहे.

- विसाजी नारायण
  - नारो विश्वनाथ
    - (चवथे चिटणीस) बाळाजी नारायण
      - (पाचवे चिटणीस) नारो बल्लाळ
    - गोपाळ नारायण
      - बाबाजी नारायण
      - रामचंद्र नारायण चिटणीस
        - हरी रामचंद्र चिटणीस
          - कृष्णाजी हरी चिटणीस
          - नारायण हरी चिटणीस
  - रामचंद्र विश्वनाथ
    - चिटको रामचंद्र
      - (वामणोली जि० रत्नागिरी येथें वंशज आहेत)
  - (दुसरे चिटणीस) काशी विश्वनाथ
    - (तिसरे चिटणीस) व्यंकाजी काशी

वरील प्रश्नांत बाळाजी विश्वनाथानी म्हटल्या प्रमाणें ते अंजनवेलींत का होते ! त्यांच्यावर संकटें कशली पडली ! त्या संकटांतून चिमाजी-योवांनी कसें वाचविलें ! त्यानें बाळाजीचा पक्ष घेतल्यामुळें त्याचे नुकसान काय झालें ! या सर्व गोष्टींबद्दलचे लेख सांपडतील तर संकटाखाली दबून गेलेलें आपलें सुदैव आपल्या पराक्रमानें व आपल्या मित्रांच्या सहाय्यानें वर काढणाऱ्या या पुरुषाच्या चरित्रांतील पुष्कळ गोष्टी उघडकीस येतील.

कृ. वि. आचार्य कालगांवकर।

१० जुनीं मराठी गीतें

(इमा ३ रा.)

धनगराच्या ओंव्या.

धनगराच्या ओंव्या हा एक महाराष्ट्रांतील लौकिक काव्याचा विशिष्ट प्रकार आहे. एकेक ओंवी म्हणजे एकेक आख्यान असतें व रानामध्यें रात्रीं मेंढरें बसविल्याजागीं धनगर लोक त्या मोठ्या प्रेमळपणानें गात असतात गातां गातां मध्यें च हरिदास अगर पुराणिक यांच्याप्रमाणें कथा भागाचें निरूपण हि करण्यांत येतें. त्यांतील सूक्ष्म वर्णनशैली व काव्यप्रतिभा ही लक्ष देण्यासारखी आहेत एक ओंवी गाण्यास ४।५ तास लागतात त्या सुरावर व घोळून घोळून म्हणण्याची वहिवाट आहे अशा ओंव्या पुष्कळ आहेत, त्यांपैकीं फक्त २ येथें देण्यांत येत आहेत दुसऱ्या ओंवीतील प्रभातकाळचें वर्णन रसिकांचे लक्ष वेधुन घेण्यासारखें आहे.

ओंवी १ ली.

सुंबरण[1] मांडल । माळावेल्या धन्यांच । सदरच्या स्वामीच । हे[2] काशीलिंग महाराज । धरती बा मातेच । सुंबरण मांडल । मेगराया पित्याच । गोरखकोळ स्वामीच । कैलासाच्या सांभाच । सुंबरण मांडल । नवाच्या बा येळला । डाळ-गांवच्या शिवला । इज्यापूरच्या शिवला । आहारवाडी गांवांत । हिवऱ्या बा बनांत । बैगे देव नांदतो । कुण्या एका दिवशी । म्हणी खेवंदा उठल । लगिन वाघ-राच । नवाच्या बा येळला । बिरोबा देवान । गोपाळ्या गा बंदवाला । बंदवाला

---

१ स्मरण २ दैवत ३ हा शब्द हि दैवतास अनुलक्षून आहे ४ गुरु व कुलस्वामी ५ ?

बोलला । जासुदाच्या वाड्याला । वाड्याला बा जावाव । जासुद बोलवून आणाव । गोपाणा येव बंदुगा । बंदु निघून गेलाया । जासुदाच्या वाड्याला । जासुदाच्या बाळाला । बाळाला बा बोलला । बेगेबागा दादान । देवळया रावळ । गावढिं बा वलिवल । जासुदाची बाळगा । बाळ निघून आल्याति । देवळा बा रावळा । बेगे देव बोलला । जासुदाच्या बाळाला । मनाएवड सोगे ये । चित्तायोग सोगे ये । रानी तुम्ही बगावे । जासुदाच्या बाळाला । बाळाला बा बोलला । जासुदाची बाळयेगा । बाळ वाड्याकडे जा । वाड्याकडे गेल्यात । वाटखरच्या बांधत । तान लाडु बांधल । भुकलाडू बांधल । पडशा त्यानी बांधिल्या । निघून बा चालला । हिवन्या बा बनात । बैरो माज्या देवाच्या । पाया तेगा पडल । हे, सुंबरान मांडल ॥ ध्रु० (पुढे चालु.) १ ॥ तवाच्या बा येळला । जासुदाची बाळगा । निघून बा चालला । नवखंड प्रथिम । दहाव्या खंड काशींनि । काशीत बा शिरल । चोथे भैरव लागल । चित्तायोग चौगैल । मनायोग रानी गा । रानी तेला गावना । नव लाक तेलंग । तेलंगांन शिरल । सोगे वधू लागल । सोगे कुठ गावना । चित्तायोग सोगना । मनायोग रानी तेला गावना । चवदा ताळ कोकाण । कोकणांत शिरल । अठरा ताळ बागलाण । बागलाण फिरल । बिरोबाला गेले हो । सोगे कांही धावना । वाटखरच्या मल्ल्या । पोरा मिळना तुकडा । जासुदाची बाळ गा । बाळ माघारी फिरली । तुळजापूर नगरात । बिरोबा देवाच भजन । भजनीला बा कळाल । अंतरि बा समाजल । बेरोदेवाच जासुद । माघारी बा फिरल । सोग नाही धावल । आंबागा त्यागा देविन । कार्के धनली पारीगा । रानी गवन्य येचिन । आरिण्यां बा वनांत । त्या बा मद्य वनांत । चिट म्हणल पाखरू । पाखरू बा नाहींगा । काही म्हणल कावळा । त्याभि वनांत नाही गा । आंबा माजी देवी गा रानी गवन्या येचित । बिरोबा देवाच जासुद । माघारि बा आल्यात । आंब माजी देवी गा । पदरान पालिवनी । बिरोबा देवाच जासुद । जासुद बा बोलल । असल्या बा वनात । मनक्ष बा कुठल । भून स्यात असल । चला आपल्या वाटन । आंबा माजी देवी गा । हाळ्या मग मारिन्नी । उचलु मला लागाव । मग तम्ही जावाव । बिरोबा देवाच जासुद । उचलु लागाय गेल्यात । एकामेका बोलल्यात । अवेशकुन झालाया । शेनीच बा निरड । आडव बा ठेवल । बिरोबा देवाच जासुद । उचलु नबा लागत । आंबा मार्जा देवीगा । उचलुन बा धिनागा । कुठल कोण सांगाव । जासुदाची बाळगा । बाळ बोलु लागली । आंबा देविइलागा । देविला बा बोलन । बिरो देवाच जासुद । बिरो देवाला सोग ये । सोग बघाव

---

६ सोयरांक ७ । ८ काखेला ९ दंडकारण्याच्या कांही भागास हें नांव असावेंसें दिसतें. श्री नाथलीलामृत (गोरखपंथी) ग्रंथांत दक्षिणेस असलेल्या 'आटिव्य' वनाचा उल्लेख आहे तें च हें असावें.

गेलो म्हतो । आंबा देविला बोलतो । आंबा देवी बोलली । वाड्याकड चलाव । तांब्याभर पाणीगा । पाणी तुम्ही पेवाव । आपल्या वाटन जावाव । आंबा माजी देवीगा । निघून बा चालल । तुळजापुरच्या वाटन । घराकडे गेलिया । पाटि बाइन ठेवली । सुंबराण मांडल (धृ०) ॥ २ ॥ तांब्या भरून दिलाया । पाणी मग प्यायाला । उन पाणी ठेवल । हात गा पाय धुयाला । हांड्या-मंदि ठेवल । पाणिगा तिन तापविल । पाय धुया दिलया । आंबा माजी देवीगा । सात उतरंडी केलीया । सात उतरंडी उतरिल्या । साळी डाळी काडिल्या । माळी डाळी पाखडिल्या । शिजत बा ठेवल्या । सुंबराण मांडल (धृ०) ॥ ३ ॥ साळी डाळी शिजल्या । साळी डाळी येळल्या । आंबा माजी देवीगा । देवी बोलू लागली । उठा बाबा चुळागा । चुळा तुम्ही भराव्या । जासुदाच्या बाळान । हाती तांबे घेतल । चुळा आंचुळा भरल्या । आंबा माज्या देवीन । जेवायिला ठाव गा । ठाव तिन मांडल । जासुदाची बाळगा । भोजनाला बसली । सुंबराण मांडल (धृ०) ॥ ४ ॥ तवाच्या बा येळला । भोजन त्यांच सरल । जिऊन बा यतेष्ट[10] । यतष्ठ बा झाल्यात । चुळा आचुळा भरल्या । जासुदाची बाळगा । पान तंबाकु खात्यान । आंबा माज्या देवीन । लखोटा बा लिवला । नान्याळ बा नगरात । मुंजावळ राजागा । राजाच्या बा कन्यागा । सातजणी कन्यागा । सगळ्यावैन धाकली । कामालेक शाणी गा । अंतरिची शाणी गा । पाटचा गा बंदुगा । बंदुगा तुगा हुर्षिले[11] । मुंजावळ राजाची । कामा लेक जितुन । जितून बा नेशील । सुंबराण मांडल । (धृ०) ॥ ५ ॥ आंबा माज्या देविन । लखोटा बा लिविला । जासुदाच्या हातात । हातात बा दिलाया । हातात बा लखोटा । घेऊन बा निघाल । हिवऱ्या बा बनात । बनात बा गेल्यात । बिरोबा देव बोलला । यश कार अपेश । जासुदाच्या बाळानु । जासुदाच्या बाळानी । लखोटा बा टाकिला । बिरोबा देवाच्या म्होरगा । बिरो माज्या देवान । वाचुन बा पाहिला । बिरो माज्या देवान । बोलु लवा लागला । जितुन बा आणाव । आपल्याशिवाय याचिगा । याचि मौंग[12] नाहीगा । सुंबराण मांडल (धृ०) ॥ ६ ॥ तवाच्या बा येळला । बैरो माजा देवगा । घोड्याच्या बा पागला । पागला बा गेलाया । वारू न्याळु लागला । वारू तेला घावना । बैरो माजा देवगा । भुइऱ्यांत गेलाया । वारू न्याळु लागला । वारू त्यान न्याळिला । नाचऱ्या बा वाणाचा । वारु त्यान न्याळिला । चारी पाया नेवैरा[13] । कपाळा चंदन । आडभोका बांडा । शेप टीला पुसावरा । वारू त्यान न्याळिला । वारू देवान न्याळिला । वर त्यान काडिला । बैरो माजा देवगा । वारू सजवू लागला । बैरो माजा देवगा । खुर-भुशा खोगिर । रेसमाचा पटा गा । चंग त्याला लावल । चारी पाया तोडागा ।

---

१० यथेष्ट–यथास्थित ११ होशील १२ शोध १३ गुडघे घासणारा–घासलेला

नोड त्यानी घातंल । रिकीब्या घातल्या । शेसफुल घातल । बैरो माज्या देवान । बेरो देव सजला । धडी पगडी केलिया । बैरो देव सजला । वारूवर बसला । वारू त्यान काडला । नान्याळ या नगराच्या । नगरच्या वाटन । सुंबराण मांडल (धृ०) ॥ ७ ॥ वारु खेळवित गा । खेळवीत पळवीत । पळवीन निघाला । गगनी धूळ उडत्यात । नान्याळ या नगरच । नगरची माणस । माणस बोलु लागली । कुठला गलीम आलाया । शौर[१४] आमच लुटाया । नगरची माणसगा । येशी मामुन्या[१५] केल्यौत्या । बेरो माजा देवगा । येशीच्या या तोंडाला । तोंडाला या आलाया । येशी मामुन्या केल्यात्या । चिरू देव बोलला । येमराख्या दादा गा । येस तुम्ही उगडावी । येस उगडाया हुकुम । हुकुम आम्हाला नाहींगा । सुंबराण मांडल (धृ०) ॥ ८ ॥ बेरो माज्या देवान । वारू माग मारला । वारू कोरडा मारला । वारू मग उडला । चारी पाय पोटीशी । पोटिशी या धरला । येशीच्या या आतगा । आतल्या या आंगाला । आंगाला या गेलाया । नगरच्या माणसाला । चोल तव्हा लागला । वस्तिला या जागागा । जागा मला देवावा । हिन नाही जागार । फुलाइ या माळणीच्या माळणीच्या या वाड्यान । वाड्यात या जावाव । बैरोबा माजा देवगा । आळोआळी फिरतो । वस्तिला या जागागा । जागा मागत फिरतो । सुंबराण मांडल (धृ.)॥ ९॥

पुढील कथाभाग

तेथून बिरो देव फुलाई माळणीच्या घरी गेला तिचें घर म्हणजे तीन वाशाचें एक झोपट होतें, त्याच्या अंगणांत वडाचें झाड होतें. त्याला देवानें आपला घोडा बांधला. त्यावेळी फुलाई माळीण कामालेकीकरितां फुलें आणण्यास गेली होती. ती थोडया वेळानें परत आली तेव्हां देवानें तिला लाडी गोडी लावून मावशीचें नातें लावलें व तिला पैसे देऊन प्रसन्न केलें. नंतर तिच्या मदतीनें व आपल्या मांत्रिक सामर्थ्यानें त्यानें राजवाड्यांत प्रवेश करून कामालेकीची खोवेशांत गाठ घेतली. कामालेकीनें त्याच्या हातावरून तो पुरुष असल्याचें ओळखिलें व ती त्याच्याशीं लग्न लावण्यास कबुल झाली परंतु तिनें त्यास आपणास तेथून काढून–जिंकून–नेण्याची विनंती केली तेव्हां कासारचा वेश घेऊन बिरोबानें राजास हि मोहन घालून आपलें कार्य केलें; त्याचें वर्णन—बिरो माजा देवगा । कामाराच्या वाड्याला । वाड्याला या गेलाया । कासार तू दादगा । माळ मला देवाविगा । हिरव पिवळ नगदगा । चुड मला देवाव गा । कासार त्या दादान गा । हिरव्या पिवळ्या नगयाच्या । चुड त्यान दिल्यानगा । माळ त्यान सांयाला गा । बैरो माज्या देवान । माळ लावली सांयाला । सादविन निघाला गा ।

---

१४ शहर १५ लावल्या

आळोआळी फिरतोगा । मुंबराण मांडल (धृ०) ॥ १० ॥ वैराळ झालाया गा । जातीचा वैराळ देव ह्यो । गेला त्या पाण्याचा पाणवठ्या । पाणवठ्यावर पालगा। पाल त्यान बांधिलया । मग कामाच्या गडनी । मग पाण्याला निघाल्या । मुरडा-वळी कां चुंबळ । चिनगवळी का घागर । गडनी मिळुन निघाल्या । गडनी निघाल्या पाण्याला । देव ह्यो जातीचा वैराळ । पाण्याच्याचि गा पाणवठ्या । पाल देवान ठोकल । हिरव पिवळ गा नगद । नगद झळकु लागल । मुंबराण माडल (धृ०) ॥ ११ ॥ पुढील कथा —

ती काकणें पाहून कामालेकीच्या सख्याना वाटलें की ती कामाने घाल-ण्यास योग्य आहेत. तेव्हां त्यानी कामालेकीस त्याची बातमी दिली. तिने त्या कासारास बालाविलें. ' कासार लोकाना ह्या नगरात जकात माफ केली तर येतो' असा त्याने निरोप पाठविला तेव्हा कामालेकीने जकातीच्या माफीचा हुकूम पाठवून दिला मग हा कासाररूपी वेरा देव तिच्या महालांत तिला काकणें घाल-ण्याकरिता गेला तेव्हा त्याचा सवाद झाला तो:—

तवाच्या वा येळला । वेराळ दादाहो । सैल कंकण चढवावा । वेराळ दादाग । दादा म्हणु नकस । अहो वेराळ भावोजी । भावोजीग म्हणाव । म्हंजी कंकण चढतो । अहो वेराळ भावोजी । सैल ककण चढवावा । वेराळ भावोजी म्हवग । अहो वेराळ कारभारी । कारभारी म्हणाव । म्हंजी ककण चढतो । अहो वेराळ कारभारी । सैल ककण चढवावा । मुंबराण मांडल (धृ०) ॥ १२ ॥ वेराळ बोलला । तुज्या मग बापाला । बापाला ग मागाव । लगनाच सामायन । सामा यन गा आणाव । कामालेक बोलती । राजा माज्या बाबा गा । चुडा कांही चढना । लगनाच सामायन । सामायन बा आणाव । म्हंजी चुडा चढल । मुंजावळ राजान । लगनाच सामायन । सामायन त्यान आणल । वेराळ बोलला । दारी मांडव घालावा । केळी खांब लावावे । दारी बाहुल घालावे । हांडी गल्लास लावावे । आंब्या नागाळ तोरण । तोरण बा लावाव मुंब-राण माडल (धृ०) ॥ १३ ॥ मुंजावळ राजान । दारी मांडव घातला । केळी खांब लावल । दारी बाहुल घातल । हाड गल्लास लावल । आंब्यानागाळ तोरण । तोरण बा लावल । मांडव बा दारात । चार ताब्या कळस । कळस बा मांडला । चार बसणी टाकली । पाणी तवा तापिवल । भट आणि बिरामण । बिरामण आणल । तवाच्या बायेळला । वेराळ दादा गा । बोलु तवा लागला । कामा मग लेकीला । पाणी मग घालाव । मल्लाचि गा घालाव ।

याप्रमाणें बोलत बोलत त्यान राजाच्या अनुमतीने कामालेकीबरोबर आपलें लग्न लावून घेतलें व मग राजाला आपली बायको मागूं लागला तेव्हां राजा शुद्धीवर आला व या कासारानें आपणास फसविलें म्हणून विमनस्क झाला. त्यानें अखेरीस त्यास

सांगितलें कीं आपण हत्तीच्या तोंडांत एक माळ घालून त्याला सर्व शहरभर फिरविणार, ठिकठिकाणचे राजे तेथें जमतील त्यांत ज्याच्या गळ्यांत हत्ती माळ घालील त्यास आपण ही मुलगी देणार. कासाररूपी बैरोदेवानें ती गोष्ट कबुल केली. व त्या समारंभाचे दिवशीं तो नगराबाहेर भिकारवेष घेऊन राजसैन्याचे शेवटीं उभा राहिला. हत्तीनें तेथें जाऊन त्याच्या गळ्यांत माळ घातली. तेव्हां राजानें तो हत्ती रद्द करून दुसरा हत्ती आणला. त्यानें हि तसें च केलें. तेव्हां इतर राजे त्याचा मत्सर करूं लागले. मग बिरोबानें भोंग्याचें रूप घेतलें व त्या राजांस तो चावूं लागला. आपला पती आपणास टाकून गेला म्हणून कामालेक उदास झाली व सती जाण्याची तयारी करूं लागली तत्संबंधी वर्णन–

बिरोबा माजा देव गा। त्यान लगन केलया। खंडोखंडच राज गा। माराया बा टपल। कुटला कोण आलाया। म्हाराचा का मांगाचा। कुटला कोण हाये गा। कुणाला बा ठावक। ठावक न्हाइ आम्हाला। खंडोखंडच राज गा। तंचु डेर दिल्यात। अपेसं[१६] आमाला दिलया। मारायाला टपल। बिरो माज्या देवान। मौवां त्यान पालटली। जातीचा बा भोंगा गा। भोंगा तवा झालाया। सुंबराण मांडल (धृ०) ॥१४॥ माणसाला चावतोया। भोंगा, भोंग। माणस पळून गेल्यात। भोंग्या माऊ गा पालटली। माणुस बि गा झालाया। निद्रासंयम झालाया। संबराण मांडल (धृ०) ॥ १५ ॥ मुंजावळ राजाची। कामा लेक बोलली। कुटला कोण माज्या गा। पदरात पडलागा। कुणीकड गेलाया। कामा मग लेकीन। बारा हात खाइ गा। खाइ तिन खांदली। बैग खुटा इंगाळ। खांडात बा रकैस। रकस बा पाडल। बोलु तवा लागली। सति आता पडायच। एक फेरी घातली। दुनवी फेरी घातली। तिनव्या बा फेरीला। बैरो माजा देव गा। देव मग आलाया। चवथ्या बा फेरीला। मनगटाला धरली। माग त्यान वडली। घोड्यावर घातली। निघुन बा चालला। हिवऱ्या बा बनात। दालगांवच्या शीवला। सुंबराण मांडल (धृ०) ॥ १५ ॥

ओंवी २ री.

सुंबराण मांडल। माळावैल्या धन्याच। सदरच्या स्वामीच। सुंबराण मांडल। धर्तरीबा मातच। सुंबराण मांडल। मेगराया पित्याच। गोरूकूळ स्वामीच। सुंबराण मांडल। कैलासाच्या सांबाच। सुंबराण मांडल। (धृ०) तवाच्या बा येळला। पाटुयान पार। देवदार कोंबडा। कोंबडा बा भोग्याला। तांबड सोळा फुटल्या। साळुख्याचा किलबिला। चिमणाबाया बाजार। कावळा बा कोक्याला। दिनमान उगावला। बैरो माज्या देवान। नवाल बा केलया। आंगोळीला उशीर।

---

१६ अपयश १७ माव–माया १८ विस्तवाचे इंगळ

उशीर बा झालाया । सूर्याबागा भगत । निद्रासैम झालाया । आंगुळीला उशीर । उन लाग कवळ । निद्रा लाग पवळ । सुंबराण मांडल ॥धृ०॥१॥ नवल्या माझ्या देवान । नवाल या केलया । सूर्याबा ह्यो भगत । निद्रासयम झालाया । गडबडोन जागा कर । जागा नवा झालायाग । निजून बा उठलार । देवळी बा रावळी गा । रावळात जाऊन गा । घडा न्हाणीचा गा । दुर्डा घेतला मंडपीचा । निघुनि बा चालला । माठा गंगला गेला । गंगयात पडला । घडा तेन भरिला । भोळा निघूनि चालिला । फुलाच्या बा बागत । बाग जळून रकशा । सुंबराण मांडल । धृ० ॥ २ ॥ भोळा निघुन चालला गा । हुंडारी बा डोंगराला । गुडग नडग फुटल । गुडग्या वाट्या फुटल्या । कोपर ढोपर फुटली गा । कोपरा वाट्या फुटल्या गा । तथन भोळा निघाला गा । निघून बा चालला गा । पर्वतीबा पटरा आला । पटरावरी जाऊन बा । पाणी मग बगतो । पाणी कुट गावना । सुंबराण मांडल । धृ० ॥ ३ ॥ अंगावइला कांबळा । कांबळा भोळ्यान काडिला । गादी त्यान बा टाकिली । मग भंडार वाटवा । गादीवर भंडारा ठेवला । होयकाळी[1] बसला । सूर्याबागा भगत । होयकाला बसला । सुंबराण मांडल ॥ धृ० ॥ ४ ॥ पहिली हाळी मारली गा । कराडी इज मारलीगा । दोनवी हाळी मारलीगा । चोरटा निघाला गा । तिनवी हाळी मारली । मेगायाचा धारागा । चवथी हाळी मारलीगा । जळमळ पाणीगा । पाचवी हाळी मारिली । खडका पाझर फुटला । भोळ्या होयिकं सपल । सुंबराण मांडल ॥ धृ० ॥ ५ ॥ गादी त्यान झाडलीगा । निघून बा चालला गा । कांबळा त्यान झाडलागा । करंडा लावली काकला । दुर्डा घेतला हातात । निघून बा चालला । माणगंग गेलायागा । शिरी मंदिल काडलागा । अंगावइला कांबळागा । कांबळा बा काडलागा । भुइलावा ठेवलागा । धोतरजोडा काडलागा । खाली मग ठेवलागा । अंगी किलच्यानि काढलगा । आंगुळी आक्यान[3] माडलर । आंगुळी आक्यान संपलर । घडा त्यान उजळिला । घडा त्यान धोईला । सुमराण मांडल ॥ धृ० ॥ ६ ॥ धोतरजोडा नेसला । अंगी किलच्यान सारल । शिरी मंदिल गुंडला । काबळ्या गोळ केलिया । घडा त्यान भरला । गुडघ्या मांड्या घेतला । घडा लावला शिराला । निघुन बा चाललागा । फुलाच्या बा बागला । बागजवळ जावोन । झंबु माज्या मळ्यांत । झडाप का उघडावी । झटाप त्यान उघडिली । घडा त्यान उतरिला । बागमंदि गेलायागा । फुल तोडु लागलागा । फुल जाइ शेवंती बा । फुल मोगऱ्याची । फुल गुलमोगऱ्याची । फुल भोळ्यान तोडिली । दुर्डा भोळ्याचा भरला । ततन भोळा बा निघाला । निघून बा चालला । सुमराण मांडल ॥ धृ० ॥ ७ ॥ याक वन वलंडल । दोनव्या वना गेलाया । दोन वन वलंडली । तिनव्या बा वनाला । वनाला

---

१ अगांत देव आणणें; देव आणण्याची क्रिया २ बंडी ३ स्नानविधि (आख्यान)

बा गेलाया । पाचा फडा भुजंग । भुजंग बा डुलत । वाटवर आडवा । भोळा भेणी झालाया । सरप बोलु लागला । भोळ्या तुला खातोरे । भोळा बोलु लागला । नग मला खाऊस । धन्याच्या बा अंगुळी । अंगुळीला उशीर । उशीर बा झालाया। अंगुळीला घालतो । माग मिबा येतोगा । मग मला खावाव । धनी जामिन देवावा । मग मला खावाव । धनी जामिन दिलाया । धर्तरीबा मातला । भोळा निघून चालला । चवथ्या पाचव्या वनाला । डझाण्या मग वाग गा । वाटवरी उभागा । उभा तवा राहिलाया । वाग बोलता झालाया । आता भोळ्या खातोरे । नग मला खाऊस । बिरोदेगा देवाला । अगुळीला उशीर । उशीर झालाया । अंगुळीला घालितो । मग मला खावाव । धनी जामीन देवावा । सुंबराण मांडल ॥ धृ० ॥८॥ चांद सुर्व्या जामीन । जामिन बा दिलाया । भोळा निघून चालिला । गेला देवळी रावळी । घडा ठेवला न्हाणीला । दुर्डा लाविऱ्या मडपीला । हाती झाडणी घेतली । देवळ रावळी झाडिली । भोळा निघून चालिला । गेला मेंढ्याच्या वाड्याला । मेंढ्याराख्या तू दादागा । पाच मेंढ्या बा फाडाव्या । पंडायान काजळ्या । वांजायान मुंज्यागा । करळ्यायान करळ्या । धन्याच्या बा तपनाला । मेंढ्याराख्या दादान । पाच मेंढ्या पिळल्या।वांज्यायान मुंज्यागा । पंड्यायान काजळ्या । करळ्यायान करळ्या । पाच मेंढ्या पिळिल्या । सुंबराण मांडल । धृ० ॥ ९ ॥ भोळा निघुनि चालिला । गयाच्या बा वाड्याला । गयीराख्या दादागा । काळी कपिली गायीगा । धन्याच्या बा तपनाला । तपनाला पिळाव्या । गयीराख्या दादान । काळी कपिली गयीगा । तपनाला पिळली । भोळा तन निघाला । देवळी रावळी आला । देवळी रावळी । हे सुंबराण मांडल धृ० ॥ १० ॥

टीप:—ह्याप्रमाणें मासल्याकरितां २ ओव्या सादर केल्या आहेत. जर अशा प्रकारच्या आणखी ओव्या जमवाव्या असे मंडळाच्या मतें ठरेल तर मंडळाच्या ज्या सभासदांच्या शेतांत दरसाल मेंढरें बसतात त्यांनीं ह्या बाबतींत प्रयत्न करावा अशी माझी सूचना आहे. रात्रीची जागरणें करण्याचें मला सामर्थ्य नसल्या मुळें ही सूचना मी करीत आहें. मंडळांतील कांहीं (जमीनदार असलेल्या) संशोधक सभासदांनी मनावर घेतल्यास धनगरांच्या असतील तेवढ्या सर्व ओव्या थोड्या च कालांत संपादन होऊं शकतील.

वा. दा. मुंडले

४ भ्याल्यासारखा

श्री

११ संशोधनवृत्त

(शक १८२२-१८३४)

भारत-इतिहास-संशोधक-मंडळाचे उत्साही व विद्वान चिटणीस रा. रा. तात्यासाहेब मेहेंदळे यांनीं जाहीरपत्रानें मंडळाच्या सभासदांनी यंदा आपलें संशोधनवृत्त संमेलनप्रसंगीं कथन करावें म्हणून सूचना केली. तिला अनुसरून ही हकीकत आपलेपुढें ठेवीत आहें.

तें वृत्त कथन करण्यापूर्वी त्याचें स्वरूप आपलें लक्षांत येणें जरूर आहे. मी सशोधनार्थ गेल्या १०-१५ वर्षांत एकटा असा फार थोडा फिरलों आहें. बहुधा तिघे चौघे मिळून आम्हीं फिरत असूं, यामुळे ज्या ज्या स्थळीं आम्हा गेलों, जो जो ग्रंथसंग्रह आमचे अवलोकनांत आला, अथवा जी अवांतर माहिती मिळाली, त्या स्थलांचें वर्णन, अथवा ग्रंथांचा नामनिर्देश किंवा ती माहिती इतर वृत्तकथनांतून आपलेपुढें येणार च असल्यानें पुनरुक्ति होऊं नये या दृष्टीनें त्यांचा समावेश या माझ्या वृत्तांत केलेला नाहीं.

या लेखांत सध्यांच्या संशोधनाचें स्थूल स्वरूप, त्या दृष्टीनें स्थळ व काळ यांचा विभाग, आणि मी जेथें एकटा च गेलों त्यावेळीं घडून आलेल्या विशेष महत्वाच्या संशोधनाचें वर्णन आणि इतरांबरोबर पाहिलेल्या गोष्टींचें त्यांच्या वृत्ताच्या परिघाबाहेरील ऐतिहासिक दृष्ट्या विवेचन, हीं दिलीं आहेत.

प्रत्यक्ष उपलब्ध झालेल्या ग्रंथांचा निर्देश करणें या कथानकाच्या सीमेबाहेरील आहे अशी माझी समजूत आहे, म्हणून त्यांचा निर्देश बहुधा येथें केलेला नाहीं.

संशोधन करणें हें आज अत्यंत सुकर आहे असें मला वाटतें. शारीर श्रमाची, कालाची व अवश्यक अशा द्रव्याची अवश्यकता नाहीं असें नाहीं; परंतु त्याच्या मानानें उपलब्ध होणाऱ्या साधनांची विपुलता लक्षांत घेतली म्हणजे, संशोधन करणें आज तरी किती सुकर आहे त्याची कल्पना सहज होईल. नापेर जमीनींत थोड्याशा श्रमानें व पैशानें विपुल पीक उत्पन्न होतें, तसें या दिशेनें आजपर्यंत एकाहून अधिक व्यक्तींचे नांव घेण्यासारखे प्रयत्न झाले नसल्यानें थोड्याशा श्रमानें सुद्धा संशोधकास एक वर्ष पुरेल इतकी सामुग्री एक महिन्यांत उपलब्ध होते. मे महिन्याचे सुटींत २०-२२ दिवस श्रम करून ५-६ ट्रंका कागदपत्र गोळा केल्याचा अनुभव आहे. तेव्हां संशोधक म्हणवून घेणें आज जर इतकें

सुकर आहे आणि स्वधर्म, स्वराष्ट्र व स्वभाषा यांची सेवा करणें जर या कालीं इतकें सहज आहे तर मग प्रत्येकानें च या दिशेनें कां प्रयत्न करूं नये हें कळत नाहीं .

संशोधनाचा प्रदेश व त्याचा काळ इतका विस्तृत व अगाध आहे कीं, संशोधनाचे कार्यांत संशोधकांची गर्दी होईल अशी कोणास हि कधीं सुद्धां भीति बाळगण्याची जरूरी नाहीं; आणि इतके वैपुल्य अथवा अशी समृद्धी असल्यावर निराशा अथवा मत्सर यांचें नांव तरी कशाला ! अहमहमिका अथवा महत्वाकांक्षा संशोधनाचे कामीं असणें क्षम्य नव्हे अवश्य आहे, परंतु मत्सर हा विघातक आहे. तो आज तरी असण्याची जरूरी नाहीं. कारण दहा-पांच तर काय परंतु एक हजार संशोधक आजन्म जरी श्रम करतील तरी त्यांस पुरून उरण्याइतके संशोधन आज आहे. परंतु असें म्हणणें हि एका दृष्टीने माझा हा अविचार च होईल. आज काय आणि कधीं हि काय, ज्ञानास सीमा अशी नाहीं च, तें निस्सीम आहे, प्रागतिक आहे, निरंत आहे. मग संशोधन सान्त कसें होईल ! तेव्हां आज काय आणि केव्हां हि काय मत्सरास म्हणून थारा नाहीं. आपल्या आयुष्याचा वीस वर्षांहून हि अधिक काल या संशोधनाचे कामीं अव्याहत परिश्रमांत ज्यांनीं घालविला, त्यांचे आज उद्गार असे आहेत कीं इतक्या वर्षांनंतर हि आज पन्हां संशोधनाचे द्वारशीं च आपण आहोंत. एवढी जेथे अगाधता आहे, तेथे आजन्म निमज्जन करण्यास कोणास प्रत्यवाय आहे !

संशोधन इतकें जरी सुकर आहे तरी, तें अधिक सुलभ होण्यास शिस्त व मनुष्यबळ यांची अवश्यकता आहे. प्रत्येक संशोधकानें प्रथम आपल्या संशोधनाची विशिष्ट दिशा ठरविणें अधिक श्रेयस्कर आहे. अशी दिशा ठरविणें फक्त कांहीं काळ च अवश्यक होतें; साधनसामुग्री पुष्कळशी हातीं येऊन, तिच्यावर मनन हि चांगलें झालें म्हणजे आपली दिशा सोडून इतरत्र संचार करण्यास संशोधकाच्या मनाची थोडीशी तयारी होते. अशा प्रकारें ध्येय एकदां ठरल्यावर त्या धोरणानें संशोधनाचा प्रदेश हि ठोकळ मानानें आंखल्यासारखा होतो. महाराष्ट्रांत च संशोधन आपणांस करावयाचें आहे, असें गृहित धरून कालानुरोधानें आपणास त्याचे कसे विभाग करितां येतील तें स्थूल मानानें पाहूं.

प्राचीन इतिहास एकीकडे ठेवुन ज्यासमध्यकालीन अथवा अर्वाचीन हि म्हणतां येईल या इतिहासाचा काळ शक ४०० पासून म्हणजे जयसिंह चालुक्यापासून सुरू झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. तेथपासून शक १७४० पावेतोंच्या काळाचे स्थूल मानानें तीन विभाग करावे. एक ४०० शकापासून तों ११ शें शकापावेतों; या कालांतील संशोधनाचा प्रदेश म्हटला म्हणजे, नर्मदा दक्षिण तीरा-

पासून तों तुंगभद्रा उत्तर तीरापावेतोंचा आहे. या भागांत तत्कालीन ताम्रलेख, प्रस्तरलेख, देवालयें, इतर इमारती, मुर्ती, नाणीं आणि दंतकथा यांचा हवा तेवढा पुरवठा होण्यासारखा आहे. या कालांतील मराठी सारस्वत उपलब्ध होण्याची फारशी आशा नाहीं; व तें आजपावेतों उपलब्ध नसल्यानें त्याचे स्वरूपावरून प्रदेशाची अटकळ हि बांधतां येत नाहीं.

शक ११०० पासून तों शक १५०० पावेतोंच्या कालांतील संशोधन विशेषतः श्रीगोदा व श्रीकृष्णातीरीं आणि थोडेंसें वरघांटीं झालें पाहिजे. ज्या प्रदेशास आज आपण मोंगलाई म्हणतों त्याचा पुष्कळसा उत्तरभाग व किंचित मध्यभाग हा महाराष्ट्र–धर्म–प्रवर्तक संतांच्या पादस्पर्शानें अत्यंत पुण्यप्रद झालेला आहे. व ज्यास या कालांतील संशोधन करणें असेल त्यानें श्रीआळंदीपासून नेवाश्याहून पैठणचे वाटेनें, जोगाईचे अंबयावरून थेट कल्याणी भागानगरापर्यंत बैलगाडीनें संथपणें प्रवास करून, प्रत्येक खेडें व त्या खेड्यांतील प्रत्येक घर तपासलें पाहिजे. या कालांतील ऐतिहासिक संशोधनाचा प्रदेश हा बहुतेक या सीमेंतील च ठरेल असें मला वाटतें.

शक १५०० ते १६४० पावेतोंचें संशोधन विशेषतः दक्षिण उत्तर कोंकण व पुण्यापासून कोल्हापुरापर्यंत थोडासा वरघांटाचा भाग यांत करणें योग्य होईल.

या नंतरचा शंभर वर्षांचा काल म्हणजे अटकेपर्यंत घातलेल्या हुतुतूचा असल्यानें या कालांतील संशोधन उत्तरेस अटकेपासून तों दक्षिणेस श्रीरामेश्वरापर्यंतचे प्रदेशांत झालें पाहिजे.

हे विभाग मीं स्थूल मानानें केले आहेत व यांत वऱ्हाड, नागपूरचा समावेश केलेला नाही.

तेव्हां आपल्या संशोधनाची पूर्व तयारी करणें म्हणजे आपलें ध्येय ठरवून त्या दृष्टीनें महाराष्ट्राचा कोणता भाग आपणांस इष्ट व अवश्यक आहे हें पाहणें इतकें ठरलें म्हणजे संशोधनाचें कार्य बेशिस्त होणार नाहीं व श्रम हि वेरे च वांचतील.

यानंतर संशोधकास अवश्य अशी दुसरी गोष्ट ' मित्रसहाय ' ही होय. समानविचार, समानउत्साह व समानवय असे मित्र एक अथवा अधिक मिळाल्यास संशोधक माझे मतें अत्यंत भाग्याचा गणला पाहिजे. अशा मित्रांबरोबर केलेला प्रवास किती सुखकर व बोधप्रद होतो हें येथें अप्रस्तुत असल्यानें, जरी त्याचें विवेचन करणें अप्रासंगिक होईल तरी इतकें येथें सांगणें अवश्य आहे कीं अशा मित्रांच्या सहवासांत केलेला प्रवास हा प्रवासापासून होणाऱ्या आवश्यक दुःखाविरहित असतो. तें दुःख किंवा त्या अडचणी या च मुळीं सुखाच्या होतात. त्या त्या परिस्थितींत नवीनता उत्पन्न झाल्यानें त्या

मसद च होतात दुःखास च सुखरूप करणें हें ज्या संगतींत शक्य आहे, असली संगत मिळाल्यास प्रवासदुःखाची तेथें गोष्ट कशास !

शके १८२२ त मी सातान्यास असतानां एका खेडेगांवीं देशपांड्याचे घरीं जुने कागदपत्र चाळीत असतां, तेथें मला तीन बखरी मिळाल्या. एक चतुर साबाजी संबंधी, दुसरींत विजयनगरचा विध्वंस वर्णिलेला आहे व तिसरीचा नाश अत्यंत झाला असल्यानें, जरी चांगलेंसें कळत नाहीं, तरी ती दुर्गादेवीच्या दुष्काळानंतरची अथवा तत्कालीन कांहीं हकीकत असावी असें वाटतें. पैकीं पहिली मंडळापुढें पूर्वीं च मांडली. दुसरी एकदा ' सरस्वतीमंदिरांत ' दिली होती, परंतु तींत चुक्या बऱ्या च असल्यानें, आज ती पुन्हां आपल्यापुढें ठेवीत आहें. तिसरी यथावकाश उजेडांत येईल. असो.

शक १५०० पूर्वीचें व शक ११०० नंतरचें मुसलमानी रियासतीचे कागदपत्र शोध केल्यास, त्या भागांत म्हणजे सोलापुर, विजापुर या भागांकडे देशमुख, देशपांडे व देसाई अशा वतनदारांकडे अद्याप हि मिळण्यासारखे आहेत अशी माझी समजत आहे. मराठ्यांच्या कालांत पूर्वीचे देशमुख, देसाई, देशपांडे च बहुशा आपापल्या वतनांत कायम ठेवलेले होते हे इतिहासज्ञांस सांगणें नको च. तेव्हां जसें मावळ हे मराठ्यांच्या आद्य इतिहासाच्या साधनांचें क्षेत्र आहे असें स्थूल मानानें म्हणतां येतें तद्वत् च मराठ्यांच्या पूर्वील मुसलमानांच्या रियासतीचा इतिहास कोठें मिळणें—महाराष्ट्रांत—शक्य असेल तर तो विजापुर सोलापुर व क्वचित् बेळगांव व धारवाड ह्या जिल्ह्यांत च मिळेल. त्यांपैकीं बहुतेक तर नाश झाला असेल च, तथापि अत्यंत परिश्रमानें कांहीं उपलब्ध होणें शक्य असल्यास तो तिकडे च होईल.

यानंतर शक १८२४–२५ पासून संशोधनार्थ म्हणून जो मी बाहेर फिरलों, तो मुख्यतः " रामदास आणि रामदासी " यांचे मठांचे दर्शनार्थ इतर मित्रमंडळीबरोबर फिरलो आहे. परंतु आमचें फिरणें बहुधा पायरस्त्यानें असल्यानें, इतर साधुसंतांच्या पदाविक्षेपांनीं पुनीत झालेलीं, त्यांच्या समाधीच्या योगानें तीर्थपदास पावलेलीं व त्यांच्या सांप्रदायांनीं विभूषित असलेलीं अशीं अनेक स्थळें अवलोकनांत आलीं. त्यांचा सविस्तर विचार दुसऱ्या सभासदांच्या लेखानें मंडळापुढें येणार आहे च. माझ्या नोंदवहींत इतिहासदृष्ट्या जी काय थोडीशी स्वतंत्र माहिती आहे ती व जेथें मी स्वतंत्रतेनें गेलों होतों तेथील माहिती एवढी च मी आतां येथें देतों.

शके १८२४–२५ सांत मी श्रीडोमगांवी गेलों. माझे संशोधनाचे प्रवासास हा आरंभ च होय. माझे प्रेमळ मित्र रा. पांगारकर हे यावेळीं डोमगांवी आमचे

बरोबर होते; तेथें श्रीमत् दासबोधाचा केलेला तर्जुमा तपासण्याचें काम आम्हीं केलें. हा तर्जुमा श्रीकल्याणस्वामींचे हातचे दासबोधावरून केलेला होता. मूळ पोथी हि श्रीकल्याण महाराजांचे हातची आहे की नाही, अशी अद्याप कोणास शंका असल्यास त्याबद्दल मजजवळ अत्युत्तम पुरावा आहे, तो कोणता हें पुढें येईल च. तेथें ७ दिवस मुकाम करून पुढें श्रीक्षेत्र पंढरपूर येथें गेलों. तेथें रा. पांगारकरांनी मला "जयबोध" म्हणून एक ग्रंथ दाखविला. त्याच्या ओंवी २० हजार असून अध्याय हि वीस च असल्याचें स्मरतें. हा ग्रंथ श्रीमत् दासबोधानंतर सुमारे १०० वर्षांनी झालेला असून तो त्या ग्रंथाची टीका च आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. ग्रंथ विस्तृत परंतु टीका इतकी उच्च दर्जाची नसल्यानें तो छापून काढण्यास अद्याप हि मन घेत नाहीं. सुमारें १००–१०० वर्षांच्या अवकाशानें तीन बोध झालेले आहेत. पहिला बालबोध, दुसरा दासबोध व तिसरा जयबोध. शेवटील दोन बोध या च सालीं उपलब्ध झाले. 'बालबोध' हा पुढील सालाचे आरंभी मी मुल्हेरीस गेलों तेथें उपलब्ध झाला. व तो विशेष महत्वाचा असल्यानें यंदा प्रसिद्ध हि केला आहे.

खानदेशांत जनजसवंत, रत्नाकर व दीन मुकुंद हे च कायते नांव घेण्यासारखे संतकवी होऊन गेले व त्यांचा, निदान शेवटच्या दोघांचा, सर्व अथवा बरा च ग्रंथसंग्रह मुल्हेरीस उपलब्ध झालेला आहे. मात्र रत्नाकराचे भागवतासारखा प्रचंड ग्रंथ मी न आणतां ब्रम्हाणपुरी त्यांचे परंपरेतील मठांत तसा च ठेविलेला आहे. आतां सारस्वताच्या दृष्टीनें खानदेशांत संशोधनाचें फारसें काम राहिले आहे असें वाटत नाहीं.

या पुढचे वर्षी अत्यंत महत्वाचा असा कागदपत्रांचा संग्रह मजला मिळाला. श्रीसमर्थांचे उपाध्याय दिवाकर भट यांचे वंशजाची एका सन्मित्रा मार्फत माझी भेट झाली त्याचेकडून श्रीसमर्थकालीन अशीं सुमारें २०० वर पत्रें मिळालीं. त्या पत्राचा संबंध श्रीरामदासी सांप्रदायाशी असल्यामुळें तीं मी माझे मित्र रा. शंकर श्रीकृष्ण देव यांचे हवालीं केलीं आहेत. रामदासी ग्रंथमालेंत **श्रीसमर्थ संप्रदायाचीं कागदपत्रें** म्हणून जो भाग येत्या विजयादशमीस प्रसिद्ध होणार आहे त्यांत वरील पत्रांचा समावेश होऊन त्यांचें महत्व आपल्या सर्वांच्या निदर्शनास येईल.

या च शकीं आणि या च संधीस दुसरे एका दिशेनें संशोधन करणें अनायासें माझ्या वांट्यास आलें. चाळीसगांव तालुक्यांतील पिंपरी नांवाच्या खेड्यांत एक ताम्रपत्र (पत्र ३) आहे असें रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांना कळलें ते इकडे अनभ्यस्त असल्याने व त्यांचा मुक्काम हि त्यावेळीं येथें च

असल्यानें कांहीं मित्रांच्या साहाय्यानें त्यांस मिळणें पेक्षां तें मला मिळणें थोडें सुकर झालें; व त्याप्रमाणें तें मला मिळालें. पुढें रा. राजवाडे यांस कार्यव्याप्ति असल्यानें तें ताम्रपत्र वांचण्याची मला च आज्ञा केली. प्रथम प्रयत्न असल्यानें त्यास कालावधी लागला खरा परंतु माझे संशोधनास एक नवीन मार्ग खुला झाला. हें पुराणवस्तुसंशोधन अत्यंत हृदयंगम आहे असें मला वाटतें. इतरांनीं हि त्याचा अनुभव घेऊन पहावा. यानंतर ५-७ ताम्रपट या च जिल्ह्यांत नवीन उपलब्ध झाले, यावरून माझें मत असें झालें आहे कीं, नाशीक व खानदेश विशेषतः त्याचा दक्षिण भाग, या प्रदेशांत ताम्रपट अत्यंत असले पाहिजेत. उपलब्ध होतील तेव्हां खरें. मुल्हेरच्या रेषेंत अजिंठ्याच्या उत्तरपठारीं खानदेशच्या दक्षिण भागांतील, वाघळीसारख्या खेड्यापाड्यांत हि प्राचीन शिवालयांचे भाग अद्याप हि पाहाण्यास सांपडतात. तेथें असलेल्या शिलालेखांवरून, हीं मंदिरें पूर्वी ' कैलासतुल्य ' भव्य असावीत असें स्पष्ट दिसतें. वेरूळ अथवा फरदापूर येथील लेणीं ज्या अजिंठ्याच्या डोंगरांत कोरली गेलीं त्याचे च दक्षिणोत्तर पाठारावर, राष्ट्रकूट अथवा चालुक्य यांचे सामन्त आणि महासामन्त राज्य करीत होते. राष्ट्रकूट हे शैव होते असें म्हणतात. त्यांचे कालांतील हल्लीं उद्ध्वस्त अशीं शिवालयें इकडे बरीं च दृष्टोत्पत्तीस येतात, आणि म्हणून च मी वर लिहिलें आहे कीं, खानदेशांत सारस्वतग्रंथांचे दृष्टीनें संशोधनाचें कार्य जरी फार थोडें राहिलें आहे, तरी इतर पुराणसंशोधन संपलें नाहीं. या च जिल्ह्यांतील भास्कराचार्यांचें पाटण या शहरीं खणलें तर अद्याप हि शिलालेखांचे तुकडे सांपडतात. पितळखोऱ्यांचीं लेणीं या च पाटणाजवळ मोंगलाई व खानदेश यांच्या सरहद्दीवर आहेत. तेव्हां खानदेशांतील पुराणवस्तुशोधन संपलें असें म्हणतां येणार नाहीं. इतकें च नाहीं तर अद्याप त्यास आरंभ हि नाहीं असें म्हटलें तरी चालेल.

खानदेश व मोंगलाई यांचे सरहद्दीवरील कन्नडचे पुढें हतनूर येथें एक विहिर खणीत असतां, जिच्यावर कांहीं अक्षरें खोदलीं आहेत अशी एक वीट सांपडली आहे असें कळलें. ती कशी आहे तें पाहण्यास व मिळाली तर घेऊन येण्यास मी तिकडे गेलो परंतु कन्नड येथें मुक्काम झाला असतां, ज्याचे घरीं तो आड खणला होता त्या मालकाची च भेट तेथें झाली. त्यानें त्या वेळीं उडवाउडवी केल्यामुळें निराशा झाली; व तो गैरमाहितगार असल्यानें ती वीट हि कोठें नाहींशी झाली म्हणून पुढें कळलें. त्या च विहिरींत कांहीं दगडांचा संग्रह आहे म्हणून कळलें, त्यावरून शोध करितां एक दगड मात्र नजरेस पडलें परंतु तें शुद्ध शेण झालेलें होतें. त्या भागांत प्रयत्न केला तर कदाचित् असल्या विटांचा अधिक शोध लागेल. असो. मी कन्नडीं च थोडा शोध करून परत जाण्याच्या तयारीत असतां तेथील गोविंद गजानन राजवैद्य म्हणून एक सद्-

गृहस्थ आहेत त्यांचे घरीं अप्रतीम ग्रंथसंग्रह आहे असा शोध लागला. तो सर्व ग्रंथसंग्रह मीं पाहिला आहे. मराठी ग्रंथांचा भरणा थोडा आहे. संस्कृत वैद्यकावर मात्र अप्रतीम ग्रंथ आहेत.

शक १८२७–२८ पासून बहुधा प्रत्येक वर्षी आम्ही मोंगलाइचे बाजूस जात असूं. तेव्हां प्रत्येक वर्षाची हकीकत न देतां मजजवळ जीं टिपणें आहेत त्यांचा एकंदर गोषवारा मात्र येथें देतों.

नेवासें—

येथें नारायण शंकर पाठक या नांवाचे गृहस्थाजवळ एक ताम्रपट आहे म्हणून कळलें. हे गृहस्थ नेवाश्यास व शेंवतें देवळाणें पोष्ट शेवगांव येथें राहतात. तसें च सावळाराम रामचंद्र बडवे यांचे जवळ हि दोन पत्रें आहेत असें कळलें.

वेरूळ—

येथें चार जुनीं घराणीं आहेत म्हणून समजतें तीं हीं:–(१) ढगे (रोझ्यास राहतात) (२) डोळस (३) लक्षेश्वरी (४) पाठक. तेथें विष्णुशास्त्री टोपरे म्हणून शास्त्री आहेत. हे परस्थ असून, दोन तीन पिढ्या झाल्या वेरुळास आले आहेत. यांचे जवळ संस्कृत ग्रंथांचा अत्यंत मोठा भरणा आहे. परंतु दुःखाची गोष्ट अशी कीं त्यांची गरीबी असल्यानें त्या पोथ्यांची व्यवस्था नीट नाहीं. पाणी गळून बहुतेक १–२ वर्षांत त्या नामशेष होतील असें दिसतें. मीं तो संग्रह पाहिला त्या च वेळीं पोथ्यांची पत्रें सोडविणें जरा कठिण च झालें होतें. सदरहू गृहस्थ पोथ्या देण्यास तयार आहेत. संग्रह अत्यंत मौल्यवान आहे. मीं कांहीं पोथ्यांचीं नांवें टिपलीं आहेत, परंतु तितकीं सुद्धां येथें देणें अशक्य आहे. माझे टिपणवहींत त्या यादीचे शेवटीं यांचे नांवावर शेरा आहे, तो असाः- A very large stock, impossible to take down all.

दौलताबाद--

येथें किल्या शेजारी च मानपुरी मठ आहे व तेथें मानपुरींची समाधी आहे त्यावर एक लेख आहे तो असाः--

श्री गुरवेनमः ॥ पाहा देवगिरी सफळ
अवघी साधुजनीं सेविली । तेथें
मानपुरी पवित्र नगरीं समाधि संपादिलीः
सोळासे जरी बाबनातिल बरा साधार
संवत्सरीः जेष्ठः शुद्ध हि पंचमी रविदिनी
हे बोलिलो उत्तरी ॥

यावरून मानपुरींचा समाधी काळ शक १६५२ साधारण संवत्सर जेष्ठ शुद्ध ५ रविवार हा होता हें उघड आहे.

या समाधी शेजारीं च दुसरी एक समाधी आहे तिच्यावर हि लेख आहे तो असाः—

श्री गुरवेनमः ॥ श्रीमद्देवगिरी जनार्दन
पुरीं वैकुंठ लोकापरी । जेथे ग्यानपुरी हि
मानपुरिसी ध्यावोनिया अंतरीं । सत्राशे
सत्याशी श्रावणे शशिदिने श्री पूर्णिमा
ऽऽभ्यंतरी । गेले विष्णुपदा शरीर त्यजुनी
ते क्रोधने वत्सरीं ॥

या वरून समाधिकाळ शक १७८७ क्रोधन संवत्सर श्रवण शुा १५ सोमवार. हे ग्यानपुरी समाधिसान्निध्यावरून व श्लोकावरून मानपुरीचे शिष्य असावेत असें वाटतें; परंतु काळांत फार अंतर आहे.

येथें असतां असें कळलें की रा. बापू बाळकृष्ण जोशी गुरवाचे ढोसले पोष्ट बदनापूर तालुके चालना यांचे जवळ शके ११०० पासून १३०० पावेतोचा मोडी कागद सांपडेल. मी तो मिळविण्याचा अथवा हि हकीकत खरी अगर खोटी याचा निकाल लावण्याचा अद्याप प्रयत्न केलेला नाहीं.

पैठण—

नाशिक येथील हरि शास्त्री गर्गे हें नाथांच्या वंशाचे तीर्थोपाध्ये असल्यानें, नाथांचा हस्तलेख त्यांचे जवळ मिळेल म्हणून नाथांच्या वंशांतील हल्लींचे ह. भ. प. नारायण बुवा पालखीवाले यांनी कळविले. तसें च नाथांचा सर्व ग्रंथ-संग्रह त्यांचे उद्धव म्हणून कोणी शिष्य होते, व ज्यांचा मठ पंढरपुराकडे आहे, त्या मठीं तो सर्व आहे.

शिवदिनकेसरींच्या मठांत कांहीं ग्रंथसंग्रह आहे. परंतु मठाधीशाची प्रत्यक्ष भेट केव्हां हि न झाल्यानें तो समग्र पाहण्यास मिळाला नाही. व्यवस्था-पकानें आपल्या जवळ असलेला थोडासा दाखविला.

शिवदिनांची समाधी–शके १६९६ जय नाम संवत्सर माघ वद्य १३ सोमवार.

यांचा ज्ञानप्रदीप म्हणून ग्रंथ तेथें पाहण्यास सांपडला. रचनाकाल शके १६९२.

कृष्णदयार्णव व त्यांचे नातू काशिनाथ स्वामी व आणखी तिसरे कोणी एक या तिघांच्या समाधी एकत्र शेजारीं आहेत त्या समाधींवर त्यांच्या कालाचा उल्लेख आहे, परंतु ते श्लोक आपणांस आतां लवकर च ऐकण्यास सांपडतील म्हणून मी त्यांचें पुनरुच्चारण करूं इच्छीत नाहीं.

श्रीनाथांच्या समाधीवर एक श्लोक आहे व त्यांत त्यांचा समाधिकाल दिलेला आहे. त्या खेरीज रघुनाथकृत एकनाथनिर्याण म्हणून एक ओंवीबद्ध प्रकरण त्या मठांत च सांपडलें, त्यांत निर्याणकाल दिला आहे तो असाः —

" शके (१५२१) पंधराशे एकवीस । वर्षामाजी विकारी नांव त्यास । मीन गृहीं संक्रांतीस । फाल्गुन वद्यास षष्टी जे ।। भानुवासर असुनि चंद्रमा । प्रहर दोन चारि घटिकेला । वज्र योग वनिज करण ते वेळां । असें प्रांजळा ते काळीं ।। जाला पूर्वी षष्टीपंच पूर्वी । आतां जाली षठ पर्वी । ऐसे महिमान नाहीं ऐकिलें पूर्वी । पुढती नाहि किजे उर्वी मंडळामाजी ।। "

नाथांच्या निर्याणाबद्दल अशी आख्यायिका आहे कीं त्यांनीं जलसमाध घेतली. पैठणास जलसमाधि घेतलेल्या संतांचा च विशेष भर आहे, यावरून जलसमाधि घेणें हा सगरहा प्रघात पूर्वी होता असें दिसतें. पूर्वील संतांच्या समाधींचा स्थूल दृष्ट्या विचार केला तर, असें दिसतें कीं श्रीज्ञानेश्वरीत सांगितल्या प्रमाणें जसा दिवा मालवावा त्याप्रमाणें प्राणांचें आकलन करून ब्रह्मरंध्रांतून प्राणांस घालवून देह ठेविणें ज्यांस अनुकूल नसेल ते जलसमाधि घेत असावेत; परंतु आपले अवतारकार्य संपल्यावर शरीराच्या लालसेनें दिवस कसें तरी कंठणें कोणांस च संमत नसावें. श्रीसमर्थांच्या समाधिकाळा पावेंतों झालेल्या संतांच्या चरित्रांचा विचार करून असें माझें मत झालेलें आहे. त्यानंतरच्या काळासंबंधी नव्हे. असो.

श्रीनाथांच्या समाधीच्या सन्मुख जें महाद्वार आहे, त्यावर श्लोकबद्ध असें नाथचरित्र कोरलेलें आहे, त्याचा मासला म्हणून १–२ श्लोक येथें देतों.

श्रीगणेशा ।। सप्रेमयुक्त घडली गुरुभक्ति
साची । जाली कृपा सफळ साध्य जनार्दनाची ।
ब्रम्हैव बोध समना निज निर्विकारी ।
श्री एकनाथ विबुधा भरणावतारी ॥ १ ॥
वाराणसींत विबुधाप्रति मान्य जाली ।
एकादशावरि टिका सुगमार्थ केली ।
ब्रम्हीं स्वकर्म विनियोग जनोपकारी ।
श्री एकनाथ विबुधा भरणावतारी ॥

असें हें एक अष्टक असून, शेवटी एक ९ वा श्लोक दिलेला आहे. ही रचना जर पुरातन असेल, तर ती महत्वाची आहे; कारण इच्यांत श्रीखंड्या चरित्र व नाथांचे ग्रंथ हें सर्व आलें आहे; रचना आधुनिक असल्यास जनसमजुतीचा एक प्रकारें हा पुरावा च आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. श्रीनारायण बुवा पालखीवाले यांचे संग्रहीं असलेली 'रुक्मिणीस्वयंवराची'

एक प्रत मला त्यांनीं दाखविली; तींत अध्याय ५ ओंवी सातवी संपूर्ण झाल्यावर एक ओंवी अधिक आहे, ती अशी:—

माघ शुद्ध पंचमीसीं । भृगु रेवति नक्षत्रासि ।
शुद्ध पंचक विवादेसी । द्विजे देवासी सांगितले ॥

ही ओंवी ज्या प्रतीत आहे आहे ती शक १७७१ मधील आहे. परंतु या प्रतीहून हि त्यांचेजवळ आणखी एक जुनी प्रत आहे तांत ही ओंवी अशी आहे–

माघ शुद्ध अष्टमी बुध । अनुराधा नक्षत्र योग सिध ।
निष्पंचकी लग्न सिध । द्विजीं देवासी प्रबोधिलें ॥

ही ओंवी अथवा वर दिलेली यांपैकी कोणती हि आज प्रसिद्ध असलेल्या छापील प्रतींत नाहीं, परंतु मागील ओंव्यांच्या संदर्भावरून पाहतां अशा एका ओंवीची आवश्यकता खास आहे असें स्पष्ट दिसतें. छापील प्रतीत सातवी ओंवी अशी आहे:––

रुक्मिणीचिया लग्नासि । कवण दिवस कवणिये मासीं ।
कवण नक्षत्र तें द्विजासी । मदनमदनें पुसिलें ।

या वरील ओंवींत श्रीकृष्णांनीं द्विजांस प्रश्न केला आहे कीं, रुक्मिणीचें लग्न कधीं आहे ? परंतु छापील प्रतीत त्यास उत्तर दिलें नसून त्या पुढील ओंवी

सारथि बोलाविलें दारुकासि । वेगिं संजोगिं रथासी ।
जाणें आहे कौंडन्यपुरासी । दुजयासि कळों नेदी ॥

अशी आहे. ही विसंगता अत्यंत दोषार्ह आहे; वरील प्रश्नाचें उत्तर अवश्य पाहिजे होतें, परंतु छापील प्रतीत कोठें दिसत नाहीं. या दृष्टीनें त्या ओंव्या अत्यंत महत्वाच्या आहेत. या दोन ओंवीपैकीं एक मूळ नाथांची च असली पाहिजे हें उघड आहे. कारण नाथांनीं देवाकडून प्रश्न करवून तो तसा च सोडून दिला जाणें शक्य नाहीं.

घोटण–

पैठणाहून शेवगांवास जातांना रस्त्यावर हें खेडें लागतें, येथें एक शिवालय फार मोठें व पुरातन आहे, देवळाची सर्व बांधणी यादवकालीन असून स्तंभावर मूर्ती कोरलेल्या आहेत. देवळाच्या आंतील सपाटीपेक्षां सुमारें दीड पुरुष खोल गाभाऱ्यांत श्रीशिवपिंडी व शाळुंका आहे, शिलालेख वगैरे नाहीं .

वृद्धेश्वर–

नांवावरून च हें स्थान अत्यंत पुरातन आहे हें उघड होतें. अरण्यांत अस-

त्यानें मजबूत पेटींत घालून बंदोबस्तानें ठेविलेल्या रत्नाची या देवालयास उपमा शोभेल. सभोंवार असलेल्या डोंगरावर मत्स्येंद्र, कानीफ व जालंधर यांची स्थानें आहेत व या नाथांनीं या च शिवालयांत भंडारा तपश्चर्येच्या सांगतेकरतां केला होता अशी एक आख्यायिका आहे. दिनकर रामदासी यांनीं येथें च तपश्चर्या केली. या देवळाचा जीर्णोद्धार पुरंदरे यांनीं केला असें शेजारच्या गांवच्या लोकांचें म्हणणें आहे या देवळांत एक भली मोठी घंटा आहे, तिच्यावर एक लेख आहे, तो फार झिजलेला असल्यानें अक्षरें जशी वांचतां यावीं तशी येत नाहींत, तथापि प्रयत्न करून जसें वाचवलें तसें पुढें देत आहें:—

९ (ओं०) संवत ११७१ (११५१?) चैत्र सुदि ॥ सोमे श्रीभना (रा ?) वर्ष विजय राजा । प्रमदेवः (प्रानदेव) राजने सृष्टा श्री परमात्मा सिवाय सुखाय ×× ाद्वावे (देवा) (देवे) घंटा प्रदत्ता :

या लेखांत प्रानदेव किंवा प्रमदेव असा दान देणाऱ्या राजाचे नांवाचा उल्लेख आहे. हा प्रमदेव किंवा परमदेव यादव वंशांतील दुसऱ्या सेऊणचंद्राचा मुलगा व शक १११० चे सुमारास देवगिरीस यादवांची गादी स्थापणाऱ्या भिल्लमाचा पणजा असावा. सेऊणचंद्र हा शक ९९८ मध्यें हयात होता. कारण त्या वर्षी त्यानें चालुक्य विक्रमादित्यास कल्याणीचे गादीवर बसण्यास मदत केली आहे. परमदेवाचा काल या वर दिलेल्या लेखावरून शक १०३६ चा येतो. तेव्हां सेऊण व परमदेव यांच्यांत अंतर फक्त ३८ वर्षांचे येतें, सबब तो परमदेवाचा काल असणें असंभवनीय नाहीं. तसें च भिल्लमाचा मृत्यु हल्लीं उपलब्ध असलेल्या माहितीवरून शक ११२३ मध्यें झालेला आहे. तेव्हां परमदेवांत व भिल्लमांत म्हणजे चार पिढ्यांत येकंदर ८७ वर्षांचे अंतर येतें. तेव्हां हें हि कांहीं अननुकूल नाहीं. तेव्हां हा प्रमदेव किंवा परमदेव वर सांगितल्या प्रमाणें यादव वंशांतील च असावा हें निश्चित आहे.

संवत्सर ११७१ किंवा शक १०३६ या साली बार्हस्पत्य गणनेनें चैत्र शुद्ध ५ स सोमवार येतो.

तेव्हां शके १०३६ च्या चैत्र शुा ५ सोमवारीं यादव कुलोत्पन्न परमदेव नांवाच्या राजानें श्रीवृद्धेश्वर किंवा म्हातार देवास घंटा अर्पण केली, असें या लेखावरून स्पष्ट होतें.

बीड—

हें शहर तेथें असलेल्या जीर्ण इमारतींवरून व त्यांच्या कित्येक अवशेषांवरून अत्यंत पुरातन आहे असें सहज दिसतें. हें बिन्दुसरा नदीचे तीरीं असून

त्याचें पुरातन नांव कोणी चंपावती तर इतर कित्येक कुन्दमती होतें म्हणून सांगतात. येथें यादव बांधणीचें फार भव्य, व सभोंवार असलेल्या जलपूर्ण संदकानें अत्यंत रमणीय असें 'श्रीकंकालेश्वराचें' देवालय आहे. त्यांत शिलालेख वगैरे कांहीं नजरेस पडला नाहीं, यामुळें यादवांचे राजवटींतील तें देवालय आहे इतकें जरी निश्चित आहे तरी कोणत्या विशिष्ट यादवराजानें तें बांधलें याबद्दल कांहीं एक अटकळ बांधतां येत नाहीं.

जवळ च विक्रमाचा घाणा म्हणून एक स्थान दाखवितात. या स्थानाच्या आख्यायिकेवरून एक विचार मनांत उद्भवतो, तो येथें नमूद करणें इष्ट वाटल्या वरून तसें करीत आहें.

विक्रम राज्यभ्रष्ट होऊन शनीचे फेऱ्यांत सांपडल्यानें त्यास आपल्या आयुष्याचे कांहीं दिवस तेल्याचे घाण्यावर बसून घालवावे लागले, ही आख्यायिका आम्हांस लहानपणीं च माहीत होते. हा विक्रम उज्जयनीचा असें हि सांगतात. आख्यायिकेचा उद्गम कदाचित् ऐतिहासिक चालुक्य विक्रमाच्या कथेंत तर नसावा ? परमार्दिदेव अथवा दुसरा विक्रम यास त्याचा भाऊ जो सोमेश्वर यानें इतर राजांच्या मदतीनें पदच्युत करून त्यास आपल्या राज्यांतून घालवून दिलें होतें व त्यास पुढें त्याचा मित्र जो यादव सेऊणचंद्र त्यानें मदत करून फिरून त्यास शक ९९८ मध्यें राज्यासनावर बसविलें ही कथा इतिहासज्ञांस माहित च आहे. तेव्हां कदाचित् पदच्युत झालेला विक्रम आपल्या यादव मित्राचा पाहुणचार घेत त्याचे राज्यांत या बीडास अथवा चंपावतीस तर राहिला नव्हता, अथवा पाहुणचार घेत म्हणण्या ऐवजीं सेऊणाशीं राजकरण करीत असतां अज्ञातवासांत तर येथें राहिला नव्हता ? उज्जयनीचा विक्रम व कल्याणीचा विक्रम यांच्यांत घोंटाळा होणें साहजिक आहे. दुसरें असें कीं, सेऊणाचे वेळीं यादवांची राजधानि 'चांदोर' ही होती, देवगिरी नव्हती; तेव्हां राजधानीपासून बऱ्या च अंतरावर चंपावतीस राहणें असंभवनीय नाही. सेऊणाचे वेळीं अथवा त्यानंतर लागली च वृद्धेश्वराचे देवास सेउणाचे पुत्रानें घंटा अर्पण केली आहे यावरून तो प्रदेश यादवांचे ताब्यांत होता असें अनुमान काढणें अगदीं च केवळ गैर होणार नाहीं. कसें हि असो, बीड अथवा चंपावती येथील विक्रमाच्या मूलाशीं ऐतिहासिक आख्यायिका आहे हें खास; व बहुधा मीं वर दिली आहे ती च ती असावी अशी दृढतर शंका येते.

अंबे–जोगाईचें––

येथील विठ्ठलबुवा पुसकर सांगतात कीं ही पूर्वींची जयंती नगरी. आपला चुलता जो शारङ्गधर त्याचा च जयंतपाळ पुतण्या व सेनापति होता. या जयंतपाळाची समाधि उदगीर येथें आहे. जयंतपाळ अथवा जयंतीपाळ हें विशेषनाम

नसून जयंती नगरीचा पालन करणारा तो जयंतिपाळ असा त्याचा अर्थ आहे. ते आणखी असें सांगतात कीं श्रीमुकुंदराजांची खरोखर समाधि येथें नसून ती काशीकडे आहे. हल्लीं ज्या स्थानास समाधि म्हणून म्हणतात तें फक्त एकांतवासांत तपाचरणाचें स्थान आहे, बसावयाची ती जागा होती.

या हकीकतींत सत्यतेचा कितपत अंश आहे त्याचा निकाल लावणें संशोधकांकडे आहे.

येथें रा. कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर म्हणून एक वकील आहेत, त्यांनीं आपले चुलते बाळकृष्ण भवानराव ऊर्फ तात्या साहेब चौसाळकर इनामदार यांचे संग्रहीं असलेली व परंपरागत त्य घराण्यांत चालत आलेली एक विवेकसिंधूची पोथी मोठ्या आनंदानें मला दिली. या पोथीचा विशेष हा आहे कीं, आजपर्यंत कोणत्या हि प्रसिद्ध प्रतींत शेवटीं ज्या ओंवी नाहींत अशा दोन ओंवी या प्रतींत शेवटीं दिल्या आहेत. व त्या अत्यंत महत्वाच्या आहेत. त्या ओंवी ह्याः–

वर्ते शके अकरा दाहोत्तरू । साधारण संवत्सरू ।
राजा शारङ्धरू । राज्यकरी ॥
ऐसा समयो सर्वोत्तमु । तेथ मुकुंद द्विजोत्तमु ।
विवेकसिंधु मनोरमु । निर्मिता जाला ॥

या दोन ओंवींचें महत्व किती आहे हें स्पष्ट करून सांगण्याची अवश्यकता नाही. श्रीमुकुंदाचा काल आज पावेतों — ही पोथी माझे हस्तगत होई तों — अज्ञात होता तसा तो हल्लीं न राहून त्याबद्दल कल्पनातरंग उठण्यास कांहींसा आधार झाला आहे. दुसरें असें आहे कीं " नृसिंहाचा जयंतपाळ " म्हणून जों हल्लींच्या प्रचलित प्रतींत उल्लेख आहे तो अजून त्यांत ज्याचा उल्लेख नाहीं अशा शारङ्धराचा शिवाय उल्लेख आहे व तो ' राज्य करी ' असा आहे. नृसिंहाच्या जयंतपाळाचा ' राज्य करी ' असा कोठें हि उल्लेख नाहीं, यावरून विठ्ठलबुवा पुसकरांचें म्हणणें जरा विचारार्ह आहे हें उघड आहे. पण या कालासंबंधी मी लवकर च स्वतंत्र विचार करणार आहें व तशी चर्चा करण्याचा हा समय हि नव्हे म्हणून वर केलेल्या निर्देशावर सध्यां सोडणें बरें. एक गोष्ट मात्र येथें नमूद करावीशी वाटते ती ही कीं, गोव्याहून नुकती च एक विवेकसिंधूची प्रत रा. तात्या साहेब मेहेंदळे यांचेकडे आली व तिच्यांत हि या दोन ओंवींचा उल्लेख आहे. अंबे जोगाईचें कोणीकडे व गोंवें कोणीकडे. परंतु या दोन भिन्न स्थलीं उपलब्ध होणाऱ्या प्रतींत या दोन महत्वाच्या ओंवी बहुशा एका च शब्दांत सांपडतात ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. असो.

अंब्यास एक नृसिंह तीर्थ आहे. तेथें च श्री दत्तोपासक, नाथ–समकालीन दासोपंत यांची समाधि आहे. दासोपंताचा जन्मकाळ भाद्रपद वा ८ शके

१४७३ व समाधिकाळ माघ वा ६ शके १५३७ म्हणजे नाथानंतर १६ वर्षांनी. दासोपंताचा ग्रंथसंग्रह बहुतेक सर्व येथे असलेल्या त्याच्या दोन मठी आहे.

चांगदेवाचा म्हणून येथे एक फार मोठा वाडा व त्यांची च एक भली थोरली विहीर आहे. चांगदेव चार ऐकून माहित आहेत. एक वटेश्वर, दुसरे मुधेश, तिसरे महिपतिबावास आपल्या पूर्वजाचे चरित्र कथन करणारे, व चौथ पाटण येथील भास्कराचार्यांचे नातु. यापैकी कोणाचा हा वाडा आहे याचा शोध लागणें अवश्य आहे. शिष्यपरंपरा या वाड्यात आहे.

अब्यास शिलालेख फार आहेत व ते वाचले गेले नाहीत अशी माझी समजूत आहे. मला हें कळल्यानंतर एक दोन वाचण्यास अवकाश मिळाला, परंतु इतर तसे च राहिले आले आहेत दक्षिण हैद्राबाद येथील डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन डॉ. मिराजउल हसन यांच्याशी या शिलालेखांच्या व मोगलाईतील इतर शिलालेखांचे बाबतीत मी पत्रव्यवहार केला व काही प्रसिद्ध झाले असल्यास कृपेनें पाठविण्याविषयी विनंति हि केली. डॉ. साहेबांनी कृपेनें लागली च उत्तर पाठविले की, त्या दिशेनें अद्याप तिकडे प्रयत्न झालेला नाही. परंतु विचार आहे व लवकर च तो अमलात येईल; व पुस्तकें बाहेर पडली म्हणजे मजकडे पाठविण्यात येतील. हे काम राष्ट्राचें असल्यानें सावकाश च व्हावयाचे तेव्हां या उत्तरास आज जरी जवळ जवळ ६ वर्षें झाली तरी ता कार्याचे मानाने काही फार नव्हत.

अंब्यास च मला श्रीज्ञानेश्वरीचा ९ वा अध्याय उपलब्ध झाला. तो मी आपणास दाखविण्यास आणला आहे. याचे संबधी विचार स्वतंत्र च करणें बरें.

धारूर--

जांबेहून निघून अब्यास येण्यास निघालो असतां वाटेत प्रथम केशवपुरी म्हणून लहानशा वस्तीचे एक खेडे लागते. या खेड्याचे सभोवारची पडझड व पुरातन इमारती आणि प्राकार, तलाव आणि बावी यांच्या खुणा पाहिल्या व त्यांनीं व्यापिलेला विस्तार लक्षांत घेतला म्हणजे पूर्वी फार मोठ्या शहराची केशवपुरी ही एक पुरी अथवा भाग होता असे सहज दिसतें. श्रीकेशिराजाची मूर्ति अत्यंत रमणीय आहे. येथें संशोधन पुराणवस्तूचे करणे योग्य व अवश्यक आहे.

केशवपुरीचे वाटेंत माजलगांव लागते. येथे पाठक उपनांवाच्या गृहस्थाजवळ मराठी ग्रंथांचा उत्तम संग्रह आहे. येथे एका कोष्ट्याजवळ श्रीज्ञानेश्वरीची एक जुनी प्रत आहे.

हें उद्धव चिद्‌घनांच्या समाधीचें स्थान. मठ व समाधि यांची स्थिति अत्यन्त उद्वेगजनक आहे. समाधि मठाचे बाहेर परंतु आवाराचे आंत असून वर छाया जवळच्या वृक्षाची मात्र आहे. चबुत्रा मोठा प्रशस्त असून समाधि १॥ हात चौरस आहे. वर पादुका आहेत. संतांनीं जननिंदेचा उग्र ताप सहन करणें असें तसें त्यांच्या समाधींनी शीतोष्ण सहन करणें सहज आहे. व या दृष्टीनें आहे ती स्थिति नैसर्गिक च आहे. मठ सबंध पडला आहे. अशी ही नि-वाऱ्याची जागा ज्यांच्या नशींबीं नाहीं अशी एक गरीब बाई व बिनबाप्या पोर-का एक पोरगा अशीं दोन मायलेंकरें त्या मठांत राहत आहेत. दारिद्र्याचे त्यांचेवर मोठे उपकार च म्हणावयाचे कीं त्यांस सत्संगति त्या योगें घडते.

यज्ञेश्वर भट पुजारी बालाजी संस्थान, यांनीं सांगितलें कीं, धारूराहून ८ कोसांवर सोनेसांगवी म्हणून एक गांव आहे. तेथें उद्धवचिद्‌घनांचे शिष्य आहेत. समाधीचे पुजारी मारुति बुवा यांनी कळविलें कीं, स्वामींचे ग्रंथ वेळें गांव येथें असावेत. परभणीहून वेळेगांव २–२॥ दिवसांचे अंतरावर आहे. मारुतीबुवांचे पूर्वीं कोणी वामनबुवा कुदे म्हणून पुजारी होते ते हल्लीं वऱ्हाडांत राजाचे पिंपळगांवीं आहेत. पुलगांव स्टेशनपासून पिंपळगांव १० कोस आहे म्हणतात. या गृहस्थांकडे ग्रंथांचा शोध करून पाहावा.

कोकिळ गंगाधर यांचे वंशज हल्लीं येथें आहेत.

वैद्यनाथ परळी--

धारूराहून अंबे व अंब्याहून परळी असा प्रवासक्रम होता, परंतु या लेखांत मी शहरांचा पूर्वापार क्रम ठेविला नाहीं, याचें कारण असें कीं त्या एक प्रकारें आंखून दिलेल्या मार्गानें पुढील संशोधकांनीं जाऊन इतर प्रदेशांकडे दुर्लक्ष्य करूं नये. हा सर्व प्रदेश इतिहास व सारस्वत यांच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचा आहे. धर्मांचें पुनरुज्जीवन व धर्मावर उभारलेल्या राष्ट्रांच्या घडामोडी या प्रदे-शांत झालेल्या आहे. हा प्रदेश इतका पुण्यप्रद आहे कीं. जेथें आपण पाऊल ठेऊं, तेथें आपल्या पायाखालीं पुरातन संस्कृतीच्या समाधी आहेत, असें निःसंदेह मान-ण्यास हरकत नाहीं. या दृष्टीनें संशोधकाचें हा प्रदेश माहेर आहे. असो.

कोल्हापुरास जसें सूर्यप्रकाशाचें साधन केलें आहे म्हणतात, त्याप्रमाणें येथें हि वैद्यनाथाचे देवळांत केलेलें आहे. तसा एक स्तंभ दरवाजाशीं दिसतो. स्थान ज्योतिर्लिंगाचें असून पिंडी स्वयंभू नाहीं हें आश्चर्य आहे. यावरून दुसऱ्या एका जोतिर्लिंगाचे स्थितीबद्दल मला अठवण झाली ती येथें मुद्दाम नमूद करितों.

श्री ॐकारमांधाता यांचें हि ज्योतिर्लिंग च आहे. परंतु सध्यां पूजा ज्या पिंडीची म्हणून होते ती वस्तुतः मूळची पिंडी नव्हे. मूळची पिंडी हल्लीं असलेल्या पिंडीपेक्षा फार आंत आहे हें वरील घुमटाचे प्रत्येक मजल्यावर असलेल्या शाळुंकेवरून, प्रदक्षिणेच्या वाटेवरील न्हाणीवरून व मागे राहिलेल्या देवळाच्या अवशिष्ट भागावरून स्पष्ट होत आहे. तशांत गाभाऱ्यांत जातांना समोर जो भिंत दिसते तिच्यांतून बाहेर दिसणाऱ्या टिटव्यावरून ती भिंत पूर्वी नसून नंतर तो मार्ग बंद करण्या करितां घातली आहे असे स्पष्ट दिसतें. आख्यायिका हि पण अशी च आहे कीं, मुसुलमानांच्या भीतीनें ती भिंत घातली आहे. भितीचें कारण आतां उरलें नाहीं तेव्हां आतां तरी पुण्याकरितां अथवा कीर्तीकरितां कोणी पुरातन ज्योतिर्लिंग भक्तांचे सेवेस सुलभ करून देईल काय ?

याचा च आणखी एक मासला पाहणें असल्यास साताऱ्यानजीक लिंबीचे गणपतीचा आहे. पुरातन मूर्ति आंत असून हल्लींची मूर्ति अलीकडे बसविलेली आहे.

वैद्यनाथांच्या देवळापासून थोडेसे अंतरावर "जगमित्र नागा" यांची समाधि आहे. नाथ सांप्रदायाप्रमाण ही समाधि पायऱ्यांची असून मागें कोनाड्यांत श्रीगोपालकृष्णाची मुरलीधर मूर्ति आहे. येथील चिमणभट म्हणून कोणी पुजारी आहेत त्यांस ग्रंथाबद्दल माहिती असावी, परंतु त्यांची माझी भेट झाली नाहीं. मठांत तीन चार आधुनिक लिहिलेल्या तुकाराम महाराजांच्या गाथा, श्रीज्ञानेश्वरी, असे दोन चार ग्रंथ आहेत.

या समाधीसमोर च एक तुकारामांची समाध आहे. अज्ञानानें हे देहूकर तुकाराम समजतात.

येथें शाकंबरी म्हणून एक देवीचे स्थान आहे. तेथें उत्सव वगैरे होतो. नारायणराव लक्ष्मण कुळकर्णी राहणार जोगाईचें अंबे यांचेकडे ग्रंथसंग्रह असावा असा अजमास आहे. त्यांचेकडे शोध करणें अवश्य आहे.

संपलें. फुरसतीचे वेळीं १२ महिन्यांतून एक महिना संशोधन करणें म्हणजे वस्तुतः संशोधकाचें सोंग घेणें आहे भक्ति अव्यभिचारिणी असल्यावाचून ती भक्ति नव्हे त्याप्रमाणें संशोधन हें हि अव्यभिचारी असल्यावांचून तें संशोधन नव्हे. संशोधक हा गणाचा प्राण आहे; म्हणून तेथ जातीचे हवे आहेत, गबाळांचें काम नाही. परंतु असे जे जातीचे आहेत त्यांनीं आपल्या संशोधनाचें वृत्त आपले पुढें कसें मांडावयाचे ? त्यांचे सायन्त जीवनवृत्त हें च त्यांचें संशोधनवृत्त होय. ज्यांच्या आयुष्यक्रमांत हजार व्यापृति आहेत त्यांनीं च आपलें संशोधन वृत्त कथन करणें योग्य होईल. अशा दृष्टीनें मीं हें वृत्त आपले पुढें मांडलें आहे.

गो. का. चांदोरकर

पहिली अकरा वर्षें

१८२५ — १८३५

कोठें काय आहे ?

जो संग्रह हाती आला आहे त्याचें विवेचन पुढील टांचणांत केलें नाहीं कोठें काय पाहिलें आणि काय मिळालें तें नुसतें सांगून, काय मिळालें नाहीं तें च मुख्यतः नमूद करण्याचा हेतु मनांत होता. आशय हा की, जें आपणांस मिळालें नाहीं, तें कोणी तरी आणि केव्हां तरी मिळवावें.

स्थलांचीं नांवें

१ टाकळी
२ डोमगांव
३ तडवळे
४ पांघरी
५ चाफळ
६ माजगांव
७ चरेगांव
८ सज्जनगड
९ जांब
१० हिवरे
११ दहिफळ
१२ भालगांव
१३ इंदूरबोधन
१४ कऱ्हाड
१५ उंब्रज
१६ शिरगांव
१७ मसूर
१८ शहापूर
१९ वडगांव
२० निंगडी
२१ कोरेगांव
२२ वाई
२३ कण्हेरी
२४ पसरणी
२५ बोरगांव
२६ बाहे
२७ पाल
२८ बीड
२९ केज
३० अंबा जोगाई
३१ परंडा
३२ शिराळें
३३ वाटेगांव
३४ ओझर्डे
३५ भागानगर
३६ मिरज
३७ ब्रह्मनाळ
३८ भेंडाळे
३९ पिंपळगांव

४० पाटोदें
४१ आस्नगांव
४२ गुंज
४३ पोखरी
४४ आंबड
४५ जळगांव
४६ साडेगांव
४७ दादेगांव
८४ वाघवाडी
४९ कामथी
५० परळी
५१ कुंडलवाडी
५२ पैठण
५३ तीसगांव
५४ केशापुरी
५५ माजलगांव
५६ धारूर
५७ परळी वैद्यनाथ
५८ लातूर
५९ नीलंगे
६० कल्याणी
६१ माणिकनगर
६२ चाळकापूर
६३ मैलार
६४ बेदर
६५ येहेळाळी
६६ महागाव
६७ आपचद
६८ तजावर
६९ मारगुटी
७० कोनूर
७१ मन्नारगुडी
७२ अरणी
७३ कारंजे

(१) टाकळी--नाशिकापासून दीडकोस, गंगेच्या कांठी. नंदिनी ऊर्फ नासिर्डी व गंगा यांचा संगम आहे. श्रीसमर्थांनी पुरश्चरण केलें तें येथें. उद्धवांचा मठ आहे नरहरीकृत "कर्मविपाक;" तुकाराम, बहेरु, येकाजनार्दन, नामदेव, ज्ञानदेव यांचे अभंग; कृष्णदासमुद्गलाचें रामायण, वामनकृत समश्लोकी गीता; शके १६२३ तील एक व १६९१ तील एक, अशा एकनाथी भागवताच्या दोन प्रती; ज्ञानेश्वरीची एक अपूर्ण पण बरी च जुनी प्रत; शके १७०० व १७१० तील रामविजयाच्या दोन प्रती; मत्स्यमुनेश्वर, गोसावीनंदन, नरहरि, जयराम, अनंत, इत्यादिकांची पदें व शके १७१८ नळनाम संवत्सर आश्विन शुद्ध १ रविवासरे चित्रा नक्षत्रे लिहिलेली श्रीमत् दासबोधाची प्रत, इतका संग्रह मठांत आहे.

मार्गशीर्ष व. १०
१८२१

मठांत जुना पत्रव्यवहार नाहीं. रामचंद्र बाबांच्या पूर्वीचें एक हि पत्र नाही. गंगेच्या कांठी उद्धवांची समाधी उघड्यावर आहे.

परंपरा:-

श्रीरामदास-उद्धव (पु. ति. फाल्गुन शु. १)- भीम (पु. ति. कार्तिक व. १)-शिवराव (पु. ति. मार्ग. व. ४)-रामचंद्र (पु. ति. पौष्य व. १२)-गोविंदराम (पु. ति. आश्विन शु. ४)-रघुनाथ (पु. ति. कार्तिक व. ७)-गंगाराम (पु. ति. कार्तिक. शु. ७)-विद्यमान.

(२) डोमगांव--केम स्टेशनपासुन सातकोस. हा श्रीकल्याणांचा मठ. रामदासी मालेंतील तिसऱ्या भागाच्या प्रस्तावनेंत या मठाची हकिकत आली आहे. या मठांत श्रीसमर्थांचा कित्ता, मूळ श्रीदासबोध ग्रन्थ, सोनेरी, रुपेरी दासबोधाची प्रत व मुद्गलस्वामींच्या हातचा दासबोध इत्यादि वस्तु आहेत. मठांतील व गांवांतील इतर महत्त्वाचा ग्रन्थसंग्रह सत्कार्योत्तेजक सभेजवळ आहे. श्रीकल्याणस्वामींच्या वेळचा व नंतरचा जो सांप्रदायिक पत्रव्यवहार आहे तो मिळाला आहे.

(३) तडवळें–बार्शीपासून पुढें, स्टेशन च आहे. येथें श्रीकल्याणस्वामींचे शिष्य जगन्नाथ यांचा मठ आहे मठांतुन ८६ बाडें सत्कार्योत्तेजक सभेला मिळाली आहेत. जगन्नाथांची समाधी आहे. तेर, ढोकी, धाराशीव, म्हैसगांव, कळब, बेबळी हीं ठिकाणें येथून जवळ असून तेथं मठ आहेत. त्यांचें संशोधन व्हावयाचे आहे.

१८२६ वैशाख वद्य २

परंपराः-

श्रीरामदास–कल्याण (आषाढ शु. १३)–जगन्नाथ (पौष्य व. २)–गजानन (चैत्र शु. ५)–रंगनाथ (आश्विन व. २)–रघुनाथ (मार्गशीर्ष शु. १३)–सखाराम (आश्विन शु. ८)–दत्तात्रय

(४) पांघरी–तडवळ्याच्या अलिकडिल स्टेशन. येथे श्रीकल्याणांचे शिष्य रामाजी बावा यांचा मठ आहे व मठांतील संग्रह चाळला आहे व महत्त्वाचा मिळाला आहे.

परंपरा

श्रीरामदास–कल्याण–रामाजी (श्रावण व. १३)–अनंत (भाद्रपद व.१२)–अनंत उर्फ बापु (माघ व. १)–रामबुवा (कार्तिक शु. १५)– लखुबुवा (माघ शु. ७)–अनंत बुवा

(५) चाफळ–मसूर स्टेशनपासून पाच कोस. हें श्रीसमर्थांचें मुख्य-ठिकाण. याची हकिगत मालेतील तिसऱ्या भागांत आली च आहे. येथील बरा च संग्रह मिळाला आहे व अजून मिळावयाचा बरा च राहिला आहे, असा तर्क आहे.

(६) माजगांव–उंब्रजेहून चाफळास जातांना लागतें. येथें श्रीसमर्थ-स्थापित मारुती आहे. त्याची व्यवस्था श्रीस्वामींकडे च आहे.

(७) चरेगांव–हा हि गांव उंब्रजेहून चाफळास जातांना लागतो. राजाराम प्रासादिकृत भक्तमंजरीमालेची अस्सल प्रत या गांवी आहे. चरेगांवाच्या मागे चंद्रगिरीचा डोंगर आहे त्या डोंगरांत श्रीसमर्थांची सुप्रसिद्ध घळ आहे. त्या वर पद आहे च.

(८) सज्जनगड–मालेंतील तिसऱ्या भागांत सज्जनगडाची हकिगत आली च आहे. गडावरील सबनीस व साठे गडकरी यांच्याकडील कागद मिळाले आहेत.

(९) **जांब**–मोगलाईंत परतुरस्टेशनपासून सात कोश. ही श्रीसमर्थांची जन्मभूमि होय. तिसऱ्या भागांत हकिगत दिलेली च आहे. मठांतील कागदपत्रें वगैरे मिळाली आहेत. जांबेच्या जवळपास पाटवदे, हिवरे, शेलूमार्फळ, शिवनगांव, लिंबगांव, भेंडी टाकळी, टाकरवन, वगैरे गावीं ठोसरांचीं घराणी आहेत.

(१०) **हिवर**–गंगेच्या काठीं. जांबेपासून ४ कोश. मुंजाबाचें येथें स्थान आहे. " मुंजाबा" हे श्रीसमर्थांचें कुलदैवत होय. येथें ठोसरांचीं पांच घरें आहेत पण कोणाकडे हि उपयुक्त संग्रह नाहीं. येथून लिंब म्हणून १०–१२ कोसांवर एक गांव आहे. तेथें मनोहर बाबा ठोसर म्हणून आहेत ते वडिल घराण्यांतील आहेत त्यांचेकडे तपास करावा असें सांगतात.

(११) **दाहिफळ** –परतुरपासून १२।१३ कोस उत्तरेस. येथें श्रीश्रेष्ठांची समाधी आहे.

(१२) भालगांव–मोगलाईंत करमाळे स्टेशनपासून अर्डाच तीन कोस; सुकना नदीचे कांठीं. येथें त्रिंबकराय ऊर्फ भोळाराम यांचा मठ आहे. त्रिंबकराय हे च भोळाराम होत अशी माझी अजून खात्री नाहीं. मठ गांवाला लागून च पण बाहेर आहे व त्रिंबकरायांची समाधी एक कोसावर लहानशा डोंगरावर आहे. समाधीवर अक्षरें कोरलेली आहेत, तीं सर्व लागत नाहींत:–

> ॥ श्री आदि नारायण + + + + ++ +(विष्णु ब्रह्मा वशिष्ट?)
> मुनी रामचंद्र रामदास + + + (त्रिंबक !) राज
> परंपरा येणेंप्रमाणें:–

परंपरा—

	श्रीरामदास	
शिष्य	त्रिंबकराय	मार्गशीर्ष शु. ८
शिष्य	हरिहर	फाल्गुन व. ९
पुत्र	खंडेराव	भाद्रपद व ३०
”	रघुवीरस्वामी	भाद्रपद शु. ४
”	विश्वासराव ऊर्फ रावसाहेब	आषाढ व. ६
”	रघुवीरस्वामी उ. नानासाहेब	फाल्गुन व. १०
”	रंगराव ऊर्फ आबासाहेब	

पहिल्या रघुवीरस्वामींच्या पूर्वींची पत्रें आढळलीं नाहींत. कांहीं स्फुट संग्रह मिळाला. हरिहरांची कांही कविता आहे. मठपतींचा एक वाडा औरंगाबादेस आहे, तेथें कांहीं संग्रह असल्यास पाहिलें पाहिजे.

(१३) इंदूर बाधन—हें शहर मोठें असून मोगलाईत आहे. टांकळीचे जे उद्धव महंत त्यांचा च येथें हि मठ आहे. या मठाची परंपरा अशी —

श्रीरामदास— उद्धव (फाल्गुन शु. १)—माधव (श्रावण व. १३)—गोविंद (चैत्रशु.१५)—अनंत—नारसिंह—रामकृष्ण—रामचंद्र—जयराम—आत्माराम.

मठांत अनंत, गोविंद, माधव यांची कांही पत्रें आहेत, परंतु उद्धव किंवा समर्थ यांचें एक हि नाहीं.

अनंतस्वामी जसे परमार्थांत थोर अधिकारी होते, तसे च महापराक्रमी होते. आपल्या डाव्या हाताला उपरणें गुंडाळून तो एका धिप्पाड वाघाच्या तोंडांत देऊन उजव्या हातानें त्यावर वार करून त्यास लोळवला. त्या वाघाचे कातडें मठांत ठेवलें आहे.

येथून दीड दोन कोसावर श्रीरंगपुर म्हणून ठिकाण आहे. तेथें जवळ डोंगरांत एका मोठ्या थोरल्या दगडावर श्रीमारुतीची मूर्ति कोरलली आहे. पाऊस पडत नव्हता म्हणून ब्राह्मण अनुष्ठान करीत असतां श्रीसमर्थ आले व त्यांनी मूर्ति कोरून देऊन तीवर छाटी टाकून अभिषेक करावयास सांगितलें आणि मग पाऊस आला वगैरे जी हकीकत बखरींत आहे तें च हें ठिकाण. ठिकाण फार रम्य, भव्य आणि शांत आहे. अजून हि या ठिकाणी व्याघ्रादिकांची भीति आहे लहान लहान डोंगरांच्या रांगा सर्वत्र पसरल्या असून ठिकठिकाणी लहानमोठे तलाव आहेत, व झाडी विपुल आहे त्यामुळें या ठिकाणाला अपूर्व शोभा आलेली आहे.

जवळपास डोंगरांत पुष्कळ धुंडलें पण बखरींत दिलेली ती सवाई कोठें दिसली नाहीं. नक्की ठिकाण कळेना व कदाचित इतक्या काळानंतर ते पवित्र अक्षर हि राहिलें नसेल. मठपतींच्या समाधी या ठिकाणी आहेत. पूजेसाठी येथे श्रीसमर्थांच्या पादुका स्थापन केल्या आहेत, तेथें

श्री
रामदास
स्वामिच्या
पादुकाः ॥

असें दगडावर कोरलें आहे. मठांतील महत्त्वाचा सर्व ग्रन्थसंग्रह मिळाला आहे.

(१४) कऱ्हाड–येथील देशपांड्यांच्या घराण्यांतील आका होत. देशपांडे यांचे कडे कागदपत्रें असलीं पाहिजेत. एकवार प्रयत्न केला पण यश न आलें. पुन्हा प्रयत्न केला पाहिजे.


(१५) उंब्रज–मसूरस्टेशनपासून दोन कोसांवर कृष्णाकांठी. श्रीकल्याण स्वामींचे शिष्य केशवस्वामी यांचा येथें मठ आहे. मठांत श्रीसमर्थांनी स्थापिलेला मारुती आहे.

परंपरा—

श्रीरामदास
|
कल्याण
|
केशव भाद्रपद व. ३०
|
मल्हार
|
केशव
|
रामचंद्र
|
हनुमंत
|
सीताराम
|
हनुमंत | रघुनाथ

मठांतून थोडा फार संग्रह ग्रन्थांचा व कागदपत्रांचा मिळाला आहे. याच मठांत केशवस्वामींच्या हातची शके १६२४ तील श्रीमत् दासबोधाची प्रत आहे. कृष्णाकांठीं केशवस्वामींची समाधी आहे.

(१६) शिरगांव–उंब्रजेहून च शिरगांवाला जावें. चार पांच कोसांवर आहे. श्री समर्थांची येथें केव्हां केव्हां वस्ती असे. येथे कल्याणांचे बंधु दत्तात्रय यांचा मठ आहे. दत्तात्रयांची समाधी येथें च आहे.



मठांतील काही ग्रन्थसंग्रह मिळाला आहे. या च घराण्यांतील एक पुरुष …लटरीस आहेत. तेथें तपास केला पाहिजे.

(१७) मसूर–श्रीसमर्थस्थापित येथें मारुति आहे. त्याची व्यवस्था श्री. स्वामींकडे च आहे. या गांवीं सांप्रदायिक कागदपत्रांचा संग्रह असला पाहिजे पण अजून मिळाला नाहीं.

(१८) शहापुर–मसूरपासून कोसभर. श्रीसमर्थ–शिष्णीण सतीबाई यांचें हें गांव. तंजावर मठपति भीमस्वामी ते या च मठांतील होत. मठांत श्रीसमर्थांनीं स्थापिलेला मारुती आहे. मठाच्या बाहेर डाव्या हाताला श्रीसमर्थांच्या साठीं

संध्येकरितां गुहा बांधलेली आहे. गांवापासून सुमारें पाव कोसावर एक लहानसी रांजणखिंड आहे. खिंडीच्या एका बाजूस महादेवाचा डोंगर व श्रीसमर्थांचा डोंगर असे डोंगर आहेत. श्रीसमर्थांच्या डोंगरावर एक मोठा दगड आहे त्यावर श्री बसत. तेथून कऱ्हाड, वसंतगड, तलबिड, चंद्रगिरीचा डोंगर, उंब्रज, शिरगांवचा टापू, मसूर वगैरे भोंवतालचा प्रदेश दिसतो. जवळून कृष्णानदी नागमोडीसारखी गेली आहे.

१७०५ तील ग्रन्थराजाची प्रत मठांत आहे. बाकी संग्रह कांहीं नाहीं असें म्हणतात.

(१९) वडगांव—हा गांव सातारा जिल्ह्यांत आहे. रहिमतपूर स्टेशनवरून जावें. श्रीरामदासपंचायतनांतील जयरामस्वामी यांचा येथें मठ आहे. त्यांची परंपराः—

वडगांवपरंपराः—

श्रीकृष्णाप्पा स्वामी	शके १५४५ माघ शु. १५
जयरामस्वामी	१५९४ भाद्रपद व. ११
गोपाळस्वामी	१६१२ आश्विन व. १
विठ्ठलस्वामी	१६४१ कार्तिक व. १०
*मुनेश्वरस्वामी ऊर्फ रुद्रमुनी	१६६६ फाल्गुन व. ९
महादेवस्वामी (पुष्कळशा सनदा यांचे नांवें)	१७२१ कार्तिक व. ५
आप्पाजीबुवा	
गोपाळबुवा (महारुद्रस्वामीकालीन)	
विठ्ठलबुवा	
महादेवबुवा	
कृष्णाजीबुवा	

* यांच्या नांवच्या कांहीं सनदा आहेत.

ही सर्व शिष्यपरंपरा असून गादी ब्रह्मचाऱ्याची आहे. महादेवस्वामी मोठे कर्ते पुरुष होऊन गेले. सनदापत्रें बहुतेक त्यांच्या वेळचीं आहेत. समाधिमंदिर व मठ हीं यांनी च बांधविली. तसें च हल्लीं जो मठांत रथ आहे तो यांनीं च करविला होता.

मठांत एक जीर्ण फाटलेला कागद आढळला, त्यावर पुढील मजकूर होता:—

कृष्णाप्पास्वामी हे वरुणबाहेचे कुळकर्णी, शाखा अश्वलायन गोत्र काश्यप.

जयरामस्वामी हे कात्राबाज मांडवगणचे देशपांडे उपनाम कसरे गोत्र वशिष्ट सूत्र अश्वलायन.

गोपाळस्वामी हे बद्रिकाश्रम जोतिमठ अनंत देव याचे मठातील गोत्र काश्यप सूत्र अश्वलायन.

विठ्ठलमूर्ति हे म्हसवडकर उपनाम पारखे गोत्र हारित सूत्र अश्वलायन.

मुनीश्वरस्वामी हे हेळगांवपाडलीचे कुळकर्णी गोत्र भारद्वाज.

संभेश्वरस्वामी (पुढें कागद फाटला आहे).

मठांत ग्रन्थसंग्रह पहावयास मिळाला त्याचें टांचण करितों:—

(१) परमामृत शक १७५० तील प्रत

(१) अपरोक्षानुभव, जयरामस्वामीकृत, अस्सल मूळच पोथी, रचनाकाल शके १५९१, ग्रन्थसंख्या सुमारें २०००

(१) रामायण बाळकांड सीतास्वयंवर कृष्णदास जयरामकृत, अस्सल मूळ च पोथी, रचनाकाल शके १५७० भाद्रपद कृष्णपक्ष अष्टमी गुरुवार, ग्रन्थसंख्या २०४९

(१) रुक्मिणीस्वयंवर, जयरामकृत, शक १६५४ तील दोन प्रती.

(१) स्वात्मबोध, माधवविरचित ४१ अध्याय.

(१) विवेकसार, गद्यात्मक ग्रन्थ, शक १७०८, १६ प्रकरणें.

(१) ज्ञानेश्वरी, प्रत जुनी, एकनाथांनी शुद्ध केलेली.

(१) ज्ञानीभक्तसंवाद, जयरामकृत. ग्रन्थसंख्या २३८.

(१) भागवत, जयरामकृत, पूर्वार्ध, ४९ अध्याय.

(१) भगवद्गीता समश्लोकी टीका सोपानदेवाची

(१) शांतिपंचीकरण, जयरामकृत.

याशिवाय तीन चार बाडें पहावयास मिळालीं, त्यांत जयरामकृत अभंग, पदें वगैरे होती. हा सारा संग्रह मठांत च आहे. जयरामस्वामींची बहुतेक

कविता महाराष्ट्रानें अजूनपर्यंत अप्रकाशित राहूं द्यावी हें आश्चर्य आहे. " ज्ञानी भक्तसंवाद " हें लहानसें प्रकरण नुकतें च छापलें गेलें आहे.

मठांत सनदापत्रें आहेत, त्यांत जुनें असें पुढील पत्र आहे.

अस्सल] १६१९ आश्विन शु. ७ [मोर्डी

श्री

जयेराम

राजश्री समस्त सरदार पागा
व सिलेदार गोसावियासी

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने ॥ रामचंद्र नीलकंठ अमात्य आसिर्वाद सुा समान तिसेन अलफ मोजे रायेगाव ता आऊध हा गाव राजश्री स्वामी यास इनाम दिल्हा आहे तरी तुम्ही आमदरफ्तीमुळें कोणी उपसर्ग द्याल तरी द्यावयाचे प्रयोजन नाही छ. ५ रविलावल निदेश समक्ष

लेखन
सीमासमु
ल्लसति

(२०) निगडी—

हा हि गांव सातारा जिल्ह्यांत च आहे. मसूरस्टेशनवरून जावें. श्रीसमर्थ-पंचायतनांतील रंगनाथस्वामी यांचा येथें मठ आहे. त्यांची परंपरा:—

बापाजी

- यादवराव आप्पा (जमखिंडी संस्थानांत वाठार येथें समाधी. श. १६०६ पौष शु. १५)
- रंगनाथस्वामी (जन्म १५३४ मार्गशीर्ष शु. १०. समाधी १६०६ मार्गशीर्ष व. १०)
  - शिष्य जनार्दन गंगाधर गोसावी ब्रह्मचारी इचलजरंजीकर स. १६७२ भाद्रपद व. ४
- विठ्ठलराव ऊर्फ आत्यास्वामी स. १६२७ श्रावण शु. ८
  - काशीराज
  - योगीराज (रंगनाथांच्या पश्चात मठीं हे अधिकारी झाले

स.१६६४
मार्गशीर्ष व. ७)
|
विठ्ठलराव
|
बापाजी
|
दाजी
|
वामन
|
रंगनाथ — दत्तो — बाळकृष्ण
|
पंढरीनाथ (रंगनाथ) — नरहर (बाळकृष्ण)

मठांत चार पांच सनदा पहावयास मिळाल्या—

(१) १६१२ चैत्र शु. ९ रविवार, दत्ताजी कराजी नाईक व सूर्याजी फिरंगोजी नाईक पिसाळ देशमुख व देशपांडे प्रांत वाई सरम्भा विजापर यानी पूर्वील इनाम पाहून योगेश्वरांच्यानांवे एक चावर जमीन दिली आहे.

(२) सुगा सन समान तिसैन अलफ म्हणजे शक १६१९ त रामचंद्र नीळकंठ यांनीं देशाधिकारी वाई यांस आज्ञा केली कीं संभाजी राजे यांचे कारकीर्दीत ४५ बिघे इनाम होते, आतां सर्व निगडी गांव इनाम दिला आहे, पुण्यतिथी, अन्नछत्र वगैरे चालवणें.

(३) राजशक २५ ची एक सनद

(४) राजशक ३४ ची एक

(५) एक फारशी सनद स ११७+ची

रंगनाथस्वामींच्या कवितेपैकीं पदांच्या संग्रहाचें पुस्तक प्रकाशित आहे च. **मठांत पूर्वी विश्रांतिवही** व **समुद्रवही** अशा दोन वह्या स्वामींच्या होत्या, पण **सुमारें अठ्ठावीस वर्षांमागें मठास** आग लागली होती तींत दोन हि वह्या **अर्पण होऊन** महाराष्ट्र त्यांना कायमचें मुकलें.

अंतोबा गोसावी यांचे कडे शिवरामकृत अष्टावक्र ग्रन्थ आहे. त्याचा शेवट
हा ग्रन्थ तीसावरि जाण दोनी । श्लोकाप्रति श्लोक चि देशवाणी ।
श्रीनाथदेवो बरवा सुवाचा । दयाळु राजा शिवरामजीचा ।।

दत्तात्रय वामन बुवा गोसावी, नरहर बाळकृष्ण, व पंढरीनाथ रंगनाथ यांच्याकडे कांहीं संग्रह खास आहे. मला फक्त वर वर अगदीं च थोडा पहावयास मिळाला.

(१) शके १६१६ कार्तिक वा। १० रविवारीं ज्याचें लेखन समाप्त झालें असा वरानागेश ग्रन्थ नरहर बाळकृष्ण यांचे संग्रहीं आहे.

(१) १७०६ फाल्गुन व. ५ स लिहिलेलें एक बाड पाहिलें, त्यांत कोणा माधवरायांची कांहीं गोड कविता आहे. माधवरायांच्या कवितेचा थोडा मासला देतों.

पद १ लें.

जाणा तो ठकला । तो ठकला ॥
धनकामिनिवर झुकला ॥ ध्रु० ॥
ममतेचा जो विकला । जो करि संतजनाच्या नकला ॥ जाणा० ॥ १
परिखा सांगे अकला । आपुल्या स्वहिना आपण मुकला ॥ जाणा० ॥ २
माधवराया चुकला । कैसा होईल त्या उकला ॥ जाणा० ॥ ३

पद २ रें.

जाणा तो तरला । तो तरला ।
भजनभरीं जो भरला ॥ ध्रु० ॥
संसारा विसरला । संताचे चरणी अनुसरला ॥ जाणा० ॥ १ ॥
भक्तांचा पथ धरला । आपला आपण जो उद्धरला ॥ जाणा० ॥ २ ॥
दुष्ट जनासी हरला । माधवरायातें मोहरला ॥ जाणा० ॥ ध्रु० ॥

पद ३ रे

चरणीं जडला हेत । हरीच्या ॥ ध्रु०
धनसुत जाणुनि त्याग चि केला । जैसे निर्जिव प्रेत ॥ १ ॥
संतपदावरि सर्व हि अर्पिले । मागितल ते देत ॥ २ ॥
माधवराया संगें रतलो । सद्गुरुचे गुण घेत ॥ ३ ॥

रंगनाथस्वामींच्या घोड्याचा खूर रुतला म्हणून स्वामींचा मुक्काम येथें झाला अशी आख्यायिका आहे. खूर जेथें रुतला तो दगड दाखविण्यांत येतो.

रंगो गोविंद शिरवळकर सुभेदार प्रांत मावळ यांच्यावर कांहीं राजकीय संकट आलें होतें. त्यावेळी त्यांनी नवस केला होता. संकटाचें हरण झालें म्हणून

त्यांनीं इहिदे सबैन मया अलफांत म्हणजे श. १६९२ त समाधीचें देऊळ बांधलें, असें सांगतात.

कोणी कृष्णराव माइणकर म्हणून अलिकडे च होते, त्यांचे संग्रहीं रंगनाथ-स्वामींची बखर होती असें सांगतात.

(२१) कोरेगांव—

कोरेगांवच्या बोकिलांचे मूळ पुरुष श्रीसमर्थांचे शिष्य होते, म्हणून कोरेगांवीं बोकिलांकडे तपास केला. अंताजीपंत बोकिलांच्याकडे श्रीसमर्थांनीं दिलेली पट्टाभिषिक्त श्रीरामाची मूर्ति आहे, तिचें दर्शन झालें. आपणाजवळ कागदपत्रें नाहींत असें ते म्हणाले. तसें च नानासाहेब बोकिल हे हि आपणांजवळ कागदपत्रें नाहींत असें म्हणाले. परिचय नसल्यामुळें मला अशीं उत्तरें मिळालीं असतील असें मला वाटलें.

(२२) वाई—

शकांत पधराशें छपन्न सालांत ।
वैराज क्षेत्रांत स्वामी आले ॥ १ ॥
आले रामदास कृष्णातटाकासी ।
दक्षिणतीरासी वस्ति केली ॥ २ ॥
केली वस्ती तेथें मारुती स्थापिला ।
रोकडोबा त्याला नांव दिल्हें ॥ ३ ॥
दिले अनुग्रह थिटे चित्रावासी ।
पूजा पिटक्यासी सांगितली ॥ ४ ॥

असा एक अभंग रोकडोबा मारुतीच्या पुजारी बुवाजवळ मिळाला. तो विशेष जुना असावा असें वाटत नाहीं. थिटे, चित्राव व पिटके यांचा तपास केला पण कागदपत्रें वगैरे कांहीं मिळालीं नाहींत. चित्रावांचे कागद रा. राजवाडे यांनीं मिळविले आहेत.—

(२३) कन्हेरी

मालेंतील तिसऱ्या भागांत या भागची हकीकत आली च आहे.

(२४) पसरणी—

कण्हेरीमठाच्या परंपरेंतील जे भिमाजीबावा त्यांचे शिष्य रघुनाथ होत, त्यांनीं हा मठ स्थापिला. रघुनाथांची १६ अध्यायांची ओवीबद्ध बखर मठांत आहे. त्या बखरीचें नांव श्रीगुरुरघुनाथकथामृतग्रन्थ असें आहे. रघुनाथांची येथें च समाधी आहे. श्रीसज्जनगडाप्रमाणें येथें हि लहानशा प्रमाणावर समाधी खालीं असून वर श्री रामाची मूर्ति आहे.

राजशक ५२ विश्वावसु पौष शु. ४ स श्रीमंत बाळाजी बाजीराव यांनीं राजश्री राघोबा गोसावी सांप्रदाय श्री स्वामी यांना एकसर व भोइगांव येथील ८११।८११ बिघ्यांबद्दल करून दिलेल्या तीन सनदा मठांत आहेत. इसने सितैन मया अलफांत म्हणजे शक १६८३ त पसरणींचे पाटलांनीं दोन बिघे इनाम दिल्याची एक सनद आहे.

(२५) बोरगांव—

हें सुप्रसिद्ध चिटणीस घराण्याचें गांव होय. पुढें एक पत्र देतों, त्यांत आलेल्या नांवांचा बोध होण्यापुरता वंशवृक्ष असाः—

- बाळाजी आवजी
  - खंडो बल्लाळ
    - जिवाजी
      - रामराव
        - मल्हार यांचे पुढें वंशज खंडेराव ऊर्फ धनीसाहेब
          - मल्हार खंडेराव
          - नीळकंठ
      - देवराव
        - यांचे वंशज बाबासाहेब
    - बापुजी
    - गोविंदराव
    - बहिरवराव

धनीसाहेब व बाबासाहेब बोरगांवीं च असतात व त्यांचेकडील बराचसा ऐतिहासिक संग्रह यापूर्वी च महाराष्ट्राला उपलब्ध झाला असून अजून हि त्यांचेजवळ पुष्कळ संग्रह अप्रकाशित असा असावा असा माझा ग्रह झाला आहे. बापुजींचे वंशज कांहीं बोरगांवीं आहेत व कांहीं जैतापूर (सातान्याजवळ) व सातारा येथें आहेत; गोविंदरावांचे वंशज कांहीं बोरगांवीं व कांहीं जैतापूर, मांजगांव (चाफळजवळ) व बडोदें येथें आहेत व बहिरवराव यांचे वंशज वडगांव (शेणोलीजवळ) व मेढे येथें आहेत. या सर्व वंशजांजवळ कागदपत्रादिकांचा संग्रह असण्याचा संभव आहे

बाबासाहेब यांनीं कांहीं पत्रांच्या नकला दाखविल्या, त्यांत पुढील एक नक्कल हाती. तें पत्र श्री समर्थांच्या गादीवरील हनुमंतस्वामी, बखरकार, यांनीं लिहिलेलें आहे.

नक्कल] १७३७ भाद्रपद शु. १३ [मोडी

श्रीरामसमर्थ

श्रीरामदासस्वामी हनुमंत नाम्ना

श्रिया सह चिरंजीव विजईभव राजमान्य राजश्री मल्हारीराव दादा चिटनवीस यास अनेक आसिर्वाद उपरी संस्थानचे गांव भुमी वगैरे बंदोबस्ताची राजपत्रें रुमाल तुम्हांपासी कैलासवासी श्री बाबास्वामिनीं ठेविले पूर्वी महादाजी लिंगो याचे विद्यमानें दिल्हे ते ते पावले व चार मुख्य राजपत्रें दोन थोरले कैलासवासी सिवाजी महाराज यांची व दोन शाहुमहाराज यांची तीं आम्ही प्रौढ जाल्यावरी यावी म्हणोन ठेविली तीं हाली आणविल्यावरून तुम्ही आणून दिल्हीं तीं पावली त्यात येक पत्र सिवाजी महाराज याणी श्री चे संस्थानचा व्यापार राजद्वारी व संस्थानचे उस्तवारी बालाजी आवजी चिटनवीस याजकडे नेमिली ते मेवा करितील म्हणोन उत्तर पाठविले ते पत्र तुमचे तुम्हापासी दिल्हे बालाजी आवजी व खंडो बल्लाळ व जिवाजी खंडेराव व गोविंद खंडेराव व रामराव जिवाजी सेवा करीत आले त्या अन्वये तुम्ही सेवा करीत आहां पुढे हि वंशपरंपरेनें राजद्वारी व संस्थानी सेवा करीत जावी सर्व पारपत्यगार व अधिकारी याणी तुम्हास कळऊन तुमचे संमते चालाव ऐसे राजआज्ञा व थोरले श्रीची आज्ञा त्याप्रो चालत जावे तुम्ही सेवा करीत आला तैसी करीत जावी बहुत काय लिहिणे मिति शके १७३७ भावनाम संवछरे भाद्रपद शुद्ध १३ हे असिर्वाद

चिटणीसांचे नातलग नारायण बापु म्हणून आहेत त्यांना बळवंत ऊर्फ भिवराव व मनोहर असे दोघे चिरंजीव आहेत. नारायण बापूकडे धनीसाहेबांच्या कडील कांहीं संग्रह असावा, असें कळलें. भिवरावांकडे तपास केला पाहिजे.

(२६) बाहे—

बाहे गांव बोरगांवपासून दोन अडीच कोसांवर आहे. येथें श्रीसमर्थांनीं स्थापिलेला मारुती आहे. स्थान प्रेक्षणीय आहे. या स्थानाची कथा बखरींत आली च आहे. देवस्थानाची पूजा गोवर्धन ब्राह्मणाकडे आहे. बखरींत जी म्हशीची गोष्ट आली आहे ती आपल्या च पूर्वजाची असें पुजारी म्हणतात.

जयरामस्वामींचे गुरु कृष्णाप्पा येथील राहणारे.

या गांवीं कागदपत्रें मिळावीत असा तर्क आहे.

(२७) पाली—

तारळ खोऱ्यांत शिरगांवजवळ हें गांव आहे. पालीचा खंडोबा सुप्रसिद्ध आहे. श्रीसमर्थसांप्रदायांत या गांवाचा संबंध अशासाठीं येतो कीं श्रीसमर्थशिष्य रंगोबा यांची येथें समाधी आहे. हे रंगोबा कोण हें आपणांस ठाऊक च आहे. ते गाणारे फार उत्तम होते. कमरेखालीं तोडावा वगैरे जी गोष्ट बखरींत दिली आहे ती यांची च.

रंगोबाच्या समाधीची जी अनास्था पाहिली ती कांहीं अपूर्व च. शिव शिव.

रंगोबांच्या समाधीची मिती पौष व. ८ होय.

रंगोबांच्या संबंधाचे कांहीं कागद त्यांचे शिष्य चाफळकर ढवळे यांचेकडे मिळाले आहेत.

चाफळचे देशपांडे येथें राहतात. त्यांचे वंशज रा. गोविंद आण्णाजी देशपांडे यांचे संग्रहीं कागदपत्रांचीं दप्तरें होतीं पण आठ दहा वर्षांमागें त्यांच्या घरास आग लागली होती तींत तीं दप्तरें अग्निमुखीं पडलीं! त्यां दप्तरांत काय होतें ईश्वरास माहित! महादेव भटजी पोरे हे हि चाफळकर देशपांड्यांचे च वंशज होत. त्यांचे बंधुजवळ कांहीं कागदपत्रांचा संग्रह आहे म्हणतात. मिळविला पाहिजे.

(२८) बीड—

हा गांव मोगलाईंत आहे. येथें गिरिधरमहंतांचे दोन मठ आहेत त्यांची साद्यंत हकिकत श्रीसमर्थप्रतापाच्या प्रस्तावनेंत आली च आहे. बीडास मीं फक्त श्रीसमर्थसांप्रदायिक वाङ्मयाचा शोध केला; परंतु बीडास इतर हि प्राचीन मराठी वाङ्मय उपलब्ध होण्याचा फार संभव आहे. रा. राजवाडे यांना श्रीएकनाथांच्यापूर्वींची ज्ञानेश्वरी मिळाली ती येथें च. या गांवी ज्योतिषावर मराठी ग्रन्थ विपुल आहेत, असें मीं ऐकलें आहे. तात्पर्य या गांवीं संशोधनाला पुष्कळ अवकाश आहे.

या गांवीं कनकालेश्वर महादेवाचे पुरातन देवालय आहे. देवालयांतील प्रत्येक सुंदर चित्र यवनांच्या हातानें विद्रूप केलेलें आहे. खालच्या मजल्यांत शंकराची पिंडी वरच्या मजल्यावर महजिद असा अपूर्व देखावा येथें पहावयास सापडतो.

बीडाहून बार्शीस जातांना बीडापासून तीन कोसावर पाली म्हणून एक गांव आहे. तेथें गांवाबाहेर वडाच्या एका प्रचंड वृक्षाखालीं शंकराचें जुनें देवालय आहे. त्या देवालयांत एक संस्कृत शिलालेख आहे. २½ × २ विती शिला आहे. खालच्या २।४ ओळी व वरील १।२ ओळी गेल्या आहेत. सुमारें वीस ओळी शाबूत आहेत. त्यांत श्रीसिंहण याचा उल्लेख आहे.

(२९) केज—

हा हि गांव मोगलाईत आहे, बीडाहून अंबा जोगाईस जातांना वाटेंत लागतो; किंवा तडवळे स्टेशनपासून चवदा कोस आहे.

येथें श्रीसमर्थशिष्य उद्धव यांचा मठ आहे. उद्धवांची पुण्यतिथि चैत्र व. ९ स होते. टांकळी व इंदूरबोधन येथील उद्धवांची पुण्यातिथि फाल्गुन शु. १ स आहे; तेव्हां केजचे उद्धव महंत हे निराळे होते असें वाटतें.

पण या गावीं बापुबुवा म्हणून ८० वर्षांचे एक वृद्ध गृहस्थ भेटले. त्यांचे वडील ४० वर्षांमागें ९० वर्षांचे होऊन निवर्तले. आपण वडीलांच्या तोंडून ऐकिलेली हकिकत बापुबुवांनीं सांगितली ती अशी कीं, जांब प्रांतांत कोणी दशपुत्रे म्हणून होते त्यांच्या वंशांतील हे उद्धव होत, लहान बाळ असतांना उद्धव फार रडत म्हणून श्रीसमर्थांनीं त्यांना पाळण्यांत च उपदेश केला.

उद्धवानीं शिष्यसंप्रदाय केला नाहीं. उद्धवांच्या पुतण्याची बायको लक्ष्मी-बाई ६०।७० वर्षांमागें ८०।९० वर्षांची होऊन ती हि आपण पाहिली होती, तेव्हां आपण १०।१५ वर्षांचे होतों, असें बापुबुवा सांगतात.

उद्धवांच्या पूजेंतील पट्टाभिरामाची मूर्ति मठांत आहे. येथें दुसरा एक मारुतीमठ म्हणून आहे त्या मठांत थोडा संग्रह उपलब्ध झाला.

या च गांवीं बालाजीचा एक मठ आहे. त्या मठांत संदेहहरण ग्रन्थाची मूळ पोथी आहे. संदेहहरण ग्रन्थाची एक प्रत अंबा जोगाईस मला मिळाली आहे. ग्रन्थ छापविण्यापूर्वी मुळ ग्रन्थाशीं केव्हां तरी अवश्य ताडून पाहिला पाहिजे.

गावाच्या ईशान्य बाजूला एका जांभळीच्या वृक्षाखालीं मोठा चबुतरा असून वर उघड्यांत च उद्धवांच्या पादुका आहेत.

रघोत्तमराव महारुद्र देशपांडे ऊर्फ देसाईसाहेब म्हणून एक श्रीमान् थोर गृहस्थ या गांवीं आहेत. कल्याणस्वामींच्या घराण्याशीं यांचा संबंध असल्यामुळें कांहीं श्रीसांप्रदायिक संग्रह यांच्यापाशीं होता, तो त्यांनीं मोठ्या प्रेमानें दिला आहे.

(३०) अंबाजोगाई—

हें देवीचें स्थान सुप्रसिद्ध आहे.

येथें गांवाबाहेर घोडद्रा म्हणून ठिकाण आहे. तेथें आद्यकवि मुकुंदराज यांची समाधी आहे. ठिकाण रम्य व भव्य आहे. निर्जन अशा डोंगरांत च आहे म्हणून नैसर्गिक रम्यता आली आहे व व्याघ्रादिकांचा निःशंक संचार होत असल्यामुळें स्थानाला भव्यपणा हि आला आहे. समाधीपासून बऱ्या च अंतरावर खोल दरींत खालीं पाणी आहे. तेथें आम्ही सात आठ जण स्नानास गेलों असतां वाघाच्या आरोळ्या स्पष्ट ऐकूं आल्या. हा भाग वेगळा. पण वैनगंगेचे तीरीं मध्यप्रांतांत बैतुलकडे मुकुंदराजांची समाधी असावी असा एक प्रश्न रा. राजवाडे यांनीं काढला आहे. तथापि, मला वाटतें, हा प्रश्न अजून त्यांना सोडवावयाचा आहे. मुकुंदमुनींचें बैतुलाकडे कदाचित् वास्तव्य असेल व येथें समाधी असेल. या गांवीं मुकुंदराजांची माहिती पुष्कळांना आहे व या प्रांतांत त्यांचे ग्रन्थ हि सर्वत्र आहेत ही हि गोष्ट वरील प्रश्न सोडवितांना विचारांत घ्यावी लागेल.

परभणी जिल्ह्यांत पालीम गांवीं दादासाहेब म्हणून कोणी कोंकणस्थ ब्राह्मण मोजणी खात्यांत कारकून आहेत त्यांचे जवळ अंबाजेगाईच्या रंगनाथ पाठकांकडील विवेकसिंधूची मूळ पोथी आहे, असें पाठकांनीं कळविलें. पाठकांची ही माहिती उडवाउडवीची नसल्यास, अवश्य शोध केला पाहिजे.

ज्यांच्या ग्रन्थांची संख्या लक्षानें मोजली जाते त्या दासोपंतांचीं येथें दोन देवघरें आहेत; एक थोरलें व दुसरें धाकटें. दासोपंतांची थोडी माहिती पूर्वीं इतरत्र दिली च आहे.

या गांवीं दहा बारा मोठमोठे जुने शिलालेख आहेत. ते आतांपर्यंत कोणीं च वाचले नसतील असें वाटत नाहीं. वाचले नसल्यास वाचले पाहिजेत.

येथें श्रीसांप्रदायिक दोन मठ आहेत पैकीं एक मठ पाहण्यांत आला. दुसरे मठपति परगांवीं गेले होते. मठाची परंपराः—

श्रीरामदास

शिष्य — कल्याण (डोमगांव)

शिष्य — जगन्नाथ (तडवळें)

शिष्य — गदाधर (यांनीं येथें मठ स्थापिला)

पुत्र — नारायण | शिवराम

हे विभक्त होऊन दोन मठ झाले.

नारायण
- या मठाचे विद्यमान पुरुष तात्याबुवा परगांवीं गेले होते.

शिवराम — येथून पुढें पुत्रपरंपरा
- गोविंद
- शेषाद्रि
- रामचंद्र (हे विद्यमान आहेत. चतुर्थाश्रम स्वीकारला आहे)
- लक्ष्मण

पांढरखडा डोंगरांत गदाधर तपश्चर्या करीत असत. तेथें च त्यांची समाधी आहे. लक्ष्मण रामचंद्र यांचे मठांतून संदेहहरण ग्रन्थाची मत मिळाली होती. तिची नक्कल करून घेऊन प्रत परत केली. तात्याबुवांचा मठ केव्हां तरी पाहिला पाहिजे.

(३१) परंडा—

हा गांव मोंगलाईंत असून येथें जुना किल्ला आहे. ह्या गांवीं ऐतिहासिक कागदपत्रें वास्तविक विपुल असावीत आणि असतील हि.

(१) रेणुकादास देवीदास ऊर्फ बापुसाहेब देशमुख

(१) नारायण एकनाथराव देशमुख

(१) मनोहर चक्रोजी ऊर्फ रावसाहेब देशमुख यांच्या संग्रहीं पुष्कळ कागदपत्रें असलीं पाहिजे. व्यंकटेश बळवंत ऊर्फ पंडितराव कारकून यांचें सहाय्य बरें च होईल.

(३२) शिराळें—

हा गांव सातारा जिल्ह्यांत वाळवे तालुक्यांत आहे. श्रीसमर्थांनीं स्थापिलेल्या अकरा मारुतींपैकीं एक येथें आहे. परंपरा कळली ती अशीः—

श्रीरामदास
|
जयराम
|
शिष्य — नारायण
|
,, — बापु
|
पुत्र — गोविंद
|
आप्पाजी — मारुती — रघुनाथ

आप्पाजीबुवा येथें असतात. त्यांचे जवळ कांहीं संग्रह नाहीं. मारुतीबुवा व रघुनाथबुवा पुणें जिल्ह्यांत पुरंदर तालुक्यांत परिंचे येथें असतात. त्यांचे जवळ कांहीं संग्रह असावा असें आप्पाजी कळवितात.

जयरामांची समाधी येथें च श्रीमारुतीचे देवालयासमोरील शेतांत आहे. समाधीवर त्रयोदशाक्षरी मंत्र कोरलेला आहे.

येथील देशपांड्यांच्या साठीं मारुतीची स्थापना झाली, असें म्हणतात. तेव्हां देशपांड्यांच्याकडे कागदपत्रें असावयास पाहिजेत. परंतु शिराळ्याच्या देशपांड्यांनीं कळविलें कीं, आमचे वडिल घराणें ओझर्डीस आहे, तेथें नानासाहेब, गोपाळराव दादासाहेब आहेत त्यांचे कडे कागद असावेत, शिवाय वाटेगांवीं गोविंद रामचंद्र देशपांडे आहेत त्यांचेकडे कागद खास आहेत. नाहीं म्हणायाला या गांवीं भोसल्यांचे दिवाण बाजीराव बल्लाळ काळेकर कुळकर्णी होऊन गेले, त्यांचे घराण्यांतील विद्यमान पुरुष गोविंदराव कृष्णराव यांचे कडे पेशवाईच्या अंताचे वेळचे दोन चार कणगे भरून कागद कुजत असलेले पाहाण्यास सांपडलें. त्यांपैकीं ५।२५ कागद बरोबर घेतले आहेत. बाकीचे कागद कोणा इतिहास संशोधकास शोधावयाचे असतील तर त्यानें तेथें गेलें पाहिजे.

(३३) वाटेगांव—

शिराळ्याच्या देशपांड्यांनीं पुढल्या गांवची वाट दाखविल्यावरून वाटेगांवीं गोविंदराव रामचंद्र देशपांडे यांचे कडे आलों. गोविंदराव म्हणाले, शिराळकर

देशपांड्यांच्या कडे च कागद असावयास पाहिजेत, आमच्याकडे कांहीं नाहींत. फार च गयावया केली तेव्हां म्हणाले, तपास करूं, कांहीं आढळल्यास कळवूं. अजून कळविलें नाहीं, पण केव्हां तरी कोणास तरी कळवितील.

(३४) ओझर्डे—

वाटेगावाहून ओझर्ड्यास आलों. नानासाहेब व त्यांचे पुतणे गोपाळराव यांस भेटलों. देशपांड्यांचे मूळपुरुष विठ्ठलराव हे श्रीसमर्थांचे शिष्य होत. श्रीसमर्थांनीं दिलेलें रामपंचायतन यांचे घरीं आहे. शके १६३६ तील एक व १६४६ तील दुसरी अशा दोन सनदा गोपाळरावांनीं दाखविल्या, त्यांत पूर्वीच्या सनदा दग्ध झाल्याचा उल्लेख आहे, तेव्हां खुद्द श्रीसमर्थांच्या वेळचा कांहीं संग्रह यांचे पाशीं नसावा असें मानण्यास हरकत नाही.

(३५) भागानगर—

श्रीरामदासपंचायतनापैकीं केशवस्वामींचें हें नगर होय. तेथें केशवस्वामींचा मठ वगैरे कांहीं नाही. केशवस्वामींची समाधी येथें अजून ती कोठें आहे याचा शोध मोठ्या मुष्किलीनें लागला. मुलेमाज्याचे बागे पलिकडे रंग्रेजगुढा आहे, त्यांच्या पलिकडे मुसानदीचे कांठी एका शेतांत केशवस्वामींची समाधी आहे. समाधी आहे म्हणजे समाधीचें स्थान आहे. समाधीस्थानाच्या सभोंवतालची सर्व जमीन यवनांच्या मालकीची आहे. समाधीच्या ओट्याचे दगड तर लोकांनी काढून नेले च होते, पण प्रत्यक्ष पादुका हि ठिकाणावर नाहीत. काय दैना सांगावी. ही स्थिति मुसानदीच्या महापुराच्या पूर्वीची होय आतां काय दशा झाली आहे कोण जाणे. हा काळमहिमा होय. कालांतरानें समाधीस्थळ कोणतें तें तरी कोणी दाखविणारा भेटेल की कसें याची शंका आहे.

केशवस्वामींच्या शिष्यवर्गांत रंग्रेज म्हणजे रंगारी यांचा भरणा फार होता. अजून हि कित्येक रंगाऱ्याकडे केशवस्वामींच्या कवितेची बाडें आहेत. श्रीरामपंडित ऊर्फ भाऊसाहेब रजलकर म्हणून गोलीगढ्यांत राहत होते, त्यांनी एका रंगाऱ्याकडून असें बाड आणून दाखविलें होतें. तेव्हां प्रयत्न केल्यास केशवस्वामींच्या कवितेचीं बाडें भागानगरास मिळावीत, असें आहे.

(३६) मिरज—

येथें वेणुबाईचा मठ आहे. श्रीसमर्थदत्त श्रीरामपंचायतन मठांत आहे. मठांत कागदपत्रांचा संग्रह राहिलेला नाहि.

शेजारी च दुसरा एक लहान मठ आहे. सकुबाई म्हणून वेणुबाईच्या शिष्यीण होत्या, त्यांच्या हा मठ. त्यांची समाधी येथें च आहे. समाधीवर त्रयोदशाक्षरी मंत्र आहे.

तोंडी माहितीवरून असें कळलें कीं, सकुबाई या बाजीभट जोशी म्हणून मिरजेस होते त्यांच्या भगिनी होत. सकुबाईच्या वंशांतील गणपतराव व गोविंदराव बुवा रामदासी हे कोल्हापूर इलाख्यांत कुशेरास राहतात, त्यांच्याकडे कागदपत्रांचा तपास करावा.

(३७) ब्रह्मनाळ—

श्रीरामदासपंचायतनांपैकी आनंदमूर्ति यांचा येथें मठ आहे. आनंदस्वामी व त्यांचे गुरु रघुनाथस्वामी यांच्या समाधी समोरासमोर कृष्णाकाठीं आहेत, तें ठिकाण निवांत व चित्तास प्रसन्न करणारें आहे. तेथून गांव जवळ च आहे व गांवांत मठ आहे. आनंदमूर्तींची गुरुपरंपरा सांगतात ती अशीः—

शंकराचार्य— वासुदेवानंद — परमानंद — वैकुंठानंद — कृष्णानंद— रंगनाथस्वामी — काशीराज स्वामी — आनंदस्वामी— पुत्र कृष्णानंद स्वामी. हल्लीं यांचा वंश ब्रह्मनाळेस आहे. या घराण्याची एक शाखा खानापूर तालुक्यांत कळंबी येथें आहे, त्यांचेकडे हि कांहीं कागदपत्रें असावींत. ब्रह्मनाळ येथील वंशजांचे कागद पहावयास मिळाले. त्यांच्या नकला घेतल्या आहेत. कागद महत्वाचे आहेत. एकंदर ७७ लेखांक आहेत. गोपाळात्मज गंगारामशिष्य बापानंद विरचित "आनंदचरितामृत" नांवाचें आनंदमूर्तीचें सोळा अध्यायाचें चरित्र मिळालें आहे.

रघुनाथस्वामींचा आंगरखा, टोपी, जोडा मठांत आहेत. आनंदमूर्तींच्या चरित्रांत ज्या जोड्याची गोष्ट आहे, तो च हा जोडा होय.

(३८) भेंडाळें—

हें गांव जांबेपासून एक कोस आहे. ठोसरांच्या चाभाडे उपाध्यायांपैकीं कांहीं जणांचीं घरें येथें आहेत. कागदपत्रांचा तपास केला. कांहीं मिळाले नाहींत.

(३९) पिंपळगांव—

हें गांव जांबेपासून दीड कोस आहे. येथें नानाबुवाकडील संग्रह पाहिला. त्यांत हनुमंतस्वामीकृत श्रीसमर्थांची बखर होती, ती मिळाली. एकनाथांच्या आनंदलहरी प्रकरणाची एक जुनी प्रत त्या संग्रहांत होती. तिचे पाठ शुद्ध होते. या च संग्रहांत "लोदीसाडखानविनोदार्थं कविकल्याणमल्ल विरचितं चिंतामणि सूनुरामचंद्रेण लिखितम् ।" अनंगरंग नावाचा एक आठ पृष्ठांचा ग्रन्थ होता. हे खान कोण होते व त्यांच्या विनोदार्थ असली ग्रन्थरचना, हा कवि कोण आणि त्या ग्रन्थाचा संग्रह करणारा कोण, कोण जाणे !

(४०) पाटोदें—

येथें आबादेव व माधवबुवा वगैरे ठोसरांची मंडळी आहेत. त्यांचेकडे कागदपत्रांचा तपास केला पाहिजे.

(४१) आसनगांव—

हें गांव जांबेपासून अर्धा कोस च आहे. श्रीसमर्थांचें लग्न व्हावयाचें होतें तें या गांवीं. आसनगांवचे देशमुख जालनापुरास रहावयास गेले आहेत. माधवराव देशमुख म्हणून विद्यमान पुरुष आहेत, त्यांचेकडे कागदपत्रांचा तपास केला पाहिजे.

(४२) गुंज—

जांबेहून हिवऱ्यास या गांवावरून जातां येतें. गांव गंगेच्या तीरीं आहे. सुमारें ७५।१०० वर्षांमागें राजारामबुवा म्हणून होऊन गेले, त्यांची समाधी येथें गंगाकांठीं आहे. स्थान रम्य आहे. येथें दत्तात्रय जोशी म्हणून आहेत ते सावरगांवच्या रामोपासक कुळकर्ण्यांकडे श्रेष्ठांच्या ग्रन्थांविषयीं तपास करणार आहेत.

(४३) पोखरी—

जांबेपासून दीड दोन कोसांत च. व्याहमांडव म्हणून पैठणाजवळ एक गांव आहे. तेथील कुळकर्ण्यांच्या मुलाला श्रेष्ठांची मुलगी दिली होती असें सांगतात. जांबेहून गंगाधरमहाराज जेव्हां साताऱ्याकडे गेले तेव्हां त्यांच्या बरोबर व्याहमांडवचे कुळकर्णी गेले होते. त्या कुळकर्ण्यांचे वंशज गणेश जिवाजी हे पोखरीस अलिकडे मठ बांधून असतात. त्यांच्या संग्रहीं जयरामसुत बाळंभट जोशी जांबकर यांनी शके १७३५ त लिहिलेली येकवीस समासींची पोथी व श्रीमहारुद्रस्वामींच्या हातची श. १७५९ तील मनाच्या श्लोकांची एक सुंदर वही आहे.

(४४) आंबड—

जालनास्टेशनपासून दक्षणेस आंबड १०।१२ कोस आहे. आंबडच्या देशपांड्यांची मुलगी श्रेष्ठांना दिली होती; म्हणून आंबडास देशपांड्यांकडे तपास करावयाचा. येथें देशपांड्यांचीं दोन घरें आहेतः (१) नानासाहेब कांडारीकर यांचें. हे गृहस्थ वृद्ध आहेत; यांच्याकडील संग्रह पहावयास मिळाला नाहीं. तो पाहिला पाहिजे. (२) विनायकराव देशपांडे यांचें. यांचेकडे हनुमंतस्वामीकृत बखर मिळाली. तसें च एक पत्र पाहावयास सांपडलें. रामभक्तिपरायण जनार्दन बावा गुरु सदासीव बावा रामदासी गोत्र काश्यप श्रीमठ संस्थान श्री गंगातीर मौजे साडेगांव प्रा

आंबड यांस सेवक यशवंतराव होळकर सुभेदार यांनीं सन १२२८ स (श. १७[illegible]) हें पत्र लिहिलेलें आहे. त्यांत सुभेदार लिहितात, पूर्वीपासून रामनवमीचा उत्साह चालत आला आहे. सन १२१३ (श. १७३४) सालीं दुष्काळ पडला, शिष्यशाखा देशांतरास इनाम गेले, तरी शक १७३२ आश्विन शु. १० च्या धर्मपत्रा अन्वयें दरगांव अर्धा रुपया दिला आहे तो घेणें व श्रीमंतांचे राज्यास व दरगांवास अभिष्ट चिंतन करून असावें.

या गांवीं गणपतराव बापाजी काळे यांचें एक जुनें घराणें आहे. त्यांच्या कडे जुन्या कागदपत्रांचा बरा च संग्रह असल्याचें त्यांनीं स्वतः सांगितलं, परंतु हल्लीं आपणास सवड नाहीं पुढें केव्हां तरी दाखवूं म्हणाले. ते पहावयाचे आहेत. तसें च त्यांचे च संबंधी जोशी व फाटक यांच्याकडे हि कागद आहेत ते हि पहावयाचे आहेत.

आंबड गांव बरें च पुरातन दिसतें. पोखरणीचा तलाव, देवीचें देऊळ, महादेवाचा डोंगर, खंडोबाचें देऊळ वगैरे स्थळें प्रेक्षणीय आहेत. देवीचें देऊळ पुढें बांधलेलें डोंगरांत आहे. देवालयाच्या पायऱ्या वगैरे देवी अहल्याबाईनें बांधविल्या म्हणून सांगतात ! धन्य आहे त्या मातुःश्रीची ! देवालयाच्या दक्षिण दरवाज्याबाहेर पांच ओळींचा एक अस्पष्ट शिलालेख आहे. तिसऱ्या ओळींतील " महिमा पर्वताचा ॥ " हीं अक्षरें व पांचव्या ओळीतील " सन ११५० " हीं अक्षरें एवढीं च लागलीं.

आंबडास एक श्रीसांप्रदायिक मठ आहे. त्यास स्वामींचा मठ म्हणतात. त्या मठाची परंपरा अशी:—

श्रीरामदास–कल्याण–जगन्नाथ –यादव – राघव – अच्युताश्रम स्वामी (यांनीं हा मठ स्थापिला. समाधी शक १७४५ श्रावण शु. १२)–त्र्यंबक–जीवन–गणेश–रंगनाथ.

या मठांत संस्कृत प्राकृत ग्रन्थांचा भरणा बरा च आहे आणि समाधानाची गोष्ट अशी कीं तो व्यवस्थित ठेवला आहे. बरोबर घेण्यासाठीं कांहीं संग्रह निवडला होता, पण तो मिळाला नाहीं. श्रीसांप्रदायाच्या दृष्टीनें अनुपलब्ध असें त्यांत कांहीं च नव्हतें, म्हणून मग आग्रह हि केला नाहीं. या संग्रहांत एक वस्तु मात्र अपूर्व आहे. श्रीमत् भगवद्गीतेची एक उत्कृष्ट व सुंदर अक्षरांनीं लिहिलेली पोथी या संग्रहांत आहे. भगवंतांनीं दहाव्या अध्यायांत विभूतियोग सांगतांना " आपण कोण, आपलें स्वरूप काय " याचें जें परोपरीनें वर्णन केलें आहे, त्या प्रत्येक प्रकाराला अनुरूप असें एक एक चित्र या प्रतींत काढलें आहे. चित्रकलेचें मला मुळीं च ज्ञान नाहीं. पण माझे मित्र र. तात्यासाहेब भट यांना

चित्रकलेचें ज्ञान आनुवंशिक आहे, ते म्हणतात कीं हीं चित्रें सर्वोत्कृष्ट असून या सर्व चित्रांचे फोटो घेऊन सचित्र भगवद्गीता जो प्रसिद्ध करील त्याच्या लाखों प्रती खपतील. अशीं चित्रें सुमारें पाऊणशें ऐशीं आहेत. हें काम चित्रशाळेचें आहे व तें त्यांनीं करावें. गिरामस्म्येकमक्षरम् याचें चित्र असें आहे—

ॐ

(४५) जळगांव—

आंबडच्या दक्षणेस दहा बारा कोस हा गांव आहे. येथें एक श्रीसांप्रदायिक मठ आहे, त्याची परंपराः—

	श्रीरामदास
	|
	देवदास (दादेगांव)
	|
शिष्य	हरिस्वामी
	|
,,	उद्धव
	|
पुत्र	कृष्ण (यांनीं हा मठ स्थापिला)
	|
,,	भीमराज
	|
,,	राघव
	|
,,	श्रीराम
	|
,,	सीताराम

मठांतील संग्रह पहावयास मिळाला नाहीं.

(४६) साडेगांव—

जळगांवच्या दक्षणेस दीड कोस गंगेच्या कांठीं हा गांव आहे. गंगेच्या कांठीं असणारें कोणतें स्थल चित्ताला प्रसन्न करणार नाहीं ? येथें श्रीसांप्रदायिक मठ आहे. उद्धवांच्यापर्यंत जळगांवची जी परंपरा ती च या मठाची हि. उद्धवांच्या पुत्रानें जळगांवचा मठ स्थापिला व शिष्यानें येथें स्थापिला. ती शिष्यपरंपरा अशीः—

उद्धव
|
शिष्य राघव
(यांनीं हा मठ स्थापिला)
|
" सदाराम
|
" जनार्दन
(आंबडच्या वर्णनांत यशवंतराव होळकरांचे जें पत्र आलें आहे तें यांना)
|
" गोविंद
|
" वामन
|
" लक्ष्मण
|
" सीताराम

सीतारामबुवा अल्पवयी आहेत म्हणुन सांगतात. ते व त्यांचे पालक आणि व्यवस्थापक परगांवी गेले होते, त्यामुळें संग्रह पहावयास मिळाला नाहीं. केवळ मनसोक्त गंगास्नान करावयास सांपडलें.

(४७) दादेगांव--

श्रीसमर्थशिष्य देवदास यांचा येथें मठ आहे. मालेंतील तिसऱ्या भागांत या मठाची हकिकत आली च आहे. दादेगांवापासून कडेगांव जवळ च आहे. कडेकर देशमुख या मठाचे सांप्रदायी असल्यामुळें त्यांच्याकडे देवदासांचे ग्रन्थ असण्याचा फार संभव आहे, असें कळतें. देवदासांचे शिष्य कृष्णाजीबावा कड्यास च राहत. कड्यास सांप्रदायिक इतर हि ग्रन्थ मिळण्याचा फार संभव आहे. तेथें रामचंद्र सीताराम दुधाट यांच्या जवळ शक १६१६ तील श्रीग्रन्थराजाची प्रत आहे असें त्यांच्या पत्रावरून कळते. तात्पर्य कड्यास एकवार गेलें पाहिजे.

(४८) वाघवाडी--

ही वाडी परळीखोऱ्यांत आहे. तेथे कारखाननीस यांचं एक जुनें घराणें आहे. त्यांचेकडे कांहीं कागदपत्रें असावींत पण पहावयास मिळालीं नाहीत; त्यांचे कडून फक्त तीन बाडें मिळालीं. कागदपत्र पाहिले पाहिजेत.

(४९) कामथी--

हें हि लहानसें खेडें परळीखोऱ्यांत आहे. तेथें दप्तरदार यांचें घराणें आहे. घरांत कर्ते पुरुष कोणी भेटले नाहींत. विष्णुपंत गोपाळ करंडे म्हणून एक गृहस्थ या गांवीं भेटले. जवळ कागद असावेत. उगी च थोडे दाखविले व कांहीं थोडे दिले.

(५०) परळी--

परळीस कुळकर्ण्यांकडे कांहीं कागद नाहींत. विनायक श्रीधर देशपांडे यांचे कडे बखर व बाळाजी गणेश देशपांडे यांचे कडे श्रीदासबोधाची प्रत आहे असें कळलें, पण उभयतां हि गृहस्थांची भेट झाली नाहीं.

(५१) कुंडलवाडी--

इंदूरबोधच्या अलिकडे धर्माबाद स्टेशन आहे, तेथून कुंडलवाडी ४।५ कोस आहे. दरम्यान गंगा नदी लागते. कुंडलवाडीस श्रीसांप्रदायाचा मठ आहे. हा मठ एकेहाळी मठपति दासविश्रामधामकर्ते आत्माराम यांच्या शिष्यानें स्थापिलेला आहे. परंपरा---

श्रीरामदास
|
कल्याण
|
शिवरामस्वामी (आपचंद)
|
रामचंद्र
|
आत्माराम (एकेहाळी मठपति)
|
यादव
(यांनीं हा मठ स्थापिला)
|
मारुती
|
सखाराम
|
भगवंत — रामकृष्ण ऊर्फ बाबामहाराज
|
आत्माराम (भगवंत यांचे शिष्य)

रामकृष्ण ऊर्फ बाबा महाराज बहुश्रुत आहेत. यांनीं श्रीसमर्थांचीं कांहीं कूटात्मक पदें म्हणून दाखविलीं. तीं उतरून घेतलीं आहेत. “ अन्वयव्यतिरेक ” प्रकरण श्रीसमर्थांचें नाहीं असें यांनीं मला सांगितलें होतें व तें च खरें ठरलें

असें इतरत्र मीं लिहिलेल्या टांचणावरून कळणार आहे. दासबोधाचें मुसलमान म्हणून जें प्रकरण आहे तें कल्याणकृत आहे असें यांचें म्हणणें आहे. श्रीसांप्रदायिक ग्रन्थांचा संग्रह मठांत बरा आहे. आहेत तीं सर्व प्रकरणें आपणांस पूर्वीच उपलब्ध झालेलीं आहेत.

संप्रदाय	स्वरूप
भक्ति	सद्गुरूची
उपासना	आत्मारामाची
साह्यता	मारुतीची
मार्ग	शुद्ध
क्रिया	सात्त्विक
प्रचीति	भावपूर्वक

या सात लक्षणांनी जो युक्त असेल त्यानें आपणांस रामदासी म्हणवावें, असें बाबामहाराजांनी सांगितलें.

(५२) पैठण—

हें पुरातन शहर साधुसंतांचें माहेरघर होय. त्यांत एकनाथ महाराज, अमृतराय, कृष्णदयार्णव व शिवदिनकेसरी यांच्या निकट सहवासानें ही प्राचीन नगरी विभूषित झाली आहे.

(१) तोंडी माहितीवरून असें कळतें कीं नाशकास श्रीएकनाथांचे उपाध्याय कोणी गर्गे म्हणून होते, त्याचे वंशजाकडे नाथांचें हस्ताक्षर आहे; नाथांचे कोणी उद्धव म्हणून पुणेसातान्याकडे शिष्य होते, त्यांनीं नाथांचा कवितासंग्रह नेला होता; मुंगीस नाथांच्या हातचें भागवत असावें.

नाथांच्या समाधीशकाविषयी आतां शंका च उरली नाहीं. शके १५२१ हें साल सर्वमान्य झालें आहे. समाधीवर श्लोक आहेत ते इतरत्र प्रसिद्ध आहेत. तथापि हे श्लोक तरी नाथांच्या पश्चात् किती तरी वर्षांनी कृष्णदयार्णवांनीं केलेले आहेत तेव्हां समाधीशक अगदीं निर्विवाद ठरला असें मानलें च पाहिजे असें नाहीं.

शके १६८७ त केशवांनी नाथांचें चरित्र लिहिलेलें, तुकाराम तात्या यांनीं नाथांच्या अभंगांची दहा अकरा वर्षांमागें जी गाथा छापली तींत आलें आहे. पैठणास या चरित्राची शके १७१४ त केलेली प्रत पाहण्यांत आली. शेवटच्या अध्यायांतील ९८ ते १०२ ओव्या तुकाराम तात्यांनी गाळल्या आहेत. त्या ओव्यांवरून केशवांची परंपरा कळते, ती अशीः—

एकनाथ—पौत्र राघव—माधव—राघव—त्र्यंबक—केशव.

पैठणास नारायणबुवा पालखीवाले यांचे जवळ नाथांचें हस्ताक्षर आहे व संग्रह हि बरा च आहे.

नाथांचे ग्रन्थ व नाथांचें चरित्र यांच्या संशोधनांत कोणीं तरी आपलें आयुष्य खर्च करण्यास अवश्य तयार झालें पाहिजे.

(२) अमृतराय यांच्या मठांत कांहीं विशेष माहिती मिळाली नाहीं.

(३) कृष्णदयार्णवांची समाधी येथें च आहे. समाधीवर श्लोक आहे ता असाः—

श्रीगुरवे नमः ।। रौद्रीडिषट्षट् शशिशाकावर्षी ।।
सत्पंचमी शुक्लसुमार्गशीर्षी ॥ नैर्गुण्य श्रीकृष्ण ॥
दयार्णवासी ॥ तत्पादुका पूज्य सुखैकराशी ।। १ ॥

यावरून कृष्णदयार्णवांनी शके १६६२ च्या मार्गशीर्ष शु.५ स समाधी घेतली हें उघड आहे.

त्यांच्या च समाधीशेजारी काशीनाथ याची व उत्तमश्लोक यांची अशा दोन समाधी आहेत. त्यांवर हि समाधीशकांचे श्लोक आहेत. त्यावरून काशीनाथांनीं १७०८ व उत्तमश्लोकांनीं १७५८ त समाधी घेतली असें दिसतें.

(१)वसुव्योमसूर्याद्रे पराभवे· ·
(२)पूर्वपुत्रराशीच्चाडामु दुर्मुख· ·

पैठणास व पैठणचे आसपास कृष्णदयार्णवांचे ग्रन्थ मिळण्याचा संभव फार आहे.

(४) शिवदिनकेसरी यांनी शके १६९६ जयनाम संवत्सरीं माघ व. ३ स समाधी घेतली. यांचा मठ गंगेच्या कांठी असून प्रेक्षणीय आहे. केसरीनाथकृत शक १६३८ तील सिद्धांतसार, शिवदिननाथकृत १६९२ तील ज्ञानप्रदीप, चिंतामणीकृत ज्ञानकैवल्य व शिवदिन नाथांचे नातू लक्ष्मीनाथ यांचा प्रीतिभूषण असे चार ग्रन्थ मठांत आहेत असें कळलें, पण ग्रन्थ पहावयास मिळाले नाहींत. हे ग्रन्थ मिळविण्याचे कामी विष्णु रामकृष्ण घुगरी यांचें सहाय्य होण्यासारखें आहे.

रा. घुगरी यांचे जवळ श्रीज्ञानेश्वरीच्या पांच प्रती, शके १६२०, १६२४ १६७४, १७२९, १७४१ या शकांतील पहावयास मिळाल्या. या पांच हि प्रतींत ती नरोटीची ओंवी नाहीं.

या ठिकाणीं मला एक गोष्ट नमूद करावयाची आहे. या जशा पांच प्रती पहावयास मिळाल्या, तशा बहुतेक मठांत श्रीज्ञानेश्वरीची प्रत पाहण्यांत येते. श्रीज्ञानेश्वरींत जे अशुद्ध पाठ पडले होते ते शोधून शक १५०६ त नाथांनीं ज्ञानेश्वरी शुद्ध केली. त्या प्रसंगाच्या त्यांनी शेवटीं पांच ओंव्या केलेल्या छापण्यांत

आहेत, पण माझ्या पाहण्यांत आजपर्यंत ज्ञानेश्वरीच्या ज्या ५।५० हस्तलिखित प्रती आल्या आहेत त्यांत या शोधनाच्या फक्त पहिल्या चार च ओंव्या आहेत. अशी एक हि प्रत मला आढळली नाहीं की जींत तीं शेवटची नरोटीची ओंवी आहे. यावरून व इतर अनेक कारणांवरून

ज्ञानेश्वरी पाठीं । जो वोवी करील मऱ्हाठी ।
तेणें अमृताच ताटीं । जाण नरोटी ठेविली ॥

ही ओंवी नाथांची नाहीं असें माझें मत झालें आहे. खुद्द पैठणास नाथांचे मठांत नानाबुवांकडे जी ज्ञानेश्वरीची प्रत आहे तींत हि ही ओंवी नाहीं.

शिवदिनकेसरींचें मला एक महत्व असें आहे कीं त्यांचीं श्रीसमर्थांवर कित्येक पदें आहेत. शक १६६६ चे सुमारास श्रीसज्जनगडावर ते स्वतः उत्सवाचे प्रसंगी हजर होते. त्या वेळीं त्यांनीं श्रीसमर्थांपुढें कीर्तन केलें त्यांत कित्येक पदें तेथल्या तेथें त्यांनीं करून म्हटली. त्यानी श्रीसमर्थांवर केलेली कांहीं पदें रा. घुगरी यांचेकडे मिळालीं.

(५३) तीसगांव—

श्रीसमर्थशिष्य दिनकर यांचा येथे मठ आहे मालेंतील भाग ६ वा, स्वानुभवदिनकर, यांत या मठाची साद्यन्त हकिकत आली च आहे.

(५४) केशापुरी--

जांबेहून दक्षिणेकडे धारूरास जातांना जांबेपासून सात कोसांवर गंगेच्या दक्षिणेस ही पुरी लागते. तेथें केशवराज व दत्त यांच्या अप्रतिम मूर्ती आहेत.

(५५) माजलगाव--

ह्या तालुक्याचा गांव सिंधुफेननदीचे कांठीं असून केशापुरीपासून एक कोस आहे. येथें श्रीसमर्थसांप्रदायाचा मठ आहे. मठाची परंपरा—

श्रीरामदास
|
वेणुबाई
|
शि. हरिदास
|
" आण्णाबुवा
|
" सदाशिव
|
" गिरमाजी
|

पुत्र विठ्ठल
|
" व्यंकटेश
|
" विठ्ठल
|
" लक्ष्मण

मानसपूजा, जुनाट पुरुष, चतुर्थ योग, निर्गुणध्यान, सगुणध्यान, षड्रिपु, पंचमान हीं श्रीसमर्थांचीं प्रकरणें, विवेकसिंधु, विष्णुदासनामाकृत भीष्मपर्व व मुक्तेश्वराच्या आदिपर्वाची शक १६६७ तील प्रत हे ग्रन्थ मठांत पहावयास मिळाले. पैकीं मानसपूजा, जुनाट पुरुष, विवेकसिंधु व आदिपर्व हे चार ग्रन्थ नूर्त बरोबर मिळाले आहेत.

या मठांत आणखी इतर संग्रह बरा च असावा, परंतु सर्व पहावयास मिळाला नाहीं.

(५६) धारूर—

म्हणे उद्धवचिद्घन महाराज ।
रामदासाचा संग घडो मज ।।

त्या उद्धवचिद्घनांची येथें समाधी आहे म्हणून येथें आलों. समाधी आहे. पण अशा त्यांच्या समाधी शेकडों ठिकाणीं आहेत, त्यामुळें खरोखर त्यांनीं समाधी कोणते गांवी घेतली हें सांगणें कठीण आहे, असें येथील ब्राह्मण पाटील नागोराव भाऊसाहेब यांनी सांगितलें. समाधीचे आवार मोठें आहे, पण सर्वत्र पडझड झाली नाहीं. तेथें कोणी राहात नसून उद्धवचिद्घनांचे पुजेंतील देव, पुजारी मारुतीसीताराम काळे यांनीं आपणाकडे नेले आहेत. येथें भाद्रपद व. १ ला उद्धवचिद्घनांची पुण्यतिथि मानली जाते.

" गंगाधर कोकिळ " यांचा हि या गांवाशी संबंध होता व त्यांची हि कविता या गांवीं मिळण्याचा संभव फार आहे. रामशास्त्री मुकुंद कोकिळ म्हणून एक गृहस्थ या गांवीं असतात. त्यांची भेट जाली नाहीं, पण त्यांचेकडे कोकिळांचा व इतरांचा पुष्कळ संग्रह आहे असें कळलें कोकिळाविषयीं जास्त माहिती पूर्वी इतरत्र दिलेली आहे.

(५७) परळी वैद्यनाथ—

हें ज्योतिर्लिंगाचें स्थान अंबाजोगाईपासून पांच सहा कोस अंतरावर आहे. याविषयीं एक लहानसें टांचण भा. इ. सं. मंडळाच्या १८३४ च्या पहिल्या सहामाही अहवालांत दिलेलें आहे.

(५८) लातूर—

हें स्टेशन च आहे. येथें एक जुना श्रीराममठ आहे, पण मठांत कोणी नमते व परंपरा, ग्रन्थ वगैरे कांहीं नाहीं.

गांवाबाहेर सिद्धेश्वराचें पुरातन स्थान पाहण्यासारखें आहे. तेथें दीपमाळेच्या चबुतऱ्यावर एक शिलालेख हवा खात पडला आहे. बहुतेक अक्षरें उडालीं च आहेत. सिद्धेश्वराचे देवळाजवळ च हिरण्यकशिपूचें पोट विदारण करीत असलेली नृसिंहाची मूर्ति असून देवालय आहे. हें हि स्थान तितकें च जुनें आहे. मूर्तीचें सिंहासन पाहण्यासारखें आहे.

(५९) नीलंगे—

लातूरपासून दक्षिणेस नीलंगे दहा अकरा कोसांवर आहे. श्रीसमर्थांचे प्रत्यक्ष शिष्य आण्णाप्पा यांचा येथें मठ आहे. आण्णाप्पांना च आनंद म्हणत. ते ब्रह्मचारी होते.

आण्णाप्पांच्या हातची श्रीमत् दासबोधाची प्रत मठांत आहे. मला या प्रतीचें मोठें कौतुक वाटलें. कल्याणस्वामींच्या हातचा मूळ ग्रन्थ जो डोमगाव-मठांत आहे, तेवढा च ततोतंत आकार या प्रतीचा आहे. श्रीसमर्थांच्या सर्व शिष्यांचीं अक्षरें सारखीं होतीं कीं काय न कळे. एका च गुरूचा कित्ता गिरविणारे सारे शिष्य ! प्रतीच्या अक्षराचें वळण हि मूळ ग्रन्थाप्रमाणें च आहे.

आण्णाप्पा व त्यांचे शिष्य जयराम यांच्या समाधी गांवाबाहेर मठाला च इनाम असलेल्या एका शेतांत आहेत. आण्णाप्पांची पुण्यतिथि मार्गशीर्ष व. ३ व जयरामांची फाल्गुन व. १४ होय. आण्णाप्पांचे समाधीवर " श्रीराम " हीं अक्षरें आहेत.

मठाशेजारीं च एक जुनें शंकराचें देवालय आहे.

मठांतील कांहीं उपयुक्त संग्रह मिळाला.

(६०) कल्याणी.

हें प्राचीन शहर नीलंग्यापासून आठ नऊ कोस आहे. येथें पूर्णानंदाचे शिवरामस्वामी यांचा मठ आहे. त्याविषयीं एक टांचण भा. इ. स. मंडळाचे १८३४ चे दुसरे त्रैमासिक अहवालांत दिलें आहे.

कल्याणीस एक विठ्ठलमंदीर आहे. मंदीराचे मालक यशवंतराव पाठक यांनीं कांहीं संग्रह दिला आहे, त्यांत श्रीधरकृत कांहीं ग्रन्थ आहेत. यशवंतरावांचें म्हणणें असें कीं, श्रीधर कल्याणीस असत. श्रीधरस्वामींसंबंधानें आजपर्यंत जो शोध झाला आहे तो ग. ब. साने यांनीं एका निबंधांत संकलित केलेला आहे, त्यावरून

अधिर केव्हां हि कल्याणीस होते असें दिसत नाहीं. मग यशवंतरावांच्या म्हणण्यांत कितपत तथ्य आहे कोण जाणे.

(६१) माणिकनगर—

कल्याणीपासून पांच सात कोस हें नगर आहे. श्रीमाणिकप्रभूंच्या या स्थानाचें माहात्म्य, आपल्या संशोधनदृष्टीनें अगदीं अलिकडिल आहे. पण हें अलिकड वसलेलें शहर इतकें स्वच्छ, रम्य व चित्तास प्रसन्न करणारें आहे कीं, केवळ तेवढ्या च साठीं मी त्या नगराचा येथे उल्लेख करीत आहें नगर लहान च आहे. पण एकाद्या ब्राह्मणाच्या घराप्रमाणें सर्व नगर कसें स्वच्छ ठेवलेलें आहे. माणिकप्रभूंची समाधी निःसंशय प्रेक्षणीय आहे.

(६२) चाळकापूर—

माणिकनगराहून बेदरला जातांना वाटेंत हें स्थान लागतें. जोगाईची देवी, चाळकापुरचा मारुती व मेलारचा खंडोबा हीं तीन देवतें मोगलाईंत प्रसिद्ध आहेत. चाळकापुरच्या मारुतीच्या दर्शनास नेहमीं रांब लावून लोक येत असतात. येथें आत्माराममहाराजांचा म्हणून एक मठ आहे. उपासना मारुतीची खरी, परंतु श्रीसमर्थसांप्रदायाचा संबंध दिसत नाहीं.

आत्माराम—भटजीमहाराज—अंबादास—श्रीपती – अंबादास(विद्यमान).

यावरून आत्मारामहाराज शंभर सवाशें वर्षांमागें च होऊन गेले हें उघड आहे. मठपती मठांत एक पंचधातूची मूर्ति दाखवितात व ती आपल्या पूर्वजांस पेशव्यांनीं दिली म्हणून सांगतात. तापाविश्राम म्हणून सात च अध्यायांचें आत्माराम महाराजांचें चरित्र आपणापाशीं आहे; पण तें परगांवी एकानें वाचावयास नेलें आहे, असें मठपति म्हणाले. तें चरित्र पाहिलें पाहिजे.

(६३) मैलार—

चाळकापूराहून निघाल्यावर बेदरच्या अलिकडे ३।४ कोसांवर हें उध्वस्त शहर लागतें. या च ठिकाणी खंडोबाचें प्रचंड देवालय आहे. गांव ओसाड, गर्द झाडी व विपुल पाणी यांयोगें या ठिकाणाला रमणीयता आली आहे. गांवाचा ओसाड भाग पाहिला म्हणजे पूर्वी हें मोठें भरभराटीचें गांव असावें असें वाटतें. असें असून हल्लीं गांवांत मनुष्याची वस्ति मुळीं च नाही. येथील पाणी वाईट आहे म्हणून गांव उठत उठत पुरें उठलें असें सांगतात.

(६४) बेदर—

उद्धवचिद्घनांचा एक व श्रीरामाचा एक असे दोन मठ येथें आहेत,

उद्धवचिद्धनांचे मठांतील परंपरा तुटली आहे. हल्लीं व्यवस्था खंडेराव नरसिंगराव यांचेकडे आहे. त्यांचेकडुन कांहीं किरकोळ संग्रह मिळाला.

बापुदेव भूनसाने म्हणून एक गृहस्थ बेदरास आहेत, त्यांचेकडे उद्धव-चिद्धनांचा कांहीं संग्रह आहे, पण पहावयास मिळाल नाहीं.

श्रीराममठात कांही विशेष संग्रह नाहीं.

ऐतिहासिक स्थळें येथें पुष्कळ च आहेत. ऐतिहासिक कागदपत्रांसाठीं बेदरास कांहीं काळ राहून संशोधन केलें पाहिजे.

(६५) एकेहाळी—

येथे दासविश्रामधाम ग्रन्थाचे कर्ते आत्मारामहाराज यांचा मठ आहे व त्याची हकिकत गल्या सालच्या संमेलनाच्या अहवालांत आली च आहे.

(६६) महागांव —

गुलबर्ग्याच्या उत्तरेस सहा सात कोसांवर हा गांव आहे. वडवाळसिद्धनागनाथ म्हणून जे होऊन गेले, त्यांच्या एका शिष्याचा येथें मठ आहे. मठांत ग्रन्थसंग्रह पुष्कळ आहे. परंतु तो नुसता पहावयास हि मिळाला नाहीं. कोणीं तरी पुन्हा प्रयत्न केला पाहिजे.

(६७) अपचंद--

महागांवापासून सुमारें दीड कोसहें लहानसें खेडें आहे. कल्याण स्वामींचे शिष्य शिवरामस्वामी यांचा येथे मठ आहे. परंपरा:—

श्रीरामदास - कल्याण — शिवराम — रामचंद्र— आत्माराम (दासविश्रामधामकर्ते)—रामराज—आत्माराम—रामकृष्ण (विद्यमान).

शिवरामस्वामीची समाधी येथें च असून समाधीवर त्रयोदशाक्षरी मंत्र आहे. रामचंद्रमहाराजांची समाधी येथे च असून तीवर " श्रीरामचंद्रसद्गुरवे नमः " अशीं अक्षरें आहेत.

मठांत उपयुक्त असा कांहीं संग्रह मिळाला.

(६८) तंजावर—

श्रीसमर्थसंप्रदायाचे तंजावरास एकंदर पांच मठ आहेत. शहापुरकर भीमस्वामींचा स्वतःचा एक, तिघा शिष्यांचे तीन व अनंतमौनींच्या परंपरेंतील सेतुरामबावांचा एक. अनंतमौनींची परंपरा त्यांचा मठ मन्नारगुडीस आहे, त्याचे वर्णनप्रसंगीं देऊं. तूर्त भीमस्वामींची परंपरा पाहूं:—

- **श्रीरामदास**
  - **भीमस्वामी फाल्गुन शु. १**
    - गोविंद बाळ पु.ति. वैशाख व. ३
      - भोळाराम
      - वासुदेव श्रावण शु ५
        - मुकुंद
        - भाऊस्वामी
          - गोविंदबाळ पौष शु ६
            - भाऊस्वामी
              - रामचंद्रराव
    - आण्णाजी बावा
      - नागोबा
        - आत्माराम
          - नागोबा
            - आत्माराम
              - अण्णाजी बुवा उर्फ त्यागराज
                - रघुपती
    - **झोळीराम बावा**
      - **नागोबा फा शु.२**
        - रामचंद्र फा. व. ३
          - रामशेष पौ. व. १४
            - नागोबा
              - भीमराव

१ भीमस्वामीचे मठांत भीमस्वामींच्या हातचा दासबोध आहे. त्याला अकरा वस्त्रांचीं वेष्टणें असतात. मठांतील उपयुक्त ग्रन्थसंग्रह सर्व मिळाला. मठांत श्रीसमर्थांच्या व भीमस्वामींच्या तसबिरी आहेत, त्यांवरून फोटो घेतले. भीमस्वामींची समाधी मठापासून एक कोस अंतरावर आहे. समाधीची अत्यन्त **अनास्था आणि दुर्दशा आहे.**

(२) गोविंदबाळाच्या मठांत ग्रन्थसंग्रह बरा च आहे. मिळाला **मुळीं च नाहीं.** अर्धा अधिक पहावयास मिळाला. त्यांत खालील ग्रन्थ होते:—

(१) शके सोळाशें आठावन्न । पिंगळ संवत्सर पावन ।
तैं दशमस्कंधारंभण । केलें आपणें इंदुपुरी ॥
कितेक दिवसा नंतर । संपला ग्रंथ सुंदर ।
विनवी माधवकुमार । जोडोनि कर श्रोतयांसी ॥

अशी हि माधवकुमारांची दशम स्कंधावर १२०६४ ग्रंथसंख्या **टीका आहे.** ग्रन्थाच्या शेवटीं ही प्रत कोणाची यांविषयीं जो मजकूर आहे, तो असा:—

जो प्रतापसिंह राजमणी । तन्मंत्री मानाजी आप्पा वीरामणी ।
तत्सुत सुबराव गुणखाणी । तत्पुत्र सुगुणी शंकरराव ॥

तयाचें हें भागवत दशम। ओव्यांत मंगलप्रद परम।
मन्मथ वर्षे मार्गेश्वर उत्तम। शुद्ध पक्षीं सुगम पूर्ण लिहिलें ॥

(१) माधवकृत भारतांतील कांही पर्वे
(१) महिपतिकृत भक्तविजय
(१) मोरोपतांचें आर्याभारत
(१) वृत्तरामायण
(१) मयूरपंतकृत भागवतटीका
(१) पांडुरंग माहात्म्य

मेदिनीकरकुल संभव। रुक्मांगदपुत्र ज्ञानविभव।
गंगाधराख्य अभिनव। जया सद्भाव श्रीरामचंद्री ॥
श्रीशिवरामेंद्र योगीश्वर। तदनुग्रही दयासागर।
रुक्मासुत म्हणती ज्यासी थोर। लक्ष्मीनृसिंहपर सदा ॥
तयाचा श्रीअभय हस्त। माझिया माथा सदा वर्तत।
तो जैसा बोलवीत। तैसा बोलतसे जाणा ॥
येथें मीपणाची नाहीं ठावो। बोलविता सद्गुरुरावो।
सर्वसाक्षी रघुपुंगवो। जाणे भावो शेष म्हणे ॥

(१) ब्रह्मनिमतोर्जाकृत अद्वैत प्रकाश
(१) आनंदसागरकृत रा-चैतन्य
(१) वामनकृत समश्लोकी गीता
(१) व्यंकटेशस्तोत्र
(१) माधवकृत श्लोकबद्ध रामायण
(१) संतविजय
(१) भोजराजविरचित " चंपू अयोध्याकांड "
(१) वामनकृत निगमसार
(१) ज्ञानेश्वरकृत हस्तामलक
(१) कुंभकर्णमाहात्म्य
(१) विठ्ठलदास रुद्रकृत तुलसी माहात्म्य
(१) अनुभवामृत
(१) शेषकृत अद्भुतकांड रामायण

या हि मठांत श्रीमत् दासबोधाची जुनी प्रत आहे. एक चित्रपट आहे, त्यांत

समर्थ	राम	भीमस्वामी
भाऊस्वामी	गोविंदबाळ	वासुदेव

अशी चित्रें असून वर झांकणाच्या दरवाज्याप्रमाणें दोन फळ्या आहेत. डाव्या फळीवर आंतल्या बाजूस शुक आणि भोळाराम यांचीं व उजव्या फळीच्या आंतल्या बाजूस ज्ञानेश्वर व मुकुंद यांचीं चित्रें आहेत. या चित्रपटाचा फोटो घेतला आहे. या मठांतील इतर संग्रह केव्हां तरी पाहिला पाहिजे. अरणीकर आनंदतनयांचे कोणी न राहिल्यामुळें त्यांच्या पूजेंतील श्रीरामाच्या मूर्ति या च मठांत आणून दिलेल्या आहेत.

(३) आण्णाजीबावांच्या मठांत विशेष ग्रन्थसंग्रह नाहीं. इतर मठांतल्याप्रमाणें श्रीसमर्थ व भीमस्वामी यांच्या तसबिरी आहेत. या मठांत भीमस्वामींच्या खडावा आहेत. आण्णाजीबावापासून तिसरे पुरुष जे आत्माराम त्यांचीं कांहीं पदें विद्यमान मठपतींच्या पाठांत आहेत, तीं ते उतरून पाठविणार आहेत. अण्णाजीबावांच्या हातचा दासबोध मुख्य भीमस्वामीच्या च मठांत आहे.

(४) झोळीरामबावांना हें नांव मिळण्याचें कारण भीमस्वामींची झोळी या मठांत आहे या मठांत विपुल ग्रन्थसंग्रह होता व तो मठपतींनीं मोठ्या प्रेमानें माझ्या झोळींत टाकला व मीं तो कृतज्ञतापूर्वक स्वीकारला. जी भिक्षा मिळाली तिचें स्वरूप या टांचणांत दर्शविण्याचा हेतु नसल्यामुळें या ग्रन्थसंग्रहाचें स्वरूपवर्णन पुढें करूं. कोठें काय आहे कीं जें संशोधकांना मिळवावयाचें किंवा पहावयाचें आहे तेवढें च या टांचणांत नमूद करीत आहें.

तंजावरास कोणत्या हि मठांत, किंवा कोणा हि खाजगी मनुष्याकडे का होईना, गेलें म्हणजे

चित्रकला नाना नाटक ।
म्हणोनि नामें करनाटक ॥

असें जें या प्रांताचें वर्णन श्रीसमर्थांनीं भीमस्वामींना पाठविलेल्या एका पत्रांत केलें आहे, त्याची साक्ष पटते. ती प्रचीति झोळीरामबावांच्या मठांत विशेष येते. मठांत शिरलें म्हणजे जिकडे पहावें तिकडे चित्रें च चित्रें दिसतात. भक्तिविजयांतील प्रसंगांचीं हातानें काढून कांचांत बसविलेलीं सुमारें ५० चित्रें या मठांत आहेत. पौराणिक चित्रांचा एक मोठा थोरला चित्रपट आहे. इतर मठांतल्याप्रमाणें श्रीसमर्थांची जुनी तसबिर या हि मठांत आहे.

(५) सेतुरामबावांच्या मठांत आमचा प्रवेश झाला नाहीं. मठ म्हणजे मोठा थोरला राजवाडा च आहे. मठपतींना निरोप पाठविला पण त्यांनीं दर्शन दिलें नाहीं. सेतुरामबावांच्या मठाला पन्नास पाऊणशें हजारांचें उत्पन्न आहे हें सारें शक १६६२ च्या सुमारास प्रतापसिंह महाराजांनीं करून दिलेलें आहे. अनंतमौनींचे मेरुस्वामी व मेरुस्वामींचे सेतुराम. या मठांत ग्रन्थसंग्रह असला पाहिजे व आहे हि. पुन्हा कोणीं तरी यत्न केला पाहिजे.

अशी तंजावर येथील पांच मठांची हकिकत आहे. तंजावर हें मराठ्यांच्या राजधानीचें च शहर असल्यामुळें तेथें पाहण्यासारखें व मिळविण्यासारखें अवांतर पुष्कळ च आहे.

(१) मराठ्यांचा राजवाडा आहे. मराठ्यांचा असा, एवढा मोठा राजवाडा, एवढा च बहुधा उरला आहे. मोठमोठाले हौद (त्यांत आता पाणी नाहीं), दरबार भरण्याच्या जागा, शस्त्रागार, वगैरे राजवाड्यांतील भाग पाहण्यासारखे आहेत. या च राजवाड्यांत सरस्वतीमहाल म्हणून जगप्रसिद्ध ग्रन्थसंग्रहालय आहे. त्याचे वर्णन इतरत्र दिलें च आहे.

(१) तंजावरच्या राजघराण्याचे जे पेशवे व इतर अधिकारी होत त्यांची घराणी येथे आहेत. त्यांच्याकडे ऐतिहासिक कागदपत्रे मिळण्याचा संभव आहे. प्रयत्न केला पाहिजे.

(१) दादास्वामी म्हणून एक वृद्ध गृहस्थ येथे आहेत, त्यांचे जवळून एक पदांची वही व रामसोहळा ग्रन्थाचा कांहीं भाग मिळाला. पदाची वही उतरून घेऊन परत हि केली.

(१) कृष्णस्वामी नाईक म्हणून एक थोर श्रीमान गृहस्थ येथें आहेत. त्यांनी येथें एक मोफत वाचनालय स्थापिलें आहे व कांहीं हस्तलिखित ग्रन्थांचा हि संग्रह केला आहे माधवकृत रामायणाची सात हि कांडें यांचे जवळ होतीं. तीं त्यांनी दिली होती. उतरून घेऊन त्यांची परत केली. कोणा हि महाराष्ट्रीयाला संशोधनाचे कामी हे मोठ्या आनंदानें सहाय्य करतात.

(१) श्रीसमर्थांनीं आपला अवतार समाप्त करण्याच्या पूर्वी थोडे च दिवस गडावरील श्रीरामाच्या मूर्ति तंजावराहून आल्या हें सर्वविश्रुत च आहे, ज्या ओतिंगारानें म्हणजे सोनारानें त्या मूर्ति तयार केल्या त्याचा हि येथे ५।६ वर्षां पूर्वीपर्यंत मठ होता; श्रीरामाचा जन्मोत्सव तो करीत असे. शेवटचा पुरुष निपुत्रिक वारल्यामुळें मठ बंद पडला.

भारत इतिहाससंशोधकाला वर्ष दोन वर्षे पुरेल इतकें काम तंजावर प्रांतांत निःसंशय आहे.

(६९) मारंगुडी—

तंजावराहून कोनूर पांच कोस आहे. कोनूरास जातांना वाटेंत दोन कोसावर हें गांव लागतें. येथें दोन मोठाली देवालयें आहेतः एक देवीचें व दुसरें श्रीरामाचें. देवीच्या देवालयाच्या पहिल्या च सभामंडपाच्या एका खांबावर पुढील लेख कोरला आहे.

श्री
स्वस्ति श्रीशालीवाह
न शकब्दः १७५२ सत्रा
शे बाव्हन कल्यब्दाः ॥
४९३१ च्यारि हजार
र्णांशे यकर्त्ताम ॥ व
× × × × × × ×
संवत्सर पुष्य वद्य सप्त
मी बुधवार भरणी न
क्षत्र मार्गळी मास ते
दी २३ या शुभ दिनी रा
जश्री शरफोजी माहा ॥
राजकृत चिरबंदी न
नन मटप धर्म ॥ ७ ॥

मार्गळी म्हणजे मार्गशीर्ष व तेदी म्हणजे तारीख.

(७०) कोनूर—

श्रीसमर्थांचे प्रत्यक्ष शिष्य राघवस्वामी यांचा येथें मठ आहे. मठ आहे म्हणजे काय तर हल्ली फक्त तेथे चार भिंती व वर छप्पर आहे. गांवांत एकंदर घरें ३०।४० असतील. मठांत एक विधवा स्त्री व तिचा आठ नऊ वर्षांचा एक मुलगा हीं माणसें व चार भांडीं इतकें सामान आहे. परंपरा ठाऊक नाही असें बाई म्हणतात. श्रीसमर्थांची जुनी तसबीर व श्रीरामाच्या मूर्ति मठात आहेत. पुजा नित्य होत नसावी असे दिसते संग्रह काही नाही असे बाई म्हणाल्या, पण बाईचे जांवई नारायणराव पुढे मन्नारगुडीस भेटले ते संग्रह आहे असें म्हणाले. जावयांना वेळ नव्हता, नाही पक्षा आपण येऊन संग्रह दाखविला असता, असें जांवई म्हणाले. या च राघवांचे शिष्य माधव होत. माधवांचे ग्रन्थ किती तरी आहेत. भारत, भागवत रामायण वगैरे अनेक ग्रन्थ माधवकृत आहेत. तंजावरमठाचे वर्णनांत माधवांचा उल्लेख आला च आहे.

या मठांतील ग्रन्थसंग्रह पाहण्याचा व मिळविण्याचा पुन्हा प्रयत्न झाला पाहिजे

(७१) मन्नारगुडी—

तंजावराहून मन्नारगुडीस आगगाडीनें जाण्यास दोन तीन तास लागतात. श्रीसमर्थांचे शिष्य अनंतमौनी याचा येथे मठ आहे. परंपरा अशीः—

श्रीरामदास

अनंतमौनी पु. ति. भाद्रपद व. ९

मेरु पु. ति. आषाढ शु. ११
शके १६५५

अनंत पु. ति. भाद्रपद व. ९ — २ — ३ — ४

बाबुस्वामी — अनंतमेरु

शिवरामस्वामी — राजाराम — मेरुस्वामी — महिपति (विद्यमान)

स्थिति गरिबीची. ती च मेरुस्वामींचे शिष्य सेतुराम यांच्या वंशजांची स्थिति बरी आहे, हें आपण तंजावरच्या मठवर्णनांत पाहिलें. याविषयीं एक आख्यायिका आहे. मेरुस्वामींना कफ झाला होता. तो बाहेर टाकण्यास अनंतादि चार मुलांस सांगितलें. त्यांनी टाकला नाही. तें च काम सेतुरामबावांना सांगितलें. त्यांनी आज्ञा पाळली. तेव्हां मेरुस्वामी मुलांना म्हणाले तुम्ही भंकुबावे म्हणजे वेडे व्हाल व सेतुरामांना आशिर्वाद दिला कीं तुम्हांला राज्यलक्ष्मी प्राप्त होईल. त्याप्रमाणें कांहीसा अनुभव आला खरा.

अनंतमौनींची समाधी येथें च आहे पण ती पडून गेली आहे. तिची दुरुस्ती करण्याची बुद्धि सेतुरामबावांना होवो मेरुस्वामींची हि समाधी येथें च आहे तिची व्यवस्था सेतुराममठाकडे असून ती उत्तम आहे. मेरुस्वामींचे गुरु च अनंतमौनी, तेव्हां त्यांच्या समाधीची उत्तम व्यवस्था ठेवणें सेतुरामबावांकडे च येतें

महिपतिबावाकडे दोन बाडें मिळालीं. एक लहान आहे, पण दुसरें बरें च मोठें आहे. दोन्ही बाडांत इतरांची कविता आहे च, पण मेरुस्वामींची हि बरी च आहे. मठांत दासबोधाची जुनी प्रत आहे.

मन्नार म्हणजे गोपाळ व गुडी म्हणजे देऊळ. मन्नारगुडीस गोपाळकृष्णाचें एक अत्यंत भव्य आणि प्रचंड मंदीर आहे.

गांवांत शिरतां क्षणीं च चौफेर फरशी केलेला व बत्तीस बिघे जमीन व्यापणारा मोठा थोरला तलाव आहे. तलावाच्या मध्यभागीं श्रीकृष्णाचें एक देवालय आहे. होडीनें जातां येतें.

(७२) अरणी—

तंजावराहून परत येतांना अरणीवरून येतां येतें. आनंदतनय या अरणीचे. अरणीस गेलों; पण आनंदतनयाचें कोणास नांव हि ठाऊक नाहीं, असें आढळून आलें.

अरणी पासून कोस दीड कोस **सत्यविजयनगर**—म्हणून एक टुमदार लहानसें गांव आहे. शहाजी महाराजांना धरून देण्याची विजापूरदरबारची कामगिरी बजावणारे वेदो भास्कर यांना अरणी गांव जहागीर असून वेदो भास्करांचे वंशज सत्यविजय नगरास राहतात. तेथें जहागीरदारसाहेबांचा सुंदर वाडा आहे. आम्ही गेलों ते उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळें जाहागीरदारसाहेब थंड प्रदेशांत गेले होते; त्यांचे चिटणीस रा. लक्ष्मणराव भेटले. जहागीरदार साहेबांकडे असलेल्या कागदपत्रांचे भाषांतरासह छापील पुस्तक च आहे असें ते म्हणाले. रा. लक्ष्मणराव यानी त्या पुस्तकाची एक प्रत देण्याचे कृपा करून कबूल केलें आहे.

(७३) कारंजें—

श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांनी लुटल्याबद्दल मराठ्यांच्या इतिहासांत प्रसिद्ध असलेलें हें श्रीमंत शहर वऱ्हाडांत मूर्तिजापुरापासून दहा कोस आहे. श्रीसमर्थशिष्य बालकराम यांचा येथें मठ आहे. मठाची परंपराः—

श्रीरामदास
|
बालकराम
यांची समाधी मात्र अकोल्यापाशीं
बार्शीटाकळीस आहे
|
गेकडाराम
यांची समाधी येथें च आहे
पु. तिथि चैत्र व. १३
|
बापुस्वामी
|
सखाराम
|

लक्ष्मण

मारुती (विद्यमान)
वृद्ध, सत्त्वस्थ, जुन्या तऱ्हेचे गृहस्थ

१ — रामभाऊ — गणपति

१
सखाराम
सीताराम

रोकडाराम किंवा बालकराम यांच्या वेळचीं कागदपत्रें मठांत नाहींत. ग्रन्थसंग्रह मठांत होता तो मिळाला. त्यांत रोकडाराम व बालकराम यांची कांही कविता आहे.

बिंदुतीर्थाचे कांठी रोकडारामस्थापित मारुति आहे. श्रीसमर्थस्थापित मारुतीप्रमाणें च ध्यान आहे.

याशिवाय दुसरा एक श्रीसंप्रदायाचा मठ येथें आहे, पण त्यांतलि विद्यमान पुरुष परगांवीं गेल्यामुळें भेट झाली नाहीं. पुन्हा केव्हां तरी गेलें पाहिजे.

येथें आणखी एक तिसरा मठ आहे. तो श्रीसमर्थ संप्रदायाचा नाहीं. त्याची स्थापना सदाराम महाराज होऊन गेले त्यांनी केलेली आहे. शक १६८८ ज्येष्ठ शु. १३ स सदाराम समाधीस्थ झाले. सदारामांचे शिष्य दीनानाथ हे आपल्या वयाच्या ९३ व्या वर्षी शके १७४० च्या कार्तिक व ९ स समाधिस्थ झाले. दीनानाथांची कविता या मठांत आहे. ती बहुतेक अप्रकाशित आहे.

गांवाला गांवकुंस असून तीन दिशांच्या तीन दरवाज्यांवर शक १६२१ च्या सुमाराचे शिलालेख आहेत त्यांत आवरंगजेब आलमगीरचा उल्लेख आहे.

ऐतिहासिक दृष्टीनें कारंज्यास संशोधन करण्यास पुष्कळ जागा आहे.

शं. श्री. देव

१३ गेल्या वर्षाच्या संशोधनार्थ प्रवासाची हकीकत

शक १८३५

गेल्या संमेलनांत आर्यवंशावर म्हणजे ब्राह्मणादींच्या गोत्रांवर मी एक निबंध वाचलेला आपल्याला आठवत असेल. त्या निबंधांत चित्पावनांची जुनी

आडनांवें ऋषिनामांपासून निघालेलीं आहेत असें दाखविलें आहे. म्हणजे चित्पावनांत ज्या पुरातन कालीं पुरुषांचीं नांवें ऋषिनामें होतीं त्या कालीं हीं जुनीं साठ आडनांवें प्रचलित झालीं, असें होतें. हा काल म्हणजे शातवाहनशकाच्या पूर्वी हजार बाराशें वर्षांचा असावा. तेव्हां पासून पतंजलीच्या कालापर्यंत म्हणजे शकपूर्व दुसऱ्या शतकापर्यंत ब्राह्मणांत ऋषिनामें ठेवण्याचा प्रघात होता, असें माझें मत आहे. तदनंतर, राम, कृष्ण, वासुदेव, वगैरे अलीकडील पुरुषनामें प्रचारांत आलीं. तीं सध्यां हि चालूं आहेत. चित्पावन या शब्दाच्या व्युत्पत्तीवर व चित्पावनस्थ ह्या शब्दाच्या व्युत्पत्तीवर हि मीं दोनतीन निबंध व टांचणें लिहिलीं आहेत. रा. सा. साने यांनीं हि या च विषयावर एक निबंध लिहिलेला आपणास माहीत आहे. हे सर्व निबंध साक्षात् चित्पावनांच्या देशांत ऊर्फ भूमींत प्रवास करून माहिती मिळविल्याशिवाय देशावर बसून लिहिलेले होते. तेव्हां, सहज च ओघास असें आलें कीं, साक्षात् चित्पावनभूमींत जाऊन, चित्पावनांची वस्ती त्या भूमींत किती जुनी आहे, मूळ वस्ती पहिल्या प्रथम कोठें व केव्हा झाली, तेथून पुढें चित्पावन कोठें व कसे पसरले, व मूळ वैदिक आचार व प्रघात सुटून इतर धंदे चित्पावन केव्हां पासून करूं लागले, वगैरे अनेक मनोरंजक व बोधकर प्रश्नांचा अभ्यास व शोध करावा. ह्या मनोदयानुरूप शक १८३५ च्या पवसाळ्यानंतर, परशुराम क्षेत्रांत ऊर्फ चित्पावनभूमींत प्रवास करण्याचा मी निश्चय केला. परंतु १८३५ चा पावसाळा संपण्यापूर्वी गणेश चतुर्थीस श्रीगजाननाच्या उत्सवा करितां वऱ्हाडांत जाण्याचा प्रसंग येऊन भाद्रपदांत च प्रवास दक्षिणेच्या ऐवजी उत्तरेकडे सुरू झाला. वऱ्हाडांत मूर्तिजापूर व कारंजे या गांवीं कांहीं फार चांगली प्राप्ति झाली. मूर्तिजापुरास जोशी आहेत त्यांची वस्ती त्या प्रांतांत आज आठशें वर्षें आहे, असें तेथील जोश्यांचें दफ्तर व कांहीं पोथ्या पहातां दिसून आलें. शिवाय जोश्यांचा एक वंशवृक्ष मिळाला, त्यांत एकंदर पिढ्या ३२ दिल्या आहेत. दर पिढीस २२ वर्षें धरलीं, तर एकंदर वंशवृक्ष ७२६ वर्षांचा होतो. म्हणजे कमींत कमी हा वंश मूर्तिजापूर प्रांतांत ७२६ वर्षें म्हणजे सातवाहनाच्या आकराव्या शतकापासून आहे. इतकी जुनी वंशावळ अद्यापपर्यंत दक्षिणेंत मला आढळली नाही. ज्ञानेश्वराच्या आईच्या घराण्याची वंशावळ इतकी जुनी आपेगांवास सांपडावी. सदा वंशावळ आपल्या नजरेखालून जावी म्हणून आज मंडळांत आणिली आहे. मूळ हे जोशी हातगांवचे. ह्यांचे आडनांव पाठक.

कारंजास दोन तीन स्थलीं मराठी व संस्कृत ग्रंथ मिळाले. ते मीं आपल्या संग्रहांत ठेविले आहेत. त्यांत आजपर्यंत आपल्याला माहीत नव्हते असे कांहीं वऱ्हाडांतील

मराठी कवि आहेत. त्यांची माहिती आपल्या पाक्षिक सभांतून प्रसंगोपात्त येईल. कारंजास कांहीं रामदासी मठ आहेत, त्यांचा परामर्श रा. रा. देव यांनीं घेतला आहे. रामदासी कामाची मिरासदारी देव यांनीं कमाविली असल्यामुळें, द्वेसपासच्या भीतीनें तें काम सोडून कारंजें येथील बाकीच्या बिनवारशी कुरणांत आपल्या मंडळाचे सभासद रा. घुडे यांजबरोबर मी बरा च हिंडलों. कारंजें ही पूर्वीची मोठी उतारपेठ आहे व येथें कोट्यधीश सावकार होते. या शहराला शिवाजी महाराजांनीं एकदां भेट दिली होती व येथून त्यांना चांगली प्राप्ति झाली होती. येथें कांहीं संस्कृत व मराठी ग्रंथ असे सांपडले की त्यांची मूलोत्पत्ति नागपूरप्रांतांतील छिंदवाडा व बैतूल वगैरे स्थलीं झाली असलेली दिसली सबब नागपूरास गेलों. तेथें एक दोन ठिकाणीं नागपूर प्रांतांतील मराठी कवींचे कांहीं ग्रंथ मिळाले. तेथून छिंदवाडा व बैतूल येथें मुकुंदराजांच्या ग्रंथांचा शोध करावयास जावयाचें मनांत होतें. परंतु, हा मुकुंदराजी शोध रा. चांदोरकर यांनी पूर्वी च आंगीकारिला असल्यामुळें त्यांच्या शोधाच्या कक्षेंत अतिक्रम केला नाही. नागपूर व वऱ्हाड या प्रांतांत तत्प्रांतीय सारस्वत झालेलें आहे व इतिहासाचीं साधनें हि विपुल आहेत. माझी अशी खात्री आहे कीं, त्या दोन प्रांतांना इतिहास संशोधकांचें एक स्वतंत्र मंडळ हवें आहे. त्याशिवाय तेथील साधनसामग्रीचा परामर्श घ्यावा तसा घेतां यावयाला फार कष्ट पडतील.

वऱ्हाड व नागपूर इकडे मी सुमारें दोन महिने होतों. तेथून परत येऊन खेडजुन्नरकडे जावयास निघालों. खेड येथील देशपांडे यांच्या येथें ज्ञानेश्वरकालीन अस्सल जुन्या पाठाच्या ज्ञानेश्वरीची कांहीं पानें सांपडली. तीं सभासदांच्या अवलोकनार्थ ठेविलीं आहेत. ज्ञानेश्वरांचें मुख्य स्थान आळंदी; तेव्हां आळंदीच्या पंचक्रोशीत किंवा आसपास अस्सल जुन्या ज्ञानेश्वरीच्या पोथ्या सांपडल्या पाहिजेत; असा अंदाज आज कित्येक वर्षें मी करून चुकलों होतों. त्याचा अनुभव ह्या खेडाच्या देशपांड्यांच्या येथें आला. देशपांड्यांचे दप्तर पाहिल्यावर इतर हि आसपासचीं खेडी व मोठी गांवें धुंडाळावी असें मनांत होतें. परंतु एथें असा आढळ झाला कीं ह्या प्रांतांतील शोधाचा जिम्मा रा. पटवर्धन यांनीं घेतला आहे, व ह्या कामीं त्यांना श्रीमंत मुजुमदार यांचे साहाय्य आहे. सबब, येथील प्रवास इतका च आटोपून, परशुरामक्षेत्रांत जाण्यास मी कार्तिकांत सिद्ध झालों.

२ चित्पावनांची मूळपीठिका शोधणें हा कोंकणांत प्रवास करण्याचा मुख्य हेतु होता. कोंकणाचे मीं सोईकरितां दोन भाग केले. चिपळूणापासून गोंव्यापर्यंतचा एक भाग व चिपळुणापासून अष्टागरापर्यंतचा दुसरा भाग. पैकीं गोंवे प्रांतापासून प्रारंभ केला. गोंव्यांत असें आढळून आलें कीं तेथें दोन संशोधक अगोदर च चांगलें काम करीत आहेत. त्या प्रांतात चित्पावनांचीं मूळें सांपडण्यासारखीं

नसल्यामुळें, तेथील संशोधक रा. आपटे व मी चिपळूणापर्यंत उत्तरेस व चिपळुणापासून राजापुरापर्यंत दक्षिणेस प्रवास केला. पूर्वी गोंव्यास जातांना राजापुरापासून रत्नागिरीपर्यंत एकदां प्रवास केला च होता. पुन्हा दुसरीं गांवें पहात पहात पूर्णगडावरून व पांवसेवरून रत्नागिरीस गेलों व रत्नागिरीहून फुणगुसास पोहोंचून आरवलीवरून पुन्हा चिपळुणास आलों. चिपळुणाहून राजापुरास येतांना विशाळगडाखालील प्रभानवल्ली नामक जुनाट मोडकळीस आलेल्या शहरांत हि कांहीं मनोरंजक शोध केला. अशा रीतीनें गोंव्यापासून चिपळूणपर्यंतची कोंकणपट्टी मी तीनदां चालून गेलों. एकदां वलाटीनें गेलों, एकदां खलाटीनें गेलों व एकदां मधल्या पट्टीनें गेलों. आणि हा सारा प्रवास पायानें केला. बोचक्यांत काठी अडकवून ती खांद्यावर टाकून सुमारें दहा बारा मैलांपर्यंत दिवसाची चाल मी करीत असे. बैलगाडीचा हि दोन तीन वेळां उपयोग केला. ह्या प्रवासांत चित्पावनांच्या मूळपीठिकेच्या व मध्यकालीन स्थितीच्या इतिहाससाधनांचा शोध करतां करतां कऱ्हाडे, देशस्थ, देवरुखे, भंडारी, शेणवई, प्रभू, वगैरे इतर जातीच्या इतिहाससाधनांचे हि कांहीं कागदपत्र मिळाले. समुद्र, खाड्या, बंदरें, कोट, दऱ्या, खोरीं, पठारें, नद्या, डोंगर, पर्वत, देवळें, मशिदी, घाट्या पाहून कोंकणप्रांतांतील लोकांच्या जीवनचरित्रासंबंधानें व इतिहाससंबंधानें व वैयक्तिक आणि सामाजिक मनोरचनेसंबंधानें माझ्या माहितींत बरीं च भर पडली. कोंकणांतील ब्राह्मण, मराठे, भंडारी, वगैरे लोक मोठे चलाख, उद्योगी, शीघ्रबुद्धि, धाडसी व श्रमसाहस करणारे असलेले मला दिसले. त्यांच्यांत मध्यम व उच्च शिक्षणाचा प्रसार झाल्यास, एकंदर महाराष्ट्रांतील समाजाची प्रगती जास्त वेगानें होईल, असा माझा ग्रह झाला. ह्या लोकांत Naval Architecture चें एखादें School व उच्च शिक्षणार्थ एखादें तरी सर्वसाधनसंपन्न College स्थापिल्यास, येथून धाडसी व व सुशिक्षित नावाडी आणि कुशाग्र विद्वान निपजण्याचा संभव आहे. कोंकणांत मी जेवढ्या प्रदेशांत हिंडलों तेवढ्यावरून असा अनुभव आला कीं शिलालेख, ताम्रपत्रें, नाणीं व कागदपत्रें ह्या प्रदेशांत बहुत उपलब्ध होण्यासारखी आहेत. पुरातन देवळें हि जागोजाग दृष्टीस पडतात. ह्या प्रदेशाचा ऐतिहासिक अभ्यास करण्यास, खरें म्हटलें तर, एक स्वतंत्र इतिहासमंडळ च हवें. कोंकणांत गेल्या वर्षी मी एकंदर तीन महिने होतों. पुढील वर्षी चिपळूणापासून अष्टागरापर्यंतच्या प्रदेशांत हिंडावयाचा संकल्प आहे.

३ कोंकणांतून आल्यावर नेवाश्यास कांहीं दिवस घालविले. तेथें जोश्यांच्या येथें शक ९६१ तील श्रीपतीचा संस्कृत–मराठी ग्रंथ सांपडला. त्याच्या संबंधानें विशेष माहिती उद्या पर्वी मी आपल्यापुढें ठेवणार आहे.

वि. का. राजवाडे

१४ रणदुल्लाखानाचा घुमट

सातारा जिल्ह्यातील रहिमतपुर या गांवीं ओढ्याचे नजीक एक मशीद असून, जवळ च रणदुल्लाखानाचा घुमट आहे. मशीद व घुमट यांचे दरम्यान कारंजें असून आसपास मुसुलमानांची वस्ती आहे. रहिमतपूर गांवचा रणदुल्लाखानाशी निकट संबंध आहे; किंबहुना रणदुल्लाखान याने च पूर्वींच्या कुमठे गांवाचे ठिकाणीं रहिमतपूरची वसाहत केलेली आहे. पेशवे सरकार यांचे राजवटींत रहिमतपुर येथें पटवर्धनांचे ठाणें होतें. रणदुल्लाखानाच्या घुमटामध्यें त्याची कबर असून, घुमटाचे चार हि बाजूंस प्रत्येकी एकेक असे चार फारसी शिलालेख आहेत. सातारा ग्याझिटिअर पृ. ५४८ ।५४९ अगर भारतवर्षातील पंतप्रतिनिधीची बखर पृ. १९ ह्यावर उल्लेखिल्याप्रमाणे वरील शिलालेख मशिदीवर नाहीत.

२ हे चारी लेख मुसुलमानी पद्धतीनें उठावदार अक्षरांत कोरलेले असून प्रत्येक लेखाच्या पांच पाच ओळी आहेत. प्रत्येक लेख ही एक स्वतंत्र कविता आहे असे म्हटल्यास प्रत्यवाय नाही. सदर लेख 'मतकारिब' नांवाच्या वृत्तामध्यें बसविलेला असून, सदरहू वृत्त १७ अगर १८ मात्रांचे आहे. फारसी आर्ष काव्यें ह्या च वृत्तात रचण्यात आलेलीं असून. सदर वृत्ताचें समर्थांच्या 'मनाच्या श्लोकां'शीं बरें च साम्य आहे

३ सदरहू शिलालेख खालीलप्रमाणेः—

दरवाजये शुमाल (उत्तर)

१ जहे रोजये पाके रनदूलाखान
ज अफजल बिना दर जहां शुद मसल

२ हवायश चु बागे इरम दिलकुशा
फजायश फराख चु कसरे अमल

३ पये नक्षे तारीखे आं हुक्म शुद
ब आशिक अजां किब्लगाह दवल

४ दर अन्देशा बूदम के हातिफ जगैब
बगुफ्ता बगु रोजये बेबेदल

५ चु आ मेहरे अनवर दरां शुद मुकीम
शुदः रोजा बैतुःशरफ चु हमल

अर्थ

रणदुल्लाखानाचा हा विशुद्ध घुमट किती तरी सुंदर आहे ! पृथ्वींतील उत्तमोत्तम इमारतींत ह्या इमारतीची गणना होते. ह्या घुमटाची हवा 'इरम' नांवाच्या स्वर्गीय बागेंतील हवेसारखी अन्तःकरण विकसित करणारी आहे. ह्याचे सभोंवताલચા विस्तार आशारूपी वाड्याप्रमाणें अत्यंत विस्तृत असा आहे. हा घुमट (पूर्ण झाल्याबद्दलची) तारीख खोदण्याविषयीं आशक याला दरबारांतून हुकूम झाला, तेव्हां तारीख कोणती लिहावी ह्या विचारांत आशक मग्न असतां, 'रोझये बिबदेल' (हा रोजा अद्वितीय आहे) असें लिहिण्याविषयीं देवदूताने येऊन त्यास सांगितलें. त्या प्रखर सूर्यानें, पक्षीं रणदुल्लाखानानें येथे येऊन कायमची वस्ती केली तेव्हा हें ठिकाण मेषराशीप्रमाणे सुरम्य मंदीर बनलें.

दरवाजये मश्रिक (पूर्व)

१ चु रनदुलाखां कूफ्त तब्ले अज्यल
रवांशुद बजन्नत जफैजे अमल

२ यकी आं के रुस्तुम जमा कूच कर्द *
शनीदम ज मिगं शुद्-ई-नुक्ताह्ल

३ दिगर खतमें जूदस्त तारीखे ऊ
बकौले सुखन गुस्तरे बिबदल

४ सियुम आंके आराम बाहक गिरिफ्त
निदादाद हातिफ बगुशे जुमल

५ जहारुम इरम जाये रुस्तुम जमां
चेजांबा रकमजद खिरद बर महल.

अर्थ

रणदुल्लाखानानें मृत्यूंचे ढोलगे वाजविलें तेव्हां त्याचा आत्मा ईश्वराच्या पूर्वप्रसादामुळें स्वर्गास गेला. 'आपल्या वेळच्या रुस्तुमनें कूच केलें' (रुस्तुम जमां कूच कर्द) हें वाक्य (रणदुलाखानाचा गुरु) मिरा-याजपासून ऐकिले तेव्हां (रणदुलाखान केव्हां मेला ती तारीख समजण्याची) अडचण दूर झाली. दुसरी तारीख 'खतमे जुद' (दानशूरतेचा अंत) ही होय. हें वाक्य एका

---

* कवितेंत रणदुल्लाखानाचे मृत्यूचा हिजरी सन 'अबजद' पद्धतीने दिला आहे. दुसऱ्या ओळीतील- 'रुस्तुम जमा कूच कर्द' ह्यांतून निघणाऱ्या १०५१ सना शिवाय बाकी सर्व ओळीतून हिजरी सन १०५३ निघत आहे. दुसऱ्या ओळींत खोदण्याची चुक झालेली आहे. मृत्यूचा सन १०५३ च होय.

उत्तम कवीनें गायिलें आहे. तिसरी तारीख ' आराम याफ़क गिरिफ्त ' (ईश्वरासन्निध विश्रांति घेतली) ही होय. ही वाणी देवदूतानें सर्वांच्या कानांत सांगितली. चवथी तारीख ' इरम जाये रुस्तुम जमां ' (आपल्या वेळच्या रुस्तुमची पक्षीं रणदुल्लाखानाची ' इरम ' हें विश्रांतिस्थान झालें) ही होय. कवीनें आपल्या बुद्धिचातुर्यानें हा किती तरी बहारीचा शेग मारिला आहे बरें !

दरवाजये जनूब (दक्षिण)

१ हरांकस के अफजल शुद् अन्दर अजल
बुवद् अफजले अस्त्र दर हर अमल

२ वजूदे अजीजश गहे इन्तेखाब
ज नजमे कमालस्त बैतुल गजल

३ हमा सुलहां जगष बराये खुदास्त
बुवद् जां मुजफ्फर बहर्यक जदल

४ गरज रा न बाशद् बसूयश गुजर
के खद् चष्म बेहतर बुवद् बि सघल

५ मुसखर शवद् मुल्के हरदो सरा
मरांरा के बाशद् ज हिमत कुतल*

अर्थ

सर्व मानवजातीची भवितव्यता ज्या दिवशीं निश्चित झाली त्या दिवशीं जो मनुष्य सर्वोत्कृष्ट ठरला, तो कोणत्या हि वेळीं व कोणत्या हि कामीं सर्वोत्कृष्ट च असतो. ही बहुमोल व्यक्ति निवडणुकीचे वेळीं सर्वांगपूर्ण अशा काव्यांतील उत्कृष्ट ओळीप्रमाणें ठरते त्याचे सर्व तह व लढाया ह्या केवळ ईश्वराकरितां असल्यामुळें, प्रत्येक लढाईंत तो यशस्वी होतो त्याचे ठिकाणीं स्वार्थबुद्धीला कशी ती रीघ च नसते; कारण डोळा हा रोगविरहित असणें चांगलें. धैर्यरूपी वारूवर जो आरूढ झाला तो इहलोक व परलोक ही जिंकणार च.

दरवाजये मग्रिब (पश्चिम)

१ ज सुलतां मुहंमद् शहे जमसरीर
अजां याफ्त अफजल खिनाबे अजल

२ के बस कल अहाये तिलिस्मात अमास
य कर्नाटकष गष्ता मफ्तूहोहल

---

* हें काव्य सार्वत्रिक असून, रणदुल्लाखानाकडे हि घेतां येतें.

३ ज दर्या ब दर्या सिपह् गान्दः अस्त
किराबूद ई दस्तगाहो अमल

४ बजूदो बलुत्फो बकुवत वहिल्म
शुदः काफ़ुता काफे आलम मसल

५ रबूदः गहे इस्तेहां ताजेजाह
जमेहरो जसुबहो जबीरो जबल

अर्थ

ज्यांचे पाये जादूनें भारलेले होते असे कर्नाटकांतील पुष्कळ किल्ले ह्यानें हस्तगत करून घेतल्याकारणानें ह्यास ज्याचें सिंहासन जमशीद्च्या सिंहासनासारखें होतें अशा सुलतान महंम्मदाकडून 'अफजल' असा दिव्य किताब मिळाला. ह्यानें आपल्या फौजा समुद्राच्या ह्या टोंकापासून तो तहत त्या टोंकापर्यंत नेल्या. एवढें सामर्थ्य व कर्तबगारी कोणाचे हातून घडली आहे बरें ! दानशूरता, दयालुत्व, सामर्थ्य व उदारमनस्कता ह्यांहीं तो जगविख्यात झाला; पक्षीं त्याच्या ह्या गुणांमुळें त्याचे नांव सर्वतोमुखी झालें. ह्या चारी गुणांच्या परीक्षेमध्यें ह्यानें अनुक्रमें सूर्य, प्रातःकाळ, हत्ती व पर्वत यांपासून यशाचा चांद हिरावून घेतला.

४ हे ते शिलालेख होत. ह्यांची भाषांतरें पूर्वी सातारा ग्याझिटिअरमध्यें इंग्रजींत प्रसिद्ध झाली असतां, व ग्याझिटिअरमधील इंग्रजी भाषांतराचें मराठी अवतरण भारतवर्षकारांनीं केलें असतां ह्या लेखाचें प्रयोजन काय, व एवढा व्याप कशाकरितां असे प्रश्न साहजीक च संभवतात. ह्या बाबतींत मला इतकें च सांगावयाचें आहे कीं, ग्याझिटिअरी भाषांतर येथून तेथून चुकांनीं व्याप्त आहे, एवढें च नव्हे तर पुष्कळ ठिकाणीं विपर्यास आहे. मूळ शिलालेख व त्याचें शब्दशः ऐतिहासिक पद्धतीनें केलेलें भाषांतर यांचें महत्व किती आहे, हें तज्ज्ञांस सांगणें नलगे. अर्थहीन, नीरस व चुकांनीं व्याप्त असें भाषांतर संशोधकांस बुचकळ्यांत पाडतें असा अनुभव आहे. जिज्ञासूंनीं ग्याझिटिअरी भाषांतर व वर दिलेलें खरें भाषांतर ताडून पहावें.

५ रणदुल्लाखान हा कधीं वारला ह्याबद्दल लिहितांना ग्याझिटिअरकारांनी तो हिजरी सन १०५३ अगर १०५९ ह्या सालीं वारला असें अनुमान केलें आहे ! एके ठिकाणीं तो १०५९ मध्यें च वारला असें हि लिहिलें आहे. एके ठिकाणी १०५३ सन दिलेला व दुसरे ठिकाणी तो १०५९ दिलेला हें पाहून भारतवर्षकार बुचकळ्यांत पडले आहेत ! ! व रा. राजवाडे ग्याझिटिअरकार व राजवाड्यांचे संग्रही असलेला ता. १९ जून १६४९ मधील अफजलखानाचा एक महजर ह्यांचे आधारें खानमजकूर इ. स. १६४९ च्या जानेवारी ते जून यांचे दरम्यान वारला

असें म्हणण्यास सिद्ध झाले आहेत (म. इ. सा. खंड ४, प्रस्तावना पृ. १४।१५ पहा) परंतु वर दिलेल्या शिलालेखावरून रणदुल्लाखान हिजरी सन १०५३ मध्यें (ता. १२ मार्च इ. स. १६४३ ते २८ फेब्रुवारी इ. स. १६४४ यांचे दरम्यान) वारला हें निश्चित आहे.

१०५९ हा सन घुमट पूर्ण झाल्याबद्दलचा होय. सदरहू शिलालेख रहिमतपूर येथे गेलों असतांना उतरून दिल्याबद्दल शेख महंमद अमिनोद्दिन रायबागकर मुनशी यांचा, व भाषांतर करण्याचे कामी मदत केल्याबद्दल पुणें येथील फीमेल हायस्कूलमधील शिक्षक रा. गोखले व डेक्कन कॉलेजमधील प्रो. शेख अब्दुल कादर सरफराज यांचा मी फार आभारी आहे.

पांडुरंग नरसिंह पटवर्धन

१५ कात्रजचा तलाव

भारत-इतिहास-संशोधनाच्या ज्या चार मुख्य शाखा अध्यक्षसाहेबांनी सांगितल्या त्याशिवाय आणखी एक महत्वाची शाखा आहे असें मला वाटतें. ती शाखा शिल्पशास्त्र होय. या शाखेसंबंधी संशोधनाचे काम खुद्द आमचे सरकार व करीत आहे; व सरकारचे उदार आश्रयाखालीं या विषयास वाहिलेलीं कांहीं मासिकें हि पण निघत आहेत. कात्रजचा तलाव हा सरकारांनी पुणें शहराच्या म्युनिसिपालिटीच्या हवालीं केलेला आहे. त्याबद्दलची पुष्कळशी माहिती सरकारी दप्तरी असली पाहिजे. ती माहिती मला उपलब्ध झाली नाहीं, तथापि या रचना करणाराचे जें चातुर्य दिसतें त्याविषयीं आपणास कांहीं थोडें सांगणार आहें.

गांवच्या नकाशावरून उतरून घेऊन तलावाचा नकाशा तयार करून बरोबर आणला आहे, त्यावरून मला जें भाषेनें व्यक्त करतां येणार नाहीं तें सर्व समजण्यास उपयोगी पडेल.

या तलावासंबंधानें शिल्पज्ञास उपयोगी पडणारी पण जी इतर मंडळींना रुक्ष वाटेल अशी माहिती सांगण्याचा मी प्रयत्न करीत नाहीं. फक्त ज्यांचें महत्व सर्वांस समजण्यासारखें आहे, त्या चार पांच गोष्टी आपणांपुढें मांडतो. या गोष्टींचे महत्व मला अतिशय वाटतें. कारण ह्यांपैकीं बऱ्या च गोष्टी हल्लीं शहराचे पाण्याकरितां जी तळीं बांधण्यांत येतात त्यांत दिसत नाहींत, त्या पूर्व काळीं इतक्या पूर्णत्वानें असणें यांत फार महत्व आहे.

कोणच्या हि शहरास जो पाण्याचा पुरवठा करावयाचा तो शुद्ध असावा, त्यांत घाण वाहून येतां उपयोगी नाही. लहान तलावांत ओढ्याचें शुद्ध पाणी कसें यावें हा प्रश्न कठीण तर खरा च. कात्रजच्या तलावाशिवाय हा प्रश्न सोडविलेला कोठें हि माझे पहाण्यांत नाही. जुन्नर व अहमदनगर येथें ही तजवीज दिसली नव्हती. विजापुरांत कदाचित ही तजवीज दृष्टीस पडेल असें वाटून तेथील जुने तीन तलाव फिरून पाहिले, परंतु ही तजवीज कोठें हि दृष्टीस पडली नाहीं. पब्लिकवर्क्सखात्यांतील ओळखीची मंडळी भेटली, त्यांपैकी कोणी हि ही तजवीज पाहिल्याचे सांगत नाहीत. तेव्हां ही अतिमहत्वाची तजवीज हा कात्रजचा तलाव बांधणाऱ्या शिल्पज्ञांची च आहे की दुसरे कोठें अशा प्रकारची तजवीज आहे हें समजणें ऐतिहासिक दृष्टीनें फार महत्वाचें आहे.

कार्तिकमार्गशीर्षापासून सहा सात महिने जी घाण वावरत असते ती व तशी च उन्हाळलेली माती वळीवाचे पावसानें धुवून नद्यानाल्यांतून वाहून येते हें सर्वांस माहीत आहे. त्या च प्रमाणें हें हि महशूर आहे की, हें प्रथमचे पाणी प्याल्यानें गांवांतून महामारीसारखे रोग उद्भवतात. तेव्हां हें पाणी तळ्यांत येऊं देऊं नये ही अत्यंत महत्वाची बाब ह्या एका च तळ्यांत साधली आहे. ह्मणून मला याबद्दल फार च कौतुक वाटतें. या तलावांत वर सांगितल्या प्रकारची घाण येऊन त्यापासून तलावांतील पाणी खराब होऊं नये म्हणून जी योजना केली आहे ती अशीः—तलावांत ज्या ठिकाणीं ओढा येऊन मिळतो तथून बरेच वर ओढ्याला एक दगडचुन्याचा बांध घालुन त्याचें पाणी अडविलें आहे व त्यांत एक बारे ठेविलें आहे. आणि ओढ्याला नवीन तास काढून दिला आहे. याप्रमाणें तलावांत येणाऱ्या सर्व ओढ्यांची व्यवस्था करून अखेर ताम तलावाचे खालील बाजूस मूळ नाल्यास आणून मिळविला आहे. या कामास खर्च बरा च झाला आहे खरा, परंतु उपयोगाच्या मानानें खर्च कांहीं च नव्हे. पाणी तलावांत येऊं देणें न देणे हें सर्वस्वी आतां तलावाच्या अधिकाऱ्यांचे खुषीवर आहे; आगोट लागेपर्यंत गढूळ व घाण पाणी आंत घेतलें नाहीं म्हणजे तलावाच्या पाण्यांत रोगबीजें येणार नाहींत व गाळ हि फारसा सांचणार नाहीं हें उघड आहे, याकरितां तजविजीचे महत्वाचा आपण विचार करावा.

दुसरी महत्वाची तजवीज याहून हि महत्वाची आहे, पण ती बहुतेक सर्व जुन्या शहरांस पाणी पुरविण्याची जी कामें केलेली आहेत त्या सर्वांत दिसून येते. मुसुलमानी अमदानीत याचा उपयोग सार्वत्रिक दिसतो. सांचलेले पाण्याचा उपयोग शक्य तितका पिण्याकडे करावयाचा नाहीं. पिण्याच्या कामीं झऱ्याचे पाण्याचा उपयोग करावयाचा. कात्रज तलावाचें पाणी प्रत्यक्ष घेण्याची तजवीज

आहे तरी तें तसें घेण्याची अवश्यकता हि वर्षांतून बहुतेक महिना दोन महिन्यांहून अधिक लागत नाहीं. तळ्याचे खालील बाजूस लागणारे सर्व झरे एकत्र करून बांधून काढलेल्या कात्रजच्या नळांतून आणिले आहेत. आजूबाजूस सांपडलेले सर्व झरे यांत सामील केले आहेत.

हा कात्रजचा नळ उत्तम प्रकारें बांधलेला असून आंतून मनुष्यास येण्या-जाण्याइतका मोठा आहे हें महशूर आहे ! या झऱ्याच्या पाण्याच्या उपयोगा-पासून असा एक मोठा उपयोग होतो कीं, "Settling tanks" गाळ सांठण्याची टांकी, "Filter beds" पाणी गाळून घेण्याची टांकी व "Clear water tanks" स्वच्छ पाण्याची टांकी यांची जरूर च लागत नाहीं. तेव्हां ही दुसरी गोष्ट महत्वाची आहे.

आतां तिसऱ्या गोष्टीकडे वळतों. वर सांगितलेल्या दोन्ही गोष्टींहून ही तिसरी गोष्ट अधिक महत्वाची आहे. जमिनींत झरे असतात ही गोष्ट फार कालापासून माहीत झालेली आहे. विहिरीचे कल्पनेचा उगम हि या च गोष्टीवर अवलंबून आहे. जमिनींत झरे कोठें लागतील व किती मोठे लागतील याची माहिती सांगणारे पानाडे म्हणून असतात; व अलीकडे या गोष्टी दाखविणारीं यंत्रें-हि उपलब्ध होऊं लागलीं आहेत. ही गोष्ट जमिनींत असलेल्या झऱ्यांची झाली. हे झरे पावसाच्या मानानें लहानमोठे होतात हें हि अलीकडे अधिक दिसूं लागलें आहे. ज्या विहिरीस चार मोटा चालत तीस आज एका मोटेस हि पाणी पुरविणें कठीण झालें आहे, ही गोष्ट आमच्या जुन्या लोकांच्या लक्षांत पूर्णपणें आली. आणि त्यांनीं झरे वाढवितां येतील हें लक्षांत घेतलें व झरे वाढविण्याचे प्रयोग हि जागजागीं केले. या प्रयोगांपैकीं कात्रज हें फार महत्वाचें ठिकाण आहे. ज्या-प्रमाणें पाऊस जास्त पडला म्हणजे झरे वाढतात त्याप्रमाणें पावसाचें पाणी कांहीं वेळपर्यंत थबकून धरलें म्हणजे पाणी जमिनींत जास्त मुरतें व झरे वाढ-तात, ह्या गोष्टी कात्रज तलाव बांधणाराच्या पूर्ण लक्षांत आलेल्या होत्या असें स्पष्ट दिसतें. कात्रजच्या खोऱ्यांत कोठें हि जा म्हणजे आपल्या लक्षांत येईल की त्या ठिकाणीं जितक्या ताली बांधलेल्या आहेत तितक्या फार च थोड्या ठिकाणीं बांधलेल्या आहेत. नाल्याच्या दुतर्फा सुक्या दगडाच्या भिंती बांधून जितकें पाणी आंत मुरणें शक्य आहे तितकें मुरवण्याची तजवीज केलेली आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे की, तळ्याच्या पाण्याच्या सात आठ पटींहून अधिक पाणी पुणें शहरांत येतें. पैशाचा हिशोब पाहिला म्हणजे निदान दर वर्षास २०।२२ हजार रुपये किंमतीचे पाणी पुणें शहरास मिळतें ! यांपैकीं बरा च भाग तालीमुळें आहे. ही कल्पना सरकारांनीं मनावर घेतल्यास जमीन पुष्कळ सुधा-रेल. या तालीच्या योगानें जमिनीचें फूल धुपून जात नाहीं. जमीन फार सुपीक

होते व जमिनींतील झरे वाढतात. इतक्या फलद्रूपतेची गोष्ट अमलांत आणून पुण्यास उत्तम पाणी पाजविण्याबद्दल आम्ही खचित पेशवेसरकारचे ऋणी आहोंत.

चवथी गोष्ट म्हणजे तळीं धुण्याची तजवीज. ज्याप्रमाणें आपण घरांतील हौद रिकामा होतां च पुन्हां भरण्यापूर्वी धुतों त्याप्रमाणें हें तळें पुन्हां भरण्याचे अगोदर धुण्याची तजवीज केलेली आहे. तळ्याच्या तळास दोन मोठीं दारें ठेवलीं असून तीं काढतां घालतां येतात. आगोटीचे पूर्वी ही दारें उघडून शेवाळ व दुसरें वाईट गवत वगैरे काढून टाकून तळें स्वच्छ करण्याच्या कामी यांचा फार उपयोग आहे. एकूण तळ्यांत दूषित व गढूळ पाणी घ्यावयाचें नाहीं; नळांत पाणी झऱ्याचें च घ्यावयाचे; झरे वाढवावयाचे व दर वर्षी आगोटीपूर्वी एक वेळ तळें उत्तम प्रकारें धुवावयाचें. इतक्या गोष्टी केल्यावर पुण्यास मुबलक पाणी पेशवाईंत मिळत असावें यांत संशय नाही !

आता या तळ्यांसंबंधानें शेवटची गोष्ट म्हणजे पर्वतीचें तळें. हे तळें म्हणजे कात्रजच्या तळ्याचा एक भाग आहे. अंबील ओढ्यास दोन ठिकाणी बांध घालून हें तळें तयार केलें आहे. अंबील ओढा बाजूस काढून दिला आहे. या तलावापासून शहरास अनेक उपयोग होतात. तळावाखालच्या बाजूच्या बागांतील विहिरीस पाणी व गांवांतील विहिरीस पाणी, शहरास थंडावा, शोभा, जलविहाराची सोय व कात्रजचें पाणी कमी च होईल तेव्हां अडीअडचणीत पाण्याची सोय, या सर्व गोष्टी यांत होत्या. पावसाळी कात्रज तलावाचें पाणी फार फुकट जातें तें यांत सांठवून ठेवीत. यामुळें या तलावांतील पाणी हि स्वच्छ च असे व गलिच्छ बिलकुल नसे व हा हि तलाव धुण्याची सोय असल्यामुळें नेहमी स्वच्छ च राहत असावा

तज्ज्ञांनी या तलावाबद्दल माहिती मिळविल्यास त्यांस यांत आणखी अनेक चांगल्या गोष्टी दिसून येतील, व या निबंधामुळें ही व इतर जुनी कामें त्यांनी पाहिल्यास व म्युनिसिपल अधिकाऱ्यांनी या तलावाची उत्तम व्यवस्था ठेवल्यास मी आज लिहिलेल्या चार शब्दांचें चीज झालेंसें होईल.

गणेश सखाराम खरे

द्वितीय-संमेलन-वृत्त.

रामदास व रामदासी ग्रंथमालेचे प्रसिद्ध संपादक धुळ्याचे वकील रा० शंकर श्रीकृष्ण देव यांचे माघ शुा १३ शके १८३५ चें खालील पत्र आलें:—

श्रीराम धुळे

माघ शु० १३

श्री. रा. खंडेराव चिंतामण मेहेंदळे. चिटणीस भा. इ. सं. मंडळ, पुणें, यांसी से. कृ. सा. न. वि. वि. यंदा वार्षिक संमेलन होणें अत्यंत अगत्याचें आहे, असें मला वाटतें. चालूसालीं नवीन सभासद् हि पुष्कळ झाले आहेत. सर्वांनीं मिळून एके ठिकाणी जमून झालेल्या कामाचें सिंहावलोकन करून पुढील वर्षीं कोणती कामें करावयाचीं ती ठरविली पाहिजेत. यंदाच्या संमेलनांत निदान १०।१५ तरी सभासदांचे निबंध वाचले जावेत. रा. ब. साने, रा. ब. महाजनी, रा. राजवाडे, रा. चांदोरकर, प्रो. शिवरामपंत परांजपे, रा. ब. पारसनीस, रा भावे, प्रो. लिमये, रा हरिभाऊ आपटे, रा. पोतदार, श्रीमंत मुजुमदार, रा. पटवर्धन वगैरेंचे निबंध यंदाचे संमेलनांत ऐकावयास मिळावेत अशी फार इच्छा आहे. आपण सर्वांना अगत्यपूर्वक आमहार्थी आमंत्रण पत्रें पाठवावीत. आपण स्वत: हि कांहीं निबंध वाचलें पाहिजेत. सभासद वाढविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. "भारतीय इतिहास" मासिक काढावें अशी माझी सूचना आहे. बुधवार वैशाख वद्य ११ ता. २०।५।१४ रोजी संमेलनास सायंकाळीं सुरवात व्हावी. गुरुवार व शुक्रवार रोजी सकाळ संध्याकाळ संमेलन भरावें. तात्पर्य, यदा संमेलन भरविण्यांत यावें अशी माझी सूचना आहे. ती आपणांस पसंत पडून आपण त्या कार्यास लागाल, असा पूर्ण भरंसा आहे. कळावे, बहुत काय लिहिणें हे वि.

सही. शंकर श्रीकृष्ण देव

या पत्रावरून वैशाख वद्य ११ शके १८३६ पासून तीन दिवस संमेलन भरविणें सोईचें होईल असें स्थानिक व बाहेरगांवचें सभासदांचें मत पडलेवरून खालील विनंतिपत्र मंडळाच्या सभासदांस व हितचिंतकांस पाठविण्यांत आलें.

श्री

मिति वैशाख व. ८ शके १८३६

भारत-इतिहास-संशोधक-मंडळाच्या सभासदांचें द्वितीय संमेलन मिति वैशाख व. ११।१२।१३ शके १८३६ बुधवार, गुरुवार, शुक्रवार (ता. २०।२१।२२

मे) असे तीन दिवस आम्हां बळवंतांचे वाड्यांत भरणार आहे. बुधवारीं सकाळीं ७॥ वाजतां (स्टँ. टा.) कामास सुरवात होईल. त्यावेळीं आजवर झालेल्या कामाचा आढावा घेऊन मंडळाचें कार्यक्षेत्र वाढविण्यासाठी व काय उपाययोजना करावी याबद्दल सभेंत चर्चा होणार आहे.

सभेंत ऐतिहासिक संग्रहालय, ऐतिहासिक मासिक, संदर्भ-ग्रंथसंग्रह, पुराणवस्तुसंरक्षण, ऐतिहासिक-संशोधन-पद्धतीची चर्चा, ऐतिहासिक ग्रंथांची बृहत्सूची, वगैरे अनेक महत्वाच्या बाबींचा खल व्हावयाचा आहे. निरनिराळे सभासदांकडून संमेलनांत वाचण्यासाठी कांहीं निबंध व सभासदांस दाखविण्याकरितां कांहीं ऐतिहासिक वस्तु हि आल्या आहेत. तरी कार्याची उपयुक्तता व महत्व लक्ष्यांत घेऊन आपण हजर रहाल व आपल्या माहितीचा व अनुभवाचा फायदा मंडळास द्याल अशी उमेद आहे.

खं. चिं. मेहेंदळे

(चिटणीस)

निबंध

१ भारतीय-युद्धाचा काळ	रा. ब. चिं. वि. वैद्य
,,	रा. रा. त्र्यं. गु. काळे
२ चित्पावनांची मूळपीठिका, मध्य-व सद्यःस्थिति	रा. रा. वि. का. राजवाडे
३ शक ९६१ तील एक मराठी ग्रंथ	,,
४ पांडव कालीनसें दिसणारें एक वाक्य	,,
५ गेल्या वर्षांतील माझें संशोधन	,,
६ श्रीरामदास व रामदासी संशोधन	रा. रा. शं. श्री. देव
७ श्रीसमर्थांनीं स्वहस्तानें लिहिलेलें एक पत्र	,,
८ श्रीसमर्थांचा कित्ता	,,
९ माझें संशोधन वृत्त	रा. रा. गो. का. चांदोरकर
१० बाबासाहेब (बाजीराव २ रे) यांचे वेळची सरकारी दौलत	,,
११ विजयनगरचा विध्वंस	,,
१२ ईश्वररावाचा अपुरा ताम्रपट	,,
१३ शके १४००-१७०० मधील महाराष्ट्रांतील व्यवहारपद्धति	रा. रा. भा. वा. भट
१४ एक जुन्यांत जुनें छापील मराठी पुस्तक	रा. रा. शि. वि. शेवडे

१५ कागजचा तलाव — रा. रा. ग. स. खरे

१६ वासोटा किल्ल्याची हकीगत—(बापु गोखल्यांची पत्रें) — रा. रा. न. चिं. केळकर

१७ धनगरांच्या ओव्या — रा. रा. बा. दा. मुंडले

१८ शिराळकर भोंसले — ,,

१९ पंतप्रधानाख्यानम् — रा. रा. द. वा. पोतदार

२० ज्ञानेश्वरांचा जोहार — श्री. गंगाधरराव मुजुमदार

२१ एकनाथांची बालक्रीडा — ,,

२२ माहानुभाव पंथाबद्दल महाराष्ट्रीय कवींनीं केलेले उल्लेख — रा. रा. खं. चिं. मेहेंदळे

२३ ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या कांहीं आख्यायिका — ,,

२४ बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचें एक ऋणानुबंधी घराणें — रा. रा. कृ. वि. आचार्य

२५ मराठी कुणभाऊ भाषा — ,,

त्याप्रमाणें बुधवार मिति वैशाख वा। ११ शके १८३६ रोजीं सकाळी ७॥ वाजतां मंडळाचे कार्यालयांत आप्पाबळवंतांचे वाड्यांतील दिवाणखान्यांत सुरुवात संमेलनाचे थाटानें झाली संमेलनांत सभासदांस दाखविण्यासाठी मांडलेल्या ऐतिहासिक वस्तूंनी दिवाणखाना गजबजून गेला होता; तरी पण व्यवस्थित मांडणीमुळें दिवाणखाना व सर्व वस्तु विशेष खुलून दिसत होत्या. रा. देव यांनी श्रीसमर्थ चरित्रांतील प्रसंगाचे निरनिराळे फोटो मांडले होते. रा. चांदोरकर यांनी निरनिराळे जुनाट ग्रंथ मांडले होते त्यांत ज्ञानेश्वरीचा जुनाट नववा अध्याय, ज्ञानेश्वरांचें योगवासिष्ठ, सुषेणकृत आयुर्वेद महोदधि—लिपीचा एक उत्कृष्ट नमुना देणारी पोथी, विवेकसिंधूची १११० शक देणारी प्रत वगैरे ग्रंथ होते. रा. राजवाडे यांनी शिवपूर्वकालीन व शिवकालीन पत्रें, शक ९६१ तील मराठी ग्रंथ, एक तेहतीस पिढ्यांचा वंशवृक्ष, महादजी शिंद्यांचीं हस्ताक्षरें, व चित्रमय कर्णपर्व, वगैरे वस्तु मांडल्या होत्या. रा. भा. वा. भट यांनीं सहा जयपुरी चित्रें मांडलीं होतीं. त्यांचेकडे कलेच्या दृष्टीनें पाहिलें असतांना वृत्ति तल्लीन होत.

संमेलनासाठीं धुळें, अमळनेर, इसलामपुर, सोलापूर, भुसावळ, कारंजा, मिरज, कल्याण, मुंबई वगैरे ठिकठिकाणाहून खालीं लिहिलेले सभासद आणि गांवांतील व बाहेरील निमंत्रित हितचिंतक हि आले होते.

रा. वि. का. राजवाडे, रा. भा. वा. भट, रा. [illegible] न. पटवर्धन, रा. द. वा. पोतदार, रा ग. का. चांदोरकर, रा. वि. का. करमरकर (ठाणें) रा. भट (हायकोर्ट वकील), रा. त्राकोर, ग. गद्रे, रा. अं. वा बर्वे, रा. बा. दा. मुंडले, (हसं

लामपूर), रा. रा. बी. बर्वे, रा. आपटे, रा. सि. शि. दातार, (तळेगांव) रा. बा. दा. तळवलकर, रा. सि. के. दामले, रा. ब. चिं. वि. वैद्य, प्रो. चिं. गं. भानू रा. शिवरामपंत परांजपे, रा. अ. वि. फडणीस, रा. वि. का. भागवत, रा. गो. रा. गोगटे, (भुसावळ) रा. शं. श्री. देव, रा. ह. ग. गोडबोले, रा. व्यं. रु. कर्वे (बार्शी) रा. बापूराव आठल्ये, रा. वा. दा. गोवईकर सुभेदार, (सातारा) रा. फडके (हायकोर्ट वकील), रा. गोपाळराव भिडे, रा. वि. गो. विजापूरकर, रा. वासुदेव शास्त्री खरे, रा. का. रा. वडवे, रा. य. ग. फफे, रा. नाडकर्णी (इंदूर), रा. न. चिं. केळकर, रा. कोल्हटकर, रा. रु. प्र. खाडीलकर, डॉ. ह. श्री. देव, रा. ग. द. पराडकर, रा. शं. ना. जोशी, रा. विष्णुबुवा अक्कलकोटकर, रा. का. रु. लेले, रा. नी. गो. लेले, रा. य. र. रानडे, रा. ह. र. भागवत, रा. ल. र. पांगारकर, रा. हसबनीस, रा. रेगे वकील (डहाणु) रा. खरे वकील (डहाणु) प्रो. वि. द. गोखले, बॅ. पुणतांबेकर, रा. सोमण वकील (सातारा), रा. इनामदार वकील (खटाव), रा. कुळकर्णी, रा. इर्डीकर, रा. भुस्कुटे, रा. ह. गो. लिमये, रा. वा. न. मिरजकर, रा. द. न. मिरजकर रा. शिरवळकर, रा. वामनराव शेगुणशी, रा. आण्णासाहेब करमरकर, रा. काळे, रा. गोवंडे, रा. वा. गो. आपटे, रा. वैद्य, श्री. गं भा. रमाबाई रानडे, नामदार रा. ब. ग रु. साठे, डॉ. सरदेसाई, रा. पटवर्धन, रा. अण्णासाहेब खरे, रा. गोगटे, रा. करमरकर (ठाणे) रा. निफटे, रा. देशपांडे, रा. बी. आर. मेहेंदळे, (हायकोर्ट वकील), रा. कुर्लेकर, (इंदूर) रा. गो. ब. लघाटे (सबजज्ज), प्रो. म. म. जोशी, रा. वाडेकर, रा. के. अ. पाध्ये (हायकोर्ट वकील) रा. सहस्रबुद्धे, रा. न. ग. घुडे (कारंजा), श्री. गं. ना. मुजूमदार, रा. अळेकर, रा. ग. व्य. दिवाणजी, रा. र. गो. भिंगे, रा. मा. बा. साठे, रा. अत्रे, रा. म. सि देसाई, प्रो. काळे, रा. त्र्य. गु. काळे, रा. चं. गो. आपटे, रा. आचार्य, रा. अळदकर, रा. किशनराव वकील, हतवळेकर मास्तर, रा. दा. ग. बेडेकर, रा. पळशीकर, रा. पुरंधरे, रे. डॉ. एन मॅक्निकल, रा. बी. व्ही. टिळक, श्री. आप्पासाहेब फडणीस, रा. गो. रु. देवधर, रा. राजोपाध्ये वकील (सातारा) रा. स. मा. दिवेकर, रा. स. बा. मराठे (दापोली) प्रो. शेख, वैद्यपंचानन कृष्णशास्त्री कवडे, श्री. बाबासाहेब मळेकर, रा. ना. वि. मावळणकर, रा. शेवडे, रा. के. जी. परसोडकर, डॉ. रा. गो. वसे, रा. वासुदेवराव जोशी., रा. खं. चिं. मेहेंदळे वगैरे

सुरुवातीस मंडळाचे चिटणीस यांनी सभासदांचें स्वागत करून रा. ब. साने अजारी असल्यामुळें रा. ब. वैद्य यांस अध्यक्ष निवडावें अशी सूचना करण्याबद्दल प्रो. भानू यांस विनंति केली. प्रोफेसर भानू यांनीं गौरवपर उद्गार काढून अशा महत्वाच्या प्रसंगी अध्यक्ष होण्यास रा. ब. वैद्य सर्वतोपरी योग्य आहेत

असें म्हणून त्यांस अध्यक्ष निवडण्याबद्दल सूचना केली. या सूचनेस प्रो. शिवरामपंत परांजपे यांनीं अनुमोदन व रा. न. चिं. केळकर यांनीं पुष्टी दिल्यावर अध्यक्ष स्थानापन्न झाले. सुरुवातीस ना. केशवराव, रा. कोल्हटकर, रा. दामले वगैरे पांच नवीन गृहस्थांस सभासद करून घेतल्यावर शके १८३५ चें इतिवृत्त चिटणिसांनीं वाचलें. इतिवृत्त स्वतंत्र ग्रंथाचे शेवटीं जोडलें आहे. इतिवृत्त एकमतानें मंजूर झाल्यावर रा. गा. का. चांदोरकर रा. शं. श्री. देव, रा. पां. न. पटवर्धन, रा. वि. का. राजवाडे यांनीं संशोधन-वृत्तें वाचली. त्यापैकी रा. पां. न. पटवर्धन यांच्या संशोधनवृत्ताशिवाय बाकीचीं तिन्हीं संशोधनवृत्तें छापली आहेत. रा. पां. न. पटवर्धन यांस आपलें संशोधनवृत्त इतक्यांत च प्रसिद्ध करणें प्रशस्त वाटत नाहीं. तेव्हां त्यांनीं होऊन च तें मागें ठेविलें आहे.

आपला नेहमीचा एकांती काम करण्याचा रिवाज जरा सभासदांचे माहिती-प्रीत्यर्थ बाजूस ठेवून आपले अनुभव, व इतर माहिती सांगितल्यानें संशोधनाची दिशा आपणास कळण्यास साधन झालें, निदान संशोधनाची आपणास कल्पना तरी येईल असें सांगून व्यक्तिशः सभासद या नात्यानें व सर्व सभासदांच्या वतीनें अध्यक्ष म्हणून रा. ब. वैद्य यांनी संशोधकांचे अन्तःकरणपूर्वक आभार मानि-ल्यावर अध्यक्ष रा. ब. साने यांचे भाषण रा. सि. के. दामले यांनी वाचलें, निरनिराळ्या संशोधक सभासदांनी केलेल्या कामगिरीचा परामर्ष घेऊन मंडळाचें काम कसें नमुने-दार ठेविलें पाहिजे, मंडळानें अंगिकारलेल्या कामांपैकी कोणती किनपत् पार पडलीं, मंडळाच्या अन्तररचनेंत काय फेरफार व्हावयास पाहिजेत, व मंडळामार्फत होत असणाऱ्या कामांत कोणती सुधारणा व्हावयास पाहिजे या बद्दल व्यक्तिशः अभिप्राय प्रगट करून इतिहास व सारस्वत कोणतें व कसें प्रकाशित करावें हें स्वानुभावानें सांगून अध्यक्षांनी त्यावेळच्या कांहीं कुत्सित टीकांचा अत्यंत तीव्रपणें निषेध केला. नंतर मांडलेल्या प्रेक्षणीय वस्तूंचें अल्प वर्णन रा. चांदोर-कर, देव राजवाडे, यांनीं सांगितलें, थोरले माधवरावांची अति उत्कृष्ट तसबीर लिंबवें श्री. रावसाहेब आपटे यांचे पूजेंत असलेली रा. आपटे यांचे मार्फत आलेली सर्वांनी पाहिल्यावर रा. द. वा. पोतदार यांनीं पेशवाईतील श्रीधर कवीवर टांचण वाचलें.

बुधवार दुपार च्या कामास सुरवात प्रो. हरि गोविंद लिमये यांनी खालील ठराव मांडून केली:—ठराव

आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या ऐतिहासिक साधनांची बृहत्सूची करण्यासाठीं खालील गृहस्थांची मंडळी नेमावी; या मंडळीस आपल्यामध्यें इतर गृहस्थांच

समावेश करण्याचा अधिकार असावाः—रा. ब. का. ना. साने, रा. गो. का. चांदोरकर, रा. मा. वा. भट, श्री. रा. गंगाधर नारायण मुजूमदार, रा. न. चिं. केळकर, रा. द. वा. पोतदार, रा. वासुदेव वामनशास्त्री खरे, रा. ब. द. ब. पारसनीस, रा. वि. गो. विजापूरकर, प्रो. हरि गोविंद लिमये, रा. चिं. गं. भानू, रा. पां. न. पटवर्धन डॅ. पुणतांबेकर, रा. सर्वे रा. वि. का. राजवाडे, रा. सं. चिं. मेहेंदळे. ठराव, सभेपुढें ठेवतांनां अशा सूचीची सर्वत्रांसच किती जरूरी आहे तें विशद करून सांगितलें. रा. राजवाडे यांनीं हि अशा ग्रंथाची उपयुक्तता व जरूरी प्रतिपादून अनुमोदन दिल्यावर मूळ ठराव एकमतानें पसार झाला. नंतर अध्यक्ष रा. ब. वैद्य यांनीं आपल्या जागीं रा. न. चिं. केळकर यांस अध्यक्ष करून भारतीय मुद्रांचा काळ हा निबंध वाचला. रा. रा. त्र्यं. गु काळे यांनीं हि त्या च विषयावर निबंध वाचला. नंतर श्रीसमर्थांनीं स्वहस्तानें लिहिलेलें पत्र. हा निबंध रा. देव यांनीं वाचला. रा. वा. दा. मुंडले यांनीं 'धनगरांच्या ओव्या' व 'शिराळें येथील नाथाचें देवालय' असे दोन निबंध वाचले. व संमेलनाचें बुधवारचें काम संपलें.

गुरुवार सकाळच्या कामास सुरवात झाली तेव्हां रा. वि. का. राजवाडे यांनीं चित्पावनांची मूळपीठिका, मध्य व सद्यस्थिति हा निबंध वाचला.

ठराव २ रा 'मंडळास मिळालेल्या विशिष्ट माहितीवरून ज्या ऐतिहासिक स्थळांच्या संरक्षणाविषयी सूचना करणें इष्ट व जरूर वाटेल त्याजविषयीं हिंदुस्थानसरकारच्या १९०४ च्या सातवे कायद्याप्रमाणें तशा सूचना मंडळानें सरकारास वेळोवेळीं कराव्यात.' रा. रा. रु. प्र. खाडिलकर यांनीं सभेपुढें मांडला तेव्हां ते म्हणाले, 'कालच संशोधनवृत्त आपणास सांगितलें गेलें त्यांत आपण ऐकिलें आहे कीं, पूर्वीच्या साधुसंतांस त्याच्या हयातींत तर ऊन, वारा, पाऊस सहन करावा लागे व तसाच त्यांच्यांतल्या कांहींचे समाधींस हि करावा लागत आहे ! हा प्रकार कांहीं श्रेयस्कर नाहीं व आपणांस पहावत हि नाहीं व तें काम व्हावयास तर पाहिजे आहे. तेव्हां तें काम करण्यासाठीं आज आपण एक उपमंडळ—लहानानें थोरास उप म्हणून कसें म्हणावें ! तरी—नेमावे. ही कामें करविण्याची सरकारास वेळोवेळीं विनंति करावी असा हा ठराव आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीनें ऐतिहासिक महत्वाच्या स्थळांचें व इमारतींचें संरक्षण करावयाचें आहे एवढेंच केवळ नसून जी ऐतिहासिक साधनसामुग्री देशाबाहेर गेल्यानें देशाच्या इतिहासाचें नुकसान होणार असेल ती साधनसामुग्री देशांतच कस्टम ऑफिसरास ठेवितां येईल. लॉर्ड कर्झन यांचें व्हाइसरॉय होण्यापूर्वीपासून या देशाच्या इतिहासाकडे

लक्ष होतें व त्याचे हातून च हा कायदा पास झाला आहे. 'धुळ्याचे वकील रा० रा० भा० वा० भट यांनीं ठरावास अनुमोदन दिल्यावर ठराव एकमतें पसार झाला.

'भारतीय इतिहासाचीं साधनें ग्रंथरूपानें प्रसिद्ध करण्याची सोय व्हावी' हा तिसरा ठराव रा० रा० वासुदेवशास्त्री खरे यांनी सभेपुढें मांडला तेव्हां त्यांनीं खालील आशयाचें भाषण केलें:—" रा० राजवाडे व त्यांचे स्नेही त्यांच्याजवळ सांप्रत ४०–५० खंडांपुरेशी (रा० राजवाडे:–२००० खंडांपुरेशी) साधनसामुग्री जमलेली असावी. तेव्हां ती प्रसिद्ध होऊन इतिहासभक्तांस घरोघर अभ्यासावयास मिळणें किती जरूरीचें आहे हें सांगून रा० खरे म्हणाले कीं ' मा ग्रंथ काढूं लागलों तेव्हां सुरुवातीस सर्वत्र निराशामय होतें, परंतु त्याच स्थितांतून ७–८ पुस्तकें निघाली, व आणखी ३।४ निघावयाची तीं निघतील. शिवाय या बाबतींत नुकसान झालें तरी एखाद्या व्यक्तीचें होईल. फायदा मात्र सर्व समाजाचा होईल. ग्रंथ काढण्याचें ठरल्यावर फीरस्तप्रमाणें निवडक उतारे करून काढावेत कां घराणेवार काढावेत, का साल–क्रमावर रचना करावी वगैरे मतभेदाचे भाग गौण आहेत, त्यांचा विचार ग्रंथ काढतांना होईलच. ' प्रो० लिमये यांनी मूळ ठरावास अनुमोदन दिल्यावर प्रो० भानू यांनी ' अग्निबाधेपासून सुरक्षित अशा संग्रहालयांत पत्रें सांठवून या ऐतिहासिक पत्रांची–लेखांची-बृहत्सूची व्हावी व ती प्रसिद्ध करावी ' अशा उपसूचना आणली. त्यावर बरीच चर्चा होऊन उपसूचनेचा विचार पुढें करण्याचें ठरलें व मूळ ठराव जशाचा तसा एकमतानें पसार झाला. नंतर सध्यांचें ' सारस्वताचें मासिक पुस्तकरूपानें काढावे ' हा ठराव अध्यक्षांनीं सभेपुढे मांडला व तो हि पसार झाला. नंतर ग० चांदोरकर यांनीं बाजीराव २ रे यांचे वेळच्या सरकारी दौलतीची नोंद * वाचून दाखविली. नोंद बाजीरावास वस्त्रें मिळाल्या वेळची आहे. त्यावरून त्या वेळीं सरकारी १७ कारखाने, हुजुरात घोडीं १००००, लहान ११० व मोठे ५ सरदार, गाडदी १०००० मुत्सद्दी व कारभारी ३८, कारकून ५०००, हाशमी लोक २००० व किता लोक ६ होतेसे दिसतें. नंतर रा० रा० द० वा० पोतदार यांनीं ' पंतप्रधानख्याम् ' वाचलें नंतर रा० कृ० वि० आचार्य कालगांवकर यांनी बाळाजी विश्वनाथ यांचे एक ऋणानुबंधी घराणें हा लेख वाचला. नंतर ईश्वररातांचा अपुरा ताम्रपट दाखवून तो रा० गो० का० चांदोरकर यांनीं वाचून दाखविला.

पत्रा १

१ ॐ स्वस्ति प्रचकाशासाः परम भट्टारकपादानुध्यात ईश्वररात कुशलि

---

* लेख पूर्वी भारतवर्षांत प्रसिद्ध झाला आहे.

२ [illegible] वेण्यकूपिका ग्रामे समुपागतास्तव्यां नैषा-
स्मदायुक्तमि नि

३ युक्ता त्कुमारा मात्योपरिरदान्हिकदन्दपाशीक हस्त्यश्व
जनव्यापृत चाट

४ भटादि ब्राम्हणोत्तरांश्च ग्रामप्रतिवासिनः कुशलमनुव
ण्य ब्रागय

मौजे वाशी येथील एका वृंदावनांत जुन्यांत जुनी एक ज्ञानेश्वरी पुरलेली असल्याची नोंद रा· मेहेंदळे यांनीं वाचून दाखविल्यावर गुरुवारच्या सभेचें काम संपलें.

शुक्रवार सकाळ च्या कार्यक्रमांतील पहिला निबंध रा· भास्कर वामन भट यांनीं ' महाराष्ट्रांतील व्यवहार निर्णयपद्धति शके १४००–१७०० ' या विषयावर वाचला.

नंतर रा· वासुदेव वामन खरे यांनीं पेशवाईतील प्रसिद्ध पुरुषांचीं हस्ताक्षरें (एकंदरपत्रें २७) तपशील स गून दाखविलीं त्यांचा तपशीलः—

१ हें पत्र सदाशिवराव भाऊंनीं पानपतच्या स्वारीस जातांना माधवराव यांस लिहिलें आहे. पत्र फाटलेलें असून मागच्या बाजूचें सर्व अक्षर भाऊसाहेबांचें आहे. या पत्रावरून नवीन माहिती कळते ती एवढी च कीं, इ स. १७६० त गोपाळराव पटवर्धनांनीं दौलताबाद घेतली तेव्हां त्या स्वारींत सुमारें १६ वर्षांच्या वयाचे माधवराव हजर होते. पेशव्यानीं त्यांस पटवर्धनांबरोबर स्वारीस पाठविलें होतें.

२ ते ९ पर्यंतचीं ८ पत्रें माधवराव पेशवे यांचीं आहेत. पैकीं २ पासून ८ पर्यंत खासदस्तूरचीं आहेत. त्यांत ७ व ८ हीं पत्रें स. १७६६।६७ या सालचीं आहेत व बाकीचीं स. १७६३ ते ६६ पर्यंतचीं आहेत.२व३ या पत्रांत आईच्या प्रकृतीविषयीं विचारपूस केली आहे. नंबर ५ चें पत्र " सौभाग्यवती " पार्वतीबाईस लिहिलें आहे. नंबर ५ च्या पत्राच्या मागें बाबा वैद्याच्या३ ओळी आहेत. त्यावरून पत्र लिहिलें जाण्याच्या वेळीं श्रीमंतांची स्वारी युद्धोन्मुख होती असें दिसतें नंबर ९ च्या पत्रांत थोर माणसाचें क्षुल्लक बाबींसंबंधें लिहिणें असल्यामुळें मनोरंजक वाटतें. गोपिकाबाई गंगापुरास रहात होती तेथें तिच्या खर्चाकरितां निराळे तालुके तोडून दिलेले होते. तिच्याजवळ स्वार पागा वगैरे लवाजमा बारमहा रहात असे त्याचा खर्च पेशवे सरकारांतून चाले. अर्थात् सरकारी पागेच्या कारकुनास जेऊं घालण्याबद्दल बाईसाहेबांच्या पाकानिसास तकार करावीसें वाटलें व तसें न करण्याबद्दल त्याला पेशव्यांस ताकीद करावी लागली !

१०।११।१२ हीं पत्रें रघुनाथ बाजीराव यांचीं आहेत. त्यांत नंबर १२ चें पत्र रघुनाथराव यांच्या हातचें आहे. त्यांत ५ व्या ओळींत "अर्धी" हा शब्द आलेला आहे. केव्हां हि "ध" चा "मा" सोडल्याशिवाय होणें कठीण. राघोबाचा "ध" झालातरी त्याचा जो एक प्रसंगीं "मा" झाला तो आनंदीबाईनें सोडल्याशिवाय झालेला नाहीं !

१३ ते १७ हीं पत्रें नारायराव पेशवे यांचीं आहेत नं. १३ व १४ हीं वयाच्या १४।१५ व्या वर्षी व बाकीचीं पुस्त्या आहेत ती त्या पूर्वीचीं आहेत.

१८।१९ हीं पत्रें बाळाजी विश्वनाथ वर्वे, उत्तर कोंकणचे मामलेदार यांच्या हातचीं आहेत. नं. १९ मध्यें "थोरले साहेबानीं वहिनी बाई मागारी पाठवून सडे जाले" असें लिहिलें आहे यावरून हें पत्र स. १७६६।७ अथवा ७०।७१ च्या स्वारींत लिहिलेलें असावें. कारण, त्या दोन स्वाऱ्यांत मात्र रमाबाईपेशव्यांबरोबर होत्या.

२०,२१ हीं पत्रें अलीबहादर याचीं आहेत. नं. २१ चें पत्र फाटून शिवाय त्याचीं अक्षरें पुष्कळ ठिकाणीं लुप्त झालेलीं आहेत. आणि त्याचें कारण कागदावर सोनेरी वर्खाचे बुंदके होते ते कोणी दुष्ट पोरानें कातरून घेतले आहेत!

२२ वें पत्र नाना फडनवीस यांच्या हातचें आहे.

२३ व्या पत्राच्या पाठीमागचा मजकूर गोपाळराव पटवर्धन यांच्या हातचा आहे.

२४ च्या पत्रांत वरच्या २ व खालच्या ९ ओळी पांडुरंगराव गोविंद पटवर्धन यांच्या हातच्या आहेत. थारभाईंच्या कारस्थानाच्या वेळचें तें पत्र आहे.

२५ चें पत्र गंगाधरराव गोविंद यांच्या हातचें असून ते लक्ष्मण हरि लागू यांस लिहिलेलें आहे.

२६ चें पत्र रामचंद्र परशुराम यांचें असून शेवटच्या ओळी त्यांच्या हातच्या आहेत.

२७ च्या यादींत "सातशें चौदा दोन पैकीं" "आठशें दोन महालांत अंमल बसला नाहीं" "रामचंद्रपंत कोपळकर" या तिन्ही मसलाशा परशराम भाऊंच्या हातच्या आहेत.

आपणास मुबलक हस्ताक्षरें पहावयाचीं असतील तर तीं श्री. मजेकर यांजकडे मिळतील. कांहीं श्री. मिरजकर यांजकडे हि आहेत.

त्यानंतर रा. राजवाडे यांनीं 'श्रीपतिकृत मराठी ज्योतिषरत्नमाळा शके ९६१ सुमार हा निबंध वाचला.

/n1८ नंतर रा. का. गो. आपटे हे त्यावेळीं नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या बंगालच्या साहित्य परिषदेच्या अहवालांत आलेल्या महाराष्ट्र-पुराणाच्या भागावरून सुचणारी माहिती सांगूं लागले. ' निबंध लेखनिशिष्ट असल्याशिवाय लेख मंडळापुढें विचारासाठीं ठेवूं नये, असा सभेचा नियम आहे, रा. आपटे यांनीं आपलें म्हणणें लिहिलेलें नाहीं सबब-त्यांस बोलूं देऊं नये, अशी रा. राजवाडे यांनीं हरकत घेतली. थोडी भवति-न-भवति होऊन अखेर अपवाद म्हणून अध्यक्षांनीं रा. आपटे यांस बोलूं दिलें.

या दिवशीं पहिल्या दोन दिवसांपेक्षां कांहीं जास्त वस्तू सभासदांस पहाण्यासाठीं श्री. मुजुमदार, रा. पोतदार, पटवर्धन, बॅरिस्टर पुणतांबेकर यांनीं मांडल्या होत्या

शुक्रवार दुपारचा कार्यक्रम सुरूं करतांना रा. वा. दा. मुंडले यांनी 'शिराळकर भोसले ' घराण्याची अस्सल कागदपत्रावरून माहिती सांगितली. नंतर रा. पांगारकर यांनीं निरंजनमाधवाचे स्वहस्तानें लिहिलेले ग्रंथ दाखवून निरंजनाचे ग्रंथाबद्दल कांही माहिती सांगतली. नंतर रा. चांदोरकर यांनी ' विजयनगरचा विध्वंस ' हा निबंध वाचला.

बखर पूर्वीं सरस्वतीमंदिरांत छापली आहे. परंतु ती फार अशुद्ध म्हणून ती पुनः रा. चांदोरकर यांनीं मंडळापुढें ठेविली होती. वनस्पतीशास्त्रासंबंधींच्या इ. स. १६७८ त छापलेल्या Horhes Mdicns Malabaricus पुस्तकांतील एक मराठी छापील (शिळेवर) पान रा. शेवडे यांनी वाचून दाखविलें, व पानाचा फोटो हि दाखविला. मराठी मजकूर छापण्यास (शिळेवर अगर टायपांत) सुरूं झाल्याचा हा जुन्यांतला जुना दाखला होय. नंतर 'अक्रूरो ददते मणिम्' या वाक्यावर रा. राजवाडे यांनी निबंध वाचला.

नंतर रा. पां. न. पटवर्धन व प्रो. शेख अबदुल कादर सर्फराज यांनीं ' रहिमतपूर येथील रणदुल्लाखानाचे घुमटावरील ४ शिलालेख ' हा निबंध वाचला. मुसलमानी भाग व अर्थ शेख अबदुल कादर सर्फराज यांनीं वाचला व इतर माहिती रा. पटवर्धन यांनीं सांगितली.

नंतर रा. का. रु. लेले यांनीं नारोपंत चक्रदेव हा निबंध वाचल्यावर रा. बर्वे यांनीं नारायणबोवा जालवणकर यांचा फोटो दाखवून खालील माहिती सांगितली.

श्रीनारायणमहाराज जालवणकर या सत्पुरुषाचा जन्म शालिवाहनशके १७२९ प्रभव संवत्सर आषाढ व. ४ गुरुवार रोजीं झांशी नजीक जालवण येथें झाला. त्यांच्या वडिलांचें नांव तात्या पुराणिक. ते देशस्थ ब्राह्मण होत. नारायणमहाराजांचा समाधिशक १७८९ प्रभव संवत्सर आषाढ व. ५ गुरुवार.

यांची समाधि काशीमधील हनुमान घाटावर पूर्णानंदांचे मठांत होती. यांच्या ग्रंथांचीं नांवें:–१ बोधसागर. २ कैवल्यसागर. ३ ज्ञानसागर. ४ विज्ञानसागर ५ आनंदसागर. ६ शान्तिसागर. ७ करुणासागर. ८ विचारमाला. ९ चिद्रत्न-माला. १० गुरुपादुकाष्टक. ११ बोधाष्टक. १२ निर्वाणपंचक. १३ सिद्धयोगाष्टक. १४ अष्टांगयोग. १५ धांवे व पदें. यांशिवाय समाधिप्रकरण, गुरुपरंपरा, मानसपूजा वगैरे कांहीं स्फुटप्रकरणें आहेत, परंतु ती अप्रकाशित आहेत. तसेंच, करुणासागर ग्रंथापैकीं ८७२ ओंव्या छापलेल्या आहेत. एकंदर ग्रंथ सुमारें ३६००० असून तो अप्रकाशित परतु उपलब्ध आहे. बेळगांवच्या रामतत्वप्रकाश छापखान्यांत कैवल्यसागर व ज्ञानसागर हीं दोन प्रकरणें छापलेलीं आहेत. याशिवाय वर नमूद केलेली सर्व प्रकरणें सन १८९० मध्यें रा. दत्तात्रय भंजप्पा संजगिरी यांनीं छापून प्रसिद्ध केली. देवास येथील माधवराव नारायण यांजकडे श्रीनारायण महाराज यांची रंगीत तसबीर आहे, त्यावरून घेतलेला प्रकाशलेख सम्मेलनांत ठेवण्यांत आला होता.

नंतर अध्यक्षांनीं खालील ठराव सभेपुढे मांडला :– ग्रांट डफ साहेबांच्या मराठ्यांच्या इतिहासांत ऐतिहासिकदृष्ट्या ज्या चुका आहेत त्या अलीकडे प्रसिद्ध झालेल्या किंवा संशोधिलेल्या ऐतिहासिक साधनांच्या मदतीनें निश्चित करून हप्त्याहप्त्यांनीं मंडळापुढें ठेवाव्या व त्या करितां खालील मंडळी नेमण्यांत यावी.

रा. ब. का. ना. साने, रा. चिं. गं. भानु. रा. ह. गो. लिमये, रा. वासुदेव वामन खरे, रा. विष्णु गोविंद विजापूरकर, रा. वि. का. राजवाडे, रा. शि. म. परांजपे, प्रो. वामन गोविंद काळे. ठराव एकमतानें पसार झाल्यावर अध्यक्षांनीं समारोप केला ते ह्मणाले:–आपलें तीन दिवसांचें काम मोठ्या आनंदानें व सलोख्यानें पार पडलें. अनेक विषयांवर विद्वानांनीं लेख वाचले. आपलें काम संशोधनाचें म्हणजे सत्यशोधकाचें आहे. अर्वाचीन इतिहासांत बरेच खांब रोविले गेले आहेत. परंतु प्राचीन इतिहासांत अशा प्रकारचे खांब रोविले पाहिजेत, असें सांगून आपण कोणकोणते खांब रोविले आहेत, ते सांगून, अध्यक्षांनीं पर-गांवाहून संमेलनास आलेल्या सभासदांचे आभार मानिले. रा. रा. न. चिं. केळकर व चिटणीस मेहेंदळे यांचीं आभारप्रदर्शनार्थ भाषणें झालीं व सभेच्या संमेलनाचें काम समाप्त झालें. तिसऱ्या दिवशीं दुपारीं श्री. बाबासाहेब पटवर्धन मळेकर सभेस हजर होते. तीन दिवसांत सुमारें १५।२० नवीन सभासद झाले.

सूची

आ.

च

ह

परिशिष्ट

व्यवहारनिर्णयपद्धति

शके १४००-१७००

महाराष्ट्रांतील व्यवहारनिर्णय प

शके १४००

अनु-क्रम नंबर	प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचें नांव	कागदाचें स्वरुप	तारीख, माहे, सन	उभयतां नां
१	२	३	४	५	
क	प्रकाशित. ग-जवाडे, मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १५ ले. २ पा. १०, ११, १२	मसूर-जगदळे	०	०	नरसोजी बिन वाईमाच खान
ख	प्र. रा. म. सा. खं. १५ ले. २ पान १२	मसूर-जगदळे	०	०	नरसोजीराव कानोजी पि
ग	प्र. रा. म. सा. खं. १५ ले ३ पा. १५	मसूर-जगदळे			सुलतानजी पिसाळे
१	प्र. रा. म. सा. खं. १५ ले ६ पा. २२–२८	मसूर-जगदळे	महजर	शके १५३२ माघ शुा १०	नरसोजी ज बापाजी मु
१ क	' ले. ७ पान २८ २९	मसूर-जगदळे	कौलनामा	शके १५४२ भाद्रवद वा १	नरसोजी ज

द्धति परिशिष्ट—व्यवहाराचें स्वरूप दर्शविणारें

ते शके १७००

वादींचां वें	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचें स्वरूप	व्यवहारनिर्णयाचें स्थल	व्यवहार विषयाचें स्वरूप
६	७	८	९
कमाजी पाटील	०	०	मसूरची पाटीलकी
जगद्ळे विा माला		पैठण	मसूरची पाटीलकी
राव जगद्ळे विा राव जगद्ळे	मसूर परगण्याचें पाटील व हक्क जवारांचे गोत व कसबे मसूरचें बैते बलुते	मसूर	मसूरची परगण्याची देशमुखी व मसूर कसब्याची पाटिलकी
गद्ळे विा मलमान	व्यवहारप्रवीण धर्माधिकारिणी माणिक पाटक व हरि पाटक	पैठण	मसूरची पाटिलकी
गद्ळे	०	०	मसूरची पाटिलकी

अनु-क्रम नंबर	प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचें नांव	कागदाचें स्वरूप	तारीख, माहे सन	उभयतां ना
१	२	३	४	५	
२	प्र. रा म. मा. खं. १५ ले. १० पान ३२–३३	मसूर–जगदळे	साक्षपत्र	शके १६०६ पौष शुा १०	महादजी वि. सटवोजी
३	" " ले. १० १/२ पा. ३४–४०	मसूर–जगदळे	महजर	शके १६०४	महादजी वि. संताजी बिन पाटील मौजे
४	" " ११ पान ४० ते ४६	मसूर–जगदळे.	निवाडापत्र	शके १६०६ माघ शुा ७	महादजी कसबे मसूर संताजी मौजे शिवले वि सिताजी व भोंसले
५	" " १२ पान ४६–५०	मसूर–जगदळे.	निवाडापत्र	शके १६०६ जेष्ट बा। १३	माणकोजी जगदळे वि शिवाजीनाईक मौजे शिराडे

वादींचीं वें	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचें स्वरूप	व्यवहारनिर्णयाचें स्थल	व्यवहार विषयाचें स्वरूप
६	७	८	९
बिन सुलतानजी जगदळे, बिन बाबाजी भोंसले.	हुजीर मजालस स्थल किल्ले रायगड	रायगड	पिकांची नुकसानी
बिन सुलतानजी जगदळे भिवजीचव्हाण कोणे गाउ.	साहेब सादर देशक पाटील मजकूर व गोत	कोणेगाउ	कोणेगांवची पाटीलकी
पाटील जगदळे तो उंबरज पाटील घाडगा व मौजे वराडे सटवोजी	सभा विश्मान राजश्री कविकलश छंदो गामात्य व सर कारकून	०	कसबे मसूर व मौजे कोणेगव्हाण व मौजे शिरवडे व मौजे शिवडे व मौजे वराडे तरफ मजकूर या गांवाची शेतेंभाते सितजोजी व सटवोजी भोंसले एहीं हिरोन घेतली व कित्येक अघामव केली.
बिन राहुजी मौजे शिराडे प्रनर सोजाडा तर्फ उंबरड	छत्रपती संभाजी महाराज		शिरोडे गांवचे निमि पाटिल की

अनु-क्रम नंबर	प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचें नांव	कागदाचें स्वरूप	तारीख, माह, सन	उभयतां नां
१	२	३	४	५	
६	प्र. रा. म. सा. खं. १५ ले. १२ पान ५० ते ५३	मसूर-जगदळे	क्रयपत्र	शके १६१० भाद्रपद शुा ७	महादजी पाटी जी पाटील बाबाजी चि पाटील व
७	,, ,, ,, ले. १८ पा. ५७, ५८	मसूर-जगदळे	खरीदखत	शके १६१३ जेष्ट वाा ७	जानराउ बा मौजे कोढ वि महादजी बिन
८	,, ,, ,, १९ पा. ५९, ६०	,,	पत्र	शके १६१३ जेष्ट्वाा ६	,, ,,
९	,, ,, ,, ,, ,, २० पान ६०	,,	शर्तनामा	,,	,,
९क	,, ,, ,, ,, ,, २२ पान ६२ ते ६४	,,	कौलनामा	शके १६१३ पौष वाा ९	

वादीचीं नांवे	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचें स्वरूप	व्यवहारनिर्णयाचें स्थल	व्यवहारविषयाचें स्वरूप
६	७	८	९
ल बिनसुलतान जगदळे यांसी न गंगाजी दुसरे	०	०	शिरवडाची पाटिलकी
गमाडे मोकदम शिरस यांसी सुलतानजी जगदळे.	०	०	जगदळे यांच्या देशमुखी वतनापैकी च्यार गांव च्यारशें होनांस विकत दिले.
	०	०	,,
	०	०	,,
	०	०	मसूरचे देशमुखी वतन.

अनु-क्रम नंबर	प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचें नांव	कागदाचें स्वरूप	तारीख, माहे, सन	उभयतां नां
१	२	३	४	५	
९अ	प्र. रा. म. सा. खं १५ ले. २६ पा. ६८. ६९	मसूर-जगदळे	अज्ञापत्र	शके १६१५ अश्विनशुा ११	
१०	,, ,, ,, ,, ,, ३३ पान ७४. ७५	,, ,,	महजर	शके १६१६ श्रावणशुा १	महादजी बिन जगदळे वि. यादव.
११	,, ,, ,, ,, ,, ३७ पान ७८, ७९	,,	घखेर	शके १६१६ भाद्रपदशुा १	
१२	,, ,, ,, ,, ,, ३८ पान ७९, ८०	,,	,,	,,	
१२अ	,, ,, ,, ,, ,, ४८ पान ९० ते ९२	,,	अज्ञापत्र	शके १६१८ कार्तिकशुा १०	महादजी बि जगदळे विा यादव
१३	,, ,, ,, ,, ,, ५० पान ९४, ९५	,,	महजर	शके १६२२ आश्विनवा २	होननाक नाकर्मा मौ

वादींचीं वें	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचें स्वरूप	व्यवहारनिर्णयाचें स्थल	व्यवहार विषयाचें स्वरूप
६	७	८	९
०	०	०	मसूर तर्फेचे जगवळे याचे देशमुखी वतनाचें सत्तावन गांवांपैकी वीस गांवची मालकी.
सुलतानजी	हजर मजालसी बे हुजूर गोत.	थळ मौजे किवळ तो मसूर	,,
			मसूरची देशमुखी
न सुलतानजी			सत्तावन गांवची देशमुखी.
बिनं आब जे खोडसी	हजर मजालस	थळ कसबे मसूर	पैसे घेऊन ठार मारण्या

अनु-क्रम नंबर	प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचें नांव	कागदाचें स्वरूप	तारीख, माहे, सन	उभयतां नां
१	२	३	४	५	
१४	प. ग. म. सा. खं. १५ ले. ५१ पान ९५, ९६	मसूर-जगदळे.	फारकत	शके १६२४ वैशाखशा ११	प्रा महादजी वा जग दळे रतनोजी सेलार किल्ले नसीन
१५	,, ,, ,, ,, ,, ५४ पान ९८, ९९	,,	अज्ञापत्र	शके १६२५ वैशाख व. १२	महादजी ज वि. यादव
१६	,, ,, ,, ,, , ५९ पान १०१ ते ११३	,,	साक्षपत्र	शके १६३० चैत्रशा ७	महादजी जी जगदळे वि. यादव.
१६अ	,, ,, ,, ,, ,, १३ पान १६९, १७०	निबसदानंद	निवाडापत्र	शके १५९३	मोहनगीर, वगैरे
१७	,, ,, ,, ,, ,, २७९ पान २७६ ते २७८	रोहिल खोरे गुमे देशपांडे	महजर	शके १५७४ पौषवा २	वाजी बिन मो कसबे बि. शिराळें.

वादींचीं वें	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचें स्वरूप	व्यवहारनिर्णयाचें स्थल	व्यवहारविषयाचें स्वरूप
६	७	८	९
कऱ्हाड सुलतानजी यासी मनसबदार वसंतगंड	०	०	बद्दल बस्तभाव व रुपये.
गदळे	०	०	मसूरची देशमुखी
बिन सुलतान	हुजीर मजालस राजश्री शाहुराजे	कसबा पाटे गाऊ	मसूर परगण्याचे देशमुखीचे गांव सतावचे मालकी-बद्दल.
आनंदगीर.	श्री दसनाम मानभाव	निंब परगणें वांई.	मठाधिपती यांस पावन करून घेतल्या बद्दल.
बाबजी व दुसरे. उभ्राली.	हजार. मजालस. हवलदार व मुदसदियान वगैरे नाईकवाडी, देशक, बलुते	किल्ले रोहिडा	कसबे उभ्रोळीचे मोकदमी बद्दल.

अनु-क्रम नंबर	प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचे नांव	कागदाचें स्वरूप	तारीख, माहे, सन	उभयतां नां
१	२	३	४	५	
१८	प. ग म सा. सं. १५ ले २७२ २७८, २७९ २८०.	रोहिडा खोरे गुंजे देशपांडे.	सनद	शके १५७५ श्रावण शु॥ ३	अर्जनाक वि धाकनाक
१९	,, ,, ,, ,, ,, २७३ पान २८१	,,	यजितपत्र	शके १५७५ मार्गशीर्ष शु॥ ३	बावाजी सिव गुमास्ते दिगत प्रभू
२०	,, ,, ,, ,, ,, २९० पान २९९ ते ३०१	,,	साक्षपत्र	शके १६३१ श्रावण व॥ १	खोपडे देश वि. माउरे मोक
२१	,, ,, ,, ,, ,, ३०७ पान ३२३ ते ३२७	,,	महजर		दादाजी नरस कर्णी गांव मोकासा वि. बाबाजी सिउ
२२	,, ,, ,, ,, ,, ४१३	सातारा राजोपाध्ये	महजर	शके १५५२ अश्विनशु॥ १३	संभाजी वि.

वादीची वें	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचें स्वरूप	व्यवहारनिर्णयाचें स्थल	व्यवहारविषयाचें स्वरूप
६	७	८	९
बिन गोंद्नाक बा माननाक महार	०	०	मोकदम मौजे करंजिगे याचे इनामापैकी तीन एक पैसा व महारकी इनामापैकीं आठवा हिस्सा.
देव सोनाके दादाजी नसस	शिवाजा राजे महाराज.	०	देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण.
मुख दम	हजीर मजालस राजमुद्रा शामर्जा हरी नामजाद सुभा प्रांत मावळ गोत.	मौजे आंबडे ता उत्रोली	मौजे माडर देव प्रांत वाई व मौजे आंबडे व बलुल व नेरे तरफ उत्रोली या गांवच्याशिवेचा गरगशा
प्रभू देशकुलकुर्णी सा उत्रोली. देउंसोनटके	हजीर, मजालस, हवालदार कारकून, सरगुरो, बाजी नाइक, नाईकवाडी देसक, सेट्या व महाजन, बलुते	किले रोहिडा	महजरावर खोटाईनें देशकळर्णी असे विकलम केल्या बद्दल.
तानदेउ	हजीर मजालसी	किल्ले फत्तेमंगल	मोकदमी.

अनु-क्रम नंबर	प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचें नांव	कागदाचें स्वरूप	तारीख, माहे, सन	उभयतां नां
१	२	३	४	५	
२३	प. रा म. सा. ख.१५ले.४१४ पान ४४५, ४४६	सातारा राजोपाध्ये	खरेदीखत	शके १५५३ आषाढ शुा ७	गोंदजी संभाजी वि. गोविंदजी
२४	,, ,, ,, ,, ,, ,, ४१७ पान ४४९, ४५०	,,	खरेदीखत उलट	शके १५५५ आश्विन शुा १०	जिवाजी वि वि. संभाजी
२५	,, ,, ,, ,, ,, ४१८ पा. ४४९, ४५०,४५१	,,	महजर	,,	जिवाजी बि भोंसले वि. एमाजी ,,
२६	,, ,, ,, ,, ,, ,, ४१९ पान ४५१, ४५२	,,	खरेदीखत	शके १५५५ अश्विन शुा १२	सदर
२७	,, ,, ,, ,, ,, ४२६ पान ४५८, ४५९	,,	ईनामपत्र	शके १६४७ श्रावण बा ५	

वादींचीं वें	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचें स्वरूप	व्यवहारनिर्णयाचें स्थल	व्यवहारविषयाचें स्वरूप
६	७	८	९
मोकद्दम तानदेउ बिन महादजी	०	०	मौजे निरगुडी येथील मोकद्दमी
न खेलोजी भोसलें तानदेऊ	०	०	,,
न खेलोजी बि धाकोजी	हजीर मजालसी मोकदम हमशाई.	०	,,
	०	०	,,
	०	०	सुपी तालुके हवेली गांव इनाम.

अनुक्रम नंबर	प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचें नांव	कागदाचें स्वरूप	तारीख, माहे, सन	उभयतां नां
१	२	३	४	५	
२८	म. रा. म. सा खं.१५ले.४३० पान	चाकण ब्रह्मे	महजर	शके १५२३ मार्गशीर्ष शुा १३	मुद्गलभट वि ब्रह्मे
२९	,, ,, ,, ,, ,,४३२ पान ४६६	,,	बक्षिसपत्र	शके १५४१ जेष्ट वा ५	मुरारीभट यासी बखाथी
३०	,, ,, ,, ,, ,,४३३ पान ४६७	,,	निवाडापत्र	शके १५४२ भाद्रपद शुा ११	मुरारभट वि. वासुदेवभट
३०अ	,, ,, ,, ,, ,,४३५ पान ४६८	,,	सभापत्र	शके १५५१ चैत्र शुा ३	मुरारीभट वा सावी ब्रह्मे वि. तिमाजी
३१	,, ,, ,, ,, ,, ५	कानदखोरे मरळ देशमुख	महजर	शके १५३८ मार्गशीर्ष शुा १३	बाबाजी वि. बाजी मर
३२	,, ,, ,, ,, ,, २२	,,	महजरनामा	शके १५८८ माघ शुा १०	बाबाजीझुंझार कानदखोरे. मालोजी
३३	,, ,, ,, ,, ,, ४०	,	महजर	शके १५६९ माघ शुा ३	बाबाजी वि

वादीचीं वें	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचें स्वरूप	व्यवहारनिर्णयाचें स्थल	व्यवहारविषयाचें स्वरूप
६	७	८	९
पुडले	सभा	चाकणस्थल सील समे	पिंडदान नांदीश्राद्ध वगैरे उत्पन्नाबद्दल
गोसावी ब्रह्मे बीन विढपाठक	०	०	जोशीवृत्ती कलहेट निरगुडी याची
ब्रह्मे ब्रह्मे.	ब्रह्मसभे विद्यमान	चाकणस्थळ	पुस्तकांचा कलहो.
सुदेव भट गो- पुरुषोत्तम झुंझारराव	०	०	खुलि जागा.
ळ	समस्त देसकतर्फ कानद खोरे.	कानदखोरे	कानद खोऱ्याचे देशमुखी वतन.
राव देशमूख वि. पतंगराव	हाजीर मजालसी गोत व मातोश्री आवाजी.	धानीव	देशमुखी वतन
झुंझारराव.	हाजीरमजालसी मुक्काम किल्ले सिंव्हगड	किल्ले सिंव्हगड	खंड रुपये ४२०० परचक्र

अनु-क्रम नंबर	प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचें नांव	कागदाचें स्वरूप	तारीख, माहे, सन	उभयतां नां
१	२	३	४	५	
					उद्मी वाणी किल्ले प्रचंड
३४	प्र. रा. म. सा. खंड १६ ले. ५५		महजर	शके १६५६ फाल्गुन शुा ५	बाबाजी बिन वि बाबाजी महा दुणेकर
३५	,, ,, ,, ,, ,, ५९	—	सवादपत्र	शके १६५९ मार्गशीर्ष वा २	राजाजी वि मानजी
३६	,, ,, ,, ,, ,, ५७	—	महजरनामा	शके १६६१ चैत्र वा १३	शिवजी खंडा म
३७	,, ,, ,, ,, ,, ५८	—	बिंदाणे	शके १७०१ वैशाख वा ५	नारायण
३८	,, ,, ,, सं. १७ ले. १	सिलीमकर देशमुख.	खरीदखत	०	कान्होजी वा या जानकोई

वादींचीं वें	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचें स्वरूप	व्यवहारनिर्णयाचें स्थल	व्यवहारविषयाचें स्वरूप
६	७	८	९
व गोळक गाड.			आले तेव्हां गांवकऱ्यानें कबूल केला त्याचे वांटणीबद्दल.
जावजी सडेकर बिन बाजी	हाजीर गोत वाा कानदखोर, देशमूख देशपांडे, सरनोबत, मोकदम, चौगुले, बाजे वतनदार, चांभार महारतर्फ मजकूर.		न.
आप्पाजी तुकाजी प्रभु	०	०	देशमूखी वतन.
गंगाधर ल्हार	बिहुजर गोत	०	खासनिशी.
झुंझारराव	०	०	गांवची शीव.
शाहाजीराव स कोम राणोजी	०	०	देशमूखीवतन.

अनु- क्रम नंबर	प्रकाशित- अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचें नांव	कागदाचें स्वरूप	तारीख, माहे सन	उभयतां नां
१	२	३	४	५	
३९	प्र ग. म सा. ख. १७ ले. ७	सिलीमकर देशमख	महजर	शके १५५९ माघ वा ७	बापूजी बिन वि. हवाजी चि.
४०	,, ,, ,, ,, ,, ८	,,	,,	शके १५६९ चैत्र वद्य ९	स
४१	,, ,, ,, ,, ,, १२	,,	महजर नामा	शके १५७९ चैत्र वा २	बकाजी
४२	,, ,, ,, ,, ,,	सुपे देशपांडे	,,	शके १६१९	काकोजी वि. टोळे. वि. माणकोजी बिन
४३		,,	तकरीर	शके १६४२	नारो केश राव

वादींचीं वें	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचें स्वरूप	व्यवहारनिर्णयाचें स्थल	व्यवहार विषयाचें स्वरूप
६	७	८	९
कान्होजी बाबाजी	हाजीर मजालस. मसरूल हजरती. रा. दादाजी कोंडदेउ सूभेदार नामजाद व कारकून किल्ला कोंडाणा.		देशमूखी वतन
दर	हजर मजालसी रा. श्री. शिवाजी राजे साहेबु	पुर्णे	,,
बिन येसाजी	हजीर मजालसी बी हुजूर देशमुख. देश कुळकर्णी व देसक ताा गुंजण मावळ	०	मोकदमी वतन.
हिरोजी आ-	हाजीर मजालस सुपे.	सुपे	पाटीलकीबद्दल
भेऊजी पाटील			
व व बाबु- रायाजी	०	•	•

अनु-क्रम नंबर	प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचें नांव	कागदाचें स्वरूप	तारीख, माहे, सन	उभयतां नां
१	२	३	४	५	
४४		मुपे देशपांडे	जयपत्र	शके १६४४ श्रावण वा। १३	नागो केशव व वि. यादव रखमाजी
४५		शिरवळ देशपांडे	महजर	शके १५६५	तिमाजी वि. गमाजी

वादींचीं वें	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचें स्वरूप	व्यवहारनिर्णयाचें स्थल	व्यवहार विषयाचें स्वरूप
६	७	८	९
बाबुराव रामा वी देवाजी त्रिंबक	राजश्री शाहू महाराज अष्टप्रधान. होनाजी अनंत. न्यायाधीश, राजमुद्राधिकारी, प्रतिनिधी, अमात्य न्यायाधीश, चिटनीस, खारनिस, शेखमिरा, बाजीराव बल्लाळ प्रधान, सचीव, सुमंत नामजाद खालसा, वतनदार महालनिया, देशमूख व देशपांडे प्रां वांई, श्रीशाहूराजे भोंसले देशमूख प्रांत वांई. गोत देसक परगणे सुपे—बारामती मोकदम मौजे सोनवडी. मौजे पणदरे.	माहुली श्री कृष्णावेण्यासंगम.	देशपांडे वतन.
पुरषोत्तम विठ्ठल			देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण.

अनु-क्रम नंबर	प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचें नांव	कागदाचें स्वरूप	तारीख, माहे, सन	उभयतां नां
१	२	३	४	५	
४६		शिरवळ देशपांडे	महजर	शके १५९४ श्रावण शुा १	विठोजी बिन बापुजी बिन
४७		,,	,,	शके १६३३ श्रावण वाा १३	खंडोजी बिन बहि वि. साखराई कान्होजी
४८		कल्याण जोशी	,,	शके १५५३ आश्विन वाा १४	भिलाजी वि. रामाजी
४९		पंढरपूर अराध्ये	०	शके १५६० भाद्रपद वाा १	थिटे वि. बडवे
५०		,,	महजर	शके १६१८ श्रावण वाा ३	वाळ वि. कावेरी.
५१		,,	,,	शके १६१९ फाल्गुन वाा २	आराधे वि. ताटे

वादींचीं वें	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचें स्वरूप	व्यवहारनिर्णयाचें स्थल	व्यवहारविषयाचें स्वरूप
६	७	८	९
गाखोजी बाजी वगैरे	०	०	देशमुखी वतन
जागोजी रजी. कोम रभाजी बिन	हजर मजालसी गोत परगणे सिरवल	०	पाटीलकी वतन
माबाजी आत्माजी	पंचाईत	०	कुळकर्णी वतन
भागध्ये.		श्रीक्षेत्र पेठ सिंगणापूर	जोशी वृत्ती
कृष्णभट	हुजीर मजालस क्षेत्र पंढरपूर प्रा कासेगड.	पंढरपूर	घर
व थिटे	हुजीर मजालसी	पंढरपूर प्रा कासेगांव प्रामाण दहिगड	जोशी व कुळकर्णी वृत्ती

अनु-क्रम नंबर	प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचें नांव	कागदाचे स्वरूप	तारीख, माहे, सन	उभयतां नां
१	२	३	४	५	
५२		पंढरपुर अराध्ये	महजर	०	पुंडलिक वि. बडवे
५३		कोल्हापुर धर्माधिकारी	,,	शके १४९२ जेष्ठ शुा १	मोसिभट वि. विरपाक्ष
५४		,,	,,	शके १५५५ आषाढ वा १३	धर्मा जोशी
५५		,,	आज्ञापत्र	शके १६४४ आषाढ वा ९	सदाशीव भट जोति पटण
५६		,,	सुरत महजर	शके १६२१ आषाढ वा८	राघो मल्हार

वादींचीं वें	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचें स्वरूप	व्यवहारनिर्णयाचें स्थल	व्यवहारविषयाचें स्वरूप
६	७	८	९
भट बेणेराय.	समस्त देसक व समस्त महाजन क्षेत्र पंढरपूर.	पंढरपूर	देवाचे पालखीपुढें ठेविलेल्या वस्तु.
लाटीकर भट वेदांती	बीहुजूर समस्त ब्राह्मणसभा तथा राजमुद्राधिक्ष करून समस्त महाजन वा आस्टे पॉ पाटोळ्याचे.		ग्रामउपाधिक वृत्ती
धिकारी वि	बीहजर. हजर मजालसी यानी आजमहाल प्रा कोल्हापूर.	कोल्हापूर	धर्माधिकारिणीवृत्ती
भट बिन जात षी मौजे कढोली	श्रीमत शंकराचार्य अभिनव श्रीविद्यानरसिंव्ह भारती स्वाती	०	०
सब देउ बुलगो	हजीर मजालसी.		देशपांडे वतन

अनु-क्रम नंबर	प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचें नांव	कागदाचें स्वरूप	तारीख, माहे, सन	उभयतां ना
१	२	३	४	५	
					वि विसाजी
५७		वांई चित्राव	निर्णयपत्र	शके १५९० श्रावण वा ८	नरसिंह वि. नारायणभट चित्राव
५८		,,	निवाडापत्र	शके १७००	गोविंद जोशी बि. वासुदेव जोसी
५९		दासोपंत	जयपत्र	शके १६१७ आषाढ वा ७	दासो वि. सर्वज्ञ
६०		जोशी	निवाडापत्र	शके १६८८ माघ वा १	जो वि पा
६१		दिनकर रामदास	महजर	शके १६०२	जनार्दन बिन

वादीची वें	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचे स्वरूप	व्यवहारनिर्णयाचें स्थल	व्यवहारविषयाचे स्वरूप
६	७	८	९
काशी.			
भट चित्राव एकनाथभट वगैरे	ब्रह्मसभा	०	स्वकष्टार्जित मिळकतीचे वांटणीबद्दल.
बिन शामजोशी बिन लिंगजोशी	०	०	जोतिषी वृत्ती.
गोसावी. गोसावी.	०	०	मंत्रांगसहित मंत्रोपदेश ज्ञानांगासहित ज्ञानोपदेश.
शी ध्ये	थोरले माधवराव पेशवे		जोतिशी वृत्ती
गोसावी केशवभट	हुजीर मजालस ठाणे परगणें नेवासे		जोशीवृत्ती

अनु-क्रम नंबर	प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचें नांव	कागदाचें स्वरूप	तारीख, माहे, सन	उभयतां नां
१	२	३	४	५	
६२		दिनकर रामदास	महजरनामा; मिरासीपत्र	शके १६२३ आषाढ शुा७	जिवाजी कबुलया कुलकर्णी खुर्द पर
६३		कुडाळ देशमुख	महजर	शके १५२४ जेष्टवा१	सूर्याजी जानोजी
६४		,,	शर्तनामा	शके१५२५ अधिकआषाढ वा१०	,,
६५		,,	महजर	शके१५२७ वैशाख शुा८	,,
६६		,,	,,	शके ५२७ वैशाख वा७	,,
६७		,,	,,	शके१५८५ श्रावण शुा१०	बापूजी बिन सूर्याजी

वादींचीं व	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचें स्वरूप	व्यवहारनिर्णयाचें स्थल	व्यवहारविषयाचें स्वरूप
६	७	८	९
रघुनाथ जीर रखमांगद मौजे वढले गणे सेउगाउ	०	०	जोशी वृत्ती
गाजे फर्जंद चौधरी.	हजीर मजालसी प्रात वांई		देशमखी वतन
	●	●	,,
	हजर मजालसी किल्ले परळी.	●	,,
	हजर मजालसी किल्ले नंदन	०	,,
म रत्नोजी नाईक यांस नाईक	●	०	,,

अनु क्रम नंबर	प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचें नांव	कागदाचें स्वरूप	तारीख, माह, सन	उभयतां नां
१	२	३	४	५	
६८		कुडाळ देशमुख	महजर	शके १५८६ श्रावण शुा १०	बापुजी बिन सूर्याजी
६९			अज्ञापत्र	शके १६०८ चैत्र शुा ?	मोरेश्वर
७०			नेमपत्र	शके १६१३ कार्तिक शुा १३	रामचंद्र वि. कृष्णाजी
७१			राजीनामा पत्र	शके १६२७ मार्गशीर्ष शुा २	गमाजी वि रामचंद्र नि- कुळकर्णी
७२		पाटण देशपांडे	पत्र	सुा सलास समातीन अलफ ता ७ ९ मोहरम जान	अर्जास सेरीकर गोंदजी —टील —राह —ढाढ

वादींची वें	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचे स्वरूप	व्यवहारनिर्णयाचें स्थल	व्यवहारविषयाचें स्वरूप
६	७	८	९
रत्नोजी नाईक यांस नाईक			देशमुखी वतन
पंडितगव	०	०	जानी पावन करून घेतल्याबद्दल
निळकंठ बुलगो	हाजीर मजालसी किल्ले सातारा	०	देश कुळकर्ण व गांव कुळकर्ण.
व्रल शेणवी वि. ळकंठ देश	हाजीर मजालस.	किल्ले प्रसिद्धगड ऊर्फ रांगणा.	देशकुळकर्ण व गांव कुळकर्ण.
दताजी व लोकरे पा- मौजे वें- परगणे क-	अजब दिवाण ठाणा परगणे पाटण.	०	पाटिलकी वतन

अनु-क्रम नंबर	प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचें नांव	कागदाचें स्वरूप	तारीख, माहे सन	उभयतां नां
१	२	३	४	५	
७३		पाटण देशपांडे	महजर	छ २४ सफर ईश्वर नाम संवत्सर भाद्रपद वा। ११	रामसेटी कडान्तका
७४		,,	,,	शके १६०० मार्गशीर्ष शु। १०	गणेशभट वि. वासदेव श्वनाथ
७५		,,	,,	•	आबाजी महादजी
७६			शृंगेरीमठाचें संस्कृत आज्ञापत्र	शके १६०८ माघ शु। १५	
७७			महजर	शके १६१६ चैत्र वा। ५	हरी भट कृष्णभट
७८			,,	शके १६४० कार्तिक वा। १३	नारायण नंन सर वि.

वादीचीं वें	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचे स्वरूप	व्यवहारनिर्णयाचें स्थल	व्यवहार विषयाचे स्वरूप
६	७	८	९
बिन सिद्सेटी ल भाा पाटण		स्वस्थल दृता गीरपाटण.	मरसंटेपणाचे वतन
बिन कोंडभट भट बिन वि- भट	हजर मजाल सी	स्थळ पाा पाटण	जोतिर्षा वृत्ती
बिन कसाजी वि- बिन जोत्याजी	॰	•	पाग्लिकी वतन
			बहिष्कार घातल्याबद्दल
सप्रे वगैरे वि. वाला नलिक	हाजीर मजालस	सप्रे मांकली मौजे फोंडों	स धर्माकारणा व ज्योतिषी वृत्ती
बिन अ जोतिर्षी	हाजीर मजालसी यामी सभा मं- डलीक सदर	फोंडा	सर जोतिर्षा वृत्ती

अनु-क्रम नंबर	प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचें नांव	कागदाचें स्वरूप	तारीख, माहे, सन	उभयतां नां
१	२	३	४	५	
					भास्करभट
७९			निवाडा	शके १७३४ पौष वा ८	विनायक चंद्रभट सप्रे.
८०		पुणे देशपांडे	महजर	शके १५३० आषाढ शु॥ २	मान पाटील पाटील वि. जान पाटील
८१		,,	,,	शके १५५०	परगणे पुणे वि.
८२			,,	श्रावण वा ३ शके १५६१	परगणे सुपे मालजी वि भिलोजी
८३			,,	शके ५६४ ज्येष्ठ शु॥ ११	बाजी वि. सिदोजी
८४			,,	शके १५६४ ज्येष्ट वा ६	मीगजी वि. अमन
८५			,,	शके १५७३ वैशाख वा १	कृष्णाजी वि. गोविंदराम

वादीचो वें	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचें स्वरूप	व्यवहारनिर्णयाचें स्थल	व्यवहारविषयाचें स्वरूप
६	७	८	९
मंप्र	कोट फोडा		
जोशी वि व गोपाळ भट			सरजोतीषी वृत्ती.
बिन अवल बिन बाद पाटील	हजरमजालसी परगणे पणे	पुणे	पाटीलकी वतन.
चि विलायत	हजीर मजालस	०	गांवचे शीवे-बद्दल.
चि विलायत. भोईश.	हजीर मजालस रा. दादाजी कोंडदेउ वगैरे		पाटीलकी
बिन बाजी बिन बाकाजी	हजीर मजालस राजश्री दादाजी कोंडदेउ वगैरे		मोकदमी.
बी मयाजी बिन चांद	हजीर मजालसी मुक्काम कसबे खेड बारे.	०	मोकदमी.
बिन सताजी देशकुळकर्णी	हजीर मजालस.		मोकदमी.

अनु-क्रम नंबर	प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचें नांव	कागदाचें स्वरूप	तारीख, माहे, सन	उभयता नां
१	२	३	४	५	
८६			महजर	शके १५९०	गोंदशेटी वि गणसेटी
८७			महजर	शके १५९३ श्रावण शुा ७	जानोजी वि. एमाजी
८८			जाबिता मखलासी	शके १५९४ श्रावण शुा ८	माली माउ वि. विसाजी
८९			महजर	शके १५९७ कार्तिक शुा २	बकाजी
९०			,,	शके १६०९ माघ शुा ७	गवरोजी लोइकरा
९१			करीणा	शके १६१९ श्रावण शुा ७	योदो नाम करीनी
९२			तकरीर	शके १६३२ १६३३	तान्हाजी जगताप परगणे

ादींची वें	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचें स्वरूप	व्यवहारनिर्णयाचें स्थल	व्यवहारविषयाचें स्वरूप
६	७	८	९
हुलवाल			घराबद्दल
शेरे			
कुंभारकर	गोत मौजे वणपुरी	वणपुरा	वडिलार्जित मिळकतीबद्दल
कुंभारकर			
माळी वगैरे			
बाबाजी कुळकर्णी.			पैशाबद्दल. (गांवगतीचें पैशाचे हिशोबाबद्दल).
फर्जंद	हुजर मजालसी सभासद	•	पाटीलकी वतन
बिन बाबाजी	•	•	,,
देव देशकुळकर्णी मावल	•	•	देशकुळकर्ण .
बिन माहूजी मौजे बेलसरे सासवड	०	०	मोकदमी वतन

अनु-क्रम नंबर	प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचे नांव	कागदाचें स्वरुप	तारीख, माहे, सन	उभयतां ना
१	२	३	४	५	
९३			तकरीर	शके १६३८ अश्विन वा। १३	मल्हारभट
९४			महजर	शके १५८९ माघ वा। ४	फट जोति-ठ्ठल
९५			,,	शके १६१७ श्रावण शु। २	अनंत फट जो·
९६			जबानी	शके १६८० अश्विन शु। ११	भास्कर
९७			,,		विठ्ठल
९८			महजर	शके १६५३ मार्गशीर्ष शु। ५	भास्कर वि. उपाध्ये
९९			पत्र		
१००		कुडाळ देश-पांडे	महजर	शके १२०१ श्रावण शु। १०	अंतो मल वि. देऊपंत

वादींचीं वें	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचें स्वरूप	व्यवहारनिर्णयाचें स्थल	व्यवहारविषयाचें स्वरूप
६	७	८	९
काळे			उपाधेपण, जोतिष वृत्ती.
षी बिन वि जोतिषी.	हाजीरानी मामले गोता.		सरजोतिषी. सरधर्माधिकरण
जोतिषी बिन तिसी.			ज्योतिषी वृत्ती
भट सफ्रे			
जोशी.			
भट सम्रे	लाजरान देसक तपे अतंरुज शेटीय महाजन कसबा फोंडा		सरधर्माधिकारी-णी व सर ज्योतिषी वृती.
नाथ.			,,
रस			देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण

अनु-क्रम नंबर	प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचें नांव	कागदाचें स्वरूप	तारीख, माहे, सन	उभयतां नां
१	२	३	४	५	
१०१		कुडाळ देशपांडे	महजर	शके १५०६ फाल्गुन शु॥ १	परभुणे वि जोशी
१०२		,,	,,	शके १५०६ कार्तिक व॥ १	अंतोमल वि. देउपंतरस -कर
१०३		,,	अज्ञापत्र	शके १६३५ श्रावण व॥ ६	रा. श्रीनि -निधा- कुसाजी प्रभूंचे.
१०४			येजितपत्र		कुसाजी यांस रायोजी अप्पाजी
१०५			महजर	शके १६४२ भाद्रपद शु॥ १३	कुसाजी वि. सिवजी

वादींचीं वें	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचें स्वरूप	व्यवहारनिर्णयाचें स्थल	व्यवहारविषयाचें स्वरूप
६	७	८	९
	कारकुनानी, व हुद्देदारानी, व सर गुरो नाईकवाडी यांनी, देसकानी, मोकद्दमानी, व शेटे महजनानी, व बाजेकर्दमांनी	महा घटका स्थल गलस्ते ष्दर	देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण.
नाथ प्रभुणे. अकलज.			,,
वासपंत प्रति- याचे- अनंत			,,
अनंत प्रभुणे. वाघोजी खंडो			,,
अनंत नारायणप्रभुणें.		कुडाळ	,,

अनु-क्रम नंबर	प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ ग्रंथ	घराण्याचें नांव	कागदाचें स्वरूप	तारीख, माहे, सन	उभयतां नां
१	२	३	४	५	
१०६			पत्र		राजमान्य राजमुद्रा व सभासद व समस्त बा कुडाळ यांसी यशवंतराव दंतागीर नारो लि
१०७			”		राजश्री विठ्ठल -दार व ता बारा कुडाळ यांसी आत्मा कारकून दंतागीर
१०८			सवदरोखा	सुाासमस समानिन मया अलफ	रा. दादो देशपां· गाउ पर

वादींचीं वें	व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्थेचें स्वरूप	व्यवहारानर्णयाचें स्थल	व्यवहारविषयाचें स्वरूप
६	७	८	९
राजश्री देशमुख व गोत रामुरे परगणे गोसावी देशमूख पाटण राजा			देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण
तान्हाजी प्रभु हवल-कारकून मुरे परगणे			"
जी मल्हार परगणे			
बापूजी दे. तपेआट गणे जाहलीः			

भारत—इतिहास—संशोधक—मंडळ, पुणें
वार्षिक इतिवृत्त शके १८३५ सालचें

श्री

सन्मान्य अध्यक्ष व विद्वान् सभासद हो,

भारत- इतिहास- संशोधक- मंडळ शके १८३२ सालीं स्थापन झाल्यापासून पहिल्या तीन वर्षांचें इतिवृत्त सालोसाल आपणांस सादर केलें आहे व. आज चवथ्या वर्षाचें—शके १८३५ सालचें—इतिवृत्त सादर करीत आहे.

प्रथम संमेलनाची तीन दिवसाची सभा सोडून गतसालीं मंडळाच्या चोवीस पाक्षिक सभा झाल्या. त्या वेळीं हजर असणाऱ्या सभासदांचें सरासरी प्रमाण नऊ होतें. धुळें येथील सभासदांच्या इच्छेवरून धुळें येथें मिति आश्विन शु॥ ६ रविवार रोजी रा. गोविंद काशीनाथ चांदोरकर यांचे अध्यक्षतेखालीं एक विशेष सभा भरविली होती. तेव्हां सर्व धुळेकर सभासद हजर होते व इतिहास- संशोधक रा. राजवाडे यांनीं ' मुकुंदमुनींचें महाभाष्य ' हा निबंध वाचला. मूळ संस्कृत ग्रंथ म. सारस्वतांत प्रसिद्ध झाला आहे. पाक्षिक सभांत वेळोवेळीं वाचलेले बहुतेक सर्व निबंध वार्षिक वृत्तांत छापले गेले आहेत; न छापलेल्या निबंधांचें टांचण ग्रंथाचे शेवटीं जोडूं. सदरहु छापील निबंधांत लेख विषयवारीनें लावलेले सापडणार नाहींत. कारण निबंधकारांकडून निबंध जसजसे तयार होऊन आले तसतसे छापले गेले आहेत.

प्रथम-संमेलनांत जे ठराव पसार करण्यांत आले त्यांपैकीं (१) श्रीशिवाजीस्मारक कमेटीच्या अध्यक्षांनीं लिहिल्या बरहुकुम स्मारक कमेटीचा निर्णय अद्याप झालीं नाहीं. वर्ष सहामहिन्यांत निकाल होईलशी आशा आहे. आपल्या विनंतिप्रमाणें कमेटीचा निर्णय अनुकुल झाल्यास संशोधनास अगर इमारतीस अगर दोहोंस हि चांगली मदत होईल. (२) महाराष्ट्र—कवि चालविण्याचें मंडळानें अंगावर घेतलें (प्रथम संमेलनवृत्त पृष्ठ ८०), व त्याप्रमाणें शके १८३५ सालीं मासिकाचे चार अंक अगदीं वक्तशीर बाहेर पडले. महाराष्ट्रांतील कवींनीं विचार-व-विकार-प्रदर्शन गेल्या हजारवर्षांत मुख्यतः संस्कृत प्राकृत अशा दोन द्वारांनीं केलेलें आहे, गद्य व पद्य अशा हि दोन्ही तऱ्हांनीं झालेलें आहे. तसेंच अशा सर्व प्रकारच्या सार-

स्वनाचा अन्तर्भाव मासिकांत करतां यावा म्हणून महाराष्ट्रीय-सारस्वत व महाराष्ट्र-कात्रि अशा दुहेरी नांवानें मासिक सुरू केलें. मासिकांत ग्रंथ संपादण्याचें काम वे. शा. सं. रा. पाठक शास्त्री, रा. रसाळ, रा. देव, रा. चांदोरकर व श्री. मुजूमदार यांनीं केलें आहे याबद्दल मंडळ त्यांचें ऋणी आहे. मासिक बक्षशीर निघालें हें आत्माराम छापखान्याच्या मालकांच्या लोभाचें फळ होय. मासिकास वर्गणीदार अति अल्प मिळाले आहेत. मंडळास पदर खर्चून मासिक चालूं ठेवावयाचें आहे. रा. वि. ल. भावे यांस पुरवावयाचा १५०० पृष्ठांचा मजकूर रा. देव यांनीं तयार केला आहे. तो ताब्यांत घेऊन सत्वर प्रसिद्ध करण्याबद्दल रा. भावे यांस विनंति केली आहे. (३) मंडळातर्फे संशोधन करण्याचे कामीं रा. आचार्य-कालगांवकर, रा. पोतदार व रा. पटवर्धन या त्रिवर्गास विनंति करावयाची. परंतु प्रत्येकास खर्चण्यास एक हजार रुपये संग्रहीं असल्याशिवाय या सद्गृहस्थांस विनंति करणें निरुपयोगी होतें. तेव्हां तो बेत सोडून या त्रिवर्गाकडून सवडीनुरूप जें संशोधन होईल त्या कामीं खर्च करण्यासाठीं वर्गणीनें जमलेल्या पैशाचा विनियोग करण्याचें ठरविलें आहे. (४) भारतीय इतिहास-अर्थशास्त्र-समाजशास्त्र-राजधर्मशास्त्र वगैरे शास्त्रांच्या अध्ययन-अध्यापनाची व्यवस्था करण्याबद्दलचीं विनंतिपत्रें येथील विश्वविद्यालयादि संस्थांस पाठविण्याचें ठरलें होतें. या च गोष्टींबद्दल विचार सध्यां विश्वविद्यालयादि-संस्थांत चालू आहे. त्यांच्या विचारें काय निर्णय ठरतो तो पाहून मग आपल्यास ज्या सूचना करावयाच्या त्या करणें रास्त होईल.

मंडळाच्या कामाबद्दलचे अनुकुल अभिप्राय, विविधज्ञानविस्तार, लोकशिक्षण, मासिक-मनोरंजन, केसरी, ज्ञानप्रकाश, मराठा, बांबे क्रॉनिकल, टाइम्स वगैरे वर्तमानपत्रांनीं व मासिकांनीं प्रकट केले आहेत त्यांबद्दल मंडळ त्यांचें आभारी आहे. क्वचित् मतभेद आहेत परंतु ती बाब गौण आहे. केसरी व ज्ञानप्रकाश पाक्षिक सभांचें वृत्त सवडीप्रमाणें प्रसिद्ध करून मंडळाच्या कामाबद्दल देशांत माहिती प्रसिद्ध करून लोकांत या कामाची आवड उत्पन्न करून मंडळास आपले ऋणी करीत आहेत.

मंडळास खालील गृहस्थांकडून पुस्तकें नजर मिळालीं आहेत. त्यांचा साभार स्वीकार केला आहे:—

रा. ब. का. ना. साने, रा. रा. द. वा. पोतदार, भाईसाहेब गुप्ते, बा. प्र. मोडक यांचे चिरंजीव, रा. गो. का. चांदोरकर, रा. अ. बा. बर्वे, रा. बा. दा. मुंडले.

मंडळातर्फे केलेल्या विनंतीस मान देऊन खालील संस्थांनीं व सद्गृहस्थांनीं पुस्तकें मंडळास मोबदल्यादाखल पाठविलीं आहेत. व पुढें प्रसिद्ध होणारीं पुस्तकें पाठविण्याचें कबूल केलें आहे. त्याबद्दल मंडळ त्यांचे आभारी आहे.

ना. आर. इ. एन्थॉवेन,

भावनगरचे दिवाण,

रॉयल एशिॲटिक सोसायटी (शाखा-मुंबई)

नागरी-प्रचारिणी सभा

त-गणपति शास्त्री (त्रावणकोर दरबार)

शके १८३५ सालीं खालील गृहस्थ मंडळाचे सभासद होते. मंडळाच्या कामाची माहिती देऊन नवीन सभासद मिळविण्याचे कामीं रा. अनंत विनायक पटवर्धन, रा. देव, रा. लक्ष्मण जनार्दन खरे, श्री मुजुमदार, रा. पटवर्धन वगैरे सभासदांनीं विशेष साहाय्य केलें. ज्या नांवापुढें *अशी खूण केली आहे ते गृहस्थ या सालांतील नवीन सभासद होत.

(अ) आश्रयदाते सभासद†

*श्रीमंत सर परशुरामराव भाऊसाहेब पटवर्धन के. सी. आय. ई.

संस्थान जमखंडी, जमखंडी

(आ) हितकर्ते सभासद

श्रीमंत नारायणराव गोविंद ऊर्फ बाबासाहेब घोरपडे

संस्थान इचलकरंजी इचलकरंजी

(इ) सभासद†

रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर बी. ए. एल्, एल्, बी.	पुणें
*रा. रा. कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर बी. ए.	पुणें
*रा. रा. मार्तंड त्रिंबक गद्रे इनामदार	पुणें
*श्री. व्यंकटराव तात्यासाहेब गुजर जहागीरदार	नागपूर
ना. गोपाळ कृष्ण गोखले बी ए. सी. आय. ई.	पुणें
*रा. रा. जगन्नाथ रघुनाथ घारपुरे बी. ए. एल्, एल्, बी. हायकोर्ट वकील	मुंबई
रा. रा. गोविंद काशीनाथ चांदोरकर बी. ए. एल्, एल्, बी वकील	धुळें
*रा. रा. मुकुंद रामराव जयकर एम्, ए, बार. ॲट्. लॉ.	मुंबई
*प्रोफेसर बळवंतराय कल्याणराय ठाकोर एम्. ए.	पुणें
*श्रीमंत रामराव अमृतराव ऊर्फ अबासाहेब डफळे सं. जत	जत
रा. रा. शंकर श्रीकृष्ण देव बी. ए., एल्, एल् बी, वकील	धुळें

† यादी अकारविल्हे

श्री. रा. विनायक नीलकंठ नातू इनामदार	पुणें
रा. रा. अनंत विनायक पटवर्धन बी. ए.	पुणें
*श्री. सरदार. गोविंद बळवंत पटवर्धन शास्त्री,	सांगली
*रा. ब. सीताराम विश्वनाथ पटवर्धन बी. ए.	पुणें
*रा. रा अनंत सखाराम फडके	भुसावळ
*रा. रा. सदाशिव रामचंद्र बखले बी. ए. एल्, एल्, बी. हायकोर्ट वकील.	मुंबई
*रा. रा. नारायण मल्हार बेदरकर बी. ए. एल्.एल्. बी. वकील	उमरावती
रा. रा. भास्कर वामन भट वकील	धुळें
रा. रा. विनायक लक्ष्मण भावे बी. एस. सी.	ठाणें
*रा. ब. विष्णु मोरेश्वर माहाजनि एम्.ए.	अकोलें
श्री. सरदार गंगाधरराव नारायण मुजूमदार,	पुणें
रा. रा. खंडेराव चिंतामण मेहेंदळे बी. ए. सरदार (चिटणीस)	पुणें
रा. रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे बी, ए, इतिहास-संशोधक	पुणें
*गं भा. श्री० रमाबाई रानडे	पुणें
रा. ब. चिंतामण विनायक वैद्य एम्. ए. एल.एल. बी.	कल्याण
*ना. रा. ब. गणेश कृष्ण साठे वकील	सोलापूर
रा. ब. काशीनाथ नारायण साने बी. ए, (अध्यक्ष)	पुणें

(ई) साधारण सभासद†

*रा. रा. बळवंत रामचंद्र अनगळ ॲडव्होकेट	उमरावती
*रा. रा. जयराम केशव असनारे बी. ए. बी. एल्	उमरावती
*रा. रा. गोपाळराव नारायण उकिडवे	सांगली
श्री मोरेश्वर चिंतामण ओंकार, सरदार	पुणें
*रा. ब. रावजी बाळाजी करंदीकर बी. ए. १	धारवाड
रा. रा. गणेश सखाराम खरे एंजिनियर	पुणें
*रा. रा. लक्ष्मण जनार्दन खरे एम्, ए. एल्, एल्, बी.	उमरावती
रा. रा. हरि गणेश गोडबोले बी. ए.	पुणें
*रा. रा. नरहर रामचंद्र घुडे	कारंजा
*रा. रा. नारायण गोविंद चापेकर बी. ए, एल् एल्, बी.	खेड
*रा. रा. रामकृष्ण रावजी जयवंत बी. ए, एल् एल्, बी.	उमरावती
*रा. रा. विश्वनाथ गणेश जावडेकर बी. ए, एल् एल्, बी.	धुळें
*रा. रा. अनंत विश्वनाथ टिळक, बी, ए, एल् एल्, बी.	धुळें
*रा. रा. रामचंद्र उमाकांत ढमढेरे	बडोदें

---

१ मयत † याची अक्षरचिन्हे.

*रा. रा. यशवंत स्वामीराव तिळगुळकर बी. ए, एल्, एल्, बी.	विजापूर
*रा. रा. हरि विठ्ठल तुळपुळे बी. ए, एल् एल्, बी.	पुणें
*रा. रा. सदाशिव महादेव दिवेकर	मुंबई
*रा. रा. यशवंत गोविंद देशपांडे बी. ए, एल् एल्, बी.	उमरावती
*रा. रा.पी. व्ही. कृष्णस्वामी नाईक	तंजावर
*रा. रा. गजानन घनःश्याम नाडकर्णी ॲडव्होकेट्	मुंबई
*श्री. रा. विनायकराव मोरेश्वर नातू इनामदार	पुणें
रा. रा. शिवराम महादेव परांजपे एम्, ए.	पुणें
*रा. रा. केशव आप्पा पाध्ये बी, ए एल् एल्, बी.	ठाणें
रा. रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर बी. ए.	पुणें
*रा. रा. विनायक चिंतामण पांडे बी. ए, एल् एल्, बी.	उमरावती
*रा. रा. श्रीकृष्ण व्यंकटेश पुणतांबेकर बी. ए, बार ॲट, लॉ.	पुणें
*रा, रा, दत्तात्रय शिवराम पुसाळकर वकील	एरंडोल
*रा. रा. केशव वामन ब्रम्ह बी. ए. एल् ,एल् बी.	उमरावती
*रा. रा. विष्णु काशीनाथ भागवत बी. ए, एल् एल्, बी.	अमळनेर
*रा. रा, राजाराम रंगनाथ भालेराव	पुणें
*रा. रा. नारायण बळवंत भिडे बी. ए, एल् एल्, बी.	पुणें
*रा. रा, बळवंत सखाराम भुसारी	पुणें
रा. रा. वासुदेव दामोदर मुंडले	इसलामपूर
*रा. रा. कृष्णाजी बळवंत मोघे, कारभारी	जमखंडी
*रा. रा. महादेव विष्णु मोडक बी, ए, एल एल्, बी	नंदुरबार
रा. रा. शंकर रामचंद्र राजे	पुणें
*रा. रा. वासुदेव विष्णु शिदोरे बी. ए, एल्, एल् बी.	धुळें
रा. रा. अच्युत सीताराम साठे एम्, ए, बी. एल्	उमरावती

(उ) सहानुभविक सभासद†

*रा. रा. द. वि. आपटे बी. ए. पोंडा	गोवा
रा. रा. नारायण बापूजी उडगीकर एम्, ए.	पुणें
*रा. रा. पांडुरंग वामन काणे एम्, ए; एल्, एल्, एम्.	मुंबई
*रा. रा. केशव बाजीराव कुळकर्णी	इंदापूर
*रा. रा वासुदेव वामन खरे	मिरज
रा. रा गोपाळ रावजी गोगटे बी, ए. एल्, एल्, बी.	भुसावळ

---

† यांची अकारविल्हे

रा. रा. दत्तात्रेय श्रीराम जोशी इनामदार	तळेगांवदाभाडे
*रा. रा. वामन दामोदर तळवलकर वकील	पुणें
*रा रा. महादेव गंगाधर दामले बी. ए, एल् एल्, बी	उमरावती
*रा. रा. रामचंद्र विनायक पटवर्धन बी. ए, एल् एल्, बी.	पुणें
*रा. ब. विठ्ठलराव नारायण पाठक बी. ए.	सातारा
रा. रा महादेव मोरेश्वर फडणीस इनामदार	पुणें
रा. रा. हरि रघुनाथ भागवत, बी. ए.	पुणें
रा. रा. चिंतामण गंगाधर भानु बी. ए.	पुणें
रा. रा. हरि गोविंद लिमये एम्. ए.	पुणें
*रा. रा. विष्णु नारायण वर्तक एम, ए, एल, सी. ई.	माळशिरस
*रा. रा. विनायक रामचंद्र सरज्योतिषी	पोंडा–गोवा

(ऊ) वहाते सभासद †

*रा. रा. कृष्णाजी विष्णु आचार्य कालगांवकर	पुणें
रा. रा. हरि नारायण आपटे	पुणें
रा. रा. रघुनाथ पांडुरंग करंदीकर, वकील	सातारा
*रा. रा. त्र्यंबक गुरुनाथ काळे	पुणें
*रा. रा. माधव विष्णु खरे, वकील	एरंडोल
*रा. रा. विष्णु दत्तात्रेय गोखले, एम्. ए.	पुणें
*रा. रा. मल्हारराव राघोबा जाधव	नेवासे
रा. रा. पांडुरंग नरसिंह पटवर्धन	पुणें
*नामदार रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे एम्. ए. बी. एम्. सी.	पुणें
रा. रा. रामकृष्ण दत्तात्रेय पराडकर	पुणें
रा. रा. दत्तो वामन पोतदार बी. ए.	पुणें
*रा. रा. अनंत वासुदेव फडणीस	पुणें
*रा. रा. नारायण विठ्ठल मावळणकर	पुणें
*रा. रा. विष्णु गोविंद विजापुरकर एम्. ए	तळेगांव–दाभाडे
*रा. रा. कृष्णाजी त्र्यंबक हसबनीस	पुणें

रा. ब. दत्तात्रेय बळवंत पारसनीस मंडळाचे सभासद आहेत परंतु कोणत्या वर्गांत नांव घालावयाचें ते त्यांनी अद्याप कळविलें नाहीं.

एकूण साल अखेरीस सभासद १०१ पैकी एक मयत.

---

† यादी अकारविल्हे

शके १८३५ सालीं मंडळाचा जमाखर्च पुढें दिल्याप्रमाणें झाला आहे:—

जमा	खर्च
१५०६–१२–० वर्गणी	३५६–०–० शके १८३४ चे दुसऱ्या सहामाहीचे वृत्ताची छपाई, बांधणी.
३९५–०–० देणगी	१४८–१४–० प्रथम संमेलनवृत्त छपाई, बांधणी
१०१–६–० पुस्तकविक्री	२९–६–० किरकोळ छपाई
६२–८–० मासिकाची वर्गणी	२०८–९–९ मासिकास खर्च चार अंकांचा
२०६५–१०–०	४६–७–३ टपाल खर्च
११०१–८–६	२५–०–० संशोधन खर्च
	२५–०–० बँकेत बुड
	११–०–० किरकोळ खर्च
	३९–३–० दफ्तर खर्च
	७४–९–६ कर्जाची फेड
	९६४–१–६

देणगीदाखल रा० भा. के. वेलणकर यांनी रक्कम रु० १०० व रा० बा. दा. हसबनीस यांनीं रु. ५० स्वयंस्फूर्तीनें दिले आहेत हें त्यांस विशेष भूषणावह आहे.

शके १८३५ सालांतली सभासदांची संख्या, व जमेच्या व खर्चाच्या रकमांची मागील तीन सालांच्या संख्यांशीं तुलना करून पाहिली असतां मंडळाची हरएकप्रकारें प्रगति झाल्याचें दिसून येईल. म्हणून आपलें आपण च अभिनंदन करावेसें वाटणें अगदीं साहजिक आहे. परंतु इतक्या सभासदांनीं अटोकाट प्रयत्न चालविले असतांना हि आपली प्रगति इतक्या मंदगतीनें व्हावी याचें मला सखेदाश्चर्य वाटत आहे. आज सरासरीनें वार्षिक उत्पन्न १५०० रुपयांचे धरण्यास हरकत नाहीं. खर्चाच्या रकमा ठोकळपणें (१) वार्षिकवृत्त छपाई खर्च रु. ६०० (२) सारस्वताच्या मासिकाचा छपाईखर्च रु. ६०० आहे. इतिहासाच्या मासिकास सुरवात करण्याबद्दल फार निकडीचीं पत्रें सभासदांकडून येत आहेत. व तें मासिक लवकर सुरू केलें पाहिजे. त्यास सुमार २५००-३००० रु. खर्च यावा. शिवाय किरकोळ छपाई व टपाल खर्च आहेत च. हे व इतर वाढते खर्च भागवावे कसे याची कार्यकारी सभासदांस सारखी विवंचना लागून राहिली आहे. तसें च या कामीं अवश्य लागणारा (१) प्राच्य-पाश्चात्य संदर्भग्रंथसंग्रह केला पाहिजे व. कारण पुरेशी माहिती न मिळून, आधार तपासा-

वयास न मिळाल्यामुळें केलेलें मतप्रकाशन भीतभीत च करावें लागेल. निरनिराळ्या सभासदांच्या जवळ झालेला संग्रह सुरक्षित रहावा म्हणून (२) अग्निबाधाविरहित असें संग्रहालय उभारण्याचा व ते चालविण्याचा विचार व्हावा व (३) प्रांतोप्रांतीं पांगलेलीं साधनसामुग्री गोळा करून आणण्यासाठीं मंडळास ठिकठिकाणीं प्रतिनिधि पाठवितां येतील इतकें मनुष्यबळ आपण जमविण्याचा निश्चय केला पाहिजे.

या व असल्या इतर प्रश्नांचा समाधानपूर्वक निकाल लावून मंडळाची कार्यपरंपरा अखंड कायम ठेवून मंडळ जास्त जास्त कार्यक्षम होत जाईल अशी उपाययोजना करण्याबद्दल व आहे असा च लोभ कायम ठेवून वृद्धिंगत करण्याबद्दल सर्वांस विनंति करून मी आपली रजा घेतों.

वैशाख व. ११। शके १८३६
भारत-इतिहास-संशोधक-मंडळाचें
कार्यालय

खंडेराव चिंतामण मेहेंदळे
(चिटणीस)